Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578



# *Journal of Research and Development*

*A Multidisciplinary International Level Referred Journal*

**April-2021 Volume-11 Issue-10**



## *Recent Trends in Social Sciences*

**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
**'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)**

**Guest Editor**
**Dr. R. B. Chougule**
**I/C Principal,**
**Kankavli College, Kankavli,**
**(Maharashtra)**




**Executive Editors**
**Dr. S. N. Patil**
**Dr. R. A. Mumbarkar**
**Mr. Y. V. Mahalinge**

Co- Editors
**Dr. S. D. Kadam**
**Lt. (Dr.) B. L. Rathod**
**Mr. T. N. Jaykar**







**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*April-2021 Volume-11 Issue-10*

*On*

## Recent Trends in Social Sciences

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Guest Editor**
Dr. R. B. Chougule
I/C Principal,
Kankavli College, Kankavli, (Maharashtra)

**Executive Editors**
**Dr. S. N. Patil**
**Dr. R. A. Mumbarkar**
**Mr. Y. V. Mahalinge**

Co- Editors
**Dr. S. D. Kadam**
**Lt. (Dr.) B. L. Rathod**
**Mr.T.N.Jaykar**

Editorial Board

| | | |
|---|---|---|
| *Dr. A. K. Farakate* | *Dr.B.G.Gawade* | *Dr. S. T. Disale* |
| *Mr. S. B. Patil* | *Mr. S. S. Rane* | *Dr. M. P. Chavan* |
| *Mr. G. A. Tekale* | *Mr. S. M. Sonawane* | *Mrs. V. V. Rasam* |
| *Mr. S. R. Darpe* | *Mr. V. P. Ilkar* | *Mr. A. M. Umrikar* |

**Published by-** Principal, Kankavli College, Kankavli (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

# CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | आर्य समाजाचे सामाजिक कार्य<br>*प्रा. माणिकराव शामराव चव्हाण* | 1-3 |
| 2 | स्थानिक इतिहास – इतिहास लेखनातील नवीन प्रवाह<br>*प्रा. डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील* | 4-6 |
| 3 | भारतीय सर्कशीचा उगम व स्वरूप एक:अभ्यास<br>**प्रा.डॉ.चंद्रकांत शिवराम गिरी** | 7-9 |
| 4 | अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचा जमीन बळकाव लढा<br>**प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर** | 10-15 |
| 5 | ग्रामीण विकास पर पारिस्थितिकीय एवं पर्यावरणीय प्रभाव : नालंदा जिला के संदर्भ में<br>**पूरन चन्द** | 16-19 |
| 6 | पश्चिमी चम्पारण जिला में थारू जनजाति की कृषि समस्यायें: एक भौगोलिक अध्ययन<br>**कुमार गौरव** | 20-23 |
| 7 | भूमि उपयोग में परिवर्तन एवं भूमि प्रबन्धन पूर्वी चम्पारण जिला के संदर्भः एक भौगोलिक विश्लेषण<br>**रणधीर कुमार रंजन** | 24-27 |
| 8 | मुंबईचे शिल्पकार जगन्नाथ शंकर शेठ<br>*प्रा. माणिकराव शामराव चव्हाण* | 28-29 |
| 9 | रायगड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसाय आणि रोजगार संधी<br>*डॉ. राजाराम महादेव थोरात* | 30-35 |
| 10 | कोरोना महामारी आणि सामाजिक बदल<br>*अंकुश रामराव शिंदे, अभिजीत बाबासाहेब कदम* | 36-39 |
| 11 | कोरोना आणि जगाचे कृषी क्षेत्रातील बदलत जाणारे अर्थकारण<br>*नेहा अशोक चव्हाण* | 40-42 |
| 12 | भारताची कर्ज समस्या आणि व्यवस्थापन<br>*प्रज्ञा प्रदीप तांबे* | 43-45 |
| 13 | रुपयाचे अवमूल्यन आणि भारतीय अर्थव्यवस्था<br>*लेफ्टनंट प्रा.डॉ.एम.आर.खोत* | 46-49 |
| 14 | ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण<br>हर्षदा सुरेंद्र गुरव | 50-52 |
| 15 | पूर्व विदर्भातील स्वदेशी आंदोलन<br>*डॉ.गजानन बापुराव ठाकरे* | 53-56 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील पाश्चात्य महिलांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास<br>*डॉ. पौळ भावना श्रीपती* | 57-63 |
| 17 | चंद्रसेन विराट की ग़ज़लों में राजनीतिक बोध<br>*श्री.भिकाजी व्हन्नाप्पा कांबळे* | 64-67 |
| 18 | ठाणे जिल्ह्यातील हवा प्रदूषण आणि त्याचे मानवी आरोग्यावरील परिणामांचा अभ्यास करणे<br>*श्री दिपक हिलाल महाजन, डॉ. सुरेश जे. फुले* | 68-69 |
| 19 | सामाजिक विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>*प्रा. सोनकांबळे अरूण विठ्ठल* | 70-71 |
| 20 | अन्न सुरक्षा (Food Security)<br>*कु. महेंद्र सर्जेराव महानोर* | 72-73 |
| 21 | सुनगाव जि बुलडाणा येथील तीन ऐतिहासिक बारव<br>*डॉ. श्याम प्रकाश देवकर* | 74-77 |
| 22 | आत्मनिर्भरतेतून समृध्दीकडे जातांना मराठवाड्याच्या विकासात व्यापारी पिकांच्या भूमिका<br>*पवार प्रियंका जयराम, गीता दिलीप उगले* | 78-83 |
| 23 | आधुनिक नकाशाशास्त्र : GIS व रिमोट सेन्सिंगचे भूगोलशास्त्रात महत्व<br>*डॉ. बबन क. सिनगारे* | 84-87 |
| 24 | महाराष्ट्राच्या शेतीवर हवामान बदलाचे परिणाम व व्यवस्थापन<br>*प्रा. डॉ. घार एस. जी.* | 88-90 |
| 25 | सामाजिक परिवर्तनात मानसशास्त्राची भूमिका<br>*प्रा.मुंगूसकर अनिल मधुकर* | 91-93 |

| | | |
|---|---|---|
| 26 | देगाव पाटेश्वर लेणी एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ<br>*प्रा. राहुल किसन गंगावणे* | 94-95 |
| 27 | आधुनिक विपणन व्यवस्थापन आणि जागतिकीकरण<br>*प्रा. संगिता गंगाराम उतेकर, डॉ. सुधाकर भाऊराव टेलके* | 96-99 |
| 28 | महिला सशक्तिकरण में सोशल मीडिया की भूमिका<br>*रीना शर्मा* | 100-101 |
| 29 | पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात असलेल्या कुपोषण समस्येचा अभ्यास<br>*डॉ.रविंद्र भा.घागस, श्री.दीपक जनार्दन कडू* | 102-105 |
| 30 | निवडक मालवणी कवी आणि त्यांची कविता<br>*डॉ. सतीश कामत* | 106-110 |
| 31 | रासायनिक कीटकनाशकांचा वसुंधरेवर होणारा दुष्परिणाम व उपयोजनात्मक नैसर्गिक कीटकनाशकांचे गुणधर्म - एक चिकित्सक अभ्यास<br>**सौ लोंढे एस. आर.** | 111-113 |
| 32 | ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणातील समस्यांचा चिकित्सक अभ्यास<br>*सौ लोंढे शुभांगी राजेंद्र* | 114-116 |
| 33 | सर्व शिक्षा अभियानाचा चिकित्सक अभ्यास ." संदर्भ;- तालुका -वसई , जिल्हा :- पालघर.<br>*सौ नलिनी संजय गायकवाड* | 117-118 |
| 34 | जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम<br>*प्रा. डॉ. राजेंद्र आराम मुंबरकर* | 119-121 |
| 35 | "महात्मा गांधींच्या विचारातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास" संदर्भ- राळेगणसिद्धी, जिल्हा- अहमदनगर<br>*प्रा. नितिन वि. खरात, डॉ. रविंद्र भा. घागस* | 122-123 |
| 36 | घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>*डॉ. विद्या शरद मोदी* | 124-127 |
| 37 | पेशवे घराण्यातील स्त्रियांचे राजकीय योगदान<br>*प्रा. डॉ. निलीमा राऊत* | 128-132 |
| 38 | कोकनातील देवराईमधील वनस्पतीचा अभ्यास<br>*प्रा.डॉ.पी.डी.गाथाडे* | 133-138 |
| 39 | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शोषित वर्गाचे चित्रण<br>*प्रा. जगदीश पांडुरंग राणे* | 139-141 |
| 40 | हिंदी उपन्यासों में किन्नर विमर्श का सामाजिक यथार्थ<br>**डॉ. संतोष रघुनाथराव रायबोले** | 142-145 |
| 41 | पेशवे कालीन श्रावणमास दक्षिणा<br>*प्रा. डॉ. निलीमा राऊत* | 146-148 |
| 42 | चिनी प्रवासी -: प्रवासवर्णन आणि बौद्ध धर्म<br>*सुनील पंडित वाघमोडे* | 149-151 |
| 43 | सामाजिक वास्तवाचा अविष्कार - युगानुयुगे तूच<br>*सीमा हडकर* | 152-155 |
| 44 | सहकारातून आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास<br>*सौ. योगिनी जयवंत पाटील* | 156-158 |
| 45 | शेती व्यवसायात स्त्री शेतकरी संख्येत वाढ करणे ही काळाची गरज<br>*डॉ. जयवंत काशिनाथ पाटील* | 159-161 |
| 46 | चालुक्यकालीन स्थापत्य कलेचा नांदेड जिल्हातील उत्कृष्ट अविष्कार- होट्टल<br>*डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे* | 162-164 |
| 47 | मराठवाडा मुक्ती संग्रामातील दलितांचे योगदान<br>**प्रा. डॉ. ज्ञानोबा कदम, प्रा.सत्यवान राणे** | 165-169 |
| 48 | महिला सक्षमीकरण<br>*सौ. सुचिता रमेश म्हात्रे* | 170-173 |
| 49 | समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>*डॉ. भागवत सुभाष गजधाने* | 174-175 |
| 50 | सविन्धान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>*डॉ.देविदास हारगिले* | 176-177 |
| 51 | पंचवार्षिक योजनांमधील बदलते कृषी धोरण<br>**सचिन आर. दर्पे** | 178-181 |

| | | |
|---|---|---|
| 52 | सरोगेसी मदर- एक परामर्श<br>***Prof.Tendolkar Dipa dattaram.*** | 182-185 |
| 53 | उमाजी नाईक यांच्या जीवनातील उपेक्षित पैलू<br>***प्रा.सुमन केंद्रे*** | 186-188 |
| 54 | Significance of Sindhudurg Fort Through The Perception of Malvan Tourism<br>***Jyoti Buwa*** | 189-193 |
| 55 | महाराष्ट्र राज्यातील महिला स्वयंसहायता बचत गट व महिलांचा विकास<br>**सौ.विनया विक्रांत रासम** | 194-198 |
| 56 | महिला ग्रा.प. लोकप्रतिनिधीच्या विकासात मागासक्षेत्र अनुदान निधीची भूमिका<br>***प्रा. सोनवणे एस.एम., डॉ. कालिदास भांगे*** | 199-203 |
| 57 | ग्रामीणांचे जमीन हक्क व भूसंपादन कायदा: स्थिती व वास्तव<br>***श्री. अनंत कदम, डॉ. सुभाष सावंत, प्रा. चंद्रप्रभा निकम*** | 204-209 |
| 58 | दलित कथेचे शिल्पकार: बाबुराव बागुल<br>**प्रा. डॉ. सोनवले राजकुमार रंगनाथ** | 210-211 |
| 59 | भारतीय लोकतंत्र के सक्षम चुनौतियाँ एक विवेचनात्मक दृष्टिकोण<br>**आशा नागर** | 212-216 |
| 60 | सांगली जिल्ह्यातील महिला शेतमजुरांच्या समस्या<br>**राणी महादेव कांबळे** | 217-218 |
| 61 | महिला सक्षमीकरणात स्वयंसेवी संस्थांची भूमिका संदर्भ युसुफ मेहेरअली सेंटर तारा पनवेल रायगड<br>**डॉ. रमेश प. म्हात्रे** | 219-221 |
| 62 | ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च, तंत्र व कौशल्य शिक्षण / प्रशिक्षणाच्या असुविधा आणि गळतीची कारणे<br>**संतोष नारायण निकम** | 222-226 |
| 63 | सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासात कोकण रेल्वेची भूमिका<br>**विश्वास मुळीक** | 227-230 |
| 64 | डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केलेले कार्य<br>**पंकज चंद्रशेखर जयस्वाल** | 231-234 |
| 65 | साहित्य आणि चळवळी<br>**प्रा. रामचंद्र गायकवाड** | 235-237 |
| 66 | आधुनिक महिलांचा आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याविषयीचा अभ्यास<br>**डॉ. सौ. हेमलता आनंद सावंत** | 238-239 |

# आर्य समाजाचे सामाजिक कार्य

*प्रा. माणिकराव शामराव चव्हाण*

*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल*

**प्रस्तावना-**

जगामध्ये व भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक सुधारणाच्या ज्या काही चळवळी झाल्या त्यामध्ये आर्य समाजाचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. हिंदू धर्मातील वाईट चालीरीती यांच्यावर प्रकाश टाकून त्या बंद कशा होतील त्यासाठी आर्य समाजाने महत्वाचे काम केलेले आहे. आर्या समाजाने प्राचीन भारतातील संस्कृतीतील शासन मानवी समाज मूल्यांचे महत्व सांगून त्यातील अमर तत्वज्ञान सांगण्याचे कार्य केले. स्वामी दयानंद सरस्वती व त्यांचा आर्य समाज यांनी पुन्हा हिंदू धर्माला उभारी आणली. हिंदी धर्मातील अनिष्ठप्रथांना विरोध करतानाच त्यांनी हिंदू संस्कृतीची महानता जगाला सांगितली. वैदिक काळात भारतीय संस्कृती चांगली प्रगत झालेली होती. वर्णाश्रम पद्धतीच्या समाज रचनेचे तत्वज्ञान त्यांनी स्पष्ट केले. अशा जेष्ठ आणि श्रेष्ठ धर्मातील दोष दूर करण्यासाठी पाश्चात्य धर्मातील तत्वज्ञानाची गरज होती. हिंदू धर्माला बदलण्याचा प्रयत्न करून हिंदू धर्माभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला.

**स्वामी दयानंद सरस्वती -**

आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी केली. त्यांचा जन्म इ. स. १८२४ मध्ये गुजरात मधील टंकारा या लहानशा गावी झाला. त्यांचे घराणे ब्राह्मण होते. तसेच त्यांचे मूळ नाव मूळशंकर होते. त्यांचे वडील अंबा शंकर हे सनातनी व धार्मिक विचारांचे होते. शिव हे ह्या घराण्याचे कुल दैवत होते. त्यामुळे धार्मिक वातावरणात मूळशंकर हे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा प्रसंग महाशिवरात्री दिवशी त्यांच्या वयाच्या १४ व्या वर्षी घडला. ते वडिलांच्या बरोबर शिव उपासना करण्यासाठी रात्रीच्या वेळी शिव मंदिरात गेले असताना त्यांनी त्या मंदिरातील शिव पिंडीकडे एक चित्ताने पाहत असताना त्यांना एक विचित्र चित्र दिसले ते म्हणजे महादेवाच्या पिंडीवर उंदीर फिरत असलेला व देवापुढील नैवेद खात असलेला त्यांना दिसले. हे पाहिल्यानंतर मूर्ती पूजेबद्दल त्याच्या मनात शंका निर्माण झाली. मूर्ती मध्ये परमेश्वर नाही त्यामुळे मूर्तीपूजा योग्य नाही असे त्यांना वाटू लागले त्यामुळे त्यांनी वडिलांना काही गोष्टी विचारल्या परंतु त्या गोष्टीचे व शंकांचे उत्तर वडिलांच्याकडून मिळाले नाही. त्यमुळे स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मनात धर्माबद्दल जिज्ञासा वाढीस लागली ती म्हणजे परमेश्वराचे सत्य स्वरूप समजून घ्यावे आणि देवाच्या नावाने चाललेले भ्रष्टाचार, वाईट चालीरीती दूर करावेत.

सन १८४५ साली त्यांच्या घरात त्यांच्या लग्नाची बोलणी सुरु झली त्यावेळी त्यांना वाटले कि आपण जर लग्नाच्या पाशात अडकलो तर आपल्या प्रश्नांची उत्तरे आपणास कधीच मिळू शकणार नाहीत म्हणून ते घरातून निघून गेले. सन १८६० पर्येत त्यांनी भारतात ठिकठिकाणी संचार केला व सत्य ज्ञानाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला व त्याच वर्षी त्यांनी थोर पंडित स्वामी विराजानंद सरस्वती यांना गुरु म्हणून स्वीकारले. मथुरा या ठिकाणी राहून हिंदू धर्माचे तत्वज्ञान प्राप्त केले. पाणिनी व पतंजली चा अभ्यास केला व सरस्वती संप्रदायातून संन्यास घेतला त्यानंतर त्यांनी दयानंद सरस्वती असे नाव धारण केले. हिंदू धर्माचे तत्वज्ञान लोकांना पटवून सागण्यासाठी त्यांनी संपूर्ण भारताचा प्रवास केला. ते संस्कृत मधून प्रवचने करीत आपल्या तत्वज्ञानाच्या प्रचारासाठी त्यांनी पुस्तके प्रकाशित केली. वैदिक धर्माचे पुनर्जीवन करण्यासाठी आणि वैदिक तत्वज्ञानाच्या प्रचारासाठी स्वामी दयानंद यांनी इ. स. १८७५ मध्ये मुंबौ येथे आर्य समाजाची स्थापना केली आणि त्या संघटनेमार्फत समाज सुधारणेची चळवळ राबवली.

आर्य समाज या संघटनेची भारतातील सर्व थरापर्येत धार्मिक तत्वज्ञानाचा प्रसार होण्यास मदत झाली. ज्या रानडे व महाराष्ट्रातील इतर लोकांच्या सांगण्यावरून ते प्रवचन देण्यासाठी पुणे येथे आले. जाती भेद मानु नका, वेदांचे अध्ययन समाजातील सर्व लोक करू शकतात. मूर्तीपूजा करू नका असा संदेश त्यांनी लोकांना दिला. त्यांच्या प्रवचनाचा प्रभाव पडल्यामुळे लोकांनी त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढण्याचे ठरविले पण सनातनी धर्म मार्तंडाना हे विचार मान्य नव्हते म्हणून त्यांनी गाढवाची मिरवणूक काढण्याचे ठरविले. गर्भानंद कि जय अशा घोषणा देवून त्यांनी स्वामींजीच्या मिरवणुकीवर हल्ला चढवला. स्वामींनी पुढे लाहोर येथे आर्य समाजाची एक शाखा काढली तीच पुढील काळात मुख्य झाली इ. स. १८८३ मध्ये स्वामी मृत्यू पावले त्यांच्या मृत्यू नंतर लाला लजपतराय, लाला हंसराज, श्रद्धानंद पंडित गुरुदत्त इ. नी हे कार्य पुढे नेटाने सुरु केले.आर्य समाज चळवळीने शिक्षण क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली. स्वामींनी वैदिक वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार केला. हिंदी धर्मातील वाईट प्रथांवर त्यांनी कठोर जाती व्यवस्थेची निर्भत्सना केली. यावेळी त्यांनी हिंदू धर्माला चांगले स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी धार्मिक व सामाजिक सुधारणा करण्याबरोबर शैक्षणिक प्रसाराचे कार्य केले.

**आर्य समाजाची तत्वे -**

या संघटनेने भारतात वैदिक धर्मातील तत्वज्ञान आणि आधुनिक बुद्धीजीवी विचार यांची सांगड घालून आपले तत्वज्ञान तयार केले होते. या संघटनेने वेदांचा अभ्यास केला पाहिजे असे सांगितले. समाज रचनेसाठी वर्ण पद्धतीचा

पुरस्कार केला. चातुर्य वर्ण जन्मावर आधारलेले नसून कर्मावर आधारलेले असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. आर्य समाजात सर्व जाती धर्मांच्या लोकांना प्रवेश होता. अशा या आर्य समाजाची तत्वे खालीलप्रमाणे

१. ईश्वर हाच खऱ्या तत्वज्ञानाचे मूळ असून सर्व वस्तू त्यांच्या स्वरुपात ज्ञात आहेत.

२. ईश्वर सच्चिदानंद असून तो आनंदी, अनंत, निराकार,, सर्व साक्षी, अमर व पवित्र आहे.

३. वेद हे त्या ईश्वरापासून निर्माण झाले आहेत, त्यामुळे जे सत्य आहे त्याचे अध्ययन करणे, त्याचा प्रसार करणे हे प्रत्येक आर्याचे परम पवित्र कर्तव्य आहे.

४. प्रत्येक व्यक्तीने असत्याचा त्याग करून सत्याचा स्वीकार करावा.

५. सद्गुणांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी प्रत्येकाने चांगले व वाईटच विचार करावा.

६. मानव जातीचा भौतिक, आध्यात्मिक, व सामाजिक उन्नती करून मानवाचे कल्याण साधने हाच आर्य धर्माचा मूळ उद्देश आहे.

आर्य समाजाने सामाजिक कल्याणासाठी वरील विचार मांडले आहेत.

**वेदाकडे चला -**

सर्व ज्ञानाचा उगम वेदातून झाला आहे. त्यामुळे वेदांच्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. वेद हेच खरे धर्म ग्रंथ आहेत. वेदकालीन समाज व्यवस्था हि आदर्श समाज व्यवस्था होय. अशी आर्य समाजाची विचारसरणी होती. आचार्य जावडेकर आर्य समाजच्या तत्वज्ञानाच्या बद्दल म्हणतात परमेश्वराच्या शुद्ध स्वरूपाचे ज्ञान वेदात असून, वेदांचे अध्ययन करणे हे प्रत्येक हिंदूचे कर्त्यव्य आहे. चातुर्य वर्ण हे जन्म सिद्ध नसून गुण व कर्मावर अवलंबून असावेत आणि ज्यांच्या अंगी गुण असतील त्याला त्या वर्णाचा अशिकार प्राप्त व्हावा . वेदकालानंतर हिंदू समाजात जे बदल झाले ते आर्य समाजाला मान्य नाहीत. स्वामीनी बाल विवाहास विरोध करून, स्त्री शिक्षण व विधवा विवाहास प्रोत्साहन दिले. वैदिक धर्माचे दरवाजे सर्व धर्मियांना खुले असावेत यासाठी त्यांनी शुद्धीकरण चळवळ हाती घेतली होती. मुतीपुजा, स्त्री दास्य, अस्पृश्यता इत्यादी समाजातील दोषावर स्वामींनी आक्रमक हल्ला चढवला त्यावेळी सनातनी हिंदुनी त्यांना खूप विरोध केला. तरी हि त्यांनी आपले कार्य शेवटपर्यंत चालू ठेवले होते. १८३३ ला त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या अनुयायांनी कार्य नेटाने चालू ठेवले.

**शुद्धीकरण चळवळ -**

आर्य समाजाने केलेल्या प्रमुख कार्यात शुद्धीकरण चळवळ अत्यंत मौलिक आहे. हिंदू धर्माच्या कर्मठपणामुळे धर्मांतर केलेल्या व्यक्तींना परत हिंदू धर्मात येण्यास मज्जाव होता. पण आर्य समाजाने परत स्वधर्मात येण्याची वाट मोकळी केली. हिंदुस्थानात ऐक्य प्रस्थापित करणे हा या शुद्धीकरण चळवळ मागील प्रमुख हेतू होता.

**शैक्षणिक कार्य -**

आर्य समाजाने शैक्षणिक प्रसाराच्या कार्यात हि महत्वाची भूमिका पार पडली आहे. त्यांनी देशात अनेक शैक्षणिक संस्था काढल्या त्याद्वारे ज्ञानदानाचे कार्य चालू केले. बहुजन समाज धार्मिक व सामाजिक क्षेत्रात गलितगात्र झालेला होता त्यांना धर्मज्ञान नव्हते. अनेक अनिष्ठ व वाईट चालीरीती मुळे धर्मास विकृती प्राप्त झाली होती. अशा धार्मिक पद्धतीना धक्का देण्यासाठी बहुजन समाजाला धर्म मार्तंड यांच्या जोखडातून सोडवण्यासाठी, बौद्धिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून दिले. तसेच त्यांची उन्नती करण्यासाठी आणि जातीयतेच्या भूतांना मुठमाती देण्यासाठी महात्मा फुले यांनी याच काळात कार्य चालविले. आर्य समाजाचे पाईक लाला हंसराज यांनी लाहोर येथे दयानंद अंग्लो वैदिक स्कूल हि संस्था स्थापन केली त्याचे पुढे महाविद्यालयात रुपांतर झाले. या ठिकाणी इंग्रजी बरोबरच वैदिक धर्माचे शिक्षण दिले जात होते. या संस्थेतील अभ्यासक्रम आर्य समाजाच्या वैदिक पुन्र्स्थानाच्या ध्येयाशी जुळणारा नसल्यामुळे जुन्या गुरुकुल पद्धतीचे शिक्षण देणारी गुरुकुल योजना श्रद्धानंद यांनी सुरु केली. याठिकाणी हिंदी भाषेतून शिक्षण दिले जात होते. नैतिक शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले होते. आर्य समाजाने ज्याप्रमाणे भारतात जे सुधारणांचे कार्य केले ते सर्व महाराष्ट्रात सुद्धा सुरु केले होते. या समाजाच्या वतीने कोल्हापूर, सोलापूर, मुंबई येथे शैक्षणिक कार्य केले गेले. आज हि या समाजाचे सोलापुरात दयानंद महाविद्यालय शैक्षणिक क्षेत्रात योगदानाचे कार्य करीत आहे.

आर्य समाजाचे गरीब व अनाथ, विधवा यांच्यासाठी आश्रम उघडले, स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी या समाजाने प्रयत्न केले. पिडीताना सह्हाय करण्यात हा समाज सदैव अग्रेसर होता. राजकीय कार्य कर्वे समाजसुधारक व आर्य समाजाचे विचार पसरीत करण्यासाठी लाला लजपतराय यांनी टिळक स्कूल ऑफ पोलिटिक्स हि संस्था सुरु केली. आर्य समाज फक्त वेदांनाच स्वतः प्रमाण मानतात आणि इतर जेवढे वेदानुकुल असेल तेवढेच ग्राह्य समजतो. वेद प्रामाण्य हे आर्य समाज शिकवणुकीचे खरे गमक आहे आर्य समाज त्रैतेयवादी आहे. प्रकृती, जीव व परमेश्वर अनादी व अनंत असे तो मानतो. परमेश्वराच्या भक्तीसाठी मध्यस्थांची गरज नाही. दैववाद व अवतार वादावर समाजाचा

विश्वास नाही. आर्य समाजाच्या कार्यामुळे हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व पुन्हा सिद्ध झाले. या आर्य समाजाने संपूर्ण देशातील हिंदू धर्मीय लोकांच्या मनात अभिमान जागृत केला हे सिद्ध होते.

**स्वराज्य प्रेम व राष्ट्राभिमान निर्माण केला -**

आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेतला. राजकीय स्वातंत्र्य प्राप्ती हे दयानंद यांचे प्रथम ध्येय होते. विदेशी वस्तूंचा बहिष्कार व स्वदेशी वस्तूंचा वापर त्यांनीच प्रथम लोकांना शिकवला. हिंदू लोकांच्या अंतःकरनात राष्ट्रभक्ती ची भावना त्यांनी निर्माण केली. यामधून भारतीय समाजात राष्ट्राभिमान निर्माण झाला.

अशा प्रकारे आधुनिक भारताच्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीत आर्य समाजाचे स्थान श्रेष्ठ दर्जाचे आहे. सुप्रसिद्ध पश्चिमात्य लेखक हान्स कोह्न्स म्हणतात २० व्या शतकातीलभारताची पायाभरणी आर्य समाजाने केली. वरीलप्रमाणे आर्य समाजाचे कार्य दिसून येते.

**संदर्भ-**

१. जनार्धन वाघमारे , "स्वामी दयानंद सरस्वती", कीर्ती प्रकाशन औरंगाबाद

२. मेघा अंबिके,  "स्वामी दयानंद सरस्वती", मंजुळ प्रकाशन नागपूर

# स्थानिक इतिहास – इतिहास लेखनातील नवीन प्रवाह

**प्रा. *डॉ. अशोक ज्ञानदेव पाटील***
*श्री. मनोहर हरी खापणे कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, पाचल*

**सारांश–**

'इतिहास' या शब्दाची फोड 'इति + ह + आस' म्हणजे असे असे घडले अशी केली जाते. गतकाळात घडलेल्या निवडक घटनांचा अर्थ लावला की इतिहास आकाराला येत असतो. इतिहासकार विविध प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे इतिहास लेखन करीत असतो. इतिहास म्हणजे केवळ भूतकाळातील राजकारण आणि वर्तमानकाळातील राजकारण म्हणजे भविष्यातील इतिहास हा विचार आता मागे पडला आहे. इतिहासाच्या अभ्यासामध्ये राजकीय बाजू व्यतिरिक्त इतर सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक घटकांनाही अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. आधुनिक काळात इतिहास लेखन शास्त्रामध्ये अनेक इतिहास लेखनाचे नवनवीन प्रवाह उदयास आले आहेत. त्यापैकी स्थानिक इतिहास या लेखन प्रवाहाचा अभ्यास करणे हा या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे. आधुनिक काळात इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासामुळे आंग्लवादी, राष्ट्रवादी, प्राच्यविद्यावादी, मार्क्सवादी, सबाल्टर्न, इ. इतिहासलेखन प्रवाह निर्माण झाले आहेत. या प्रवाहाबरोबरच प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास लेखन हे नवे प्रवाह आता उदयास येऊन ते महत्वाचे ठरू लागले आहेत. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक इतिहासाचा अभ्यास करताना अभ्यासकांनी विशेष काळजी घेतल्यास याप्रकारचा अभ्यास इतिहास लेखनात उपयुक्त भर टाकू शकतो. स्थानिक इतिहास लिहीताना इतिहासकार त्या ठिकाणच्या लोकांच्या आपल्या जन्मभूमीविषयी ज्या स्वाभाविक भावना असतात त्या भावना व ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असणारी व्यक्ती यांच्या आधारे इतिहास लेखन करतो. कधी स्वतःच्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करून त्याच्याकडून वदवून घेतलेल्या मौखिक इतिहासाच्या रूपात मांडत असतो. त्यामुळे मौखिक इतिहास हा स्थानिक इतिहासासाठी आवश्यक घटक मानला जातो. स्थानिक इतिहासाचे संशोधन करताना गावांच्या नावाची व्युत्पत्ती, भौगोलिक, सामाजिक रचना, धार्मिक व सांस्कृतिक जीवन, आर्थिक घटक, राजकीय व प्रशासकीय घटक या मुद्यांच्या आधारे स्वतंत्रपणे लेखन करणे आवश्यक आहे.

**प्रास्ताविक-**

अनेक इतिहासकारांनी इतिहासाच्या वेगवेगळया व्याख्या केलेल्या आढळतात. तरीही 'इतिहास' या शब्दाची फोड 'इति + ह + आस' म्हणजे असे असे घडले अशी केली जाते.१ गतकाळात घडलेल्या निवडक घटनांचा अर्थ लावला की इतिहास आकाराला येत असतो. इ. एच. कार यांच्या मते, 'भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद म्हणजे इतिहास होय. इतिहासकार भूतकाळातील ठराविक घटना निवडून त्याबद्दल आपले स्पष्टिकरण सादर करतो त्यालाच इतिहास असे म्हणतात.'२ इतिहासकार विविध प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे इतिहास लेखन करीत असतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे इतिहासाबद्दल म्हणतात, 'विशिष्ट काल, विशिष्ट स्थल व विशिष्ट व्यक्तीचे विशिष्ट आचरण हे तीन घटक एकत्र येवून प्रसंग ही वस्तू बनली जाते व अनेक प्रसंगांच्या व्यवस्थित संततीपासून इतिहास म्हणून ज्या वस्तूस म्हणता येईल तिची निर्मिती होते.'३ त्यांनी इतिहासामध्ये फक्त राजकीय घटनांचाच अभ्यास नसून मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचा अभ्यास होत असतो असे सांगितले. इतिहास म्हणजे केवळ भूतकाळातील राजकारण आणि वर्तमानकाळातील राजकारण म्हणजे भविष्यातील इतिहास हा विचार आता मागे पडला आहे. इतिहासाच्या अभ्यासामध्ये राजकीय बाजू व्यतिरिक्त इतर सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक घटकांनाही अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.४ आधुनिक काळात इतिहास लेखन शास्त्रामध्ये अनेक इतिहास लेखनाचे नवनवीन प्रवाह उदयास आले आहेत. त्यापैकी स्थानिक इतिहास या लेखन प्रवाहाचा अभ्यास करणे हा या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**इतिहास लेखनातील विविध प्रवाह-**

२० व्या शतकाच्या सुरूवातीला प्रा. ब्युरी यांनी **'History is a science, no more and no less'** या शब्दात इतिहास हे शास्त्र आहे असे ठामपणे सांगितले. तेव्हापासून इतिहासाला शास्त्राचे स्वरूप देण्याची प्रक्रिया सुरू होऊन इतिहास अध्ययन, संशोधनाची व लेखनाची पध्दती उत्क्रांत होत गेली. १९८० च्या दशकात कामगार, शेतकरी, बहुजन वर्ग व स्त्रीयांच्या इतिहासाला महत्व प्राप्त झाले. त्यामुळे 'सबाल्टर्न इतिहासलेखन' हा नवा प्रवाह विकसित झाला. त्याला डॉ. अरविंद देशपांडे यांनी 'वंचित' हा मराठी शब्दप्रयोग वापरला. त्यामुळे राजा केंद्रीत इतिहास हा जनसामान्य केंद्रित इतिहास करण्यासाठी तळाकडून इतिहास या इतिहास लेखन प्रवाहाकडे सर्वजण पाहू लागले आहेत.५ आधुनिक काळात इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासामुळे नवनवीन प्रवाह निर्माण झाले आहेत. अशा लेखन प्रवाहामध्ये आंग्लवादी,

राष्ट्रवादी, प्राच्यविद्यावादी, मार्क्सवादी, सबाल्टर्न, इ. इतिहासलेखन प्रवाह निर्माण झाले आहेत. या प्रवाहाबरोबरच प्रादेशिक आणि स्थानिक इतिहास लेखन हे नवे प्रवाह आता उदयास येऊन ते महत्वाचे ठरू लागले आहेत.

**स्थानिक इतिहासलेखन प्रवाहाचा उदय व विकास-**

स्थानिक इतिहास लिहिण्याची सुरूवात प्रथम इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकात सुरू झाली. पाश्चिमात्य देशात विशेषतः फ्रान्समध्ये किल्ले, नाणी, चर्च, शस्त्रे, संग्रालये, पोषाख, अलंकार, भांडी, इ. चा इतिहास लिहिला जाऊ लागला. १९व्या शतकात अमेरिकेतही अशाचप्रकारचे लिखाण होऊ लागले. खास करून व्यापारी, उद्योगपती, प्रसिध्द व्यक्ती, व चर्चचे अधिकारी यांची माहिती इंग्लंडमधून आलेले व अमेरिकेत स्थायिक झालेल्या लोकांनी, अमेरिकेत युध्दात भाग घेतलेल्या लोकांनी, भौगोलिक घटकांची माहिती लिहिली.६ त्यामुळे तेथे स्थानिक इतिहासाचा उदय झाला.

डॉ. राजा दिक्षित यांनी स्थानिक इतिहासाची संकल्पनात मांडताना असे म्हटले आहे की, 'इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता या दोहोंचा वेध असतो. त्यातील अनेक अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू प्रादेशिक इतिहासामुळे प्रकाशात येतो. प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणजे स्थानिक इतिहास होय. स्थानिक इतिहासाचा अभ्यास करताना अभ्यासकांनी विशेष काळजी घेतल्यास याप्रकारचा अभ्यास इतिहास लेखनात उपयुक्त भर टाकू शकतो.'७ स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. प्रदोश ही संकल्पना सापेक्ष आहे. स्थानिक इतिहासामध्ये एखाद्या गावाचा किंवा तालुक्याचा इतिहास समाविष्ट केला जाते. विविधतेने नटलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशात प्रादेशिक इतिहासाचे महत्व विशेषत्वाने जाणवते. राष्ट्रीय अस्मितेच्या पोटात प्रादेशिक अस्मिता सुखाने नांदू शकतात. 'मी महाराष्ट्रीय आहे' यामध्ये माझा भारतीयत्वाला विरोध नाही. ही वेगळी प्रादेशिक अस्मिता असूनही ती राष्ट्रीय अस्मितेली पुरक आहे. या दोन्हीचे सहकार्य स्थानिक इतिहासास उपयुक्त आहे हेच दर्शवते.८ स्थानिक इतिहास लिहीताना इतिहासकार त्या ठिकाणच्या लोकांच्या आपल्या जन्मभूमीविषयी ज्या स्वाभाविक भावना असतात त्या भावना व ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असणारी व्यक्ती यांच्या आधारे इतिहास लेखन करतो. कधी स्वतःच्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करून त्याच्याकडून वदवून घेतलेल्या मौखिक इतिहासाच्या रूपात मांडत असतो.९ त्यामुळे मौखिक इतिहास हा स्थानिक इतिहासासाठी आवश्यक घटक मानला जातो. गोविंद नारायण मडगावकर यांचा मुंबईचे वर्णन (१८६१), ना. वि. जोशी पुणे शहराचे वर्णन (१८६८), ना. ब. चाफेकर यांचे बदलापूर (१९३३), द. गो. लांडगे यांचा नागपूरचा सांस्कृतिक इतिहास (१९५४), राजुरकर यांचा चंद्रपुरचा इतिहास (१९५६), पु. पा. गोखले यांचा जागृत सातारा (१९६२), अरूण टिकेकर संपादित शहर पुणेः एक सांस्कृतिक संचिताचा मागोवा (२०००), इ. ग्रंथामध्ये स्थानिक इतिहासाची मांडणी केलेली आहे. स्थानिक इतिहास लेखन ही बाब हळूहळू अत्यंत महत्वाची ठरत आहे. प्रत्येक गावाची, तालुक्याची व प्रदेशाची एक स्वतंत्र ओळख असते. त्या प्रदेशात असणाऱ्या गावांना इतिहासाची चांगली परंपरा असते. स्थानिक इतिहासाचे संशोधन करताना पुढील मुद्यांच्या आधारे स्वतंत्रपणे लेखन करणे आवश्यक आहे.

**गावांच्या नावाची व्युत्पत्ती –**

गावाच्या नावाला ऐतिहासिक परंपरा असते. एखाद्या गावाचे नाव कसे पडले याविषयी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी वर्गीकरण केले आहे.१० त्यानुसार काही गावांची नावे वनस्पतींच्या नावावरून पडलेली आढळतात. उदा., रत्नागिरी जिल्ह्यातील येळवण या गावाचे नाव. या गावामध्ये मोठ्या प्रमाणात वेळू या बांबूवर्गीय वने मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यावरून वेळू वन व वेळू वनावरून येळवण असे नाव पडले आहे. काही गावांची नावे देवता, मनुष्य, जाती व लोक यांच्या नावावरून पडलेली आढळतात. उदा., पंढरपूर हे नाव ऐतरैय ब्राम्हण ग्रंथानुसार विश्वामित्राच्या शंभर मुलांपैकी पौन्ड्र, औन्ड्र, शबर, मुतीब आदी पन्नास मुलांनी दक्षिणेत येवून राज्य वसविली. त्यापैकी पौन्ड्र मुलाची राजधानी पोन्ड्रपूर म्हणजेच आजचे महाराष्ट्रातील पंढरपूर.११ मनुष्येतर प्राणीमात्रांच्या नावापासून काही ग्रामनामे पडलेली आढळतात. त्यावरून त्या भागातील प्राणी सृष्टीचा बोध होतो. या प्राण्यांमध्ये वाघ, सिंह, उंदिर, मांजर, कोल्हा, अस्वल, इ. प्राण्यांचा समावेश होतो. उदा., कोल्हापूर जिल्ह्यातील मांजरे, सांगली जिल्ह्यातील अस्वलवाडी, कोल्हेवाडी, उंदिरवाडी, इ. गावांची नावे प्राणी नामापासून पडलेली आहेत. नदी, संगम, डोंगर, माळ, दूध, दही, इ. पदार्थापासून काही ग्रामनामे तयार झालेली आढळतात. उदा., रत्नागिरी जिल्ह्यातील बावनदी या गावाचे नाव शेजारी वाहणाऱ्या बावनदीवरून पडले आहे. सांगली जिल्ह्यातील दूधोंडी, दह्यारी व ताकारी ही एकमेकाजवळ वसलेली गावे प्राचीन काळी दूग्ध व्यवसायासाशी निगडीत असवीत. त्याकरीता त्याचे संशोधन होणे गरजेचे आहे. मुसलमान बांधवांची वस्ती ज्या गावामध्ये असते त्या गावांची नावे मुस्लीम नामनिर्देशक आढळतात. उदा., राजापूर तालुक्यातील सौंदळजवळ असणारी मुसलमानवाडी किंवा

इतर अनेक गावातील वाड्या. याशिवाय अनेक गावांना व शहरांना मुस्लीमनामनिर्देशक नावे असून त्या नावामध्ये त्या गावांचा किंवा शहरांचा इतिहास दडला आहे. उदा., इस्लामपूर, औरंगाबाद, अहमदनगर, इ.

**भौगोलिक –**

स्थानिक इतिहास लिहिताना गावाचे भौगोलिक स्थान, गावातून वाहणारे पाट, नदीनाले, गावातील तलाव, वाडे, प्रवेशद्वारे इ. चे संशोधन स्थानिक इतिहासामध्ये करता येते.

सामाजिक रचना –सामाजिक रचनेमध्ये गावातील समाजजीवन, कुटूंब व्यवस्था, सामाजिक व्यवस्था, सामाजिक प्रथा, शिक्षण संस्था, स्त्रीयांची स्थिती व सामाजिक चालीरिती इ. चा अभ्यास आवश्यक असतो.

**धार्मिक व सांस्कृतिक जीवन –**

गावातील मंदिरे व प्रार्थना स्थळे, वार्षिक सण-उत्सव, ग्रामदेवतांच्या यात्रा, पारंपारिक खेळ व मनोरंजन इ. मधून ग्रामीण जीवनातील धार्मिक व सांस्कृतिक माहिती मिळते. त्यामुळे स्थानिक इतिहास लिहिताना धार्मिक व सांस्कृतिक घटकाला महत्व देणे आवश्यक ठरते.

**आर्थिक घटक –**

गावामधील शेती, उद्योग, व्यवसाय, व्यापार, व्यापारी जाती, इ. ची माहिती घेणे हा आर्थिक घटकाचा मुख्य उद्देश असतो. स्थानिक इतिहासामध्ये आर्थिक घटकालाही अतिशय महत्व आहे.

**राजकीय व प्रशासकीय घटक –**

गावचे राजकारण व प्रशासन, गावाचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान, गावातील स्वातंत्र्य सैनिकांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग याबद्दलचे संशोधन स्थानिक इतिहासासाठी अतिशय उपयुक्त असते. उदा., पाचल गावचा स्थानिक राजकीय इतिहास लिहिताना आबा नारकर यांचे स्वातंत्र्य संग्रामामधील योगदान विचारात घेतल्याखेरीज तो परिपूर्ण होत नाही.१२

**संदर्भ –**

१) लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), मराठी विश्वकोष, खंड २, मुंबई, १९७६, पृ. ५०७

२) शांता कोटेकर, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, नागपूर, २००५, पृ. ४

३) मु. ब. शहा (संपा.), इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड १०, धुळे, १९९८, प्रस्तावना, पृ. १९

४) डॉ. ह. श्री. साने (संपा.), सामाजिक शास्त्रे आणि साहित्यःअंतःसंबंध, पुणे, १९९५, पृ. ९१

५) उमेश बगाडे, सबाल्टर्न स्टडीज व भारतीय इतिहास लेखनातील स्थित्यंतर, समाज प्रबोधन पत्रिका, जुलै-सप्टेंबर २००७, पृ., ३०२ ते ३१२

६) Barbara J. Howe, 'A Century of Local History Writing, JSTOR; OAH Magazine of History VOL. No. 3 (summer), 1989, P., 10 - 15

७) राजा दिक्षित, प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संदर्भ, इतिहास शिक्षक, पुणे, ऑक्टोबर-डिसेंबर, २००४, पृ., ४

८) Dipak G. Deshapande, 'Tilak Maharashtra University', Pune, National Seminar on MANY Histories, Souvenir, 21st March 2009, P. 9

९) अरूण टिकेकर (संपा.), शहर पुणेः एका संचिताचा मागोवा, खंड १, पुणे, २०००, प्रस्तावना, पृ., १६

१०) मु. ब. शहा (संपा.), इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड ६, धुळे, १९९८, प्रस्तावना, पृ. ४२

११) मिथिला उदय लाड, त्रैमासिक आदिम संघर्ष, मार्च ते मे २०१४, पृ.७

१२) स्नेहल नेने, सह्यगिरीतील गांधीः आबा नारकर, पुणे २०१३

# भारतीय सर्कशीचा उगम व स्वरूप एक:अभ्यास

**प्रा.डॉ.चंद्रकांत शिवराम गिरी**
इतिहास विभाग प्रमुख, चंद्राबाई-शांत्ताप्पा शेंडूरे कॉलेज,हुपरी.जि.कोल्हापूर

प्रस्तावना:-

सर्कस हा पारंपरीक खेळ आहे.प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीत सर्कशीत केल्या जाणाऱ्या काही कवायती,पशुपक्ष्यांचे खेळ होत होते.भारतातही डोंबाऱ्याचे खेळ आजही प्रचलित आहेत.आज दिसणाऱ्या आधुनिक सर्कशीचा उदय आणि विकास अठराव्या शतकात झाला.जगातील पहिली सर्कस फिलिप ऑस्टले यांनी इ.स १७६८ मध्ये लंडन येथे सुरु केली होती.मानव आपल्या जीवनात मनोरंजनात्मक कौशल्ये का करतो या बद्दल क्रीडा विषयक सिद्धांत सांगता येईल.वानर रुपात असलेला आदिमानव आपल्या सहज हालचाली करीत त्यालाच पहिला कसरतपटू म्हणून संबोधले गेले आहे.सर्कस या शब्दाचे मूळ सर्क्युलस (सर्कस म्हणजे रिंगण) ह्या **latin** शब्द मध्ये आढळतो.मुळात भारती यसर्कस बहरली ती कृष्णाकाठच्या सांगली जिल्ह्यातील तासगाव,म्हैशाळ परिसरात. डिजिटल मनोरंजनाच्या साधनांच्या जन्मापूर्वी पासून बालक ते जेष्ठाच्या पर्यंत सर्कस आकर्षणाचे केंद्र बनले होते.पूर्वी तर लहान मुलांना प्राण्यांची ओळख या सर्कशीतून होत होती.मनोरंज विश्वावर आज चित्रपट,टीव्ही,मोबाईल.कॉम्पुटर यांची हुकमत झाली.तरी सर्कशीने आपले वेगळेपण टिकवून ठेवले होते.दोन दशकापूर्वी वन्यजीव प्राण्यांच्या सहभागावर शासनाने बंदी घातल्यामुळे खऱ्या अर्थने सर्कशीच्या वाटचालीला उतरती कळा लागली.

सर्कशीच्या नवीन कंपन्याची स्थापना:-हिंदुस्थानामध्ये विष्णुपंत छत्रे यांनी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील कुरुंदवाडच्या संस्थानाचे अधिपती चिंतामणराव उर्फ बाळासाहेब पटवर्धन व जव्हार संस्थानाचे १४ वे अधिपती मल्हारराव उर्फ पतंगशहा चौथे यांच्या सहकार्याने पहिली सर्कस कंपनी इ.स.१८७८ सुरु केली१.सर्कशी संबधी लागणारी सर्व मदत कुरुंदवाडकर व जव्हारकर यांनी देण्याचे मान्य केले.विष्णुपंत छत्रे यांनी कुरुंदवाड येथेच राहून सर्कस सुरु करावी यासाठी कुरुंदवाड संस्थाना तर्फे भव्य मैदान उपलब्ध करून दिले.तर जव्हारकर यांनी आपल्या संस्थानातील चाबुकस्वार यांची दोन मुले पाठविली होती.शिवाय पशु–पक्षी सर्कशीसाठी देत होते.पतंगशहा चौथे सर्कशीच्या खर्चासाठी आपल्या संस्थानातून अडीचशे ते तीनशे रुपये वर्षाला पाठवून देत होते.२जव्हारकर विष्णुपंतांना वस्ताद या नावाने सबोधित असत.पतंगशहा चौथे यांनी घोडी,नोकरवर्ग यासाठी लागणारा खर्च देण्याचे मान्य केले होते.त्यामुळे विष्णुपंत छत्रे हे सर्कशीच्या खेळाच्या शेवटी जव्हारच्या पतंगशहाबद्दल धन्यवाद गाऊन आपली सर्कस समाप्त करीत होते.विष्णुपंत छत्रे यांच्या सर्कशी मध्ये कलाकार म्हणून काम करणारे म्हैशाळचे व्यंकटराव दत्तात्रय देवल,पुण्याचे तुकाराम गणपती शेलार,तासगावचे तुकाराम पोवार,सांगलीचे सदाशिव कार्लेकर,परशुराम माळी यांनी आपआपल्या स्वतंत्र सर्कस कंपन्या स्थापन केल्या होत्या.सदाशिव कार्लेकर यांनी इ.स.१६८३ मध्ये सांगली येथे"कार्लेकर ग्रॅन्ड सर्कस"स्थापन केली.या सर्कशीत पशुची संख्या कमी होती.कार्लेकर सर्कशीतील जेकीन्स व फमिलीचे चित्तथरारक मोटार सायकल उड्डाण हे खास आकर्षण होते.३कार्लेकर सर्कस इ.स.१९४३ मध्ये बंद पडली.परशुराम लायन सर्कस हि परशुराम माळी यांनी इ.स.१८९० मध्ये तासगाव येथे स्थापन केली.लो.टिळकांनी परशुराम माळी यांना"द लायन ऑफ द सर्कसेस"ही मानाची पदवी देवून गौरव केला.त्यावरून माळी यांच्या सर्कशीस हे नाव पडले.४माळी सर्कशी मध्ये वाघ,सिंह, हत्ती,घोडे इ.पशुचा मोठा भरणा होता.परशुराम माळी स्वत;उत्कृष्ट पशुशिक्षक होते.ही सर्कस इ.स.१९५५ मध्ये मिरज येथे बंद पडली.सदाशिव कार्लेकर सर्कशीतील तुकाराम गणपती शेलार यांनी स्वत;ची"शेलार्स रॉयल सर्कस"इ.स.१९१० मध्ये स्थापन केली.नारायण वालावलकर यांनी दि ग्रेट रॉयल सर्कस भागीदारीत सुरु केली होती.५वडगावपानच्या त्र्यंबकराव राणोजी थोरात यांनी इ.स १९१० मध्ये"रिनाऊड बॉम्बे सर्कशीची"स्थापन केली.ही सर्कस इ.स १९३६ मध्ये बंद पडली.या शिवाय वडगावपानच्याच शंकरराव राघोजी थोरात यांनी"साऊथ सर्कस"सखाराम तुकाराम थोरात,बिब नबाब तांबोळी,(मालेगाव हवेली) आणि निळवंडे इथल्या दत्तात्रय कुलकर्णी,इ.स१९२० मध्ये बाबुराव कदम यांनी'ग्रॅन्ड बॉम्बे सर्कशीची स्थापन केली होती.आशा छोट्या सर्कशी होत्या.एका इंग्रजाने दिलेले आव्हान स्विकारून विष्णुपंत छत्रे यांनी स्वत;ची सर्कस उभारली आणि ती फक्त हिंदुस्थानातच नव्हे तर पदेशातही लोकप्रिय केली.६अशा विष्णुपंत छत्रे यांचा दि.२० फेब्रुवारी १९०५ रोजी वयाच्या ५९ व्या वर्षी इंदूर येथे मृत्यू झाला.६त्यामुळे सर्कशीची सर्व जबाबदारी त्यांचे बंधू काशिनाथपंत छत्रे यांनी स्वीकारली.७काशिनाथपंत छत्रे यांचा मृत्यू १९१४ मध्ये झाला.त्यांच्या मृत्यूनंतर ग्रॅन्ड इंडियन सर्कसही बंद पडली.

व्यंकटराव देवल:-हे म्हैशाळचे गावाचे रहिवाशी होते. म्हैशाळ पासून पुण्यापर्यंत चालत जावून विष्णुपंत छत्रेच्या सर्कशी मध्ये दाखल झाल होते.व्यंकटराव देवल यांनी इ.स.१८९५ मध्ये "देवल सर्कस"या नावाने स्वतंत्र सर्कस सुरु केली होती.या ही सर्कशीचे विदेशात ही दौरे झाले होते.देवल सर्कशीचे खास वैशिष्टये म्हणजे हातचलाकीची कौशल्ये होती.देवल हे भारतातील सर्वोत्कृष्ट विदूषक होते."द बेस्ट क्लाउन इन इंडियन सर्कस" म्हणून त्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो.६देवल यांनी पशुशिक्षक,रिमास्टर,जगलर आशा विविध भूमिकांतून त्यांनी सर्कशी मध्ये चाळीस वर्षे कारकीर्द केली.व्यंकटराव देवल यांच्या मृत्यूनंतर त्याचे पुतणे विनायकराव देवल व बडोपंत देवल यांनी सर्कशी मध्ये मृत्यूगोल व झोपाळयावरील कसरती भारतात प्रथमच विकसित केल्या होत्या.देवल सर्कशी मध्ये मृत्यूगोल मध्येकाम करणारे कलाकार हे लॉरेन ब्रदर्स ऑस्ट्रेलियाचे होते.ही देवल सर्कस इ.स.१९५७ मध्ये बंद पडली.७

दामू धोत्रे:-(दामोदर गंगाराम धोत्रे १९०२-१९७२)इ.स.१९१२ मध्ये पुण्याच्या शेलार मामांची 'शेलार रॉयल सर्कस' पुण्यात असताना तुकाराम गणपती शेलार मामांचा भाचा दामू धोत्रे सर्कशी मध्ये रुजू झाला होता.त्यावेळी दामू धोत्रे यांचे वय ११ वर्षाचे होते.पुढे दामू धोत्रे हे प्रसिद्ध भारतीय कलाकार म्हणून आंतरराष्ट्रीय किर्तीचे कलाकार म्हणून भारता मध्ये नावारूपाला आले होते.८ शेलार मामांच्या सर्कशी मध्ये सावळाराम हे प्रशिक्षक होते.त्यांच्या मार्गदर्शना खाली दामू धोत्रे यांनी अनेक कौशल्ये शिकून घेतली होती.दामू धोत्रे यांनी केरळच्या गोविंद नायरयांच्या कडून सायकली वरील कसरतीचे कौशल्ये प्राप्त केले होते.दामू धोत्रे यांची सर्कस मधील कामे विशेषत;पशु-पक्षी यांच्या कडून करवून घेणे.शक्ती प्रदर्शन करणे मोटार उडविणे,सायकलवरील कौशल्ये अशी होती.शेलार मामांच्या सर्कशीत १४ वर्षे काम करून वयाच्या २६व्या वर्षात ते केरळच्या गुहा बाबाच्या सर्कशीत रुजू झाले.दामू धोत्रे हे ग्रेंट रिगलिग ब्रदर्स अन्ड बार्नुम सर्कस,खान सर्कस,अमेरिकेची कार्सन सर्कस,प्रो.इझोका यांच्या रशियन सर्कस मध्ये नंतर फ्रान्स मधील"ज्यूइग सर्कस"आशा सर्कशी मध्ये काम करत.जगातील अनेक शहरा मध्ये दौरे करून नाव लौकिक मिळविला होता.त्यांना दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या वेळी अमेरिकन सैन्यात ३ वर्ष सक्तीने काम करावे लागले होते.९ वयाच्या ४० व्या वर्षी सर्कशीच्या क्षेत्रात विदेशात काम करत असताना दामू धोत्रे यांनी स्वतंत्र भारताचे तत्कालीन केंद्रिय मंत्री काकासाहेब गाडगीळ यांच्या प्रयत्नाने भारतीय नागरिकत्व स्विकारून पुणे येथे स्थायिक झाले.वयाच्या ११ व्या वर्षापासून सर्कशीत पदार्पण केल्यानंतर ४० वर्षे भारतात आणि भारताबाहेर अनेक प्रमुख सर्कशीत अत्यंत यशस्वी कलाकार म्हणून काम केले 'दामू धोत्रे ऑफ इंडिया' या नावाने जगभर प्रसिद्ध झाले.दामू धोत्रे यांनी पुण्या मध्ये शुक्रवार पेठेत'सर्कस-व्हिला'नावाचे घर बांधले आहे.या घरात सर्कशी संबधीची पोस्टर्स,फोटो,परितोषिके वृत्तपत्रातील कात्रणे,पोशाख,चाबुकाचे नमुने,सर्कशी विषयीची पुस्तके असा संग्रह आहे.तसेच अमेरिकेतील सर्कस वर्ल्ड म्युझियम मध्ये दामू धोत्रे यांचे पुतळे व सर्कशीत वापरलेले साहित्य जतन करून ठेवण्यात आलले आहे.10आंतरराष्ट्रीय किर्तीचे सर्कस कलावंत दामू धोत्रे यांचा उल्लेख केल्याशिवाय भारतीय सर्कशीचा इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. म्हैशाळ हे गाव सर्कशीची जन्मभूमी म्हणून प्रसिद्ध होते.देवल सर्कस,दग्रॅन्ड बॉम्बे सर्कस,ह्या म्हैशाळगावच्या प्रसिद्ध सर्कशी होत्या.तासगावात एकूण १५ सर्कशी होत्या.त्यामुळे त्याकाळी महाराष्ट्रातील तासगावात हि सर्कस व्यवसायाची प्रमुख बाजार पेठ म्हणून प्रसिद्ध होती.शिवाय जी.ए.सर्कस,भोसले,भिमराव पाटील, दत्तात्रय कुलकर्णी सर्कस,अशा अन्य सर्कशी होत्या. सर्कशी समोरील समस्या /अडचणी:-वादळ,पाऊस,आग हे तीन सर्कसवाल्याचे मुख्य शत्रू आहेत.तसेच युद्ध,रोगराई हे देखील शत्रू आहेत.एका गावातून/शहरातून दुसऱ्या गावात स्थलांतर करून स्थिरावण्यासाठी जागा/जमीन,वीज,पाणी,पशु-पक्षा साठी चारा मिळविण्यासाठी संबधीत ग्रामपंचायत,पालिका,पोलीस, जिल्हाधिकारी जागेचे मालक हे सर्व जण सौजन्यशील असतील तरच सर्कस उत्तम चालते.पण असे दुर्मिळच असतात.सर्कस पाहण्यासाठी गावातील/शहरातील प्रतिष्टीत नागरिकांना,गुंड लोकांना फुकटचा पास द्यावा लागतो.सर्कशी मधील कामगार/ कलाकार आपला जीव धोक्यात घालून काम करत असतो.त्याला इतर व्यवसायात असणारे कोणते ही हक्क सवलती लागू केल्या जात नाहीत. बोनस, फड, ,पेन्शन नसल्यामुळे निवृत्तीनंतर रोजगाराची कमाई बंद होते.हा व्यवसाय फिरता असल्यामुळे कामगाराची संघटना स्थापन झाल्याचे दिसून येत नाही.ऊस तोडणी व वीट कामगाराच्या मुलाप्रमाणे त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या सुविधा मिळत नाहीत.एकाच ठिकाणी स्थाईक नसल्यामुळे अनेक सुख सोयी पासून हे लोक वंचित राहतात.कलाकार असून ही राज्य,राष्ट्रीय पुरस्कारा पासून हे लोक वंचित राहिलेले दिसतात.महाराष्ट्रातील संगीत नाटक मंडळ आणि सर्कस कंपण्या यांची तुलना करण्याचा मोह टाळता येत नाही.दोन्हीच्या उदय आणि विकासाच काळ साधारण १०० ते१२५ वर्षापूर्वी होता.दोघांचा ही व्यवसाय लोकांचे मनोरंजन करणे हाच होता.या दोन्हीतील फरक इतकाच की सर्कस साऱ्या देशभरात आणि परदेशात देखील जात असे.पण

संगीत नाटके महाराष्ट्राच्या बाहेर गेली नाहीत. सध्याच्या काळात दूरदर्शन,चित्रपट,मोबाईल.कॉम्पुटर अशा जास्त आकर्षक सहजपणे व प्रभावी रंजन माध्यमाचा प्रसार ग्रामीण भागात वाढत असल्याने सर्कशीच्या लोकप्रियतेला ओहोटी लागून सामान्य प्रेक्षक सर्कशी पासून दूर चालला आहे.त्यामुळे सर्कस व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न घटले आहे.सर्कसचा प्रचंड लवाजमा पोसण्यासाठी येणारा अवाढव्य खर्च,सर्कस एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्यासाठी लागणारा खर्च अशा खर्चाच्या वाढत्या प्रमाणामुळे सर्कस व्यवसाय तोट्यात आला आहे.सर्कस व्यवस्थापण ही फार जिकिरीचे व अडचणीचे होत चालल्याने त्याचा ही सर्कस व्यवसायावर प्रतिकूल परिणाम होत आहे.त्यामुळे अनेक सर्कशी बंद पडल्या आहेत.कोरोना लॉकडाऊनमुळे हजारो उद्योगाची चाके गाळात रुतली.परिणामी लाखो कामगार आणि अभियंत्यांना रोजीरोटी गमवावी लागली.यात दुर्दैवाने सर्कस कलाकाराची भर पडली आहे11.महाराष्ट्र सरकारने नाट्य,संगीत,नृत्य व तमाशा इ.कलागुणांना विकसित करण्याचे धोरण स्वीकारले होते.नाट्यक्षेत्रातील हौशी कलावंतांचा नाट्य महोत्सव सुरु करण्यात आला.अनेक शहरात खुल्या नाट्यमंदिरांची निर्मिती करण्यात आली.संगीतनृत्य,नाट्य,यांचे शिक्षण देणाऱ्या संस्थाना अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता.तमाशाना उत्कृष्ट कार्याबद्दल परितोषिके देण्याची योजना कार्यान्वित केली.नाट्य,संगीत, नृत्य व तमाशा क्षेत्रातील विपन्नावस्थेतील व वृध्द कलावंतांना अर्थसाह्य देण्याची योजना महाराष्ट्र शासनाने कार्यवाहीत आणली पण सर्कशी मधील कलावंतसाठी अशा प्रकारची कोणतीच योजना कार्यान्वित केली नाही.त्यामुळे अनेक कलाकार आपल्या कलेपासून दूर गेले.सांगलीच्या अजय माने याने आपली"न्यू रॉयल सर्कस"भंगारात घालण्याचा निर्णय घेतला12 काळजावर दगड ठेवत सर्कशीचे सर्व साहित्य कवडीमोल दराने गडहिंग्लज येते भंगारात घातले.त्यामुळे अनेक कलाकार बेरोजगार झाले.या पुढे सर्कस उद्योगाला भरभराट यावी असे वाटत असेल तर शासकीय पातळीवर सर्कशीना मदत होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील सर्कशी बंद पडल्यावर केरळ सरकाने सर्कस कलाकारांना संरक्षण दिले आणि सरकाने सर्कस व्यवसायास उत्तेजन ही दिले.त्यामुळे केरळ राज्य हे सर्कस व्यवसायाचे केद्र बनले.

संदर्भ व टिपा

1) वाड(डॉ) विजया (संपा) मराठी विश्वकोश खंड१८,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई,2009 पृ.796

२) दिमोटे गंगाधर अण्णाजी (वकील स.जव्हार) जव्हार संस्थानचे अधिपती श्रीमंत महाराज विक्रमशहा राजेसाहेब यांचे चरित्र 1919 पृ.27

3) वाड(डॉ) विजया (संपा) मराठी विश्वकोश खंड१८,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई,2009पृ.796

4) कित्ता पृ 796

5) भारत ४ इंडिया पृ ८

६) https://www.bytes of indin.com

6) आरोसकर एस.बी.(SAI प्रशिक्षक निवृत्त )जिम्नॅस्टिक कल्चर अप्रकाशीत पृ.84

7) जोशी तर्कतीथ श्री.लक्ष्मणस्त्री (संपा)मराठी विश्वकोश खंड 6,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई.1977 पृ.41

8 आरोसकर एस.बी.(SAI प्रशिक्षक निवृत्त )जिम्नॅस्टिक कल्चर अप्रकाशीत पृ.83

9) कित्ता पृ.85

10) https://mr.mWikipedia.org

11 )दै.सकाळ दि.३० मार्च २०२०पृ ४

12) दै.सकाळ दि.३० डिसेंबर२०२० पृ १

# अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचा जमीन बळकाव लढा

*प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर*

*इतिहास विभाग, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर.*

**प्रास्ताविक**

आशिया खंडात सहकार चळवळीची पायाभरणी करणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यास महाराष्ट्रातील कम्युनिस्ट चळवळीच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. कारण कष्टकरी शेतकरी समुदायात व ग्रामीण भागात कम्युनिस्ट पक्षाने याच जिल्ह्यात भक्कमपणे पाय रोवले. स्वातंत्र्योत्तर काळात अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमीन विषयक प्रश्नावर कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या चळवळीमध्ये जमीन बळकाव लढ्याच्या चळवळीस अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे दिसून येते. या चळवळीच्या माध्यमातून स्वकीय सरकारच्या शोषक व जुलमी धोरणांचे जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाने हिडीस स्वरूप दर्शवून वंचित घटकांच्या प्रति आपली बांधिलकी स्पष्ट केल्याचे दिसते.

**महत्त्वाचे शब्द :** *सिलिंग. लाल बावटा, कॉम्रेड, च्या जमीन धारणा कमाल कायदा, जबरन जोत,*

**शोधनिबंधाचा उद्देश :**

१. जमीन बळकाव लढ्याची पार्श्वभूमी समजून घेणे.
२. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा जमीन बळकाव लढ्याच्या हेतूचा मागोवा घेणे.
३. कॉंग्रेस सरकारची जमीन बळकाव लढयासंबंधीची प्रतिक्रिया जाणून घेणे.
४. १९६२ च्या महाराष्ट्र सरकार जमीन धारणा कमाल मर्यादा ठरविणाऱ्या कायद्याची वस्तुस्थिती जाणून घेणे.
५. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या सिलिंग कायद्यामागच्या भूमिकेचा आढावा घेणे
६. अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या जमीन बळकाव लढ्यातील कामगिरीचा आढावा घेणे.

**1. जमीन बळकाव लढ्याच्या पार्श्वभूमी :**

१९५२ च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्ह्यात कम्युनिस्ट पक्ष, रिपब्लिकन पक्ष व लाल निशाण पक्षाने सरकारकडे असलेली हजारो एकर जमीन आदिवासी, हरिजन भूमिहीनांना मिळावी या करिता भूमिहीनांच्या चळवळीची यशस्वी मुहूर्तमेढ रोवली होती. या चळवळीतील जमीन बळकाव लढा हा पुढचा महत्वाचा टप्पा होता. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने संपूर्ण देशामध्ये सिलींगचा कायदा झाला पाहिजे याकरिता १९७० साली अखिल भारतीय पातळीवर एक मोठा जमीन बळकाव लढ्याचा कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय घेतला. कारण कम्युनिस्ट पक्षाच्या मते स्वातंत्र्य मिळून २३ वर्षे होऊनही कॉंग्रेस सरकार शेतकऱ्यांना त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन (शेतकीचे मालकी हक्क) उपलब्ध करून देण्यात अपयशी ठरले होते. राज्यांतील कॉंग्रेस सरकारने शेतीबाबत अनेक कायदे केले. शेती विकासावर प्रचंड पैसा खर्च केला. तरीही ग्रामीण भागातील ८० टक्के शेतमजूर, गरीब शेतकरी दरिद्री जीवन जगत होते. खेड्यातील ४० टक्के जनता भूमिहीन होती. जे शेतकरी भूमालक होते त्यांच्याकडे तुटपुंजी जमीन होती. याउलट ८ टक्के लोक असे होते, की त्यांच्याकडे लागवडीखाली असलेल्या जमिनीचा ३६ टक्के मालकी भाग होता. त्यात जुने राजेरजवाडे, बडे जमीनदार, पूर्वीचे जहागीरदार, बडे उद्योगपती आदींचा समावेश होता. त्यामुळे जमिनीवरची ही प्रस्थापितांची मक्तेदारी नष्ट करून त्यांच्याकडील जमिनी भूमिहीनांना दिल्या जात नाही, तोपर्यंत शेतमजूर आणि गरीब शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणे शक्य नाही असे कम्युनिस्टांचे मत होते.१ कॉंग्रेस सरकार मात्र देशात पुरेशी जमीनच नाही, आहे त्या जमिनीचे आम्ही वाटप करून टाकले आहे अशा थापा मारीत होते. एम. एस. दांतवालांसारखे सरकारधार्जिणे अर्थशास्त्रज्ञ जमीन मालकी संबंधाबाबत पंजाब, तामिळनाडू व आंध्रप्रदेश या राज्यात पुरोगामी कायदे झालेले नसतानाही तेथे हरितक्रांतीने अपेक्षेपेक्षा जास्त यश प्राप्त केल्याचे दिसून येते. याउलट महाराष्ट्र व गुजरातसारख्या राज्यात जमीनविषयक विशेषत: कुळांच्या बाबत प्रगत कायदे झालेले आहेत त्या राज्यात शेती उत्पादनक्षमतेची वाढ बेताचीच आहे असा निष्कर्ष काढण्यात मश्गुल होते. शेती उत्पादनाला आणि उत्पादनक्षमतेला हानीकारक अशा जमीनविषयक सुधारणा सरकारने टाळाव्यात असे त्यांचे मत होते. सरकारनेही हरितक्रांतीला, वाढत्या शेतीउत्पादनाला महत्व देऊन त्यामागे जमीनवाटप व जमीनसुधारणा घडवून आणून शेती उत्पादनात वाढ करण्याचा मार्ग अवरूद्ध करून टाकला. कॅा. डांगे सरकारच्या या धोरणावर टिका करताना म्हणतात, "जमीनमालकी संबंधात सामाजिक जीवनात, शासनसंस्थेत एकूण समाज व अर्थव्यवस्थेत रचनात्मक बदल न करता शेती व्यवस्थेतील तांत्रिक प्रगतीवर दिलेला एकांगी भर हा प्रगतीविरोधाचा धोका वाढवीत आहे." अमेरिकन अर्थतज्ञ सोलोन बारक्लोभ भारत सरकारच्या जमीन सुधारणेवर भाष्य करतांना म्हणतो, "शेती मालकी संबंधात फेरबदल करण्याच्या प्रश्नाला बगल दिली तरी त्या प्रश्नाशी चार डोळे करण्याचा क्षण टळत नाही आणि राज्यकर्त्यांनी टाळाटाळ केली तरी अविकसीत देशातील कष्टकरी जनता तो अशा पद्धतीने सोडविल की ती सुखावलेल्या जमीनदारांना सुखावह

होणार नाही."२ त्यातच जमीनधारणेच्या कमाल मर्यादेच्या कायद्यात सरकारने अनेक पळवाटा करून ठेवल्या होत्या. उदा: १९६२ साली महाराष्ट्र सरकारने जमीन धारणेची कमाल मर्यादा ठरविणारा कायदा केला. हा कायदा म्हणजे जमीन मालकी संबंध सुधारणेचा अखेरचा टप्पा व जमीन मालकी संबंधात विषमता नष्ट करणारा कायदा होय असे काँग्रेसजन आत्मप्रौढीने सांगू लागले. मात्र वस्तुस्थिती वेगळीच होती. महाराष्ट्रात ३० एकर जमिनीवर ११ टक्के खातेदार आहेत व शेतकऱ्यांच्या ६ टक्के खातेदार आहेत. परंतु त्यांच्याजवळ ४२ टक्के जमीन आहे. ह्याउलट ५ एकरपर्यंत ३७ टक्के खातेदार व १५ टक्के शेतकरी असून फक्त ७ टक्के जमीन त्यांच्याजवळ आहे. त्यामुळे ही जमीन मालकी संबंधात विषमता नव्हे तर आणखी काय असा सवाल कम्युनिस्ट सरकारला विचारू लागले. या कायद्यात जमीनदारांना पळवाटा असल्यामुळे आणि मर्यादेचे क्षेत्र अधिक ठेवल्यामुळे जमिनीचे केंद्रीकरण अबाधित राहिले. उदा: १९५६ सालच्या भाऊसाहेब हिरे यांच्या कुळ कायद्यातील तरतुदींनुसार बारमाही पाणी, दोन व एका हंगामातील पाणीपुरवठा जमिनीसाठीचे प्रमाण व कोरडवाहू जमीनसाठीचे कमाल जमीन धारण प्रमाण अनुक्रमे १२, २४, २७ व ४८ एकर असे ठेवण्यात आले. याउलट १९६२ च्या जमीन धारणा कमाल कायद्यानुसार बारमाही पाणी, दोन व एका हंगामातील पाणीपुरवठा जमिनीसाठीचे प्रमाण व कोरडवाहू जमीनसाठीचे कमाल जमीन धारण प्रमाण अनुक्रमे १८, २७, ३० व ६६ ते १२६ एकर (व्यक्तीगत मालकीच्या जमिनीवर व कुटुंबाला सवलत) असे ठेवण्यात आले. त्याचा फायदा घेऊन मक्तेदार, जमीनदार, उच्च अधिकारी, मंत्री यांनी लाखो शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काच्या जमिनीपासून वंचित ठेवले.३

**1.भारतीय कम्युनिस्ट पक्षाची जमीन बळकाव लढ्याची भूमिका व उद्देश** :भारतीय कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेस सरकारचा हा धूर्त डाव ओळखून जनतेचे या प्रश्नावर प्रबोधन करावयास सुरुवात केलीएकीकडे जनतेला समाजवादाचे डोस पाजावयाचे . तर दुसरीकडे जमीनदारशाही नष्ट करून भूमिहीनांना हक्काची जमीन मिळवू द्यावयाची नाही असा धूर्त खेळ सरकार वाटप करायला पडजमीनच शिल्लक नाही असा प्रचा .आपल्याशी खेळत आहे हे जनतेने ओळखलेर प्रस्थापित सरकार, जनसंघ व हितसंबंधी करीत असतांना देशात ९ कोटी एकर सरकारी पडजमीन, ३ कोटी एकर जंगलाची जमीन व ९ कोटी एकर वरकड जमीन अशी एकूण २१ कोटी एकर जमीन वाटपासाठी उपलब्ध आहे हे कम्युनिस्ट पक्षाने दाखवून दिले व सरकारचा हा प्रचार धादांत खोटा असल्याचे जनतेच्या निदर्शनास आणून दिलेच्या निवडणुकीच्या काळात १९६७ . कम्युनिस्ट पक्षाने मक्तेदार, जमीनदार, सरकारी मंत्री, बडे अधिकारी आणि त्यांचे पाठीराखे सरकार यांच्या विरुद्ध प्रचार करून १९६९ च्या सुरुवातीला जमीन बळकाव लढा उभारण्याचा निश्चय केला.४

**2.भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा सरकारी पडजमिनी ताब्यात घेण्याचा अहमदनगर जिल्ह्यातील कार्यक्रम** :१९६९ मध्ये भाकप, भारतीय खेत मजदूर युनियन आणि अखिल भारतीय किसान सभा या संघटनांनी एकत्र येऊन लागवडीस लायक अशा सरकारी पडजमिनी ताब्यात घेण्याची मोहीम हाती घेतलीसप्टेंबर . १९६९ मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय कौन्सिलने एक ठराव पास केला" .सरकारी जमिनी ताब्यात घेण्याची मोहीम हिरहिरीने हाती घ्या; आपल्या पक्षाशी सहकार्य करून ज्या ज्या जनसंघटना आपल्याबरोबर यायला तयार असतील त्यांना बरोबर घेऊन या मोहिमेला हात घाला ही .सत्याग्रहाची लक्षणात्मक मोहीम आहे, या दृष्टीने तिच्याकडे न पाहता सरकारी जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेऊन तेथे पिके काढवयाची आहेत या दृष्टीने या मोहिमेकडे आपण पहिले पाहिजे", असा सर्व पक्षघटकांना आदेश दिला.५

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या आदेशानुसार दिफेब्रुवा ८ .री १९७० रोजी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, लाल निशाण पक्ष व, संयुक्त समाजवादी पक्ष यांच्या वतीने भूमिहीन शेतकरी, शेतमजूर व आदिवासींची एक परिषद कॅाडांगे .दत्ता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व कॅा ., कॅागोदूताई परुळेकर ., साथी एसपरिषदेत महाराष्ट्रातील लागवडी लायक जंगल व पडीक जमीन .जोशी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली .एम . ना कसण्यास द्यावीभूमिहीन शेतकऱ्यां, जमीनदार व बागायतदार शेतकऱ्यांचे जमिनीवरील केंद्रीकरण नष्ट करून जमिनीचे फेरवाटप व्हावे, आदिवासींनी वहितास आणलेल्या 'जंगल जमिनी' काढून घेऊ नये इत्यादी मागण्यांचे ठराव पास करण्यात आले.मार्च रोजी विधानसभेवर भव्य मोर्चा नेण्याचा निर्णय घेण्यात आला ४च्या प्रश्नावर तसेच भूमिहीन शेतकऱ्यां .६ श्रीरामपूर परिषदेतील निर्णयानुसार ४ मार्च रोजी कॅाडांगे यांच्य .ा अध्यक्षतेखाली २५ हजार शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा विधानसभेवर नेण्यात आला" .एप्रिल पर्यंत जमिनीचे फेरवाटप केले नाही तर २० हजार भूमिहीन शेतकरी जमिनीत नांगर घालून तिचा कब्जा करतील .असा निर्णायक इशारा कॅा "सारा महाराष्ट्र पेटविल्याशिवाय आम्ही गप्प राहणार नाही .डांगे यांनी सरकारला दिला.७ सरकारने मात्र बहिरेपणाचे सोंग घेऊन भूमिहीनांच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या . रोजी १९७०एप्रिल १४ .त्यामुळे भाकप व महाराष्ट्र राज्य शेतमजूर संघ यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन दि जिल्ह्यातील हजारो भूमि १५महाराष्ट्रातील हीन व आदिवासींनी लालबावट्याच्या जयघोषात पडित जमिनीत नांगर

घातले व २३ हजार एकर जमिनीवर कब्जा केला या .'जबरन जोत' आंदोलनात सुमारे ५ हजार भूमिहीन व आदिवासींना अटक करून त्यांना दिर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.[८] अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर तालुक्यातील ८, अकोले तालुक्यातील ०५, श्रीरामपूर तालुक्यातील ०५ व राहुरी तालुक्यातील ०६ केंद्रांवर भूमिहीनांनी जमिनीत नांगर फिरवून सत्याग्रह केलाकडू .बी .पी .या सत्याग्रहात कॅा ., आमदार कॅादेशमुख .के .बी ., कॅासहाणे मास्तर ., कॅारामभाऊ नागरे ., कॅाबाबुराव थोरात यांनी स .हभाग घेतलाया .भूमिहीनांच्या प्रश्नावर झालेला हा पहिलाच राज्यव्यापी भव्य लढा होता . लढ्याने गरीब जनतेच्या जमिनीच्या मागणीबाबत सरकारचे धोरण बदल्याखेरीज आपणास जमीन मिळू शकणार नाही ही जाणीव भूमिहीनांना झाल्यामुळे या लढ्याला प्रचंड पाठिंबा मिळाला असे आपल्या मुलाखती दरम्यान कॅापंढरीनाथ . .सहाणे मास्तर यांनी सांगितले[९]

### ३. भूमिहीनांच्या लढयासंबंधी इंदिरा गांधींची भूमिका :

भूमिहीनांची लढाऊ चळवळ आणि जमिनीची भूक लक्षात घेऊन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना एक पत्र लिहिले. 'सरकारी पडजमिनी गरीब भूमिहीन शेतकऱ्यांना लवकर वाटून द्या, कुळ कायद्यात योग्य त्या दुरुस्त्या करण्यासाठी आणि त्या अंमलात आणण्यासाठी उपाय योजा', असे आदेश या पत्रान्वये देण्यात आले. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली 'आम्ही मूलगामी जमीनसुधारणा कायदे करणार आहोत, जमिनीचे वाटप करणार आहोत अशा घोषणा कॉंग्रेसकडून केल्या गेल्या.[१०] भाकपचे अहमदनगर जिल्ह्यातील अकोल्याचे आमदार कॅा. बी. के. देशमुख यांनी विधानसभेत सरकारच्या शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (तृतीय सुधारणा) विधेयकाची चिरफाड करतांना ४ मे १९७० च्या भाषणात शेतकऱ्यांची वस्तुनिष्ठ व्याख्या करून सरकारच्या दुटप्पी धोरणाचे सातत्याने वाभाडे काढले. ते म्हणाले, "ज्याने कधी शेतात नांगर धरला नाही, नांगर कसा धरायचा याची ज्याला माहिती नाही, तो शेतकरी झाला आहे. अध्यक्षमहाराज, जो स्वतः शेती करतो, थोडीफार मजुरी लावून कष्ट करतो, राबतो त्याला शेतकरी समजले पाहिजे. असा जो शेतकरी आहे तो जी जमीन कसतो तेवढी जमीन त्याला देण्यात यावी. तशी दुरूस्ती कायद्यामध्ये केली तरच आपल्याला जी हरितक्रांती करावयाची आहे, ती यशस्वी होऊ शकेल. तरच गोरगरिबांचे प्रश्न सुटतील. अन्नधान्याची गरज भागेल. पण अध्यक्षमहाराज ह्या गोष्टी करण्याच्या दृष्टीने शासन कधीही पाऊल टाकणार नाही. कारण मध्यमवर्ग व वरच्या वर्गाचे विशिष्ट लोक यांचे संरक्षण हे सरकार करते. कारण ते लोक निवडणुकीत शासनाला मदत करतात. त्यामुळे त्यांच्या हिताचे संरक्षण करणे ही शासनाची जबाबदारी समजली जाते. तेव्हा आपण सिलींगचा कायदा करून योग्य ते पाऊल उचलावे. तसा कायदा केला तरच देशाचे उत्पादन वाढू शकेल व भूमिहीनांना आणि शेतकऱ्यांना जमिनी कसण्यास मिळू शकतील. परंतु अशा प्रकारचे पाऊल सरकार उचलणार नाही याची मला खात्री आहे."[११]

### ४. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा जमीन बळकाव लढ्याचा कार्यक्रम :

दि. ८ ते १३ मे १९७० या काळात भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय कौन्सिलची बैठक दिल्ली येथे पार पडली. या बैठकीत आजचे बिनबुडाचे सिलिंगचे कायदे सुधारण्याच्या प्रश्नावर कॉंग्रेस, अकाली-जनसंघ, डी.एम.के, स्वतंत्र पक्षाचे मुख्यमंत्री मूग गिळून बसले आहेत. सिलिंगच्या कायद्यात सुधारणा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असे ही काही मुख्यमंत्री उघडपणे बोलत आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री व काही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी कितीही चांगल्या घोषणा केल्या तरी गरीब शेतकरी, शेतमजूर आणि आदिवासींनी लढाऊ आंदोलने उभारल्याशिवाय या घोषणांमधून फारसे काही निष्पन्न होणार नाही असा बैठकीत निष्कर्ष काढण्यात आला. म्हणून सिलिंगच्या कायद्यात मूलभूत सुधारणा करून सरकारी जमिनींचे वाटप व्यवस्थित घडवून आणणे यासाठी भूमिहीनांच्या खालील मागण्यांवर अखिल भारतीय पातळीवर जमीन बळकाव लढ्याची भारतीय कम्युनिस्ट पक्षाने हाक दिली.

१. सर्व सरकारी जमिनी, लागवडी लायक पडजमिनी, जंगल जमिनी सोडून ग्रामपंचायतीच्या ताब्यातील उपजाऊ जमिनी, जमीनदार, मक्तेदार आदींच्या ताब्यात असलेल्या सरकारी जमिनी भूमिहीन गरीबांना देण्यात याव्यात. ज्या भूमिहीनांच्या ताब्यात सरकारी जमिनी आहेत त्यांचा होणारा छळ बंद करून त्यांचे पट्टे त्यांना करून देण्यात यावेत.

२. कुळांच्या ताब्यातील जमिनीवरून त्यांना बेदखल करण्याचे सर्व मार्ग बेकायदेशीर घोषित करून त्यांचे उल्लंघन करणाऱ्या जमिनदारांना दंड ठोठावले पाहिजेत. कुळ कायद्यात योग्य त्या दुरुस्त्या करणारे कायदे केले पाहिजेत. खंडाचा भरमसाठ दर कमी करून त्याचे प्रमाण निश्चित केले पाहिजे. सरंजामी जमीनदारी नष्ट करून कुळांना जमिनीचे मालक ठरविले पाहिजे. ३. आजचे सिलिंगचे कायदे पूर्णतः बदलावेत. त्यात खालील मुद्यांचा समावेश करावा. साखर कारखान्यांच्या मालकीचे फार्म्स, गवताळ जमिनी, फळबागा आणि देवस्थानांच्या जमिनी यांना मिळणाऱ्या सवलती बंद कराव्यात. काही कायद्यांमध्ये सिलिंगचा कायदा व्यक्तींना लागू आहे. त्यामुळे हा कायदा कुटुंबाला लागू केला पाहिजे. जमिनदारांच्या मालकीच्या जमिनीवर आज जी कमालमर्यादा आहे ती कमी केली पाहिजे. जमिनीची परिस्थिती आणि

चळवळीची तीव्रता या बाबी लक्षात घेऊन भिन्नभिन्न राज्यात सिलिंगच्या मर्यादा खाली आणल्या पाहिजेत. ४. आदिवासींच्या बळकावलेल्या जमिनी त्यांना परत करून त्यासंदर्भात कडक कायदा करावा. त्यांना जंगलाच्या जमिनी दिल्या जाव्यात आणि बिबड (भटक्या पद्धतीने) शेती कसण्याचे त्यांनी सोडून देऊन कायम शेती करावी म्हणून त्यांना आर्थिक व तांत्रिक मदत दिली जावी. ५. जमीनदारांच्या मालकीच्या गावठाणाच्या जमिनीवर वस्ती करून राहणाऱ्या लोकांना या जमिनीचे मोफत मालकी हक्क दिले पाहिजेत. ६. सिलिंग कायद्याची अंमलबजावणी केल्यानंतर वरकड, सरकारी पडजमीन व जंगलाची जमीन भूमिहीन शेतकऱ्यांना वाटून द्यावी किंवा त्यांची सहकारी शेते स्थापन करावीत. ७. जमिनीचे योग्य वाटप व्हावे या करिता ज्या वेगवेगळ्या भूमीसमित्या केल्या जातील त्यात भूमिहीनांच्या संघटनांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे.[१२] १४ एप्रिलच्या लढ्यानंतर सरकारने '१९७० च्या आत आम्ही हा प्रश्न सोडवू' अशी घोषणा केली असली व त्याप्रमाणे हालचाली सुरू केल्या असल्या तरी १४ एप्रिल सरकारची व ७ जून आपली! या जिद्दीने आपण पुढील लढ्याची तयारी केली पाहिजे. १४ एप्रिलच्या लढ्यात जी जंगल, वरकड व पडजमीन आपण सरकारकडे मागितली आहे ती "७ जून नंतर मृग नक्षत्राचा पाऊस पडल्यावर आम्ही पेरणार, त्याचे पीक घेणार व त्याचे प्रत्यक्ष फायदे भूमिहीन शेतकऱ्यांना मिळवून देणार". म्हणून या लढ्याच्या तयारीला त्वरित सुरुवात करून '७ जून नंतर पेरते व्हा' असा संदेश देऊन जमिन बळकाव लढ्याचा कार्यक्रम सर्व राज्यांत पावसाळा सुरू होताच हाती घेण्याचा आदेश कम्युनिस्ट पक्षाने दिला.१३

**5.अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाचे जमीन बळकाव लढ्यातील योगदान व कामगिरी**:

दि. १ जुलै १९७० रोजी भाकप, अ. भा. किसान सभा व आदिवासी भूमिहीन शेतमजूर संघ यांच्या नेतृत्वाखाली राहुरी तालुक्यात सहा केंद्रांवर जमीन पेरणी सत्याग्रह करण्यात आला. त्याचे नेतृत्व जिल्हा किसान सभेचे अध्यक्ष कॉ. बाबुराव थोरात, कॉ. गंगाधर जाधव यांनी केले.१४ १४ जुलै रोजी महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाच्या सभेत जमीन बळकाव लढा तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला. कम्युनिस्ट पक्षाच्या आदेशानुसार १५ ऑगस्ट १९७० रोजी भाकप, किसान सभा, लाल निशाण पक्ष, प्रजा समाजवादी पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष व भूमिहीन शेतमजूर संघटना यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण भारतात व महाराष्ट्रभर बड्या बागायतदारांकडील जमिनी ताब्यात घेण्याचा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेण्यात आला.१५

अहमदनगर जिल्ह्यात श्रीरामपूर तालुक्यात खाजगी साखर कारखानदारी व बड्या बागायतदारांचे मोठे प्रस्थ होते. त्यामुळे सर्वपक्षीय नेतृत्वाने या तालुक्यात ४ केंद्रांवर जमीन बळकाव लढा कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेतला. तालुका मॅजिस्ट्रेटने या भागाच्या आसपास १४४ कलम जारी केले. त्याचा भंग करून सत्याग्रह करण्याचा सर्वांनी निश्चय केला. अहमदनगर जिल्ह्यात सोमय्या (९०० एकर जमीन) यांच्या श्रीरामपूर तालुक्यातील फार्मवरील सत्याग्रहात अहमदनगर बीड व औरंगाबाद जिल्ह्यातील ८०० सत्याग्रहींनी भाग घेतला. त्याचे नेतृत्व कॉ. चंद्रगुप्त चौधरी व कॉ. निवृत्ती उगले यांनी केले. कॉ. बाळासाहेब नागवडे, कॉ. वकीलराव लंघे, कॉ. नामदेवराव आव्हाड, कॉ. जग्गनाथ सोनवणे, कॉ. बाबुराव थोरात, कॉ. अचपळराव लांडे पाटील, कॉ. सातपुते पाटील, कॉ. लक्ष्मणराव लांडे, कॉ. शांतीलिंग आप्पा लोहकरे, कॉ. विनायकराव औटी आदी कम्युनिस्ट पुढाऱ्यांनी या सत्याग्रहात भाग घेतला. फार्म भोवती पोलिस व एस. आर. पी. चा कडक पहारा ठेवण्यात आला होता. फार्ममधील शेतमजुरांनी १५ ऑगस्ट रोजी एक दिवसांचा लाक्षणिक संप करून सत्याग्रहाला आपला पाठिंबा व्यक्त केला. सत्याग्रहींनी सिलींग मर्यादेपेक्षा जादा जमीन काढून घ्या, भूमिहिन व आदिवासींना जमीन मिळालीच पाहिजे, जान देंगे जमीन लेंगे अशा घोषणा देत फार्ममध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी १४४ कलमाचा भंग केल्याबद्दल सर्व सत्याग्रहींना अटक केली. स्त्रियांना २०० रु. दंड अगर दोन दिवसांची शिक्षा ठोठावण्यात आली. श्रीरामपूर तालुक्यातील जमीनदार खटोड (१३०० एकर जमीन) यांच्या मालुंजा येथील फार्ममध्ये कॉ. एकनाथ भागवत व आमदार दराडे यांच्या नेतृत्वाखाली ६०० भूमिहीन सत्याग्रहींनी जबरदस्तीने जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांनाही ताब्यात घेतले. स्टेट फार्म हरेगाव येथे सुमारे ७६ सत्याग्रहींनी जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. या तुकडीचे नेतृत्व कॉ. माधवराव गायकवाड, आमदार कॉ. बी. के. देशमुख व कॉ. पी. बी. कडू पाटील यांनी केले. १६ कोल्हार येथे केंद्रीय मंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्या ६० एकर शेतीत २२३ सत्याग्रही घुसल्याबद्दल त्यांना १८८ कलमाखाली अटक करण्यात आली. या सत्याग्रहाचे नेतृत्व कॉ. गंगाधर ओगले यांनी केले.१७

**6.जमीन बळकाव लढ्याचे मूल्यमापन :**

१५ ऑगस्टचा जमीन बळकाव लढा संपूर्ण भारतभर झाला. या लढ्यात ३१,१८३ सत्याग्रहींना अटक झाली व १, ६१, ९९० एकर जमीन ताब्यात घेण्यात आली. महाराष्ट्रातील २६ पैकी २२ जिल्ह्यातील २० हजारापेक्षा जास्त सत्याग्रहींनी लढ्यात भाग घेतला. त्यात १२०० स्त्रिया होत्या. ७५०० जणांना अटक झाली व ४ हजारापेक्षा जास्त सत्याग्रहींना ७

दिवस ते ४॥ महिन्यांची शिक्षा झाली. या लढ्यात १२ हजार एकर पडजमिनीचा कब्जा घेण्यात आला.१८ महाराष्ट्रात अहमदनगर जिल्हा हा या लढ्यामध्ये सर्वात आघाडीवर होता. जिल्ह्यात १७०० सत्याग्रहींना अटक करण्यात आली. ११६७ जणांना १ महिन्याची शिक्षा झाली. या लढ्यामुळे जिल्ह्यातील बड्या बागायतदारांनी आज ना उद्या आपल्या ताब्यातील जमीन जाणार याची धास्ती घेतली. ेच स्वतःकडे हजारो एकर जमीन ठेवून त्या जमिनीवर राबणाऱ्या कुळांना उपाशी मारणारे व शेतमजुरांची पिळवणूक करणारे शासकीय व खासगी भांडवलदारांचे लुटारू शोषक स्वरूप समोर आले. भूमिहीनांना वाटण्यासाठी थोडीच जमीन शिल्लक आहे ह्या प्रचारातील फसवेपणा दिसून आला. बड्या जमीनदार व भांडवलदारांनी हजारो एकर जमीन बेकायदेशीर मार्गाने बळकावली आहे हे या लढ्यामुळे स्पष्ट झाले.१९ या लढ्याच्या परिणामस्वरूप केंद्र सरकारच्या सूचनेनुसार महाराष्ट्र सरकारने १९६१ च्या भूमीधारणेची मर्यादा कमी करण्यासंबंधीचा वटहुकूम १९७१ साली काढला. त्यानुसार बागायतीची कमालमर्यादा १० ते १८ एकर, विहीरीच्या पाण्याखालील जमिनीची २७ एकर व कोरडवाहू जमिनीची कमालमर्यादा ५४ एकर एवढी निश्चित केली. गरीब शेतकरी, शेतमजूर व आदिवासी शेतकऱ्यांच्या परिषदेत कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी कॅा. एकनाथ भागवत यांनी या वटहुकूमला विरोध करून जमीनधारणेची कमाल मर्यादा निम्यावर आणून ही मर्यादा साधारण जमिनीसाठी ३० एकर, हलक्या जमीनिसाठी ५० एकर व ओलीताखालील जमिनीसाठी ८ एकरपेक्षा अधिक न ठेवण्याची मागणी केली. तसेच जमिनीची कालमर्यादा ठरवितांना जमिनीच्या मालकीऐवजी त्या जमिनीत किती उत्तपन्न निघते हा निकष लावण्याची मागणी केली. सिलींगची अंमलबजावणी सप्टेंबर १९७० ऐवजी जानेवारी १९७१ पासून करण्याच्या सूचनेला कम्युनिस्टांनी विरोध केला. कारण अनेक बागायतदारांनी आपल्या लाखो एकर जमिनी नातेवाईकांच्या नावे केल्या होत्या. शेतकरी कोणाला म्हणावे याची स्पष्ट व्याख्या न केल्याने सधन व्यापारी, दलाल, सरकारी अधिकारी, काळा पैसेवाले यांना एक प्रकारे अभय मिळून त्यांना जमीन ठेवण्याची मुभा मिळाली. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने जमीन धारणेची कमाल मर्यादा ठरविणाऱ्या वटहुकूमाला विरोध करण्याची भूमिका चालूच ठेवली.२० पुढे १९७५ साली देशात आणीबाणी जाहीर झाल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० कलमी कार्यक्रम घोषित केला आणि त्यामध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणानुसार सिलींग कायदा करून त्यात मोठ्या जमीनदारांकडील अतिरिक्त जमिनी भूमिहीन शेतमजुरांना देण्याची तरतूद केली.२१ अशा प्रकारे कम्युनिस्ट पक्षाने देशपातळीवर जमीन बळकाव लढ्याच्या माध्यमातून उभी केलेली चळवळ यशस्वी करण्यात अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाने मोठी भागीदारी केलेली दिसते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. दैनिक नगर टाइम्स, वर्ष ११ वे, अंक ४५ वा., दि. १८/१२/१९७६, पृ. क्र. २.

२. दैनिक नगर टाइम्स, वर्ष १३ वे, अंक २३९ वा., दि. १२/०७/१९७८, पृ. क्र. १.

३. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. ०५/१०/१९८०, पृ. क्र. १.

४. कॉ. भगवान गायकवाड, 'मुलाखत दि. २३/०८/२०१४', तालुका सचिव भाकप, शेवगाव, मु. पो. खरडगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

५.साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. ३०/०३/१९६९, पृ. क्र. ९.

६. ढोले अशोक एकनाथ, 'कॉ. पी. बी. कडू पाटील जीवन व कार्य: एक चिकित्सक अभ्यास (१९२१-१९९६)', (अप्रकाशित शोध प्रबंध), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, २०१४, पृ. क्र. २८२.

७. कडू पी .बी., क्रांतिपंढरीचा वारकरी (शब्दांकन: सविता भावे), प्रकाशक, अरुण पुंजाजी कडू, सात्रळ, राहुरी, सप्टेंबर २०१४, पृ. क्र.१८४.

८. भागवत एकनाथ, 'जमिनीचा लढा लढवा', भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, राजभुवन, सरदार पटेल रोड, मुंबई, प्रथम आवृत्ती, १० जुलै १९७०, पृ. क्र. ३.

९. उद्धृत, देशमुख सुदाम, 'महाराष्ट्रातील ग्रामीण गरिबी आणि जमिनीचे फेरवाटप', भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, राजभुवन, सरदार पटेल रोड, मुंबई, प्रथमावृत्ती, जून १९६९, पृ. क्र. १-२.

१०. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १३/०२/१९७२, पृ. क्र. ३-४.

११. भागवत एकनाथ, 'जमिनीचा लढा लढवा', उपरोक्त, पृ. क्र. ३.

१२. जमिनीसाठी देशव्यापी लढा उभारा! पडित व वरकड जमिनी ताब्यात घ्या! (भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय कौन्सिलच्या दि. ८ ते १३ मे १९७० च्या दिल्ली येथे बैठकीने संमत केलेला ठराव), भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे प्रकाशन, राजभुवन, सरदार पटेल रोड, मुंबई, पृ. क्र. २.

१३. दैनिक नगर टाइम्स, वर्ष ५ वे, अंक ११३ वा., दि. १२/०२/१९७०, पृ. क्र. १.

१४. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. ०८/०३/१९७०, पृ. क्र. १.

१५. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. २६/०४/१९७०, पृ. क्र. १-२.

१६. कॉ. पंढरीनाथ बाबुराव सहाणे, 'मुलाखत दि. २७/११/२०१४', माजी तालुका सचिव भाकप, संगमनेर, मु. पो. पेमगिरी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

१७. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १७/०५/१९७०, पृ. क्र. ७.

१८. उद्धृत, शेवाळे विठ्ठल, 'एका वादळाची कहाणी- कॉ. बी. के. देशमुख यांचे जीवनकार्य', प्रकाशक, कॅा. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, रेड फ्लॅग बिल्डिंग, बिंदु चौक, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, मे २०१०, पृ. क्र. २४-२५.

१९. जमिनीसाठी देशव्यापी लढा उभारा! पडित व वरकड जमिनी ताब्यात घ्या!, उपरोक्त, पृ. क्र. ७ ते ९.

२०. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १७/०५/१९७०, पृ. क्र. ८.

२१. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. १९/०७/१९७०, पृ. क्र. ६.

# ग्रामीण विकास पर पारिस्थितिकीय एवं पर्यावरणीय प्रभाव : नालंदा जिला के संदर्भ में

*पूरन चन्द*

*शोधार्थी भूगोल विभाग, पी०आर०टी०, मगध विश्वविद्यालय, बोधगया*

**सारांश :-**

मानव प्रकृति का अभिन्न अंग है तथा उसने प्राकृतिक संसाधनों एवं पारिस्थितिकी प्रणालियों के आधार पर ही विकास किया है। वस्तुत: विकास की आवश्यकता का जन्म मनुष्य की सचेतन प्रेरणा के फलस्वरूप प्रकृतिक स्थिति को स्वाहित में सुधारने के लिए होता है। विशेषत: यह भोजन, वस्त्र, वस्तुओं एवं शरणस्थल की स्थिती में वांछित है। मनुष्य अपने अस्तित्व, सुख-सुविधा, मनोरंजन आदि की पूर्ति साधनों के उपयोग से करता है, जब मानव के द्वारा संसाधन को आंशिक रूप से शोषण का रूप ले लेता है, तो एक ओर प्राकृतिक संसाधनों का भण्डार कम होने लगता है और दूसरी ओर इनकी गुणवत्ता में गिरावट आ जाती है। अन्तत: प्राकृतिक प्रणालियों की जीवनदायिनी क्षमताएँ क्षीण होने लगती है और संसाधन आधार संकुचित होने लगता है। ग्रामीण विकास क्षेत्रों में वातावरण को प्रदूषित होने से बचाने के लिए वृक्षारोपण सर्वश्रेष्ठ साधन है। दूसरी ओर वृक्षों के कटाव पर भी रोक लगायी जानी चाहिए। कारखनों और मशीनें लगाने की अनुमति उन्हीं लोगों को दी जाना चाहिए जो औद्योगिक कचरे और मशीनों के धुएँ को बाहर निकालने का समुचित व्यवस्था कर सकें। वर्तमान समय में हमारे समक्ष सबसे बड़ी चुनौती पर्यावरण को बचाने की है क्योंकि पानी, हवा, जंगल, मिट्टी आदि सब कुछ प्रदूषित हो चुका है। इसलिए प्रत्येक व्यक्ति को पर्यावरण का महत्व बताया जाना चाहिए क्योंकि यही हमारे अस्तित्व का आधार है। यदि हमने इस असन्तुलन को दूर नहीं किया तो आने वाली पीढ़ियाँ अभिशाप्त जीवन जीने को बाध्य होगीं। रासायनिक उर्वरकों के छिड़काव एवं वनों के अंधाधुंध कटाई के कारण पर्यावरण को काफी ज्यादा प्रभावित हुआ है। रासायनिक उर्वरकों के अधिक मात्रा में खेतों में उपयोग करने से जहाँ खेती की मिट्टी को उर्वराशक्ति क्षीण हो जाती है, दशक से ही हरित क्रान्ति की शुरूआत के साथ ही रासायनिक उर्वरक, कीटनाशकों का उपयोग काफी अधिक शुरू होने के फलस्वरूप पर्यावरणीय पर इसका प्रतिकूल प्रभाव पड़ा। वायुमंडल में कॉर्बनडाई ऑक्साइड की मात्रा में कमी होने लगा। ग्रामीण विकास का परिस्थतिकीय एवं पर्यावरणीय आधार है। बिहार राज्य के नालंदा जिला के ग्रामीण क्षेत्रों में कल-कारखाने एवं मशीनें लगाने की अनुमति उन्हीं लोगों को दी जाना चाहिए जो औद्योगिक कचरे और मशीनों के धूएँ को बाहर निकालने की समुचित व्यवस्था कर लें।

**मूल शब्द :-** ग्रामीण विकास, पर्यावरणीय संतुलन, पर्यावरणीय आधार, रासायनिक उर्वरकों, औद्योगिक कचरे।

**अध्ययन क्षेत्र :**

ग्राम्य क्षेत्रों में कम होते संसाधनों के साथ पोषण, ईंधन, आवास एवं सफाई जैसी समस्याएँ प्रखर हैं। विकास विशेषत: ग्रामीण विकास के साथ पर्यावरणीय ह्रास पर सामयिक उलझन है। इसलिए ग्रामीण विकास के सन्दर्भ में पर्यावरणीय एवं पारिस्थितिकी के प्रश्नों का विशेष महत्व है, तथा यह प्रश्न संसाधनों के अल्प विकास, अति दोहन, शोषण मूलक व्यवस्था, वर्गीय असन्तुलन, बेरोजगारी एवं कुपोषण की स्थिती में और ही प्रखर है। गाँव प्राकृतिक संसाधनों की गोद में बसता-पलता है तथा भारतीय ग्रामों की मौलिक विशेषता इसके जीवन में शताब्दियों से पर्यावरणीय अनुकूल संस्कार है। उनकी सांस्कृतिक धाराओं में प्राकृतिक एवं पारिस्थितिकी तंत्र के साथ सभी तत्वों का मानवीकरण एवं दीव्यीकरण किया गया था, लेकिन आज के ग्राम नष्ट होती संसाधनता, सांस्कृतिक तत्वों में ह्रास एवं आर्थिक विपन्नता के पर्याय है। ग्रामीण विकास हमारी राष्ट्रीय प्राथमिकता है तथा इसको संचालित कर ग्राम्य जीवन को सुखद बनाना हमारा राष्ट्रीय लक्ष्य है। सामान्यत: ग्रामीण विकास की प्रक्रिया संसाधन विकास, कृषि विकास प्राविधिक प्रत्यावर्तन एवं ग्रामीण समुदाय के सामाजिक-सांस्कृतिक तथा आर्थिक रूपांतरण से सम्बद्ध है। हमारा सम्पूर्ण विकास ग्राम्य क्षेत्रों में जैसे संसाधनों पर निर्भर है। समग्र ग्रामीण विकास की अवधारणा में किसी ग्राम्य तंत्र का अपने स्वयं के पर्यावरण के साथ तालमेल रहते हुए अपनी सम्पूर्ण सम्भावना को उदघाटित करना और अपने में ऐसी आँतरिक संरक्षात्मक प्रक्रियाओं को अपनाना एवं संवर्द्धन करना, जो दीर्घकालिक पर्यावरणीय परिवर्तनों के साथ अनुकूलन एवं सामन्जस्य स्थापित करने में सहयोग दे को सम्मिलित किया गया है। ग्रामीण विकास में प्राकृतिक व्यवस्था के अनुरूप पर्यावरण का न्यायोचित विवेकपूर्ण एवं अनवरत उपयोग सम्मिलित है। पारिस्थितिकी रूप से संतुलित दीर्घकालिक योजना का मुख्य उद्देश्य पर्यावरण को मनुष्य की आवश्यकता के अधिकतम अनुरूप बनाना है। इसके अन्तगर्त बाढ़ नियंत्रण, सूखा नियत्रण, वनीकरण, एवं वृक्षारोपण, मृदा-अपरदन पर रोक, उर्जा के वैकल्पिक स्रोतों की खोज, भूमि दुरूपयोग नियंत्रण, प्रदूषण नियंत्रण एवं ग्रामीण स्वच्छता आदि को स्वीकृति प्राप्त है। इससे स्थानीय एवं वर्गीय सन्तुलन के साथ पर्यावरणीय एवं पारिस्थितिकी सन्तुलन बना रहेगा। बिहार राज्य के नालन्दा जिला एक प्रमुख जिला है, जिसका मुख्यालय बिहारशरीफ है। यह जिला प्राचीन भारत में ऐतिहासीक उच्च्च शिक्षा

का सर्वाधिक महत्वपूर्ण एवं विख्यात केन्द्र था। यह शोध अध्ययन क्षेत्र बिहार राज्य के नालन्दा जिला का कुल भौगोलिक क्षेफल 2367 वर्ग किलोमीटर भू-भाग में विस्तारीत है। नालन्दा जिला, मुख्य रूप से कृषि प्राधानता जिला है। इस क्षेत्र में मुख्यत: गेहूँ, धान, मक्का, चना, मसूर, खेसारी, एवं आलू की खेती के लिए महशूर है। बिहार के नालन्दा जिला के ग्रामीण क्षेत्रों के किसानों आलू उत्पादन करने में विश्व कीर्तिमान कायम करने में सफल योगदान दिया है। पर्यावरण ऊर्जा का आम्बर हे तथा ऊर्जा विकास का मूल बिन्दू है। ऊर्जा से ही कृषि कार्यों, ग्रामीण उद्योग विकसित होंगे तथा ग्राम्य जन-जीवन में आवश्यक सुविधाएँ जुट सकेंगी। सम्प्रति भारतीय ग्राम्य जलाऊ लकड़ी, आपूर्ति एवं अन्य ऊर्जाजन्य समस्याओं से ग्रस्त है। भारत की बहुसंख्यक ग्रामीण जनता गरीब है। उसे सस्ती एवं धुआँ रहित तथ उपयोगी ऊर्जा प्रणाली की आवश्यकता है। वातावरण को प्रदूषित होने से बचाने के लिए वृक्षारोपन सर्वक्षेष्ठ उपाय है। बढ़ती हुई जनसंख्या और औद्योगीकरण ने विश्व के सम्मुख प्रदूषण की समस्या पैदा कर दी है। कारखानों से निकलने विषैले धुएँ तथा जहरीली गैसे के रिसाव से आज मानव-जीवन समस्याग्रस्त हो गया है। इस प्रदूषण से मनुष्य जानलेवा बीमारियों का शिकार हो रहा है।

बिहार राज्य के नालन्दा जिला 2011 जनगणना के अनुसार कुल जनसंख्या 28,77,653 है, जिसमें पुरूष की जनसंख्या 14,97,060 तथा महिलाओं की संख्या 13,80,593 हे। इस जिले में लिंगानुपात 1000 पुरूष पर 922 महिलाएँ है। इस जिला में 3 अनुमंडल, 20 प्रखण्ड, 36 पुलिस स्टेशन एवं गावों की संख्या 1003 है। इस जिले में साक्षरता दर 66.41 है। पुरूष साक्षरता 77.11 तथा महिला साक्षरता दर 54.76 है।

**शोध अध्ययन नालन्दा जिला के क्षेत्र का मानचित्रण**




**प्रस्तुत शोध परियोजना के उद्देश्य :-** प्रस्तुत शोध परियोजना के निम्नलिखित उद्देश्य है।

- बिहार राज्य के नालन्दा जिला का ग्रामीण क्षेत्रों के भौगोलिक विश्लेषण,
- नालन्दा जिला के ग्रामीण विकास एवं पर्यावरणीय आधार पर संपोषणीय विकास हेतु योजना का निर्माण
- ग्रामीण विकास के परिस्थितिकीय एवं पर्यावरणीय आधार का विश्लेषण करना,
- वातावरण को प्रदूषित होने से बचाने के लिए जन-जागरूकता पैदा करना,
- प्राकृतिक संसाधनों एवे पारिस्थितिकी प्रणलियों के आधार पर ग्राम्य विकास का निर्माण।

**विधितंत्र :-** किसी भी शोध कार्य करने के लिए शोध परियोजना का सफल सम्पादन, सुविकसित विधितंत्र के अभाव में संभव नहीं है। भूगोल के किसी भी भौगोलिक क्षेत्र या स्थान पर मानव के निवास्य स्थल और उसकी विभिन्न आवश्यकताएँ की पूर्ति हेतु आवश्यक माध्यमों का भी अध्ययन करता है।

प्रस्तुत शोध परियोजना हेतु निम्नलिखित विधितंत्रों का सहारा लिया जाएगा :-

- शोध अध्ययन परियोजना से सम्बन्धित विभिन्न प्रकार की आँकड़ों का संकलन किया जाएगा
- आँकड़ों के आधार पर तालिकाओं चित्रों एवं मानचित्रों आदि का निर्माण किया जायेगा।

**बिहार राज्य के नालन्दा जिला के वनीय क्षेत्र वितरण (प्रखण्डवार) हेक्टेयर में (2011)**

| क्रम सं० | प्रखण्डवार | ग्रामों की संख्या | कुल क्षेत्रफल (हेक्टेयर में) | कुल वन क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| 1 | Chandi | 66 | 12758.00 | 3 |
| 2 | Rahui | 61 | 12081.00 | 0 |
| 3 | Bind | 29 | 6963.00 | 47.6 |
| 4 | Sarmera | 29 | 11526.00 | 0 |
| 5 | Asthawan | 59 | 14026.00 | 0 |
| 6 | Biharsarif | 72 | 15190.00 | 0 |
| 7 | Noor sarai | 60 | 12447.00 | 59.7 |
| 8 | Tharthari | 30 | 6276.00 | 0 |
| 9 | Parblalpur | 23 | 6300.00 | 0 |
| 10 | Hilsa | 57 | 13090.00 | 0 |
| 11 | Ekangarsari | 88 | 13250.68 | 0 |
| 12 | Islampur | 91 | 21612.65 | 0 |
| 13 | Ben | 32 | 10082.00 | 0 |
| 14 | Rajgir | 49 | 11106.00 | 0 |
| 15 | Silao | 48 | 11523.00 | 0 |
| 16 | Giriak | 40 | 7881.00 | 563 |
| 17 | Katrisarai | 14 | 4226.96 | 20.8 |
| 18 | Kariparsurai | 45 | 6547.00 | 0 |
| 19 | Nagar Nausa | 44 | 7389.40 | 70.1 |
| 20 | Harriaut | 66 | 17252.04 | 18 |
| **जिला नालन्दा** | | **1003** | **221527.73** | **877.7** |

**Source: -** District Census Handbook Nalanda.

जनगणना रिपोर्ट 2011 के अनुसार यहाँ की जनसंख्या का औसत घनत्व 922 व्यक्ति प्रति वर्ग किलोमीटर है। प्रशासनिक स्तर पर नालन्दा जिला में कुल 20 प्रखण्ड है, जिनका नाम – चन्दी, रेहुई, बिन्द, सरमेरा, अस्थमाँ, बिहार शरीफ, नुरसाराय, थरथरी, परबलपूर, हिलसा, एकंगरसराय इस्लामपूर, बेन, राजगीर, सिंलाव, गिरियक, कत्तरीसराय, कराईपरसुराय, नगरनौसा, हरनौत। प्रखण्डवार यदि सभी ग्रामों की संख्या 1003 है। कुल क्षेत्रफल 221527.73 हेक्टेयर है। बिहार राज्य के नालान्दा जिला में ग्रामों के विस्तार है, जो कुल भौगोलिक क्षेत्रफल 21612.65 भू-भाग में ग्रामों के विस्तार है, जहाँ कुल वन क्षेत्र शून्य है। यदि सबसे कम गाँवों की संख्या में कत्तरीसराय 14 गाँवों है, जो कुल भौगोलिक क्षेत्र 4226.96 हेक्टेयर भू-भाग में फैला हुआ है, जो वन क्षेत्र का यदि चर्चा किया जाए, तो उस क्षेत्र में भी वनों की हेक्टेयर भू-भाग शून्य है।

**निष्कर्ष:-**

पृथ्वी मानव का अवास है, लेकिन साथ ही अन्य जैव-अजैव तत्वों का भी स्थान है। विभिन्न सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक अनुक्रियाओं के कारण अनेकानेक पर्यावरणीय विलक्षणताएँ दृष्टिगत हो रही है। विकास प्रक्रिया में पर्यावरणीय एवं पारिस्थितिकी अनुक्रमण ही दीर्घकालिक विकास को सुनिश्चित कर सकता है। पर्यावरणीय एवं पारिस्थितिकी पक्षों को दृष्टिगत रखते हुए ग्रामीण विकास को सुनिश्चित कर सकता है। पर्यावरणीय एवं पारिस्थितिकी पक्षों को दृष्टिगत रखते हुए ग्रामीण विकास को सुनिश्चित करते समय निम्न बिन्दुओं पर विचार करना चाहिए।

निम्न स्तर से उच्च स्तर की ओर नियोजना प्रक्रिया को अपनाना, विकेन्द्रीकृत ऊर्जा प्रणाली का विकास तथा ऊर्जा के वैकल्पिक स्रोतों का विकास, स्थानीय संसाधनों का विकास एवं उनका विवेकपूर्ण उपयोग जिससे पारिस्थितिकी संतुलन बना रहे, कृषि विकास पशुपालन एवं ग्रामीण उद्योग के विकास को प्रदूषण रहित एवं पर्यावरणीय सुरक्षा के साथ सुनिश्चित करना, ग्रामीण स्वच्छता हेतु शौचालयों का निर्माण।

**संदर्भ सूची:-**

1. डिस्ट्रीक्ट सेन्सस हैण्डबुक, नालन्दा, 2011 (CD)
2. राय पारसनाथ "अनुसंसाधन परिचय" लक्ष्मी नारयण अग्रवाल, आगरा।
3. डॉ. मंगला सिंह, प्राध्यापक भूगोल, वसन्त कालेज फार वीमेन्स राजघाट- वारणसी।
4. विश्वनाथ प्रसाद सिन्हा (2016) ; बिहार का भूगोल।
5. Bihar Statistical Hand book, 2011
6. Mahto.K (1947) pattern of population growth in Bihar, Geographical Research centre Patna, Vol-12.
7. World news, Global, development report March 2010.

# पश्चिमी चम्पारण जिला में थारू जनजाति की कृषि समस्यायें: एक भौगोलिक अध्ययन

**कुमार गौरव**
शोधार्थी, भूगोल विभाग, जे०आर०एफ,मगध विश्वविद्यालय बोध गया

**सारांश:**

बिहार की पश्चिमी चम्पारण जिला में अधिकांश कृषि पर आश्रित है, फिर भी कृषि का विकास सही ढंग से नहीं हो पाया है। यहाँ आज भी कृषि में मूलभूत सुविधाओं का अभाव है। जनजातीय समुदाय में यह समस्या और भी जटिल है। इनके पास भूमि कम है। संबंधी संसाधनों और जागरूकता की कमी तथा अशिक्षा एवं सरकारी उदासीनता है। इसलिए वे आज भी कृषि से अन्य लागों की तुलना में लाभान्वित हो गये हैं, जिससे उन्हें अनेक कठिनाइयों का सामना करना पड़ता है। पश्चिमी चम्पारण जिला में इस जनजाति की संख्या 2011 में 75537 थी, जिसमें 37632 पुरूष एवं 37905 महिलायें थी। शहरी क्षेत्र में इनकी संख्या 73078 तथ ग्रामीण क्षेत्र में 2459 थी। पश्चिमी चम्पारण जिला के अधिकांश जनजाति गरीब किसान हैं, उनके पास कृषि के अतिरिक्त आय का कोई अन्य साधन नहीं है। उसके बदले उन्हें उपज का आधा हिस्सा ही मिलता है। उनके पास न तो जोतने के लिए हल है, न ही अच्छी सुविधायें और न ही पैसे हैं जिससे कि उस बटाई की भूमि पर यंत्र या अच्छी बीज से अच्छा उत्पादन प्राप्त कर सके। इन कृषकों की अशिक्षा, अश्रानता, अंधविश्वास और भाग्यवादिता गरीबी के कारण है। भौतिक क्षेत्र में वैज्ञानिक प्रगति होने के बावजूद गरीबी में जीवन व्यतीत करना थारू आदिवासियों की कृषि के लिए अभिशाप हो गया है।

**मूल शब्द :** कृषि, किसान, जागरूकता, गरीबी, कृषि समस्यायें, सिंचाई, फसल।

**अध्ययन क्षेत्र:**

पश्चिमी चंम्पारण जिला 26°16' से 27°31' उत्तरी अक्षांश और 83°50' से 85°18' पूर्वी देशान्तरों के बीच वैश्विक मानचित्र पर स्थित है। जिले का क्षेत्रफल 5,228 वर्ग कि०मी० भू-भाग में फैला हुआ है। क्षेत्रफल की दृष्टि से बिहार के अन्य जिलों की तुलना में जिला का स्थान प्रथम है। यह जिला उत्तर में नेपाल के पहाड़ी क्षेत्र, दक्षिण में गोपालगंज जिले और पश्चिम में पूर्वी चम्पारण जिला का भाग है। उत्तर प्रदेश राज्य और पूर्व में पूर्वा चम्पारण जिले और नेपाल के साथ है, इसका एक अन्तराष्ट्रीय महत्व है। अंतर्राष्ट्रीय सीमा जिले के पाँच ब्लॉकों के साथ लगी हुई है। रामनगर, गौनाहा, मैनाटांड़ और सिकता, जो उत्तर-पश्चिम से दक्षिणी-पूर्व तक फैली हुई है।

जनगणना रिपोर्ट 2011 के अनुसार यहाँ की जनसंख्या का औसत धनत्व 1495 व्यक्ति प्रति वर्ग किलोमीटर है। प्रशासनिक स्तर पर पश्चिमी चम्पारण जिला में कुल 18 प्रखण्ड हैं, सिधाव, रामनगर, गौनाहा, मेनटांड़, नरकटियागंज, लौरिया, बगहा, पिपरासी, मधुबनी, भिटाहा, थाकराहन, जोगापट्टी, चनपटियाँ, सिकटा, मौछलियाँ, बेतियाँ, बैरिया, नौतन है। जनगणना वर्श 2011 में इस जिला के नगरीय जनसंख्या 39316 थी जो कुल जनसंख्या का 5.49 प्रतिशत था; शेष ग्रामीण जनसंख्या थी।

**परिकल्पना**

विभिन्न तथ्यों को ध्यान में रखकर इस शोध पत्र हेतु निम्नांकित दो परिकल्पनाएँ विकसित की गयी हैं:

1. अशिक्षा एवं जागरूकता के अभाव में थारू जनजाति कृषि संबंधी सरकारी अनुदान से वंचित हैं।
2. थारू जनजाति की कृषि की परम्परागत तथा वर्तमान समस्याओं की समीक्षा

**पश्चिमी चम्पारण जिला का मानचित्रण**



**उद्देश्य**

प्रस्तुत शोध पत्र का उद्देश्य थारू जनजाति के किसानों की कृषि संबंधी मूलभूत सुविधाओं का आकलन करना जैसे- वित्त संबंधी समस्या, विपणन, एवं भंडारण संबंधी समस्या, वर्तमान समय में खेत में उपयोग की जा रही कीटनाशकों से उत्पन्न समस्या, यंत्रीकरण की समस्या, सिंचाई की समस्या, जागरूकता की कमी, सरकारी योजनाओं की इनके प्रति उदासीनता इत्यादि का विश्लेषणात्मक अध्ययन करना है। साथ ही इस अध्ययन से निकाले गये निष्कर्षों के आधार पर व्यावहारिक सुझाव भी देना है, जिनपर अमल करके कृषि की परम्परागत तथा वर्तमान समस्याओं का निराकरण किया जा सकता है। इसके अलावा थारू किसानों की व्यावहारिक समस्याओं को ध्यान में रखकर, उनसे मिलकर उनकी समस्याओं को देखा गया है और उन्होंने अपनी समस्याओं को अपने ढंग से सुलझाने के उपाय भी बताये हैं, जिसका समावेश इन अध्ययन में है।

**विधि तंत्र**

यह शोध पत्र पूर्णत: सर्वेक्षण पर आधारित है। इसके लिए पश्चिमी चम्पारण जिला के पाँच प्रखण्डों का चयन किया गया है और प्रत्येक प्रखण्ड से पाँच गाँव का चयन किया गया है और प्रत्येक गाँव से पाँच किसान परिवारों को लिया गया है (पाँच किसान परिवार को लेने का आधार गाँ में उनकी कम संख्या का होना है।) इसके लिए प्रश्नावली तैयार कर उनसे व्यक्तिगत साक्षात्कार द्वारा आंकड़े एकत्रित किये गये है, तथा आंकड़ों का विश्लेषण किया गया है।

**अध्ययन के लिए चयनित मापदण्ड**

- किसानों के स्वामित्व में कृषि योग्य भूमि का विवरण
- किसानों द्वारा बटाई पर ली गयी भूमि उपलबध कृषि उपकरण संबंधित विवरण
- सिंचाई के श्रोत का विवरण किसानों की शैक्षणिक स्थिति
- संचार के श्रोत
- कृषि कार्य हेतु लिए गए ऋण
- फसल नुकसान पहुँचाने वाल जानवर व पक्षी
- भण्डारण की पद्धती

**तालिका 01:**

| क्र.सं. | प्रखण्ड का नाम | गाँव | उत्तरदाताओं की संख्या |
|---|---|---|---|
| 1. | सिधाव | कालापानी, थरही, पिपटा, कोटराहा, रामपूरवा, | 25 |
| 3. | रामनगर | बरगजवा, महूई, सेमरा, बरगनाव, जोगिया, | 25 |
| 4. | गौनाहा | परसा, महूवआ, हस्ती बेरिया, बैड़िया, बेलवा, | 25 |
| 5. | मैनाटांड़ | केलवापूर, धरमपूर, तिलोजपूर, घुटूरवा, | 25 |
| 6. | नरकटियागंज | बैरगाँन, मैराऊल, परसी, मैनवा, पिपरा | 25 |

भारतीय समाज में विभिन्न जनजातियों का पाया जाना हमारी सांस्कृतिक धरोहर है। आधुनिक युग की खोज उपभोगवाद पर आधारित है। किन्तु आदिम इतिहास के संदर्भ में आदिम जनजातिय का अध्ययन करना भी आधुनिक समाज की आवश्यकता है। ये आदिम आदिवासी जनजाति जंगलों में निवास करता है, जंगल ही इनका जीवन है तथा आधुनिकता की चकाचौंध से कौसों दूर है। कभी कभी ऐसा लगता है कि ये जनजाति अपने जंगली वातावरण में ही मदमस्त जीवन यापन करने के लिए बनी है।

मनुष्य एक सामाजिक प्राणी है और मानवीय विकास का चक्र निरन्तर चलता रहता है। समाज का कर्तव्य है कि समाज का प्रत्यके प्राणी सुखी-सम्पन्न जीवन-यापन करें। इस हेतु सरकार ने विभिन्न प्रकार की योजनाओं का क्रियान्वयन किया है। वर्तमान परिवेश में थारू आदिवासी जनजाति समुदाय का विकास सरकार की प्रमुखता है। देश के सम्पूर्ण विकास में सभी समुदाय का सहयोग आवश्यक है, किसी एक समुदाय को छोड़कर देश का समग्र विकास नहीं किया जा सकता है। इतिहास इस बात का साक्षी है कि विश्व की अनेक मानव जातियों ने विकास का कदम एकसाथ रखा जिसमें से कुछ मानव जातियों ने अपना विकास परिष्कृत रूप से किया और आधुनिक प्रजातियों में आ गये। किन्तु आधुनिक युग में अनेक जाति विलुप्त हो गई या विलुप्ति के कगार पर है, किन्तु भारतीय आदिम जनजाति ने अपने आपको विपरीत परिस्थितियों में भी जीवित रखा है जो कि भारतीय जनजातियों की प्रमुख विशेषता है।

**परिवार में सदस्यों की संख्या**

पश्चिमी चम्पारण जिला शोध अध्ययन क्षेत्र के माध्यम से वहाँ के 11 किसानों के यहाँ 0-5 सदस्य, 41 किसानों के घर 6-8 सदस्य, 37 किसानों के यहाँ 9-12 सदस्य, वहीं 11 किसानों के यहाँ 12 से अधिक सदस्य है। 12 से अधिक सदस्य उन किसान परिवारें के घर है, जिनके भाई या तो बाहर मजदूरी करने के लिए गये है या साथ में खेती करते हैं और उनका परिवार उनके साथ ही रहता है। इससे स्पष्ट है कि अधिकांश किसान परिवारों में सदस्यों की संख्या ज्यादा है। इतने सारे सदस्यों का कृषि से पेट भरना अपने आप में एक एड़ी समस्या है, वो भी इतनी कम जमीन से। जब किसान अपने परिवार के सदस्यों का पेट अपनी जमीन से नहीं भर पाते हैं तो ये बटाई पर जमीन लेते हैं और उसपर खेती करते है, जिसका आधा हिस्सा उनको मिलता है। जब कभी फसल खराब होती है तो उन्हें कर्ज लेना पड़ता है और कर्ज चुकाने के दूसरे के घर जाकर मजदूरी भी करनी पड़ती है एवं अपने स्वामित्व में कृषि योग्य भूमि के माध्यम से खेती लायक भूमि के आकार के बारे में जानकारी दी गई है। इस संदर्भ मे पता चला कि 21 किसान भूमिहीन हैं, 20 किसानों के पास 10 कट्ठा के बीच, 21-30 कट्ठा 15 किसानों के पास और 8 किसानों के पास 30 कट्ठा से अधिक खेती लायक जमीन है। इससे यह साफ पता चलता है कि थारू किसान के खेती से जुड़े रहने के बावजूद भी इनकी अपनी जमीन बहुत कम है जो इनकी एक बड़ी समस्या है।

**किसानों द्वारा बटाई पर ली गई भूमि**

इस विषय में देखा गया है कि वे उत्तरदाता जो स्वयं खेती करते हैं उनमें से अधिकांश उत्तरदाता बटाई की जमीन भी जोतते हैं। बटाई की जमीन पर खेती करने वाले किसान फसल का आधा हिस्सा जमीन मालिक को देते हैं।

**कृषि उपकरण**

थारू परिवारों में कृषि उपकरण की उपलब्धता में कमी दिखती है, जिसका मुख्य कारण इन परिवारों में भूमि की कमी है। इस सर्वेक्षण से सबसे चौकाने वाली बात यह निकल कर आई कि 100 किसानों के सर्वेक्षण में मात्र 5 किसानों के पास ही हल बैल हैं, ट्रैक्टर की संख्या एक है तथा पंपिगसेट 17 है। वहीं खुरपी/हंसिया/कुदाल सबके पास है।

**उपलबध सिंचाई के श्रोत**

कृषि उत्पादकता बढ़ाने के लिए सिंचाई आवश्यकता है। सिंचाई के साधन नहर, तालाब, कुआँ, नलकूप और नदियाँ हैं। इन क्षेत्रों में अधिकांश सिंचाई नहर और पंपिंगसेट से होती है। डीजल पंप को नहर, तालाब, नदी एवं कुआँ में लगाकर सिंचाई की जाती है।

**किसानों की शैक्षणिक स्थिति**

शिक्षा समाज के बौद्धिक स्तर, सम्पन्नता एवं प्रगति के स्तर को दर्शाता है। यह सामाजिक विकास एवं प्रगति का ऐसा अमोघ अस्त्र है जो समाज में गुणवता पूर्वक परिवर्तन लाने का मार्ग प्रशस्त करता है।

**संचार के स्रोत**

कृषि में संचार के साधनों का महत्वपूर्ण स्थान है और ये प्रत्येक किसान के लिए आवश्यक है। पश्चिमी चम्पारण जिला मे किसानों के पास मोबाईल लगभग सभी के पास है रेडियो, टेलिविजन और समाचार पत्र जो किसानों को जागरूक करने में महत्वपूर्ण योगदान देता है की कमी है। कुछ शिक्षित उत्तरदाताओं ने बताया कि चाय की दुकान पर समाचार पत्र आता है, वहीं पर पढ़ लेते हैं। पूरे भारत में किसान कॉल सेन्टर 22 क्षेत्रीय भाषाओं में कृषि संबंधी मुफ्त सूचना देता है, उसका लाभ भी ये नहीं ले पाते हैं।

**कृषि कार्य हेतु लिए गए ऋण**

यहाँ के अधिकांश किसान महाजन से कर्ज लेते हैं। सिधाव प्रखण्ड के कुछ किसान ही बैंक से ऋण लेते हैं। महाजन से कर्ज लेने पर ब्याज का दर अधिक होता है फिर भी करीब-करीब सभी लोग ऋण लेते हैं, जिसका मुख्या कारण जानकारी का अभाव तथा अशिक्षा है। महाजन से हाथोंहाथ ऋण मिल जाता है जबकि बैंक में लम्बी प्रक्रिया हाने की वजह से ज्यादा समय लगता है। कुछ किसानों ने बताया कि जिस साल फसल खराब हो जाती है, उस साल उन्हें महाजन का कर्ज चुकाने के लिए दूसरे कार्यों में मजदूरी करनी पड़ती है, जैसे - चिमनी पर जाकर ईट-भट्ठा का कार्य करना।

**अनाज भण्डारण की पद्धति**

आज भी यहाँ के सभ थारू किसान परम्परागत ढंग से ही अनाज का भण्डारण करते हैं। उनके पास जो संसाधन है उसी से अनाज भण्डारण का यंत्र बनाते हैं। जैसे – डेहरी, खोंप, मटका या बोरी। डेहरी मिट्टी से बना होता है, जिसमें 4 क्विंटल तक अनाज रखा जा सकता है। खोप कंडा, बांस और रस्सी से बना होता है, जिसमें गेहूँ के भूषा के साथ अनाज को बोरी में भरकर रखा जाता है।

**फसलों को नुकसान पहुँचाने वाले जानवर व पक्षी**

इन क्षेत्रों में लगभग सभी किसानों की फसलों को चुहा, नीलगाय, सांढ़ और भैंसा द्वारा नुकसान पहुँचाया जाता है। इसके आलाव बंदर, गिलहरी, कौआ, तोंता, कबूतर, जंगली सुअर भी फसलों को नुकसान पहुँचाते हैं। चूहा मुख्यत: धान, गेहुँ और आलु को नुकसान पहुँचाता है। ये चूहे खरी फसलों के बीच अपनी बील बनात हैं और उन फसलों को अपनी बील के अन्दर ले जाकर खते हैं तथा इकट्ठा करते हैं। नीलगाय के द्वारा मुख्यत: मक्का, गेहूँ, धान और सब्जियों को रात में नुकसान पहुँचाया जाता है।

**निष्कर्ष:**

निष्कर्षत: कहा जा सकता है कि थारू जनजाति किसानों की कृषि समस्यायें जटिल है, जिससे निपटने के लिए थारू किसानों को सुव्यवस्थित तरीके से संगठित कर सही मार्गदर्शन व पंचायत एवं प्रखण्ड स्तर पर सरकार द्वारा चलायी जा रही कृषि योजनाओं के प्रति जागरूकता फैलाकार ही इस कुचक्र को खत्म किया जा सकता है, तभी ये थारू किसान सही और स्वस्थ जिन्दगी जी पायेंगे।

**संदर्भ सूची:**

1. उमाहिया, कुमार कृष्ण (1993) कृषि विकास की समस्यायें, मित्तल पब्लिकेशन।
2. बिहार सरकार का कृषि रोड मैप 2012-17
3. कुमारी, लक्ष्मी (2003); आदिवासी क्षेत्रों का सामाजिक-आर्थिक विकास (अविभाजिव बिहार के संदर्भ में) जिज्ञासा प्रकाशन, पटना।
4. डिस्ट्रीक्ट सेन्सस हैण्डबुक, पश्चिमी चम्पारण, 2011 (CD)
5. जैन डॉ. पुखराज, भारत की सांस्कृतिक विरासत, पृ. 220;222

# भूमि उपयोग में परिवर्तन एवं भूमि प्रबन्धन पूर्वी चम्पारण जिला के संदर्भः एक भौगोलिक विश्लेषण

***रणधीर कुमार रंजन***

*शोधार्थी, भूगोल विभाग, जे०आर०एफ०, मगध विश्वविद्यालय बोधगया*

**सारांश**

**परिचयः-** देश के कुल क्षेत्रफल उस सीमा को निर्धारित करता है जहाँ तक विकास प्रक्रिया के दौरान उत्पत्ति के साधन के रूप में भूमि का समतल विस्तार संभव होता है। जैसे-जैसे विकास प्रक्रिया आगे बढ़ती है, एवं एक नये मोड़ लेती है, समतल भूमि की आवश्यकता होती है, व परम्परागत उपयोगों में अधिक मात्रा में भूमि की माँग की जाती है। सामान्यता इन नये उपयोगों अथवा परम्परागत उपयोगों में बढ़ती हुई भूमि की माँग की आपूर्ति के लिए कृषि के लिए कृषि के अन्तर्गत भूमि को काटना पड़ता है, और इस प्रकार भूमि कृषि उपयोग से गैरकृषि कार्यों में प्रयुक्त होने लगती है। एक विकासशील अर्थव्यवस्था के लिये जिसकी मुख्य विशेषतायें श्रम अतिरेक व कृषि उत्पादों के अभाव की स्थिती का बना रहता है। भूमि उपयोग के आँकड़े विद्यमान भूमि क्षेत्र का प्रयोगवार विवरण प्रस्तुत करते है और यह स्पष्ट करते हैं कि किसी भूमिखण्ड को सक्षमतापूर्वक कैसे कृषि योग्य बनाया जा सकता है। भूमि उपयोग का विभाजन मुख्य रूप से इस तथ्य पर आधारित है कि भूमि की प्रकृति कृषित भूमि की ओर बढ़ने की है अथवा चारागाह या वनों के अन्तगर्त बढ़ने की है। भूमि उपयोग का विवरण वन, कृषि, उपयोग में प्रयुक्त बंजर तथा कृषि योग्य खाली भूमि, चालू परती भूमि, अन्य परती भूमि और शुद्ध-कृषि भूमि नाम प्रस्तुत किया जाता है।

**मूलशब्द:** लघु उद्योग, घरेलू उद्योग, आर्थिक परिवर्तन, सामाजिक विकास, उद्योग।

**अध्ययन क्षेत्र:-**

बिहार राज्य के पूर्वी चम्पारण जिला की कुल भौगोलिक क्षेत्रफल 3968 वर्ग किलोमीटर भू-भाग में विस्तार है, एवं इसका मुख्य आधार मिट्टी संसाधन, जल संसाधन एवं कृषि संसाधन सम्बन्धित हेतु मृदा को बहुत महत्वपूर्ण संसाधन माना जाता है। पूर्वी चम्पारण जिला के भौगोलिक दृष्टिकोण से स्थिती एवं विस्तार 26°16' उत्तरी अक्षांश एवं 85°16' पूर्वी देशान्तकर ग्लोबीय विस्तार है, तिरहुत प्रमण्डल का मुख्यालय है, समुद्र तल से औसतन ऊँचाई 173 फीट है। भौगोलिक आधार के अनुसार बिहार राज्य के कुल क्षेत्रफल का 2.4 प्रतिशत भू-भाग है। बिहार राज्य के पूर्वी चम्पारण जिला के पश्चिमी भाग में गंगा नदी के तट पर स्थित है। इस जिला का कुल भौगोलिक क्षेत्रफल 3968 वर्ग कि०मी० भू-भाग में फैला हुआ है। 2011 के जनगणना के अनुसार, कुल जनसंख्या 5099371 है, जिसमें से नगरीय जनसंख्या की कुल संख्या, 401343 है जो 5.68 प्रतिशत शहरी क्षेत्रों में निवास करते हैं। इस जिला के अधिकांश लोगों की आजीविका कृषि पर ही आधारित है, लेकिन जनसंख्या वृद्धि होने के कारण प्रतिकूल प्रभाव पड़ा है। नगरीय जनसंख्या में वृद्धि 2001-2011 के अन्तराल में 8.23 प्रतिशत की वृद्धि हुई है। इस जिले के भौगोलिक दृष्टिकोण के कारण जनसंख्या का लिंगानुपात 1000 पुरूषों संख्या पर 899 महिलाएँ की संख्या है, 2001 के अनुसार आँकड़ों को दर्शाया गया है जबकि 2011 के अनुसार 1000 पुरूषों संख्या में 972 महिला की संख्या है। जिसके माध्यम 2001-11 आँकड़ों के अनुसार लिंगानुपात 73 संख्या में वृद्धि हुई है।




**(पूर्वी चम्पारण जिला का मानचित्रण)**

भूमि प्रयोग, भूमि उपयोग तथा भूमि संसाधन उपयोग प्रायः एक दूसरे के पयार्य के रूप प्रयोग किये जाते है, परन्तु इनके मध्य एक सूक्ष्म अंतर है। अर्थशास्त्री अर्थशास्त्री और भूगोलविद् इन की अलग-अलग व्याख्यायें प्रस्तुत करते है। प्राकृतिक परिवेश में भूमि प्रयोग एक तत्सामसयिक प्रक्रिया है जबकि मानवीय इच्छाओं के रूप में अपनाया गया भूमि उपयोग एक दीर्घकालीक प्रक्रिया है, इससे सतत एवं क्रमबद्ध विकास का स्वरूप लक्षित होता है। वुड के अनुसार भूमि का प्रयोग केवल प्राक्रतिक भू-दृश्यके संदर्भ में ही नहीं अपितु मानवीय क्रियाओं पर आधारित उपयोगी सुधारों के रूप में भी प्रयुक्त होना चाहिए। डॉ० सिंह के अनुसार कृषि से पूर्व की अवस्था के लिए जिसके अंतगर्त प्राकृतिक

परिवेश का पूर्णतया अनुसरण किया जाता हो "भूमि प्रयोग शब्द अधिक उपयुक्त होता है। परन्तु जब मनुष्य अपनी आवश्यकताओं की पूर्ति हेतु भूमि के उचित या अनुचित प्रयोग के पश्चात् भूमि उपयोग कहना अधिक संगत होगा।"

**Table: Distribution of villages according to land use, 2011**

| Sr.No. | Name of CD Block | Number of inhabited villages | Total area (in Hectares) | Percentage of cultivable area to total area | Percentage of irrigated area to total cultivable area |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Raxaul | 41 | 12514.90 | 82.93 | 60.85 |
| 2 | Adapur | 60 | 15695.98 | 76.06 | 61.25 |
| 3 | Ramgarhwa | 43 | 16745.35 | 87.17 | 65.49 |
| 4 | Sugauli | 46 | 14781.71 | 68.85 | 59.67 |
| 5 | Banjaria | 30 | 13920.90 | 78.01 | 72.29 |
| 6 | Narkatia | 51 | 12908.28 | 79.22 | 49.89 |
| 7 | Bankatwa | 20 | 8641.90 | 81.01 | 60.45 |
| 8 | Ghorasahan | 26 | 11884.10 | 85.52 | 57.14 |
| 9 | Dhaka | 61 | 15614.20 | 91.89 | 71.74 |
| 10 | Chiraia | 41 | 20536.40 | 80.18 | 53.71 |
| 11 | Motihari | 68 | 23137.40 | 83.30 | 57.31 |
| 12 | Turkaulia | 33 | 13602.10 | 84.17 | 69.52 |
| 13 | Harsidhi | 61 | 19010.50 | 71.14 | 66.28 |
| 14 | Paharpur | 55 | 15453.85 | 75.90 | 66.33 |
| 15 | Areraj | 42 | 16874.60 | 65.75 | 52.93 |
| 16 | Sangrampur | 23 | 14372.54 | 72.18 | 53.49 |
| 17 | Kesaria | 41 | 16940.96 | 62.19 | 42.60 |
| 18 | Kalyanpur | 97 | 23772.63 | 73.72 | 78.81 |
| 19 | Kotwa | 44 | 15156.89 | 82.24 | 61.91 |
| 20 | Piprakothi | 20 | 6612.60 | 78.73 | 73.09 |
| 21 | Chakia(Pipra) | 76 | 16645.98 | 70.20 | 68.47 |
| 22 | Pakri Dayal | 20 | 9650.90 | 84.04 | 73.98 |
| 23 | Patahi | 37 | 11847.22 | 83.06 | 66.05 |
| 24 | Phenhara | 26 | 5459.80 | 90.08 | 83.36 |
| 25 | Madhuban | 54 | 11371.50 | 73.43 | 65.88 |
| 26 | Tetaria | 46 | 8037.10 | 77.40 | 58.84 |
| 27 | Mehsi | 90 | 11298.38 | 70.03 | 39.59 |
| **Total** | | **1252** | **382488.67** | **77.48** | **62.51** |

**Note:** Cultivable area = irrigated area + unirrigated area.

बरलों के अनुसार, "भूमि संसाधन अपयोग" भूमि समस्याएँ व उसके नियोजन की विवेचना की वह धुरी है, जिसके अध्ययन के लिए उन्होंने निम्नलिखित पाँच महत्वपूर्ण दृष्टिकोण है।

1. आर्थिक दृष्टि से संपन्न समाज की स्थापना

2. भूमि संसाधन उपयोग की अवस्था तथा अनुकूलतम उपयोग का निर्धारण

3. विभिन्न लागत कारकों, (श्रम और पूँजी आदि) के अनुपात में भूमि से अधिकतम लाभ की योजना

4. फसलगत भूमि के उपयोग में माँग के आधार पर लाभदायक सामंजस्य तथा परिवर्तन का सुझाव।

5. किसी क्षेत्र के लिए अनुकूलतम एवं बहुउद्देशीय भूमि उपयोग का विवेचन करना तथा उसके सुझावों को क्षेत्रीय अंगीकरण हेतु समन्वित करना।

**जनपद में सामान्य भूमि उपयोगः-**

टेक्नीकल कमेटी ऑन को ऑरडीनेशन ऑफ एग्रीकलचरल स्टैटिक्स की संस्तुति के आधार पर पूर्वी चम्पारण जनपद के सामान्य भूमि उपयोग की विभिन्न क्षेणियों का विवरण किया जा रहा है,

**भूमि उपयोग पूर्वी चम्पारण जिला, 2011 (हेक्टेयर में)**

| क्र.सं. | वन | गैर कृषि प्रयोग में प्रयुक्त भूमि | बंजर और कृषि योग्य भूमियाँ | स्थायी चारागाह | विविध वृक्षों एवं बागों वाली भूमियाँ | कृषि योग्य व्यर्थ भूमि | वर्तमान परती भूमि | अन्य परती भूमि | शुद्ध कृषित क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Purba Champaran | 355.1 | 1493.1 | 181 | 333.5 | 565.6 | 261.1 | 67.7 | 159.2 | 8037.7 |
| Bihar | 1832 | 41012.7 | 7576 | 9365.1 | 15301.2 | 15301.2 | 2775 | 357.3 | 297912.7 |

**वनः-** वन संपदा प्रकृति की एक अप्रतिम कृति है। यह एक नवीकरीणय संपदा है। जिसका अस्तित्व समाज को तत्कालिक लाभ तो देती ही है साथ-साथ परोक्ष रूप से जीव-जगत के अस्तित्व का आधार भी होता है। यह आर्थिक दृष्टि से तो लाभदायक है ही साथ-साथ यह पर्यावरण की दृष्टि से भी अत्यधिक उपयोगी है। पूर्वी चम्पारण जिला में कुल वनीय क्षेत्र 355.1 हेक्टेयर भू-भाग में फैला हुआ है।

**बंजर और गैर कृषि योग्य भूमियाँ०:-** इन शीर्षक में उन भूमियों को सम्मिलित किया जाता है, जो भवन, सड़क, रेलमार्ग आदि के प्रयोग में है, इसी प्रकार के भूमियाँ जो जल प्रवाहों, नदियों या नालों के अंतगर्त है, कि इस वर्ग में सम्मलित है, इसके अतिरिक्त अन्य गैर कृषि प्रयोगों की श्रेणियाँ भी इसके अंतगर्त सम्मिलित होती है। गैर कृषि प्रयोग में प्रयुक्त भूमि 1493.1 हेक्टेयर भू-भाग मे फैला हुआ है।

**बंजर और गैर कृषि योग्य भूमियाँ०:-** इस श्रेणी में वे सभी भूमियाँ सम्मिलित है जो बंजर है या कृषि योग्य नहीं है। इस कोटि में पर्वतीय, पथरी और रेगिस्तानी भूमियाँ आती है। इन भूमियों को अत्याधिक लागत के बिना फसलों के अंतर्गत नहीं लाया जा सकता है। बंजर और गैर कृषि योग्य भूमियाँ कृषि क्षेत्र के मध्य हो सकती है। पूर्वीचम्पारण जिला में 181 हेक्टेयर भू-भाग में फैला हुआ है।

**स्थायी चारागाहः-** इसके अंतगर्त चराईवाली सभी भूमियाँ सम्मिलित है इस प्रकार की भूमियाँ घास स्थली हो सकती है या स्थायी चरारगाह के रूप में, ग्राम समूहों के चारागाह भी इस कोटी में आते है। पूर्वी चम्पारण जिला में के 3.5 हेक्टेयर भू-भाग में विस्तारीत है।

**विविध वृक्षों एवं बागों वाली भूमियाँ०:-** कृषि योग्य वह सभी भूमियाँ सम्मिलित की जाती है जिन्हें शुद्ध कृषि क्षेत्र में सम्मिलित नहीं किया जाता है। किन्तु कतिपय कृषिगत प्रयोग में लायी जा सकती है। इस के अंतगर्त छोटे-पेड़ छावन वाली बासें की झाड़ ईंधन वाली लकड़ी के वृक्ष सम्मलित किया जाता है। 565.6 हेक्टेयर भू-भग में फैला हुआ है।

**कृषि योग्य व्यर्थ भूमिः-** जो खेती के लिए उपलब्ध है, परन्तु जिस पर चालू वर्ष एवं पिछले पाँच वर्षो या इससे आधिक स्वंय से फसल भी उगाई गयी है। ऐसी भूमियाँ परती हो सकती है, या झाड़ियाँ और जंगल वाली हो सकती है, यह भूमियाँ किसी अन्य प्रयोग में नहीं लायी जा सकती है। 261.1 हेक्टेयर भू-भाग में फैला हुआ है।

**वर्तमान परती भूमिः-** वह कृषिगत क्षेत्र सम्मिलित किया जा सकता है, जिसे केवल चालू वर्ष में परती रखा जाता है, उदाहरण के लिय यदि किसी पौधाशाखा वाले क्षेत्र को इसी वर्ष पुनः किसी फसल के लिए प्रयोग नहीं किया जाता है तो उसे चालू परती कहा जाता है। 67.7 हेक्टेयर भू-भाग में फैला है।

**अन्य परती भूमिः-** जो पहले कृषि के अन्तगर्त थी परन्तु अब स्थायी रूप से एक वर्ष की अवधि से अधिक परन्तु 5 वर्ष की अवधि से कम अवधि से खेती के अंतगर्त नहीं है। जमीन का खेती से बाहर होने के कई कारण हो सकता है। 159.2 हेक्टेयर भू-भाग में विस्तारीत है।

**शुद्ध कृषि क्षेत्रः-** फसल तथा फसलोउत्पादन के रूप में शुद्ध बोया गया क्षेत्र सम्मिलित किया जाता है। एक बार से अधिक बोये गये क्षेत्र की गणना भी एक बार की जाती है। यह कुल बोये गये क्षेत्र से कम होता है। 8037.7 हेक्टेयर पूर्वी चम्पारण जिला के भू-भागों में फैला हुआ है।

**निष्कर्ष:**

बिहार का यह जिला अपनी भौगोलिक विशेषताओं के आधार पर विशिष्ट स्थान रखता है। अपने पड़ोसी जिलों की तुलना में भौतिक स्वरूप, स्थलीय स्वरूप, ढलान, आदि में विभिन्नता है, यहाँ की जलवायु शीतल एवं आर्द है। विश्वभर में जलवायु परिवर्तन का विशेषताएँ का विषय सर्वविदित है, इस बात से इन्कार नहीं किया जा सकता है, कि वर्तमान समय में जलवायु परिवर्तन की विशेषता वैश्विक स्तर, देशस्तर, राज्य स्तर, जिला स्तर के समक्ष मौजूद सबसे बड़ी चुनौती एवं इसको निपटना वर्तमान समय की एक बड़ी आवश्यकता बन गई है। प्राकृतिक प्रभाग के स्वरूप में नदियों का मुख्य रूप से विस्तार है, प्राकृतिक एवं मानवीय गतिविधियों के कारण भूमि उपयोगिता, कृषि मृदा अपरदन से खाद्य संकट एवं जलवायु परिवर्तन जैसी समस्याएँ गंभीर हो जा रहा है, इसलिए मृदा अपरदन एवं इसके कारण कॉर्बन क्षय मा◌ीटरिंग करना अति आवश्यक है।

**संदर्भ सूची:**

1. कुमारी ध्रुव डॉ. दीक्षित, समाजशास्त्र, अनुसूचित जनजाति, शिवलाल अग्रवाल एण्ड कम्पनी इंदौर 2014, पृ.2
2. दुबे, श्यामाचरण, आदिवासी भारत, राजकमल प्रकाशन, देहली, पृ.10-11
3. जैन डॉ. पुखराज, भारत की सांस्कृतिक विरासत, पृ. 222;223
4. राय पारसनाथ, "अनुसंसाधन परिचय" लक्ष्मी नारायण अग्रवाल, आगरा।
5. Census of India 2011, Purba Champaran District census Handbook, Patna.
6. Bihar Statistics, Dept. of Planning & Development, Bihar, Patna

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021,
Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# मुंबईचे शिल्पकार जगन्नाथ शंकर शेठ

*प्रा. माणिकराव शामराव चव्हाण*
*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविदयालय, कुंडल*

**प्रस्तावना-**

मुंबई हि महाराष्ट्राची भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक राजधानी आहे. या मुंबईचे शिल्पकार म्हणून जगन्नाथ शंकर शेठ यांचेकडे पाहुले जाते. नाना म्हणजे बुद्धी, विद्वत्ता, आणि कर्तव्य याचे एक उत्तम उदाहरण होते. त्यांनी सामाजिक प्रबोधनात आणि सार्वजनिक जीवनात अत्यंत मोलाचे काम केले आहे. नाना हे स्वयंभू नेते होते. राजकर्ते व जनता यांच्यात नानाच्या बद्दल आदर होता. त्यांनी मुंबई मध्ये शैक्षणिक, राजकीय, सामाजिक,धार्मिक अशा विविध कार्यात भाग घेवून या शहराला गतिमान करण्याचा सतत प्रयत्न केला.

जीवन वृतांत -

जगन्नाथ शंकर शेठ उर्फ नाना यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील मूरवाड येथे दैवज्ञ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे उपनाव मुरकुटे असे होते. त्यांच्या वडिलांनी जवाहिऱ्याच्या व्यवसायात खूप मोठी संपत्ती मिळवली होती. त्यांचे वय 18 वर्ष होई पर्येंत त्यांचे आई व वडील हे मृत्यू पावले असल्याने त्यांच्या वर मोठ्या उदयोग व्यवसायाची जबाबदारी येवून ठेपली. प्रारंभापासून नानांना शिक्षणाची आवड असल्याने त्यांनी मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषेत विशेष प्राविण्य मिळवले आणि त्यामिलेच त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाची छाप राज्यकर्त्यावर पाडली. त्यांनी आपल्या संपत्तीचा विनियोग जनतेच्या कल्याणासाठी केला. मुंबईच्या विकासासाठी त्यांनी तन मन आणि धनाने भाग घेतला. अनेक संस्थाना आणि गोर गरिबांना आर्थिक सहहाय करून आपले दातृत्व सिद्ध केले. मुंबई प्रांताच्या बोर्ड ऑफ एज्युकेशन चे ते १८५० ते १८५६ या कालावधीत सदस्य होते. मुंबई विद्यापीठाने त्याची फेलो म्हणून नेमणूक केली. याच वेळी सरकारने त्यांना जस्टीस ऑफ दी पीस हा सन्मान दिला होता. या पडला त्यांनी जनतेची गाऱ्हाणी सचोटीने सोडवून न्याय देण्याचा प्रयत्न केला.

शैक्षणिक कार्य -

नानांनी गव्हर्नर ऐल्फीस्टेन यांना स्पष्ठ सांगितले कि विद्यादानाखेरीज आमच्या लोक्नाचा उद्धार हिणार नाही. गव्हर्नर ला हे विचार पटले व त्यांनी नानांच्या सहकार्याने मुंबई येथे शैक्षणिक कार्य करण्यास सुरुवात केली. याचा एक पहिला प्रयोग म्हणून नानांनी इ.स. १८२२ मध्ये बॉम्बे नेटिव्ह ऐजुकेशन सोसायटी हि संस्था स्थापन केली. संपूर्ण देशात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून स्थापन झालेली हि पहिलीच संस्था आहे. या संस्थेने मुंबई व मुंबई बाहेर अनेक शाळा सुरु केल्या. ऐल्फीस्टेन यांचे शैक्षणिक काम लोकांच्या स्मरणात राहावे म्हणून मुंबई येथे ऐल्फीस्टेन कॉलेज सुरु करण्यात आले. याच वेळी सरकारने शिक्षण प्रसाराच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी बोर्ड ऑफ एज्युकेशन ची स्थापना केली. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे जनतेत जागृती होत होती आणि ती जागृती आणखीन वाढावी म्हणून इ.स. १८४५ मध्ये दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड आणि विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी स्टुडट लिटररी साय्न्तिफिक सोसायटी ची स्थापना केली. यावेळी मुलींच्या शिक्षणाबद्दलचा गैरसमज दूर व्हावा म्हणून नानांनी स्वतच्या जागेत जगन्नाथ शंकर शेठ मुलींची शाळा काढली व स्त्री शिक्षणाचा पाया घातला. हे त्यांचे कार्य धाडसाचे तसेच दूरदृष्टी चे उत्तम उदाहरण होते. रोबर्ट ग्रंट या गव्हर्नर च्या स्मृती प्रीत्यर्थ ग्रंट मेडीकल कॉलेज ची स्थापना केली. इ.स. १८५९ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. त्याचे पहिले फेलो म्हणून नानांची नियुक्ती झाली यावरून त्यांच्या शैक्षणिक कार्याची जाणींव होते. नानाच्या शैक्षणिक कार्याचे स्मारक म्हणून इ.स. १८५७ मध्ये दि जगन्नाथ शंकर शेठ फस्ट ग्रेड अंग्लो व्हार्न्याकुलर स्कूल काढण्यात आले.भारतीयांना कला विषयक शिक्षण मिळावे म्हणून नानानी खूप प्रयत्न केले व त्यातूनच आजचे जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स आहे हे महाविद्यालय निर्माण झाले आहे.

सामाजिक कार्य -

शैक्षणिक सुधारणा बरोबरच सामाजिक सुधारना बाबत नानांचे विचार पुरोगामी होते. स्त्री शिक्षण, सतीबंदी , शुद्धीकरण चळवळ यांना त्यांनी प्रोत्साहन दिले. सतीबंदी च्या वेळी नानांनी हि चाल अमानुष आहे असे लोकांना पटवून दिले. मुंबई कौन्सिल मध्ये निवडून आल्यानंतर नानांनी मुन्सिपल अकट व्हावा म्हणून खूप प्रयत्न केले. इ.स. १८४६ मध्ये तो कायदा पास केला. त्यानंतर मुंबई शहराच्या आरोग्याची आणि सुख सोईची व्यवस्था करण्यसाठी स्वतंत्र मुन्सिपल कमिशन नेमण्यात आले. त्यावर नानाची नेमणूक करण्यात आली. रॉयल ऐशियातिक सोसायटी च्या मुंबई शाखेचे एक भव्य ग्रंथालय आहे. त्याला नानांनी फार मोठी मदत केली. अग्री, होर्टीकलचर सोसायटी आणि जाग्रफिकाल सोसायटी च्या स्थापनेत नानांचा सिंहाचा वाट होता. नानांचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे बोरीबंदर ते पुणे अशी रेल्वे सुरु करण्यासाठी

खूप मोठे प्रयत्न केले. इ.स. १८३७ मध्ये भिवंडीत जातीय दंगल झाली त्यावेळी नानानी हिंदू ची बाजू घेवून गव्हर्नर ला खटल्याची फेर तपासणी करण्यास सांगितले व दंगल खोरांना कडक शिक्षा देऊन हिंदुना न्याय मिळवून दिला. तसेच इ.स. १८३६ मध्ये सरकारने सोनापूरची स्मशानभूमी भिवंडीला हलविण्याचा निर्णय घेतला होता तो लोकांच्या गैर सोयीचा होता. तो गव्हर्नर सांगून रद्द केला असे मुंबई च्या हिताचे अनेक प्रश्न नानांनी सोडविले आहेत.

राजकीय कार्य -

नानांच्या लोकसेवेचा दृष्टीकोन व्यापक होता. ते शिर्मंत असून हि त्यांनी जनसेवेचे व्रत स्वीकारले होते. जनतेच्या प्रत्येक कार्यक्षेत्रात सुधारणा व्हावी असे त्यांना वाटत होते. जनतेची दु:खे सरकारला दाखविण्य्साठी व सरकारला लोकहिताच्या योजना राबविण्यासाठी नाना व दादाभाई नौरोजी यांनी पुढाकार घेवून इ.स. १८५२ अंधे बॉम्बे असोसिएशन हि संस्था मुंबई शहरात स्थापन केली. नंतर हि संस्था राजकीय चळवळीचे केंद्र बनली. या संस्थेच्या संदर्भात त्यांनी काढलेले उद्गार " या देशातील जनतेचे कल्याण करावे अशी इंग्रज सरकारची इच्छा आहे हे खरे, पण आमची अशी काही दु:खे आहेत ती सरकारच्या नजरेस येत नाहीत, म्हणून ती सरकारच्या नजरेस आणून द्यावीत आणि रयतेच्या सुखाकरिता सरकारला हर एक गोष्टीत सहकार्य करावे म्हणून हि संस्था काढली आहे". या संस्थेमार्फत हिंदी लोकांना कायदे मंडळात प्रतिनिधित्व मिळवून दिले. नाना इ.स. १८६१ मध्ये कायदे मंडळात जाणारे पहिले हिंदी गृहस्थ ठरले आहेत. सरकारमध्ये नानांचे वजन असल्यामुळे स्माल कॉज कोर्टातील खटले चालविण्यासाठी स्माल कॉज कोर्टातील वकिलांना असे खटले चालविण्यासाठी परवानगी मिळवून दिली. असे त्यांचे राजकीय कार्य होते.

योग्यता -

नानांनी विविध क्षेत्रात केलेले कार्य त्यांच्या कार्याची साक्ष देण्यास पुरेसे आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात नानांचा समवेश करावाच लागेल म्हणूनच ते मुंबई चे जनक होते. हे निर्विवाद आहे. त्यांचे जीवन म्हणजे मुंबई चा इतिहास होय. त्यांनी परकीय लोकांच्या पुढे कधी लाचारी पत्करली नाही. स्त्रीयांच्या शिक्षणाबद्दल त्यांना तळमळ होती. मुंबई मध्ये वेगवेगळया संघटना स्थापन करून आपले आयुष्य पूर्ण अर्पण केले. म्हणून ते खऱ्या अर्थाने जनतेचे सेवक होते. आचार्य अत्रे म्हणतात, "मुंबईचा अनभिषक्त सम्राट हि पदवी त्यांना यथार्थ आहे". त्यांनी आधुनिक मुंबई चा पाया घातला. नाना हे जनतेचे स्वयंभू नेते होते. बुद्धी, विद्वत्ता, कर्तुत्व, यांचा ते महासागर होते म्हणून त्यांना आधुनिक मुंबईचे जनक असे म्हणतात.

**संदर्भ-**

1. श्याम भुर्के, " Management गुरु", स्नेहल प्रकाशन, पुणे
2. माधव पोतदार , " जगन्नाथ शंकर शेठ ", अनुबंध प्रकाशन, पुणे

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"*

# रायगड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसाय आणि रोजगार संधी

***डॉ. राजाराम महादेव थोरात***

*भूगोल विभाग प्रमुख, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा, ता. तळा, जि. रायगड.*

**सारांश :**

रायगड जिल्ह्यातील हिरवीगार वनराई स्वच्छ व सुंदर निसर्गरम्य सागर किनारे तसेच मुरुड-जंजिरा, कुलाबा हे जलदुर्ग महाराष्ट्राच्या शौर्याची साक्ष देत आहेत. रायगड, तळेगड, कर्नाळा, द्रोणागिरी हे किल्ले जगप्रसिद्ध आहेत अष्टविनायकांपैकी पालीचा श्री बल्लाळेश्वर, महडचा वरदविनायक आणि दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री क्षेत्र हरिहरेश्वर तसेच कनकेश्वर, नागेश्वर ही धार्मिक तीर्थ क्षेत्रे आहेत. घारापुरी, कुडे, ठाणाळे, खडसांबळे, पाळे- महाड, आंबिवली या रायगड जिल्ह्यातील जगप्रसिद्ध बौद्ध लेण्या आहेत. तसेच माथेरान हे थंड हवेचे ठिकाण असून खांदेरी-उंदेरी, घारापुरी ही पुरातन बेटे आहेत. त्यामुळे दरवर्षी हजारो देशी व विदेशी पर्यटक रायगड जिल्ह्यात पर्यटनासाठी येतात. नैसर्गिक. सांस्कृतिक, ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व असल्यामुळे रायगड जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाचा विकास करणे गरजेचे आहे. लोकसंख्या संसाधनाच्या विकासामध्ये पर्यटन व्यवसायाला महत्त्व आहे.

**रायगड**

रायगड हा डोंगरी किल्ला पूर्वी रायरी नावाने ज्ञात होता. सन 1656 मध्ये शिवाजी महाराजांनी रायगड जिंकल्यावर महाराजांनी 1662 मध्ये त्याचे नाव बदलून रायगड असे ठेवले. हा किल्ला महाडच्या उत्तरेस 24 कि. मी. व जंजिऱ्याच्या पूर्वेस 64 कि. मी. आहे. रायगड किल्ल्याचे भौगोलिक स्थान 18 अंश 14 मिनिट उत्तर अक्षांश व 73 अंश 30 मिनिट पूर्व रेखांश असून उंची 870 मीटर आहे. युरोपियन त्यास पूर्वेकडील जिब्राल्टर म्हणत असत. सभोवताली तुटलेल्या डोंगरांच्या कड्यांवरून तो सह्याद्रीच्या रांगापासून विभक्त झाला असून सभोवताली दीड किलो मीटर रुंदीची दरी निर्माण झाली आहे. या दरीतून गांधारी व काळ नद्या उगम पावतात. सर्व बाजूंनी सह्याद्री रांगांनी वेढल्यामुळे तो लांबून लक्षात येत नाही. पश्चिमेकडील 25.5 कि.मी. वरील माणगाव वरून किल्ल्याचे टकमक टोक व हिरकणी बुरुज दिसतात. किल्ल्याच्या सान्निध्यात पोटला व गुईरीचा डोंगर आहे. या डोंगरावरून इंग्रजांनी 1818 मध्ये किल्ल्यावर तोफा डागल्या होत्या. महाबळेश्वर डोंगरावरून रायगड अस्पष्ट दिसतो पण त्याचे अचूक व स्पष्ट दर्शन या किल्ल्यापेक्षा 300 मीटर अधिक उंच असलेल्या पूर्वेकडील तोरणा किल्ल्यावरुन होते. पश्चिमेकडे 3.2 कि. मी. असणाऱ्या लिंगाण्यावरूनही रायगडचे चांगले दर्शन घडते . तेथून भवानी टोक, टकमक टोकाचा तुटलेला भाग व काही उध्वस्त अवशेष स्पष्ट दिसतात.

रायगड किल्ला हे महाराष्ट्रातील एक पर्यटन स्थळ म्हणून लोकप्रिय आहे. महाराष्ट्राचे स्फुर्ती स्थान असलेल्या शिवाजी महाराजांची येथे राजधानी व समाधी असल्यामुळे अनेक पर्यटक भक्तिभावाने प्रेरित होऊन निसर्ग दर्शनासाठी जात असतात. पर्यटकांच्या सोयीसाठी गडावर निवास व्यवस्था, विश्राम ग्रह, धर्मशाळा आहेत. महाड वरून पाचाड मार्गे खूबलढा बुरुजापर्यंत राज्य परिवहन सेवा उपलब्ध आहे. येथून पुढे पायऱ्या चढून गडावर जाता येते. तसेच आज रोप-वे वाहतुकीची सेवा उपलब्ध आहे. गडावर जाण्यासाठी 1370 पायऱ्या चढाव्या लागतात. यावेळी खुबलढा बुरूज, नाना दरवाजा, मस्जिद मोर्चा, महादरवाजा, गडमाथा, मदार शहाचा कबर, गंगासागर, मनोरे, पालखी दरवाजा, मेणा दरवाजा, राणीवसा, राजभवन, रत्नशाळा (तळघर) सदर आणि फड , सिंहासन, नगारखाना, सचिवांची घरे, कवी कलश वाडा, अंधार कोठड्या, हिरकणी टोक, होळीचा माळ, शिकाई, धर्मशाळा, पीलखाना, बाजारपेठ, ब्राह्मणवाडा, जगदीश मंदिर, शिवरायांची समाधी, अज्ञात समाधी, दारूची कोठारे, भवानी टोक टाकमकटोक या सर्व इतिहास प्रसिद्ध वस्तू पर्यटकांना बघायला मिळतात.

**मुरुड-जंजिरा:**

राजपुरी खाडीच्या उत्तर टोकावर राजपुरी नावाचे लहानसे गाव असून ते मराठेशाहीच्या वेळी आरमाराचे ठाणे होते. राजपुरी खाडीच्या मुखाजवळ समुद्रात एका अवघड गोलाकार बेटावर मजबूत जंजिरा हा एक जलदुर्ग आहे. मराठी आरमाराची उत्पत्ती जंजिऱ्याच्या सिद्धी मुळे झाली आहे. जंजिरा या अरबी भाषेतील शब्दाचा अर्थ पाण्यातील किल्ला असा आहे. जंजिऱ्याचे भौगोलिक स्थान मुरुड तालुक्यात 17 अंश 45 मिनिट उत्तर व 73 अंश 05 मिनिट पूर्व असे आहे.

शिवाजी महाराज व त्यांचे सुपुत्र संभाजी महाराज यांनी जंजिरा जिंकण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला पण सिद्धी जोहार याने अखेरपर्यंत त्यांना प्रतिकार केला. सन 1860 मध्ये जंजिऱ्यात लागलेल्या भीषण आगीत संस्थानाची अनेक महत्त्वाची कागदपत्रे व दस्तऐवज भस्मसात झाले. जंजिऱ्याच्या महा भिंती 13 ते 15 मीटर उंच आहेत. राजपुरी कडील महादरवाजास सागराच्या पाण्यापर्यंत पायऱ्या आहेत. महादरवाजा हूलमुख नावाच्या दोन बुरुजांच्या मध्ये आहे. महादरवाजा वरील कमानीवर पांढऱ्या दगडावर "योहोर " या अरबी शब्दासह हिजरी 1111 चा (सन 1694) काल उल्लेख असलेला कोरीव लेख आहे. या लेखा जवळ कमानीवर हत्ती व वाघांच्या झुंजीच्या कोरीव प्रतिमा आहेत. जंजिरा दुर्गाला एकूण 22 बुरुज असून वेगवेगळया नावाने ओळखले जातात. महादरवाजा जवळील बुरुजांची रचना अशी आहे की, त्यामधील दरवाजा किल्ल्या जवळ आल्याशिवाय दिसत नाही. हे सर्व बुरुज प्रत्येकी 27 मीटरच्या अंतराने बांधले आहेत. बांधकाम लयबद्ध असून फिरंगी स्थापत्या सारखे वाटते. बुरुजांच्या वरील कमानीची भिंत कमळ पाकळीच्या आकाराची असून बुरुज व या भिंतीमुळे किल्ला एखाद्या कमल पुष्पा सारखा दिसतो. प्रत्येक बुरुज दोन किंवा तीन मजली आहे. वर कमानींची भिंत व गच्ची आणि त्याखालील मजल्यात बंदूकधारी शिपायांची माऱ्याची जागा तसेच आतील बाजूस विश्रांतीची जागा आहे. बुरूजावरून मारा करण्यासाठी लागणारा दारुगोळा ठेवण्याची सोय देखील होती. दोन बुरुजांमध्ये छत असलेल्या जोड भिंतीतून पावसातही कोणत्याही बुरुजावर जाता येते. तट भिंतीच्या आतल्या बाजूस चहुबाजुस खंदक बांधलेला दिसून येतो. जंजिरा दुर्गाचे मुख्य आकर्षण म्हणजे तेथील 3 देशी व 7 विदेशी तोफा हे आहे. तिन्ही देशी तोफा प्रवेशद्वारावर आहेत. त्यातील सर्वात मोठ्या कलाल-बांगडी नावाच्या तोफेची लांबी 5.4 मीटर मुखाचा परीघ 2.3 मीटर आणि नळकांड्याचा व्यास 35 सेंटीमीटर आहे. ही प्रचंड तोफ 1735 मध्ये पेशव्याच्या सैन्याने येथे आणली व माघारी जाताना येथे सोडून दिली. ही वजनदार तोफ किल्ल्यावर कशी आणली हे एक आश्चर्यच आहे. विदेशी बनावटीच्या 7 तोफामध्ये 3 स्वीडन आणि स्पेन, हॉलंड आणि फ्रान्सची प्रत्येकी 1 असून एक ओळखता येत नाही. स्वीडनच्या तिनही तोफा पितळी असून अतिशय रेखीव व आकाराने सारख्या आहेत. त्या 3 बुरुजांवर आहेत. या तोफांवर सी. आर. एस अशी अक्षरे असून सन 1665 मधील स्वीडनचे राज चिन्ह कोरलेले आहेत. किल्ल्यात बरेच पर्शियन शिलालेख आहेत ते वेगवेगळे कालखंड दर्शवतात. जंजीऱ्यात 1972 पर्यंत वस्ती होती. नंतर उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे तेथील निवासिनी स्थलांतर केले.

**माथेरान:**

कर्जत तालुक्यातील माथेरान हे थंड हवेचे प्रसिद्ध ठिकाण मुंबईपासून जवळ आहे. माथेरानचे भौगोलिक स्थान 18 अंश 55 मिनिट उत्तर व 73 अंश 15 मिनिट पूर्व असून सागर सपाटीपासून उंची 791.5 मिटर इतकी आहे. माथेरान हे नाव डोंगर माथ्यावरील रान (जमीन) या अर्थाने रूढ झाले आहे. मे 1850 मध्ये ठाण्याचा जिल्हाधिकारी एच. पी. मॅलेट माथेरानवर प्रथमच गेला तोपर्यंत माथेरान कोणासही ज्ञात नव्हते. नेरळ-माथेरान रेल्वे 15 एप्रिल 1907 ला सुरू झाली. या रेल्वेचे श्रेय मुंबईचे प्रसिद्ध बोहरा व्यापारी सर आदमजी पीरभॉय यांच्याकडे जाते. हिरवीगार वनराई, विविध पशुपक्षी, प्राणी या नैसर्गिक साधन संपत्तीने माथेरान अतिशय समृद्ध आहे. आज माथेरानला जाण्यासाठी रस्ते व रेल्वे वाहतुकीची सोय आहे. आता नेरळ-माथेरान डांबरी रस्ता जकात नाक्या (दस्तुरी नाका) जवळ संपतो. खाजगी वाहनांना फक्त येथ पर्यंतच परवानगी आहे. माथेरानमध्ये स्वयंचलित वाहनांना परवानगी नाही. शासनाच्या विश्रामगृहा व्यतिरिक्त पर्यटन विकास महामंडळाचे हॉलीडे होम्स, खाजगी हॉटेल्स, केंद्र सरकारची व खाजगी कंपन्यांची विश्रामगृहे आहेत. शासनाचा माउंट बंगला (792 मीटर) माथेरानचा सर्वोच्च बिंदू आहे. पॅनोरमा पॉइंट, गारबट पॉईंट, सिमसन तलाव, सारलोट तलाव, पीसारनाथ मंदिर, वन ट्री हिल, शिवमंदिर मंदिर व मारुती मंदिर, ऑलिंपिया इत्यादी निसर्गरम्य पॉईंट देशी व परदेशी विदेशी पर्यटकांना खुणावतात. माथेरान हे रायगड जिल्ह्यातील महत्वाचे पर्यटन केंद्र आहे. पर्यटन व्यवसायावर अनेक लोकांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. पर्यटन स्थळांचा विकास करताना नैसर्गिक पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.

**हरिहरेश्वर:**

दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असणारे हरिहरेश्वर हे धार्मिक तिर्थक्षेत्र श्रीवर्धन तालुक्यात आहे. अरबी समुद्र किनाऱ्यावर असणाऱ्या हरिहरेश्वरचे भौगोलिक स्थान 18 अंश उत्तर अक्षवृत्त व 73अंश पूर्व रेखावृत्तावर आहे. छत्रपती शाहूंचा पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यांचे हे जन्मगाव आहे. मुंबईपासून 210 व पुण्यापासून 205 कि. मी. अंतरावर हे क्षेत्र आहे. सागर सानिध्य निसर्गसौंदर्यामुळे हे पर्यटन स्थळ पर्यटकांना भुरळ घालते. हरिहरेश्वर व काल भैरव या दैवतांचे धार्मिक महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. काल भैरव हे महा देवाचे रूप आहे. प्रथम काळ भैरवाचे व योगेश्वरीचे दर्शन घेतल्यानंतर क्रमाने शेजारच्या हरिहरेश्वर मंदिरातील नंदी व गणपती, नंतर हरिहरेश्वराचे आणि परत काळ भैरव व योगेश्वरीचे दर्शन घ्यावयाचे असते.काळभैरवाच्या दर्शनाने व कृपाप्रसादाने भूत पिशाच्च बाधा नाहीशी होते. असा लोकांचा समज आहे. हरिहरेश्वरच्या काळभैरवाची जागृत देवस्थान म्हणून मोठी प्रसिद्धी आहे. भूत बाधा झालेले अनेक लोक येथे येतात. अतृप्त आत्म्यांना मुक्ती देण्याचे गती श्राद्ध, नारायण नाग बळी व त्रिपिंडी श्राद्ध बडी हे विधीही येथील शुक्ल तीर्थावर करतात. येथील पांडव तीर्थावर उत्तरक्रिया सुद्धा करतात. मंदिराच्या पश्चिमेस असलेल्या टेकड्या व पलीकडील समुद्रकिनाऱ्याचा सर्व परिसरात विष्णुपद, गायत्रीतीर्थ, चक्रतीर्थ, सूर्यतीर्थ, यज्ञकुंड, विष्णुतीर्थ, ब्राह्मण गुहा, कोसाची प्रदक्षिणा मार्ग इत्यादी अनेक तीर्थे व धार्मिक ठिकाणे असल्यामुळे हरिहरेश्वरला दक्षिणकाशी असे स्थानिकरीत्या म्हटले आहे. सर्व ठिकाणच्या कालभैरवाच्या मूर्ती दक्षिणाभिमुख असतात. परंतु हरिहरेश्वरचा काळ भैरव मात्र उत्तराभिमुख आहे. येथे महाशिवरात्री तीन दिवस कार्तिक शुद्ध एकादशी ते पौर्णिमा आणि कालाष्टमी निमित्ताने यात्रा भरतात. धर्मशाळे जवळ असलेली तोफ 1733 पासून आज पर्यंत तिन्ही उत्सवांच्या वेळी रोज रात्री उडवतात.

**पाली:**

अष्टविनायका पैकी श्रीबल्लाळेश्वर विनायकाचे स्वयंभू देवस्थान सुधागड (पाली) तालुक्यात आहे. पालीचे भौगोलिक स्थान 18 अंश 55 मिनिट उत्तर अक्षवृत्त व 73 अंश 20 मिनिट पूर्व रेखावृत्तावर आहे. या महागणपती बल्लाळ विनायक, बल्लाळेश, बल्लाळनायक, बल्लाळेश्वर अशी नावे आहेत. सांप्रतच्या पाषाणी देवालयापूर्वी गणपतीचे देवालय लाकडी होते. मूळच्या लाकडी मंदिराचा जीर्णोद्धार बाबुराव फडणीस व त्याचा मुलगा मोरोबा दादाने केला (1770). बल्लाळ विनायकाचे मंदिर "श्री" कारी धाटणीचे बांधलेले आहे. ते पूर्वाभिमुख असून दक्षिण प्राची साधली आहे यामुळे दक्षिणायनात सूर्योदयासमयी सूर्यकिरण मूर्तीवर पडतात. देवालयात दोन गाभारे असून अंतर गाभाऱ्यात (5.5 x 7 मी.) विनायकाची स्वयंभू मानलेली मूर्ती सिंहासनाधिष्ठित आहे. देवालयाच्या भिंती 3.66 मी. जाडीच्या मजबूत आहेत. बाहेरील आकार बहूकोणाकृती असला तरी दोन्ही गाभाऱ्यां चे आतील आकार चौकोनी आहेत. श्रीबल्लाळेश्वर मंदिरात नित्य पूजा, नैवेद्य, आरती हे नित्यक्रम व प्रत्येक कृष्णपक्षातील संकष्टी व शुक्ल पक्षातील विनायकी चतुर्थीस पालखी, गायन व किर्तन, कार्तिकात काकड आरती, भाद्रपदी माघी उत्सव प्राचीन काळापासून चालत आलेले आहेत. संकष्टी, अंगारकी, माघी उत्सवास हजारों धार्मिक पर्यटक येतात. त्यांच्यासाठी धर्मशाळा व काही स्वतंत्र खोल्या देवस्थान व्यवस्थापनाने बांधल्या आहेत. येथून 5 कि. मी. वर सिद्धेश्वर या गावात सिद्धेश्वर महादेवाचे पेशवेकालीन मंदिर आहे. पालीजवळ उन्हेरे येथे गरम पाण्याचे झरे आहेत. त्वचारोग असणारे अनेक पर्यटक या ठिकाणी स्नान करण्यासाठी येतात.

**महड:**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात अष्टविनायकापैकी दुसरे वरद विनायकाचे स्थान महड या ठिकाणी असून भौगोलिक स्थान 19 अंश 10 मिनिट उत्तर व 73 अंश 35 पूर्व रेखावृत्तावर आहे. हे ठिकाण खालापूर पासून पूर्वेस 3 किलोमीटरवर मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूला आहे. गृत्समद ऋषींनी घोर तपश्चर्या करून गणेशाला प्रसन्न केले व गणेशाच्या वराने ब्राह्मणत्व प्राप्त झाल्यावर त्या ठिकाणी श्री वरद विनायकाची स्थापना केली. तोच आजचा महडचा वरदविनायक असल्याचे मानतात. वरद विनायकाचे मंदिर पेशवा राजवटीत बांधण्यात आले. अष्टविनायकापैकी हे एक धार्मिक पर्यटन स्थळ असल्यामुळे येथे अनेक पर्यटक येतात. संकष्टी व अंगारकीस भाविकांची बरीच गर्दी असते. भाविकांसाठी निवासाची खास सुविधा आहे.

**कुडे:**

तळा या डोंगरी व दुर्गम तालुक्यात तळयापासून 13 किलोमीटर अंतरावर कुडे हे गाव असून गावाच्या पूर्वेकडील डोंगरावरील बौद्धकालीन लेण्यांमुळे ते प्रसिद्ध आहे. डोंगराच्या पश्चिम उतारावर सागर सपाटीपासून 50 ते 70 मीटर उंचीवर 26 बौद्ध लेण्या व 11 पाण्याच्या टाक्यांचा समूह आहे. शिवाय येथे अनेक लहान पाण्याची कुंडे आहेत. कुडा लेणीचे भौगोलिक स्थान 18 अंश 55 मिनिट उत्तर अक्षांश व 70 अंश 35 मिनिट पूर्व रेखांशावर आहे. जवळच अरबी समुद्र आहे या लेण्यांचा शोध 1848 साली लागला. सर्व लेण्या नैऋत्य पश्चिमाभिमुख असून यांचा विस्तार 200 मीटर आहे. लेण्या द्विस्तरीय असून लेणी क्रमांक 1 ते 15 खालच्या रांगेत व 16 ते 26 वर आहे. येथून राजपुरी व मांदाड खाडी परिसराचा सुंदर देखावा दिसतो. समोर विस्तीर्ण राजपुरी खाडी पलिकडे तसेच महोबा टेकडीच्या दोन्ही अंगास सुमारे 100 ते 300 मीटर उंच डोंगर रांगामुळे ही खाडी पर्वतातील मोठ्या तलावात सारखी भासते. या टेकडीवरून पूर्व दिशेस तळा व उत्तरेस घोसाळा किल्ले दिसतात. शतकानुशतके समुद्रावरून येणारे जोरदार खारे वारे व नैऋत्य मान्सून पावसाचे तडाखे यांना लेणी तोंड देत असल्यामुळे काळाच्या प्रवाहात येथील काही शिलालेख व प्रतिमा झिजून अस्पष्ट झाल्या आहेत. या लेणींमध्ये महत्त्वाचे कोरीव वास्तुशिल्प आहे. महाराष्ट्रातील इतर लेण्यांपासून जरी त्या एकाकी पडल्या असल्या तरी येथे बरीच वास्तुशिल्पीय मूलतत्त्वे विकसित पावलेली आहेत. येथील उच्च प्रतीच्या पुरालिपीतील काही शिलालेख लेणी समूहाचे महत्त्व विशद करतात. प्राचीन काळी राजपुरीस येणाऱ्या-जाणाऱ्या जहाजांवरील व्यक्तींनी येथे आश्रय घेतला असावा. तसेच कुडा लेण्यांना मांदाड बंदर गावाचा आश्रय होता. परंतु या बौद्धकालीन लेण्या आज दुर्लक्षित आहेत. पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीकोनातून कुडे लेणींचा विकास करणे गरजेचे आहे. त्यासाठी सरकारदरबारी पाठपुरावा करावा लागेल.

**घारापुरी लेणी:**

हे बेट मुंबईच्या गेट वे ऑफ इंडिया पासून १० किलोमीटर सागरी अंतरावर आहे. त्याची व्याप्ती सुमारे 7 चौरस किलोमीटर एवढी तथापि ख्याती मात्र विश्वव्यापी आहे. घारापुरी लेणीचा समावेश उरण तालुक्यात होत असून भौगोलिक स्थान 18 अंश 55 मिनिट उत्तर अक्षांश व 72 अंश 55 मिनिट पूर्व रेखांशावर आहे. भारतातील 1200 पेक्षा अधिक लेण्या डोंगरमाथ्यावर किंवा डोंगराच्या कुशीत असून घारापुरी लेणी मात्र निळ्याशार सागराच्या विळख्यात आहे. यावेळी या लेण्यांच्या माथ्यावर गडद निळे जलद तर पायथ्याशी गडद नीळा जलोदधी आणि या दोहोंच्या मध्ये लेणीचा उठावदार मोती आतीव मनोहरी असे हे दृश्य आहे. आपल्या कलेचे सोने व्हावे अशी इच्छा बाळगणाऱ्या कलाकारांच्या योजनेचे व आत्मविश्वासाचे दर्शन येथे घडते. घारापुरी बेटावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. मुंबईच्या अपोलो बंदरातून मोटर-बोटीने बेटाच्या वायव्येस बांधलेल्या धक्क्यावर उतरता येते. तेथून लेणी सुमारे दीड किलोमीटर आहे किंवा कर्नाक बंदरातून घारापुरीची फेरी करणाऱ्या आग बोटीने बेटाच्या नैऋत्य किनाऱ्यावर उतरता येते. या बेटाचा परीघ सात किलोमीटर असून येथील डोंगराची उंची 153.5 मीटर आहे. डोंगरही त्याच्या अंगलटीला साजवील असे छोटेच आहेत. मोरे बंदर, राज बंदर, घारापुरी व शेट बंदर अशी तीन चिमुकली खेळी बेटांवर आहेत. घारापुरीला सापडलेल्या वस्तू, नाणी व खापरांचे आवशेष यावरून येथे भरभराटीस आलेले प्राचीन बंदर असावे. सातवाहन काळात घारापुरी बंदरास व्यापारी महत्त्व होते. रोमन, ग्रीक, अरबी व्यापारी या बंदराशी संपर्क ठेवून होते. बेटावरील मोरे बंदर किंवा येथून जवळच असलेल्या उरण शेजारचे मोरा बंदर यांना मौर्य सम्राट अशोकाच्या काळापासून महत्त्व आलेले दिसते.

वेरूळची विश्वविख्यात लेणी पाहिलेला अरब प्रवासी 'अल-मसुदी' याने घारापुरी ही पाहिली होती. तिचा सन्दबुर या नावाने तो उल्लेख करतो. पुढे 1153 मध्ये इद्रीसी म्हणतो की घारापुरी हे एक व्यापारी महत्त्वाचे ठाणे असल्यामुळे त्याच्या भोवती नेहमी परदेशी गलबते नांगरून उभी असतात. परंतु घारापुरीचे हे प्राचीन वैभव आता लोपले आहे. आज दिसणारे अवशेष प्राचीन कला कौशल्याची प्रचिती देतात. कला रसिक आणि पर्यटकांच्या दृष्टीने या लेणी विशेषतः मुख्य लेणे म्हणजे एक अनुपम भेट ठरते. संशोधनाच्या दृष्टीने या लेण्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

**पाले :**

बौद्ध लेणी साठी प्रसिद्ध असलेले हे गाव महाड शहराच्या वायव्येस तीन किलोमीटर अंतरावर मुंबई-गोवा 17 राष्ट्रीय महामार्गावर आहे. पाले या पर्यटन स्थळाचे भौगोलिक स्थान 18 अंश 6 मिनिट उत्तर व 78 अंश 29 मिनिट पूर्व रेखावृत्तावर आहे. लेणी गावाजवळील एका टेकडीत आहे. जवळच गांधार नावाचे ओसाड गाव असून लेणींना गांधारपाले लेणी असेही संबोधतात. सावित्री आणि गांधारीच्या संगमा पासून जवळ असलेले हे ठिकाण पावसाळ्यात अतिशय रम्य वाटते. टॉलिमी पेरिप्लस हे भूगोलतज्ञ या ठिकाणी येऊन गेले आहेत. पाले लेणी समूहात एकूण 28 लेणी असून त्या दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमांकित आहेत. सर्व लेणी पूर्वाभिमुख आहेत. या लेण्या दोन स्तरात आहेत. हे एक महत्वाचे पर्यटन केंद्र आज पर्यटन व्यवसायाच्या विकासाअभावी दुर्लक्षित आहे.

**महाड:**

या ऐतिहासिक पर्यटन केंद्राचे भौगोलिक स्थान 18 अंश 05 मिनिट उत्तर अक्षांश व 73 अंश 25 मिनिट पुर्व रेखांश असे आहे. महाड शहर सावित्री, गांधारी नदीच्या संगमाजवळ आहे. महाडला इ. स. पूर्व काळापासून इतिहास व भूगोल आहे. महाड ची पहिली नोंद इ. स. पूर्व 225 मध्ये कोकण किनाऱ्यावरील महत्त्वाचे बंदर व व्यापारी केंद्र म्हणून आढळते. महाडच्या वायव्येस 3 कि. मी. वरील पाले लेणी व दक्षिणेस 3 कि.मी. वरील कोल येथील लेणी महाडचे प्राचीनत्व सिद्ध करतात. महाडला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सत्याग्रहाने या ठिकाणाचे नाव भारतभर पसरले. दलित उद्धारासाठी केलेला सत्याग्रह हे महत्त्वाचे आंदोलन मानले जाते. सन 1942 च्या 'छोडो भारत' आंदोलनातही महाडने नेत्रदीपक कार्य केले. काही स्वातंत्र्य सैनिकांनी बलिदान दिले. महाड परिसरात सैनिकी पेशाची मोठी परंपरा आहे. येथील लष्करी परंपरेमुळे महाड येथे रायगड मिलिटरी स्कूल आहे. महाडमध्ये चवदार तळे, वीरेश्वर तळे, श्री विरेश्वर मंदिर, महाड बंदर, होडी बंदर, शहा बहिरी दर्गा, सुलतान जुम्मा मस्जिद, नाना फडणवीसांचा वाडा, राम मंदिर, विष्णू मंदिर, जाखमाता मंदिर, हनुमान मंदिर, बाळाजी मंदिर, गुजराती मंदिर, कोटेश्वरी मातेचे देवस्थान इ. ठिकाणे आहेत. महाडमधील चवदार तळयात 14 विहिरी किंवा जिवंत झरे होते. त्यावरून त्यास चवदार तळे असे नाव पडले असावे. डॉ. आंबेडकरांनी 20 मार्च 1927 रोजी चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले करण्याचा सत्याग्रह करून दलितक्रांतीचा प्रारंभ केला. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली हजारो अस्पृश्यांनी चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले. महाड महानगरपालिकेने ऐतिहासिक चवदार तळ्याचे सुशोभीकरण केले असून बुद्ध विहार बांधला आहे. तळयात चार कारंजे केल्याने तळयाचे सौंदर्य वाढले आहे. परंतु देखभाल अयोग्य असल्यामुळे चवदार तळे अस्वच्छ बनले आहे. तळयात गाळ व दुर्गंधीयुक्त पाणी साचलेले असते. ऐतिहासिक दृष्ट्या महाड हे एक महत्वाचे पर्यटन केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे.

**कुलाबा किल्ला:**

सरखेल कान्होजी आंग्रे च्या पराक्रमाचे केंद्रस्थान असलेला हा जलदुर्ग अलिबागच्या नैऋत्येस सागर किनाऱ्यापासून सुमारे 300 मीटर अंतरावर आहे. दक्षिणोत्तर 267 ते 297 मीटर लांब व पूर्वपश्चिम 109 मीटर रुंद अशा बेटावर किल्ला आहे. कुलाबा हे नाव भौगोलिक आहे. शिवाजी महाराजांनी 1662 च्या सुमारास कुलाबा किल्ला मजबूत केला. कुलाबा हे मराठ्यांच्या आरमाराचे कोकणातील प्रसिद्ध प्रमुख ठिकाण होते. जंजिऱ्याच्या सिद्दीला या किल्ल्यामुळे वचक बसला होता. पर्यटनासाठी हा किल्ला धोकादायक आहे. किल्ल्याची तटबंदी 6 ते 7 मीटर उंच असून किल्ल्यावर 17 बुरुज आहेत. किल्ल्यास 2 दरवाजे आहेत. महादरवाजा ईशान्येस व लहान दरवाजा (यशवंत) दक्षिणेस आहे. महादरवाज्यात प्रवेश करण्याआधी किल्ल्याबाहेर एका कोपऱ्यात गंजलेले लोखंडी भोयरे दिसतात. महादरवाजास मोठी कमान असून दोन्ही बाजूस वर्तुळाकार दगडी जोत्यांच्या भिंती आहेत. दरवाजा जमिनी पासून 7.5 मीटर उंच आहे. कुलाबा या ऐतिहासिक जलदुर्गाची देखभाल करण्याची गरज आहे. ओहोटीच्या काळात अनेक हौशी पर्यटक किल्ल्यात जाऊन येतात.

**अलिबाग:**

रायगड जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय अलिबाग येथे आहे. अलिबाग या शहराचे भौगोलिक स्थान 18 अंश 39 मिनिट उत्तर अक्षांश व 72 अंश 57 मिनिट पूर्व रेखांशावर आहे. अलिबाग मुंबईपासून 19 कि.मी. सागरी अंतरावर आहे.पूर्वीच्या काळी या परिसरात नारळ-पोफळीच्या बागा पसरल्या होत्या. त्या 'अली' नावाच्या धनवान मुसलमान व्यक्तीच्या मालकीच्या होत्या. अलीच्या बागांच्या ठिकाणी वसलेले शहर म्हणून यास अलिबाग हे नाव पडले. अलिबागला 'श्रीबाग' असेही म्हणतात. समुद्राकडून अलिबागकडे येताना अतिशय नयनरम्य देखावा दिसतो. समुद्र किनाऱ्यावर वसलेले असल्याने वर्षभर अलिबागची हवा सुखकारक असते. अलीच्या बागांमध्ये त्याने अदमासे 330 वर्षांपूर्वी बांधलेल्या अनेक विहिरी पैकी 10 ते 11 विहिरी आजही आहेत. इ. स. 1698 मध्ये कानोजी आंग्रे आरमाराचा प्रमुख झाल्यावर त्याने 17 व्या शतकाच्या अखेरीस अलिबाग शहर नव्याने उभारले. इ. स. 1852 मध्ये अलिबाग हे तालुक्याचे मुख्य ठिकाण बनले. सन 1869 साली वेगळा कुलाबा जिल्हा निर्माण झाला व अलिबाग जिल्हाचे मुख्यालय झाले. अलिबाग शहराचे महत्त्वाचे आकर्षण आणि वैभव असलेली भूचुंबकीय वेधशाळा मुंबईच्या कुलाबा वेधशाळेची शाखा असून तिचा जगात दुसरा क्रमांक आहे. या वेधशाळेची स्थापना 1904 मध्ये झाली आहे. भारत सरकारच्या हवामान खात्याकडून या वेधशाळेचे कार्य चालवले जाते. पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीमध्ये होणारे फेरफार किती प्रमाणात होत आहेत याविषयीची शास्त्रीय माहिती या वेधशाळेत संग्रहित व आलेखित केली जाते. या वेधशाळेची इमारत विशिष्ट प्रकारच्या दगडांनी बांधलेली आहे. त्यात लोखंडाचा वापर केलेला नाही. या वेधशाळेत जून 1993 मध्ये अद्ययावत व अतिशय संवेदनक्षम चुंबकीय यंत्रसामग्री बसवून संगणक व उपग्रहाद्वारे ती जगातील अद्ययावत अशा 35 चुंबकीय वेधशाळा शी जोडण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात भौगोलिक, ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळे अनेक असून त्यापैकी प्रमुख 11 पर्यटन स्थळांचा अभ्यास केला आहे. कोकणातील ही प्रसिद्ध पर्यटन स्थळे आहेत. पर्यटन व्यवसायाचा विकास झाल्यानंतर खऱ्या अर्थाने कोकणाचा विकास होईल. त्यासाठी पर्यटन व्यवसायाच्या विकासाचा आराखडा तयार करून तो मंजूर करण्याची गरज आहे. लोकसंख्या संसाधनाचा विकास पर्यटन व्यवसायावर देखील अवलंबून आहे.

**संदर्भग्रंथ :**

1. Bhatia A. K. : Tourism Development.
2. शिंदे एस . बी.: पर्यटन भूगोल .
3. सांगळे शैलजा : पर्यटन भूगोल.
4. विठ्ठल घारपुरे : महाराष्ट्राचा पर्यटन भूगोल.
5. www.mtdc.com
6. www.itdc.com

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# कोरोना महामारी आणि सामाजिक बदल

*अंकुश रामराव शिंदे[१] अभिजीत बाबासाहेब कदम[२]*

*[१]राज्यशास्त्र विभाग, एम.फिल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद*

*[२] राज्यशास्त्र विभाग, एम.ए., डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ, औरंगाबाद*

**प्रस्तावना :**

मानवाने अनेक नैसर्गिक संकटाचा सामना केलेला आहे. मानवी जीवन नैसर्गिक असून ते नैसर्गिक संकटाने घेरलेले आहे. अनेक प्रकारच्या आपत्तीला मानव सामोरे गेला आहे मनुष्यप्राणी जस जसा विज्ञानाकडे औद्योगिकीकरणाकडे वाटचाल करू लागला तशी तशी त्याच्यासमोर संकटही वाढत गेली. पूर्वी भारतामध्ये आरोग्याबाबत सुधारणार नव्हती अनेक साथीच्या रोगांमुळे कित्येक बळी घेतले जायचे. परंतु विज्ञानाच्या शोधांमुळे नवीन तंत्रज्ञानामुळे, शिक्षणामुळे, सुधारित आरोग्य यंत्रणेमुळे अनेक मनुष्य विघातक रोगांवरती औषधाचा शोध लावला गेला. त्यामुळे जन्म दरांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली व मृत्यू दरामध्ये घट झाली ही चांगलीच बाब म्हणावी लागेल. परंतु एकविसाव्या शतकामध्ये २०१९ साली कोविड-१९ रोगाचा प्रकोप झाला आज २०२१ उजाडले तरी तो कमी झाला नाही या उलट त्याचे प्रमाण अधिक तीव्र झाले आहे या रोगावर प्रभावी असे औषध देखील तयार झाले नाही जे औषध बनवले गेले त्याचे उत्पादन कमी पडत आहे. कारण रुग्ण संख्येचे प्रमाण अधिक आहे. या कोविड-१९ मुळे मानवाच्या जीवनामध्ये अभूतपूर्व असे सामाजिक बदल घडून आले आहेत त्या सामाजिक बदलावर लक्ष केंद्रित करणे हा या शोध प्रबंधाचा हेतू आहे. संपूर्ण जगामध्ये सद्यस्थितीला कोरोना च्या रुग्णाचा कहर झाला आहे डब्ल्यू एच ओ या जागतिक संघटनेने ११ मार्च २०२० ला कोविड-१९ ही जागतिक महामारी आहे असे घोषित केले. सद्यस्थितीला संपूर्ण जगामध्ये १३.७ कोटी लोक या महामारी मुळे बाधित झाले आहेत. १३.७ कोटी लोकां पैकी ७.७८ कोटी लोकांनी कोरोना या आजारावर मात करून ते कोरोना मुक्त झाले आहेत. तर २० लाख ९५ हजार लोकांचा दुर्दैवी मृत्यू झालेला आहे. जगाच्या तुलनेत भारतामध्ये जवळपास १ कोटी ३७ लक्ष लोक हे कोरोना बाधित असून १ कोटी २३ लक्ष लोकांची कोरोना महामारी मधून मुक्तता झाली. एक लाख ७१ हजार कोरोना बाधित व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. वरील परिस्थिती पाहता भारतामध्ये या रोगाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. या महामारी रोखण्यासाठी देश-विदेशा मध्ये (लॉकडाऊन) टाळेबंदी चा वापर करण्यात आला आहे. इतर देशामध्ये टाळेबंदी करत असताना योग्य त्या उपाययोजना कडे लक्ष देण्यात आले परंतु भारतामध्ये एका रात्रीमध्ये संपूर्ण (लॉकडाउन) टाळेबंदी घोषित करण्यात आली त्यामुळे येथील सामाजिक जीवनावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये**

१. कोविड-१९ मुळे झालेल्या सामाजिक बदलाचा अभ्यास करणे.

२. कोरोना महामारी व सद्यस्थितीमधील कोराना बाधीत रुग्णांची आकडेवारी जाणून घेणे.

३. कोविड-१९ मुळे आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य व्यवस्थेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :-**

१. कोविड-१९ मुळे सामाजिक बदल झालेला आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधनाच्या वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेण्यात आला आहे. तसेच तथ्ये संकलनाच्या द्वितीय सामग्रीचा उपयोग केला आहे. यामध्ये वर्तमान पत्रे, वेबसाईट आणि ब्लाॅग वरील निवडक लेखाचा वापर केला आहे.

**कोविड-१९ आणि सामाजिक बदल**

वुहान या (चीन) शहरा मधून उदयास आलेल्या कोविड-१९ या रोगाचा जवळ-जवळ प्रत्येक समाजातील घटकावर गंभीर परिणाम झाला आहे. मोठ्या प्रमाणात पसरलेल्या रोगामुळे अनेक देशांच्या दळणवळण, आयात निर्यात व आंतरराष्ट्रीय प्रवासावर निर्बंध आणले गेले. सर्व जगभर पसरलेल्या या रोगाला नियंत्रित करण्यासाठी टाळेबंदी ही एकमेव

पद्धत अवलंबलेली आहे. आणि जवळ-जवळ प्रत्येक देशाने ही पद्धत स्वीकारली आहे. भारतीय समाजातील टाळेबंदी दरम्यान सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, कृषी, मानसिक पातळीवर आणि इतर बऱ्याच बाबींवर परिणाम झाले, यामुळे लोकांच्या जीवनावर विनाशकारी परिणाम झाले.

**सामाजिक अंतर वाढले**

कोरोना हा विकार आपल्या समाजाला नवी विषमता शिकवत आहे. जर आपण समाज शास्त्रीयदृष्ट्या सामाजिक अंतराच्या कृतीचे विश्लेषण केले तर ते अस्पृश्यतेचे नवीन रूपच म्हणावे लागेल. भारतीय समाजात पूर्वी उच्च जातीतील लोक अस्पृश्य लोकांशी सामाजिक अंतर राखत असत जेणेकरून ते उच्च जातीतील लोकांना अपवित्र करू शकणार नाही. त्याच धर्तीवर कोविड-१९ च्या कारणास्तव समकालीन समाजात अस्पृश्यता दूर करणारे आणि एकीकरण वाढविणारे सर्व घटनात्मक नियम हे अयशस्वी झाल्यासारखे दिसत आहेत. कारण लोकांना सामाजिक आंतर ठेवण्यास सांगितले जाते अर्थात कोविड-१९ च्या प्रभावावर नियंत्रण ठेवण्यासाठी हा (सामाजिक अंतर) एकमेव उपाय आहे आणि त्यासाठी प्रोत्साहित केले जाणे आवश्यकच आहे. कोरोनाची लागण झालेल्यांची संख्या एका बाजूला वाढत असताना दुसऱ्या बाजूला त्यांच्याप्रती त्यांचे शेजारी व नातेवाईक असंवेदनशील होताना दिसतात. कोरोना ची लागण झालेल्या व्यक्तीकडे कुत्सित दृष्टीने पाहिले जात आहेच पण अनेक ठिकाणी त्या व्यक्तीला अक्षरशः वाळीत टाकण्याच्या ही घटना घडत आहेत. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. समाजामध्ये राहूनच त्याला मनुष्यत्व प्राप्त होते हे प्राचीन ग्रीक विचारवंत अरिस्टोटल यांनी सांगितले आहे. त्याने मनुष्याचा विवेक व परहितकारक वृत्ती आपल्या पुढे ठेऊन मूल्यलक्षी विवेचन केले होते; परंतु कोरोनामुळे मनुष्याची वाटचाल एकमयतेतून तुटकपणाकडे होत आहे. माणूसपणाचा अधःपात होताना दिसतो आहे. मनुष्य अधिक आत्ममग्न झाला आहे म्हणूनच कोरोनाच्या निमित्ताने सार्वजनिक विवेकाचा भारतीय समाजव्यवस्थेत सत्वभ्रंश झाल्यासारखी परिस्थिती ओढवली आहे. कोरोनाच्या कठीण प्रसंगात एकमेकांविषयी संशय व अनादराची भावना समाजजीवनात प्रकर्षाने दिसल्यामुळे सार्वजनिक विवेकाचा लवलेशही शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये दिसला नाही. शहरी भागातून गावाकडे आलेल्या लोकांना गावात प्रवेश नाकारला गेला. भारतीय खेड्यांमध्ये कायमच आपलेपणाची भावना आहे. परंतु या महामारी मध्ये त्याची प्रकर्षाने उणीव दिसून आली तसेच शहरांमध्येही कोरोना बाधित व्यक्तीला प्रवेश नाकारला गेला त्यामुळे कित्येक सोसायटींना पोलिसांना नोटिसा पाठवावे लागले. सामाजिक स्थैर्य विस्कळीत करणाऱ्या अशा परिस्थितीत सामाजिक अंतराची ही संस्कृती शारीरिक अंतरा ऐवजी जातीजातीमध्ये व वर्ग वर्गामध्ये कायमचे (सोशल डिस्टंसिंग) रुजवले अशी भीती वाटू लागली आहे.

**अर्थव्यवस्थेतील बदल**

कोविड-१९ मुळे अर्थचक्राच्या वाढीचा दर ऋणात्मक गेला आहे. कोविड-१९ चा प्रभाव बहुविध आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून ग्रामीण आणि शहरी दोन्ही ठिकाणी विपरीत परिणाम झाला आहे. अनेकांना रोजगारापासून मुकावे लागले तर अनेकांना आहे ते ही विकावे लागत आहे. सर्वात महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला तो रोजंदारी करणाऱ्या मजुरांचा! असे मजूर ज्याचे पोट हातावर आहे. ज्यांना दररोज काम मिळाले तरच त्यांची चूल पेटते, असे लोकांना रस्त्यावर भीक देण्यासाठी देखील कोणी राहिले नाही. अनेक उद्योग हे कर्मचारी स्थलांतरामुळे (टाळेबंदीमुळे) गावाकडे गेली त्यामुळे उत्पादन क्षमता ही कमी झाली, तर महागाई वाढली आहे. संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला या महामारी मुळे चाप बसला आहे. या टाळेबंदीमुळे छोटे-छोटे उद्योगांचा ह्रास झाला आहे. नवीन उद्योग सुरू करण्याची मानसिकता राहिली नाही, बेरोजगारी यामुळे वाढतच जात आहे. ती किती दिवस असेच वाढत राहील हे सांगता येणे अशक्य झाले आहे. सरकारी नोकरी तर दूरच परंतु खाजगी नोकरी देखील आजच्या तरुणांना मिळणे कठीण झाले आहे. टाळेबंदी काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर ऋणात्मक गेला आहे. सरकारी तिजोरीवर मोठ्या प्रमाणात ताण आला आहे. आय. एम. एफ. च्या म्हणण्यानुसार गेल्या शंभर वर्षातील ही आर्थिक क्षेत्रातील सगळयात मोठी मंदी असणार आहे. अनेक कर्मचाऱ्यांची पगार कपात होतेय, किंवा त्यांना सरळ कामावरून कमी केले जात आहे. त्यामुळे बेरोजगारी आणि स्थलांतर दोन्हीही घडून येत आहे. स्थलांतरित कामगारांना भेडसावणाऱ्या समस्या या प्रत्येकाने पाहिल्या आहेत परप्रांतीय कामगार दैनंदिन कमाईवर अवलंबून असतात. त्यांच्याकडे फारच कमी बचत असते की ती कोणत्याही आपत्कालीन

परिस्थितीत खर्च करू शकतील. ज्यांच्याकडे संसाधने उरली नव्हती त्यांनी शहरामध्ये नोकरी आणि पैशाच्या अनुपलब्धतेमुळे आपल्या खेड्यात जाण्यास सुरुवात केली आहे आपल्या मुलासह गरोदर पत्नीबरोबर हजारो महिलांचे अनवाणी चालणे या मजुरांच्या नशिबी आले आहे

**शिक्षण**

अर्थव्यवस्थेतून जाताना कोविड-१९ चा शिक्षणावर होणारा परिणाम क्रुर झाला आहे. त्याचा परिणाम नंतरच्या दिवसात दिसून येईल, कोरोना मुळे शिक्षण क्षेत्रात जगात जवळपास १५० कोटी विद्यार्थ्यांवर प्रचंड परिणाम झाला आहे. शाळा कॉलेजेस बंद झाले आहेत आणि परीक्षाही ठप्प झाल्या आहेत. ( beaten or broken : informality and covid) या जागतिक बँकेच्या अहवालानुसार विद्यार्थ्यांच्या या पिढीच्या उत्पादकतेवर शाळा बंद पडण्याचा आजीवन परिणाम होईल, असा जागतिक बँकेने इशारा दिला आहे. पुढच्या काळात शाळा-कॉलेजमध्ये न जाता ई-बुक्स वाचणं आणि ई-लर्निंग ने अभ्यास करणं वाढेल पण भारतासारख्या ठिकाणी अजून तरी ई-लर्निंगचा वापरावर बऱ्याच मर्यादा पडतील पण मुलं आता एकत्र खेळणार नाहीत लहान मुलावर त्याचा खूप वाईट परिणाम होईल. सुमारे एक वर्ष झाले शाळाबाह्य मुले कदाचित काही तथ्ये विसरतील तसेच त्यांचा शिकण्याच्या क्षमतेवरही परिणाम करतील.

**मानसिक बदल**

कोणत्याही साथीच्या रोगांचा किंवा कोणत्याही परिस्थितींचा ज्याचा परिणाम समाजावर मोठ्या प्रमाणात होत असतो. टाळेबंदी ने हे सिद्ध केले आहे की, मनुष्य हा एक सामाजिक माणूस आहे, कारण जवळ पास चार महिने सतत टाळेबंदी मुळे लोकांवर मानसिक परिणाम केला आहे आणि घरातील हिंसाचाराच्या रुपाने स्त्रिया व मुलांना त्याचा सामना करावा लागत आहे. लॉकडाऊन मुळे अत्यंत विषम आणि विदारक चित्र दिसते. यात ग्रहकलह, घटस्पोट, एकटेपणा, चिंता, भीती आणि नैराश्य या सगळ्यांचं प्रमाण खूप वाढले. समाजातील अस्थिरता, विषमता, प्रचंड स्पर्धा, युक्तिवाद, स्वार्थीपणा आत्मकेंद्रीपणा, उंचावलेल्या महत्त्वकांक्षा, त्याहीपेक्षा खूप कमी असलेल्या संधी, पैशाला व प्रतिष्ठेला आलेले प्रचंड महत्त्व यासाठी चाललेली केविलवाणी धडपड आणि सतत इतरांची केलेली तुलना ही मनःस्थितीला कारणीभूत आहे. ही कारण दूर केल्याशिवाय माणसाची चिंता भीती एकाकीपणा आणि नैराश्य दूर होणार नाही.

**आरोग्यावरील परिणाम**

या महामारी ने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आरोग्यावर खास करून परिणाम केला आहे. भारतामध्ये जवळपास २१.७ टक्के (२०११) लोकसंख्या ही दारिद्र रेषेखालील आहे त्यांच्या आरोग्यावर खर्च हा ० टक्के आहे. कोविड-१९ मुळे आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण पडला आहे नियोजन अभावी रुग्णांचे हाल होत आहेत कोरोना बाधित रुग्णांची एवढी संख्या वाढली आहे की, त्यांना बेड उपलब्ध होत नाहीत. केंद्र आणि राज्य सरकारच्या राजकारणात सामान्य जनतेला आपला प्राण गमवावा लागत आहे. जमेची बाजू अशी की समाजातील व्यक्तींना आरोग्याचे महत्व समजले आहे. खासकरून ग्रामीण भागामध्ये आरोग्य विषयी जनजागृती मोठ्या प्रमाणात झाली आहे. परंतु या महामारीमुळे आपल्या आरोग्य यंत्रणेवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. एकंदरीत आरोग्य यंत्रणेमध्ये उणिवा दिसून आल्या आहेत. त्यामुळे शासन व्यवस्थेला देखील आरोग्याचे महत्त्व वाटू लागले आहे. कोविड बाधित रुग्णांना बेड, व्हेंटिलेटर ऑक्सिजन इत्यादी साधने अपुरी पडताना दिसत आहेत. पूर्वीच आरोग्य यंत्रणेवर मोठ्या प्रमाणात खर्च केला असता तर आजची परिस्थिती ही वेगळी असती.

**सारांश**

सदरील शोध निबंधामध्ये कोरोना महामारीमुळे झालेले सामाजिक बदल व कोरोना महामारी रोखण्यासाठी सरकारने टाळेबंदी सारखे कठोर पाऊल उचलले त्यामुळे समाजामध्ये झालेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, कृषी, मानसिक पातळीवरील तसेच शैक्षणिक व आरोग्यविषयक बाबींवर सरकारच्या एकंदरीत भूमिकेत वर प्रकाश टाकण्यात आला आहे. टाळेबंदी हा महामारीवरील शाश्वत पर्याय नाही. तसेच टाळेबंदी मुळे उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा होतो यासाठी योग्य उपाययोजना राबवणे महत्त्वाचे ठरते व आरोग्य यंत्रणेवर पारदर्शकपणा आणावा लागेल जेणेकरून बाधित रुग्णाची गैरसोय होणार नाही याकडे सरकारने लक्ष केंद्रित करावे तरच कोरोनासारखा महामारी वर नियंत्रण ठेवता येईल.

**संदर्भ सूची.**

1. systems.jhu.edu/research/public-health/ncov/
2. अच्युत गोडबोले,दीपा देशमुख साधना साप्ताहिक ९ मे २०२० लेख
3. अभिषेक सोनी  ब्लॉग २७ ऑक्टोबर २०२०
4. ministry of health and family welfare government of India (mohfw.gov.in)

# कोरोना आणि जगाचे कृषी क्षेत्रातील बदलत जाणारे अर्थकारण

***नेहा अशोक चव्हाण***

*एम.ए.अर्थशास्त्र भाग-१, अर्थशास्त्र विभाग, गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी*

**संशोधन गोषवारा:**
कोविड १९ अर्थात कोरोना विषाणूच्या प्रसाराचा भारतासह संपूर्ण जगातील प्रत्येक घटकावर अत्यंत खोलवर परिणाम झालेला आहे. भारतासह जगभरातील अनेक भागात माणसांच्या हालचाली, साधनसामग्री आणि वाहतूक आदी सर्वच क्षेत्रांना एकप्रकारे लकवाच मारला आहे. सगळे ठप्प झाले आहे. उत्पादन क्षेत्रे लॉजिस्टिक, वस्तू व सेवा क्षेत्रातील अर्थव्यवस्थेबरोबर सर्वच क्षेत्रे पूर्णपणे बंद आहे. या साऱ्या उद्रेकाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर वेगाने नकारात्मक परिणाम होत आहे.

**बीज शब्द :** कोरोना – कृषीक्षेत्र – अर्थव्यवस्था – जग

**प्रस्तावना :**

जगभरात पसरलेल्याकोविड-१९ महामारीमुळे जग अतिशय वेगाने जागतिक मंदीच्या दिशेने वाटचाल करत आहे. किमान पुढील काही महिने जागतिक अर्थव्यवस्थेचा बराच मोठा भागठप्प राहील. २३ मार्च २०२० रोजी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या व्यवस्थापकीय संचालिकाक्रिस्टलिना जॉर्जियावा यांनी केलेल्या विधानानुसार जागतिक वाढीच्या दराचा २०२०साठीचा आढावा नकारात्मक दिसून येत आहे आणि त्यात २०२१ शिवाय सुधारणेची शक्यता नाही.तसेच २०२१ चा विचार केला तरी ही परिस्थिती फारशी बदलली आहे असे नसून कोरोनाच्या दुसऱ्या टप्प्यामुळे त्यामध्ये अधिक वाढ होत आहे.जागतिक कामगार संघटनेच्या म्हणण्यानुसार, कोरोनामुळे जागतिक बेरोजगारीत कमालीची वाढहोऊन ती २५ दशलक्षांपर्यंत पोहोचण्याची संभावना आहे.जेव्हा हे संकट चालू झाले, तेव्हा ते फक्त चीनपुरते मर्यादित राहील असा सर्वांचाकयास होता.मात्र सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम अधिकाअधिक तीव्र होत गेला.लॉकडाऊन म्हणजे काय? व्यावहारिकदृष्ट्या, लॉकडाऊन म्हणजे सर्व आर्थिक व्यवहार ठप्पअसणे. ह्याचाच अर्थ वस्तू व सेवांचे उत्पादन आणि पुरवठा संपूर्णपणे ठप्प नसला तरीविस्कळीत होणे. विद्यमान मागणीच्या तुलनेत वस्तू आणि सेवा पुरेशा प्रमाणात पुरवल्याजात नाहीत. त्याच वेळी, आर्थिक युनिट्स बंद झाल्यामुळे लोक आपली नोकरी व मजुरीगमावतात. याखेरीज लॉकडाऊनमुळे वस्तू खरेदी मंदावल्याने एकूण मागणीवरही विपरितपरिणाम होतो. अलीकडच्या काळातील जागतिक अर्थव्यवस्थेमधील मंदीसदृश परिस्थिती हीएकतर खालावलेली मागणी अथवा अचानक घडून आलेले पुरवठ्यातील बदल किंवा आर्थिक संकटयामुळे उद्धवलेली आहे. कोविड-१९ लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे वेगळेपणअसे की मागणी व पुरवठा ह्या दोन्हींमध्येही लक्षणीय घट झालेली आहे. शेतकरी आणि शेती उद्योग मोठ्या अडचणीत सापडला आहे. आज लॉकडाऊनमुळे जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर कामगार टंचाई भासत आहे याचा प्रतिकूल परिणाम शेती उत्पादनावर होत आहे.जगाच्या बाजारपेठेत तांदूळ गहू यांसारख्या प्रमुख उत्पादनांची साठेबाजी,निर्यातदार देशांनी थांबवलेली निर्यात, असे परिणाम दिसून आले.दुध हा रोजच्या जीवनातील महत्त्वाचा घटक आहे.दुध निर्यातदार देशांमधील दुग्धउत्पादनाचा दर वाढत आहे.अमेरिकेत अंड्याच्या किरकोळ विक्री दरात तीव्र वाढ होत आहे. कोरोनामुळे जगाच्या बाजारपेठेत असे चढउतार दिसून येत आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) कोरोनामुळे जगाच्या अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम अभ्यासणे.
२) जागतिक स्तरावर कृषीक्षेत्रावरील आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.
३) जगातील विविध देशातील शेत मजुरांची कमतरता अभ्यासणे.
४) आंतरराष्ट्रीय पातळीवरील मागणी आणि पुरवठ्यातील वाढ घट अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

या शोधनिबंधामध्ये कोरोनामुळे जगात कृषी क्षेत्रात झालेल्या बदलांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये जगातील प्रमुख चार उत्पादनांची निवड करून त्यामध्ये घडून आलेल्या बदलांचा अभ्यास केला आहे.

**माहिती संकलन**

या शोधनिबंधामध्ये दुय्यम तथ्य सामग्रीचा आधार घेतला आहे,त्यामध्ये विविध मासिके पाक्षिके वृत्तपत्र अध्ययन विषयाशी निगडीत संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल इत्यादींचा आधार घेतला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

सदर शोध निबंधात आंतरराष्ट्रीय व्यापारातील केवळ प्रमुख चार उत्पादनांचा अभ्यास केला आहे.तसेच केवळ कोरोना कालखंडात घडून आलेल्या बदलांचा अभ्यास केला आहे.

**माहितीचे विश्लेषण:**

कृषी क्षेत्रावरील आर्थिक परिणाम: जागतिक स्तर

जागतिक स्तरावर, अन्न व कृषी संघटनेला (एफएओ) मागणी व अन्नपुरवठा ह्यात बदलांचीअपेक्षा आहे. जगातील सर्व देशांनी आपापल्या देशातील नागरिकांचे उपासमार आणि कुपोषणयांपासून संरक्षण, याचबरोबर अन्न पुरवठा साखळीतील त्रुटी दूर न केल्यास 'जागतिकअन्नसंकट' उद्भवू शकते. तसेच, कोविड -१९ हे संकटजगभरात "अन्नटंचाई" निर्माण करू शकते असा इशारा संयुक्त राष्ट्रांनी दिला आहे.वर्ल्ड फूड प्रोग्रॅमच्या निरिक्षणानुसार कोविड-१९ मुळे आधीच अन्नाबाबतचीअसुरक्षितता आणि कुपोषण ह्यांनी ग्रस्त असलेल्या जनतेचे आणखी हाल होण्याची शक्यताआहे. लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात कामकरणे, रास्त व किफायतशीर दर मिळवणे आणि बाजारपेठेत खरेदी किंवा विक्रीसाठी प्रवेशमिळविणे अशक्य झाल्यास त्याचे अत्यंत वाईट परिणाम होतील.

### 1.तांदूळ- गहू

तांदूळ आणि गहू यांची लोकांनी केलेली साठेबाजी आणि अन्न निर्यातीवर विविध देशांनीलादलेले निर्बंध यामुळे जगात तांदळाच्याकिमतीत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उदाहरणार्थ, जगातील तिसऱ्याक्रमांकावरील तांदूळ निर्यातदार देश असणा-या व्हिएतनामने निर्यात थांबवली आहे, यामुळे जागतिक तांदळाच्या निर्यातीत 15 टक्क्यांनी घट होऊ शकते. भारत आणिथायलंडनेही निर्यातीवर बंदी घातल्यास जगातील तांदळाच्या किंमतींमध्ये लवकरच तीव्रवाढ होऊ शकते. गव्हाचा जगातील सर्वात मोठा निर्यातदार आणि उत्तर आफ्रिकेचा सर्वातमोठा गहू पुरवठादार असणा-या रशियाकडूनही निर्यातीवर निर्बंध लादले जाण्याची शक्यताआहे. गव्हाच्या पीठाचा जगातील सर्वात मोठा स्रोत असलेल्या कझाकस्तानने तर आधीचत्याच्या निर्यातीवर बंदी घातलेली आहे. इतर पिकांबाबतीतही असेच प्रकार निदर्शनासयेत आहेत.

### 2. मका :

मका हा इथेनॉलच्यानिर्मितीतील सर्वात महत्वाचा घटक आहे. तेलाच्या घसरलेल्या किंमती आणि खूप दिवस चालणारे लॉकडाऊन यामुळे जगात विविध देशात  वाहनचालवण्याच्या घटत्या प्रमाणामुळे इथेनॉलची मागणी कमी झाली आहे. अमेरीकेत मका या पिकाच्या किमती कोसळल्या आहेत.याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर अधिक दिसून येतो.

### 3. अंडी

मार्च २०२० च्या सुरूवातीचा विचार करता  अंड्यांच्या घाऊक किमतींमध्ये १८०टक्क्यांनी वाढ झालेली आहे, कारण ह्याच काळातील मागच्या वर्षी झालेल्या खरेदीच्यातुलनेत ग्राहकांनी ४४ टक्क्यांनी अधिक अंडे खरेदी केली आहे. किरकोळ विक्रेते वाढतीमागणी पूर्ण करण्यासाठी नेहमीपेक्षा सहापट जास्त ऑर्डर देत आहेत. अमेरिकेत मार्च२०२० मध्ये अंड्यांचे साठे अतिशय वेगानी कमी होत आहेत. अमेरिकेत, अंड्यांच्या पुरवठ्यात कमतरता आणि किरकोळ विक्री दरात तीव्र वाढ नोंदवली गेली आहे.

### 4. मांस

मांसक्षेत्र एका वेगळ्या कारणामुळे संकटात सापडले आहे. मांससेवन सुरक्षितअसल्याचे वैज्ञानिकांनी स्पष्ट केल्यानंतरही कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पसरलेल्याअफवांमुळे घटलेले मांससेवन हे ह्या संकटामागील एक प्रमुख कारण आहे. इथे लक्षातघेण्याजोगे दोन घटक म्हणजे चीन आणि आफ्रिकन स्वाईन फीवर. २०१९ च्या अखेरीस, चीनच्यामोठ्या भागाला आफ्रिकन स्वाईन फीवरच्या साथीने ग्रासले होते ज्यामुळे तेथील सुमारे५० टक्के  डुकरांचा मृत्यू झाला होता. यामुळे चीनमध्ये डुकराच्या मांसाच्या किंमतीतएकदम वाढ झाली आणि डुकराच्या मांसाऐवजी गोमांसाचे सेवन अधिक होऊ लागले.  गोमांसाच्या किंमती वाढल्या. सध्याच्या कोविड-१९ महामारीमुळे चीनसोबतचअमेरिकेसारख्या जगातील अन्य प्रमुख बाजारपेठांमध्येही गोमांस सेवनाचे प्रमाणलक्षणीयरित्या घटलेले आहे.

तरीही, मार्च २०२० मध्ये गोमांसाच्या किरकोळ मागणीत आणि तुटवड्याच्या भितीनेकेल्या जाणा-या खरेदीत (पॅनिक बाईंग) वाढ झाली आहे. १५ मार्चच्या आठवड्याअखेरअमेरिकेतील किरकोळ गोमांस विक्रीत ७७ टक्के वाढ नोंदवली गेली. ह्यामुळे गाय व इतरदुधदुभत्या जनावरांच्या किंमतीतही वाढ झाली आहे.मात्र गोमांसांच्याकिंमतीतील या वाढीचा फायदा शेतक-यांना न होता केवळ दलालांना झाला आहे. ह्याचकारणामुळे किरकोळ गोमांस विक्री आणि किंमती वाढत असतानाही अमेरिकेतील पशुपालकशेतकरी सरकारला हस्तक्षेप करण्यास सांगत आहेत.

### 5. दुध :

दूधाच्या आयातदार देशांपैकी चीन हा एक मोठा आणि महत्वाचा आयातदार देश आहे.रबोबँकच्या मते, २०२० मध्ये चीनची दुधाची आयात १९ टक्क्यांनी घटण्याची शक्यता वर्तवण्यात आलीहोती. त्याच वेळी, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड,

युरोपियन युनियन यासारख्या दूध निर्यातदारदेशांमधील दूग्धउत्पादनाचा दर मात्र वाढतच आहे. कोविड-१९ मुळे त्यात घट व्हायचीशक्यता नाही. अशा परिस्थितीत, जागतिक बाजारात दुधाचे दर खाली येतील असा अंदाज आहे.निर्यातदार देशांमधील दूध उत्पादकांसाठी ही मोठ्या चिंतेची बाब आहे. त्याचवेळी, पुरवठ्याच्या स्थानिक साखळयांमधील कोंडीच्या दबावामुळे बहुतेक देशांमध्ये दुधाचेदर चढे राहण्याची शक्यता आहे.

**कृषीक्षेत्रावरील संकट**

जागतिक स्तरावर, कामगार टंचाई हे ही शेतीवरील संकटाचे एक मुख्य कारण बनत आहे.हंगामी स्थलांतरित कामगारांच्या अनुपलब्धीमुळे अमेरिका, युरोप आणि ऑस्ट्रेलियात पीककापणीच्या कामामध्ये व्यत्यय येण्याची भिती व्यक्त केली जात आहे. फ्रान्सच्या कृषी मंत्र्यांनी संपूर्ण देशातील लोकसंख्येला पुरेसे अन्नं उपलब्ध होऊश्कण्यासाठी कृषी उत्पादन वाढवण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्याचबरोबर घरात बंदअसणा-या आणि काम करत नसलेल्या फ्रेंच स्त्री-पुरूषांना शेतीचे काम करण्यास पुढेयेण्याचे आवाहन केले आहे. बेरोजगार कामगारांना कृषी क्षेत्राकडे वळण्यासाठीप्रोत्साहित करून शेतमजुरांची कमतरता दूर करण्याचा जर्मनीचा प्रयत्न आहे. पोलंडमध्ये हाच प्रश्न युक्रेनियन कामगारांविषयी आहे. या कामगारांना पोलंडमध्येचराहू देण्याची विनंती पोलिश शेतकऱ्यांच्या संघटनांनी त्यांच्या सरकारला केली आहे.युरोपियन संसदेच्या शेतीविषयक समितीचे अध्यक्ष नॉर्बर्ट लिन्स यांनी सदस्य देशांनाहंगामी स्थलांतरित कामगारांना इतर देशांमध्ये सुरक्षित प्रवेश मिळावा यासाठी पाऊलेउचलण्याचा आग्रह केला आहे.

**शेतमजुरांची कमतरता**

जगातील काही ठराविक देशातील कामगार टंचाई पुढील तक्त्याद्वारे दर्शवली आहे.

| **देश** | **कामगार टंचाई ( जागतिक स्तर)** |
|---|---|
| फ्रांस | २ लाख |
| जर्मनी | ३ लाख |
| यू.के. | ८० हजार |
| अमेरिका | ६० हजार |

कोरोना त्यामुळे झालेले लॉकडाऊन यामुळे जगात विविध देशात कामगार टंचाई मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे फ्रांस देशात पर प्रांतीय कामगारांच्या अनुपस्थितीमुळे २ लाख कामगारांचा तुटवडा भासणार आहे.जर्मनीत जवळ जवळ ३ लाख हंगामी कामगारांची टंचाई भासेल. जे फळ भाज्या पिकवण्यासाठी जर्मनीत स्थलांतर करतात.तसेच यू.के.मध्ये ८० हजार तर अमेरिकेत जवळ जवळ ६० हजार कामगारांचा तुटवडा भासणार आहे. जे पिक उत्पादनासाठी एच -२ ए व्हिसावर आलेले असतात. साधारण मार्च-एप्रिल नंतर हंगामी कामगार, बहुतांशी मेक्सिकोमधून, शेतीत काम करण्यासअमेरिकेमध्ये येऊ लागतात. या हंगामी कामगारांना प्रवास करण्याची मुभा मिळावी यासाठी लिन्स यांनी कृषी मंत्रीव कृषी आयोगास हंगामी कामगारांसाठी प्रवेश परवाना आणि विशेष बस, रेल्वे अथवाविमानसेवा ह्यांची सोय करण्याचे आदेश दिले आहेत.

निष्कर्ष:

१.जगातील सर्व देशांनी अन्नपुरवठा साखळीतील तृटी दूर न केल्यास 'जागतिक अन्न संकट ' उदभवू शकते.

२.अनेक देशांकडे त्यांच्या लोकसंखेस सुमारे एक किंवा दोन महिने पुरेल इतका तांदळाचा साठा आहे. सद्याची परिस्थिती अशीच कायम राहिल्यास मुख्यत: तांदूळ आयात करणारे देश अडचणीत येतील.

३.सद्याच्या कोविड १९ च्या महामारीमुळे चीनसोबत अमेरिकेसारख्या जगातील अन्य बाजार पेठांमध्ये गोमांस सेवनाचे प्रमाण लक्षणीयरित्या घटलेले आहे.

४.जागतिक स्तरावरील कामगार टंचाई दूर करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण कृषी क्षेत्रावर त्याचा प्रतिकूल परिणाम वेगाने दिसून येईल.

**संदर्भ:**

*1. सामाजिक संशोधनाची मुलतत्वे लेखक:डॉ. बिभीषण करे, विद्याभूत पब्लिकेशन, जुलै २०१५.*

*2. कोरोना व जगाचे बदलत जाणारे अर्थ कारण – डॉ. आर.रामकुमार नाबार्ड चेअर प्रोफेसर टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबई.*

*3. साठे, मधुसुदन- जागतिक अर्थकारण , डायमंड पब्लिकेशन्स पुणे.*

*4. वार्ताहर, ( १३/०४/२०२०) कोरोनाचा उद्योग धंद्यावर होणारा परिणाम. दै.ई. सकाळ.*

# भारताची कर्ज समस्या आणि व्यवस्थापन

***प्रज्ञा प्रदीप तांबे***

*MA-I अर्थशास्त्र विभाग, गोगटे जोगळेकर महाविद्यालय , रत्नागिरी*

**संशोधन गोषवारा:-**

ज्याप्रमाणे व्यक्ती किंवा कुटुंबांना कर्ज उभारावी लागतात त्याच प्रमाणे देशाचा कारभार चालवण्यासाठी सरकारलाही कर्ज घ्यावे लागतात . त्यास सार्वजनिक कर्ज असे म्हणतात. अलीकडच्या सरकारच्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. हा खर्च भागवण्यासाठी कर व इतर नेहमीच्या मार्गाने मिळणारे उत्पन्न कमी पडते तेव्हा सरकारला विविध मार्गाने कर्ज उभारावी लागतात.ही कर्ज जागतिक बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आंतरराष्ट्रीय वित्त संस्था यांच्याकडून सरकार कर्ज उभारते.परंतु आज सरकारवरील जागतिक कर्जाचा बोजा खूप मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.

**बीज शब्द:-** भारत -कर्ज समस्या-कर्ज व्यवस्थापन

**प्रस्तावना:-**

प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था हा त्या देशाचा कणा असते. आणि त्या देशाची बँकिंग व्यवस्था किती सबळ आहे यावरूनत्या देशाची अर्थव्यवस्था किती सशक्त आहे हे लक्षात येते. काही वर्षापूर्वी भारताचे पतमानांकन जागतिक बाजारात 'मुडीजने' ते फक्त. पण हा आनंद कायम टिकणे अशक्य होऊन बसले आहे. उंचावण्याचे नमूद केल्याने सर्वांना आनंद झाला वाढून हजार कोटी रुपयांवरून 78 मध्ये भारतीय बँकांची अनुत्पादित कर्जे ही दोन लाख 2015 अनुत्पादित कर्जामुळे हजार कोटी रुपयांवर गेले आहेत 34 पर्यंत लाख 2017.तब्बल अडीच पट वाढ झालेली आहे .त्यामुळे भारत 'पिक्ज' यादीत जाऊन बसला आहे. म्हणजेच बुडीत कर्ज त्यांच्या बाबतीत पोर्तुगाल ग्रीस स्पेन आणि पाचव्या नंबर वर भारत या देशांच्या सोबतीला गेला आहे. सातत्याने उत्तम आर्थिक विकास दर साधायचा असेल तर त्यासाठी देशातील बँकांचे आर्थिक आरोग्य सुधारणे आधी महत्त्वाचे असते. भारत हा अनुत्पादित पुनर्रचित कर्जाच्या गर्तेत सापडला आहे.

हा कर्ज फुगा एक दिवस फुटणार आणि त्यामुळे अनेक राष्ट्रांचा अर्थव्यवस्था गंभीर संकटात सापडेल असे इशारे अर्थतज्ञ अनेक वर्षे देत आहेत. अशा संकटांना देशातील ठोकळ उत्पादनावर रोजगार निर्मितीवर विपरीत परिणाम होऊन कोट्यावधी सामान्य नागरिकांचे जीवन विस्कळीत होत असते. म्हणून अर्थव्यवस्थांमध्ये सतत वाढणारी अवाजवी कर्ज अपेक्षा सामान्य नागरिकांच्या जिव्हाळयाचा विषय असला पाहिजे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

- भारताची जागतिक कर्ज समस्या आणि त्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
- कोविड-19 नंतरभारताच्या जागतिक कर्ज क्षेत्राचा अभ्यास करणे.
- भारताच्या जागतिक कर्जसमस्येच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

**गृहितके:-**

- भारत हा अनुत्पादित पुनर्रचित कर्जाच्या गर्तेत सापडला आहे.
- कोविड 19-नंतर खूप मोठ्या प्रमाणात भारतावरील जागतिक कर्ज हे वाढलेली दिसून येते.

**माहिती संकलन:-**

द्वितीय माहितीच्या आधारावर हे संशोधन पूर्णपणे आधारलेले आहे .इंटरनेटवरील माहितीच्या आधारे हा रिसर्च पेपर लिहिला आहे.

**संशोधन मर्यादा:-**

प्रस्तुत शोधनिबंधात भारताच्या कर्ज समस्येचा अभ्यास केला आहे.

**<u>माहिती विश्लेषण</u>:-**

जर आपण भारतावर किती कर्ज आहे याबद्दल बघितले तर मार्च रोजी संपलेल्या तिमाहीत चलन मूल्यांकनाचा 2020 परिणाम आणि व्यापारी कर्ज आणि अनिवासी भारतीय (एनआरआय( मध्ये भारताचे परकीय कर्ज 558.5 अब्ज डॉलर्सवर पोचले. मार्च 2 अखेर देशाचे एकूण बाह्य कर्ज 2020.8 टक्क्यांनी वाढवून 558.5 अब्ज डॉलर्स पोहोचले आहे . अर्थमंत्रालयाच्या म्हणण्यानुसार व्यावसायिक कर्जात वाढ झाल्याने देशावरील एकूण कर्ज वाढले आहे.मार्च अखेर 2019 अहवालात म्हटले आहे .अब्ज डॉलर होते 543 एकूण बाह्य. की ,मार्च 85 चलन साठा प्रमाण 2020.5 होते.गेल्यावर्षी

याच काळात हे प्रमाण टक्के होते 76. अर्थ मंत्रालयाच्या अहवालानुसार बहुतेक उद्योगन्मुख बाजारपेठांमध्ये अर्थव्यवस्थेच्या विस्तारामुळे परकीय कर्ज वाढते. यामुळे देशांतर्गत बचतीत घट कमी केली जाते. भारत या प्रकरणात अपवाद नाही.

**भारताचे कोरोना पश्चात जागतिक कर्ज:-**

कोरोनाच्या संकटात जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे .भारताच्या अर्थव्यवस्थेलासुद्धा त्यामुळे दणका बसला असून आता जागतिक रेटिंग एजन्सी मुडीजने धोक्याची घंटा वाजवली आहे . मूडीज एन्व्हेस्टससर्विस ने पर्यंत भारत हा सर्वाधिक कर्ज 2021 असलेली अर्थव्यवस्था असेल कोरोना महामारी आर्थिक विकास आणि वित्तयगणितामध्ये बराच फरक पडणार आहे. याचा अर्थव्यवस्थेवरही प्रभाव पडेल आणि पुढच्या काही वर्षात पर्यंत अशा देशांच्या अर्थव्यवस्थेला कर्जाच्या ओझ्याखाली राहावे लागेल.मुडीजने म्हटले आहे की विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेत सध्या वाढत असलेल्या तुटीमुळे त्यांच्यावरील कर्जात वाढ होत आहे. 10 पर्यंत 2021 च्या तुलनेत 2019 टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यातील काहींवर मोठा व्याज भरावे लागणार आहे .ज्यामुळे कर्जात आणखीन वाढ होईल मुडीजने म्हटले की; विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेत ब्राझील भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यावर सर्वाधिक कर्ज असू शकतं. कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने जागतिक बँक आणि आशियाई विकास बँक कडून कर्ज घेतले आहे. मायक्रो लघु आणि मध्यम उद्योगांना मदत करण्यासाठी जागतिक बँकेने 75 कोटी अमेरिकन डॉलरचे कर्ज देण्याचे जाहीर केले आहेकोटी रुपयांचे कर्ज मंजूर 3700 त्याचबरोबर भारतातील शिक्षण सुधारणेच्या कामासंदर्भात सुमारे . झाले आहे.याव्यतिरिक्त मागासवर्गीय आणि गरीब घटकांसाठी जागतिक बँकेने या साथीच्या वेळी कोटी रुपयांच्या 7500 खर्चास मान्यता दिली. तर कोरोना संकटाच्या सुरुवातीच्या टप्प्यात जागतिक बँकेने कर्ज म्हणून एक अब्ज डॉलर्स दिले होते .त्याचबरोबर देशात जगातील कोरोना विषाणूचा संसर्ग याविरुद्ध लढा देण्यासाठी भारताने आशियाई विकास बँक कडून 1.रुपये कर्ज घेतले आहे (हजार कोटी) अब्ज डॉलर्स 5.जागतिक बँकेने गेल्या वर्षभरात सर्वाधिक कर्ज रक्कम भारताला उपलब्ध करून दिली .असून तरतुदी पैकी निम्मी रक्कम कोरोना संकटी तिमाहित वितरित केली आहे. सामाजिक तसेच आरोग्य क्षेत्राबरोबर या आंतरराष्ट्रीय अर्थसहाय्य त्याचा अधिक लाभ देशातील सुक्ष्म लघु व मध्यम उद्योगांना झाला आहे.

**तांत्रिकदृष्ट्या कर्ज देणे-** धनको आणि ऋणको पुरता सीमित व्यवहार आहे. ऋणको कर्ज थकल्यास कर्ज करारावरील वसुलीसाठी कायदेशीर पावले उचलतात .हे झाली सर्वसाधारण परिस्थिती करोना संकटाने आणलेल्या असाधारण परिस्थितीत एकाच वेळी कर्ज फेडण्यास असमर्थता व्यक्त करत आहे .आणि हे अनेक देशात घडत आहे. सहाजिकच प्रश्न दोघंपुरता मर्यादित न राहता देशाच्या स्थुलअर्थव्यवस्थेवरील गंभीर प्रश्न बनत आहे. कर्जाची एक मोठी लाट असेल अशी भीती व्यक्त केली जात आहे. केंद्रशासनराज्य सरकारे स्थानिक स्वराज्यसंस्था आणि निमआदिशासकीय स्वायत्तसंस्था या सर्वांनी आपापल्या आर्थिक गरजा भागविण्याकरिता उभारलेले कर्जकोणतेही . सरकार आपले वित्तीयव्यवहार करीत असताना कर्ज उभारण्याच्या सर्वमान्य मार्ग अवलंबित असते. सरकारच्या एकूण कर्जाचे आकडे जाहीर चर्चेत आणि चिंतेचा विषय ठरतात. इसवी सन च्या 2005 सुमारास भारतात केंद्रसरकारचे एकूण लाख 13 कोटी रुपयांचे कर्ज होते. तसेच सर्व राज्यसरकारची मिळून सात कोटी रुपयांची कर्जे होते असा अधिकृत अंदाज आहे. सर्व कर्ज सतत वेगाने वाढत आहे .असाही अनुभव येतो विकसित देश व विकसनशील देश अशा सर्वांच्याच बाबतीत सार्वजनिक करण्याची समस्या कायम असल्याचे आढळते कोणतेही कर्ज उभारले की त्याची कालांतराने परतफेड करावीच लागते, पण त्याचबरोबर इतरही अनेक देण्याची जबाबदारी सरकारला स्वीकारावे लागते .ती सर्व देणी विचारात घेतली तर सगळा भार हा महाप्रचंड आहे असे ध्यानात येते.

**भारताच्या जागतिक कर्जाचे व्यवस्थापन:-**

सरकारी कर्जाचे महाप्रचंड प्रमाण पाहता या कर्जाची परतफेडही अत्यंत अवघड समस्या असणार हे उघड आहे ,.असे कर्ज परत करण्याचे अनेक मार्ग असू शकतात.

1. **कर्ज फेड निधीची स्थापना** -:

या पद्धतीनुसार जेव्हा सरकार उभारते तेव्हा परतफेडीसाठी निधी स्थापन करते. आधुनिक काळात या पद्धतीचा स्वीकार मोठ्या प्रमाणात केला जातो. दरवर्षी कर उत्पन्नातून काही विशिष्ट रक्कम त्या निधीतून उपलब्ध होते.त्यामध्ये उत्पन्न

प्रमाणे नवीन कर्जाची रक्कम देखील त्यात टाकली जाते. कर्जपेढीचा दृष्टीने असा निधी फारच उपयुक्त ठरतो. अडचणीच्या काळात सरकार या निधीतील रक्कम वापरू शकते. कर्ज परतफेड करण्याची ही एक आदर्श पद्धत आहे.

2. **कराचे वाढते प्रमाण:**

सरकारला कर्ज फेड करण्यासाठी आवश्यक उत्पन्नाची गरज भासते. ती सुलभ जावी यासाठी करांचे दर आणि करांची संख्या वाढवून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळून कर्ज फेड करण्यात यावी. त्यामुळे कर्जाचा भार कमी होईल. पण त्यामुळे व्यापार राहणीमान उपभोग उत्पादन रोजगार यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. परंतु त्यातून मुक्त होण्यासाठी हा पर्याय उपयोगी ठरू शकतो.

3. **कर्ज काही प्रमाणात परत करणे व काही प्रमाणात नुतनीकरण करणे:**

कर्ज काही प्रमाणात परत करणे व काही प्रमाणात नूतनीकरण करून चालू ठेवणे. असा संमिश्र प्रकारे केला जातो. सरकारकडे जादा उत्पन्न अगर निधी उपलब्ध असेल. तर ते आपले रोखे किंवा पतपत्रे बाजारातुन विकत घेऊ शकते. तेवढ्या रकमेने सरकारचे कर्जाचे कमी होऊ शकते.

**अनुत्पादित पुनर्रचित कर्ज:-**

अनुत्पादित कर्जामुळे हजार कोटी रुपयांवरून वाढून 78 मध्ये भारतीय बँकांची अनुत्पादित कर्जे ही दोन लाख 2015 हजार कोटी रुपयांवर गेले आहेत 34 पर्यंत लाख 2017.तब्बल अडीच पट वाढ झालेली आहे. त्यामुळे भारत 'पिक्ज' यादीत जाऊन बसला आहे म्हणजेच बुडीत कर्ज त्यांच्याबाबतीत पोर्तुगाल ग्रीस स्पेन आणि पाचव्या नंबर वर भारत या देशांच्या सोबतीला गेला आहे. सातत्याने उत्तम आर्थिक विकास दर साधायचा असेल तर त्यासाठी देशातील बँकांचे आर्थिक आरोग्य सुधारणे आधी महत्त्वाचे असते. भारत हा अनुत्पादित पुनर्रचित कर्जाच्या गर्तेत सापडला आहे.

**निष्कर्ष:-** सदर प्रकल्पाच्या भारताची जागतिक कर्ज समस्या आणि व्यवस्थापन या विषयाचा अभ्यास केल्यावर पुढील निष्कर्ष निघतात.

1. भारत हा अनुत्पादित पुनर्रचित कर्जाच्या गर्तेत सापडला आहे.
2. कोरोना पाश्चात जागतिक कर्ज हे खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे.
3. भविष्यात कर्जाचे महाप्रचंड प्रमाण पाहता या कर्जाची परतफेड अत्यंत अवघड समस्या दिसून येते.
4. देशातील बँकांचे आर्थिक आरोग्य सुधारणे आवश्यक आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाने बँकांवर ती नियंत्रण ठेवून त्यांच्या कर्जाची व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

**संदर्भ:**

1. महाराष्ट्र टाइम्स 7 जुलै 2018
2. सामाजिक संशोधनाची मुलतत्वे लेखक.२०१५जुलै ,विद्याभूत पब्लिकेशन ,बिभीषण करे .डॉ:
3. www.loksata.com 2 जुलै 2020
4. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे economic SPL paper IV , E-NOTES 2015

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# रुपयाचे अवमूल्यन आणि भारतीय अर्थव्यवस्था

*लेफ्टनंट प्रा.डॉ.एम.आर.खोत*
*अर्थशास्त्र विभाग, सिंधीदुर्ग महाविद्यालय मालवण*

सध्या जग हे पैश्याच्या भोवती फिरत आहे. आदिमानवाच्या काळात चलन नव्हते पण काही प्रमाणात वस्तुविनिमय होता. त्यानंतर वस्तुविनिमय पद्धतीमध्ये हळूहळू अनेक बदल होत गेले आजच्या अवस्थेपर्यंत अनेक स्थित्यंतरे अर्थव्यवस्थतेच्या बाबतीत अथवा विनिमयाच्या बाबतीत घडून आलेले आहे. जगात विविध क्षेत्रात असलेल्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक राजकीय कला क्रीडा अशा सर्व क्षेत्रातील कार्याचा सन्मान पैशाने होतो असतो. पैशाच्या स्वरूपात व आकारात दिवसेंदिवस बदल होत चाललेले आहेत. विविध प्रकारच्या धातूचा वापर ,वस्तूचा सेवेचा वापर देखील पैसा रूपाने केला जात होता. असं म्हटलं जातं स्थिती परत्वे कालपरत्वे देण्याघेण्याचे व्यवहार बदलत गेलेले आहेत मानव हा आपला आर्थिक विकास पैशामध्ये मोजत असतो मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत पैसा हा अत्यंत महत्त्वाचा बनलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा इतिहास पाहिला असता काही महत्त्वाच्या घटनांचा परिणाम चलना वर झालेला दिसून येतो आर्थिक विनिमय सुबत्ता अवनती राजकीय यंत्रणा कलाकुसर इत्यादी कितीतरी पैलू विषयी ऐतिहासिक नाणी सांगून जात असतात किंवा बोलू शकतात. नाण्यावरील मजकूर चित्रे चिन्ह ्यांचे दर्शनी मूल्य या साऱ्या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

***जुनी भारतीय चलन प्रणाली कशी मोजले जात होती ते खालील विभक्तीकरणा वरून लक्षात येईलफुटकी कवडी - कवडी फुटी कौडी पासून कौडी आली. कौडी पासून दमडी आली.दमडी पासून धेला आला. धेला पासून पाई आली.पाई पासून पैसा आला. पैसा पासून आणा आला. आणा पासून रुपया आला.***

***कवडी- दमडी***
***दमडी- धेला***
***ढेला - पाई***
***पाई – पैसा***
***पैसा- रुपया***

***२५६ दमडी= १९२ पाई= १२८ ढेला= ६४ पाई= १६ आणे= १ रुपयायातील आणि पद्धती पन्नासच्या दशकानंतर बाद केली जाऊ पैसे पद्धत सुधारण्यात आली व १०० पैशाचा एक रुपया अशी मोजदाद होऊ लागली***

**अवमूल्यन अर्थ** - परकीय चलनाच्याबाबतीत रुपयाचे मूल्य कमी होणे अथवा जाणीवपूर्वक कमी करणे म्हणजे रुपयाचे अवमूल्यन होय.

रुपया परकीय चलनाच्या संदर्भात मागणी व पुरवठ्याच्या आधारे स्वस्त होत असल्यास अथवा घसरत असल्यास त्याला रुपयाचे अवमूल्यन असे म्हणतात.

अवमूल्यनाद्वारे रुयाची किमत परकीय चलनाच्या संदर्भात कमी करणे हा सरकारचा किंवा मध्यवर्ती बँकेचा धोरणात्मक निर्णय असतो

**स्वातंत्र्य पूर्व काळ**

भारतीय रुपया हा इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावतो. प्राचीन काळात रुपया या शब्दाची साधर्म्य असलेला शब्द कौटिल्याने अर्थशास्त्रात रुप्यरूप नावाने वापरला आहे. अर्थात हे नाणे चांदी व सोन्याचे असे. इतिहासातील अगदी ठामपणे नोंदला गेलेला काळ म्हणजे पहिला भारतीय मुस्लिम सम्राट शेरशहा सुरीने त्याच्या काळात जनतेसाठी ज्या ज्या सोयी सुविधा आणि बदल केले होते त्यापैकी रुपया या नावाने चलनात नाणी आणली हा एक मोठा बदल होता. रुपया 178 ग्रेन म्हणजे 11 ग्रॅम चांदीचा होता व या रुपयाचा एक्शेंज रेट होता. 40 तांब्याचे पैसे म्हणजे एक चांदीचा रुपया होय. याच शेर शहाणे तांब्याची नाणी सोन्याची नानी ज्याला मोहर म्हटले जात असे. ती नाणी देखील चलनात आणली तेव्हापासून व्यवहारात पैसा आला प्रामुख्याने रुपया मोघल साम्राज्यातच होता . हा रुपया पुढे भारतात सर्वत्र यायला बस्कर ची लढाई कारणीभूत ठरली बास्करच्या सर जेम्स प्रिन्सेस या ब्रिटिश व्यक्तीने भारतातील चलनाचा अभ्यास करून लॉर्ड विल्यम बेटिंग यांच्याकडे एक अहवाल आणि नाण्याची प्रारूप करून पाठवले त्याचा हा अहवाल एक डिझाईन म्हणून मंजूर होऊन इंग्लंड मधून भारतात नाणी पाडण्याची मशीन आणले गेले व त्यानंतर पुढे भारतीय रुपयाची खऱ्या अर्थाने चलनात सुरुवात झाली पुढे 1833 -34 पासून विल्यम राज्याच्या छापाची नाणी तयार होण्यास सुरुवात झाली नंतर व्हिक्टोरीया राणी, आठवे एडवर्ड ,पाचवे व सहावे जार्ज इत्यादी राजांच्या मुद्रा असलेली नाणी स्वातंत्र्यानंतरही काही काल होती. 1906 मध्ये त्यावेळेस भारतात इंडियन प्रोमिसरी नोट अर्थात अगदी कागदी नोटा व्यवहारात आणल्या होत्या त्या सर्व चलन व्यवहारात इतिहास अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

**स्वातंत्र्यानंतरचा काळ**

भारत सरकारने स्वातंत्र्यानंतरच्या काळात नाण्यांमध्ये अनेक बदल केले परंतु उत्साह हवा त्या वेळी समाज यांची भावमुद्रा नाण्याचे एका बाजूला ठेवून दुसऱ्या बाजूला भारताचे प्रतीक म्हणून सिंहाचे चित्र ठेवले आणि अशा रीतीने

आपल्या देशात रुपया चालू ठेवला. 1950 पर्यंत ही नाणी चलनात होती परंतु त्यानंतर म्हणजे 1950 साली पूर्णपणे भारतीय नाणी तयार करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर काही काळापर्यंत भारतीय रुपया हा जागतिक अर्थव्यवस्थेत भक्कम होता. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश आणि अमेरिकन डॉलरचे भाव मिळत होते तेच भारतीय रुपयाला सुद्धा मिळत असे परंतु त्यानंतर भारतीय रुपया बाजारात पत गमावून बसत आलेला आहे. आता भारतीय रुपयाची सातत्याने घसरण झालेले आहे. स्वातंत्र्यापूर्वी 18 सप्टेंबर 1940 रोजी इंग्लंडने आंतरराष्ट्रीय चलनाच्या परवानगीने पौंड 30.5 टक्क्याने अवमूल्यन केले होते. या काळात भारताची आयात निर्यात बहुतांशी इंग्लंड देशाकडे होती मात्र यामुळे भारताच्या निर्यातीत फार मोठी घट होणार होती या कारणामुळे भारताने लगेचच रुपयाचे तितक्याच प्रमाणात अवमूल्यन केले आणि त्यामुळे विनामय दर पूर्वीइतकाच राहिला गेला.

स्वातंत्र्यानंतर भारतात पहिल्यांदाच 20 सप्टेंबर 1949 रोजी रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले हे अवमूल्यन फक्त अमेरिकन डॉलर च्या संदर्भात होते. आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्याबाबतीत अधिक प्रतीकात्मकता निर्माण झाल्याने भारतीय शासनाने अवमुल्यानाचा निर्णय घेतला. या काळात डॉलर किंमत 30 सेंट वरून 21सेंट पर्यंत कमी केले होती या ***अवमूल्यनामुळे भारताची व्यापार तुट कमी झाली. 1948-49 मध्ये 185.1 कोटी रुपये असलेली व्यापार तूट 1949-50 मध्ये 141.9 कोटी तर 1950-51 मध्ये 49.6 कोटी रुपये एवढी कमी झाली. मात्र हा अनुकूल परिणाम फार काळ टिकला नाही. 1951-52 मध्ये तूट वाढून 237.1 कोटी रुपये झाली.*** त्यावेळचे अर्थमंत्री जॉन मथाई यांच्या म्हणण्यानुसार भारताला 1949 च्या अवमूल्यनाचे फारसा फायदा झालेला नाही पण तो एक केवळ संरक्षणात्मक पवित्र असल्याचे मत त्यांनी मांडले गेले.

त्यानंतर राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय चलन निधीच्या सल्ल्यानुसार भारताने 6 जून 1966 रोजी रुपयाचे 33.5 टक्के अवमूल्यन केले डॉलरची किंमत यावेळी 4.46 वरून 7.50 रुपयांपर्यंत वाढली व पौंडांची किंमत 13.33 रुपयांवरून 21 रुपये झाली. ***या अवमूल्यनाची उद्दिष्टे –1) भारताची हार्ड चलन देशांकडून होणारी आयात कमी करणे 2) भारताची निर्यात वाढविणे.3) भारताचा व्यापारतोल कमी करणे.अवमूल्यनामुळे भारताची निर्यात वाढली मात्र दुष्काळी वर्षामुळे अन्नधान्याची आयात करावी लागल्याने व्यापार तूट अपेक्षेप्रमाणे कमी झाली नाही.*** कारण किमतीचा विचार केला असता 1952-53 मूळ वर्ष असलेला भावनिर्देशांक 1966 च्या अखेरीस 180 वर गेला आणि ही प्रवृत्ती आटोक्यात येण्याची काही चिन्हे दिसेनात. त्यामुळे भारत सरकारने विविध वस्तूंच्या बाबतीत भाव नियंत्रण लागू केले. परंतु ते अयशस्वी होऊन काळयाबाजारात वाढ झाली या वाढत्या किमतीचा व देशात घसरणारा रुपयाच्या मूल्याचा प्रतिकूल परिणाम देशावर झाला. हे अवमूल्यन आंतरराष्ट्रीय चलन नीतीच्या सल्ल्यानुसार भारताने हे अवमूल्यन केले याचे कारण म्हणजे वाढत्या किमती, पाकिस्ताचा असलेला संघर्ष 1965, दुष्काळ, पाकिस्तान संघर्षाचा परिणाम म्हणून परदेशी मदत भारताला थांबली. परकीय चलन न मिळाल्याने उद्योग धंदे चालू ठेवण्यासाठी आयात करता यावी म्हणून अशा अनेक कारणाने अवमूल्यन जाहीर केले. यामागे उद्देश म्हणजे भाताच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेत आर्थिक मदत मिळावी हा होता हे अवमूल्यन अनपेक्षित होते पण परकीय दडपणामुळे ते केले असावे असे काही तज्ञांचे आरोपी आहेत. नंतर भाववाढ होऊ नये म्हणून काळजी घ्यावी लागते ती न घेतल्याने तसेच भारताच्या निर्यात मालाला मागणी लवचिक नसल्याने अवमूल्यनाचा निर्यातीवर फारसा परिणाम झालेला नाही तसेच अंतर्गत उत्पादनावर अपेक्षित परिणाम झाला नाही

भारतीय अर्थव्यवस्थेत 1991 ला प्रचंड पर्यंत प्रमाणात बदल घडून आलेले आहेत. भारताच्या आर्थिक इतिहासात 1991 हे वर्ष जास्त महत्त्वाचे व आव्हानात्मक राहिलेले आहे. त्यामागे प्रामुख्याने दोन कारणे सांगता येतील ती म्हणजे देशातील राजकीय अस्थिरता आणि जागतिक घडामोडी. या काळात भारताला 1991 मध्ये तिसरे अवमुल्यन करावी लागले. हे अवमुल्यन तीन टप्प्यांमध्ये करण्यात आले तात्कालीन पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी एक जुलै 1991 ला 9%, 3 जुलै 1991 ला 10% तर 15 जुलै 1991 ला 12 % असे केले गेले या काळात सरासरी 30 टक्क्याने अवमूल्यन झाल्याचे दिसून येते. राजकीय व आर्थिक अस्थिरतेचा बाबतीत असे म्हणता येईल की, पाकीस्तान बरोबर झालेल्या युद्धा नंतर राष्ट्रीय सुरक्षिततेला धोका निर्माण झाला होता त्याचबरोबर दुष्काळ पडलेला होता, जागतिक तेल संकट निर्माण झाले होते या सर्व कारणांमुळे भारताची आर्थिक स्थिती खालावलेली होती. 25 जून 1975 ला आणीबाणी लागू झाली. 1977 जनता शासन मोराची देसाई यांच्या नेतृत्वाखाली शासन स्थापन केले गेले. 28 जुलै 1979 ला चरण सिंग, त्यानंतर 14 जानेवारीला 1980 ला इंदिरा गांधी पंतप्रधान पदावर आल्या, 31 ऑक्टोबर 1984 ला त्यांची हत्या झाल्यानंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले. त्यानंतर 1989 ला विश्वनाथ प्रताप सिंह, त्यानंतर 7 नोव्हेंबर 1990 ला पुन्हा विश्वनाथ विश्वनाथ प्रताप सिंह, 10 नोव्हेंबर 1990 चंद्रशेखर आणि 21 जून 1991 ला पी . व्ही. नरसिंह राव सत्तेवर आले. थोडक्यात 1977 ते 1991 या काळामध्ये 14 वर्षाच्या कालखंडात 7 पंतप्रधानांची नेमणूक झाल्याचे दिसून येते. देशातील राजकीय अस्थिरतेबरोबर जगातील काही घटना भारताच्या आर्थिक संकटाला निमंत्रण देणाऱ्या ठरल्या. रशियाचे विघटन झाल्याने येणारी रूपी ट्रेड क्रेडिट प्रवाह कमी झाला. पुढील आकडेवारी बघता तर भारताच्या आर्थिक संकटाची कल्पना सहज येईल केंद्र आणि राज्य सरकार यांच्या एकत्रित वित्तीय तुटीचे जीडीपी चे प्रमाण 1980- 81 मध्ये 9 टक्के होते ते 1985-86 मध्ये 10.4 टक्के आणि 1990 91 मध्ये 12.7 टक्के इतकी प्रचंड वाढली .

फक्त केंद्राच्या तुटीचे हे प्रमाण अनुक्रमे 6.1 टक्के ,8.6 टक्के आणि 8.4 टक्के असे धोकादायक झाले. सरकारची ही प्रचंड तूट भरून काढण्यासाठी सरकारला कर्ज घेणे भाग पडू लागले. सन 1981 मध्ये शासनाने देशांतर्गत कर्जाचे जीडीपी प्रमाण 35 टक्के होते ते 1990 91 मध्ये 53 टक्के पर्यंत वाढले. भारताजवळ जानेवारी 1991 ला विदेशी चलन गंगाजळी केवळ 1.2 अब्ज डॉलर्स इतके निम्न पातळीवर होते. विदेशी व्यापारातील तूट 1989 मध्ये 12400 कोटींची होती. ती 1990- 91 लाख 16900 कोटी पर्यंत वाढली परिणामी 1991 मध्ये 1 जुलै, 13 जुलै व 15 जुलै अशा तीन टप्प्यात 9 10 आणि 12 टक्के इतके अवमूल्यन करण्यात आले. 1988 मध्ये 9.4 टक्के भाववाढीचा दर 1991 ला 13.9% गेला. त्याचप्रमाणे या काळात देशाचा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर 6.5 वरून 5.5 इतका कमी झाला. 1990 या काळातील चालू खात्यावर वाढती तूट ,विदेशी कर्जावरील कर्जावरील वाढ आणि विदेशी चलन गंगाजळीत झालेली घट इत्यादीची परिणाम म्हणून विदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होऊन गुंतवणुकीत घट झाली.

अर्थात रुपयाचा विनिमय दर बाजारातील मागणी पुरवठ्यावर रिझर्व बँकेचे लक्ष असल्याने 1995- 96 पर्यंत रुपया बऱ्यापैकी स्थिर होता. पण 1997 चे आशियाई वित्तीय संकट आणि 1999 चे कारगिल युद्ध यामुळे रुपयावर दडपण आले तेव्हा आरबीआयच्या तत्पर नियंत्रणामुळे भारताला विनिमय संकट टाळता आले. मात्र डॉलरचा भाव 22 ते 32 वरून 2006 सातला ते 40 ते 45 पर्यंत पोहोचला त्यानंतर नियंत्रण काहीशी शिथिल करून रुपया डॉलर दर 45 वर स्थिरावला. तो 2011 पर्यंत जुलैपर्यंत. पण त्यानंतर रुपयाची घसरण सतत चालू राहून डॉलर 53 रुपयापर्यंत महागला.भाववाढीचा दर दोन आकड्यांनी वाढल्याने मार्च 2010 पासून आरबीआयने 13 वेळा रेपो रेट वाढवला. महागाई आटोक्यात आणण्यासाठी व्याजदरात वाढ केली गेली याचा परिणाम कर्जे महाग झाली त्यामुळे गुंतवणूक कमी होऊन 2011मध्ये उत्पादनात घट झालेली दिसून येते.

भारताची आयात निर्यातीपेक्षा नेहमीच जास्त दिसून येते. व्यापारशेषात सातत्याने तुट दिसून येते. देशाच्या क्रूड तेलाच्या मागणी पैकी जवळजवळ 80 टक्के तेल भारताला आयात करावी लागते. सन 2011 मध्ये गुंतवणुकीचे प्रमाण अधिक घटल्याने उत्पादन वृद्धीदरात घट झाली. जुलै, ऑगस्ट 2018 मध्ये देश 72 व्या स्वातंत्र्य दिन साजरा करण्याच्या तयारीत असताना परकीय चलन बाजारात ऐतिहासिक घटना घडली ती म्हणजे 14 ऑगस्टला अमेरिकी डॉलरच्या तुलनेत विनिमय दर 70.9 हा आकडा गाठला. आज 11 एप्रिल 2021 रोजी हा दर 74.73 इतका झाला आहे . जागतिक बाजारात खनिज तेलाचा भाव वधारला यामुळे व तेल आयातदारांकडून डॉलरची मागणी वाढल्याने रुपयाला झळ बसली. खनिज तेलाच्या घसरत्या किमतीना आळा घालण्यासाठी रशिया आणि सौदी अरेबिया तेलाचे उत्पादन मर्यादित करण्यावर एकमत झाले परिणामी तेलाच्या किमती वधारल्याने डॉलरची मागणी वाढली आणि डॉलरची मोठ्या प्रमाणात खरेदी केली 2018 नंतर रुपयाच्या बाबतीत निराशाजनक कामगिरी समजली जात आहे सध्या कोरोना या साथीच्या रोगाने जगात थैमान घातले आहे. यामुळे देखील निर्यात कमी आणि आयात जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे स्वातंत्र्या नंतरच्या काळातील रुपयाच्या घसरणीचा झालेला बदल पुढीलप्रमाणे दर्शवलेला आहे.

**स्वातंत्र्यानंतरचा काळातील रुपयाची घसरण**

| वर्ष | 1 डॉलरचे रुपयातील मूल्य |
|---|---|
| १९५० | ४.७६ |
| १९८० | ७.८६ |
| १९९१ | २२.७४ |
| २०१८ | ७०.०९ |
| ११ एप्रिल २०२१ | ७४.७३ |

वरील आकडेवारीचा विचार केला असता सन 2021 पर्यंत अमेरिकेच्या डॉलरच्या तुलनेत रुपयाची सातत्याने घसरण झालेली दिसून येते .1950 मध्ये डॉलरचा दर 4.7 तर होता तो 1991 पर्यंत 22.74 इतका झाला 2020 आणि सध्या एप्रिल 2021 मध्ये आहे तो 74.73 रुपयापर्यंत पोहोचलेला आहे याचे प्रमुख कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत डॉलरचा वाढतात दबदबा आहे जागतिक बाजारपेठेत जवळजवळ 65.63 टक्के व्यवहार हे अमेरिकन डॉलरमध्ये होतात. आपल्या देशातील डॉलरची गरज 80 टक्के इंधनाच्या आयातीवर भागवली जाते. आर्थिक आणि सामाजिक विकासावर सातत्याने वेळप्रसंगी परकीय कर्ज काढून खर्च करावा लागतो. देशाच्या आयातीत निर्यातीपेक्षा अधिक वाटा असल्याचं दिसून येतं सन 2018 मध्ये देशाची निर्यात 14 टक्के तर आयात 28 टक्के इतकी होती म्हणजे निर्यातीपेक्षा आयात ही दुप्पट आहे आणि त्यामुळे व्यापारात सातत्याने तूट निर्माण होत आहे गेल्या पाच वर्षात अठरा अब्ज डॉलरची उच्चांकी पातळी तुटीची दिसून येते अर्थात ही रुपयाच्या घसरणीचे कारण असू शकत.

**रुपयाच्या घसरणीचे परिणाम**

आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या ताळेबंदाततील मूलभूत असमतोल नाहीसा करण्यासाठी निर्यातीत वाढ करण्यासाठी व आयात घट करण्यासाठी योजण्यात येणारे अनेक उपाय जे असतात त्यासाठी अवमूल्यन हा एक दीर्घ परिणाम कारक उपाय मानला जातो. रुपयाची घसरण म्हणजे इतर विदेशी चलनाच्या तुलनेत रुपयाचे मूल्य कमी होणे व परिणामी अमेरिकन डॉलर किंवा युरोप तसेच ब्रिटिश पाउंड ही चलने आपल्याला जास्त किमतीला प्राप्त होणे याला आपण रुपयाचे अवमूल्यन

असे म्हणू शकतो अथवा रुपयाची घसरण असे म्हणू शकतो. थोडक्यात विदेशी चलन यासाठी आपल्याला जास्त पैसा मोजावा लागतो विनिमय दरातील चढ उतारांचा परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर व पर्यायाने आपल्या दैनंदीन जीवनावर होतो रुपयाचे मूल्य वाढल्यास आयात स्वस्त होते. भारताने घेतलेल्या ले परदेशी कर्जाची परतफेड व त्यावरील व्याज विदेशी चलनात दिली जाते विदेशी चलन महाग होते त्यावेळी कर्जाच्या परतफेडीसाठी आपल्याला अधिक रक्कम मोजावी लागते मात्र रुपयाचे मूल्य कमी झाल्याने निर्यात स्वस्त होते परिणामी निर्यात वाढणे आवश्यक असते पण निर्यात न वाढल्यामुळ या रुपयाच्या घसरणीचा परिणाम देशाच्या परकीय चलनाच्या गंगाजळीवर होतो विनिमय दर नियंत्रित करण्यासाठी ही गंगाजळी वापरली जाते अर्थात परदेशी चलन साठा कमी होतो

रुपयाच्या घसरणीचा या विविध परिणामामुळे रुपयाचे मूल्य स्थिर राखण्याची गरज असते ते काम मध्यवर्ती बँक करीत असते याची कार्य आपल्या देशात रिझर्व बँक ऑफ इंडिया मार्फत केली जाते. या बँकेकडून परकीय चलनाच्या मागणी-पुरवठा ची व्यवस्थापन केले जाते मागणी वाढल्यास विनिमय दर वाढत असेल तर रिझर्व बँक विदेशी चलन मुख्यत्वे डॉलर बाजारात विकून त्याचा पुरवठा वाढवते आणि याउलट पुरवठा वाढल्यास विदेशी चलनाची खरेदी करून बाजारातील मागणी वाढवते आणि परिणामी चलन दर स्थिर ठेवते. 1993 पर्यंत रिझर्व बँकेकडून निश्चित केला जात होता पण त्यानंतर भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यामुळे रुपया हा परिवर्तनीय ठेवला गेला अर्थात विनिमय दर अथवा चलनाचे मूल्य हे बाजारातील मागणी पुरवठा वरून निश्चित करण्याच्या धोरणाला सरकारने पाठिंबा दिला आणि त्या वेळेपासून बाजारावर आधारित व मागणी पुरवठा वर आधारित चलन चलनाचा दर निश्चित होत आहे

समाजात आज चैनी करणारा मोठा वर्ग निर्माण झाला आहे त्यापैकी काही कडे अतोनात पैसा झालेला आहे आणि अशा मुळे चैनीच्या वस्तू मोठ्या प्रमाणात बाहेरच्या देशातून आयात होऊ लागलेले आहेत. निर्यातीसाठी फार प्रयत्न कमी होत आहेत रुपयाचे मूल्य घसरले आहेत निर्यातीला चांगले स्थान आहे निर्यातीसाठी संधी आहे तरीसुद्धा त्या पद्धतीने निर्यात आपल्या देशातून होत नाही काही सुधारणा झालेल्या नाहीत .निर्यातभिमुक उद्योगांना पाठिंबा भारत सरकार देत आहे मात्र सरकारचे प्रयत्न सुद्धा अपुरे पडत आहेत आणि त्यामुळे सातत्याने डॉलरची मागणी वाढत चाललेले आणि रुपयाचा दरामध्ये रुपयाच्या मूल्यामध्ये सातत्याने घसरण होत चाललेले आहे शेवटी असे म्हणता येईल की स्वदेशी वस्तू वापरावर आपण भर देणे गरजेचे आहे ग्रामीण उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे आणि त्यातून आयात कमी करणे आणि निर्यात वाढवणे यातून आपण आपल्या चलनाचे अवमूल्यन टाळून रूपया भक्कम करू शकतो. शेवटी ज्या भारतीय रुपयाने घोडदौड सुरू केली. शेरशहासुरीने रुपयाला सर्वसामान्यांच्या खिशाला पर्यंत पोहोचवलं आणि जेम्स प्रिन्सेसणे त्याला रूप दिलं तो रुपया येणाऱ्या काळात प्रभावशाली होओ ही आशा व्यक्त करतो. धन्यवाद...

संदर्भ

1. भारतावरील आर्थिक संकट--- महाराष्ट्र टाइम्स २०१७
2. रुपया सशक्त कसा होईल ---आसावरी बापट महाराष्ट्र टाइम्स
3. बापट असा वरील कृपया सशक्त कसा होईल महाराष्ट्र टाईम्स 12 जानेवारी 2012
4. शंकर भणगे रुपयाचे अवमूल्यन प्रकाशन महाराष्ट्र ग्रंथ भांडार कोल्हापूर
5. भारतीय अर्थव्यवस्था दत्त सुंदरम २०१६
6. www.bookmyforex.com
7. Various internet sides on google

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021,
Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण

*हर्षदा सुरेंद्र गुरव*
*संशोधक विद्यार्थी, एम ए भाग-1, गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी.*

**गोषवारा**

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये लोकसंख्येच्या बाबतीत महिलांचा जवळजवळ निम्मा वाटा आहे.त्यामुळे त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात बाहेर ठेवणे योग्य हितकारक ठरेल. देशातील निम्मी लोकसंख्या आणि अज्ञानी आणि अशिक्षितपणाचा गर्तेतून बाहेर काढून देशातील समस्त महिलांना सत्ता संपत्ती आणि संधीची समानता देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे काळाची गरज बनली आहे.देशातील ग्रामीण भागातील महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा गरीब अज्ञानी अशिक्षित अंधश्रद्धा आणि दडपशाही घाली जीवन जगणारे असा घेतला जातो.त्याचबरोबर त्यांच्याकडे कौशल्य असे प्रमाण कमी असल्यामुळे शहरी भागातील महिलांच्या तुलनेत विकास झालेला दिसत नाही. तसेच ग्रामीण भागातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे मालमत्ता आणि व्यवसायाची मालकी त्यांच्याकडे कमी प्रमाणामध्ये असल्याचे दिसते. ग्रामीण भारताच्या विकासासाठी ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण महत्त्वाचे आहे.

**बीज शब्द -** ग्रामीण महिला, सक्षमीकरण.

**प्रस्तावना**

_विकसनशील देशांचा विकास आणि महिलांचा विकास यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे.एकूण लोकसंख्या मध्ये जवळजवळ महिलांची संख्या ही निम्मी आहे. महिला सबलीकरण यासाठी केंद्र शासन आणि राज्य सरकार सातत्याने प्रयत्न करत आहेत. महिलांना त्यांचे हक्क आणि अधिकार यांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. महिलांना त्यांचे मूलभूत हक्क व अधिकार प्राप्त करून देण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी घटनात्मक कायदे तयार करण्यात आलेले आहेत. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनविणे, आर्थिक व्यवहार आणि संपत्ती मध्ये सहभागी करून घेणे घेणे अशा स्वरूपाची काही उद्दिष्ट महिला सबलीकरणासाठी आवश्यक आहे. ग्रामीण भागातील महिला या असंघटित आहेत. त्यांच्यामध्ये प्रतिनिधित्व करण्याची क्षमता कमी असल्याचे दिसून येते. घरगुती निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये अल्प प्रमाणात आहे. ग्रामीण भागातील महिला सक्षम व्हाव्यात या दृष्टिकोनातून शासकीय पातळीवर विविध उपाययोजना करण्याचा प्रयत्न चालू आहे.ग्रामीण भारताच्या विकासासाठी ग्रामीण महिलांचे आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय सक्षमीकरण होणे आवश्यक आहे.

**उद्दिष्टे**

- महिला सक्षमीकरण या संकल्पनेचा अभ्यास करणे.
- ग्रामीण महिला सक्षमीकरणाची गरज या संकल्पनेचा अभ्यास करणे.
- महिला सक्षमीकरणाचे सकारात्मक परिणाम अभ्यासणे.

**गृहितके**

- ग्रामीण भागातील महिला पूर्णपणे सक्षम नाही.
- भारतामध्ये महिला सक्षमीकरण पुरेपूर झालेली नाही.

**संशोधन पद्धती:-** द्वितीय माहितीच्या आधारावर हे संशोधन पूर्णपणे आधारलेले आहे इंटरनेटवरील माहितीचा आधार घेऊन हा संशोधन पेपर तयार केलेला आहे.

**व्याख्या**

- सत्तावंचित संधीवंचित महिलांना कोणत्याही भावा शिवाय प्रगती करण्याची संधी देणे म्हणजे महिला सक्षमीकरण होईल.
- महिला सक्षमीकरण म्हणजे दुर्बलता नष्ट करणारी स्त्रीच्या शरीर मानव बुद्धीमध्ये स्वत्वाची जाणीव व स्वतःबद्दल जागरूकता निर्माण करणारी व त्या दृष्टीने स्वयम् विकासासाठी प्रवृत्त करणारी एक संकल्पना होय.
- महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रीचे व्यक्तिमत्व एक माणूस म्हणून व्यक्ती म्हणून विकसित करणे आणि त्यांना समान संधी देणे फुल.

**महिला सक्षमीकरण म्हणजे काय ?**

महिलांना स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत .त्यासाठी तिच्या अंतर्मनातून येणारा आत्मविश्वास आणि धाडस हे तिल पाठबळ देत आहेत. आजही जगातील महिलांना विविध क्षेत्रांमध्ये जसे की सामाजिक, धार्मिक विधी शैक्षणिक ,आर्थिक व सांस्कृतिक अशा प्रत्येक क्षेत्रामध्ये निर्णय घेताना त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. महिला सक्षमीकरणात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तिला माणूस म्हणून जगण्याची संधी देऊन तिला तिचे व्यक्तिमत्व विकसित करण्यास समाजातून प्रोत्साहन मिळावे .महिला सक्षमीकरणाचा अर्थ महिलांना भीक नको आहे कोणाची दया नको आहे तर त्यांनाही पुरुषांप्रमाणे समान संधी हवी आहे आणि यासाठीच महिला सक्षमीकरण महत्त्वाचे ठरते. पावलो फ्रीरे यांनी सर्वप्रथम ही संकल्पना उपयोगात आणली महिलांना सबला करणे आणि त्यांना समान हक्क व संधी देणे हे यामागील तत्त्व आहे .मानवी हक्कांविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करण मध्ये मान्यता मिळूनही स्त्रिया निर्णय आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सामाजिक शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.

**<u>ग्रामीण महिला सक्षमीकरणाची गरज</u>**

देशातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. निश्चितचजागतिकीकरणामुळे शहरी महिलांना शिक्षण आणि रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आणि पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क विकसित करण्यास व त्यांच्या ताब्यात घेण्यास त्यांना मदत झाली. परंतु ग्रामीण महिला असूनही शिक्षण सामाजिक ऊर्जा आर्थिक पार्श्वभूमी राजकीय बाबी इत्यादी बातमीमध्ये मागासलेल्या आहे .त्यामुळेच देशाच्या विकास कार्यात ग्रामीण भागातील स्त्रियांना समाविष्ट केले जात नाही. ग्रामीण भागातील महिला मुलांचे पालन-पोषण आणि संगोपन यामध्ये व्यस्त असतात कौटुंबिक कामकाजामधून त्यांना फारसा वेळ मिळत नाही. ग्रामीणमहिलांना त्यांचे मूळ ज्ञान कौशल्य आणि लघु व्यवसाय निर्मितीसाठी सक्षम बनविणे आवश्यक आहे .ग्रामीण महिलांचे कौटुंबिक आणि समाजातील योगदान यामध्ये मोठा वाटा आहे परंतु असे असले तरी त्यांना विकासाच्या संधी मध्ये अतिशय अल्प वाटा मिळतो. बहुतेक वेळा त्यांना शिक्षण चांगल्या नोकऱ्या राजकीय व्यवस्थेमध्ये सहभाग आणि चांगली आरोग्य सेवा घेण्यापासून वगळले जाते.त्याशिवाय त्यांना शारीरिक मानसिक राजकीय आणि सांस्कृतिक अडथळयांचा सामना करावा लागतो., की जे त्यांच्या सक्षमीकरणासाठी अडचण निर्माण करतात ग्रामीण महिलांचे सबलीकरण ही काळाची गरज आहे. ग्रामीण स्त्रिया प्रगतीच्या खूपच मागच्या ओघा मध्ये राहिलेल्या आहेत. त्यांना प्रगतीच्या प्रवाहामध्ये आणणे खूपच महत्त्वाचे आहे.

**<u>ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण</u>**

भारतातील ग्रामीण भागातील बहुसंख्य महिला घर कामातच गुंतलेले असतात. कोणत्याही व्यक्तीला समाजामध्ये माणूस म्हणून जगायचे असेल तर स्वावलंबन आवश्यक आहे.स्वयंरोजगार, अर्थसहाय्य याचा अभाव विनावेतन काम व बेरोजगारी कुटीर उद्योगात मालकी हक्क नाही अशा अनेक कारणांमुळे स्त्रीचे आर्थिक स्थान पुरुषांपेक्षा दुय्यम राहिलेले आहे.ग्रामीण महिलांच्या एकत्रीकरणासाठी आणि सेवा एकत्रित करण्यासाठी त्यांच्या क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या आधारभूत उपायांसह अनेक आर्थिक आणि सामाजिक पर्यायांची ऑफर देऊन त्यांच्यासाठी पावले उचलली पाहिजेत.महिलांची क्षमता वाढविण्यासाठी आणि त्यांना सकारात्मक सामाजिक आणि आर्थिक परिणामांची पूर्तता करण्यासाठी रणनीती आखल्या गेल्या पाहिजेत.महिलांना मृदा संवर्धन, सामाजिक वनीकरण, दुग्धविकास आणि इतर व्यवसायांमध्ये लहान पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्य पालन यासारख्या शेतीशी संबंधित असलेल्या इतर व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याचे कार्यक्रम कृषी क्षेत्रातील महिलांसाठी केले पाहिजेत.महिलांना आर्थिक अधिकार मिळवून देऊन त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम केले पाहिजे उत्पादन प्रक्रियेमध्ये त्यांना सहभागी करून घेतले पाहिजे या गोष्टी केल्या तरच राष्ट्राचा विकास होईल.

**<u>राजकीयदृष्ट्या ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण</u>**

ग्रामीण महिलांनी पुरुषांच्या तुलनेत समान स्तरावर आणण्यासाठी सबलीकरणाची नवीन संरक्षक शक्ती व सामर्थ्य देणे गरजेचे आहे. राजकीय स्तरावर निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग काढल्यास राजकारणामध्ये बदल होईल. तसेच राजकारणाला नवी दृष्टी मिळेल आणि राजकारणात संस्थात्मक बदल देखील घडतील.शिक्षणाचा अभाव

राजकारणाकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन महिलाची कुटुंबाप्रती असणारी जबाबदारी या परंपरेमुळे तसेच मानसशास्त्रीय दृष्ट्या स्त्री राजकारणापासून उदासीन राहते.

**शिक्षणाद्वारे ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण**

महात्मा फुले म्हणतात की, "घरातील एक माता पूर्ण शहाणी झाली तर सर्व कुटुंब शहाणे होईल सगळ्या स्त्रिया शिकल्या की सर्व देश जागा होईल" असा विचार करूनच महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. शिक्षणामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा व संयुक्तपणे विचार करण्याचा व्यक्तीच्य बौद्धिक शक्तीचा विकास होतो. ग्रामीण समाजातील स्त्रियांचे स्थान बदलण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण आम्ही अर्थव्यवस्थेवर,मानवी जीवनावर तसेच राजकीय व्यवस्थेवर त्याचे अनेक सकारात्मक परिणाम दिसून येतील.

**निष्कर्ष**

सदर प्रकल्पात ग्रामीण महिला सक्षमीकरणाची गरज या विषयाचा अभ्यास केल्यावर पुढील निष्कर्ष मिळतात.

- ग्रामीण महिलांना सक्षम करूनच समाज आणि राष्ट्र बलवान करू शकतो.
- महिलांचा सहभाग त्यांना संरक्षण त्यांची आर्थिक उन्नती त्यांच्या शब्दांचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरणाची निर्मिती करावी लागणार आहे.
- 21 व्या शतकातील आधुनिक समाजाने ग्रामीण स्त्रियांकडे निखळ दृष्टीने पाहायला हवे.
- स्वामी विवेकानंद म्हणतात, अगदी तसेच "स्त्रियांची स्थिती सुधारल्याशिवाय जगाच्या कल्याणाची शक्यता नाही" हे खरे ठरते.

**सारांश**

देशातील कोणत्याही समुदायाचा विकास सुनिश्चित करण्यासाठी महिला स-शक्तिकरण किंवा सक्षमीकरण आवश्यक आहे.देशातील महिलांना मुख्य प्रवाहात आणणे आणि राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेमध्ये यांचा सहभाग वाढवणे ही शासनाची प्रमुख चिंता आहे.सर्व प्रकारचे कायदे व योजना असूनही नियोजन व विकासाच्या सरकारी योजना महिलांपर्यंत पोहोचण्यात अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर योजनांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. देशातील आर्थिक व पायाभूत सुविधांची उपलब्धता यांचा शैक्षणिक स्तर, राजकारणातील त्यांची आवशक्यता यांच्यातील व्यापक अंतर लक्षात घेऊन महिलांचे सबलीकरण किंवा सक्षमीकरण होणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

- इंटरनेट
- Www.loksatta.com – प्रा आशिष सुधाकर थोरात.

# पूर्व विदर्भातील स्वदेशी आंदोलन

*डॉ.गजानन बापुराव ठाकरे*

*मंगलधाम, हुडको कॉलनी मंगरुळपीर जि. वाशिम*

इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी भारतीय क्रांतीकारकांनी व जनतेने अनेक आंदोलने केलीत. त्यामधील स्वदेशी आंदोलन हे एक अत्यंत महत्वाचे आंदोलन होते. स्वदेशी आंदोलन हे टिळक युगातील महत्वांचे आंदोलन होते.या आदोलनात भारतीय जनतेने मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.स्वदेशी आंदोलत विदर्भातील जनतेने सक्रीय सहभाग घेतला. पुर्व विदर्भातील नागपुर, वर्धा, चंद्रपुर,भंडारा या जिल्ह्यातील जनतेने स्वदेशी आंदोलनास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. अनेक ठिकाणी स्वदेशी वस्तु भांडारे व कापड दुकाने सुरु झालीत. काही ठिकाणी परदेशी कापडाच्या होळया करण्यात आल्या. स्वदेशी आंदोलनादरम्यान राष्ट्रीय शाळाच्या स्थापनासुध्दा करण्यात आल्या.

**1906 चे कलकत्ता अधिवेशन व स्वदेशी आंदोलन :-**

कॉंग्रेसने स्थापना झाल्यापासुन राष्ट्रीय जागृतीचे कार्यजोमाने केले होते पण राष्ट्रीय चळवळ आतापर्यंत त्यांनी उभारली नव्हती.कॉंग्रेसचे संस्थापक सर ॲलन ह्युमन यांनी कॉंग्रेसला याबाबतील विचारणा करतांना म्हटले - तुम्ही कॉंग्रेसमध्ये वर्षातुन एकदा एकत्र येता, क्षणिक उत्साहाचा झगमगाट पाडता, वक्तृत्वात फवारे उंच उंच सोडता आणि कॉंग्रेस (अधिवेशन ) समाप्त होते व प्रत्येक जण आपआपल्या घरी घरगृती कामे करण्यात वर्षभर चुर होता. तुम्ही राष्ट्रीय स्वातंत्र्यसाठी कोणते दिव्य करण्यास तयार आहात ?[1] सर ह्युम यांच्या या प्रश्नाने प्रभावित होऊन 1995 च्या वाराणसी येथिल अधिवेशनात त्यागाचे आवाहन करण्यात आले होते.1906 चे कलकत्ता येथिल आधिवेशन दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. अध्यक्षपदासाठी दादाभाई यांचे नांव सुरेंद्रनाथ यांच्या मवाळ गटाने सुचविले तर टिळक बिपिनलाल यांच्या जहाल गटाने ते मान्य केले.[2] या अधिवेशनासाठी नागपुर प्रांतातून 90 प्रतिनिधी गेले होते या अधिवेशनात स्वदेशी, बहिष्कार स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री मान्य करण्यात आली.[3] अधिवेशनाचे अध्यक्ष श्री दादाभाई नौरोजी यांनी आपल्या अध्यक्षिय भाषणातून स्वावलंबनाशिवाय तराणोपाय नाही आणि स्वराज्य मिळाविल्या शिवाय गत्यंतर नाही. हा सिध्दांत जाहिरपणे मांडून मवाळांना धक्का दिला तर जहालांच्या आकांक्षांना उजाळा दिला.ते पुढे म्हणाले मी इंग्रजांची आर्जव व समजूत करता करता काळयाचा पांढरा झालो आहे. माझी निराशा इतकी झाली आहे की मी तरुण असतो तर इंग्रजाविरुध्द वंडच केले असते. हिंदुस्थानाचे आपले ध्येय आता ' स्वराज्य हेच ठेवावे.हिंदुस्थानच्या बहात्तर रोगांवर ' स्वराज्य ' हिच एकमेव मात्रा आहे.[4] या अधिवेशनात लोकमान्य टिळकांना पाहिजे तसे ठराव पास होऊन दादाभाई नौरोजी यांनी स्वराज्याची घोषणा केली.[5] 1906 चे कलकत्ता अधिवेशन कॉंग्रेसच्या इतिहासात युगप्रवर्तक ठरले.या अधिवेशानाने अर्ज विनत्यांचे युग संपून टिळकांनी वर्षभर कार्यशील असणारी घटनाबध्द कॉंग्रेस सुरु झाली. या अधिवेशनातून स्वराज्य , स्वदेशी राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार हा अभिनव मंत्र घेऊन वंदे मातरमचा घोष करीत भारत देश स्वातंत्र्याची वाटचाल करण्यात प्रेरीत झाला.[6]

लोकनायक अणे यांचा जहाल प्रचार :-

लोकनायक अणे यांनी त्यांच्या लेखनातुन जहाल विचारसरणीचा प्रसार केला. लोकनायक अणे यांनी लेखांची एक लेखमालाच लिहिली. ती लेखमाला 13 मे ते 08 जुलै 1977 या कालावधीत यवतमाळ येथिल हरिकिशोर या जहाल साप्ताहिकांत प्रसिध्द झाली. अणे यांनी प्रथम लेखात 'भिंक्षा देहि ' च्या मार्गाने काहीही होणार नाही व स्वराज्य मिळणार नाही हे स्पष्ट केले. दुसऱ्या लेखात राष्ट्रोन्नतीचे मार्ग स्पष्ट करतांना त्यांनी म्हटले की सत्ताधाऱ्याच्या उन्ममत्तेचा समुचितप्रकारे प्रतिकार करावयास हवा. तिसऱ्या लेखामधुन स्पष्ट होते की, लोकनायक अणे यांना लोकांमध्ये ' पुर्ण स्वातत्र्य ' हे मध्य ध्येय निर्माण व्हाव असे प्रकर्षाने वाटत होते. तसेच या लेखात पुढे ते जहाल शब्दाद्वारे स्पष्ट करतात की, इंग्रज सरकारच धोरण हे जळुप्रमाणे रक्त शोषण करुन या देशाला मृत्यूच्या जबडयात लोटून देण्याचे आहे. या धोरणास दूर करण्यासाठी राजसत्ता लोक मतानुयायी व्हावयास हवी. तेव्हा हे शोषण बंद होईल. लोकनायक अणे यांनी आपल्या विविध लोखामधून आपल्या जहाल विचारसरणीचा प्रसार केला.त्यांच्या लेखामध्ये मवाळ माणूस जहाल व्हावा असा

प्रभाव होता.तसेच त्यांनी इंग्रज सरकारच्या अत्याचारांचा व दडपशाहीचा निषेध करण्यासाठी उपाय सुचविले. लोकनायक अणे यांनी आपल्या लेखातुन जनतेला ' ठोशास ठोसा ' या प्रमाणे आचरण करा  असा आदेशच दिला. तसेच अणे स्पष्ट करतात की, अहिंसेच्या नावावर वाटेल तसे जुलूम सहन करणे विदर्भाला मान्य नाही. तसेच आपल्या लेखामधून स्वदेशी चळवळीचा प्रसार करतांना ते म्हणतात की, राष्ट्रोध्दार हा एक फार मोठा राजसूय यज्ञ आहे. स्वदेशी, बहिष्कार , राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही या यज्ञाची मुख्य अंगे आहेत. देवतांना सोमरस पाजुन अद्‌भुत स्नानानंतर आम्हाला त्यांचेकडून स्वातंत्र्यरुपी फळ मिळवायचे आहे. या यज्ञकुंडाल भडकणाऱ्या 'चतु:श्रृगे सप्ताजिव्हा 'अंग्निनारायणाच्या तुष्टीसाठी आपल्याजवळील सर्व धन संपत्तीचे समर्पण केले पाहिजे. इतकेच नव्हे तर आम्हाला जे जे प्रिय असेल त्या सर्वाची आहुती दिली पाहिजे. जर शेवटी आवश्यकता भासली तर आपल्या प्राणांची आहुती देऊन या यज्ञाची समाप्ती केली पाहिजे.लोकनायक अणे यांनी त्यांच्या लेखातुन भारतीय जनतेला स्वातंत्र्य करण्यासाठी प्रवृत्त केले.[7]

स्वदेशी आंदोलनात पूर्व विदर्भाच्या नागपुर, वर्धा, चंद्रपुर,व भंडारा या जिल्ह्यातील जनतेने मोठ्या प्रमाणासत सहभाग घेतला.

नागपुर जिल्ह्यातील स्वदेशी आंदोलन :-

**1905** च्या बनारस येथिल कॉग्रेस बनारस येथील कॉग्रेस अधिवेशनात नागपूरचे डॉ.मुंजे, डॉ.लिमये,खापर्डे,लोकनायक अणे हे उपस्थित होते. या अधिवेशनात  भारत दौऱ्यावर आलेलया युवराजाच्या स्वागताविरोधाचा व बहिष्काराचा मार्ग स्विकारावा असे ठरले. त्यात नागपूर व अमरावतीचे डॉ.मुंजे , डॉ.लिमये, दादासाहेब खापर्डे यांचा मोलाचा वाटा होता.या अधिवेशनात ना.गोखले यांनी सुध्दा स्वदेशीचे सर्मथन केले.[8] डॉ.मुंजे यांनी नागपूरला दोन  स्वदेशी दुकाने काढली.[9] तसेच खापर्डे यांनी स्वदेशी आंदोलन तीव्र करण्यासाठी अमरावती सोबतच नागपूर केद्रसुध्दा निवडले होते.[10] नागपूर मध्ये स्वदेशी आंदोलनाचा प्रभावा वाढविण्यासाठी डॉ.खानखोजे यांनी व्याख्यानमालांचा प्रारंभ केला. तसेच नरकेसरी अभ्यंकर, सप्रे, खरे, डॉ.हेडगेवार, गणू जोशी यांनी नागपूर प्रांतात स्वदेशीचा जोमाने प्रचार केला होता.[11]

नागपूर जिल्ह्यात स्वदेशी आंदोलन यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. जिल्ह्यातील विद्यार्थी वर्गाने स्वदेशीच्या प्रचाराचे कार्य हाती घेतले. नागपूरमधील भाऊसाहेब दुलारी, जयकृष्ण उपाध्ये,भवानीशंकर योगी, भंडाराचे पंढरपुरकर व  बापट, आर्वीचे रामभाऊ श्रोती या विद्यार्थीनी स्वदेशी प्रचार आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला.डॉ.पा.स.खानखोजो व रामलाल बाजपाई हे क्रातीकारक विद्यार्थी होते. नागपूर मध्ये डॉ.खानखोजे आणि  श्री उपाध्ये  यांच्या नेतृत्वात क्रांतीकारी तरुणांचे संघटन स्थापन झाले. तसेच लोकमान्य टिळकाच्या आवाहनानुसार शिवजयंती व सार्वजनिक गणेशोत्सव या कार्यक्रमांना नागपूरमध्ये प्रारंभ झाला होता. त्यावेळी नागपूर प्रांतात विद्यार्थ्यांच्या **34** शाखा कार्यकरीत होत्या.[12] राष्ट्रीय कार्याची जाणीव असलेल्या निलसिटी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वदेशी आंदोलनाच्या प्रचारासाठी व आंदोलन यशस्वी करण्यासाठी सर्वस्व: अर्पण केले. या काळात नागपूरमध्ये अनेक संस्था व क्लव स्थापन झाले.नागपूरच्या विद्यार्थांना लोकमान्य टिळकांचे सतत मार्गदर्शन मिळाल्याने तसेच विद्यार्थी सतत टिळकांच्या संपर्कात राहतअसल्याने या विद्यांमध्ये राष्ट्रभावना मोठ्या प्रमाणात जागृत झाली होती.[13]

भंडारा जिल्ह्यातील स्वदेशी आंदोलन:-

भंडारा जिल्ह्यात रघुनाथ रामचंद्र पाठक यांनी जोमाने स्वदेशी आंदोलनाचा प्रचार केला.त्यांना लोक भंडारा जिल्ह्यांचे गांधी असे म्हणत. स्वदेशी चळवळीच्यावेळी पाठक ' मंरो हायस्कुल ' चे विद्यार्थी होते. पाठक यांनी त्या शाळेत दिलेले प्रभावी भाषण सर्वाच्या आठवणीत राहिले. त्यांनी भाषणात तळमळीने सांगीतले होते. ' इंग्रजांपासून मुक्त होण्याची प्रतिज्ञा करा.'[14] **1906** च्या कलकत्ता अधिवेशनाला भंडारा जिल्ह्यातील तेजासिंह व कृष्णाजी फडके हे दोन शिक्षक उपस्थित होते. श्री अरविंद घोष यांनी **1907** मध्ये जहाल तत्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी नागपूरमध्ये घेतलेल्या सभांमुळे भंडाऱ्यातील श्री पुरुषोत्तम देव आणि श्री निळकंठ बुचे हे युवक प्रभावित होऊन त्यांनी जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात जहाल तत्वज्ञानाचा जोमाने प्रचार केला. त्यानंतर भंडारा जिल्ह्यात अनेक ठिकाणी शिवजयंती व

गणेशोत्सव उत्साहाने साजरे होऊ लागले.15 तसेच कलकत्ता अधिवेशनास उपस्थित असेल्या भंडाराच्या तेजसिंह व कृष्णाजी फडके या दोन शिक्षकांनी परत आल्यानंतर जनतेमध्ये राष्ट्रभावना जागृत करण्याचे कार्य केले.तसेच त्यांनी साखरेवर बहिष्कार घाला असा प्रचार देखील केला. या दोघांना भाषणे दिल्याबद्दल 7 दिवसाच्या शिक्षा झाल्या व त्यांच्या शाळादेखील बंद पाडण्यात आल्या.-16

चंद्रपुर जिल्ह्यातील स्वदेशी आंदोलन :-

लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी, बहिष्कार, स्वराज्य व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा प्रसार चंद्रपूर जिल्ह्यात करण्याचे कार्य जिल्ह्यातील निळकंठराव सदाफळे, दाजी गणेश देवईकर, श्री बळवंतराव देशमुख व दाजीशास्त्री चांदेकर या नेत्यांनी केले. या नेत्यांच्या प्रयत्नाने जिल्ह्यातील जनतेमध्ये राष्ट्रभावना जागृत होऊन सर्वत्र वंदेमातरमचे घोष, बहिष्कारांच्या होळया,स्वदेशी वस्तुंची दुकाने, राष्ट्रीय उत्सव सुरु झाले. वरोरा येथे श्री सदाशिवराय काकडे यांनी भाषणे देऊन जनजागृतीचे कार्य केले.1907 साली चंद्रपूर येथे महाकालीच्या आवारात कै.दाजी गणेश देवईकर यांच्या अध्यक्षतेखाली लोकनायक अणे यांचे भाषण झाले. इंग्रज सरकारच्या या भाषणाबद्दल लोकनायक अणे यांच्या खटला भरण्याचा विचार होता. पण बळवंतराव देशमुख यांनी लोकनाक अणे यांना समर्थन दिल्याने तो प्रसंग टळला. बालगोविंद, दाजीसाहेब देवईकर यांनी आपल्या व्याख्यानांद्वारे जनतेमध्ये स्वदेशी चळवळीचा प्रचार करण्याचे कार्य केले.सरकारने निर्बंध लादुनही चंद्रपूरच्या जनतेचे न घाबरता बंगालच्या फाळणीचा निषेध केला.-17

वर्धा जिल्ह्यातील स्वदेशी आंदोलन :-

वर्धा जिल्ह्यातील जनतेने देखील स्वदेशी आंदोलनास सक्रीय प्रतिसाद दिला. वर्धा जिल्ह्यातील पांडुरंग खानखोजे, शंकरराव उपदेव, त्र्यंबकराव देशपांडे, शंकरराव वसु, हिंगणीचे दादासाहेब सुभेदार, दामोदर देशपांडे, नारायण घोपडे, तुकारामपंत वसु या नेत्यांनी स्वदेशी चळवळीत प्रकर्षाने भाग घेतला होता.18 तसेच डॉ.पांडुरंग खानखोजे यांनी स्वदेशी आंदोलन चालविण्यसाठी केलेल्या कार्याचे वर्णन स्वत : केले आहे. ते म्हणतात- काळया कांबळीच्या टोप्या,हाताने तयार केलेले लिफाफे, विणकरांनी विणलेले हातमागाचे कापड, साबु इत्यादी वस्तु तयार करुन विकण्यात येत असे. बंगालचे आंदोलन आमचे आंदोलन होते आम्ही विदेशी कापडाची होळी करीत होतो.19

स्वदेशी आंदोलनाचे विदर्भावर फार मोठे परिणाम झालेत. स्वदेशी आंदोलनाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी पैशाची आवश्यकता होती. त्यासाठी ' पैसा फंड ' ही आर्थिक योजना राबविण्याता आली . स्वदेशी आंदोलनादरम्यान जनजागृतीचे कार्य विदर्भातील देशसेवक, हरिकिशोर हिंदी केसरी या वृत्तपत्रानी केले. केसरी या वर्तमानपत्रामुळे विदर्भात स्वदेशी आंदोलनाचा जोमाने प्रचार झाला.तद्वतच विदर्भातील विद्यार्थ्यांनी स्वदेशी आंदोलनास मोठ्या प्रमाणात प्रतीसाद दिला. या विद्यार्थांना शाळांमधून काढून टाकण्यात आल्याने त्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्याकरीता राष्ट्रीय शाळांची स्थापना करण्यात आली.

संदर्भ ग्रंथ सूची

1. शनिवारे,गो.सी- कथा कॉंग्रेसची गाथा स्वातंत्र्याची, पृष्ठ क्र.51
2. उदासी,बि.ना.- अकोला दैनिक मुद्रिका- स्वातंत्र्य संग्राम विशेषांक, डिसेंबर 1985, पृष्ठ क्र.44
3. कानेटकर, मा.ज.-कॉंग्रेस सुवर्ण ज्युबिली,नागपूर प्रातांचा इतिहास,1935,पृष्ठ क्र. 47
4. शनिवारे,गो.सी- कथा कॉंग्रेसची गाथा स्वातंत्र्याची, पृष्ठ क्र 52
5. कानेटकर, मा.ज.-कॉंग्रेस सुवर्ण ज्युबिली,नागपूर प्रातांचा इतिहास,1935,पृष्ठ क्र.48
6. शनिवारे,गो.सी- कथा कॉंग्रेसची गाथा स्वातंत्र्याची, पृष्ठ क्र.53
7. वक्काणी ,डॉ.नि.आ.- आधुनिक विदर्भाचा इतिहास,श्री मंगेश प्रकाशन नागपूर,2003,पृष्ठ क्र.46,47
8. अंधारे डॉ.भा.रा.-आधुनिक नागपूर (1854-2002), हिंदी मराठी प्रकाशन,2014-15, पृष्ठ क्र.111
9. कोलारकर, डॉ.शं.गो.-आधुनिक विदर्भाचा इतिहास,श्री मंगेश प्रकाशन नागपूर, 2003 पृष्ठ क्र.34
10. वक्काणी ,डॉ.नि.आ.-आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर,2003,पृष्ठ 33

11. कोलारकर, डॉ.शं.गो.-आधुनिक विदर्भाचा इतिहास,श्री मंगेश प्रकाशन नागपूर, 2003 पृष्ठ क्र.34
12. अंधारे डॉ.भा.रा.-आधुनिक नागपूर (1854-2002), हिंदी मराठी प्रकाशन,2014-15, पृष्ठ118
13. वक्काणी ,डॉ.नि.आ.- आधुनिक विदर्भाचा इतिहास,श्री मंगेश प्रकाशन नागपूर,2003,पृष्ठ क्र.32
14. कित्ता,पृष्ठ क्र.33
15. कोलारकर, डॉ.शं.गो.-आधुनिक विदर्भाचा इतिहास,श्री मंगेश प्रकाशन नागपूर, 2003 पृष्ठ क्र.33
16. बोरकर,सुनिल एस.संशोधक-भंडारा जिल्ह्याचा इतिहास,रा.तु.म.ना. विद्यापिठात आचार्य पदवीसाठी सादर करण्यात आलेला अप्रकाशित शोध प्रबंध,2007
17. कोलारकर, डॉ.शं.गो.-आधुनिक विदर्भाचा इतिहास,श्री मंगेश प्रकाशन नागपूर, 2003 पृष्ठ क्र.34
18. बैस,डॉ.विरेंद्र गोपालसिंह - वर्धा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास , श्री मंगेश प्रकाशन नागपूर, 2005 पृष्ठ क्र.4
19. वक्काणी ,डॉ.नि.आ.- आधुनिक विदर्भाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर,2003,पृष्ठ क्र.32

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील पाश्चात्य महिलांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास

*डॉ. पौळ भावना श्रीपती*

*के.के.वाघ महाविद्यालय भाऊसाहेब, नगर पिंपळस (रामाचे)ता. निफाड जि.नाशिक*

**प्रस्तावना :-**

आपल्या भारतीय समाजावर प्राचीन काळापासून ते 21 व्या शतकापर्यंत दृष्टीक्षेप टाकला तर भारतीय स्त्री ही समाजजीवनाचा अविभाज्य घटक आहे तरी ती दुर्लक्षित राहिली आहे, पुरूषसत्ताक पद्धतीने तीला दुर्लक्षितच ठेवले आहे.[1] मानव जातीच्या इतिहासाइतकाच स्त्रियांच्या अत्याचाराचा, अन्यायाचा, छळाचा इतिहास पुरातन आहे. माणूस जसजसा प्रगत होत गेला तसतशी बंधने अधिक वाढत गेली. जातीव्यवस्थेला जसा धर्माचा आधार दिला गेला तसाच स्त्रियांवरील जाचक बंधनांना धर्माचा आधार दिला गेला.[2] स्त्रियांचे सामाजिक- आर्थिक अधिकार संपविण्यात आले आणि स्त्रीला परावलंबी बनविण्यात आले. नीतीमतेची आणि चारित्र्याची बंधने स्त्रियांसाठीच कठोर करण्यात आली आणि लादण्यात आली त्यातून स्त्रियांचे माणूस असणेच नाकारले गेले त्यामुळे कुठल्याही अन्याय-अत्याचारांच्या बळी स्त्रियाच ठरल्या. वर्णसंस्कार टाळण्यासाठी स्त्रियांना नैतिक बाबी सांगत बंधने घालण्यात आली. योनिशुचित्व म्हणून बालविवाह, सतीचीचाल, पुनर्विवाहबंदी, जरठकुमारी विवाह यासारख्या अनिष्ट प्रथांचा उगम झाला. या प्रथांचा प्रभाव टिकविण्यासाठी त्यांना धर्माचा आधार देण्यात आला.[3] पतिव्रतेची कल्पना गौरवाची ठरविण्यात आली. सतीप्रथेचे उदात्तीकरण करण्यात आले. सती न जाणाऱ्या स्त्रीयांचे केशवपण करण्याची पद्धत सुरू करण्यात आली. स्त्रीयांना माणुस म्हणून वागविण्याऐवजी तिला पुरूषांनी साधन ठरविले. मनुस्मृतीने लादलेली बंधने स्त्रियांना भोगवस्तू ठरविणारी होती. स्त्रीला चैनेची वस्तू समजल्यामुळे तिच्या शरीराला वस्त्रप्रावरणांनी व दागदागिण्यांनी शृंगारण्यात आले. [4] भारतीयांच्या जीवनाला आधुनिक दृष्टिकोन प्राप्त झाला तरीही स्त्रियांच्या बाबतीत फारसा फरक पडला नाही. त्यामुळे स्त्री सुधारणेची मोठी चळवळ या देशात उभारली गेली. स्त्रियांना माणूस म्हणून अस्तित्व निर्माण करण्यापासून त्यांना शिक्षण देण्यापर्यंत आणि त्यांच्यावरील अन्याय-अत्याचाराविरूद्ध संघर्ष करण्यापासून त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य देण्यापर्यंत स्त्री सुधारणा चळवळींनी कार्य केले. उदा. राजाराममोहन रॉय यांनी सतीप्रथेविरूद्ध, पतीच्या संपत्तीत पत्नीला वाटा मिळावा म्हणून चळवळ केली, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. गोपाळ हरी देशमुख, गो. ग. आगरकर, म. गों. रानडे आदींनी स्त्रियांच्या विवाहाच्या संमती वयाबाबत, पुनर्विवाह, बालविवाहसंबंधी, जरठ कुमारी विवाह बंदीचा पुरस्कार केला. स्त्री-पुरूष समान स्वातंत्र्याची व समान संधीची मागणी या सुधारकांनी केली.[5] स्त्रियांच्या स्थिति सुधारणेच्याबाबतीत क्रांतीकारक कार्य महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुलेंनीही केले. स्त्रियांच्या हक्कांसाठी ते सतत लढले. स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार व्हावा म्हणून आयुष्यभर लढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या चळवळीतही स्त्रियांच्या प्रश्नांना, समस्यांना महत्त्वाचे स्थान दिले. स्त्रियांसंबंधीचा पारंपरिक दृष्टिकोन संपावा आणि स्त्रीयांना समान दर्जा मिळावा यासाठी सतत स्पष्ट, परखड भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली. त्यांच्या सर्वच राजकीय, सामाजिक चळवळीत स्त्रियांना मोठ्या प्रमाणात त्यांनी सहभागी करून घेतले स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा मुलाधार आर्थिक स्वातंत्र्य आहे आणि त्यासाठी स्त्रियांचे आर्थिक परावलंबित्व संपले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. स्त्री अविचारी, पापाचरणी, चंचल असते हेच चुकीचे आहे. स्त्री विवेकी असते म्हणून स्त्रियांना सर्व मानवी हक्क मिळाले पाहिजेत. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्षात्मक भूमिका घेतली. स्त्रियांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्व लक्ष देण्याची अपरिहार्यता डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन करून अधिक प्रगत विचार मांडले आहेत. डॉ. आंबेडकरांनी केलेला हा उपदेश दलित स्त्रियांपुरता मर्यादीत नाही तर सर्व समाजातील स्त्रियांसाठीचा हा उपदेश होता. स्त्रीयांनी पतीचे गुलाम होण्यास नकार देवून त्यांच्याशी मित्राप्रमाणे सहकार्य केले पाहिजे. लवकर लग्न न करणे, अधिक मुले न होऊ देणे, दुर्गुणांपासून मुक्त राहणे आणि समतेसाठी आग्रह धरणे, स्त्रीला माणूस म्हणून मान-सन्मान मिळावा अशी स्पष्ट भूमिका डॉ. आंबेडकरांची होती. त्यामुळेच त्यांनी बहुपत्नीत्वाच्या पद्धतीला विरोध केला होता. पण पुरूषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीयांनी गुलामी स्वीकारावी, अन्याय सहन करावा, छळ होऊ द्यावा हे त्यांना मान्य नव्हते त्यासाठी त्यांनी आग्रहपूर्वक 11 एप्रिल

1947 रोजी संविधान सभेत हिंदू कोड बिल मांडले आणि हे बिल संसदेत पास न झाल्यामुळेच त्यांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर स्त्रीयांच्या प्रश्नांचा विचार केला होता. कुटुंब कुटुंबातील मुलाचा विकास, स्त्री-शिक्षण, नितीमत्ता, स्त्रियांचे आरोग्य, कुटुंब नियोजनातील स्त्रियांची शारिरिक, मानसिक, लैंगिक छळातून मुक्तता, द्विभार्या प्रतिबंध करून स्त्री समानतेचा पुरस्कार पडदा पद्धतीला विरोध यासाठी डॉ. आंबेडकरांनी रणसंग्राम मांडला. संघटित स्त्री शक्तिच देशातील गरिबी हद्दपार करून शकते आणि त्यातूनच देशाच्या आर्थिक उन्नतीच्या, सामाजिक उन्नतीचा मार्ग निघू शकेल असा त्यांना विश्वास होता. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या महान कार्यात त्यांनी ज्या सामाजिक चळवळी स्त्री मुक्ती चळवळ उभारल्या त्या चळवळीत दलित स्त्रियांसोबत दलित्तेतर स्त्रीयांचाही सहभाग होता तो खालीलप्रमाणे

**संशोधन पेपरची उद्दिष्टे:- (Objectives)**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीला दालितेतरांचा पाठींबा होता त्यासोबत दालितेतर महिलांचा पाठींबा होता हेतू तपासणे .

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीला दालितेतर महिलांसोबत पाश्चिमात्य महिलांचा पाठींबा होता याचा अभ्यास करणे

**संशोधन पेपरची गृहीतके :- (Hypothesis)**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत दालितेतरांचा सहभाग  होता

२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत दालितेतर महिलांनी सहकार्य केले होते

३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत दालितेतर महिलांनी सहकार्य केले त्यात भारतीय महिलांसोबत परकीय देशातील महिलांचे  सहकार्य लाभले होते.

**संशोधन पद्धती :- (Research Methdology)**

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने सामजिक शास्त्रातील प्रचलित असलेल्या सर्वच संशोधन पद्धती इतिहास संशोधनासाठी उपयुक्त ठरतात .या संशोधन पेपर साठी संदर्भ साधनाचा म्हणजेच प्राथमिक दर्जाची साधने व दुय्यम दर्जाची साधने यांचे वाचन करून हा पेपर लिहला आहे.

**मिसेस फ्रॅन्सीस्का फिझिराल्ड (फॅनी उर्फ एफ)**

जुलै 1920 ते मार्च 1923 पर्यंत बाबासाहेब आंबेडकर लंडनमध्ये डि.एस्सी. व बार-अॅट -लॉ चा अभ्यास करीत असताना ते एका कजाग व दरिद्री स्वभावाच्या लॅंडलेडीकडे विद्यार्थी म्हणून राहत होते ती डॉ. आंबेडकरांना फार छळत होती.

लंडनमधील लॅंडलेडीच्या त्रासाला कंटाळुन बाबासाहेब दुसऱ्या लॅंडलेडीकडे राहावयास गेले होते. तिथे लॅंडलेडीची मुलगी मिसेस फ्रॅन्सीस्का फिझिरॉल्ड हिची व डॉ. बाबासाहेबांची मैत्री झाली. बाबासाहेबांना वेळोवेळी पैशांची मदत करणे, त्यांनी सांगितलेला मजकुर लिहुन काढणे, ग्रंथातील उत्तरे लिहिणे, असली कामे ती त्यावेळी (1920-1923) करीत असे. बाबासाहेबांजवळ  लंडन येथे असताना 500 पुस्तकांचा संग्रह होता. तो संग्रह त्यांना त्यावेळी भारतात आणता आला नव्हता कारण त्यांच्या जवळ पैसे नव्हते. तो सर्व ग्रंथ संग्रह फॅनीने स्वत:च्या खर्चाने जुलै 1923 ला बाबासाहेबांना भारतात पाठविला होता.[6] लंडन येथील  म्युझियम लायब्ररीत विलक्षण चिकाटीने व अंग झाडून विद्याभास करणारा भारतीय विद्यार्थी म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याची व भावी कार्यक्रमाची तिला हळूहळू ओळख झाली होती. दलित बंधुभगिनीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी डॉ. आंबेडकरांना महान चळवळ करायची होती त्यासाठी त्यांनी त्यांची बौद्धिक, मानसिक व वाचिक शक्ती अमाप वाढविण्याचा प्रयत्न ते करीत होते याची जाणीव मिसेस फ्रॅन्सीस्का झाली होती. तेव्हापासून ती बाबासाहेबांकडे आदराने पाहू लागली. ती बाबासाहेबांच्या लायब्ररीतील निरनिराळया ग्रंथातील व अहवालातील उतारे काढत असे. अनेक ग्रंथातील उतारे काढून ती ते एका मोठ्या वहीत उतरवत असे.[7]

फॅनी प्रेमळ होती पण खट्याळही होती असे बासाहेबांनी खैरमोड्यांना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आणि फॅनीचे भांडण झाले की ती आसपासची मुलं गोळा करुन त्यांना डॉ. बाबासाहेबां मागे आरडाओरडा करायला लावून त्यांना त्रास देत असे. तिनं शिकवल्याप्रमाणे ती मुलं बाबासाहेब जेव्हा ब्रिटिश म्युझियमच्या लायब्ररीकडे जाईत तेव्हा ती मुलं ओरडत "Baby elephant going, going, going, gone" चिडवत असत.[8]  बाबासाहेबांचा स्वभाव पहिल्यापासूनच नेतृत्त्व सिद्ध

करणारा कुणाही समोर न झुकणारा, नमते न घेणारा, आत्मभिमान सदाच फणा काढलेला असायचा पण फॅनी मोठी निर्मळ आणि संमजस होती, भावनेने भरलेली होती. बाबासाहेबांबद्दल तिला बौद्धिक ओढ आणि आदरयुक्त भक्ती वाटत होती असं नाही तर तिला हृदयापासून त्यांच्या मोठेपणाविषयी आपुलकी वाटत होती. बाबासाहेबांनी सांगितलेली माहिती आणि फॅनीची जी पत्र आहेत यावरून हे सहज लक्षात येते.[9]

फॅनीबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर खैरमोड्यांशी ते मोकळेपणाने बोलले होते. बोलता बोलता बाबासाहेब म्हणाले होते, "अरे पण हे मी तुला सांगितलेले सर्व काही तु माझ्या चरित्रात लिहीणार की काय? माझी हरकत नाही पण आपल्या लोकांच्या नैतिक कल्पना विचित्र आहेत. एखाद्या माणूस लहानपणी अगर तरुणपणी पाय घसरून पडला तर तो जन्माचाच पडला असे समजतात व ते त्याचा तिरस्कार व हेटाळणी करतात. युरोप-अमेरिकेत असे नाही प्रत्येक स्त्री-पुरूषाला खाजगी जीवनाचा इतिहास त्यांच्या चरित्रात दिला जातो. आपल्याकडे चरित्रलेखनात या गोष्टीला स्थान नाही".[10]

फॅनीशी असलेल्या मैत्रीची मर्यादा त्यांनी रेखली त्यांनी स्वत:ही सांभाळली आणि तिलाही सांभाळायला लावली. दया पवारांनी त्या मैत्रीच्या आलेखाला निष्पाप असे विश्लेषण लावलं आहे. ते खरोखरच फार अर्थपूर्ण आहे. बाबासाहेबांसाठी भारतात यावं अशी फॅनीची तीव्र इच्छा होती. तिला बाबासाहेबांनी बहुधा कठोर शब्दांत कधी धिक्कारलं नसावे त्याचे कारण म्हणजे त्यामागे निर्व्याज आणि प्रेमपूर्ण अंत:करणाचा अपमान करणे ठरले असते. तसे त्यांनी केले नाही तिला कधी दुखावले नाही पण मैत्रीच्या मर्यादेपलीकडे जाणाऱ्या तिच्या इच्छा त्यांनी स्वीकारल्या नाहीत. खैरमोडे लिखीत आंबेडकर चरित्रात फॅनीची काही पत्र आहेत त्या तिच्या पत्रांमधून तिची भारतात येण्याची उत्कट इच्छा कळते. तिची बाबासाहेबांविषयी सच्ची आस्था कळते आणि तिच्या स्वप्नांची सुंदर झलकही दिसते.

"You have not written to me again this week so I feel very neglated. I often wonder if some one else has supplanted me in your affections, but I try to console myself with a thought that I cannot possibly me. You are different to other men".

असे तीने त्यांना एका पत्रात लिहिले होते. बाबासाहेबांच्या वेगळेपणाबद्दल तिचे लिहिणे खोटेही नव्हते ते खरोखरच इतरांपेक्षा वेगळे पुरूष होते. म्हणून त्यांनी फॅनीच्या मैत्रीचा अव्हेर किंवा अनादर केला नाही. पण म्हणूनच तिची तीव्र इच्छा असूनही मैत्रीचे पाऊल त्यांनी मनोमन रेखलेल्या मर्यादेबाहेरही पडू दिले नाही . तिच्या भावनाशीलतेला स्वत:चे बळ बनवित असतानाच व्यवहारात ती वेडीवाकडी अशा वाहत येण्यापासून रोखून धरले.[11] बाबासाहेब आणि फॅनीमध्ये वीस-बावीस वर्ष पत्रव्यवहार चालू होता. (1923-1945) बाबासाहेबांनी लंडनमध्ये राहत असताना फॅनीबरोबर बायबल वाचले होते. बायबलमधल्या अनेक गोष्टींवर तिच्याशी चर्चा केल्या होत्या. बायबलमधल्या काही घटनांच्या मुळाशी जाऊन त्यावर नवा प्रकाश टाकणारा ग्रंथ बाबासाहेबांनी लिहावा असे फॅनीला वाटत होते. त्यावेळी बाबासाहेबांना तिने आग्रह केला. तो लिहून तिलाच अर्पण करण्याचे वचन त्यावेळी फॅनीला बाबासाहेबांनी दिले होते. बाबासाहेब अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा गुंता खोलवर उकलत गेले आणि गांधीजींनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाविषयी काय केले? यासंबंधी त्यांनी इंग्रजी ग्रंथ लिहून तोच ग्रंथ फॅनीला अर्पण केला.[12] दि. 6 ऑक्टोबर 1931 ला महात्मा गांधींनी मुसलमानांबरोबर असा करार केला की, मुसलमान प्रतिनिधींनी जर गांधीजींच्या मागण्याला पाठींबा दिला तर ते मुसलमानांच्या मागण्यांना पाठिंबा देतील. हा करार मुस्लीम लीगच्या लेटर हेडवर दि. 25 ऑक्टोबर 1931 च्या रात्री 10.00 वाजता झाला होता. यावेळी गांधीजींनी आगाखान यांना कुराणची शपथ दिली होती. हि वार्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या खाजगी सचिव फॅनींनी सांगितली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे खरे समजून घेण्यासाठी मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींना भेटले तेव्हा त्यांनी ते मान्य केले पण या कराराच्या अटी आम्हाला माहित नाहीत. कारण हा करार आगाखानाशी करण्यात आला होता.[13] फॅनी आणि डॉ. बाबासाहेबांची मैत्री लंडनपासून 20 ते 22 वर्षे टिकून होती. जरी बाबासाहेबांची दलित समाजाबद्दलची तळमळ तिला माहित होती. म्हणून तिने डॉ. बाबासाहेबांना अभ्यासात, तसेच नोटस् काढण्यासाठी, काही मजकूर टाईप करण्यासाठी सुद्धा लंडनमध्ये खुप मदत केली. बाबासाहेबांनी 'गांधीजींनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाविषयी काय केले?' हा ग्रंथ लिहिला आणि फॅनीला अर्पणही केला. तसेच महात्मा गांधीची

अस्पृश्याबद्दल असलेली असुया जेव्हा तिला समजील तेव्हा तिने मुसलमान प्रतिनिधी आणि महात्मा गांधीत झालेला करार काय होता हे डॉ. आंबेडकरांना सांगितले तेव्हा आंबेडकरांनी शहानिशा केली आणि सत्यापर्यंत पोहोचले. तिला दलित समाजाविषयी प्रेम होते यावरुन तिने आंबेडकरी चळवळीला प्रत्येकवेळी मदतच केली होती ती डॉ. आंबेडकरांची एक मैत्रीण म्हणून तिची मदत आंबेडकरांना खुप महत्त्वाची व प्रेरणादायी ठरली होती.

**ड्रेशरबाई :**

ड्रेशरबाई जोन्स मिचिगेन येथील असून त्यांनी मिचीगेन बेटर्न महाविद्यालयातून युनिव्हर्सिटी ऑफ मिचिगॅनची बी. ए. व एम. ए. पदवी त्यांनी घेतली होती. शिक्षिका म्हणून त्यांनी त्यांच्या जीवनास सुरूवात केली होती. त्यानंतर समाजसेवेस वाहून घेण्यासाठी म्हणून त्या एप्रिल 1920 मध्ये भारतात आल्या व नागपूर (मध्यप्रांत) येथे मिशन स्कुलमध्ये शिक्षिका म्हणून काम करु लागल्या. नंतर त्यांची बदली मुंबई येथील आग्रीपाडा मिशनमध्ये 1930 मध्ये झाली. त्या अस्पृश्यांच्या वस्तीत जाऊन त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी मदत करीत असत. 1935 –नंतर धर्मांतराच्या चळवळीत त्यांनी लक्ष घातल होते . ह्या अस्पृश्यांच्या लग्नसमारंभांना व सभांना उपस्थित राहात असत त्यामुळे त्यांचा व बाबासाहेबांचा परिचय झाला होता.[14]

बाबासाहेबांचा आणि ड्रेशरबाईचा स्नेहसंबंध खुपच वाढला होता. बाबासाहेब आणि त्यांची मैत्री बौद्धिक होती. त्या बाबासाहेबांना डॉक्टर साहेब असे म्हणत असत त्यांनी बाबासाहेबांसाठी त्यांच्या घरात मुंबईमध्ये एक खोली राखून ठेवली होती अत्यंत महत्त्वाची पत्रे, लेख, वक्तव्ये लिहावयाची असल्यास ते सदर खोलीत बसून लिहीत असत व तेथेच ड्रेशरबाईचा टाईपरायटर छगणलाल मोदी हा साहेबांचे लिखाण टाईप करत असे.[15] ड्रेशरबाईला बाबासाहेबांचा 12 वर्षाचा सहवास मिळाला त्यावेळेस त्या बाबासाहेबांच्या कामकाजात बरीच मदत करीत होत्या. त्याबद्दल त्यांना स्वत:बद्दल अभिमान वाटे व आनंदही वाटत होता.[16]

खैरमोडे यांच्या मते, "ड्रेशरबाईंना असे वाटत होते की, बाबासाहेब आणि त्यांचे अनुयायी हे ख्रिस्ती धर्म स्वीकारतील".पण खैरमोडेंना त्यांनी सांगितले की, मी डॉ. साहेबांना कधीही ख्रिस्ती धर्म स्वीकारा असे म्हटले नाही". त्या 1947 साली सेवानिवृत्त झाल्या म्हणून अमेरिकेला परत गेल्या.[17]

1935 च्या काळात धर्मांतराच्या चळवळ जी सुरू झाली होती. तेव्हा अनेक ख्रिस्तीसेवक डॉ. साहेबांच्या सानिध्यात आले होतो. त्यापैकी काही लोकांनी डॉ. साहेबांना ख्रिस्ती धर्मावरील ग्रंथ दिले. आग्रीपाडा मिशनचे प्रमुख बिशप पिकेट त्यांनी डॉ. साहेबांना आपल्या घरी चहापार्टी दिली होती. तेव्हा डॉ. साहेब पिकेट साहेबांना अनेक प्रश्न विचारीत होते. पण त्या उत्तराकडे डॉ. साहेबांचे फारसे लक्ष नव्हते कारण ते अधून मधून ते पिकेट साहेबांच्या लायब्ररीकडे पाहत होते. तेव्हा पिकेट साहेब म्हणाले की, डॉ. साहेब तुम्हाला पाहिजे असतील तर हवी ती पुस्तके न्या आणि वाचून परत करा. तेव्हा बाबासाहेबांनी 25 ते 30 पुस्तके काढली आणि घेऊन गेले होते. पाच ते सहा महिन्यानंतर ती पुस्तके परत आली नाहीत म्हणून ड्रेशरबाई आणि पिकेट यांनी जवळपास वर्षभर राजगृहावर जाऊन डॉ. साहेबांना विनंती केली की, पुस्तके परत द्या. पण डॉ. साहेब सतत टाळत होते. असे त्यांनी दोन वर्ष केले. म्हणून एकदा ड्रेशरबाई बाबासाहेबांना म्हणाल्या की, मी पिकेट साहेबांची पुस्तके तुमच्या लायब्ररीतून शोधून काढते. पण बाबासाहेब नाही म्हणाले. मग पिकेट साहेब आणि ड्रेशरबाईंनी रागाच्या भरात बाबासाहेबांकडे पुस्तके मागितली तेव्हा बाबासाहेबांनी थोडीशी पुस्तके काढून दिली बाकीची तुम्हीच शोधा असे म्हटले तेव्हा मिळालेले पुस्तके घेऊन ते रागारागाने राजगृहाबाहेर पडले तेव्हा पिकेट साहेब ड्रेशरबाईंना म्हणाले की, "तु सारखी बाबासाहेबांच्या लायब्ररीची स्तुती करतेस ती लायब्ररी जी मोठी झाली ती अशाच रितीने झाली असावी".[18]

लायब्ररीत चांगल्या ग्रंथांची भर पडावी असे बाबासाहेबांना वाटत होते. पण त्यांच्याकडे पैसे नसत पण ग्रंथाचे खुप आकर्षण होते. मग त्यांनी Buy, borrow or steal या तत्त्वाचा मार्ग स्वीकारला. ते ग्रंथांचा सदुपयोग करीत त्या ग्रंथातील ज्ञानाच्या ज्योतीने आपल्या समाजात आत्मशक्तीचे दिव्यतेज उभे करीत असत. ड्रेशरबाई नेहमी म्हणत की, He was a wonderful man and real genius ते अद्वितीय पुरुष होते ते खरेखुरे बुद्धीवंत होते.[19]

ड्रेशरबाई ह्या अभ्यासू आणि मोकळया मनोवृत्तीच्या, उच्च विचाराचे एक व्यक्तीमत्त्व होते. त्यांच्यावर विदेशी विचारांचा पगडा होता आणि अशाच बुद्धीवंतांशी डॉ. बाबासाहेबांची पटकन ओळख झाली होती. तेव्हा त्यांना भारताच्या सामाजिक परिस्थितीची, अस्पृश्यतेची जाणीव होती आणि त्यासाठी काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख ही होती. म्हणून डॉ. आंबेडकर त्यांच्या कामाबद्दल ड्रेशरबाईंना आकर्षण होते त्यामुळे त्या चळवळीशी समरस झाल्या होत्या. डॉक्टर साहेबांना लागणारी प्रत्येक मदत करण्यासाठी त्या तत्पर असत. त्या ख्रिस्तीधर्मोपदेशक होत्या. तरी सुद्धा त्यांनी त्यांच्या मैत्रीत धर्म आडवा येऊ दिला नाही. बाबासाहेबांचे ग्रंथप्रेम पाहुन त्यांना ग्रंथही पुरवत असत. त्यांच्या या सर्व आठवणी आंबेडकर यांचं निर्वाण झाल्यावर ड्रेशरबाईंनी खैरमोडेंना सांगितलेल्या होत्या. ड्रेशरबाईंची फार इच्छा होती की, खैरमोडेंनी छोटे इंग्रजी चरित्र लिहावे आणि त्यांना द्यावे जेणेकरुन त्या अमेरिकेत प्रसिद्ध करतील त्यामुळे डॉ. बाबासाहेब हे अमेरिकन लोकांनाही कळतील आणि खैरमोडेंनी तसे चरित्र लिहीले, टाईप केले व ड्रेशरबाईंनी पाठवून दिले.

**मिस म्युरियल लेस्टर :-**

मिस. लेस्टर ह्या इंग्लंडमधील किंगश्ले येथे राहून उपेक्षितांच्या, अस्पृश्यांच्या उद्धारासाठी समाजसेवी केंद्र चालवत होत्या. त्यामुळे असेच कार्य करणाऱ्या भारतीय नेत्यांविषयी त्यांना आत्मियता वाटत होती. विशेषत: त्यांना महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी आत्मीयता, आपुलकी वाटत होती. मिस लेस्टर ह्या सन 1946 साली भारतात आल्या होत्या. या भेटीत त्या आठवडाभर वर्धा येथील आश्रमात राहिल्या. तेंव्हा मुंबई येथे ड्रेशरबाईंनी त्यांना आठवण करुन दिली की, लेस्टरबाई ह्या लंडनमध्ये अस्पृश्यांमध्ये राहतात पण हिंदुस्थानात मात्र स्पृश्यांबरोबर राहतात तेव्हा लेस्टरबाईनी स्पष्टीकरण दिले की, त्या जरी महात्मा गांधीजी बरोबर राहत असल्या तरी त्यांच्याशी त्या अस्पृश्य चळवळ व डॉ. आंबेडकर यांच्या विषयी बोलत असत. डॉ. आंबेडकरांना दिलेली वागणुक ही चुकीची आहे याची जाणीव करुन देत असत. जेव्हा महात्मा गांधींनी असे सांगितले की, "डॉ. आंबेडकरांनी मध्यवर्ती मंत्रिमंडळात असावे असे महात्मा गांधी व काँग्रेसवाल्यांचे मत आहे पण त्यांना मंत्रिमंडळात कोण व कसे आणेल हे कळत नाही".[२०] महात्मा गांधींचे विचार कळाल्यावर मि. लेस्टर डॉ. आंबेडकरांना भेटल्या आणि त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

ड्रेशरबाईंनी बाबासाहेबांना एके दिवशी जेवणाचे आमंत्रण दिले होते जेवणा नंतर मि. लेस्टरबाई महात्मा गांधीजींचे म्हणणे डॉ. आंबेडकरांना समजावून सांगत होत्या पण बाबासाहेबांनी हे महात्मा गांधी आणि काँग्रेसमधील लोक त्यांना कसे कोंडीत पकडून नामोहरम करत होते असा मुख्य मुद्दा त्यांच्यासमोर मांडला त्याला अनुरूप असे 1930-1946 च्या दरम्यान चे कटु अनुभव त्यांनी लेस्टरबाईंना सांगितले.[२१] त्यामुळे लेस्टरबाईंनी डॉ. बाबासाहेबांची समजूत काढली त्यांना सांगितले की, आतापर्यंत जे झाले ते झाले आता तुम्ही पूर्वग्रह बाजुला सारावेत आणि मध्यवर्ती मंत्रीमंडळात जावे हे तुमच्या कार्याच्यादृष्टीने हिताचे होणार आहे. मि. लेस्टर सोबतच ड्रेशरबाई पण डॉ. आंबेडकरांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करीतच होत्या. पण तरीसुद्धा बाबासाहेबांनी नकार किंवा होकार दिला नाही म्हणून मि. लेस्टर यांनी मध्यस्थी करण्यासाठी त्या दिल्लीला गेल्या आणि घडलेल्या संवादाचा वृत्तांत म. गांधींना सांगितला. 1947 मध्ये म. गांधींनी सरदार वल्लभभाई व प. जवाहरलाल नेहरू यांना सुचविले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या मंत्रिमंडळात आणण्याचे प्रयत्न करावेत".[२२]

मि. लेस्टर ह्या पुरोगामी विचारांच्या होत्या त्यांच्यावर म. गांधीच्या कार्याकडे ओढा दिसत असला तरी पण त्यांनी अस्पृश्य उद्धारासाठी त्यांच्या देशामध्येही प्रयत्न केले होते आणि म्हणून त्या भारतात पण त्याच उद्देशाने आल्या होत्या. भारतात आल्यावर डॉ. आंबेडकरांचे कार्य याविषयी त्यांना माहिती मिळाली होती म्हणून त्या स्वत: डॉ. आंबेडकरांना भेटल्या आणि त्यांच्याशी चर्चा केली. परंतु डॉ. आंबेडकरांचे काँग्रेस आणि गांधीजी यांविषयी चांगले मत नव्हते आणि डॉ. आंबेडकरांनी ते स्वत: त्यांना सांगितले होते. पण डॉ. आंबेडकरांनी मंत्रिमंडळात यावे असे महात्मा गांधींना वाटत होते तसे ते प्रयत्न ही करत होते. मि. लेस्टरनी डॉ. आंबेडकरांचे मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला होता कारण त्यांना डॉ. आंबेडकरांच्या बुद्धीमत्तेची जाणीव होती आणि वरील सर्वांच्या प्रयत्नाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्रीमंडळात सामिल झाले होते.

या मानवतावादी चळवळीत फक्त पाश्चात्य दालीत्तेतर महिलांनी तर डॉ. आंबेडकर यांना मदत केली होतीच परंतु भारतातील अश्या काही दालीत्तेतर महिला होत्या ज्यांनी समाजाच्या आणि धर्माच्या बंधनाची पर्वा न करता या चळवळीत डॉ आंबेडकर यांना मदत केली होती त्यात जनाबाई जोशी ,एक ब्राम्हण स्त्री , वत्सूताई चित्रे , शांताबाई श्रीधर टिळक , मनोरमाबाई प्रधान ,सौ. ताराबाई जवळकर , कु. पटवर्धन , विमल वैद्य देशमुख ,डॉ. शारदा कबीर / डॉ. सविता आंबेडकर (माईसाहेब) शफी तय्यबजी ,इंदिराबाई नाईक इ. ची नावे घेता येतील .

**निष्कर्ष :-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या चळवळीत स्त्रियांच्या प्रश्नांना, समस्यांना महत्त्वाचे स्थान दिले होते. स्त्रियांसंबंधीचा पारंपरिक दृष्टिकोन संपावा आणि स्त्रीयांना समान दर्जा मिळावा यासाठी सतत स्पष्ट, परखड भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली. त्यांच्या सर्वच राजकीय, सामाजिक चळवळीत स्त्रियांना मोठ्या प्रमाणात त्यांनी सहभागी करून घेतले होते. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत दलितेत्तर महिलांनी सहभाग घेऊन डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या मानवी स्वातंत्र्याच्या चळवळीला खुप मदत व सहकार्य केले होते.

२) फॅनीने पुढाकार घेऊन आंबेडकरांना पैशांची, पुस्तकांची मदत केली होती. फॅनी आणि डॉ. बाबासाहेबांची मैत्री लंडनपासूनच होती. बाबासाहेबांनी गांधीजींनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाविषयी काय केले यासंबंधी त्यांनी इंग्रजी ग्रंथ लिहून तोच ग्रंथ फॅनीला अर्पण केला होता.

३) ड्रेशरबाई ह्या अभ्यासू आणि मोकळया मनोवृत्तीच्या, एक उच्च विचाराचे व्यक्तीमत्त्व होते. त्यांना भारताच्या सामाजिक परिस्थितीची, अस्पृश्यतेची जाणीव होती. त्यासाठी काम करणाज्या डॉक्टर साहेबांना लागणारी प्रत्येक मदत करण्यासाठी त्या तत्पर असत. त्यांच्या कामाबद्दल ड्रेशरबाईंना आकर्षण होते त्यामुळे त्या आंबेडकर चळवळीशी समरस झाल्या होत्या.

४) मिस म्युरिएल लेस्टर ह्या पुरोगामी विचारांच्या होत्या. भारतात आल्यावर डॉ. आंबेडकरांचे कार्य याविषयी त्यांना माहिती मिळाली म्हणून त्या स्वत: डॉ. आंबेडकरांना भेटल्या होत्या. स्वतंत्र भारताच्या डॉ. आंबेडकरांनी मंत्रिमंडळात जावे याकरिता मिस. लेस्टरनी प्रयत्न केला होता.

५) या मानवतावादी चळवळीत फक्त पाश्चात्य दालीत्तेतर महिलांनी तर डॉ. आंबेडकर यांना मदत केली होतीच परंतु भारतातील अश्या काही दालीत्तेतर महिला होत्या ज्यांनी समाजाच्या आणि धर्माच्या बंधनाची पर्वा न करता या चळवळीत डॉ आंबेडकर यांना मदत केली होती त्यात जनाबाई जोशी ,एक ब्राम्हण स्त्री , वत्सूताई चित्रे , शांताबाई श्रीधर टिळक , मनोरमाबाई प्रधान ,सौ. ताराबाई जवळकर , कु. पटवर्धन , विमल वैद्य देशमुख ,डॉ. शारदा कबीर / डॉ. सविता आंबेडकर (माईसाहेब) शफी तय्यबजी ,इंदिराबाई नाईक इ. ची नावे घेता येतील

**संदर्भ :-**

1. देशमुख मा. म. प्राचीन भारताचा इतिहास, बी. पी. प्रकाशन नागपूर, पृ.क्र.42
2. कुलकर्णी रूपा (ऑटोबर 2006) लोकराज्य (अंक आठवा) वर्ष 58 वे (महिलांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर) पृ.क्र. 114 प्रकाशक माहिती जनसंपर्क महासंचलनालय महाराष्ट्र शासन.
3. Dr. Ambedkar B. R. Writing and Speeches part 1, 17th Nov. 1947 to 14th December 1950
4. आंबेडकर भीमराव रामजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड-19, पृ.क्र. 202-203
5. लुलेकर प्रल्हाद (2011), अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा, सायन पब्लिकेशन, पृ.क्र. 78
6. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-7, सुगावा प्रकाशन पुणे, 1985, पान क्र.
7. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-2, सुगावा प्रकाशन पुणे, 14 एप्रिल 1985, पान क्र. 1980.
8. कित्ता, पान क्र. 83
9. मैत्री संयमाच्या भानातली, ढेरे अरुणा, लोकसत्ता चतुरंग, शनिवार 2 ऑक्टोबर 2014, पान क्र.1
10. कित्ता, पान क्र.4
11. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-9, सुगावा प्रकाशन पुणे, जानेवारी 1983, पान क्र. 26.

12. कित्ता, पान क्र. 27.
13. गायकवाड रामचंद्र, आंबेडकरी चळवळीतील दलितेत्तर, निर्मल प्रकाशन नांदेड, आक्टोबर 2013 पृ.क्र.53.
14. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-8, सुगावा प्रकाशन पुणे, 1987 पृ.138
15. 18 एप्रिल 1958 ची प्रत्यक्ष मुलाखत, खैरमोडे आणि Mildread G. Drescher, सकाळी 9.45
16. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-8, सुगावा प्रकाशन पुणे, 1987 पृ.138
17. कित्ता, पान क्र. 140
18. कित्ता, पान क्र. 141
19. 11 ऑगस्ट 1959, ड्रेशरबाईंनी खैरमोडेंना दिलेली प्रत्यक्ष मुलाखतीचा सार.
20. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड-9 सुगावा प्रकाशन पुणे, जानेवारी 1983, पृ. क्र. 173
21. उपरोक्त, पृ.क्र. 174
22. उपरोक्त, पृ.क्र. 174

# चंद्रसेन विराट की गज़लों में राजनीतिक बोध

*श्री.भिकाजी व्हन्नाप्पा कांबळे*

*शोध-छात्र, हिंदी विभाग, शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापुर, डाक:- तमदलगे, तहसील:-शिरोळ, जिला :- कोल्हापुर*

**प्रस्तावना :-**

साठोत्तरी काल के सशक्त गज़ल कवि के रुप में हिंदी साहित्य में चंद्रसेन विराट का नाम दर्ज किया गया है। चंद्रसेन विराट हिंदी के लोकप्रिय गज़लकार है। आज तक उनके चौदह ग़ज़ल संग्रह प्रकाशित हो चुके हैं। इनके साहित्य में जनवादी चेतना का चित्रण मिलता है। इनकी गज़लों में भारतीय समाज के निम्नवर्ग से लेकर मध्यवर्ग की छवि मिलती है। आम आदमी की पीडा, वेदना, आक्रोश आदि बातों की जानकारी इनकी गज़लों में मिलती है। हिंदी गजल लेखन के क्षेत्र में चंद्रसेन विराट ने अपना योगदान दिया है। उनके योगदान की वजह से हिंदी गज़ल को समृद्ध बनाने में सहायक सिद्ध हुआ है। उनकी गज़लों में हमें चेतना के विविध आयाम दिखाई देते हैं। आधुनिक काल में जीवन और समाज के प्रत्येक क्षेत्र को राजनीति ने प्रभावित किया है। प्रत्येक राष्ट्र की प्रगति या उन्नति राजनीति के स्वस्थता पर होती है। जिस देश की राजनीति शिथिल, अपाहिज होती है उस देश की प्रगति कभी नहीं हो पाती। परिणामतः राष्ट्र पतन की आवस्था की ओर झुकने लगता है। 15 अगस्त 1947 को हमारा देश स्वतंत्र हुआ। स्वतंत्रता प्राप्ति के पश्चात देश की उन्नति और विकास को ध्यान में रखते हुए संविधान का निर्माण किया गया। संविधान के द्वारा देश को समानता पर आधारित धर्मनिरपेक्ष प्रजातांत्रिक गणराज्य घोषित किया। स्वतंत्रता प्राप्ति के बाद देश में मोहभंग की स्थिति निर्माण हुई। राजनीति का वातावरण दूषित होने लगा। राजनीति का आदर्श और नैतिकता से कोई संबंध नहीं रहा। राजनीति केवल व्यक्तिगत स्वार्थ के रूप में पनपने लगी। राजनीति में दल, आपसी फूट, गुटबाजी की प्रवृत्ति बढने लगी। वर्तमान काल में अनाचार, अनैतिकता, स्वार्थ, भ्रष्टाचार, गुंडागर्दी राजनीति का अभिन्न अंग बन गया है। इसके कारण लोग राजनीति से दूर भागने लगे। चंद्रसेन विराट जी ने वर्तमान काल की राजनीतिक बोध को अपनी गज़लों के माध्यम से चित्रित करने का प्रयास किया है। राजनीतिक जीवन की विद्रुपता और नेताओं के चरित्र को अपनी गज़लों के माध्यम से मार्मिकता से उजागर किया है। चंद्रसेन विराट की गज़लों में वर्णित राजनीतिक बोध को निम्नलिखित रूप से देखा जा सकता हैं -

**1) स्वार्थी एवं भ्रष्ट राजनीतिज्ञ:-**

राजनीति में राजनेता की भूमिका महत्वपूर्ण होती है। राजनीति को गतिशील और सक्रिय बनाने में राजनेता अपना योगदान देता है। किसी भी देश की राजनीति को सुचारु रूप से संचालित करने तथा देश को विकास और उन्नति की आवस्था पर पहुँचाने का दायित्व राजनेताओं के चारित्रिक गुणों पर निर्भर रहता है। लेकिन वर्तमान काल के राजनेताओं का नैतिक पतन हुआ है, वे स्वार्थी बन गए हैं। कुर्सी प्राप्त करना उनका एकमात्र उद्देश्य है। जनसेवा, जनकल्याण आदि से उन्हें कोई लेना-देना नहीं है। इसके कारण वे जनता का शोषण कर रहे हैं और समाज सेवा का ढोंग कर रहे हैं। कुर्सी प्राप्त करने के लिए वे खोखली बातों का सहारा ले रहे हैं। जिस प्रकार साँप कुंडली मारकर बैठता है उसी प्रकार राजनेता लोग भी विभिन्न पदों पर आसीन है। उपर से वे संतो जैसा बर्ताव करते हैं लेकिन भीतर से राक्षस है। अपने क्रुर कामों को छिपाने में वे माहिर हैं। बुराई राजनीति के क्षेत्र में पनप रही है इसी कारण अच्छाई का अंत हो रहा है। चंद्रसेन विराट 'कुर्सियों के कंत' नामक गज़ल के माध्यम से राजनेताओं पर व्यंग्य करते हुए लिखते हैं-

*"वे सदन की खास ऊँची कुर्सियों के कंत हैं*
*वे हमारे आज के जनतंत्र के सामंत हैं*
*खोखले है पर प्रदर्शन ठोस का करते रहे*
*खो चुके हैं श्री मगर बनते बडे श्रीमंत हैं*
*वे पदों पर कुंडली मारे हुए आसीन हैं*
*यदि उसे तो जल न माँगे, ये वही विषदंत हैं*
*भोगवादी है भले वे योग की बातें करें*
*दुष्ट है वे सिर्फ ऊपर से दिखाऊ संत हैं*
*खून करते वे नकाबें और दस्ताने पहन*
*जुर्म को अपने छिपाने में कुशल अत्यंत हैं*
*आसनों के ठीक नीचे गुप्त तहखाने बने*
*भीतरी इनकी सुरंगें हर शिखर पर्यंत हैं*
*हर बुराई के रहे आरंभ जीवन में सदा*

*राजनीतिक क्षेत्र में अच्छाइयों के अंत हैं।" 1*

इस प्रकार आज लोकतंत्र केवल कहने मात्र के लिए लोकतंत्र रह गया है। स्वार्थी तथा भ्रष्ट राजनीतिज्ञ लोगों की वजह से लोकतंत्र की गरिमा और महत्व खत्म होता जा रहा है।

**2) भ्रष्टाचार की प्रवृत्ति :-**

वर्तमान कालीन राजनीति की नीवं भ्रष्टाचार पर आधारित रही हैं। राजनीति को पैसा कमाने का साधन माना जाता है। राजनीति में भ्रष्टाचार का सहारा लेकर काफी मात्रा में पैसे कमाये जा रहे हैं। यह प्रवृत्ति दिनों-दिन बढती जा रही है। राजनीति को पैसा कमाने का उद्योग बनाया जा रहा है। इसका वर्णन चंद्रसेन विराट अपनी गज़लों के माध्यम से करते हुए कहते हैं -

*"एक बडा उद्योग बनाया अंधाधुंध कमाई का*
*राजनीति से बढकर शायद कोई कारोबार नहीं*
*सारे मौसेरे भाई है, केवल झंडे अलग-अलग*
*जाहिर हुई नहीं मक्कारी तो क्या है मक्कार नहीं।" 2*

वर्तमान काल में भ्रष्टाचार का बोलबाला चारों तरफ फैला हुआ है। इस काल में भ्रष्टाचार ही शिष्टाचार बन गया है। भ्रष्टाचार की प्रवृत्ति के कारण राजनीति का वातावरण दूषित बन चुका है। बडे-बडे घोटाले हो रहे हैं।

*"वे किसी संस्थान में जब घुस गये तो घुन लगा*
*हर बरस घाटे बढे है और घोटाले रहे।" 3*

इस प्रकार चंद्रसेन विराट ने राजनीति के क्षेत्र में पनप रही भ्रष्टाचार की प्रवृत्ति पर अपनी गज़लों के माध्यम से प्रहार तथा व्यंग्य कसा है।

**3) चुनावी आश्वासन:-**

भारत विश्व का सबसे बड़ा लोकतांत्रिक देश है। इसके कारण चुनाव-प्रणाली को विशेष महत्व रहा है। देश की जनता चुनाव के द्वारा अपना प्रतिनिधि चुनती है। चुनाव जितने के लिए राजनेता लोग गुंडागर्दी, गुटबाजी आदि का प्रयोग करते हैं। साथ- ही चुनाव के वक्त विविध आश्वासन दिए जाते है। देश की जनता के कल्याण के लिए बडी-बडी घोषणाएँ, देश की प्रगति के स्वप्न तथा विभिन्न उपक्रमों के स्वप्न दिखाए जाते है। लेकिन एक बार चुनाव जितने के बाद उन आश्वासनों को पूरा नहीं किया जाता।

*"खूब आश्वासनों के दिये झुनझुने*
*अब तो आश्वासनों पर अमल चाहिए*
*आज तो कट गया, भूख सो ही गई*
*रोटियाँ किंतु निश्चित ही कल चाहिए।" 4*

साथ ही लोगों को पक्के मकान बनवाने के आश्वासन दिए जाते हैं लेकिन उन्हें पूरा नहीं किया जाता।

*"आप ही कहिए कि उन आश्वासनों का क्या हुआ*
*छोडिये किशमिश, गरीबों के चनों का क्या हुआ*
*स्वप्न तो पक्के मकानों के दिखाये थे कभी*
*हाय कच्चे झोपडों का, आँगनों का क्या हुआ।" 5*

झूठे आश्वासनों की घोषणा करके लोगों का कर्जा माफ करने का फैसला लिया जाता है। लेकिन उसका सारा बोझ मध्यवर्गीय लोगों पर डाला जाता हैं।

*"झूठ कुछ आश्वासनों के साथ ही*
*घोषणा कोई उचारी जाएगी*
*योजना का भात है पर कर्ज की*
*दाल पक जाए, बघारी जाएगी*
*कर्ज माफी आज लेकिन खाल कल*
*मध्यवर्गी की उतारी जाएगी।" 6*

इस प्रकार राजनेता लोग चुनाव जितने के लिए खोखले वादे, झूठे आश्वासन देते हैं।

**4) राजनीतिक विद्रुपताएँ:-**

वर्तमान युग में राजनीति का नीति से कोई संबंध नहीं रहा है। राजनीति में पाखंड की प्रवृत्ति आ गई है। आज लोकतंत्र केवल कहने के लिए लोकतंत्र रह गया है। उसकी गरिमा और महत्व कही खो गया है। राजनेता लोग कुर्सी प्राप्त करने के लिए या चुनाव जीतने के लिए अनेक हथकंडे अपनाते है। इस हथकंडे की वजह से राजनीति कुर्सी प्रधान हो गई है। कुर्सी प्राप्त करने के लिए दल-बदला जा रहा है। इसके कारण राजनीति में स्वार्थ की प्रवृत्ति निर्माण होने लगी है। स्वतंत्रता पूर्व काल में राजनीति में इमानदारी, त्याग और बलिदान को महत्व दिया जाता था। लेकिन वर्तमान काल में इमानदारी, त्याग और बलिदान का स्थान स्वार्थी प्रवृत्ति ने लिया है। राजनीति सुसंस्कृत, सुशिक्षित, सज्जन लोगों का क्षेत्र नहीं रहा है। इसका वर्णन चंद्रसेन विराट इस प्रकार करते हैं -

*"ये सियासत! उठो घर चलेंगे*
*ये जगह ही नहीं सज्जनों की।" 7*

इसके साथ ही चंद्रसेन विराट ने राजनीति को चील के घोसले की उपमा दी है।

"तू कहाँ आया, सियासत में यहाँ
चील का ये घोसला है, बोल मत।" 8

इस प्रकार चंद्रसेन विराट जी ने अपनी गज़लों के माध्यम से विद्रुप राजनीति की पोल खोल दी है।

**5) राजनीतिक मूल्यों में बदलाव:-**

आजादी के बाद देश की संसद में जो नेतागण प्रतिष्ठित हुए थे वे कुशल प्रशासक, अध्ययनशील रह चुके थे। वे मंत्रालय में चलनेवाली गतिविधियों को अपनी कार्यकुशलता से पूरा करते थे। लेकिन वर्तमान काल तक आते-आते राजनीति में अल्पशिक्षित लोग मंत्री पद पर आसीन हो गए हैं। इसके कारण मंत्रालय की जानकारी तथा लोगों की समस्याओं को हल करने की क्षमता उनके पास नहीं है। इसकी वजह से देश का भविष्य अंधकारमय हो रहा है। राजनीति में दल-बदल की प्रवृत्ति बढ रही है। यह दल-बदल की प्रवृत्ति स्वार्थ परक होती है। वर्तमान समय के राजनीतिकज्ञ लोगों के दुःख-दर्द को कम करने के बदले और बढाने का कार्य कर रहे हैं। देश की संसद में जानेवाले राजनेता पाँच साल के बाद बदलते हैं लेकिन लोगों का दुःख वही-का-वही रहता हैं।

*"वही पद है, वही कुर्सी, प्रभारी और होता है*
*वही मंदिर है, वही सूरत, पुजारी और होता है*
*तमाशा तो वही चलता, निरंतर पाँच सालों तक*
*जमूरा और होता है, मदारी और होता है*
*हमें जो दीखता, होता नहीं है वह सियासत में*
*शिकारी के पिछाडी भी, शिकारी और होता है।" 9*

राजनेता हमेशा अपने दुर्गुणों को छिपाकर दूसरे के दोषों को दिखाते हैं। वर्तमान समय के राजनेता बहुरुपियों की तरह बर्ताव करते रहते हैं। चंद्रसेन विराट देश के सचिवालय में काम करने वाले लोगों को दो मुँहवाला साँप कहते हैं-

*"साँप जो सचिवालयों में घुस गया*
*दो मुँहा है, दोगला है, बोल मत*
*आज जन में और उसके तंत्र में*
*फासला ही फासला है, बोल मत*
*कौन मानेगा कि तु सच कह रहा*
*आज सूरज साँवला है, बोल मत।" 10*

इस प्रकार आज राजनीति के क्षेत्र में सिर्फ स्वार्थ का ही बोलबाला रहा है। राजनीति में जनसेवा का मूल्य खत्म होता दिखाई दे रहा है।

**निष्कर्षतः** कहा जा सकता है कि चंद्रसेन विराट जी ने वर्तमान समय की राजनीति का सूक्ष्मता से निरिक्षण करते हुए राजनीति की विसंगतियों पर अपनी कलम के द्वारा प्रहार किया है। देश की राजनीति और राजनेताओं के व्यक्तित्व के यथार्थ दर्शन इनकी गज़लों में होते हैं। राजनीति के विविध आयामों का चित्रण करते हुए राजनीति का वास्तव चित्र अपनी

ग़ज़लों में यथार्थ रूप से किया है। चंद्रसेन विराट जी ने अपनी गज़लों के माध्यम से राजनीति के विकृत पक्ष को उजागर करने का सफल प्रयास किया है। साथ ही उन्होंने गज़लों में निहित व्यंग्य के माध्यम से राजनीतिक भ्रष्टाचार का पर्दाफाश किया है। अतः कहा जा सकता है कि चंद्रसेन विराट ने अपनी गज़लों के माध्यम से स्वार्थी एवं भ्रष्ट राजनीतिज्ञ, भ्रष्टाचार की प्रवृत्ति, चुनावी आश्वासन, राजनीतिक विद्रुपताए, राजनीतिक मूल्यों में बदलाव आदि का चित्रण करके देश की जनता तथा पाठकों को राजनीति से रु-ब-रु तथा जागरूक करने का प्रयास किया है। इन प्रवृत्तियों तथा परिस्थितियों को पहचान कर उसमें बदलाव और परिवर्तन की कोशिश की जा सकती हैं।

**संदर्भ सूची :-**

1) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-88
2) हमने कठिन समय देखा - चंद्रसेन विराट
3) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-74
4) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-181
5) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-72
6) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-157
7) धार के विपरीत - चंद्रसेन विराट, पृ.-26
8) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-60
9) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-188
10) चंद्रसेन विराट की प्रतिनिधि हिंदी ग़ज़लें - संपा.डॉ.मधु खराटे, पृ.-60

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# ठाणे जिल्ह्यातील हवा प्रदूषण आणि त्याचे मानवी आरोग्यावरील परिणामांचा अभ्यास करणे

***श्री दिपक हिलाल महाजन[1] डॉ. सुरेश जे. फुले[2]***

*[1]संशोधन विद्यार्थी, भूगोल विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर, महाराष्ट्र.*

*[2]संशोधन मार्गदर्शक, भूगोल विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर, महाराष्ट्र.*

**सारांश :**

महाराष्ट्रातील औद्योगिक शहर, ठाणे हे राज्यातील सर्वाधिक औद्योगिक प्रदूषण करणारे शहर म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) २०१७ मध्ये सुरू केलेल्या कार्यक्रमात औद्योगिक विभागातील विभाजित कण पदार्थ (PM) उत्सर्जन, व्यापक वायू प्रदूषण (द इंडियन एक्स्प्रेस, रविवार, ८,२०२०) यांची माहिती देण्यात आली आहे. हवा प्रदूषणाचे मूल्यमापन करण्यासाठी सरकारच्या 'स्टार रेटिंग' कार्यक्रमाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार ठाणे शहरात सर्वाधिक प्रदूषणकारी उद्योगांची संख्या ४८ आहे. पर्यावरणीय प्रदूषण आणि विषारी पदार्थांचा मानवाच्या आरोग्यावर तसेच इतर सजीव आणि पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम आपल्याला माहीत आहे. प्रदूषणाच्या परिणामांचा सर्वाधिक धोका लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना आहे. कॅन्सर, दमा या सारख्या आजारांची संख्या वाढत आहे. अशा वाढत्या रोगांसाठी प्रदूषण खरोखरच जबाबदार आहे.

**प्रस्तावना :**

लोकसंख्या आणि आर्थिक विकास झपाट्याने वाढल्याने पर्यावरणीय प्रदुषणाची समस्या निर्माण झाली आहे. खरे तर विकास आणि विस्ताराच्या मुद्द्यांच्या तुलनेत पर्यावरणीय मुद्द्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. भारतातील शहरी विकास सध्या अतिशय गतिमान अवस्थेतून जात आहे. शहरी भागातील लोकसंख्येची टक्केवारी १९६० मध्ये १७.९२ टक्क्यांवरून २०१९ मध्ये सुमारे ३४.४७ टक्क्यांवर पोहोचली आहे (macrotrends.net, सोर्स वर्ल्ड बँक). यामुळे शहरे झोपडपट्ट्या आणि रहिवाशांच्या छावण्यांमध्ये रुपांतरीत होत आहेत. शहरांच्या झपाट्याने होणा-या विस्तारामुळे वातावरणातील प्रदूषणाची तीव्र समस्या निर्माण झाली आहे. औद्योगिक विकासाला चालना मिळाल्यामुळे प्रचंड प्रमाणात प्रदूषके निर्माण झाले आहेत आणि त्याचा पर्यावरणावर दुष्परिणाम झाला आहे.

अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी औद्योगिकीकरण होत असताना घडणाऱ्या घडामोडींमुळे गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील हवा प्रदूषण वाढले आहे. हवा प्रदूषणाचे प्रमुख स्रोत म्हणजे उद्योग (विषारी वायू), औष्णिक विद्युत प्रकल्प (राख आणि सल्फर डायऑक्साईड), मोटार वाहने. प्रमुख प्रदूषणकारी उद्योग आणि वाहने दररोज हजारो टन प्रदूषके उत्सर्जित करतात आणि नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण करतात.

**हवा प्रदूषण:**

ऊर्जा निर्मितीव्यतिरिक्त हवा प्रदूषणाला जबाबदार असलेली मुख्य औद्योगिक क्षेत्रे म्हणजे पेट्रोकेमिकल उद्योग, रासायनिक उद्योग, खनिज उद्योग (खाणकाम) आणि धातू उत्पादन आणि प्रक्रिया उद्योग, तसेच कचरा प्रक्रीयांशी संबंधित ईतर उपक्रम.

**उत्सर्जनाचे दोन प्रकार आहेत:**

1. बिंदू स्रोत ( Point source) उत्सर्जन: चिमणी किंवा नळी सारख्या पाइपद्वारे ऊत्सर्जन केले जाते.
2. नॉन पॉईंट स्रोत (डिफ्यूज) उत्सर्जन: अस्थिर पदार्थ किंवा कण यांच्यातील थेट संपर्कामुळे वातावरणातील पदार्थ. हे उत्सर्जन क्षेत्र स्रोतांपासून (टाक्या, तलाव, ढिगारे इ.) किंवा उपकरणांपासून (व्हॉल्व्ह, नळ, कपलिंग इ.) गळतीपासून होऊ शकते.

**प्रमुख हवा प्रदूषके**:

प्रमुख हवा प्रदुषकांमध्ये सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, कार्बन डायऑक्साईड, नॉन मिथेन अस्थिर सेंद्रिय संयुगे, विभाजित कण यांचा समावेश होतो.

ट्रान्स-ठाणे-क्रीक (TTC) मध्ये देशातील सर्वाधिक औद्योगिक युनिट्स आहेत ज्यात सुमारे ७० ते ७५ टक्के रासायनिक युनिट्स आहेत. त्यापैकी बहुतेक पेट्रोलियम उद्योगाशी संबंधित आहेत. मात्र, प्रदूषणाव्यतिरिक्त नवी मुंबईच्या सदोष शहरी नियोजनामुळेही ६५ टक्क्यांपर्यंतच्या प्रदूषणाला उद्योग जबाबदार आहेत -असे इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूट फॉर अ सस्टेनेबल फ्युचरच्या संचालक डॉ. रश्मी मयूर यांचे मत आहे.

**उद्योगांकडून होणा-या हवा प्रदूषणाचा आरोग्यावर होणारा परिणाम**:

औद्योगिक क्षेत्रातून उत्सर्जित होणाऱ्या हवा प्रदूषणाच्या उच्च प्रमाणामुळे आढळणा-या विकृती व रोगग्रस्तांचे प्रमाण हे प्रदूषणाचे प्रकार आणि या भागात राहणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणावर अवलंबून असते.

ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात उद्योगांकडून उत्सर्जित होणारे मुख्य प्रदूषके म्हणजे सल्फर डायऑक्साईड, विभाजित पदार्थ (RSPM,SPM), नायट्रोजन ऑक्साईड, नॉन मिथेन अस्थिर सेंद्रिय संयुगे आणि अमोनिया. या प्रदूषकांचे आरोग्यावर होणारे परिणाम खालील प्रमाणे आहेत:

1. **सल्फर डायऑक्साईड**:

विशेषतः जोखीम असणा-या गटांमध्ये श्वसनाची लक्षणे आणि फुफ्फुसांचे कार्य बिघडते. दमा ग्रस्त मुले आणि प्रौढ आणि फुफ्फुसाच्या कार्यात अडथळा आणणारे जुनाट रोग (COPD) आणि फुफ्फुसाच्या नळयांना सुज (ब्रॉन्कायटिस) येणे यासारखे आजार उद्भवतात.

2. **कण/ विभाजित पदार्थ (RSPM, SPM)**:

श्वसनविकृती आणि हृदयविकार, लहान व्यासाच्या कणांमुळे (RSPM) आरोग्याला अधिक इजा होते कारण ते श्वसनमार्गात खोलवर प्रवेश करतात.

3. **नायट्रोजन ऑक्साईड**:

श्वसन संस्थेतील दाहक प्रतिसाद; दमा आणि COPD ग्रस्तांमध्ये श्वसनाच्या लक्षणांची वाढती वारंवारता (संक्रमण), गर्भवती स्त्रियांच्या संपर्कामुळे गर्भाचे नुकसान होते.

4. **कार्बन डायऑक्साईड**:

$CO_2$ च्या संपर्कामुळे आरोग्यावर विविध प्रकारचे परिणाम होऊ शकतात. यामध्ये डोकेदुखी, चक्कर येणे, अस्वस्थता, मुंग्या येणे किंवा टोचणे किंवा झिणझिणणे , श्वास घेणे, घाम येणे, थकवा येणे, हृदयाची वाढती गती, वाढता रक्तदाब, कोमा, ॲस्फिक्सिया आणि त्रास यांचा समावेश असू शकतो.

**निष्कर्ष:**

देशातील हवा प्रदूषण रोखण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने अनेक पावले उचलली आहेत. सरकारने १९८६ मध्ये हवा प्रदूषण (नियंत्रण आणि प्रतिबंध) कायदा लागू केला. वातावरणातील कणांचे उत्सर्जन रोखण्यासाठी उद्योगांच्या चिमण्यांमध्ये स्थिर विद्युत अवक्षेपित्र (Electrostatic Precipitator) जोडण्यात आले आहेत. ठाणे बेलापूर औद्योगिक क्षेत्र (TBI) आता हवा प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कायद्यांतर्गत हवा प्रदूषण प्रतिबंधक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सर्व उद्योगांना कायद्याचे पालन करणे बंधनकारक आहे. वृक्षारोपण आणि पर्यावरण सुधारण्यासाठी सामुदायिक सहभागाला प्रोत्साहन देण्याबरोबरच ज्याची किंमत फक्त दोन ते तीन लाख रुपये आहे अशा निरंतर हवेच्या गुणवत्ता निरीक्षण केंद्रांना प्रायोजित करण्याचाही सिडको विचार करीत आहे,. कचऱ्याचा पुनर्वापर करण्याबरोबरच वृक्षलागवड, 'स्मृती वने' आणि जलक्रीडा संकुले विकसित करण्याचा विचार सुरू आहे.

**संदर्भ:**

*1. https://www.mpcb.gov.in*
*2. https://www.indianexpress.com, ऑक्टोबर, रविवार, ८,२०२०*
*3. https://www.asianage.com, August 29, 2018*
*4. https://www.macrotends.net, source World Bank*
*5. https://www.downtoearth.org.in*

# सामाजिक विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर

***सहयोगी प्रा. सोनकांबळे अरूण विठ्ठल***

*इतिहास विभाग प्रमुख, छ. शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, सोलापूर*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, "अधिकारांची सुरक्षा कायद्याद्वारा न करता समाजाच्या सामाजिक व नैतिक भावनाद्वारा केली जाते. सामाजिक भावना जर कायद्याद्वारा प्रदान केल्या जाणा-या अधिकाराला मान्यता देण्यास तयार असेल तर ते अधिकार सुरक्षित राहतात. परंतु समाज मुख्य अधिकारांचा विरोधक असेल तर कोणताही कायदा अथवा संसदीय न्यायपालिका त्यांना अधिकारांच्या सुरक्षिततेचे आश्वासन देऊ शकत नाही.1" डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या अधिकरांच्या मागणीस कोणत्याही हीनता आणि हिंसेला जोडलेली नव्हती आणि ती गोष्ट सांगण्यात ते थांबत नसत किंवा त्यांनी कधीच समाजाच्या अराजकतेचे समर्थन केले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्चशिक्षित जबाबदार नेते होते आणि आपल्या कार्याप्रती ते पुर्णत: समर्पित होते त्यांचे सामाजिक चिंतन हे सर्वस्वी लोकशाहीवर अवलंबुन होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे नेतृत्त्व करण्याची प्रचंड क्षमता होती. त्यांनी तत्कालीन काळात सामाजिकरित्या अस्पृश्यांचे प्रश्न देशाचा मुद्दा बनविला नाही. परंतु सार्वजनिक जीवनाच्या मुख्य प्रवाहाचा एक न तुटणारा हिस्सा बनविला होता. त्यांनी अस्पृश्यांच्या समस्यांना स्थानिक स्तरावर लहान-मोठ्या सामाजिक सुधारणेऐवजी अखिल भारतीय स्तरावर उभे करून पुर्ण जगाच्या समोर समग्र भारतीय जातिबद्ध समाजाला वरून खालीपर्यंत हादरवून सोडले होते. डॉ. बाबासाहेबांनी हे सुद्धा सिद्ध करून दाखविले की या कामामध्ये त्यांना यश मिळते. त्यांनी महात्मा ज्योतीराव फुले यांचा आपल्या जीवनात खुपच सन्मान केला.

सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनामध्ये सामाजिक क्रांतीच्या महानायकांची भुमिका ही महत्त्वाची होती. आम्हाला मतदानाचा अधिकार तथा बरोबरीचा अधिकार जो मिळाला आहे तो देण्यासाठी समाजाच्या महापुरूषास कठीण संघर्ष करावा लागला होता. या महापुरूषांच्या सतत संघर्षाची एक लांब साखळी असलेली आढळते. ज्यामध्ये गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, संत कबीर, संत रोहीदास, महात्मा ज्योतीराव फुले, नारायण गुरू, छ. शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पेरियार रामस्वामी नायकर यांची नावे विशेषतेने उल्लेखनीय आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, "स्वातंत्र्य आम्हाला मिळाले परंतु यामध्ये समतेचा अभाव आहे. येथे सामाजिक व आर्थिक जीवनात विषमतेचा गवगवा आहे. या विषमतेस आम्हाला लवकरात लवकर संपवावे लागेल."2कारण जातिविरहीत समाजाची स्थापना करून समाज प्रदेश आणि राष्ट्राची प्रतिमा बदलली जाऊ शकते सामाजिक सुधारणा आणि धार्मिक आंदोलनाच्या रूपात डॉ. बाबासाहेबांनी वर्ष 1927 मध्ये महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह करून पाणी प्राशन केले होते.3 वर्ष 1930 मध्ये नाशिकच्या काळाराम मंदिरामध्ये अस्पृश्यांच्या प्रवेशाचे रणशिंग फुंकले. या मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह 4 वर्षे म्हणजे 1935 पर्यंत चालत राहिला.4 शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना करून अनुक्रमे मुंबई येथे 'सिद्धार्थ कॉलेज' आणि औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविद्यालय' ची स्थापना केली.5 याचबरोबर त्यांनी 1937 मध्ये स्वतंत्र मजुर पक्ष, 1942 मध्ये शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि 1958 मध्ये प्रस्तावित रिपब्लिकन पार्टीची स्थापना करून अस्पृश्यांना राजकीय हक्काची द्वारे खुली केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विश्वाच्या सामाजिक जीवनातील मानवीय स्तरावरती महत्त्वपुर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या सामाजिक चिंतनाची झेप एवढी मोठी होती की, विश्वाच्या नवनिर्मित दुसऱ्या गरीब समाजासाठी एक वेगळे उदाहरण होते. अमेरिकेचे नागरिक असुनही तेथील निग्रो लोकांना मतदानाचा अधिकार खुप वर्षांनी मिळाला. ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चिंतनामध्ये लोकशाही आणि अनेकवाद या दोघांचे स्थान महत्त्वपुर्ण आहे. कारण लोकशाहीमध्ये अनेकवाद ही एक न्यायोचित जीवन पद्धती आहे. ज्यामध्ये सम्मान तसेच निवडणुकीची स्वतंत्रता सोपी होते. अनेकवादाचा अर्थ - एकत्र राहणे आणि सर्वसामान्य संबंध प्रस्थापित करणे होय. हाच अर्थ लोकशाहीचासुद्धा आहे. हेच कारण आहे की, डॉ. बाबासाहेबांनी अनेकवाद आणि लोकशाहीला आपले तत्त्वज्ञान तसेच सामाजिक चिंतनाचा मुख्य मुद्दा बनविला.

डॉ. बाबासाहेबांनी आजीवन संघर्ष करून अस्पृश्य शोषित आणि वंचित लोकांच्या उद्धाराकरिता 26 जानेवारी 1950 ला देशात लोकतांत्रिक शासन प्रणाली बनवुन मतदानाचा अधिकार बलवान केला. डॉ. बाबासाहेबांनी भारतीय संविधान निर्माण करीत असतांना इतर मागास वर्गीयांच्या (OBC) हितांचापुर्णपणे ध्यान ठेवत आणि अनुच्छेद 340 च्या

अंतर्गत त्यांचे मागासलेपण दुर करण्याची व्यवस्था केली.6 मंडल कमीशनच्या अंतर्गत इतर मागास वर्गाच्या लोकांना जे आरक्षण मिळत आहे ती भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 340 ची देन आहे. सन 1951 मध्ये हिंदू कोड बिल पास न झाल्याने त्यांनी केंद्रिय मंत्रीपदाचा राजीनामा दिला परंतु काळानुरूप आज हिंदू कोड बिलाची हळु-हळु अंमलबजावणी होत असलेली दिसत आहे. म्हणुन डॉ. बाबासाहेबांचे सामाजिक चिंतनाचे स्वरूप हे व्यापक होत असलेले आढळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक चिंतन त्यांचे साहित्य, तत्त्वज्ञान याकडे पाहिले तर आपल्याला लक्षात येईल. त्यातुन असे आढळते की, त्यांचा अस्पृश्यांशिवाय दुसरा मित्र नाही. त्यांनी ज्या वर्गाच्या संघर्षाची बाजु आपल्या हाती घेतली होती ते मागील दोन हजार वर्षापासुन हीनतेचे जीवन जगत होते. अशा मुक्या आणि बहि-या समाजाचे नेतृत्त्व करणे प्रचंड कठीण काम होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कांची लढाई एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवली. सारासार विचार आणि अभ्यास, विश्लेषणानंतर त्यांनी बौद्ध धर्म स्विकारला. सन 1956 मध्ये प्रकाशित बुद्ध आणि त्याचा धम्म हा ग्रंथ लिहला जो बौद्ध धर्माचा अभ्यासपुर्ण ग्रंथ आहे. 1948 मध्ये त्यांनी 'अस्पृश्य मुळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे झाले' नावाचा संशोधनपर ग्रंथ लिहीला. 1946 मध्ये 'शुद्र पुर्वी कोण होते' तसे 1936 मध्ये 'जातिप्रथा निर्मुलन' नावाचा ग्रंथ लिहिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजाच्या सर्व अन्यायपुर्ण व दमनकारी लोकांच्या विरूद्ध विद्रोहाचे प्रतिक मात्र नाहीत. परंतु भारतीय समाजात निर्माण होणा-या नवचेतना तसेच बहुजन जागृतीचे एक महान मसीहाच्या रूपामध्ये प्रतिष्ठित आहेत. बहुमुखी प्रतिभेचे धनी शोषित, पिडीत, अस्पृश्य आणि मागासाच्या सामाजिक उद्धार हेतु आयुष्यभर संघर्ष करीत राहिले. अनेक संकटांचा सामना केला तसेच सामाजिक-आर्थिक अन्याय व अत्याचाराने पिडीत मानवतेच्या हिमायती आणि उद्धारकाच्या सजीव मार्गदर्शकाच्या रूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना व्यापक मान्यता प्राप्त झाली. त्यांचे व्यक्तित्त्व, कर्तव्य आणि सामाजिक चिंतनाला चांगल्या प्रकारे समजण्यासाठी त्यांचे शोधपुर्ण ग्रंथ, महत्त्वपुर्ण लेख तसेच सारगर्भित भाषणांना चांगल्या प्रकारे अभ्यासणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अतुट विश्वास होता की शिक्षणाद्वारेच वंचित, उपेक्षित, शोषित वर्ग प्रगती तसेच उन्नतीमध्ये सहभागी होऊ शकतो.7 जन-जागृतीच्या दिशामध्ये सामाजिक क्रांतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले चिंतन आणि साहित्याच्या माध्यमातुन काळजीय प्रभाव मिळवला आहे. जे जाणने आम्हा सर्व भारतीयांकरीता गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाचा ऐतिहासिक प्रसंगामधुन अभ्यास केला आहे. तसेच त्यांची कार्यकारण संबंधाचे शोधपुर्ण विवेचन केले असुन तत्कालीन समाजाचे तात्त्विकपुर्ण वर्णन केले आणि त्यांची सामाजिक संबंध तसेच न्याय व सामाजिक उपयोगिता पर्यंत परिक्षण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाज व्यवस्थेचे अध्ययन स्वतंत्रता समता, बंधुताच्या कसोटीवर ठेवुन केले. एक सामाजिक चिंतकाच्या रूपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय सामाजिक स्थितीचे व्यापक आणि तार्किक तथ्यांवर आधारीत विश्लेषण करून त्यांची करणे शोधुन त्यांचे निवारण सुद्धा सांगितले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपुर्ण जीवन मानवादिच्या प्रति समर्पित आणि चिंतन पुर्णत: मानवीय मुल्यांवर आधारित राहिले.

**तळटिपा :**

1. डॉ. आंबेडकर बाबासाहेब यांची भाषणे भाग 3 1946 ते 1956, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई 2002, पृ.क्र. 427.
2. कित्ता, पृ.क्र. 89.
3. बहिष्कृत भारत : 3 एप्रिल 1927.
4. डॉ. आंबेडकर बाबासाहेब यांची भाषणे खंड-18 भाग-1 1920 ते 1937 डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई 2002, पृ.क्र. 427.
5. डॉ. आंबेडकर बाबासाहेब यांची भाषणे खंड-18 भाग-2 1937 ते 1945 डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई 2002, पृ.क्र. 485.
6. पंढेरे शांताराम : डॉ. आंबेडकर आणि राखीव जागांचा प्रश्न (संपादित) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 1993, पृ.क्र. 319.
7. पुर्वोक्त, पृ.क्र. 237.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021,
Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# अन्न सुरक्षा (Food Security)

*कु. महेंद्र सर्जेराव महानोर*

*रिसर्च स्कॉलर, राज्यशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा,विद्यापीठ औरंगाबाद*

**प्रस्तावना :**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व कृषी संघटनेच्या मते 'सर्व जनतेला क्रियाशील व सशक्त आयुष्याकरीता आहारविषयक गरजा, पूर्ती व अन्न प्राधान्यक्रम भागविण्यासाठी सदासर्वकाळ, पुरेसे, सुरक्षित व सकस अन्न प्रत्यक्ष व आर्थिक दृष्टया सुसाध्य असणे हे अन्न सुरक्षेचे लक्षण आहे. जागतिक अहवालानुसार "आरोग्य संपन्न आणि सक्रिय जीवनासाठी सर्वांना सर्वकाळासाठी अन्नाची उपलब्धता असणे म्हणजे अन्न सुरक्षा (१९८६)"

जागतिक लोकसंख्या अहवालानुसार प्रत्येक दहा व्यक्तीमागे सहा व्यक्ती भारतीय आहे. जगातील जवळपास 17% लोकसंख्या ही भारतीय राहते. सद्या दुसऱ्या क्रमांकावर असलेला देश 2024 पर्यंत चीनला मागे टाकून प्रथम क्रमांकावर येईल. भविष्यात नागरिकांची पोषणाची गरज भागवणे अवघड जाईल म्हणून वेळेच सतर्क होणे गरजेचे आहे. भारतामध्ये लोकसंख्येचा एक मोठा भाग दारिद्र्य रेषेखाली राहतो ज्याला दोन वेळेचे जेवण भेटने अवघड आहे. सरासरी कमी उतपन्न, अल्पभूधारक शेतकरी व त्यामुळे त्यातून आधुनिक तंत्रज्ञान चा वापर भारतामध्ये करणे शक्य नाही, गतिक हवामान बदल, मृत्यूदरात घट, जमिनीची नापिकता, अन्न साठवण्यासाठी अपुऱ्या पद्धती, पाऊसाची अनिश्चितात, गरिबी ही सर्व समस्या ची जननी आहे, भूकमुळे लोक गुन्हेगारी कडे वळतात, हाताला भेटेल ते काम करायला तयार होतात त्यामुळे किमान वेतनपेक्ष्या कमी वेतनावर काम करायला तयार होतात त्यामुळे कुपोषण वाटते त्याचा परिणाम येणाऱ्या पिढीनवर वर होतो. 2020 सालच्या जागतिक भूक निर्देशांकात भारताचा 107 देशांमध्ये 94 वा क्रमांक लागतो. 27.2 स्कोर देवून गंभीर देशांच्या यादीत भारत येतो. आश्चर्याची बाब म्हणजे आशियातील सर्व देशांच्या खाली भारताचा नंबर लागतो.म्हणून अन्न सुरक्षा ही गांभीर्याने घेणे महत्त्वाचे आहे. पुरेसे अन्न न मिळाल्याने श्रमशक्ती व त्यांच्या उत्पन्नात घट होतो. अन्नासाठी प्राधान्य दिला जात असल्याने आरोग्य, बचत, शिक्षण या गोष्टींसाठी उत्पन्न शिल्लक राहत नाही. परिणाम गरिबी दूर होण्यास अडथळे येतात. नोबल विजेते अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांच्या मते ' दुष्काळामध्ये अनेक लोकांचे भूकबळी पडतात याचे कारण अन्नधान्याची कमतरता असते असे नाही, तर जनतेकडे अन्न खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नसते. नागरिकांच्या वाढत्या क्रयशक्ती बरोबरच अन्नधान्याची खरेदी वाढवू शकते. भारतातील अन्न सुरक्षेचे स्वरूप गुणात्मक परिनामात्मक आणि आर्थिक असे आहे.

**अन्न सुरक्षाचे तीन आधारस्तंभ आहे:**

1) अन्नाची उपलब्धता - पुरेसे संसाधने असणे

2) अन्न मिळवायची संधी

3) अन्नाचा वापर

**संविधानिक तरतूद:**

अन्न, वस्त्र व निवारा ह्या मानवाच्या नैसर्गिक गरजा आहे. भारतीय संविधानात कलम 21 अंतर्गत जीवन जगण्याचा अधिकार नागरिकांना दिला आहे. तसेच संविधानात राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वामध्ये कलम 39-ख सामूहिक हिताच्या दृष्टीने समाजातील भौतिक साधन संपत्तीवरील मालकी व नियंत्रण यांची विभागणी व्हावी.

कलम 39-ग सामूहिक हिताला बाधा उत्पन्न होईल अशाप्रकारे संपत्ती व उत्पादन साधनांचे एकत्र केंद्रीकरण होऊ नये

कलम 39-डआर्थिक गरज असणाऱ्या कोणत्याही नागरिकास त्याच्या वय व ताकदीपलीकडील व्यवसायाची सक्ती करण्यात येऊ नये. कलम 39-च बालकांना मुक्त प्रतिष्ठापूर्ण वातावरणात निरामय पध्दतीने विकासाच्या संधी - सुविधा पुरविलेल्या जाव्यात. अन्नासंबंधित कलमाचा उल्लेख आढळतो

**उपाययोजना:**

2013 साली राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यास मान्यता मिळाली. भारतातील जनतेला अन्नसुरक्षा प्रदान करण्यासाठी उचलले हे एक पाऊण आहे. याद्वारे नागरिकांना right to food चा अधिकार देण्यात आला. सोबत सार्वजनिक वितरण प्रणाली, मध्य-अन्न भोजन योजना, अन्नधान्याची सार्वजनिक खरेदी आणि साठवून करण्याची सोय करण्यासाठी सरकार प्रयत्न करते. नागरिकामध्ये जनजागृती होण्यासाठी 2019 वर्ष हे कडधान्य म्हणून साजरा केले. जेणे करून शेतकरी कमी पाण्यात त्याचे उत्पन्न घेऊ शकतील. यांमध्ये अजून सुधारणा करणे क्रमप्राप्त आहे जसे सिंचनाच्या सोई- सुविधा मध्ये वाढ, शेतमाल योग्य किंमती, जनुकीय बियांनाचा वापर , हवामान बदलाला सामावुन घेणारे बी बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, स्वस्त कृषी आदनाचा पुरवठा, शेती पूरक आशा विविध तंत्रज्ञान चा शोध , साठवणुकीसाठी गोदामाची उपलब्धता, जमीन सुधारणा कायदे करणे, भाववाढीवर नियंत्रण, इत्यादी बाबी प्रामुख्याने लक्ष देण्याची गरज आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी संसद मध्ये कृषी कायदे संमत केले.. सहकार शेती ला प्रोत्साहन देणे उदा. अमूल कंपनी ने हा प्रकल्प यशस्वीरित्या करून दाखवला त्याचा आदर्श ठेवून अजून प्रकल्पना आर्थिक साहाय्य देणे.. शेताचे विभाजन झाल्याने १ एकर शेती असेल तरी ते शेतीला शिकटून राहतात इतर रोजगार पाहत नाही. नवीन शिकण्यास तयार नसतात. रोजगार च्या संधी निर्माण होतील असे धोरणात्मक निर्णय सरकारने घ्यावे उदा. मत्स्यव्यवसाय, दूध व्यवसाय, लघुउद्योग याने स्थलांतर न होता तिथेच रोजगाराच्या संधी निर्माण होतील. स्थलांतर मुळे शहरातील स्त्रोतावर ताण येतो.

**निष्कर्ष:**

भारतातील लोकसंख्या लाभाश (Demographic Dividend) जास्त आहे म्हणजेच 15-59 वयोगटात तरुण जास्त आहे. त्यांच्या कार्यक्षमतेचा पुरेपूर भारतीय अर्थव्यवस्थाला उपयोग करून देण्यासाठी त्यांना सकस आहार देणे गरजेचे आहे जेणेकरून त्यांची बौद्धिक आणि शारीरिक कार्यक्षमता वाढवत येईल.

**संदर्भ :**

१) जागतिक लोकसंख्या अहवाल, 2020

२) जागतिक भूक अहवाल

3) Chakrabarty, Malancha, Climate change and Food Security In India , New Delhi, 2016

4) Food Security Act, 2013

# सुनगाव जि बुलडाणा येथील तीन ऐतिहासिक बारव

*डॉ. श्याम प्रकाश देवकर*

*गोपाळ नगर, हनुमान मंदिरजवळ,खामगाव, जि. बुलडाणा*

मानवाच्या उत्पत्तीपासूनच पाणी हा त्याच्या जीवनाचा आधार राहिला आहे. सिंधू संस्कृतीच्या महास्नानगृहापासून ते सनातन संस्कृतीच्या पाण्याला 'वरुण' ही स्वतंत्र देवता दोन्ही संस्कृतीतील पाण्याचे महत्व सांगून जाते. मानवाकडून जेंव्हा पूजनीय वाटणाऱ्या प्रतीकांची आराधना करण्याची संकल्पना विकसित झाली तेंव्हा पासूनच पाण्याचा वापर पवित्र होण्यासाठी होऊ लागला. तसेही मानवी वस्ती पाण्याच्या साठ्याभोवतीच झाल्याचे आपणास दिसून येते. पाणी हे जीवन आहे हे खरे भौतिकवादी जीवनतत्वज्ञान धर्म, संस्कृती व परंपरेचा अभिन्न हिस्सा बनली. प्रत्येक काळात, प्रत्येत स्थळी व प्रत्येक धर्मात पाण्याची सोय करणे हे चांगल्या कर्मात गणले गेले आहे. त्यामुळेच धर्म कोणताही का असेना पाणी व पावित्र्य ह्या संकल्पना त्याशी थोड्या फार फरकाने जुळलेल्या दिसून येतात. सिंधू संस्कृतीत महास्नानगृह हे पाणी व शरीर पावित्र्य ही संकल्पना किती पुरातन आहे हे सांगून जाते. सत्य. एस. नागराजू यांनी ***बुद्धिस्ट आर्कीटेक्चर ऑफ वेस्टर्न इंडिया*** या ग्रंथातून शैलगृह व पाणपोढी याविषयी सांगताना कायमस्वरूपी जलसंचयनची व्यवस्था शैलगृहाचे बाहेर करून लयनस्थापत्यामध्ये नव्या संकल्पनेची भर हीनयान पंथाने घातली. सोबत न्हानपोढी ही संकल्पना विकसित होत गेली. मंदिर स्थापत्याचे दृष्टीने विचार करताना मंदिर बांधकामात जेथून काळा पाषाण काढला जाई ती रिक्त जागा आपोआप बारावेचे रूप धारण करीत असल्याचे निदर्शनात आले असणार. नवव्या शतकानंतर मंदिर स्थापत्यामध्ये झालेल्या विकासासोबत बारवस्थापत्य विकसित झाले असावे. तसेही महाराष्ट्र दख्खन काळा पाषाणाचे वर वसला असल्याने उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ हा आधीपासूनच पाचवीला पुजलेला दिसून येतो. त्यातून मार्ग काढताना त्या त्या काळात त्या त्या राज्यकर्त्यांनी आपापल्या परीने उपाय शोधण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यातूनच तडाग, सरोवरे, बारव ह्या संकल्पना विकसीत झाल्या. माणसासोबतच प्राण्याचीही सोय व्हावी यासाठी तसेच विना बाह्य साधनांचा वापर करून पाणी घेता यावे यासाठी पाण्यापर्यंत जाणाऱ्या पायऱ्या असणारी स्थापत्यकृती निर्माण झाली. जगभरातसुध्दा ही स्थापत्य कृती आढळून येते परंतू भारतीय उपखंडामध्ये या स्थापत्य कृतीचे केंद्रीकरण सर्वात जास्त असल्याचे आढळून येते. संपूर्ण भारतामध्ये अश्या बारवांची संख्या पाच हजारापेक्षा जास्त असावी. रोहन काळे या मुंबईच्या ध्येय वेड्या तरुणाने एकट्या महाराष्ट्रामध्ये एक हजारापेक्षा जास्त बारव शोधून काढल्या आहेत. महाराष्ट्र बारव मोहिमेत महाराष्ट्रातील अनेक संशोधक सहभागी झाले. बुलडाणा जिल्ह्यातील अनेक बारवाची माहिती व अचूक ठिकाणे आम्ही परस्पर हस्तांतरित केली. विवेक चांदुरकर व मी व्यक्तिशः याबाबत अनेक बारवांची माहिती हस्तांतरित केली. बुलडाणा जिल्हा ह्या बारवस्थापत्य शैलीने समृद्ध असणारा भाग असल्याचे दिसून येतो. कारण या एकाच जिल्ह्यात ५० पेक्षा जास्त विविध शैलीच्या, विविध काळातील, विविध प्रकारच्या बारव दिसून येतात. याच बुलडाणा जिल्ह्याच्या उत्तरेस सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असणाऱ्या सुनगाव या छोट्या गावात तीन बारव आढळून आल्या. सोबतच एक कोठेही नोंद नसलेले चालुक्य कालीन मंदिरही आम्हास येथे आढळून आले आहे. या गावातील तीन बारव पुढील प्रमाणे आहेत.

**१.चोराची विहीर, सुनगाव –** सुनगावच्या उत्तर दिशेला सातपुडा डोंगर रांगेच्या अगदी पायथ्याला लागून ही बारव दिसून येते. बऱ्हाणपूर ते पयनघाट या जुन्या महत्वाच्या मार्गावर ही बारव व्यापारी, वाटसरू, प्रवासी, शाही लोकांच्या सोयीसाठी बांधल्याचे दिसून येते. या विहिरीची बांधकाम शैली ही मध्ययुगीन धाटणीची दिसून येते. सध्या तीन मजली ही पायविहीर दिसून येते, मात्र कदाचित ती यापेक्षा मोठी असावी.

**बांधकाम शैली –** या बारवेची बांधकाम शैली ही मध्ययुगीन इस्लामी धाटणीची असल्याचे दिसून येते. बारवेच्या प्रवेश द्वाराला असणाऱ्या टोकदार कमानी ह्या त्यावरील इस्लामी छाप दर्शवतात. मात्र त्या बारवेच्या बांधकामाचा नेमका काल कोणता असावा हे निश्चित सांगता येत नसले तरी ही बारव मुगल काळातच बांधल्या गेली असावी. कारण पयनघाट मध्ये बऱ्हाणपूर मार्गे प्रवास मुगल काळात मोठ्या प्रमाणावर सुरु झाला होता. खिलजी, तुघलक काळात वऱ्हाड मध्ये प्रवेशासाठी सामान्यपणे बऱ्हाणपूर - रोहीणखेड – जयपूर चा घाट हा मार्ग वापरात होता. मुगल काळात मात्र वऱ्हाड साठी बऱ्हाणपूर - भिंगारा – सुनगाव – जामोद हा मार्ग वापरत आला. मुगल काळातच भिंगाऱ्याला महाल ए गुलाला या विश्राम गृह प्रकारचा एक महाल, सुंदर तलाव, मशीद व आजही या गावला पाणीपुरवठा करणारी एकमेव विहीर बांधली

गेल्याचे दिसून येते. ओवऱ्या सदृश्य टोकदार कमानीची प्रवेशद्वार असलेले बांधकाम येथे दिसून येते. बांधकाम काळा स्थानिक दगड, वाळू, चुना व विटा वापरून केल्याचे दिसून येते.

**गुप्त भुयारी रस्ता –** दुसऱ्या मजल्यावरील कक्षात प्रवेश करण्यासाठी मुख्य प्रवेश द्वारातून आत येणाऱ्या पायऱ्याला लागून डावीकडे छोटा गुप्त भुयारी रस्ता आहे. या भुयारी मार्गाच्या प्रवेश द्वाराचे माप रुंदी ०.६ मीटर , संपूर्ण उंची १.१० मीटर, टोकदार कमानीस प्रारंभ एक मीटर पासून होतो. भुयारी रस्ता आतून ०.५ मीटर रुंद व १.६० मीटर पूर्ण उंची असलेला आहे.

**प्रवेशद्वार –** कक्षाला असणाऱ्या टोकदार कमानयुक्त दर्शनी भागाकडे असणाऱ्या प्रवेश द्वाराची मापे पुढील प्रमाणे आहे. प्रवेशद्वाराची रुंदी १.३५ मीटर, संपूर्ण उंची २.३५ मीटर, कमानीला प्रारंभ १.४५ मीटरवर दिसून येतो. पहिल्या मजल्यावरील कक्षात आत जाण्यासाठीच्या छुप्या प्रवेशद्वार रुंदी ०.६५ मीटर ,पूर्ण उंची १.५० मीटर, कमान प्रारंभ १.४० मीटर पासून, भिंतीची जाडी ०.७५ मीटर या मापाचे दिसून येते. भुयारातून आत आल्यावर

**विटेचे माप –** या बारवेच्या बांधकामाला वापरलेल्या विटा ह्या वैशिष्ट्य पूर्ण असून अश्या विटांची निर्मिती ही मध्य काळात दिसून येत नाही. सामान्य विटा पेक्षा ह्या विटा मोठ्या आकाराच्या आहेत. त्यांचा आकार रुंदी १५ सेमी, लांबी ३२ सेमी व जाडी ५ सेमी असा असल्याचा दिसून येतो. मात्र हा सरासरी आकार आहे. काही विटांचा आकार यापेक्षा कमी जास्त दिसून आला.

**मुख्य विहीर –** मुख्य विहिरीचा आकार अष्टकोनी असून या अष्टकोनाच्या प्रत्येक बाजूची लांबी १.७५ मीटर आहे.

**देवडी प्रकोष्ठ –** बारवेमध्ये प्रवेश करताना दोन्ही बाजूच्या भिंतीवर देवडी सदृश्य प्रकोष्ठ दिसून येतात. या प्रकोष्ठांची मापे रुंदी १.९० मीटर, पूर्ण उंची १.७५ मीटर, कमान प्रारंभ १.१० मीटर अशी आहेत.

**पायऱ्या –** प्रवेश करताना असणाऱ्या पायऱ्या २.६० मीटर लांब व ०.२० मीटर उंची असलेल्या आहेत. पहिल्या टप्प्यात एकुक्र १३ पायऱ्या आहेत. त्याखालील मजल्यावर जाताना पायऱ्यांची लांबी कमी होत जाते. त्याची लांबी १.२० मीटर व उंची ०.२० मीटर आहे. पहिल्या मजल्यावर ०.७० मीटर रुंदीचा रस्ता दोन्ही बाजूने पहिल्या मजल्यावरील कक्षात जाण्यासाठी असल्याचे दिसून येते. याखालच्या तळमजल्यावर जाण्यासाठी असणाऱ्या पायऱ्या ०.५५ मीटर लांब असल्याचे दिसून येतात.

**कक्ष रचना –** दुसऱ्या मजल्यावरील कक्षाची मापे लांबी ३.९० मीटर, रुंदी २.६० मीटर, उंची ३ मीटर असल्याचे दिसून येते. पहिल्या व सर्वात खालील मजल्यावरील कक्षाची मापे सुध्दा जवळपास सारखीच आहेत.

### २. महादेव मंदिराची बारव –

ही बारव सुनगावाच्या मधोमध असून या बारवेच्या बाजूला पुरातन महादेवाचे मंदिर दिसून येते त्यामुळे या बारवेला महादेव मंदिराची बारव असे म्हणतात. हिला मढीची बारव असेही स्थानिक नाव असल्याचे दिसून येते. ही बारव संपूर्ण काळ्या पाषाणात बांधल्याचे दिसून येते. मात्र बांधकामासाठी वापरलेला दगड ह अत्यंत उत्कृष्ठ दर्जाचा आहे. चोराची बारव बांधकामात वापरलेला दगड हा स्थानिक असल्याचे व तो फारसा दर्जेदार नसल्याचे दिसून येते. मात्र या बारवेचे बांधकामात वापरलेला दगड हा अत्यंत उच्च शिल्पकृती साठी वापरला जाणारा काळा पाषाण असल्याचे दिसून येते. तसेच मंदिर व बारव एकाच काळात बांधल्याचे दिसून येते. ही एक मंडप युक्त बारव असल्याचे दिसून येते.

**पुरातन महादेव मंदिर –** पुरातन असे महादेवाचे मंदिर या बारवेच्या बाजूलाच दिसून येते, मात्र या मंदिराची नोंद कोणत्याही ऐतिहासिक दस्तऐवजामध्ये तसेच गझेट मध्ये दिसून येत नाही. मात्र काळ्या पाषाणातील शिल्प काम व उत्कीर्ण केलेले नक्षीकाम पाहता हे मंदिर बुलडाणा जिल्ह्यातील कोथळी, साकेगाव, सातरगाव, धोत्रा नंदई याच श्रेणीचे असल्याचे दिसून येते. मात्र त्याची नोंद तत्कालीन काळात घेतली गेल्याचे दिसून येत नाही. मंदिराचे प्रवेशद्वार, स्तंभ व सभा मंडप काही अंशी कायम असल्याचे व त्यावरून आपणास या मंदिराच्या शिल्पाकृतीच्या श्रेष्ठत्वाची कल्पना करता येते. मात्र नव्याने केलेले बांधकाम, दुरुस्ती व रंगकाम यामुळे मूळ मंदिराचे वैभव हरवले आहे. मंदिर बांधकाम शैली पाहता ते मंदिर चालुक्य काळात बांधले गेले असावे. मंदिर पूर्वाभिमुख असून सध्या पूर्वेकडील प्रवेशद्वार वापरात नाही. उत्तरेकडे अत्यंत लहान प्रवेशद्वार सध्या वापरात आहे. मंदिराचा विध्वंस मध्यकाळात झाल्याचे निरीक्षण केल्यावर समजून येते.

**बारव –** मंदिराच्या उत्तरेकडे सध्या वापरात असलेल्या प्रवेशद्वारा समोर ही बारव दिसून येते. मंदिर व बारव एकाच काळात बांधल्याचे निरीक्षण केल्यावर समजून येते. या बारवेच्या भोवती देवडी व ओवऱ्या सदृश्य विध्वंस झालेले बांधकाम दिसून येते. बारवेच्या भोवती असणाऱ्या त्या देवड्या असाव्यात. ही बारव एकात एक चौकोन असावेत तसे बांधकाम या बारावेचे केल्याचे दिसून येते.

**बांधकाम शैली –** बांधकाम शैली पाहता ही बारव सर्वोत्कृष्ठ प्रकारची असल्याचे समजून येते. ती अत्यंत उच्च दर्जाच्या काळया पाषाणात बांधल्याचे दिसून येते. बांधकामाचा दर्जा सुध्दा श्रेष्ठ दर्जाचा असल्याचे दिसून येते. बारवेचे बांधकाम चालुक्य काळात झाले असावेत कारण मंदिर, देवड्या, बारव यांचे निरीक्षण केले असता ते एकाच वेळी बांधल्याचे दिसून येते व अश्या शैलीची बारव व मंदिरे याच काळात बांधल्याचे दिसून येते.

**चौकोन रचना –** बारव एकात एक चौकोन असावेत तसे बांधकाम केल्याचे दिसून येते. सर्वात बाहेरील चौकोन सर्वात मोठा असून सर्व चौकोन चौरसाकृती आहे. बाहेरील मोठ्या चौरसाची प्रत्येक बाजू ५.८५ मीटर मापाची आहे. आतील दुसरा चौकोनाची प्रत्येक बाजू ४.९० मीटर आहे व सर्वात आतील सर्वात लहान चौकोनाची प्रत्येक बाजू ४ मीटर मापाची आहे. खालील तीन चौकोनामध्ये १.२५ मीटर उंचीचे अंतर आहे.

**प्रवेशद्वार –** बारवेमध्ये असणाऱ्या प्रवेश मार्गाची रुंदी ३.१० मीटर असल्याचे दिसून येते. पहिल्या टप्प्यातील प्रत्येक पायरी १.३५ मीटर रुंद व ०.२५ मीटर उंच आहे. जमीन समांतर ते त्याखालील चौकोन यांमध्ये ३ मीटर उंचीचा फरक दिसून येतो. खालील टप्प्यामधील पायऱ्या लहान होत जातात, सर्वात खालील टप्प्यातील पायऱ्या ह्या १ मीटर रुंदीच्या आहे. बाहेरून आत असा विचार केला असता पहिला चौकोन ते दुसरा यामध्ये ०.६० मीटरचे अंतर आहे, दुसरा चौकोन ते तिसरा चौकोन यामध्ये ०.४० मीटरचे अंतर आहे. दुसरा चौकोन ते तिसरा चौकोन यामध्ये १ मीटरचे अंतर असल्याचे दिसून येते. खालच्या चौकोनाच्या पर्यंत विहिरीची एकूण खोली ५.५० मीटर असल्याचे दिसून येते.

**३. सराय बारव –**

ही बारव सुनगावच्या पश्चिम दिशेला असून ती अष्टकोनी आकाराची असल्याचे दिसून येते. ही बारव सुध्दा प्रवासी, व्यापारी, सैनिक, वाटसरू यांच्या साठीच बांधल्याचे दिसून येते. या बारव परिसरात महादेव मंदिर असल्याचे दिसून येते. पूर्वी या परिसरात सराय असल्याने या बारवेला सराईची बारव असे म्हणतात.

**बांधकाम शैली –** ही बारव संपूर्ण विटा, चुना, व वाळू मध्ये बांधल्याचे दिसून येते. मात्र पायऱ्या व पाया यासाठी काळा स्थानिक पाषाण वापरल्याचे दिसून येते. बारव परिसरात मोठे हौद, पाणी साठवण्याचे हेतू नुसार विविध कप्पे दिसून येतात. पाणी साठ करण्यासाठी अष्टकोनी आकाराचे अनेक हौद बारवेच्या बाजूला दिसून येतात. जलव्यवस्थापनाची अनोखी पद्धत या ठिकाणी दिसून येते. मोटेचे पाणी बाहेर आल्यानंतर दोन चौकोनी व इतर अष्टकोनी हौद एकाला एक लागून बांधलेले आहे. एक एक टाके भरल्यानंतर पुढील टाक्यात आपोआप पाणी जाण्याची व्यवस्था केल्याचे दिसून येते. शेवटचा हौद लांब आयताकृती असून त्याचा उपयोग प्राण्यांसाठी पाणी पिण्यासाठी होत असावा. बारव, मंदिर यावरील स्थापत्यावर जैन प्रभाव दिसून येतो.

**मुख्य बारव –** मुख्य बारव ही अष्टकोनी आकाराची आहे. एकात एक तीन अष्टकोणी बांधकामे आढळून येतात. सर्वात आतील पाण्याजवळील अष्टकोनी बांधकामाची प्रत्येक बाजू २.२५ मीटर मापाची आहे, त्यावरील अष्टकोनी बांधकामाची प्रत्येक बाजू २.६५ मीटर मापाची आहे. सर्वात बाहेरील म्हणजेच सर्वात वरील अष्टकोनी बांधकामाची प्रत्येक बाजू २.९० मीटर मापाची आहे. सर्वात बाहेरील व सर्वात मोठा अष्टकोन हा ४.२० मीटर खोली पर्यंत आहे. त्याखाली दुसरा अष्टकोन हा १.४० मीटर खोली पर्यंत आहे. व सर्वात आतील खालून पहिला अष्टकोन हा १.५० मीटर खोलीचा आहे. म्हणजेच या बारवेची पाण्यापर्यंतची एकूण खोली ४.२० + १.४० + १. ५० = ७.१० मीटर असल्याचे दिसून येते. एकूण खोली ७.५ मीटर असावी.

**पायऱ्या –** या बारवेला पायऱ्या दक्षिणेकडून उत्तरेकडे उतरत येतात. पाण्याजवळ टोकदार कमान युक्त मोठे प्रवेश द्वार दिसून येते. प्रारंभापासून पाण्यापर्यंत एकूण १५ पायऱ्या आहेत. प्रत्येक पायरीचे माप लांबी २.५० मीटर व उंची ०.२५ मीटर आहे.

**प्रवेशद्वार –** पायऱ्या उतरून आत आल्यावर पाण्याजवळ जाण्याआधी मोठे टोकदार कमानयुक्त प्रवेशद्वार असल्याचे दिसून येते. या प्रवेशद्वाराची रुंदी २ मीटर, उंची २.५ मीटर आहे, तर कमानीला प्रारंभ १.७५ मीटर पासून होतो. कमानीच्या खाली एकूण पाच पायऱ्या आहेत.

**विटा –** या बारवेच्या बांधकाम करण्यासाठी वापरण्यात आलेल्या विटांचा दर्जा हा चोराच्या बारवेच्या विटापेक्षा उच्च दर्जाचा आहे. मात्र या बारवेच्या विटा ह्या चोराच्या बारवेसाठी वापरलेल्या विटापेक्षा नूतन प्रकारच्या म्हणजेच काळदृष्ट्या चोराच्या बारवेपेक्षा अलीकडील काळातील असाव्यात. बांधकामाचा दर्जा मात्र उत्तम प्रकारचा असल्याचे दिसून येते.

**प्रकोष्ठ –** बारवेच्या सर्वात वरील अष्टकोनाच्या भिंतीवर प्रत्येक बाजूवर एक याप्रमाणे प्रकोष्ठ दिसून येतात. हे देवडी सदृश्य प्रकोष्ठ टोकदार कमान युक्त असल्याचे दिसून येते.

**मोटेची व्यवस्था –** मोटेची व्यवस्था करण्यासाठी अष्टकोनी बारवेला लागूनच चौकोनी आकाराची दुसरी बारव असून ती तळाशी परस्परांना जोडलेली आहे. या चौकोनी बारवेतून पाणी काढण्याची सोय केल्याचे दिसून येते.

**एकखांबी महादेव मंदिर –** या बारवेच्या बाजूला एक स्तंभावर उभी असलेली महादेवाची पिंड दिसून येते. हा स्तंभ मंदिराच्या खाली भुयाराचे आत असल्याचे दिसून येते. मुख्य गाभारा तेवढाच या स्तंभावर उभा असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष –** सुनगाव मधील तिन्ही बारव ह्या एक प्रवेश द्वार युक्त आहेत. सर्वात जुनी बारव ही महादेव मंदिराची संपूर्ण काळया पाषाणात बांधलेली बारव ही चालुक्य काळातील असावी. त्यानंतरची बारव चोराची बारव ही मध्य काळात बांधलेली असावी मात्र या बारवेच्या विटांची रचना पाहता जर ह्या विटा चालुक्य काळापेक्षा प्राचीन निघाल्यास या तीन पैकी सर्वात पुरातन बारव ही असेल. सराय बारव मात्र निश्चितपणे उपरोक्त दोन बारवा पेक्षा अर्वाचीन आहे. सुनगाव मध्ये तीन बारव असल्यामुळे ह्या गावचे ऐतिहासिक महत्व समजून येते. पयनघाट मधून बऱ्हाणपूर कडे जाणाऱ्या मुख्य राज मार्गावरील वऱ्हाड मधील हे एक महत्वाचे शेवटचे ठाणे असावे. जैन धर्माच्या भरभराटीच्या काळात जामोद, अचलपूर, मुक्तागीरी या सातपुड्याच्या पायथ्याशी समांतर असणाऱ्या मुख्य तीर्थांना जोडणारा हा हमरस्ता पुढे बऱ्हाणपूर कडे जात असल्याने त्या मार्गावरील एक महत्वाचे शेवटचे ठिकाण म्हणून हे गाव व्यापारी, वाटसरू, प्रवासी, मुनी, साधू, सैन्य या सर्वांसाठी प्रिया असावे. त्यामुळेच या गावात तीन बारव दिसून येतात.

**संदर्भग्रंथ –**

१. पाठक अरुणचंद्र, ***'महाराष्ट्रातील बारव स्थापत्य'***
२ .देवकर श्याम, ***'बुलडाणा जिल्ह्यातील बारव स्थापत्य'***,
३. Hooja Rima, Challengin the Nature ...
४. Livingston Morana Milo (२००२) – Steps to Water ....
५. Niyogi Books, Delhi Hiritage ...(२०१९)
६. Jutta Jain, The Stepwells of Gujrat (२००१)
७. Christopher Tadgell, The history of Architecture in India (१९९०)
८. Shekhavat Avinash, stepwell of Gujrat (२०१०)

# आत्मनिर्भरतेतून समृध्दीकडे जातांना मराठवाड्याच्या विकासात व्यापारी पिकांच्या भूमिका

*पवार प्रियंका जयराम[१] गीता दिलीप उगले[२]*

*[1,2]संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

**गोषवारा:**

कृषी क्षेत्राचा विकास कोणत्याही देशांच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका निभावत असतो. ज्या देशाचे कृषि क्षेत्र प्रगत तो देश सर्वात जास्त समृध्दीच्या दिशेने मार्गक्रमण करत असतो. एकंदर देशाच्या आर्थिक, सामाजिक, विकासासाठी शेती क्षेत्र महत्त्वाचे आहे. विकासाची पावले उचलताना त्यास गरिबीची व बेरोजगारीची धुळ लागणार नाही. यांची प्रथम काळजी घेणे आवश्यक आहे. थोडक्यात असा समस्यामूक्त रस्ताच विकासाचा शाश्वत मार्ग असू शकतो. म्हणूनच भारतासारख्या देशात कृषी क्षेत्राचा विकास घडणे आवश्यक आहे. प्रस्तुत विषयात महाराष्ट्रातील मराठवाडा ह्या विभागाचा विचार करण्यात आलेला आहे. "आत्मनिर्भरतेतनू समृध्दीकडे जातांना मराठवाड्याच्या विकासात व्यापारी पिकांच्या भूमिका" ह्या विषयात मराठवाड्यातील व्यापारी पिकांचा अभ्यास करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील तीन पिकांचा समावेश आहे. 1) उस, 2) कापूस, 3) सर्व प्रकारच्या तेलबियाचे एकूण उत्पादन. ह्या संशोधनात उपरोक्त पिकांचे आर्थिक विवेचनासाठी प्रमाण विचलण, विलचण गुणक, सरासरी समायोजित आर चा वर्ग, वार्षिक चक्रीय वृध्दीवर, अस्थिरता निर्देशांक इत्यादीचा उपयोग केला आहे.

**प्रास्ताविक:**

कृषी क्षेत्रात नियोजनबध्द पध्दतीने काम केल्यास आपली अर्थव्यवस्था इतर प्रगत देशांच्या तुलनेत सुधारण्यास मदत होणार आहे. शेतीयोग्य जमिनीचा विचार करता. आपल्याकडे चीनपेक्षा अधिक जमीन आहे. चीनमध्ये प्रत्येक नागरिकांच्या वाट्याला सरकारी फक्त दीड एकर इतकी शेती येते. तीही सरकारने त्यांना दीर्घ मुदतीच्या करारावर दिली आहे. तरीही भारताच्या सर्वसाधारण दुप्पट होईल इतके शेती उत्पादन चीनमध्ये घेतले जाते. चीनमध्ये माओंच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट क्रांती झाली त्यावेळी चीनच्या लोकांना दोन वेळेच जेवण मिळव्या इतपत सुध्दा शेती उत्पादन होत नव्हते. आज चीनचा तांदूळ आणि गव्हाच्या उत्पादनात जगात प्रथम क्रमांक लागतो. चीनचे तांदळाचे वार्षिक उत्पादन जगाच्या उत्पादनाच्या 30 टक्के एवढे आहे. चीनमध्ये उत्पादित होणारा गहू जगाच्या 18 टक्के आहे. तर चीनचे फळे-भाजीपाला उत्पादन हे जगाच्या उत्पादनाच्या 37 टक्के आहे. चीनमध्ये कुपोषणाचे प्रमाण अत्यल्प आहे. या आकडेवारीवरुन आपल्या लक्षात येते की, चीन अॅटोमोबाईल, संगणक, मोबाईल निर्मिती तसेच औद्योगिक क्षेत्राकडे ज्या गांभीर्याने पाहतो. तितक्याच गांभीर्याने तो कृषी क्षेत्राकडे पाहतो. साधारणपणे 1978 पासून कृषी उत्पादन वाढवण्यासाठी चीनने प्रयत्न करायला सुरुवात केली. यानंतर औद्योगिक प्रगती साधत असताना सुध्दा चीनने आपल्या कृषी विकासाचा दर कायम राखला आहे. यांचे कारण म्हणजे त्यांनी कृषी संशोधन केले. अधिक उत्पादन देणाÚया बियाणाची निर्मिती केली. आधुनिक उत्पादनतंत्र शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोचविण्यासाठी तज्ञ कृषी विस्तारकांची व्यवस्था केली. अशा योजना भारतात राबवण्यासाठी भरपूर निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. भारतातील 70 टक्के लोक शेती उद्योगावर अवलंबून असूनही आपल्याकडे कृषी क्षेत्र काहीसे दुर्लक्षित राहिले आहे. 2018 पर्यंत आपल्याकडे कृषी निर्यात धोरण नव्हते देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 70 वर्षांनी आपण शेतीकडे उद्योग म्हणून पाहू लागले आहे. हजारो वर्षापूर्वी रेशमी तलम वस्त्रांचा आणि मसाल्यांचा वापर भारतात मोठ्या प्रमाणावर होता आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर शेती योग्य जमीन आहे. भौगोलिक परिस्थिती आपल्या अनुकूल आहे. तरीही शेतीतून आपल्याला अपेक्षित उत्पादन मिळत नाही. सध्या आपण आपल्या लागणाÚया खाद्यतेलापैकी 80 टक्के खाद्यतेल आयात करतो. जागतिक कृषी निर्यातीत भारताचा वाटा निव्वळ 2.4 टक्के आहे. एकूण कृषी निर्यातीत भारतीय कृषी निर्यातीचा वाटा 12 टक्के आहे. जवळपास 38 बिलियन डाॅलर इतकं उत्पन्न कृषीमालाच्या निर्यातीमधून आपल्याला प्राप्त होते. 2022 पर्यंत हाच नफा 100 बिलियन डाॅलर पर्यंत करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे.

विकासाची पावले उचलताना त्यास गरिबीची धूळ लागणार नाही. यांची प्रथम काळजी घेणे आवश्यक आहे. थोडक्यात असा धूळमुक्त रस्ताच विकासाचा शाश्वत मार्ग असू शकतो. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमानुसार राष्ट्राचे सुशासन,

सामाजिक सुरक्षा, आरोग्य कल्याणविषयक विविध कार्यक्रम त्यास जोडलेली हरित अर्थव्यवस्था त्याच बरोबर लाभार्थीसाठी. डिजिटल माध्यमातून अर्थानियोजन हे जरी गरीबी निर्मूलनासाठी भविष्यामधील उत्तम कार्यक्रम असले तरीही देशांमधील बळीराजा जोपर्यंत शेतीमधून शाश्वत उत्पादन घेत नाही. तोपर्यंत अन्नसुरक्षेला जोडलेल्या गरिबीचे निर्मूलन होणे शक्य नाही. यासाठी आत्मनिर्भरतेतून समृध्दीकडे वाटचाल करण्यासाठी व्यापारक्षम शेतीची मार्ग निवडणे आवश्यक आहे. म्हणजेच कोणत्याही देशाचा कृषी विकास आधी होणे आपेक्षित असते. तो औद्योगिक विकासाला कारण होतो. परंतु औद्योगिक विकासाचा परिणाम म्हणून कृषी क्षेत्राचा विकास होणे अश्यक्य आहे.

हरितक्रान्तीपूर्वी प्रत्येक गरीब भारतीयांच्या पोटात भूक होती. 1965 ते 75 च्या काळात देशामध्ये अन्नधान्याची समृध्दी आली कष्टकारी लोकाच्या पोटात दोन घास जावू लागले हे सर्व शेतक ऱ्यामूळे शक्य झालेले आहे. आज आपल्या देशात गहू आणि भाताचे विक्रमी उत्पादन होत आहे. अन्न महामंडळाची गोदामे ओसंडून वाहता आहेत. अनेक ठिकाणी हजारो टन धान्य उघड्यावर साठवले जाते. मूषकांचा हल्ला पुन्हा वेगळाच असे असूनही आपल्या देशात आज एक सुध्दा भूकबळी होत नाही यांचे सर्व श्रेय शेतकÚयांना जाते. गहू भातामध्ये आज भारतातील पंजाब, हरियाणा, मध्यप्रदेश आणि उत्तप्रदेश काही भाग देशाचे 90 टक्के उत्पादन घेतात. यामुळे देशाची भूक भागवली जाते. म्हणजेच देश अन्नधान्य उत्पादनात खÚया अर्थाने आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण झालेला आहे आता गरज आहे, ती समृध्दी प्राप्त करण्याची कारण समृध्दीतून शाश्वत विकास साध्य होतो.

समृध्दी का आवश्यक आहे यांचे उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते स्वा. भास्करभाऊ बोरवके यांनी सांगितले आहे की, इस्त्राईल देशात कृषी अभ्यास करण्यासाठी गेले असता त्यांना असे आढळले की, तेथे अतिशय प्रगत तंत्रज्ञान वापरुन फळे-भाजीपाला पिकवला जात असल्याचे त्यांनी पाहिले. गहू, ज्वारी, भात कुठेच त्यंना दिसले नाही. म्हणून त्यांनी तेथील शेतकऱ्याना विचारले, "तुम्ही गहू, तांदूळ पिकवत नाही मग तुमची ही गरज कशी भागते? त्यांना पुढील उत्तर प्राप्त झाले. "दोज अमेरिकन फूल्स विल डू इट फाॅर अस" म्हणजे अमेरिकतील वेडे हे धान्य आमच्यासाठी पिकवतात फळे भाजीपाल्याची महाग निर्यात करुन आम्ही स्वस्तातील गहू तांदूळ आयात करु शकतो. असे त्यांना सुचवायचे होते.

भारतात काही भागात शेतकरी शक्य असूनही आत्मनिर्भर घेण्याचा प्रयत्न करत नाही. पैसा आला समृध्दी आली की वस्तु विकत घेता येतात. सिंगापूर सारख्या छोटासा देश, जिथे शेती नगण्य आहे. ते सर्व अन्नधान्य आयात करतात. सौदी अरेबिया सारख्या वाळवंटात सर्व काही मिळते का तर ते आर्थिकदृष्ट्या सक्षम आत्मनिर्भर होण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. ह्या सर्व घटना व सद्यस्थितीचा आढावा घेतला तर लक्षात येते की, शेतकरी समृध्दीसाठी व्यापारी पिक लागवडक्षम क्षेत्र उत्पादन, उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे.

**उद्दिष्ट्ये:**

1. महाराष्ट्र व मराठवाडा भौगोलिक स्थिती अभ्यासणे.
2. मराठवाड्यातील व्यापारी पिके यांची वैशिष्ट्ये अभ्यासणे.
3. मराठवाड्याच्या विकासात (समृध्दीत) व्यापारी पिकांची भूमीका अभ्यासणे.
4. मराठवाड्याचे आर्थिक मागासलेपणाची कारणे शोधताना कृषी उत्पादकता व पूरक बाबींचा विचार करणे.

**संशोधन मर्यादा:**

प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच यामध्ये प्रामुख्याने ऊस, कापूस, सर्व प्रकारच्या तेलबियांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी इ.स. 2004-05 ते 2015-16 पर्यंतचा कालखंड लक्षात घेतला आहे.

**संशोधनाची पध्दती:**

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम आधार सामग्रीवर आधारित आहे. तथ्य संकलन, वर्गीकरण, सारणीयन इ. साठी सांख्यिकीय पध्दतीचा वापर करण्यात येईल आलेला आहे. तसेच अर्थनिर्वाचनासाठी समांतर मध्य, भूमितीय मध्य, प्रमाण

विचलन, विचन गुणक सहसंबंध गुणव चाचणी इ. सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे. मराठव्द्यातील उत्पादकता, उत्पादन आणि क्षेत्र विषमतेचे मापन करण्यासाठी वृध्दीदर (CAGR) आणि अस्थिरता निर्देशांक या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

CAGR (Copound Anual Grouth Rate)

सूत्र: Y=abt

Logy = Loga + Logb

येथे:

Y = Area, Produation, Pralutivity

a = Constant term

b = Regression coefficent

t = time variable in year

Instability Index :

Mean

S.D.

C.V.

Regration

$AdR^2$

Fromula :- II = CV. $\sqrt{1-R^2}$

येथे:

Mean = समांतर मध्य

S.D. = प्रमाण विचलन

C.V. = विचलन गुणक

Regression = प्रतिपगमन

$AdR^2$ = Adjusted R Squared

$R^2$ = is the coefficeient of determination from a time Regression.

मराठवाड्यातील निर्देशांक व चक्रवाढ वार्षिक वृध्दीदर विश्लेषण:

तक्ता क्र. 1

मराठवाड्यातील ऊस, कापूस, सर्वप्रकारच्या तेलबियाचे सरासरी, प्रमाण विचलन, विचलण आणि Adjusted R Squared (समायोजित R चा वर्ग) (2004-05 ते 2015-16)

| पिके | घटक | सरासरी | S.D. | C.V. (in%) | $AdR^2$ | CAGR | II |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उस | क्षेत्र | 2031 | 688.2885 | 33.88% | 0.148 | 12.23% | 31.27% |
| | उत्पादन | 136612.6 | 51915.03 | 38.0017% | -0.052 | 10.28% | 38.97% |
| | उत्पादकता | 68.62727 | 9.735409 | 14.19% | 0.092 | -2.187% | 13.52% |
| कापूस | क्षेत्र | 14335.73 | 2985.088 | 20.83% | 0.980 | 6.24% | 2.94% |
| | उत्पादन | 21092.73 | 8368.52 | 39.68% | 0.101 | 0.3078% | 37.61% |
| | उत्पादकता | 245.9091 | 78.58397 | 31.96% | -0.110 | -5.429% | 33.67% |
| तलेबिया | सर्वक्षेत्र | 12347.27 | 1031.612 | 8.36% | 0.321 | 2.60% | 6.88% |
| | उत्पादन | 11566.91 | 5188.715 | 44.86% | 0.117 | -1.50% | 42.15% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उत्पादकता905.7727 | 384.0956 | 40.40% | 0.136 | -4.44% | 39.41% |

1. II अस्थिरता निर्देशांक
2. CAGR = चक्रीय वार्षिक वृध्दिदर (2004-05 ते 2015-16)

**विश्लेषण:**

संशोधनात महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील व्यापारी पिकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तक्ता क्र. 1 मध्ये मराठवाड्यातील ऊस, कापूस, सर्व प्रकारच्या तेलबिया यांचे सरासरी प्रमाण विचलनण, विचरण गुणक, प्रतिपगमण, वार्षिक चक्रवाढ वृध्दीदर व अस्थिरता निर्देशांक दर्शविलेला आहे. येथे चक्रवाढ वृध्दीदर हा The CAGR examines the tendency of a variable to increase decrease of stagnant over a decade of time it also explains the magnitude of the rate of change in variable under the consideration per unit of time. The compound annual growth rates were worked out in the area, Production and Productivity of commercial crops of Maharastra using exponential production function. येथे अस्थिरता निर्देशांक देखिल काढण्यात आलेला आहे. जो examine the nature of degree of instability in the area, production, Productivity. of commercial crops in Marathwada.

The variation of the coefficient was worked out for, area, Production and Productivity to masseur of variability However, simple C.V. does not explain Properly the trend component inherent in the time series data. To Overcome this Problem a measure of instability was optimated by using the cuddy Delta value Index. which corrects the coefficient of variations.

The rang of CDVI (II) are given as follows

1) Low instability : between 0 to 15
   Medium Instability : greater than 15 and lower than 30
   High instability : : greater than 30

The index of instability was competed to study the variability in area, Production and Productivity of Selected crops. the instability index indeicates the high risk of caltivation of that crops. If the index is less than 40% than it is probably stable in the test tube if it is greater (for example exption) than it is probably not stable.

उपरोक्त तक्ता क्र. 1 मध्ये काढण्यात आलेल्या अस्थिरता निर्देशांक व वार्षिक चक्रवाढ वृध्दीदर इत्यादीचे विश्लेषण केले आहे. उपरोक्त तक्ता क्र. 1 मध्ये 2004 ते 2016 पर्यंतच्या मराठवाड्यातील उस, कापूस, तेलबियाचे सरासरी उसाचे उत्पादन, उत्पादकता व क्षेत्राचा सरासरी अनुक्रमे 136612.6, 68.62727 आणि 2031 आढळतेतर प्रमाण विचलन 51915.03, 9.735409 आणि 688.2885 ऐवढे आहे. मराठवाड्याच्या उस उत्पादनात विचरण गुणक हा उत्पादन 38.0017%, उत्पादकता 14.19% आणि क्षेत्र 33.88% आहे. उस उत्पादनातील Fluctuation मराठवाड्यात सर्वाधिक आढळते, तर क्षेत्रातील Fluctuation कमी प्रमाणात आढळते. कापूस उत्पादनातील Fluctuation क्षेत्रातील 20.33% उत्पादनातील 39.68% आणि उत्पादकतेत 31.96% आढळते. तेलबिया क्षेत्रातील Fluctuation 8.36% सर्वात कमी तर उत्पादनातील Fluctuation 44.86% सर्वात जास्त आढळते. तसेच 40.42% उत्पादकतेतील Fluctuation आढळते.

मराठवाड्यातील चक्रवृध्दीदराचा विचार केल्यास तो पूढील प्रमाणे आहे. मराठवाड्यातील उस क्षेत्राचे, उत्पादनाचे आणि उत्पादकतेचा चक्रवृध्दीदर अनुक्रमे 12.23%, 10.28% आणि -2.187% आढळतो. मराठवाड्याच्या उस उत्पादकतेतील चक्रीय वार्षिक वृध्दीदर ऋणात्मक स्वरुपात आहे. तर क्षेत्र आणि उत्पादनाचे धनात्मक स्वरुपात आढळतात. उत्पादकतेतील ऋणात्मक वृध्दीदर हा उत्पादनाच्या वाढीवर विपरीत परिणाम करतो तर क्षेत्र वाढीचा

वृध्दीदर उत्पादनावर धनात्मक परिणाम करताना आढळून येतो. कापसासंदर्भात देखिल मराठवाड्यात उसासारखीच स्थिती अभ्यासांती आढळून येते.

कापूस उत्पादन, उत्पादकता क्षेत्रातील चक्रीय वार्षिक वृध्दीदर अनुक्रमे 0.3078%, -5.429%, 6.24% आढळते. तेलबियाच्या चक्रीय वृध्दीदर क्षेत्राचा 2.60% आहे. उत्पादन व उत्पादकतेचा चक्रीय वृध्दीदर हा ऋणात्मक स्वरुपात आढळतो. अनुक्रमे उत्पादन व उत्पादकतेचा चक्रीय वृध्दीदर -1.50%, -4.44% आहे. म्हणजेच मराठवाड्यातील उत्पादकतेचा उत्पादन वाढीवर ऋणात्मक परिणाम होतो. तर क्षेत्रवाढीचा धनात्मक वृध्दीदर देखिल उत्पादन वाढीस पोषक सिध्द होत नाही.

महाराष्ट्रातील शेतकऱ्याना आत्मनिर्भरतेतून समृध्दीकडे वाटचाल करण्यासाठी खऱ्याअर्थाने व्यापरक्षम शेतीची साथ धरणे आवश्यक आहे. यासाठी व्यापारी पिकांची क्षेत्रवाढ, उत्पादनवाढ, उत्पादकता वाढ आवश्यक आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाचा विचार केल्यास ह्या विभागात एकूण 8 जिल्हे येतात त्यापैकी 90 टक्के जिल्हे हे कायमस्वरुपी दुष्काळ समस्येस सामोरे जातात. उर्वरित 10 टक्के भाग हा पर्जन्यछायेच्या कृपादृष्टीत आहे. मराठवाड्याच्या पाणीसाठ्याचा विचार केल्यास मराठवाड्यात 13 मोठे, 14 मध्यम व 287 लघुपाठबंधारे आहेत. सर्व पाणीपुरवठ्याचा योग्य व पारदर्शक पध्दतीने वापर केल्यास व्यापरक्षम शेती मराठवाड्यात देखील शक्य आहे. हे उपरोक्त माहितीच्या आधारे सिध्द होते. महाराष्ट्रातील शेतीचा विचार केल्यास शेतीव्यवसाय सद्या काढणी पश्चात कार्यक्षमता आणि बाजार जोडणी कार्यक्षमता हे दोन्ही विषय पूर्णतः दुर्लक्षित आहे. यांचाही विचार होणे आज घडीला आवश्यक ठरते.

अस्थिरता निर्देशांकाचा विचार केला असता असे दिसते की, मराठवाड्यातील उस क्षेत्रफळाचे अस्थिरता निर्देशांक 31.27 टक्के आढळतो. म्हणजेच ही क्षेत्रातील अस्थिरता मराठवाड्यात जास्त आहे. 2004 ते 2016 पर्यंत केलेल्या अभ्यासात मराठवाड्यातील उत्पादनाची अस्थिरता निर्देशांक 38.97 टक्के आहे. हा देखिल प्रचंड प्रमाणात दिसतो. क्षेत्रातील अस्थिरता ही उत्पादनात जास्त प्रमाणात अस्थिरता निर्माण करते. आणि उत्पादकतेतील कमी अस्थिरतात 13.52 टक्के ही उत्पादनात क्षेत्राच्या तुलनेत कमी प्रमाणात अस्थिर आहे. म्हणजेच उस उत्पादनात अस्थिर क्षेत्राचे अस्थिरतेचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. मराठवाड्याच्या संदर्भात कापूस उत्पादनातील अस्थिरता ही उत्पादकतेमुळे आढळते. कापूसाचे क्षेत्र हे स्थिर असल्याचे, कमी असल्येल्या अस्थिरता निर्देशांकावरुन सिध्द होते. क्षेत्राचा अस्थिरता निर्देशांक प्रमाण 2.94 टक्के तर उत्पादनात जास्त अस्थिरता निर्देशांक प्राप्ता होतो, 37.61 टक्के तर उत्पादकता निर्देशांक 33.67 टक्के आहे. कापसाच्या उत्पादनात प्राप्त होणारी अस्थिरता हे उत्पादकतेचे अस्थिर असण्याचे फलित आहे. तेलबियाचा विचार केल्यास कापसासारखेच प्रमाण आढळते. क्षेत्र निर्देशांक 6.88 टक्के तर उत्पादन निर्देशांक 42.15 टक्के आणि उत्पादकता निर्देशांक 39.4 टक्के तेलबियाच्या उत्पादानातील उच्च अस्थिरता निर्देशांक मराठवाड्यातील तेलबियांच्या उत्पादकता वाढीकडे लक्ष देण्याचे सुचित करतो. कारण तेलबियाचे क्षेत्राचा अस्थिरता निर्देशांक स्थिर व कमी प्रमाणात आहे. म्हणजे क्षेत्रात कमी अस्थिरता दिसते परंतु उत्पादन वाढीसाठी उत्पादकता वाढीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष:**

आत्मनिर्भरतेतून समृध्दीकडे जाताना मराठवाड्याच्या विकासात व्यापारी पिकांच्या भमिका अभ्यासताना मराठवाड्यातील कृषी भौगोलिक स्थितीचा आढावा घेतला गेला जो व्यापारी पिकांच्या लागवडीसाठी उपयुक्त असल्याचे आढळून आले. संशोधनात व्यापारी पिकांचे वैशिष्ट्ये, भूमिका व महाराष्ट्रातील मागासलेल्या प्रदेशास प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण करताना व्यापारी पिकांची आवश्यकता का आहे याचे स्पष्टीकरण अस्थिरता निर्देशांकाद्वारे करण्यात आले आहे. यातून मराठवाड्यात उस क्षेत्र वाढीचे उत्पादनावर चांगले परिणाम आढळून आले. पण उसाचे उत्पादन वाढीत मराठवाड्याची उत्पादकता कमी असल्याचे स्पष्ट होते. म्हणून उसाची एकरी उत्पादकता वाढीसाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच व्यक्तीगत पातळीवर शेतकरी वर्गाने नवीन कृषी बी-बियाणे, यांचा स्वीकार करत. नव-नविन संशोधनास प्रोत्साहित करावे लागेल. कापूस व तेलबिया क्षेत्रातील स्थिरता उत्पादनावर उत्पादकेतील अस्थिरततेचे फलित असल्याचे दिसून आले. यासाठी कोणत्याही मागासभागात विकासासाठी पोषक हवामान असतानाही त्या भागाचा विकास

होत नसेल तर त्यासाठी उपयुक्त नैसर्गिक संसाधनाचां पुरेशा प्रमाणात म्हणजे त्यांच्या उपयोगितेनूसार उपयोग होत नाही. क्षमता असतानाही ते घटक निष्कीय स्वरुपात पडून आहे. म्हणूनच ह्या भागाच्या विकासासाठी शेती क्षेत्राकडे लक्ष देणे अगत्याचे आहे.

**संदर्भ:**

1. ए.बी. सवदी - भूगोलाची मूलतत्त्व खंड-2
2. डाॅ. विलास खंदोर - विकास व पर्यावरणीय अर्थशास्त्र
3. डाॅ. दत्ता देशकर - संकल्पना शाश्वत शेतीची
4. डाॅ. रंजन गर्गे - शाश्वत विकास
5. भुजंगराव कुलकर्णी - मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन
6. मराठावाडा 2001 - खंड-1
7. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2004-05 ते 2015-16

# आधुनिक नकाशाशास्त्र : GIS व रिमोट सेन्सिंगचे भूगोलशास्त्रात महत्व

***डॉ. बबन क. सिनगारे***
*भूगोल विभाग प्रमुख, द.ग.तटकरे महाविद्यालय, माणगाव रायगड.*

**प्रस्तावना :**

सुदुरसंवेदन तंत्र **(Remote sensing technique)** व संगणक तंत्रातील झालेल्या प्रगती बरोबरच मागील दोन दशकामध्ये भौगोलिक माहिती प्रणाली **(GIS)** या तंत्राचा मोठया प्रमाणात विकास झाला आहे. याचा उपयोग भूगोलामध्ये विविध क्षेत्रात संधोनासाठीही केला जात आहे. मानवाचा जसाजसा विकास होत गेला तसतसा त्याच्या संसाधना विषयीच्या गरजा वाढत गेल्या आणि या गरजा पूर्ण करण्यासाठी मानव नविन तंत्रज्ञानाचा विकास करू लागला. आज मानव निरनिराळया शास्त्राचा अभ्यास करून नविन तंत्रज्ञानाचा विकास करीत आहे.

**टेंग (Teng -1986)** यांच्या मते, 'भौगोलिक माहिती प्रणाली म्हणजे नकाशाशास्त्रीय प्रतिमानाच्या रुपाने क्षेत्रिय विश्लेषण स्पष्ट करणारे तंत्र होय.

**रास्टेर (Raster- 1989)**, सुदूर संवेदन तंत्र, संगणक इ. चा उपयोग करून स्थानिक, प्रादेशिक, आंतरराष्ट्रीय इ. क्षेत्रातील माहिती संग्रहीत करण्याचे, वेगवेगळया घट कातील संबंध स्पष्ट करणारे व पायाभूत नकाशे तयार करण्याचे तंत्र म्हणजे भौगोलिक माहिती प्रणाली होय.

नकाशाशास्त्राच्या प्राचीन काळापासून महत्वाचे स्थान आहे. प्राचीन नकाशाशास्त्रात आज अनेक बदल घडून आलेले आहे. याला कारण म्हणजे मानवांनी केलेली तंत्रज्ञानातील प्रगती होय. आज भूगोल विषयाच्या ज्ञानाच्या शाखा रूंदावलेल्या आहे याला कारण म्हणजे भूगोलशास्त्रात नविन तंत्रज्ञानाद्वारे अभ्यास होत आहे. भूगोल विषयास नकाशाशास्त्रात अन्यय साधारण महत्व आहे. भूगोलचा ९९ टक्के अभ्यास हा नकाशा, आकत्या आलेखा द्ववारे होतो. म्हणजेच नकाशाशास्त्र भूगोलशास्त्राचा कणा आहे. म्हणून Dueley stamp यांनी म्हटले आहे की, " The Map is the Tool the Geography" नकाशा काढण्याच्या कलेला नकाशाशास्त्रात Chtrography म्हणतात. या नकाशाशास्त्रात आधुनिक पद्धती द्वारे नकाशा तयार करण्यात येत आहे. यामध्ये सुदूर संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणाली याच्या साहयाने नकाशाशास्त्रात नवीन बदल घडून आलेला दिसतो. त्यामुळे भूगोल शास्त्रात विविध क्षेत्रीय अनुषंगाने आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सोबतच भौगोलिक माहिती प्रणालीचे अतिमहत्वाचे तंत्र जगाला मिळाले आहे. नकाशाशास्त्रात हे एक महत्वाचे नवीन बदल आहे. १९६० च्या दशकापासूनच मानवाला उपयुक्त ठरत आहे.

**जि.आय.एस./ भौगोलिक माहिती प्रणाली /GIS :**

जि.आय.एस. हे एक प्रकारचे महत्वाचे तंत्रज्ञान असून त्या प्रक्रियेद्वारे भौगोलिक गोष्टीचे संशोधन, विश्लेषण, नियंत्रण व व्यवस्थापन इत्यादी संबंधी कार्यवाही केली जाते. आणि भौगोलिक ज्ञानाचा साठा वाढत आहे. ज्ञानाचे कंगोरे असलेल्या या तंत्राची अफाट, प्रचंड विश्लेषण क्षगता असल्यामुळे त्यांचा भौगोलिक वापर वाढत आहे. माहितीच्या या प्रणालीत संगणक संहीता (Hardware) मुद्रांक ( Printer ) या सोबत संहिता (Software) इत्यादी घटकाचा समावेश असून त्याचे अवकाशीय सांख्यिकी (Spatial data) सोबत एकात्मिक उपयोग करतात. जी.आय.एस. वापरतांना विविध यंत्रणा आणि तंत्रज्ञ इत्यादी.

**जि.आय.एस.चे महत्वपूर्ण घटक :**

या यंत्रणेची प्रमुख तीन वैशिष्टे लक्षात येतात.

१. संगणक प्रणाली म्हणजेच संगणक वाचक व विश्लेशण प्रणाली.
२. भौगोलिक सांख्यीकी प्रणाली.
३. सांख्यिकीचे विश्लेषण व पृथक्करण करणारी प्रणाली

संगणक प्रणालीत संगणक Computer मुद्रांक व आरेख Plotter याचा समावेश होतो. या द्वारे नकाशाशास्त्र Cartography संगणकशास्त्र पर्यावरणशास्त्र जीओएसी Geodesy भूदृश्य स्थापत्य Landscape Architecture हवाई छायाचित्र, मापनशास्त्र, संख्याशास्त्र व सर्वेक्षण इत्यादी संबंधीचा अभ्यास करणारे तंत्र आहे.

भौगोलिक माहिती प्रणालीस खालील विविध नावाने ओळखले जाते त्यावरून या प्रणालीचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत हो ते.

१. बहुउद्देशीय भौगोलिक माहिती प्रणाली
२. संगणकीय भौगोलिक माहिती प्रणाली
३. साधन संपत्ती माहिती प्रणाली
४. नियोजन माहिती प्रणाली
५. अभिक्षेत्रीय माहिती हाताळणी प्रणाली
६. पर्यावरणीय माहिती प्रणाली
७. भूमी माहिती प्रणाली
८. अभिक्षेत्रीय माहिती प्रणाली

**नकाशाशास्त्रीक कार्ये Cartographi Functions :**

हे GIS चे प्रमुख कार्य आहे. आधारसामुग्रीच्या आधारावर नकाशाशास्त्राच्या अनेक पैलूंची कुशल हाताळणी करता येते. भौगोलिक आधारसामुग्री हाताळणीनुसार GIS चे सर्वसाधारण दोन गट पडतात.

१. आधार संदिश GIS (Base Vector)
२. आधार जाळी GIS (Base Rester )

यांचे एकमेकात रूपांतर करणे, प्रमाण बदल (Scale Changes) प्रक्षेपण बदल (Projection Changes) नकाशा सौदर्यवर्धन (Map Embellishment) मध्ये प्रमाण, मथला, उत्तर बिंदू, संकेत सूची इत्यादीचा नोंदीचा समावेश होतो.

**सुदूर संवेदन (Remote Sensing)**

रिमोट सेन्सिंग सुंदर संवेदन ही एक कला आणि शास्त्र आहे. रिमोट सेन्सिंगमध्ये आकडेवारिच्या नोंदी, यांची नोदणी करुन केलेल्या मोजमापांनुसार अभ्यास केला जातो. त्यावरून माहिती तयार केली जाते. सुदूर संवेदनाच्या साहयाने अवकाशीय सर्वेक्षणातून विविध माहिती मिळविली जाते याद्वारे भूशास्त्रे व त्यांच्या शाखा, शेती हवामान शास्त्र व इतर शास्त्रे यांचा अभ्यास करणे सुलभ झाले आहे. विशिष्ट साधनांच्या (संवेदक, संगणक इ.) साह्याने एखादया घटकाचे त्याच्या प्रत्यक्ष संपर्कात न येता, काही अंतरावरून, निरीक्षण व ओळख करून त्याचे संख्यात्मक व गुणात्मक मापन करण्याचे तंत्र म्हणजेच सुदूर संवेदन तंत्र होय. भूपृष्ठावरील वस्तू किंवा प्रदेशाचे व त्याच्या सभोवती घडणाऱ्या नैसर्गिक क्रिया व विविध घटनासंबधी विशिष्ट साधनांच्या साह्याने, दुरून माहिती मिळवून तीचे विश्लेषण करण्याचे तंत्र म्हणजे सुदूर संवेदन होय. सुदूर संवेदनात अत्याधुनिक संवेदन प्रणालीच्या अभ्यासाला फारच महत्व आहे. ह्या प्रणालीच्या साहयाने जी माहिती गोळा केली जाते. ती प्रतिमा ग्राहक छायाचित्राच्या स्वरूपात चित्रीत होउन त्यांची व्यवस्थित नोंद करण्यात येते. सध्या Imaging device म्हणून हवाई कॅमेरे यांची मदत घेतली जाते. व Multi Spectral Scanner यांची मदत घेतली जाते. व Sidelooking Airborne Scanner अशा प्रकारे सेन्सॉरचे १. पॅसिव्ह सेन्सॉर, २. ऍक्टीव्ह सेन्सॉर असे दोन प्रमुख प्रकार पडतात. पॅसिव्ह सेन्सॉरसाठी बाहय शक्ती म्हणजे सूर्य काम होते. त्याद्वारे भूपृष्ठावरील खडक, माती, पाणी, वनस्पती इत्यादी पदार्थ स्वतःचे वैशिष्ट प्रगट होईल अशा रितीने Infrared किरण परावर्तित येतात, हया रंगामुळे वनस्पतीच्या वाढीतील अनिमियता, वेगळी माती, भूजल साठयाची परिस्थिती, प्रस्तरभंग प्रणालीची शेषरूप लक्षात येण्यास मदत होते. साधारण पणे संवेदनाची सुरूवात १८५८ मध्ये पॅरीस येथे झाली. पूर्वी सुदूर संवेदनाचा वापर युद्धामध्ये शत्रुची माहिती गोळा करण्यासाठी करण्यात आला. विसाव्या शतकापासून अवकाशीय छायाचित्राचा वापर भूशास्त्रीय कामासाठी होवू लागला. १९५७ मध्ये पहिला मानवी उपग्रह अंतराळात फिरू लागल्यावर सुदूर संवेदनामार्फम असंख्य मानवी उपयोगीची सर्वेक्षण करणे मोठया प्रमाणावर सहज शक्य झाले. १९६० मध्ये टिरॉस हा मानवी उपग्रह हवामानाचा, विमानाचा अभ्यास करणारा मानवी अमेरिकी उपग्रह फिरू लागला. १९६४ मध्ये निंबस उपग्रह ज्यात उपारूण घेण्याची सोय होती, अशा प्रकारचे अनेक उपग्रह पृथ्वी भोवती फिरत असून कार्य करीत आहेत. उपग्रही छायाचित्रे, प्रतिभा चित्रांचा नकाशाशास्त्रात महत्वाचे स्थान आहे. भूपृष्ठावर ज्या गोष्टीची कल्पना येत नाही. त्या प्रतिमा

चित्रात झटकन लक्षात येतात. निरनिराळया ऋतूत निरनिराळया बदलाची कल्पना येते. दूरवर पसरलेल्या तुटक तुटक भागाचा अर्थ लावून त्यातून विशाल संरचनेचा बोध होतो.

अशा प्रकारे सुदूर संवेदनाद्वारे भौगोलिक अभ्यास क्षेत्रात फार मोठा वाटा आहे.

**व्याख्या :**

एखाद्या वस्तूला स्पर्श न करता दूरूनच छायाचित्र घेवून त्या विषयीची संपूर्ण माहिती प्राप्त करणे यालाच सुदूर संवेदन म्हणतात.

**फिसचर :**

सुदूर संवेदन ही एक अशी कला किंवा विज्ञान आहे की जो कोणत्याही वस्तुशी संपर्क न करता त्या वस्तुबद्दल माहिती प्राप्त करीत असते.

**लिंटज व सिमोनेट :**

कोणत्याही वस्तूशी संपर्क न ठेवता त्या वस्तू बाबतीत भौतीक आकडे प्राप्त करणे.

**उद्देश :**

1. GIS भौगोलिक माहिती प्रणाली या तंत्राज्ञानाचे विविध उद्दिष्टे पृथ्वीवरील पर्यावरणीय व परिस्थितीक प्रकियाचे मापण करणे तसेच भूपृष्ठीय वातावरणीय आणि जैविक माहिती संबंधीचा सांख्यिकीय माहिती मिळविणे हे मख्य कार्य आहे. व त्या सांख्यिकीय आकडेवारीच्या आधारावर नकाशा,आकृत्या, आलेख तयार केल्या जातात.
2. या तंत्रज्ञानामुळे भुजल संचय, भूमी उपयोजना, आपत्तीजनक घटक यांचे अचूक मूल्यमापन होत असते.
3. जि.आय.एस. तंत्रज्ञानात दुरस्थ संवेदन, संगणक, उपग्रह प्रतिभा व इंटरनेट या साधनाचा फार मोठा वाटा आहे. त्यामुळे भूगोल विषयात महत्वचे स्थान आहे.
4. लोकसंख्या वितरण,संपर्क साधने, मार्गाचे वितरण या शिवाय प्रदूषणाची या शिवाय प्रदूषणाची तीव्रता, नदीचे खोरे नियोजन, पूर इ.भौगोलिक घटकाचा अभ्यास करण्याकरिता या तंत्रज्ञानाचा फार महत्वाचा उपयोग होतो.
5. सुदूर संवेदनाद्वारे पृथ्वीवरील वेगवेगळया घटकाची उपयुक्त माहिती गोळा करून ती मापन संसाधनासाठी वापरले हे मुख्य उद्दिष्टे आहे. त्यासाठी कॅमेरे, सेन्सरत जहाज, अंतरिक्ष यान, मानवी उपग्रह यांचा वापर केला जातो. याद्वारे माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संगणकात वेगवेगळे सॉप्टवेअर वापरले जातात.
6. सुदूर संवेदनाचे प्राथमिक उद्दिष्टे विद्युत चंबकीय वर्णलेखाच्या विशिष्ट भागातील उर्जा शोधून त्याची व्यवस्थीत नोंद करण्यात येते.
7. सुदूर संवेदनाव्दारे जी माहिती घेतली जाते ती छायाचित्राच्या स्वरूपात चित्रीत घेवून त्याची व्यवस्थीत नोंद करण्यात येते.
8. भूपृष्ठावरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांची दुरून नोंद घेवून त्याची प्रतिमा तयार केली जाते यास संवेदक म्हणतात.

**• भौगोलिक अभ्यासात माहिती प्रणाली व सुदूर संवेदन तंत्राचे महत्व :**

भौगोलिक अभ्यास क्षेत्रात GIS आणि सुदूर संवेदनाचे महत्व फार वाढले आहे.

1. पृथ्वीवरील विस्तृत क्षेत्रातील व्यापक व अतिदुर्गम भागाची संपूर्ण व्यवस्थित व अचूक माहिती प्राप्त येते.
2. नैसर्गिक आपत्तीची. जसे भूकंप, ज्वालामुखी, महापूर, वादळे, सुनामी, याची सहजपणे सहजपणे माहिती उपलब्ध तसेच सुदूर संवेदनाद्वारे भूगोल अभ्यासात आवश्यक असलेले घटक उदा.जंगले, वाळवंट, शहरे, नदीमार्ग,तलाव, क्षारयुक्त जमीनी सहजपणे ओळखता येते.
3. आपल्या नजरेला न दिसणारे अनेक लहान मोठे भौगोलिक घटक Bird eyes vealसुदूर संवदेक द्वारे नजरेत सुटू शकत नाही.

4. भूगर्भातील खनिज पदार्थ, पाण्याचा साठा, धातु - अधातु सागर पृष्ठाचे तापमान, वादळी संकेत, आजचे ग्रामीण व शहरी मानवी प्रदूषण कारखाने, औद्योगिकरण, हवामानातील बदल, वन्य प्राणी इ.चा अभ्यास करण्यास भूगोल अभ्यासात GIS आणि सुदूर संवेदनाचे महत्वाचे स्थान आहे.
5. उपग्रहातील कॅमेरे व स्कॅनर या उपकरणाच्या साहायाने सर्व माहिती संकलित करून छायाचित्रे प्राप्त करून त्याचे विश्लेशन करून सांख्यीकीय आकडेवारी संकलित केली जाते. व त्यावरून नकाशे, आकृत्या आलेख तयार केले जाते.
6. GIS हे संशोधन, साधसंपत्ती विकास व नियोजन पर्यावरणीय आघात नागरी नियोजन नकाशाशास्त्र,गुन्हेगारीशास्त्र, इतिहास, आपत्ती व्यवस्थापन, उद्योग व्यवस्थापन, व्यापार आरोग्य इत्यादी सर्वच क्षेत्रात लाभदायक ठरते.
7. ७. भूगोलातील हवामानशास्त्र, जलविद्युत Hydrology मृदशास्त्र Soil Science परिवहन भूगोल Transport Geography यांचा अभ्यास व नियोजनास अधिक महत्त्व प्राप्त झाले.
8. ८. इ.स. २००८ मध्ये भारताच्या अंतर्गतच्या GIS च्या वापराने देशाचा पहिला समताप नकाशा तयार करण्यात आला.

९. विस्तृत क्षेत्राचा अभ्यास करणे
१०. चित्ररूप व सांख्यिकी संवेदनाने पृथ:करण् करणे
११. अचूकता निर्माण करणे
१२. विविध क्षेत्रातील उपयोगिता
१३. सांख्यिकी नकाशे, भौगोलिक माहिती प्रणालीतील नकाशे तयार करणे

**भारतीय GIS**

1. भारतीय संगणक, अवकाश संशोधन, सदूर दूरसंवेदन क्षेत्रातील कामगिरी GIS च्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत पोषक ठरली.
2. इ.स.१९८६ मध्ये भारतात इस्त्रीने या संस्थेने ISRO स्वतंत्र GIS ची स्थापना केली.
3. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस TCS कंपनीने भारतात इ.स. १९९१ पासून GIS सेवा पुरविण्यास प्रारंभ केला.
4. शार SHAR श्रीहरीकोटा
5. स्पेस अप्लिकेशन SAC अहमदाबाद
6. नॅशनल रिमोट सेन्सिंग एजंसी NSA हैद्राबाद
7. नॅशनल रिमोट सेन्सिंग एजंसी NRSA देहरादून

**निष्कर्ष :**

Remote Sensing & GIS हे आपल्या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात त्यांच्या अंतभूत गुणवैशिष्टयांमुळे सर्वच ज्ञानशाखांना त्याचा फायदा होत आहे. नकाशाशास्त्रात ती GIS आणि रिमोट सेन्सिंग हे आधुनिक Technology आपल्या भूगोल विषयाच्या अभ्यासात महत्वाची देणगी ठरली आहे. आणि सुदूर संवेदन द्वारे विविध पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधने आणि मानवनिर्मित व त्याला अपेक्षित शोध व संशोधन होवून आज प्रत्येकच उद्दिष्टे पूर्ण परिस्थितीवरील उद्दिष्टे व त्याची निष्कर्ष काढण्यात भारतीय संशोधक तसेच विद्यार्थी GIS सुदूर तंत्राचे महत्व वाढले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. डॉ.नागतोडे/ डॉ.लांजेवार - नकाशाशास्त्र व प्रात्यक्षिक भूगोलशास्त्र
2. एस.ए.डयुरी - रमेज इंटरप्रिटषेन इन जिऑलॉजी
3. देशपांडे व प्रा. कोलते – भूगोल शास्त्र परिभाषाकोष राज्य मुंबई २०००
4. डॉ.कार्लेकर श्रीकांत आणि डॉ.काळे मोहन - भूगोल शास्त्रातील संशोधन पद्धती
5. डॉ. एम.एस.सिसोदिया - उपकार प्रकाषन आगर -२
6. www.wikipedia org/GIS
7. http: www.maayboli.com
8. क्युहॅओ वेंग - रिमाट सेसींग ॲड जी.आ.एस. इंटीग्रेश

# महाराष्ट्राच्या शेतीवर हवामान बदलाचे परिणाम व व्यवस्थापन

***प्रा. डॉ. घार एस. जी.***
*भूगोल विभाग, जयक्रांती कला व वाणिज्य वरिष्ठ महा. लातूर*

**प्रस्तावना**

हवामान बदल म्हणजेच जागतिक तापमान वाढ 12 वर्षाव यांचे प्रमाण आणि किती दशकाहून अधिक काळ असणारे हवामान यामध्ये महत्वपूर्ण बदल याचा संदर्भ हवामान बदल ही नैसर्गिक घटना आहे.पृथ्वी अस्तित्वात आल्यापासून घडत आहे हवामानबदल एखाद्या दिलेल्या क्षेत्राच्या किंवा प्रदेशाच्या सरासरी हवामानातील बदल आहे. यात तापमान वारा वर्षाव यांचा समावेश होतो. याशिवाय वाहनांची संख्या वाढत या कारखानदारांची वाढत्या एअर कँडी रान इमारती या सातत्याने कार्बन डायॉक्साईडचे उत्सर्जन वाढवीत आहे याचा परिणाम शेतीवर जास्त प्रमाणात झालेला आहे.

पृथ्वी भोवतीच्या वातावरणाचे आणि हवेचे तापमान वाढल्यास हवेत चे दाब कमी होतात वारे त्या भागावर मोठ्या प्रमाणावर भास्कर होउन आणतात यातून ठेव निर्मिती होते आणि अशा कमी हवेच्या दाबाच्या पट्ट्यात अतिवृष्टी होते आणि दुष्काळी परिस्थिती दुसऱ्या भागात निर्माण होते अशा प्रकारच्या हवामान बदलामुळे काही ठिकाणी ठकू की कुठे अतिवृष्टी महापूर दुष्काळ जनावरांचा चारा पाणी प्रश्न असे अनेक प्रश्न दुष्काळी परिस्थितीमुळे शेती कमी पाणीपुरवठा त्यावर होणारा परिणाम या सर्व परिस्थितीचा सामना करण्यास भाग पडत आहे.

हवामान बदल आणि चटपर सर्वजण धास्तावले आहेत 2015 मध्ये पॅरिसमध्ये जागतिक परिषद झाली यात हवामानबदलाचे परिणाम कमी करण्यासाठी उपाय योजना ेल्या मात्र हवामान बदल आणि जागतिक सर्व देशाचे अन्नसुरक्षा धोक्यात असल्याने त्या विषयावर सखोल चर्चा करून शेतकऱ्यांसाठी नवीन धोरण ठरवणे गरजेचे होते जसे त्यात घडले नाही.

**अभ्यास क्षेत्र:-**

15०.44' उत्तर ते 22० 6० उ अक्षवृत्त 72० 36० पूर्व ते 80० 54० पूर्व रेखावृत्त दरम्यान पसरलेल्या 30771 चो Km क्षेत्रफळ असलेल्या महाराष्ट्र राज्यातील आणि शेतीवर हवामानाचा परिणाम आणि व्यवस्थापन यांची संशोधनासाठी निवड करण्यात आलेली आहे.

**उद्देश:-**

1. महाराष्ट्राच्या शेतीवर हवामान बदलाचे परिणाम जाणून घेणे.
2. महाराष्ट्राच्या शेतीवर हवामानाच्या परिणामातून पर्यायी शेती व्यवस्थापन

**विषय विवेचन**

महाराष्ट्रातील हवामानातील परिवर्तन हवामान चक्र हे काल गन्नेच्या संदर्भात असतातअभिषेक त्यानुसार आणि काळानुसार हवामान बदल होत असतो वातावरण हे नेहमीच अस्थिर असल्यामुळे हवा आणि हवामानाची स्थिती भिन्नता निर्माण होते.

**महाराष्ट्रातील शेतीवर हवामान बदलाचे परिणाम**

महाराष्ट्रात 21 व्या शतकाच्या सुरुवातीपासून मोठ्या प्रमाणात हवामान बदल जाणवू लागले इसवी सन 2000 ते 2002 ही कमी पावसाची वर्षे होतील तर इसवी सन 2003 ते दुष्काळी वर्ष होते 2004 मध्ये जुलै-ऑगस्ट पर्यंत पाऊस नव्हता त्याचा परिणाम खरीप हंगामावर झाला.2005 ते 2007 ही अतिवृष्टीची वर्ष होती इसवी सन 2009 मध्ये जून व जुलै महिन्यात पाऊस मोठे खंड पडल्याने खरीप पेरणी वर परिणाम झाले त्याच वर्षी नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात अवेळी आणि अवकाळी पाऊस पडला गेला.

2009 च्या मार्च-एप्रिल महिन्यात वादळी वारे आणि पाऊस पडला गेला यात शेतीचे फार नुकसान झाले 2010 मध्ये पाऊस चांगला झाला 2011 ते 14 मध्ये ऑक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात अवकाळी पाऊस झाल्याने द्राक्ष पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले भाजीपाला फळ पिकांचे नुकसान झाले महाराष्ट्रातील डाळिंब पिकाचे तर फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

यात 2012 मध्ये दुष्काळाची परिस्थिती होती यात 18 जिल्हे 123 तालुके प्रचंड दुष्काळाच्या खंडात सापडले गेले तसे 2015च्या दुष्काळामध्ये दुष्काळी पट्टा आणखी विस्तारला यात महाराष्ट्रातील 28 जिल्ह्यातील 135 तालुके दुष्काळी परिस्थितीला सामना करू लागली यात अनेक प्रश्न निर्माण झाले.

उदाहरणात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बोरवेल चे पाणी आटले धरण तळे कालव्यात पाणी साठा अत्यंत कमी पिकाचे नुकसान याशिवाय 2015 मार्च एप्रिल मे महिन्यात मराठवाडा पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागात गारपीट झाली सन 2016 ते 2019 यावर्षी पाऊस बऱ्यापैकी झाला.सर्व परिस्थिती विचार करता महाराष्ट्र व पूर्ण जगात करूनच या संकटामुळे शेतीवर तसेच अनेक आर्थिक शारीरिक मानसिक गोष्टीवर हा परिणाम झालेला आहे.

**पर्यायी शेती व्यवस्थापन:-**

1. **पीक पद्धतीत बदल करणे:-**

हवामान बदलाच्या परिणामामुळे शेतकरी आपल्या शेतीची पीक पद्धतीत बदल घडवून आणत आहे कापूस पिकाचे क्षेत्र कमी करून तूर सोयाबीन मका मिरच्या यांचा समावेश करावा.महाराष्ट्र राज्यात कापूस पिकाखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत आहे याचा कालावधी सात ते साडे सात महिन्याचा तर मान्सून काळ चार महिन्याचा असतो यामुळे अनेक समस्या निर्माण होतात म्हणजे उत्पादनाच्या खर्चात अधिक उत्पादन कमी यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो म्हणून तू सोयाबीन मका हा अशा पिकांची लागवड करून शाश्वत विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करावा शिवाय शेतकरी वर्गास पिकाच्या बदलाविषयी सतत प्रशिक्षण करणे गरजेचे असते.

2. **रुंद वरंबा सरी पद्धत**

वरील पद्धतीचा वापर वाढविल्यास सोयाबीन अशा अनेक पिकांसाठी या पद्धतीचा वापर यावर शेतकऱ्यांना प्रशिक्षण करावे यातून उत्पादकता वाढू शकते.

3. **रब्बी पिकांसाठी बंदिस्त वाफे तयार करणे**

पावसाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात आकारात वाफे तयार करावे उतारानुसार आकार तयार करावा नांगरून योग्य अंतरावर दंड पाठ टाकावे कमी खर्चात करावे कारण योग्य ओल्या जमिनीवर पेरणी केल्यास रब्बी पिकाचे उत्पादन वाढते.

4. **रब्बी हंगामात हरभरा पिकाखालील क्षेत्रात वाढ करणे**

हरभरा कमी पावसावर व कमी पाण्यावर येणारे पीक आहे यामुळे योग्य वेळी साऱ्या करून त्यात पावसाचे मुरेल अशी सोय करून ठेवावी.

5. **सूक्ष्म सिंचन पद्धतीचा अवलंब**

पाण्यात बचत करण्यासाठी ठिबक सिंचन वापरल्यास पन्नास टक्के पाणी वापरून त्याची बचत करावी यासाठी बंद पाणी पाणी पुरवठा योजना राबविणे गरजेचे आहे ठिबक सिंचन पद्धतीमुळे कमी पाण्यात चांगल्या प्रतीचे पिकांची वाढ होऊन उत्पादन अधिक काढण्यास मदत होईल.

6. **संरक्षित शेतीचा अवलंब करणे**

यात पॉलिहाऊस याचा वापर करावा यामध्ये गुलाब टोमॅटो ढोबळी मिरची अशा पिकांच्या लागवडीवर भर द्यावा प्रत्येक शेतकऱ्याची पॉलिहाऊस ची उत्पादने करून ठिबक सिंचनाद्वारे पाणी पुरवठा करून उत्तम प्रतीचा शेतीमाल तयार करून बाजारपेठेत विकावा.

7. **आंतरिक पद्धतीचा अवलंब करणे**

यात आणि एक पिक पद्धती निश्चित व योग्य फायद्याची ठरते. उदा. कोरडवाहू क्षेत्रात बाजरी तूर सोयाबीन मूग उडीद आंतरपिके घेणे फायद्याचे ठरते तर, बागायत क्षेत्रात ऊस कांदा हरभरा भुईमूग ऊस बटाटा अशी पिके घ्यावीत.

8. **कोरडवाहू भागातील तळ्यात मधील पाण्याचे बाष्पीभवन रोखणे**

पाण्याचे बाष्पीभवन रोखण्यासाठी वेगवेगळी दृश्य अवलंबून असून त्यावर प्रयोग होऊन त्याच्या शिफारशी करणे गरजेचे आहे.

9. **पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील पावसाचे पाणी साठवून गरजेनुसार नदीपात्रात सोडणे**

पश्चिम महाराष्ट्राच्या घाटमाथ्यावरील पावसाचे पाणी डोंगरमाथ्यावर पवनचक्क्यांच्या बसवून विंडमिल द्वारे वीज निर्मिती केली जात आहे. गरजेनुसार ते पाणी नदीपात्रात सोडावे.

10. **प्रकाश परिवर्तन का चा वापर करणे**

फळपिकांसाठी पाणीटंचाईच्या काळात ही पद्धत वापरावी.

11. **जलयुक्त शिवार महाराष्ट्राच्या वरदान ठरेल**

महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार अभियानाद्वारे अनेक गावात साखळी बंधारे तळे तयार करून पाणी समस्या सोडवण्याचा अभियान सुरू केले आहे यामुळे जन्साधरण पाणीसाठा वाढण्यास मदत होते कोरडवाहू भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला यातून शेतीसाठीही पाणी उपलब्ध होईल त्यामुळे अनेक लोकांचा कामात सहभागी होत आहे.

**सारांश:-**

आपल्या सभोवतालचे वातावरण सतत बदलत असल्यामुळे हवामानात बदल होतो बदलत्या हवामानाचा परिणाम महत्त्वाच्या जल शैलीवर तसेच शेतीवर जास्त प्रमाणात परिणाम झालेला असल्याकारणाने आपण त्याच्यावर विचार करुन पर्यायी शेती व्यवस्थापनात अनेक बदल घडून आणून हा परिणाम थांबविणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भसूची**

1. कृषी भूगोल डॉ. सुरेश फुले
2. पर्यावरण भूगोल डॉ. विठ्ठल घारापुरे
3. हवामान शास्त्र व सागर विज्ञान डॉ. शेट्टी शहापूरकर
4. अग्रोवन 3 एप्रिल 2014
5. विकिपीडिया

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"*

# सामाजिक परिवर्तनात मानसशास्त्राची भूमिका

***प्रा.मुंगूसकर अनिल मधुकर***

*सहाय्यक प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग, भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल्वे), ता. करमाळा, जि.सोलापूर (महाराष्ट्र)*

**प्रास्ताविक –**

सामाजिक परिवर्तन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. समाज चालीरीती, रितीरिवाज, मानके, मूल्ये, सांस्कृतिक बदल ही सातत्याने घडत असतात. या परिवर्तनाचे प्रकार शीघ्र व दिर्घकालीन असू शकतात. यामध्ये मानसशास्त्र जनसामान्यांच्या वर्तनाचा अभ्यास करते. या सामाजिक परिवर्तनाचे मापनही केले जाते. विकसनशील देशात जे सामाजिक परिवर्तन होत आहे त्यातील काही वैशिष्टये मानसशास्त्रीय दृष्टया महत्वाची आहेत. सामाजिक परिवर्तन हा विषय आपल्या आयुष्याशी अतिशय निगडीत आणि महत्वाचा आहे. तंत्रज्ञानातील बदल कामाच्या स्वरुपातील बदल आणि इतर सामाजिक आर्थिक बदल यामुळे व्यक्तीमध्ये परिवर्तन होते. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून केलेला अभ्यास अतिशय महत्वपूर्ण आहे.

**सामाजिक परिवर्तनाचे मानसशास्त्र –**

परिवर्तन हे जगाचे मुलभूत आणि महत्वाचे आहे. पृथ्वी या शब्दाचा जो संस्कृत प्रतिशब्द आहे त्यात ही परिवर्तन हा शब्द सामावलेला आहे. क्रम आणि परिवर्तन हे मानवी अस्तित्वाचे महत्वाचे पैलू आहेत. मानवी वर्तनातील पुर्ननिर्माण आणि स्थैर्य यामुळे जीवनाला आणि विश्वाला ही क्रम आणि पूर्वकथनीयत्व प्राप्त होते. याउलट जगातील प्रत्येक गोष्ट सतत वाहत असल्याचे दिसते. भौतिक लक्षणे, संस्था, मूल्ये, अभिवृत्ती आणि जीवन पध्दती या जगभर सारख्या नसल्या तरी सतत बदलत आहेत. मूर (1963) यांनी त्यांच्या सामाजिक परिवर्तन ग्रंथात असे लिहिले आहे की, जेव्हा एखादा बदल संपूर्ण पध्दतीत पाझरत जातो त्यास बदल म्हणावे. केवळ एकामागून एक घडत जाणा-या घटनांना बदल म्हणता येत नाही. मूर (1967) यांनी अलिकडे सामाजिक रचनांमधील बदल वैशिष्टपूर्ण बदल – अशा रचनांचे मानक मूल्ये, सांस्कृतिक परिणाम आणि प्रतिके यांच्या स्वरुपात जे परिणाम दिसतात त्यातील बदल यास सामाजिक परिवर्तन म्हणावे अशी व्याख्या केली आहे. याचाच अर्थ असा की सामाजिक क्रिया अंतक्रिया, आचरणाचे नियम आणि इतर गोष्टी या सर्वांमध्ये बदल घडत असतो. त्याचप्रमाणे विकास घडत असताना होणारे क्रांतिकारक, आर्थिक – सामाजिक बदल, कुंटुंबामध्ये होणारे घटनात्मक बदल, विवाह पध्दतीत होणा-या सुधारणा औद्योगिक उत्पादनातील बदल इत्यादी गोष्टी सामाजिक परिवर्तनाचे पैलू असतात.

**सामाजिक परिवर्तनाचे प्रकार –**

**अ)क्रमाक्रमाने होणारे विरुध्द जलद गतीने होणारे परिवर्तन –**

सामाजिक परिवर्तन मंदगतीने आणि क्रमाक्रमाने घडत जाते. आपल्या समाजात असे बदल नेहमीच झाले आहेत. ब-याच कुंटुंबाचे स्वरुप, कुंटुंबातील व्यक्तीचे परस्पर संबंध, धर्माची भूमिका, सामाजिक आंतरक्रिया, आंतरव्यक्तिक संबंध, व्यक्तीचे आणि समूहांचे वर्तन यामध्ये झालेल्या फरकांकडे पाहिले तर समाजात किती बदल झाला आहे हे आपणाला जाणवते. याउलट काही कालखंड असे आढळतात की ज्यामध्ये सामाजिक बदल जलद गतीने आणि आकस्मिक झालेले दिसतात. काही शोध, राजकीय कृती, परचक्राचे आक्रमण आणि विजय यामुळे अशा झालेल्या सुधारणा झटकन घडून आल्या असे दिसते. उदा – चाक आणि वाफेच्या इंजिनचा शोध अथवा संगणकात वापरल्या जाणा-या स्क्ष्मपट्टिकेचा शोध मिर्डाल (1968) यांच्या मातनुसार विकसनशील देशात जे सामाजिक परिवर्तन होत आहे त्यातील काही वैशिष्टये मानसशास्त्रीय दृष्टया महत्वाची आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रात रोमन साम्राज्याच्या अस्तानंतर सुरु झालेले सामाजिक सांस्कृतिक आणि व्यक्तिगत परिवर्तन, आधुनिक काळापर्यंत तसेच फ्रेंच आणि रशियन राज्यक्रांतीपर्यंत चालू राहिले. शास्त्रीय शोध लागल्यानंतर शेतीविषयक आणि औद्योगिक क्रांतीनंतर परिवर्तनाचा वेग वाढला. मात्र जीवन पध्दतीत बदल घडून येण्यासाठी दोन शतके लागली. विकसनशील देशात मात्र जे बदल घडले ते क्रमाने घडले नाहीत.

**ब)नैसर्गिक विरुध्द प्रवर्तित सामाजिक परिवर्तन –**

सामाजिक परिवर्तन सर्वकाळ घडून आले आहे. तंत्रज्ञानातील विकास, संयुक्त कुटुंब पध्दतीचा –हास, कामाच्या स्वरुपातील बदल आणि इतर सामाजिक आर्थिक बदल यामुळे आपल्या आंतरव्यक्तिक वर्तन, सामाजिक संस्था आणि मूल्य व्यवस्था यामध्ये बदल होत आहेत. हे बदल नैसर्गिक, स्वयंभू आणि नियोजनाशिवाय आणि प्रवर्तित बदलांपेक्षा ते वेगळे असतात. नैसर्गिक बदल समाजातील गतिमान प्रेरणांच्या परस्परांमधील क्रियांमुळे घडून येतात. प्रवर्तित आणि नियोजनबध्द बदल हे शासन आणि सामाजिक संस्था यांच्या खटपटींमुळे होत असतात. या बदलांची उदिदष्टे शासनाच्या धोरणांवरुन आणि कार्यक्रमावरुन ठरत असतात. गरीबी हटाव, कुंटुंब नियोजन समताधिष्ठित समाजाची स्थापना, सामाजिक न्याय आणि तळागाळातील लोकांसाठी कायदे, शेतीविषयक तंत्राच्या आधुनिकीकरणातून शेती उत्पन्न वाढविणे ही सर्व नियोजनबध्द विकासाची उदाहरणे आहेत हे परिवर्तनाचे विविध पैलू आहेत.

**सामाजिक बदलाच्या कक्षेत मानसशास्त्राचा विलंबित प्रवेश –**

सामाजिक परिवर्तन हा विषय आपल्या आयुष्याशी अतिशय निगडीत आणि महत्वाचा आहे. विशेषत: विकसनशील देशात महत्वाचा आहे. दीर्घकाळ मानसशास्त्रातील संशोधन व्यक्तिमत्वाची गुणवैशिष्टये, संवेदन, अभिवृत्ती आणि व्यक्तिची प्रेरके यांवर केंद्रित झाले आहे. त्यात सामाजिक संरचना आणि सामाजिक परिवर्तनात समाविष्ट असणा-या मानसिक प्रक्रिया यांचेकडे तितकेसे लक्ष् गेले नाही. सन 1954 मध्ये सामाजिक परिवर्तनाशी संबंधीत असणा-या संशोधनाची जी यादी केली होती त्यात 21 पैकी 2 मानसशास्त्राशी संबधीत होते. सन 1970 नंतर सामाजिक परिवर्तनाला गती मिळाली.

**सामाजिक परिवर्तनावर परिणाम घडविणारे घटक -**

सामाजिक परिवर्तन हे अभ्यासाचे अवघड क्षेत्र आहे. त्याबदल आपल्या ज्ञानात त्रुटी आहेत. शिवाय सामाजिक दर्शकाबद्दल बिनचूक आणि विश्वसनीय माहिती मिळण्याची अडचणही आहे. आरोग्य आणि आर्थिक परिस्थितीबद्दल आपल्याला थोडीफार विश्वसनीय माहिती उपलब्ध् आहे. पण सामाजिक आणि मानसिक क्षेत्रांबद्दल तसे नाही. असे असले तरी पूर्वीच्या मानाने सध्याचा सामाजिक परिवर्तनाचा वेग चांगला असे आपणास म्हणता येते. आल्विन टॉफलर (1970) यांनी त्यांच्या "फयूचर शॉक" या ग्रंथात सामाजिक परिवर्तन घडवून आणणा-या घटकांचा उल्लेख केलेला आहे ते घटक पुढीलप्रमाणे – झपाटयाने होणारे शहरीकरण 2) सुधारणांचा वाढता वेग 3) ज्ञानाचा विस्फोट 4) संपर्क माध्यमे

इ.स.1850 मध्ये जगातील फक्त चार शहरांची लोकसंख्या दहा लाखाहून अधिक होती. सन 1900 मध्ये अशा शहरांची संख्या 19 झाली. सन 1961 मध्ये ती 141 आणि व अद्यापही संख्या वाढत आहे. शहरीकरणाचा वेग सध्या 7 टक्क्याहून अधिक आहे. सध्या तर 1 कोटीहून अधिक लोकसंख्या असलेली काही शहरे आहेत. चाकाच्या शोधाने आपल्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. सध्या आपण भोवताली पाहिले तर अशाच कितीतरी अधिक शोधांनी आपले जीवन बदलून टाकले आहे. जेट विमाने, क्षेपणास्त्रे आणि इतर संहारक अस्त्रे, अणुऊर्जा, संगणक आणि स्क्ष्मपट्टिका, इलेक्ट्रॉनिक संदेशवहन, अन्नसंरक्षण, घरगुती उपकरणे आणि यासारख्या अनेक गोष्टीनी आपले संप्रेषण मार्ग, शिक्षण, आहार-विषयक सवयी आणि जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये बदल घडविला आहे. ज्ञानाचा विस्फोट तर अवर्णनीय आहे. सध्या प्रतिवर्षी इतकी पुस्तके, नियतकालिके आणि अहवाल प्रसिध्द होतात की पाच वर्षात आपला ज्ञानसाठा जुनाट होतो. ज्ञानसंपादनामध्ये 1950 मध्ये शोध लागलेल्या संगणकाने मोलाची भर घातली आहे. या सर्व घटकांनी आपले प्रत्येक जीवनक्षेत्र व्यापले आहे. ज्या वेगाने ही गोष्ट घडत आहे ती कल्पनेच्या पलीकडची आहे. यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे विकसनशील देशात जे बदल घडत आहेत ते झटकन झालेले, सुव्यवस्था नसलेले आणि जीवनाच्या सर्व अंगाना व्यापणारे असे झाले आहेत. त्यांचा सर्वसामान्य परिणाम चांगला असला तरी मानसिकदृष्टया व्यक्तीवर आणि सर्वसाधारण जनतेवर त्यांचा परिणाम अस्थितरतेचा आहे. प्राध्यापक हॅरी ट्रॉन्डिस (1971) यांनी नेहमी आढळून येणारे पुढील दुष्परिणाम सांगितलेले आहेत. आत्महत्यांचे वाढते प्रमाण, नशाबाजी, मादक पदार्थाचे अतिरिक्त सेवन, दंगे-धोपे, मत्सर, अपेक्षा आणि साध्य यातील वाढता फरक व त्यामुळे निर्माण होणारे वैफल्य, मनोदैहिक आजारांचे वाढते प्रमाण, सामाजिकदृष्टया विपथगामी वर्तन आणि राजकीय बंड, गुन्हेगारी आणि बालगुन्हेगारीचे वाढते प्रमाण वाढते आहे.

**सामाजिक परिवर्तनाचा मानसशास्त्रीय अभ्यास -**

ज्यांनी व्यक्तिला केंद्रस्थानी ठेवले आहे अशा मानसशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनामुळे व्यक्तीची संवेदने, प्रेरणा, अभिवृत्ती आणि मूल्ये यांच्यात काय बदल होतो याकडे लक्ष् दिले. मुजाफर शेरीफ यांना एका अभ्यासात असे आढळले की तंत्रज्ञानाचा ते वापरणा-या व्यक्तींच्या आंतरव्यक्तिक संबंध आणि अभिवृत्तीवर परिणाम होतो त्यांना असे आढळून आले की, तंत्रज्ञानपूर्वकाळात काळ, अवकाश आणि अंतर यांचा संबंध कामाचा वेळ आणि सामाजिक – आर्थिक कार्ये (बाजाराचा दिवस) नैसर्गिक घटना (सूर्योदय, सुर्यास्त, ग्रहण, महापूर, भूकंप) आणि निसर्गातील काही अनिवार्य घटना (पदी, पर्वत, द-या) यांच्याशी होता. तंत्रज्ञानाच्या आगमनानंतर मात्र काळ आणि अंतर, मिनिटे आणि तास, किलोमीटर आणि मैल या प्रमाण भाषेत सांगण्यात येतात. संस्थात्मक अधिकाराला आव्हान हा आणखी एक दर्शक आहे. धार्मिक अधिकार आणि नैतिक मूल्यांना आता आव्हान देण्यात येते आणि नवीन मूल्ये विकसित होत आहेत. पारंपारिक अधिकाराला आता विरोध होत असल्याचे दिसते. आपल्या देशात शहरीकरण, औद्योगीकरण आणि औपचारिक शिक्षण यामुळे अभिवृत्तीत आधुनिकीकरण होत आहे.

**सामाजिक परिवर्तनातील मानसशास्त्रज्ञांची भूमिका -**

मानसशास्त्रज्ञ सामाजिक पृथक्करण करतात. शिवाय ते बदलही घडवून आणतात. त्यांचे उद्दिष्ट परिवर्तनाला चालना देणे आणि त्यामुळे काही मानसिक तणाव निर्माण होणार असतील तर ते टाळणे हा असतो. सामाजिक परिवर्तनामध्ये मानसशास्त्रांची भूमिका सहायक म्हणून आहे. अलिकडे मानसशास्त्रांनी अधिक सक्रिय भूमिका घेऊन समाज परिवर्तन केले पाहिजे. सामाजिक परिवर्तन हे मानसशास्त्राच्या दृष्टीने एक उपयोजनाचे क्षेत्र आहे. केलमन (1968) यांच्या मतानुसार, सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात मानसशास्त्रज्ञांनी संशोधन करताना परिवर्तन योग्य दिशेने कसे होईल व त्यातील लोकांचा सहभाग कसा वाढेल हे पाहिले पाहिजे. वरील उद्दिष्टांबाबत सिन्हा (1984) यांनी असे म्हटले आहे की, या बाबतीत मानसशास्त्रांनी तीन गोष्टीवर भर दयावयास हवा त्या म्हणजे योग्य ते परिवर्तन घडवून आणणारे घटक, परिवर्तनात अडथळा आणणारे घटक आणि परिवर्तनातून निर्माण होणारे ताणतणाव कमी करण्याच्या पध्दती इत्यादी बाबीमधून मार्ग काढले पाहिजेत.

**सारांश –**

सामाजिक परिवर्तनात मानसशास्त्रज्ञांची केवळ दुय्यम स्वरुपाची भूमिका असते. विकास होत असताना त्यातून जर अनिष्ट परिणाम घडत असतील तर त्यासाठी वेगळे प्रारुप स्वीकारण्याची जरुरी आहे. एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त आर्थिक सुबत्ता आल्यास तिने व्यक्तीची जीवनशैली सुधारत नाही. मानवी जीवनात केवळ आर्थिक सुबत्ता पूरे नाही तर त्याचबरोबर पर्यावरण, सामाजिक, सांस्कृतिक, मानसशास्त्रीय इत्यादी घटकांचाही विकास व्हावयास हवा. त्यादृष्टीने मानसशास्त्राज्ञांची भूमिका केवळ सहायकाची नसून परिवर्तनाच्या बाबतीत त्यांनी अधिक सहभाग घ्यावा. पूर्वीचा काळ आणि अलीकडील काळ यामध्ये खूप मोठया प्रमाणात सामाजिक परिवर्तन झालेले आहे. अभिवृत्ती, मूल्ये, संस्था आणि सामाजिक वर्तन यामध्ये खूप मोठया प्रमाणात सामाजिक परिवर्तने झालेली दिसून येतात. झपाटयाने होणारे शहरीकरण, सुधारणांचा वाढता वेग, ज्ञानाचा विस्फोट आणि संपर्क माध्यमे यामुळे सामाजिक परिवर्तन मोठया प्रमाणात होताना दिसून येत आहे.

**संदर्भ ग्रंथ –**

1. उपयोजित मानसशास्त्र – संपादक डॉ.म.न.पलसाने, डॉ.सविता नवरे, सायली ईस्टर्न लिमिटेड पब्लिशर्स
2. बोबडे प्रकाश (1978) भारतीय समाजरचना, नागपूर विद्या प्रकाशन
3. बोरुडे रा.रं., देसाई भ.ह. कुमठेकर मे आणि गोळविलकर शी. 1990 वैकासिक मानसशास्त्र पुणे : पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
4. सोमण एम.एस. (1975) समाजशास्त्र पुणे : गौतम प्रकाशन
5. भाषा संचालनालय (1991) मानसशास्त्र परिभाषा कोष मुंबई भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# देगाव पाटेश्वर लेणी एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ

*प्रा. राहुल किसन गंगावणे*

*बाळासाहेब देसाई कॉलेज,पाटण, जि. सातारा.*

महाराष्ट्राला लाभलेल्या सांस्कृतीक वारश्यांमध्ये लयन स्थापत्याला महत्वाचे स्थान आहे. इ.स. च्या पहिल्या शताकापासून हा वास्तूप्रकार महाराष्ट्रात दिसून येतो. महाराष्ट्रातील अग्नीजन्य खडक व कातळ बांधिव स्थापत्यापेक्षा कोरीव स्थापत्याला जास्त अनुकुल आहे. म्हणूनच महाराष्ट्रात लेणी स्थापत्य व गुंफा स्थापत्याचा उत्कर्ष दिसून येतो. मौर्य कालखंडापासून सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट यांच्या काळात महाराष्ट्र व आसपासच्या प्रदेशात लेण्या खोदण्यात आल्याचे संदर्भ मिळतात. या सर्व लेण्यांचे स्वरुप प्रामुख्याने धार्मिक व ज्ञानसाधनेचे दिसून येते. लेणी स्थापत्यामध्ये महाराष्ट्रात प्रामुख्याने बौध्द, हिंदू, जैन असे तीन प्राकर पडतात.[1] प्रस्तुत 'देगाव पाटेश्वर लेणी एक ऐतिहासिक पर्यटन स्थळ' या शोधनिबंधात सातारा जिल्ह्यातील पाटेश्वर लेणी समुहावर ऐतिहासीक पर्यटन स्थळाच्या दृष्टीने प्रकाश टाकण्यात आला आहे.

**भौगोलिक स्थान** - पाटेश्वर लेणी समुह सातार्‍याच्या अग्नेय दिशेस 11.26 कीमी अंतरावर देगावच्या पुर्व-दक्षीण डोंगरमाथ्यावर आहे. येथे शैव (लेणी) संकुल आहे. हे संकुल टेकडीच्या एका टोकावर आणि माथ्यावर खालच्या अंगाला आहे. या संकुलात पाण्याची कुंडे, पुष्करणी दिपमाळ, मंदीर, गुंफांचा समावेश आहे. यातील पहिल्या गटात गुफा आणि बांधिव स्थापत्य यांचा समन्वय साधून निर्मिलेली मंदिरे आहेत.[2]

**पाटेश्वर मंदीर समुह व परिसर** - 'श्री क्षेत्र पाटेश्वर येथील गुंफा, पिंडी व मंदीर निर्मितीचा कालखंड इ.स. पुर्व 185 ते इ.स. 13 व्या शतकापर्यंत निश्चित करता येतो.'[3] पाटेश्वर पठारावर गेल्यावर सुरुवातीला गणपतीची, मारुतीची शेंदूर लावलेली छोटी मुर्ती पहायला मिळते. पुढे गेल्यावर उजव्या बाजूला '60 बाय 70 फुटांचे दगडी बांधकाम केलेले तळे आहे.'[4] 'तलावाच्या उजव्या बाजूच्या पायर्‍यांनी चढून वर गेल्यावर संपुर्ण मंदिराचा परिसर दिसतो. मंदिराच्या आवारात महादेवाच्या मंदिराव्यतिरिक्त आणखी दोन मंदिरे आहे. महादेवाच्या मंदिरासमोर, सुंदर कोरीवकाम केलेल्या नंदीचे मंदिर आहे. मंदिराशेजारी दोन्ही बाजूला दोन दिपमाळा आहेत. मंदिरातील शिवलिंग मोठे आहे. मंदिराच्या आवारातून बाहेर आल्यावर पुर्वेकडे गोविंदबाबांचा मठ आहे. मठाच्या समोर, पुढे एक मंदिर आहे. या मंदिरातील देव एखाद्या याचकाप्रमाणे हात पुढे करुन बसला आहे.'[5]

या क्षेत्रामध्ये पाटेश्वर डोंगरमाथ्यावर एकूण तीन लेणी समुह व मंदीर समुह आहेत.

**पहिला लेणी समुह** - 'हा लेणी समुह विश्वेश्वर तळयाजवळ आहे. वास्तविक ही एकच लेणी आहे. लेणीमध्ये उजव्या बाजूला लहान खोलिवजा जागा आहे. त्यामध्ये नंदी धारण केलेले शिवलिंग आहे. या ठिकाणी मांडी घालून बसलेली लहान आकाराची दगडी स्त्री मुर्ती आहेत. ही मुर्ती मांडी घालून बसलेली साध्वी असावी असे वाटते.'[6]

**लेणी समुह दुसरा-** 'मंदीर समुहाच्या पुर्वेकडे दुसरा लेणी समुह आहे. या लेणी समुहावर अग्नीवृषाचे मंदीर आहे. या मंदिराच्या पलिकडे चामुंडा मंदीर आहे. यामधील दुसर्‍या क्रमांकाच्या लेणी मध्ये तीन शिवलींगे आहेत. यासोबत आनखी काही शिल्पे येथे आहेत.'[7] तसेच या समुहातील तीसर्‍या लेणी मध्ये विष्णूदशावतारांचा मुळ रुपातील शिल्पपट आहे. लेणीच्या पश्चिमेला एक लहान देवडी आहे. त्यामध्ये नृत्यमग्न सुरसुंदरीचे शिल्प आहे. या लेणीला जोडूनच इथे एक शेवटचे लेणे आहे. वास्तवीक हे लेणे वेगळे नसून तिसर्‍या क्रमांकाच्या लेण्यांचाच एक भाग आहे.'[8]

**लेणी समुह तीसरा** - पाटेश्वर डोंगराच्या सर्वात पुर्वेकडे आणखी एक लेणी समुह आहे. येथे सवत्सकामध्येनू शिल्प आहे. या समुहाच्या मधल्या भागात दोन लिंगे आहेत. त्यांना कुंभेश्वर आणि चतुर्मुख लिंग म्हणतात. उत्तराभिमूख लेणीला तोलण्यासाठी पुर्वी ज्या ठिकाणी खांब होते. त्याठिकाणी नंतर चैदाव्या शताकाच्या सुमारास साध्या प्रकाचे खांब आधारासाठी लावण्यात आलेले आहेत. यातील नाग कोरलेल्या खांबापैकी उजव्या बाजूच्या खांबावर दर्शनी बाजूस अलिकडच्या काळातील देवनागरी लिपी मध्ये सहा ओळींचा एक शिलालेख कोरलेला आहे. तो अस्पष्ट असल्यामुळे काहीच बोध होत नाही. येथे आनखी एक लेख आहे. तो डाव्या बाजूच्या उभ्या दंडाकृतीवर कोरलेला आहे.[9]

**निष्कर्ष-** पाटेश्वर या ऐतिहासीक आणि धार्मिक पर्यटन स्थळाचे महत्त्व वाढत आहे. पर्यटकांच्या दृष्टीने या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सोय नसल्यामुळे येथील पर्यटनाला मर्यादा येतात. येथे जाण्यासाठी पक्का रस्ता आहे परंतू तो अरुंद आहे. अन्न पाण्याची व राहाण्याची सोय नाही. या डोंगरावरुन सातारर्‍याच्या परिसराचे विहंगम सृष्टीसौंदर्य पहावयास मिळते. यवतेश्वर डोंगर, अजिंक्यतारा किल्ला, लिंब खिंड, चंदन वंदन किल्ला, जरडेंश्वर डोंगर, असा सुंदर परिसर दिसतो. भविष्यात पर्यटनाच्या दृष्टीने सोईसुविधा झाल्यास ऐतिहासीक पर्यटनाच्या दृष्टीने या ठिकाणाचे महत्व वाढू शकते. हा लेणी समुह पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग चार (आशियायी माहामार्ग) पासून केवळ पाच ते सहा किमी अंतरावर आहे.

त्यामुळे या स्थळाचा विकास ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणूस झाल्यास सातारा जिल्ह्याच्या इतिहसात व पर्यटन विकासात भर पडणार आहे. म्हणून या स्थळाकडे सुमारे दोन हजार वर्षापूर्वीचा ऐतिहासिक वारसा स्थळ म्हाणून पहाणे व विकसित करणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

**1.** डॉ. दळवी दाऊद, लेणी महाराष्ट्राची, ग्रथाली प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती - 2004, प्रस्तावना पृ. 12

**2.** डॉ. पाठक अरुणचंद्र, सातारा जिल्हा गॅझेटिअर, 1999 पृ.क्र. 791

**3.** प्रा. बर्गे श.ना., श्री क्षेत्र पाटेश्वर दर्शन, हर्षद प्रिंटर्स अँड पब्लिशर्स, बनवडी ता. कराड जि. सातारा, प्रथम आवृत्ती जानेवारी 2003, पृ. 20

**4.** श्री साळुंखे राजाराम कोंडीबा (दादा), पंचयज्ञ भुमी पाटेश्वर (देगाव), साधना आर्टस, देगाव, पृ. 42

**5.** फडके अदित्य, साताऱ्याच्या मुलखात, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2007 पृ.96

**6.** फडके आदित्य, पाटेश्वर, वरदा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ऑगस्ट 2015, पृ 18

**7.** कित्ता, पृ 19

**8.** कित्ता, पृ 20

**9.** कित्ता, पृ 22,23,24

# आधुनिक विपणन व्यवस्थापन आणि जागतिकीकरण

*सहा. प्रा. संगिता गंगाराम उतेकर[1] डॉ. सुधाकर भाऊराव टेलके[2]*

*[1]ग्रंथपाल, द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव - रायगड*

*[2]ग्रंथपाल, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर ता. बिलोली जि. नांदेड*

**सारांश:**

आधुनिक विपणन व्यवस्थापनात बाजारपेठांमध्ये विविधता आढळून येते. ग्राहक, उत्पादक, पूर्ण मुक्त स्पर्धा, सरकारी व आंतरराष्ट्रीय इत्यादी बाजारपेठांचे वैशिष्ट्ये देखील वेगवेगळे असतात. तसेच ग्राहकांच्या क्रयप्रेरणा आणि ग्राहकांचा वर्तणुकीचा परिणाम बाजारपेठांवर होत असतो. विपणन प्रक्रियेत ग्राहकाला देवता मानले जाते आणि त्याला संपूर्ण समाधान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. विपणनाच्या व्यवस्थापनानुसार ग्राहकांच्या गरजांचा शोध घेणे, परीणात्मक आणि गुणात्मक अशा दृष्टिकोनातून त्याचा अर्थ लावणे, ग्राहकाला केंद्रस्थानी ठेवून ग्राहकांच्या गरजा आणि अपेक्षा विचारात घेऊन वस्तूची निर्मिती व दर्जा ठरवणे, ग्राहकाच्या गरजेनुसार वस्तूंचे वाटप करणे सेवा प्रदान करणे, तसेच वस्तूच्या खरेदीपासून अधिकाधिक समाधान मिळवून देणे या सर्व क्रियांचा समावेश केला जातो. विपणनाच्या व्यवस्थापनात विपणनाची प्रक्रिया ग्राहकपासून सुरू होते आणि ग्राहकावर या प्रक्रियेचा शेवटी होतो. ग्राहकांना जास्तीत जास्त समाधान मिळवून देण्यासाठी आणि विपणन व्यवस्थापकला आपले विपणन धोरण, कार्यक्रम निर्णय इत्यादीमध्ये योग्य तो बदल करण्यासाठी आधुनिक विपणन व्यवस्थापन आणि जागतिकीकरण यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

की-वर्ड: विपणन, आधुनिक विपणन, विपणन व्यवस्थापन आणि जागतिकीकरण.

प्रस्तावना:

विकसित आणि विकसनशील संपन्न आणि गरीब अशा दोन्ही प्रकारच्या देशामध्ये अर्थव्यवस्थेच्या विकास प्रक्रियेमध्ये विपणनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारतासारख्या गरीब देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये समाज उपासमार व संकटे या सर्व विविध प्रकारच्या बंधनांनी आडकलेला आहे. या संकटामधून मुक्त होण्यासाठी समाज आपल्यापरीने प्रयत्न करीत असतो. विपणनाच्या आधुनिक संकल्पनेमध्ये ग्राहकांच्यागरजा समजून घेणे, त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे, ग्राहकांच्या इच्छा विचारात घेऊन उत्पादनाचा दर्जा ठरवणे, ग्राहकांना विक्रय उत्तर सेवा प्रदान करणे, आणि ग्राहकांना वस्तू किंवा सेवेच्या खरेदीपासून अपेक्षित समाधान मिळवून देण्याची प्रयत्न करणे महत्वाचा हेतू आहे. कारखानदार किंवा शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या वस्तू मध्यस्थांमार्फत बाजारपेठेमध्ये पोहोचवून त्या वस्तूच्या विक्रीची व्यवस्था करणे ही विपणनाची जुनी संकल्पना होती या संकल्पनेमध्ये वस्तूवर भर होता त्यांचे हितसंबंध महत्वाचे होते. "कमाल नफा मिळविणे" ही सर्व व्यवहारा मागे असलेली एकमेव प्रेरणा होती. जागतिकीकरण याचा अर्थ "व्यापाराच्या कक्षा जागतिक पातळीवर रुंदावणे" या धोरणाचे परिणाम भारतातील व्यवस्थेवर, व्यापारी क्षेत्रावर व लघुउद्योग यावर होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहात उदयास आलेल्या विपणनाचे विविध पैलू जाणून घेणे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे.

**विपणन अर्थ व व्याप्ती:**

विपणनाची व्याप्ती व विपणनात केल्या जाणाऱ्या क्रिया यावरून विपणन या शब्दात वेगवेगळया तज्ञांनी वेगवेगळया पद्धतीने त्याचा अर्थ सांगितला आहे. जसे, ग्राहकांच्या दृष्टीने खरेदी म्हणजे विपणन, तर विक्रेत्यांच्या दृष्टीने विक्री म्हणजे विपणन, जाहिरातदारांच्या दृष्टीने जाहिरात म्हणजे विपणन इत्यादी पद्धतीने अर्थ लावला जातो.

विपणन सज्ञा आणि अर्थ:

विपणन हा शब्द वि+ पणन कसा तयार झालेला आहे. पणन या शब्दाला वि हा धातु जोडलेला आहे. मूळ शब्द पणि म्हणजे व्याजाचा धंदा करणारे लोक असा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. पण्यापासून पणन हा शब्द आला. पणन म्हणजे मालाची विक्री करणे. विपणान म्हणजे विक्रीयोग्य वस्तू विक्री योग्य करण्यासाठीचे प्रयत्न करणे

**व्याख्या:**

अमेरिकन मार्केटिंग असोसिएशन यांच्या मते, "उत्पादकाकडून उपभोक्त्यापर्यंत वस्तू व सेवा प्रवाहित करण्याकरिता येणाऱ्या विभिन्न व्यवसाय क्रिया म्हणजे विपणन होय".

फिलिप कोटलर यांच्या मते, "विपणन ही अशी मानवी प्रक्रिया असून विनिमयाद्वारे गरजा व आवश्यकता पूर्ण केल्या जातात".

डूडडी आणि रेईझान यांच्या मते, "वस्तू आणि सेवा यांचे मूल्य पैशाच्या स्वरूपात ठरवून या विनिमय करण्याची आर्थिक प्रक्रिया म्हणजे विपणन होय".

हाऊस्ले, क्लार्क आणि क्लार्क यांच्या मते, "वस्तू व सेवांच्या मालकीचे हस्तांतरण करण्यासाठी तसेच त्यांच्या भौतिक वितरणासाठी कारणीभूत ठरणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रयत्नांना विपणन असे म्हणतात".

विपणनाची आधुनिक व्याख्या: "ग्राहकांच्या गरजांचा शोध घेऊ वस्तू आणि सेवांची निर्मिती करणे, वस्तू वाटपात घाऊक आणि किरकोळ व्यापार यांचे सक्रीय सहकार्य घेऊन ग्राहकांची मागणी पूर्ण करणे आणि तीव्र स्पर्धेच्या काळात ही मागणी टिकवून ठेवणे म्हणजेच विपणन होय". या व्याख्येनुसार विपणन संकल्पनेत मूल्य निर्मिती प्रकार आणि वितरण याचबरोबर ग्राहक संबंधांचे व्यवस्थापन ही कार्य प्रक्रिया देखील समाविष्ट होते.

**विपणनाची उद्दिष्ट:**

१. ग्राहकांचे समाधान हे विपणनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. २. विपणन ही एक व्यक्तीच्या गरजांची पूर्तता करणारी मानवी प्रक्रिया आहे. ३. विपणनामध्ये वस्तूच्या भौतिक वितरण क्रियेचा अंतर्भाव होतो. ४. विपणनामध्ये ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा समावेश होतो. ५. विपणन यामुळे देशाच्या आर्थिक विकासास गती मिळते.

**विपणनाची आधुनिक संकल्पना:**

विपणनाच्या आधुनिक संकल्पनेमध्ये ग्राहकांच्या गरजा जाणून घेणे, त्यांच्या आवडी-निवडी व अपेक्षा समजावून घेणे, त्यांच्या इच्छांचा विचार करून उत्पादनाचा दर्जा ठरविणे, योग्य किमती आकारणे. वस्तूच्या उपभोगपासून ग्राहकांना पूर्ण समाधान प्राप्त होईल याची दक्षता घेणे. विपणनाची आधुनिक संकल्पना ही ग्राहकाभिमुख किंवा ग्राहक केंद्रित आहे. डॉ. निलमेघम यांच्या मते, "ग्राहकांना केंद्रबिंदू मानून विपणनाच्या सर्व क्रिया करणे हे आधुनिक संकल्पनेचे मुख्य सूत्र आहे मुख्य सूत्र आहे". ग्राहकांना वस्तू वापरापासून सर्व समाधान मिळावे यासाठी त्यांची क्रयशक्ती, आवड समजून घेण्यासाठी यंत्रणा निर्माण करणे आणि त्यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे वस्तू विकास करणे याला विपणनाच्या आधुनिक संकल्पनेत विशेष महत्त्व देण्यात आले आह.

**विपणनाचे महत्त्व:**

विपणनामध्ये उत्पादन आणि ग्राहकांना एकत्र आणले जाते. त्यामुळे ग्राहकांच्या गरजांची पूर्तता होते व व्यवसायिकांची विक्री उद्दिष्टही साध्य होतात. आधुनिक विपणन हे ग्राहकाभिमुख असल्याने नफ्यापेक्षा ग्राहक मिळवले व ते टिकवणे यास अधिक महत्त्व दिले जाते. विकसनशील राष्ट्रांसमोर बेरोजगारीची तीव्र समस्या असते. विपणन व्यवस्थेचा विकास व विस्तार केल्यास मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतात. विपणन व्यवस्थेचा विकासाच्या माध्यमातून बेरोजगारी कमी करण्याच्या दृष्टीने उपाययोजना केली जाऊ शकते. विपणन व्यवस्थेचा विकास झाल्यास देशातील संसाधनांचा व उत्पादन समतेचा पूर्ण वापर केला जातो. त्यामुळे देशाच्या सुप्त आर्थिक शक्तीला चालना मिळते त्यामुळे देशाचा जलद आर्थिक विकास शक्य होतो.

विपणानाचे विविध दृष्टिकोन

**१. समग्र विपणन:**

समुद्र विपणन ही विपणनाची एक ढोबळ संकल्पना आहे यात विपणनाची सर्वसाधारण संकल्पना गृहीत धरलेली आहे यात कोणत्याही विशिष्ट उद्योग किंवा व्यवसायात किंवा संस्थेचा विस्तार न करता सर्वसाधारणपणे संपूर्ण उद्योग किंवा व्यवसाय जगत ज्या विपणन कार्याचा अवलंब करतात त्याचा अभ्यास म्हणजे समग्र विपणन होय या संकल्पनेत पुढील बाबींचा अंतर्भाव होतो.

१. विपणानाच कार्ये ज्या ज्या संस्थेत केली जातात त्या सर्व व्यवसाय संस्था. २. अशा सर्व व्यवसायांचे अस्तित्वात असलेले ऐतिहासिक व कायदेशीर परस्पर संबंध. ३. अशा सर्व व्यवसायांकडून ग्राहकांना पुरवल्या जाणाऱ्या सेवा.

**सूक्ष्म विपणान:**

जेव्हा एखादी विशिष्ट व्यवसाय संस्था आपल्या संस्थेमध्ये जी विपणन कार्य करते किंवा विपणन व्युहरचना निच्छित करते त्यास सूक्ष्म विपणन असे म्हणतात. उदा. य हा कागद तयार करणारा कारखानदार आहे. त्याने त्याच्या कारखान्यात पुरते जे विपणन कार्यक्रम राबवले आहेत आणि व्युहरचना रचनेचावापर केला आहे त्यास सूक्ष्म विपणान म्हणतात. हा दृष्टिकोण एकाच व्यवसाय संस्थेच्या विपणनाच्या अभ्यासासाठी वापरला जातो.

**फेर विपणन :**

जेव्हा एखाद्या विशिष्ट उत्पादनास असणारी मागणी कमी होत जाते. त्या वस्तूच्या विक्रीत मोठी घट होण्याची लक्षणे दिसतात, त्या वेळी त्या विशिष्ट वस्तूची मागणी टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी काहीतरी उपाययोजना करणे आवश्यक असते. अशावेळी संस्थेने जे उपाय करावयाचे असतात. त्यापैकी महत्त्वाचा उपाय म्हणजे विपणन होय.

अधिक प्रमाणावरील विपणन:

एखाद्या ठराविक वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते. त्यामध्ये उत्पादन तयार झाल्यानंतर त्याची विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संपूर्ण बाजारपेठेत जाहिरात व विक्री योजना राबविल्या जातात. या विपणनाचा हेतू

हा असतो की, आपले उत्पादन एखाद्या विशिष्ट बाजारपेठे पुरते मर्यादित न राहता संपूर्ण बाजारपेठेत एकाच वेळी विकले जावे. उदाहरणार्थ कपड्याचा साबण या वस्तूंचे वितरण व विपणन राष्ट्रीय बाजारपेठेत करता येते.

**बृहद् विपणन:**

एखादी कंपनी आपल्या उत्पादनाचे विपणन एखाद्या विशिष्ट बाजारपेठेत करण्यासाठी जेव्हा मानसिक, राजकीय आणि आर्थिक घटक तसेच जनसंपर्क कौशल्य यांचा अधिक स्तरावर वापर करते, विपणन करताना या सर्व घटकांमध्ये समन्वय साधते, तेव्हा त्यास बृहद विपणन म्हणतात. उदाहरणार्थ भारतीय बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी कोकाकोला कंपनीने काही वर्षांपूर्वी या प्रकारची व्यूहरचना वापरली होती.

**कमाल प्रमाणात विपणन:**

जेव्हा एखादी कंपनी आपल्या उत्पादनासाठी विक्रयवृद्धीच्या योजना करते, या योजनांचा आधार घेऊन आपल्या वस्तूचा बाजारपेठेतील हिस्सा वाढविण्याचा प्रयत्न करते. त्यासाठी जाहिरात, प्रसिद्धी, प्रत्यक्ष विक्री या घटकांचा वापर करून जास्तीत जास्त बाजारपेठेवर कब्जा मिळवण्याचा प्रयत्न करते तेव्हा त्यास कमाल विपणन म्हणतात.

**बहुविध विपणन:**

बाजारपेठ ही विपणनाची अशी व्यूहरचना आहे की, जी घाऊक व्यापारी, वितरक स्पर्धात्मक फायदे घेण्यासाठी वापरतात. आपल्या स्पर्धकांपेक्षा अधिक बाजारपेठ मिळविण्यासाठी वितरक जेव्हा एकापेक्षा अधिक बाजारपेठेत विक्री करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा त्यास बहुविध विपणन म्हणतात. या रचनेमुळे वितरक किंवा घाऊक व्यापारी आपल्या स्पर्धकांवर मात करू शकतात.

**जागतिकीकरण:**

मागील बऱ्याच वर्षात शासनाच्या आर्थिक धोरणाच्या दृष्टीने जागतिकीकरण या सज्ञा मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात. जागतिकीकरणाच्या संकल्पनेत कोणत्याही एका देशाने दुसऱ्या देशात शासन करणे अभिप्रेत नाही. प्रत्येक देश सार्वभौम आणि स्वतंत्र आहे. ह्या दृष्टिकोनातून प्रत्येक देशाने इतर प्रत्येक देशाला सगळ्या प्रकारच्या आर्थिक व्यवहारांमध्ये समान वागणूक देणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रत्येक आंतरराष्ट्रीय व्यापारात मुक्तता येण्याच्या दृष्टीने परिमानात्मक बंधने आणि कराच्या स्वरूपाने लादले जाणारे निर्बंध कमी करीत ते नाममात्र करणे हे उद्दिष्ट आहे. आपल्याकडे तयार झालेल्या वस्तू बाजारात विकण्यापेक्षा ग्राहकांच्या गरजेचा शोध घेऊन त्याचप्रमाणे उत्पादन केले पाहिजे. विपणनाची आधुनिक कल्पना म्हणजे ग्राहकांसाठी उत्पादन, प्रथम. नंतर, व शेवटी. उत्पादित वस्तू ग्राहकांच्या दृष्टिकोनातून पाहणे, ग्राहकांचा संतोष हे ध्येय ठरवून ग्राहकांची संख्या वाढविणे, व त्याद्वारे नफा मिळवणे. हे महत्वाचे आहेत. विपणनाचे आधुनिक प्रवाह समजण्यासाठी काही बाबी आवश्यक आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत. १. बाजारपेठेचा झालेला विस्तार २. समाजातील क्रयशक्तीतील वाढ आणि उत्पादन तंत्रातील बद्दल ३. बाजारपेठांचे वस्तूनिहाय विशेषीकरण ४. वितरणाच्या साखळीत ग्राहक सहभाग ५. विक्रयवृद्धीसाठी व्यापारी सहकार्य ६. इंटरनेटवर व्यापार-उदीम. ७. टेलीशॉपिंग. ८. ई- कॉमर्स व्यवसायातील वाढ.

औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक व आर्थिक आघाड्यांवर होत असलेल्या प्रगतीमुळे ग्राहकांचे नवे मार्ग उदयास येत आहेत. सरकारी निमसरकारी कार्यालये छोटे-मोठे उद्योग, शिक्षण संस्था यांच्यात काम करणारे लोक निम्न मध्यमवर्गात मोडतात. त्याचबरोबर महानगरांमध्ये मध्यमवर्ग आणि उच्च मध्यमवर्ग या संख्येने वाढला आहे. बहुउद्देशीय कंपन्यांच्या मोठ्या वेतनामुळे तर हा वर्ग काही प्रमाणात वाढण्याची शक्यता आहेच. त्याचबरोबर पारंपारिक व्यापारी पेढ्या असलेली कुटुंबे व उच्च मध्यम वर्गात मोडत होती. मात्र या कुटुंबांनी मध्यम वर्गाची जीवनशैली स्वीकारली होती ही कुटुंबे पारंपरिक जीवनशैलीत अडकलेली होती. या दशकात त्यांच्या नव्या पिढीने नवी जीवनशैली स्वीकारली आहे. या मध्यमवर्गामुळे ही उत्पादक मध्यस्थाना नवी विक्रयतंत्रे व नवी विक्रयधोरणे करणे आवश्यक झाले आहे.

**निष्कर्ष:**

उदारीकरणानंतरच्या काळात व्यवसाय क्षेत्रातील विपणन कार्य जागृत ग्राहक, मुक्त ग्राहक, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन, व्यापाराचा जागतिकतेकडे प्रवास ही आव्हाने निर्माण झालीआहेत. ही आव्हाने पेलण्यासाठी भारताला आधुनिक विपणन व्यवस्थापनाची आवशक्यता आहे. त्यातूनच आधुनिक विपणन संकल्पना अस्तित्वात आली. वस्तू निवड विविधता, ग्राहकांचे वाढते उत्पन्न, जागतिकीकरण, तरुण ग्राहकांचे वाढते प्रमाण, सुलभ वित्तसहाय्य या योजनांमुळे भारतीय ग्राहकांच्या खरेदीची पद्धत आणि मानसिकता बदललेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आधुनिक विपणन व्यवस्थापनाचा विचार करणे हे भारतीय व्यवसाय पुढील एक मोठे आव्हान आहे त्याच बरोबर जागतिकीकरणाच्या प्रवाहात टिकून राहण्याची एक चांगली संधी आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. कडवेकर श्री. वि. "आंतरराष्ट्रीय विपणन " डायमंड पब्लिकेशन, पुणे

२. घाटपांडे, महेश., ठाकूर, योगेश, (१९९९) : मार्केटिंग एक आव्हान, मुंबई, आमोद प्रकाशन.

३. महेश कुलकर्णी, बेळगावकर, दिलीप आणि प्रमोद बियाणी, (२०१९) : आधुनिक विपणन व्यवस्थापन पुणे, निराली प्रकाशन.

४. रामास्वामी, नामा कुमारी, व्ही एस., (२००९):मार्केटिंग मॅनेजमेंट, मॅकमिलन इंडिया लिमिटेड ओम बुक.

५. रावेरकर, डी. पी., चौधरी, एस., (२०१५) : विपणन संशोधन मुंबई, शेट प्रकाशन.

६. लिमण, एम. एस., रावेरकर, डी. पी. आणि खोत, एस. एस. (२०१७) : विपणन आणि मानवी संसाधन व्यवस्थापन, मुंबई, शेट प्रकाशन.

# महिला सशक्तिकरण में सोशल मीडिया की भूमिका

*रीना शर्मा*

*(शोधकर्ता) समाजशास्त्र, ज्योति विद्यापीठ महिला महाविद्यालय, जयपुर*

**सारांश -:** आज का युग सोशल मीडिया का युग है जिसकी उपस्थिति और सक्रिय भागीदारी ने महिलाओं की सशक्तिकरण के लिए विचारधाराओं को तेजी से एवं व्यापक रूप से फैलाया है। सोशल मीडिया सामाजिक परिवर्तन का एजेंट बन गया है जिसने विभिन्न पहलुओं जैसे कि महिला सशक्तिकरण में मदद और समर्थन किया है वर्तमान में महिलाओं के अधिकारों और दुनिया भर में भेदभाव और रूढ़ियों को चुनौती देते हुए गौरवशाली समुदाय का ध्यान आकर्षित करने में सोशल मीडिया का एक महत्वपूर्ण स्थान है, सोशल मीडिया ने ऑनलाइन समुदाय के माध्यम से महिलाओं की समस्याओं और चुनौतियों पर चर्चा करने के लिए एक मंच दिया है। सोशल मीडिया ने महिलाओं को सामाजिक, मनोवैज्ञानिक और वित्तीय जैसे कई गुना सशक्त बनाया है प्रस्तुत लेख में इस बात पर चर्चा होगी कि महिलाओं को सशक्त बनाने के लिए सोशल मीडिया कैसे उपयोगी होता है एवं किस प्रकार महिलाएं सुरक्षित एवं स्वतंत्र रूप से सोशल मीडिया का उपयोग कर सकती है और सोशल मीडिया के प्रति महिलाओं की सक्रियता पर भी चर्चा की जाएगी। सोशल मीडिया की महिलाओं के प्रति भागीदारी की सकारात्मक एवं नकारात्मक पहलुओं की भी चर्चा की जाएगी।

**मूल शब्द-:** सोशल मीडिया, महिलाएं, सशक्तिकरण, समाज, बदलाव, भागीदारी।

**प्रस्तावना -:**सोशल मीडिया दो शब्दों का मेल है, सोशल एवं मीडिया। जिसका अर्थ है सामाजिक बातचीत करना, संवाद करना। अन्य लोगों की जानकारी प्राप्त करना एवं उस पर प्रतिक्रिया देना जिसका माध्यम संचार है एवं इलेक्ट्रॉनिक संचार है। मीडिया को समाज का एक महत्वपूर्ण उपकरण माना जाता है। आधुनिक समय में यह समाज की बड़ी शक्ति बन गई है। जो समाज पर अपना गहरा प्रभाव डाल रही है। सोशल मीडिया आज समाज में जानकारी का एक बड़े पैमाने का स्रोत बन गया है। सोशल मीडिया महिलाओं के विकास एवं जनसंचार के लिए एक महत्वपूर्ण भूमिका निभा रहा है। आज के इस आधुनिक युग में नारी सशक्तिकरण का मार्ग अपना रही है, जिससे उस उनकी मानसिकता का विकास हो रहा है तथा वह शिक्षा की तरफ काफी आकर्षित हो रही है। महिला के इस विकास में सोशल मीडिया एक महत्वपूर्ण भूमिका निभा रहा है। आधुनिक दौर में महिलाओं को जागरूक बनाने में सोशल मीडिया की महत्वपूर्ण भूमिका है। सोशल मीडिया महिलाओं को एक इलेक्ट्रॉनिक मंच प्रदान करता है जिससे विचारों का आदानप्रदान हो सके। एवं महिला अपनी बात समाज के सामने - रख सके।

**सोशल मीडिया के विभिन्न प्रकार-:** जैसा कि सोशल मीडिया एक इलेक्ट्रॉनिक मंच है, जो महिलाओं के विकास में भी एक बहुत बड़े पैमाने पर भागीदारी बनाए हुए हैं, जिसके द्वारा एक आभासी वैश्विक समुदाय विकसित हो रहा है, जिसका माध्यम है कुछ सोशल नेटवर्किंग साइट्स एवं मीडिया जो इस प्रकार हैं-:

फेसबुक, इंस्टाग्राम, वीचैट, व्हाट्सएप, स्काइप, टेलीग्राम, वाइबर आदि। विकीपीडिया, माइक्रोब्लॉग, और ब्लॉग, ट्विटर, सोशल बुकमार्क यूट्यूब, टिकटॉक, स्नैपचैट, वर्चुअल गेम वर्ल्ड साइट्स

**अध्ययन के उद्देश्य-:**

- महिला सशक्तिकरण में सोशल मीडिया की बढ़ती भूमिका का अध्ययन करना।
- सोशल मीडिया के प्रति महिलाओं की जागरूकता का पता लगाना।
- सोशल मीडिया के महिलाओं पर बढ़ते सकारात्मक एवं नकारात्मक पहलुओं को जानना।

**महिला सशक्तिकरण एवं मीडिया-:**

पिछले कुछ दशकों में स्थानीय एवं वैश्विक स्तर पर सोशल मीडिया ने संचार को बड़े पैमाने पर बदल दिया है। भारत में कुछ दशक में सोशल मीडिया के अभ्यास एवं उपयोग में वृद्धि हुई है। सोशल मीडिया विचारों को प्रेषित करने का सुगम माध्यम है, जिससे हम विचारों का आदान प्रदान कर सामाजिक प्रतिक्रिया भी तुरंत प्राप्त कर सकते हैं। जिससे हमारी सोच की नई दिशा प्राप्त होती है। हमारी सोच का दायरा बढ़ने लगता है तथा हम एक नई दुनिया में प्रवेश करते हैं। सोशल मीडिया से सामाजिक आर्थिक और राजनीतिक गतिविधियों पर भी विचारों का आदानप्रदान होता है। सोशल मीडिया - महिलाओं के लिए चर्चा करने, संवाद करने, उनकी आवाज सुनने का मंच एवं ऑनलाइन सक्रियता को व्यवस्थित करने का एक उपकरण है। सामाजिक मीडिया एक व्यापक प्रवृत्ति और व्यापक मांग के लिए एक शक्तिशाली चैनल है, जो स्थानीय एवं वैश्विक समुदाय का ध्यान केंद्रित कर महिलाओं के सही मुद्दे को प्रेषित एवं प्रोत्साहित करती है।

आज सोशल मीडिया ने अनेक महिलाओं को उनके अस्तित्व से परिचित करवाया है। वह महिला जो डरी दबी एवं सहमी सी जिंदगी जी रही थी, वो सोशल मीडिया द्वारा खुद को एक मुकाम पर पाती है एवं अपनी प्रतिभा से परिचित होती है।

आज एक महिला यदि आवाज उठाती है तो उसकी गूंज दूर तक जाती है, जिसका कारण है सोशल मीडिया। कई महिलाएं वर्तमान में प्रमुख पदों पर है इसमें मीडिया की अहम भूमिका है। महिलाओं के मुद्दे कभी भी इतनी चर्चाओं में नहीं होते थे, जितने कि आज है। यह सोशल मीडिया के कारण ही है। मीडिया लोकतंत्र का चौथा स्तंभ है इसकी महिला सशक्तिकरण में अहम भूमिका है। यह महिलाओं के आत्मविश्वास पैदा करने का काम करता है। आज सोशल मीडिया ने महिलाओं की सोच में बदलाव ला दिया है।

**सोशल मीडिया के प्रति महिलाओं की जागरूकता-:**

सोशल मीडिया, जो हमारी जिंदगी का अब एक महत्वपूर्ण हिस्सा बन गया है। यह एक टेक्नोलॉजी की देन है। खास बात तो यह है कि सोशल मीडिया में पुरुष एवं महिला में समानता है। सोशल मीडिया का इस्तेमाल जितना पुरुष करते हैं उतना ही महिलाएं भी करती है। सोशल मीडिया के जरिए महिलाएं खुद को ही नहीं वरन् अन्य महिलाओं को भी सशक्त कर रही है। महिलाएं अपनी उपलब्धियों को सोशल मीडिया पर शेयर करती है, तो उसे देश अन्य महिलाएं भी आगे बढ़ने का प्रयास करती है। सोशल मीडिया से महिलाएं समाज में हो रहे बदलाव को भी जान सकती है। सोशल मीडिया से महिलाएं अपने ज्ञान और अनुभवों को बढ़ा कर स्वयं को सशक्त बना रही है। सोशल मीडिया महिलाओं को रोजगार के अवसर भी प्रदान करता है, जिससे वह सशक्त बन सके। सोशल मीडिया से महिलाएं नई कंपनियां, नये उद्यम की शुरुआत भी कर सकती है। आज सोशल मीडिया के माध्यम से देश की बड़ीबड़ी कंपनियों में बतौर महिला इंजीनियर घर बैठे कंप्यूटर से - काम कर रही है।

**सोशल मीडिया के सकारात्मक एवं नकारात्मक पहलू-:**

जैसा कि हम जानते हैं कि प्रत्येक वस्तु के दो पहलू होते हैं, सकारात्मक एवं नकारात्मक। इसी प्रकार सोशल मीडिया के भी महिलाओं के लिए दोनों पहलुओं को देखा जा सकता है। जिस प्रकार सोशल मीडिया महिला की आवाज ऊंची उठाता है तथा आगे बढ़ने में मदद करता है। उसी प्रकार असुरक्षा का खतरा भी रहता है।

सोशल मीडिया से साइबर अपराध का खतरा भी बढ़ जाता है। महिलाओं का मानसिक शोषण का खतरा भी बढ़ जाता है। कहींकहीं सोशल मीडिया द्वारा महिलाओं को इंसाफ भी मिलता है तो दूसरी तरफ मीडिया द्वारा यौन शोषण का खतरा - है। सोशल मीडिया भी बढ़ जाता कहीं ना कहीं समय भी खराब करता है। महानगरीय तथा राज्यों की राजधानियों में जोखिमों को बढ़ता देखा जा सकता है, उसी प्रकार सोशल मीडिया पर भी कुछ जोखिम होते हैं जिनसे बचकर निकलना भी महिलाओं के लिए आवश्यक होता है। फेसबुक एवं ट्विटर जैसी साइट्स पर पुरुषों द्वारा अभद्रता का उपयोग भी महिलाओं के मानसिक शोषण का कारण बनता है।

**निष्कर्ष-:**

सोशल मीडिया समुदाय या व्यक्तियों के विचारों एवं भावनाओं का आदान प्रदान करने के लिए एक मंच है। सोशल मीडिया में महिलाओं के व्यवहार को परिभाषित किया गया है। इस अध्ययन के पश्चात यह कहा जा सकता है कि सोशल साइट्स पर महिलाओं की भागीदारी भी बढ़ रही है। महिलाओं को सोशल मीडिया के जरिए रोजगार के अवसर मिल रहे हैं। जिससे महिला स्वयं को सशक्त बना रही है। सोशल मीडिया द्वारा महिलाओं में आत्मविश्वास बढ़ रहा है। महिलाएं भी सोशल मीडिया के माध्यम से समाज की रूढ़िवादिता को कम करने की कोशिश कर रही है। तथा समाज बदलाव लाने की कोशिश कर रही है। सोशल मीडिया महिलाओं की प्रगति में सहायक बन रहा है। तथा सोशल मीडिया के माध्यम से महिलाएं राष्ट्र की प्रगति में योगदान देने में सक्षम हो रही है। साथ ही यह कह सकते हैं कि हमें सोशल मीडिया पर महिलाओं को सुरक्षित रखने का प्रयास करना चाहिए जिससे उनकी प्रगति में बाधा ना हो।

**संदर्भ ग्रंथ-:**

1. Social Media and Women Empowerment - Madhu Kumari.
2. Social Media and Women: A Critical Evaluation of the Behavioural Disconnect- B.K.Ravi.
3. Role of Media in Empowering Women - Premlata and Tanuja Jukariya.
4. Media's role in empowering of women in India - SMT.G.Padmaja H.O.D. department of political science.

# पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात असलेल्या कुपोषण समस्येचा अभ्यास

***डॉ.रविंद्र भा.घागस[1] श्री.दीपक जनार्दन कडू[2]***

*[1]मार्गदर्शक, प्राचार्य, सौ.सीताबाई रा.करंदीकर कॉलेज वडकून, ता.डहाणू, जि.पालघर*

*[2]संशोधक, आजीवन अध्यापन आणि विस्तार, विभाग, 'बी' पथ, मुंबई विद्यापीठ, चर्चगेट- मुंबई*

**गोषवारा :**

भारत हा खेड्यांचा देश आहे. भारतातील 70 टक्के लोक खेड्यांमध्ये वास्तव्य करीत असून ग्रामीण भागात अनेक प्रकारच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, पाणी, शिक्षण, रस्ते इत्यादी समस्या असल्याचे दिसून येते. भारताला स्वातंत्र्य मिळून सुमारे 73 वर्षे पूर्ण झाली असून शासनाने विविध योजना व उपक्रम राबविले असले तरी पाहिजे तितके आरोग्याच्या बाबतीत समाधानकारक असे यश मिळाले नाही. त्यामुळे आरोग्याच्या बाबतीत एक स्वप्नच ठरलेले आहे. ग्रामीण भागात लहान मुलांच्या आरोग्याच्या बाबतीत कुपोषण ही समस्या भेडसावत असल्याचे दिसून येते. पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात असणाऱ्या कुपोषण समस्येवर या शोधनिबंधात कुपोषणाचे नेमके कारण कोणते? शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना :**

देशातील ग्रामीण भागात कुपोषण ही गंभीर समस्या बनत चालली आहे. शासनाकडून आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्यामुळे विविध योजना व उपक्रम राबविले जातात. परंतु तळागाळापर्यंत पोहचू शकत नाही. त्यामुळे ग्रामीण भागात कुपोषण समूह नष्ट होण्यास कारणीभूत ठरते. कुपोषणामुळे मुलांची बौद्धिक वाढ पूर्णपणे होत नाही. त्याचा परिणाम त्याच्या आकलन क्षमतेवर होतो. त्यामुळे त्यांची शैक्षणिक पातळी खालवते. साहजिकच त्याचा परिणाम आर्थिक प्रगतीवर होतो. त्यातूनच दारिद्र्य निर्माण होऊन बाहेर पडणे अवघड होते. आपल्या देशात लहान मुलांच्या बाबतीत कुपोषणाचे प्रमाण अतिशय गंभीर स्वरूपाचे आहे. देशातील कुपोषणाची स्थिती संपुष्टात यावी यासाठी सरकार प्रामाणिक प्रयत्न करीत असले तरी व्यक्तिगत पातळीवर प्रत्येक नागरीकाने प्रयत्न करणे आवश्यक ठरते. देशातील प्रत्येक तिसरे मूल कुपोषित आहे, असे जर कुणी सांगितले तर आपण त्याला वेड्यात काढू. पण ही वस्तुस्थिती आहे .देशातील 35.7 टक्के मुलंही कमी वजनाची आहेत. 38.4 टक्के मुलांचा संपूर्ण विकास झालेला नाही आणि प्रत्येक दुसऱ्या मुलाच्या शरिरात रक्त कमी असल्याची समस्या आहे. 15 ते 49 वर्षे वयोगटातील 53 टक्के महिला रक्ताचे कमी प्रमाण असल्याने पीडित आहेत. महिला आणि बालकांमध्ये किती भयंकर कुपोषण आहे. हेच या आकडेवारी वरून स्पष्ट होते. ही आकडेवारी दुसऱ्या तिसऱ्या कुणी प्रकाशित केली असून, राष्ट्रीय कुटुंब स्वास्थ सर्व्हेक्षण (NFHS) या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेने अर्थात (एन.एफ.एच.एस.) ने जारी केली आहे. देशात केलेल्या सर्व्हेक्षणानंतर ही आकडेवारी जारी करण्यात आली आहे. त्यामुळे याचे गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. आदिवासी बहुल पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड, डहाणू, तलासरी इत्यादी तालुक्यातील गरोदर माता, बालमृत्यू, कुपोषण सारख्या समस्या रोखण्यासाठी शासन दरबारी विविध योजना राबविल्या जात आहेत. मात्र कुपोषणाचा पालघर जिल्ह्याला असलेला विळखा मात्र काही कमी होतांना दिसत नाही. कुपोषण आणि बालमृत्युचे प्रमाण रोखण्यासाठी शासनस्तरावर विविध उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत. ग्रामबाल विकास केंद्र, उपचार केंद्र व पोषण पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून कुपोषणाचे प्रमाण रोखण्यासाठी कालबद्ध उपाययोजना करण्यात येत आहेत. 0-6 वयोगटातील कुपोषित बालकांचे सर्व्हेक्षण करून SAM व MAM बालकांची यादी करून यादीतील बालके त्यांच्या श्रेणीनुसार VCDC (Village Child Development Center), CTC (Child Treatment Center) किंवा NRC (Nutrition Rehabilitation Center) मध्ये दाखल केली जातात. यामध्ये बालरोगतज्ज्ञाकडून प्रत्येक तालुक्यामध्ये ग्रामीण रूग्णालयाच्या ठिकाणी शिबीराचे आयोजन करून तपासणी केली जाते. भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृतआहार योजना कमी वजनाची बालके व वाढ खुंटलेली मुले, उंचीच्या प्रमाणात कमी वजन असलेली बालके इत्यादी समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना करण्यात आली आहे. अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपाययोजना क्षेत्रात असलेल्या अंगणवाडी अंतर्गत 7 महिने ते 6 वर्षे वयोगटातील सर्व शाकाहारी मुलांना दोन केळी व मांसाहरी मुलांना एक उकडलेले अंडे आठवड्यातून चार वेळा म्हणजेच महिन्यातून 16 दिवस एकवेळचा अतिरिक्त आहार पुरविण्यात येतो. एकूणच पालघर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये कुपोषणावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शासन स्तरावर उपाय योजना करण्यात आल्या आहेत. किंबहुना पूरक पोषण आणि आरोग्य सेवा या दोन्ही एकत्रितपणे आणि समन्वयाने पुरविल्या तरच हा प्रश्न सोडविता येईल.

**तर्क संगत :**

ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर अशिक्षितपणा, दारिद्र्य, अंधश्रद्धा, रूढी - परंपरा, व्यसनधिनता इत्यादी गोष्टी कुपोषणास कारणीभूत आहे .ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे गरोदरपणात करण्यात येणाऱ्या तपासण्या, लसीकरण करून घेत नाही. फॉलिक ॲसिडच्या गोळयांचे सेवन केले जात नाही. त्या फेकून दिल्या जातात. बऱ्याचदा अंधश्रद्धेमुळे काही प्रमाणात उपचारासाठी भगताकडे जातात. शासनाच्या विविध उपक्रम व शिबीर आयोजित केले जातात. त्याचा लाभ घेत नाही त्यामुळे कुपोषणासारखी समस्या उद्भवते.

अभ्यासाचा उद्देश :

ग्रामीण भागामध्ये शासनाच्या आरोग्य विभागाकडून विविध योजना व उपक्रम राबविल्या जात असल्या तरी कुपोषणासारख्या समस्या भेडसावत आहे. त्याबाबतीत पुढील उद्देशाची मांडणी केली आहे.

1. कुपोषणाच्या संबंधीच्या उपाययोजनांचा अभ्यास करणे व त्यांचे आरोग्यामान उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

2. पालघर जिल्ह्यात आरोग्याच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी - सुविधा, दळणवळणांच्या साधनांचा व शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे.

3. कुपोषणाच्या समस्येला आदिवासींचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक घटक जबाबदार आहे का याचा अभ्यास करणे.

4. आरोग्याच्या राबविल्या जाणाऱ्या विविध योजना किंवा उपक्रमात राबविणारी शासकीय यंत्रणा व आदिवासी यांच्यातील पारंपारिक संबंधाचा शोध घेणे.

5. कुपोषणासाठी शासकीय योजनांचा आढावा घेणे.

6. कुपोषणासाठी शासकीय योजनांचा आढावा घेणे.

7. आदिवासी बालकांचे कुपोषण थांबविण्यासाठी केलेल्या उपाय योजनांचा शोध घेणे.

8. ग्रामीण भागातील कुपोषित बालकांना व स्तनदा मातांना दिला जाणारा सकस आहाराचा आढावा घेणे.

**गृहितके :**

1. आदिवासी भागात कुपोषण ही एक समस्या आहे.

2. ग्रामीण भागातील कुपोषणाच्या समस्येकडे शासनाकडून वेळोवेळी लक्ष पुरविले जाते.

3. कुपोषण समस्या स्त्रियांच्या आरोग्याशी निगडीत आहे.

4. आदिवासी भागात आरोग्य विभागाकडून दिल्या जाणाऱ्या आरोग्याच्या सेवांमुळे ग्रामीण आरोग्य केंद्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

5. ग्रामीण भागात आरोग्याविषयी सेवासुविधा वेळोवेळी, पुरविल्या गेल्याने आरोग्य सुविधांचा लाभ ग्रामीण आदिवासी जनतेला मिळत आहे.

**कार्यपद्धती :**

"पालघर जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यातील असणाऱ्या कुपोषण समस्येचा अभ्यास" संशोधनासाठी निवडलेल्या पालघर जिल्ह्यातील पाच तालुक्यातील आदिवासी भागातील कुपोषण या स्वरूपाच्या संशोधनाची गरज आहे. पालघर जिल्ह्यातील आरोग्य विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजना आणि उपक्रम यांच्या मार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा सुविधांवर भर दिला जाणार आहे. आरोग्य विभागामार्फत कुपोषणाची समस्या सोडविण्यासाठी ग्रामीण आरोग्य केंद्र सुसज्ज आहेत काय? कुपोषणाची समस्या सोडविण्यासाठी सेवा सुविधा पुरविणारे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग, अंगणवाडी सेविका त्वरीत त्यांच्या गरजा पूर्ण करतात का? कुपोषण झालेल्या बालकांना तसेच मातांना सकस आहार पुरविण्याचे काम करू शकतात. ह्याबाबतीत जर कुपोषण झालेल्या बालकांना योग्यवेळी उपचार केल्यास सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे. कुपोषणाची समस्या सोडविणे ही आजची काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच कुपोषण सारख्या गंभीर समस्या सोडवायच्या असेल तर दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा सहज उपलब्ध करून देण्याच्य दृष्टीने अधिक गरजेचे आहे.

सामाजिक विषयात संशोधन करतांना विविध शास्त्रीय पद्धतींचा व तंत्राचा अवलंब करून निष्कर्षाचे किंवा सिद्धांताचे प्रतिपादन करावे लागते. तथ्य संकलन हे संशोधन कार्यातील एक महत्त्वाचे व प्राथमिक कार्य आहे. सामाजिक संशोधनात समस्यांचे निर्धारण झाले की, मग त्या समस्याविषयी संबंधित तथ्ये माहिती व सामुग्रीचे संकलन करावे लागते.

i) समाविष्ट करण्याचे माध्यम :

कुपोषण समस्येविषयी संशोधन करतांना पालघर जिल्ह्यातील तालुका पातळीवर सर्व्हेक्षण संशोधन पद्धतीची आखणी करून आठ तालुक्यातील आदिवासी भागातील पाच तालुक्यांतील कुपोषित बालक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ती, स्तनदा माता, गरोदर स्त्रिया, वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सेविका, बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका व तालुका वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश असेल हे संशोधन तज्ज्ञाद्वारा प्रमाणित करण्यात आलेल्या प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात येईल.

**संशोधनाची मांडणी :**

संशोधनाची मांडणी करताना पुढील प्रकरणाची योजना करता येईल.

1) प्रस्तावना आणि संशोधन पद्धती 2) संशोधन साहित्याचा आढावा

3) पालघर जिल्ह्याचा आढावा 4) शासकीय योजना व शासन यंत्रणा

5) माहिती संकलन, विश्लेषण व सादरीकरण 6) निरीक्षण, निष्कर्ष व शिफारशी 7) संदर्भ सूची

**iii) नमुना निवड व साधने :**

सदर संशोधनात पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी आदिवासी भागातील पाच तालुक्यांतील 820 प्रश्नावली भरून घेण्यात येणार आहे.

| अ.क्र. | नमुना निवड | डहाणू | तलासरी | विक्रमगड | जव्हार | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कुपोषित बालक (पालक प्रश्नावली) | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 125 |
| 2 | अंगणवाडी सेविका | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 125 |
| 3 | आशा कार्यकर्ती | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 125 |
| 4 | गरोदर माता | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 125 |
| 5 | स्तनदा माता | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 125 |
| 6 | वैद्यकीय अधिकारी | 9 | 4 | 3 | 4 | 4 | 24 |
| 7 | आरोग्य सेविका | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 125 |
| 8 | बालविकास प्रकल्प अधिकारी | 2 | 1 | 1 | 2 | 1 | 7 |
| 9 | पर्यवेक्षिका | 8 | 7 | 7 | 7 | 5 | 34 |
| 10 | तालुका वैद्यकीय अधिकारी | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| | एकूण | 170 | 163 | 162 | 164 | 161 | 820 |

सदर संशोधनासाठी बराच कालावधी व श्रम खर्च होणार आहे. या संशोधनात तालुका वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी वर्ग, अंगणवाडी सेविका तसेच आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, गट प्रवर्तक, आशा कार्यकर्ती व गरोदर माता तसेच स्तनदा माता, कुपोषित बालकांचे पालक इत्यादींचा सहभाग अपेक्षित आहे.

साधने : सदर संशोधनात पुढील संशोधन साधनांचा समावेश केला जाईल.

**संशोधनाची साधने**

प्रश्नावली निरिक्षण दस्तऐवज भेटी चर्चा

(दस्ताऐवजामध्ये कुपोषणा संबंधित साहित्य, मासिके, नियतकालिके, वृत्तपत्रे, शासकीय माहिती पत्रके इत्यादी)

माहितीचे विश्लेषण :

संशोधनात आवश्यक ते पाहणीतंत्र वापरले जाणार असून संशोधनाच्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती निरीक्षण, प्रश्नावली या साधनांद्वारे संकलित केली जाणार आहे. संशोधनाच्या निवडलेल्या पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी आदिवासी भागातील पाच तालुक्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन प्रश्नावली भरून संकलित केली जाणार आहे. अशा भेटीमधून वैद्यकीय व प्रत्यक्ष चर्चा करून परिपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न संशोधनाच्या माध्यमातून केला जाईल. प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित माहितीचे विश्लेषण करताना प्रश्नाच्या गाभ्यानुसार शिर्षकाचे निर्धारण केले आहे. या

शिर्षकाखाली प्राप्त माहितीचे विश्लेषण व सादरीकरण केले जाणार आहे. माहितीचे विश्लेषण व सादरीकरणासाठी योग्य तेथे तक्ते, आलेख, आकृती तसेच संक्षिप्तरूपे यांचा वापर केला जाणार आहे.

निष्कर्ष :

1. ग्रामीण भागात कुपोषणामुले बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी गावपातळीवर आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

2. प्राथमिक आरोग्य केंद्राकडून आधिकाधिक सोयी सुविधा सुलभ होण्यासाठी फिरत्या आरोग्य केंद्राद्वारे वैद्यकीय संस्था पोहचविल्या जातात.

3. आरोग्य शिक्षणाचे आयोजन केल्यामुळे समाजाचे ज्ञान दृष्टिकोन व वर्तणूक सुधारण्यास चालना मिळाली.

4. गावपातळीवर प्रत्येक कुटुंबाला आरोग्याच्या सेवा सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडून तसेच गावपातळीवर प्रयत्न केले जातात.

5. कुपोषणाच्या समस्या सोडविण्यासाठी विविध शासकीय योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी आढावा घेणे आवश्यक आहे.

6. ग्रामीण भागातील कुपोषित बालकांना व स्तनदा मातांना दिला जाणारा आहाराचा आढावा घेणे आवश्यक आहे.

7. किशोरवयीन मुलींना आरोग्य शिक्षण व लैंगिक शिक्षणाविषयी समुपदेशन करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1. पंडीत व.वि. - "शिक्षणातील संशोधन" पुणे, मिलींद जोगळेकर प्रकाशन, 2007

2. डॉ.आकरे बी.एन.- "आदिवासी आणि सामुदायिक विकास योजना" नागपूर पिंपळापुरे, बुक डिस्ट्रीब्युटर्स, 2009

3. डॉ.राव.वाय मोहितकुमार, दैनिक तरूण भारत (पुरवणी), दि.07 एप्रिल 2021, कुपोषण : एक गंभीर समस्या

4. चव्हाण प्रविण, 9 - पेपर सकाळ, दि.29 नोव्हेंबर 2017

5. डॉ.गारे गोविंद, "आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ" सुगावा प्रकाशन

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021,
Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# निवडक मालवणी कवी आणि त्यांची कविता

*डॉ. सतीश कामत*

*कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट*

मध्ययुगीन कालखंडापासून मालवणी बोलीचे वाङ्मयीन उपयोजन झालेले दिसून येते. ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिका या ग्रंथात मालवणी बोलीतील काही शब्द सापडतात. "वेंचिति चकोर तलगे अमृतकण कोवळे" या ओळीतील 'तलग' हा शब्द मालवणी बोलीतील आहे. संत नामदेवांची "माजो जीव हिवान मेलो, माका नंदाचो फडको दी" ही गवळण या संदर्भात विचारणीय आहे. यावरून मध्ययुगीन काळात मराठी साहित्यात मालवणी बोली वापरल्याचे स्पष्टपणे दिसते. साधारणपणे १९२५ नंतर ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे, यांनी तुरळक प्रमाणात मालवणी बोलीचा वापर केल्याचे दिसते. नंतरच्या काळात विठ्ठल नेरूरकर यांनी " चल चेडवा पाडवात्सून आगबोटीत जपान" यासारख्या अस्सल मालवणी कविता लिहिल्या. त्यांना लोकगीताची लय असल्याने त्या प्रचंड गाजल्या. पुढे कथा कादंबरीत श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, मधु मंगेश कर्णिक, हमीद दलवाई, चिं. त्र्यं. खानोलकर, प्र. श्री. नेरुरकर, हरिहर आठलेकर, ल. ना. केरकर, दिवाकर कांबळी, माधव कोंडविलकर तसेच नव्या पिढीतील लेखक जयंत पवार, प्रवीण बांदेकर यांनी मालवणी बोलीचा कमी अधिक वापर केला आहे. विंदा करंदीकर, वसंत सावंत, महेश केळुसकर, दादा मडकईकर, नामदेव गवळी, अनिल धाकू कांबळी, अजय कांडर यांचे नाव घ्यावे लागेल. एकूणच मालवणी बोलीच्या उपयोजनाचे हे सर्व प्रयत्न अपुरे वाटत असले तरी जे थोडेथोडके प्रयत्न झाले त्यातून समर्थ जीवनानुभव व्यक्त झाल्याचे दिसते. कविता हा एक मूलभूत साहित्यप्रकार आहे. हा साहित्य प्रकार आपल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाला पुरातन काळापासून वेढून राहिलेला आहे. कविता हा सुद्धा संस्कृतीचा अभिन्न भाग मानला जातो कविता पद्धती प्रकट होताना दिसते कलांचे जसे व्यवच्छेदक लक्षण आहे तसे ते काव्याचे ही आहे डॉ. गोविंद काजरेकर म्हणतात त्याप्रमाणे "सतत प्रवाही असणाऱ्या कलाप्रकारात त्या समाज संस्कृतीचे अवशेष कधी प्रकट रूपात तर कधी अप्रकट रूपाने, बीजरूपाने वसत असतात."१ मालवणी कवितांतूनही मालवणी मुलखातील लोकसंस्कृतीचे, रूढी परंपरेचे, इथल्या माणसांच्या भावजीवनाची यथार्थ दर्शन घडते. विठ्ठल कृष्ण नेरुरकर यांच्या कवितेच्या बाबतीत असेच म्हणता येईल. 'घराची आठवण' ही त्यांची कविता मनीऑर्डर संस्कृतीवर भाष्य करणारी आहे. या कवितेतला बाप आपल्या मुलाला पैसे पाठविण्यास सांगत आहे.

"ठेय झिला घराची आठव रे
पाच तरी रुपये पाठव रे"

कोकणातील तत्कालीन दारिद्र्याचे, कृषीसंस्कृतीचे चित्र या कवितेत उमटले आहे. कवितेतला शेतकरी बाप आपल्या मुलाला घर आणि कुटुंबाला न विसरण्याविषयी सांगतो आहे. या कवितेत वैशिष्ट्यपूर्ण अशी मालवणी शब्दरूपे आली असून कवितेला लोकगीताची लय प्राप्त झाली आहे. 'चेडवाक निरोप' ही विठ्ठल नेरूरकर यांची आणखी एक महत्त्वपूर्ण कविता आहे. मुंबईला जाणाऱ्या मुलीची काळजी करणारा बाप येथे भेटतो. "चल चेडवा पाडवात्सून आगबोटीत जपान्" असे सांगणारा हा बाप मुलीला संसाराची, नवऱ्याची काळजी घे म्हणून सांगतो. गाव आणि शहरातील भेट कवीने येथे मांडली आहे. महानगराविषयीचे अनामिक भयही कवितेत व्यक्त झाले आहे. शिमीट, हटेल, घोव, म्हमय, आडको असे मालवणी शब्द कवितेची शोभा वाढवतात. "नेरूरकर आपल्या कवितेत ग्रामीण माणसाच्या परिप्रेक्षातून महानगरी जीवनाकडे पाहताना दिसतात."२ थोडक्यात गाव आणि शहरी जीवनाची भिन्न रूपे त्यांनी चपखलपणे मांडली आहेत असे म्हणता येते.

'स्वस्तिक', 'उगवाई', 'देवराई', 'माझ्या दारातील सोनचाफ्याचे झाड' आणि 'सागरेश्वर' हे कवितासंग्रह लिहिणाऱ्या वसंत सावंत यांच्या 'आझन - माझन' आणि 'सांजागाणां' या दोन मालवणी कविता लक्षणीय आहेत. 'आझन - माझन' कवितेत जुन्या काळातील लहान मुलांच्या खेळाचे चित्र प्रकटले आहे. ही बालसुलभ भावना व्यक्त करणारी

प्रेमकविता आहे. लपाछपीच्या खेळात किंवा नवरा-बायकोच्या खेळात एकमेकांना मिठ्या मारून प्रेमाचा आनंद लुटण्याचे चित्र कवीने उभे केले आहे. .

"शोधत हत् सारी पोरां, तरी कोणाक् गावाक् नाय
मुके तुझे घेवन् घेवन्,होटावरती उरली साय"

बालपणात मिळालेल्या या निखळ आनंदाने इथे काव्यरूप घेतले आहे. वसंत सावंत यांची 'सांजागाणां' ही कविता म्हणजे लोकगीताला दिलेले काव्यरूप होय. शेतीची कामे करायला बाहेर पडलेल्या आईची वाट पाहता पाहता मुले व्याकुळ होऊन जातात. अशा बालकांच्या सांत्वनासाठी हे बालगीत रचले आहे. वरील दोन्ही कवितेत बालसुलभ विश्वाचे आणि बालसुलभ शब्दांचे संदर्भ आले आहेत. महेश केळुसकर हे मराठीतील नामवंत कवी आणि कादंबरीकार आहेत. त्यांचा 'झिनझिनाट' हा मालवणी कवितासंग्रह खूप लोकप्रिय ठरला आहे. त्यांची 'बाळगो नि मालग्या' ही कविता तारुण्यातील प्रेमभावनेचे दर्शन घडविते. ही प्रेमकथा कोकणाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसते. सोरो (दारू), कोलेवरंगळ (उकडे तांदूळ) अशा खास मालवणी शब्दांमुळे प्रस्तुत कविता अर्थपूर्ण बनली आहे. "व्हनीबाय जुन्यार दी गे' ही कोकणातील दारिद्र्याचे करूण चित्र मांडणारी त्यांची कविता हृदयाचा ठाव घेते. मुंबईत गेलेला एकुलता एक मुलगा आईला विसरतो. मग दारिद्र्यात खपणारी ही कोकणातील स्त्री धडूत कपड्याला महाग होते. शेजारणीकडे ती जुन्या पातळाची मागणी करते. "व्हनीबाय कुडकुडता गे जीव माजो थंडयेन ह्या" या ओळीतून म्हाताऱ्या स्त्रीच्या दारिद्र्याची, अगतिकतेची कल्पना येते. "मालवणी मुलुख आणि तेथील माणसांची संस्कृती रेखाटण्याचे प्रयत्न केळूसकर यांनी आपल्या बोलीतील कवितेतून केलेले दिसतात."३ त्यासाठी कवी महेश केळुसकर यांनी मालवणी बोलीचा समर्पक वापर केला आहे. इतिहासावरील निष्ठा, राष्ट्रप्रेम, अध्यात्म, संस्कृती हे नारायण परब यांच्या कवितेचे विशेष पैलू आहेत. 'वाढवाळ' आणि 'झेटलीमन' या दोन कवितेत त्याचा प्रत्यय येतो. 'वाढवळ' हा एक लोकविधी आहे. कवितेतला मानकरी पाताळच्या देवांना वाढवळ घालून संतुष्ट करण्याविषयी सांगतो. कृषी संस्कृतीतील ही परंपरा आहे. इस्ट देवतांना शांत केल्यास शेतीचे रक्षण होते, धनधान्याची वृद्धी होते असा समज आहे. त्या श्रध्देतून हा विधी केला जातो. त्याचे चित्रण प्रस्तुत कवितेत आले आहे.झेटलीमन'ही कविता गावरहाटीत स्वतःला प्रमुख समजणाऱ्या व्यक्तीच्या मानसिकतेवर भाष्य करते. 'जेंटलमन' या इंग्रजी शब्दाचा 'झेटलीमन' हा मालवणी उच्चार आहे. ग्रामीण भागातील आडमुठ्या, स्वतःला महान समजणाऱ्या आणि स्वतःचे मोठेपण मिरवणाऱ्या अहंकारी व्यक्तीचा उपहास करणारी ही कविता आहे. कवितेतील संकासुर, शिमगा, रोंबाट, शबय हे संदर्भ कवितेला सांस्कृतिक मूल्य प्राप्त करून देतात.

नव्वदोत्तर काळातील महत्त्वपूर्ण कवी म्हणून प्रवीण बांदेकर यांचा उल्लेख करता येईल. 'येरु म्हणे', 'खेळ खंडोबाच्या नावानं' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. 'नया घरासाटी पावो खणताना' आणि 'वारूळ' या कवितेतून त्यांनी मालवणी बोलींचा आविष्कार घडविला आहे. नवीन घराचा पाया खणताना सापडलेल्या गाडग्या मडक्यांच्या खापऱ्या कवीला आधीच्या पिढ्याचा दस्तऐवज वाटतो. हा सगळा इतिहास जपावा असे त्याला वाटते. परंतु जागतिकीकरणाच्या रेट्यात ते शक्य होत नाही. कवीने या ठिकाणी हीच हतबलता व्यक्त केली आहे. वर्तमानकाळाचे आणि भूतकाळाचे सांस्कृतिक संदर्भ या कवितेला प्राप्त झालेले आहेत. 'वारूळ' ही कविता मन मारून जगणाऱ्या विधवा आजीविषयी आहे. तिचे अंधार कोठडीतील उदास एकलकोंडे जगणे कवीने पाहिले आहे. तिच्या पदराखाली तो वाढला आहे. अशा या आजीचा मृत्यू झाल्यानंतर कवी दुःखाने व्याकूळ होतो. आजी व नातू यांच्यातील वात्सल्यभाव येथे प्रकट झाला आहे. कोकणात वारुळाला मातृप्रतिमा मांडले जाते. पूजा केली जाते. कवीला वारुळात मातृरूपाचे दर्शन घडते.

"कोपरों राखान् ठेयल्लो आफडीञ्चो बायलो आणि बाळंतिणींसाठी" या ओळीतून शिवाशिवी आणि बाळंतपणाच्या काळात स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या खोलीचा उल्लेख आला आहे. हा सांस्कृतिक संदर्भ कवितेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. .

अविनाश बापट हे तरुण पिढीतील मालवणी कवी आहेत. त्यांचे 'मालवणी मेवा' आणि 'मालवणी नजर' हे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांची 'मालवणी मेवो' या शीर्षकाची कविता मुग्ध प्रेमाचे दर्शन घडवते. काजूगर, कोकणातील फळे, खाजे यांना मालवणी मेवा म्हणतात. कवितेतील नायिका मालवणी मेव्यासारखी वाटते. कवी म्हणतो "तू म्हणजे मालवणी मेवो, मालवणी मेवो म्हणजे तूच वाटलस्" साधारणपणे कोकणातील तरुण जीव जत्रेत एकमेकांना भेटतात, एकमेकांना आवडू लागतात. पण हे प्रेम सफल होतेच असे नाही. अशा या क्षणिक प्रेमाला मुग्ध प्रेम म्हणता येईल. अविनाश बापट यांची 'नामो कुळकार' ही व्यक्तिचित्रणात्मक कविता आहे. कष्ट करूनही दारिद्र्याचे भोग सुटत नाहीत. त्यामुळे जीवनाशी अनेक तडजोडी कराव्या लागतात. बापट यांनी नामूच्या माध्यमातून मालवणी माणसांचे कष्टप्रद आणि दुःखद जीवन या कवितेत रेखाटले आहे. लयबद्ध आणि गेय रचना करणारे कवी म्हणून दादा मडकईकर यांचा उल्लेख करता येईल. 'चान्नाची फुला', 'अबोलीचा वळेसर' हे त्यांचे मालवणी काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. 'जात्रा' ही दादांची विनोदी कविता आहे. जत्रेतील गमती जमती येथे मांडल्या आहेत.

"जुन्या घराच्या पड्येचो ह्यो काळोखो

"इटो गावकार काळो, बायलार त्येचो डोळो" (किंवा)

"इमला पेमला भोवता, धके माराचा पावता" अशी जत्रेतील निरिक्षणे कवीने मांडली

आहेत. 'मिरग' या कविते दादांनी कोकणातल्या जीवनशैलीवर प्रकाश टाकला आहे. पावसाळ्याच्या आगमनानंतर शेतीच्या कामाची उडालेली धांदल येथे पहावयास मिळते. या कवितेत परमाळता, सांबारा, मुंड्ये हे वैशिष्ट्यपूर्ण मालवणी शब्द आले आहेत. मालवणी बोलीचा जाणीवपूर्वक वापर करणारे कवी म्हणजे नामदेव गवळी होय. त्यांचा 'भातालय' हा कवितासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. डॉ. गोविंद काजरेकर म्हणतात "गवळी यांचा संपूर्ण कवितासंग्रह बोली रूपातून साकारला आहे. शेताभातात राबराबून कष्ट उपसणाऱ्या, निसर्गावर, देवदेवता आणि अगोचरांवरही अविचल श्रद्धा ठेवणारा, लोकविधी आणि सणाउत्सवांत हर्षोल्हसित होणारा, अपार जीवनोत्सुकतेने भारलेला लोकसमूह नामदेव गवळी यांच्या कवितेचा गाभास्थळी आहे"४ त्यांच्या कवितेतील कोकणी मुलुख आणि त्या पार्श्वभूमीवरचे मानवी जीवन हे अगदी एकरूप झालेले दिसते. 'भातालय'मध्ये याचा प्रत्यय जागोजागी येतो. कोकणातील शेतकरी हा कष्टाला घाबरणारा नाही. "आमच्या घामट्यावरच येता रूजान सगळा शात" असे सांगणाऱ्या या बळीराजाला स्वतःच्या कष्टावर भरोसा आहे. तरीही देवशरणता, सृष्टीतील सुष्ट दुष्ट शक्तींना शांत करण्याची पिढीजात परंपरा कोकणात आहे. त्याचेही संदर्भ कवितेमध्ये येतात. यावरून देसरुड, वाढवळ, देवचार, देवदेवस्की यांचा पगडा मालवणी माणसावर कसा आहे, ते लक्षात येते. मातीशी एकरूप झालेला कवी म्हणतो,

"मातयेन जगतो मातयेन हसतो जलमाचीच माती करतो
जलम दित्या परमेश्वराक मातयेतच जलम मागतो"

कोकणातील समृद्ध कृषीसंस्कृतीच जणू येथे साकारली आहे. 'खेळे' या कवितेतून एक वेगळी प्रेमकथा कवीने सांगितली आहे. कोकणात पालखी, खेळे, निशाण या रूपाने देव माणसांच्या भेटीला घरोघरी येतो, अशी श्रध्दा आहे. असाच एक प्रेमवीर विवाह होऊन गेलेल्या पूर्वाश्रमीच्या आपल्या प्रेयसीच्या घरी जातो. कित्येक वर्षांनी त्याची भेट होते. त्या नाजूक आणि भावूक क्षणांचे चित्रण 'खेळे' कवितेत आले आहे.

"तेंवा काळोख पडाक होळयेचे खेळे यिल्ले तुज्या दारात
त्येंच्याबराबर मियाच व्हतय मुकोमुको तुझ्या खळयात"

तिच्याविषयी कोणताच राग या प्रियकराच्या मनात नाही. अर्थात प्रेमभंगाचे दुःख पचवून जे पुढे जातात तेच खरे प्रेमवीर असतात. म्हणून रडत कुढत राहण्यापेक्षा दुःख बाजूला सारून पुढे जाणे महत्त्वाचे आहे, असा आशावाद या कवितेत प्रकटला आहे. नैसर्गिक आणि अस्सल जीवनानुभव हेच गवळी यांच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणता येते.

अजय कांडर यांनी 'आवानओल' व 'हत्ती इलो' हे दोन काव्यसंग्रह लिहिले आहेत. कृषीजन संस्कृतीतील ताणेबाणे हा त्यांच्या काव्यनिर्मितीचा मुख्य गाभा आहे. गाव सोडून शहराच्या गर्दीत हरवलेल्या कोकणी माणसाची व्यथा 'तांबेट पसरलेल्या मांडवात' मध्ये मांडली आहे. नोकरी निमित्ताने शहराची वाट धरलेल्या कोकणी माणसाला गावाकडच्या आठवणी येतात. "ह्यो सांजेचो काळोख खावक उठता शेरात" अशी त्यांची स्थिती होते. अशा वेळी फक्त त्या रम्य आठवणींची सोबत असते. थकले भागले जीव 'तांबेट पसरलेल्या मांडवात' जमतात. सुख दु:खाच्या गोष्टी करतात. असा जिव्हाळा शहरात दिसत नाही. ही खंत कवितेत व्यक्त झाली आहे. 'शेताभातातलो शिरवान' ह्या कवितेत कांडर यांनी श्रावणातील आठवणींना उजाळा दिला आहे. श्रावणातल्या आल्हाददायक वातावरणात माणसे अधिक जवळ येतात. सणासुदीच्या निमित्ताने एकमेकांशी घट्ट बांधली जातात. जणू एकात्मतेची भावना श्रावणाच्या निमित्ताने वाढू लागते. पण काळ बदलला आहे. सण-उत्सव तेच आहेत पण माणसामाणसात दुजाभाव निर्माण झाला आहे. हीच व्यथा प्रस्तुत कवितेत ठळकपणे मांडली गेली आहे .

रूझारिओ पिंटो यांनी कोंकणी, मराठी आणि मालवणी भाषेत काव्यलेखन केले आहे. 'दर्यादेगेर', 'आम्ही मालवणी', 'माऊली' हे त्यांचे काही काव्यसंग्रह आहेत. त्यांची 'माझी माय' कविता अंत:करणाला भिडते. आईची महती सांगताना कवी म्हणतो,

"आय ती आय दुधावरची साय
घसरलो कधी पाय तर हळद तुरटी लाय"

स्वत: दु:ख झेलून मुलांसाठी झिजणारी आई इथे भेटते. आईची ही माया समजून घेताना कवीची दमछाक होते.'दर्याराजा' या कवितेत कोळी बांधवांचे जगणे कवी रेखाटतो. वातावरणातील बदलामुळे कोळी बांधवांवर उपाशी मरण्याची वेळ आली आहे. अशावेळी दर्यासागराची विनवणी तो करतो.

"केवढ्या मोठ्या लाटेवरून घातली माझी होडी
जास्त नको, पण मासळी गावदे तरी थोडी " हा अथांग पसरलेला दर्यासागर

आपल्या लेकरांना वाऱ्यावर सोडणार नाही याची कोळी बांधवांना खात्री आहे. पिंटो यांनी मालवणी बोलीचा माफक वापर करून कोकणी माणसाचे जीवन रेखाटले आहे. मालवणी बोलीत काव्यलेखन करणाऱ्या काही मोजक्या कवयित्री आहेत. सुनंदा कांबळे या त्यापैकी एक होत. 'शंभर रुपये तरी पाठव' हा त्यांचा काव्यसंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. सुनंदा कांबळे यांनी कोकणी माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीवर विनोदी ढंगाने भाष्य केले आहे. 'गटारी' साजरी करणारी गावातील तरुण पोरे दारूच्या नशेत बकऱ्याऐवजी कालेलकारणीचा कुत्रा पकडून आणतात. नशेतच तो कापून खातात. पण दुसऱ्या दिवशी त्यांना जेव्हा खरी बातमी कळते तेव्हा त्यांची तोंडे पाहण्यालायक होतात. माणसाच्या वर्तनविसंगतीवर या कवितेत भाष्य केले आहे. '...आणि आवडण आजी उठली' ही त्यांची दुसरी कविता ही अशीच विनोदी आहे. एका वृद्ध स्त्रीच्या मृत्यूची गोषेट येथे रंगवून सांगितली आहे. संपूर्ण कविता नाट्यमय रूप धारण करते. घटना प्रसंगातील विसंगती हेरून त्यावर हलक्या-फुलक्या शब्दात भाष्य करण्याचे कौशल्य सुनंदा कांबळे यांच्याकडे असल्याचे दिसते..

सई लळीत यांनी ही मालवणी बोलीतून काव्यलेखन करून मालवणी बोली सर्वदूर पोहोचली आहे. 'वांगड' हा त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यातून त्यांनी कोकणातील लोकपरंपरा, कुटुंब, नातेसंबंध, स्त्रीविश्व समर्थपणे मांडले आहे. 'वांगड' कवितेत गावाकडे एकटेपणाचे दु:ख भोगणाऱ्या आईची व्यथा येते. अशा कितीतरी स्त्रिया आपल्या मुलांची वाट पहात जुन्या आठवणी कुरवाळत जीवन जगत आहेत. कवितेतील आवशी म्हणते,

"धा वर्षा झाली थंडीत झिलान घितल्यान एक गरम आंगडा
आता गिम पावसात आसता ता माझ्या वांगडा"

कधीकाळी मुलाने घेतलेला अंगरखा म्हातारीला जसाच्या तसा आठवतो. तो अंगरखा आता जीर्ण झाला आहे. तसेच काळानुरूप नात्यातही अंतर पडले आहे. पण आठवणींची सोबत कायम आहे. कोकणातील जिते जागते असे चित्र

कवयित्री मांडते. सई लळित यांची 'शबय' ही कविता सुद्धा तितकीच महत्त्वपूर्ण आहे. शिमग्यातील शबय मागण्याचा संदर्भ कवितेला आहे. कवितेतला नायक राधेचे सोंग घेऊन मुद्दाम तिच्या दारात येतो. तिचे दुसऱ्या पुरुषाशी लग्न झाले आहे. शबय मागणारा 'तो' आणि नवऱ्यासह माहेरी आलेली 'ती' यांच्यातील मूक संवाद कवयित्रीने रंगविला आहे. त्याला पाहून तिचे डोळे पाणावतात, याचे त्याला समाधान वाटते. तो म्हणतो,

"मी मनातल्या मनात तुझ्या पुढच्या जन्माची शबय मागतय
आणि डोळे तळयेत ठेवून तसोच पुढच्या घराकडे वळतय"

या कवितेतून प्रियकर प्रेयसीची व्याकुळता, प्रामाणिकता, अबोल प्रेम अशा विविध छटांचे दर्शन घडते.

थोडक्यात असे म्हणता येते की, मालवणी मुलखातील या वरील सर्व कवींनी दक्षिण कोकणातील निसर्गाचे, माणसाच्या स्वभावाचे, चालीरिती आणि रूढी परंपरांचे, श्रद्धा आणि अंधश्रद्धाचे, दैन्य दारिद्र्याचे, प्रेमादी भावभावनांचे नेमके आणि नेटके दर्शन घडविले आहे. मालवणी बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळा यांचा वापर हे या कवितांचे महत्त्वपूर्ण लक्षण आहे. मानवी स्वभावाचा परिपोष आणि रसपरिपोष यादृष्टीने या कविता महत्त्वाच्या ठरतात. या कवितांतून मानवी वर्तनातील संगती - विसंगती, प्रेम, सुख - दुःख, उपहास, खोडकरपणा यांचे वास्तव दर्शन घडते. समर्पक शीर्षके आणि समर्थ आशय लाभल्यामुळे उपरोक्त सर्व कवितांना वाङ्मयीन मोल प्राप्त झाले आहे. मालवणी मुलखातले हे कवी आणि त्यांची कविता काही अंशी अलक्षित वाटत असली तरी मालवणी मुलखाची आणि मालवणी बोलीची पताका फडकती ठेवण्यात ती नक्की यशस्वी ठरली आहे, यात शंका नाही.

**संदर्भ-**

१. काजरेकर गोविंद, कोकणातील कृषी संस्कृती आणि लोकगीते, दर्या प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. ७

२. काजरेकर गोविंद व इतर, मालवणीतल्या वाटा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१७, पृ. १०४

३. तत्रैव, पृ. १०९

४. गवळी नामदेव, भातालय, लोक वांगमय गृह प्रकाशन, मुंबई, २०१८, मलपृष्ठ

# रासायनिक कीटकनाशकांचा वसुंधरेवर होणारा दुष्परिणाम व उपयोजनात्मक नैसर्गिक कीटकनाशकांचे गुणधर्म - एक चिकित्सक अभ्यास

**सौ लोंढे एस. आर.**

*चेंबुर वेल्फेअर मराठी शाळा*

**सारांश:**

आधुनिकीकरणाच्या युगात मानवाला भेडसावणारी सर्वात मोठी समस्या म्हणजे लोकसंख्येचा भस्मासुर होय. मानवाच्या तीन मूलभूत गरजांपैकी अन्न ही गरज पूर्ण करण्यासाठी मानवाने आधुनिक तंत्रज्ञान आणि विकसित विज्ञान यांच्या साह्याने अनेक विविध रसायनांचा उपयोगाने रासायनिक खते रासायनिक कीटकनाशके धान्यांच्या व पिकांच्या संकरित जाती, आधुनिक यंत्रसामग्री या सर्वांचा वापर करून रासायनिक शेती सुरू केली. रासायनिक शेती मधून प्रारंभीस मिळणारे उत्पादन भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे आर्थिक उत्पादनात सुध्दा  वाढ होते . परंतु रासायनिक कीटकनाशकांमुळे दीर्घकाळ आढळणारे दुष्परिणाम दिसून येतात. या कीटकनाशकांचा पर्यावरणातील इतर रसायनं बरोबर रासायनिक अभिक्रिया होऊन अतिशय घातक अशी संयुगे तयार होतात. पर्यावरण, मानव आणि प्राणी यांना घातक असणारे रासायनिक कीटकनाशके, कॅन्सर, यकृतात बिघाड, नपुंसकता, गर्भपातचे विकार इत्यादी साठी कारणीभूत ठरतात. रासायनिक कीटकनाशकांचा मध्ये कार्बन आणि क्लोरीनचे प्रमाण खूप जास्त असते. या कीटकनाशकांचे नैसर्गिकरीत्या विघटन होऊ शकत नाही. त्यामुळे ते पाण्यात मातीत मिसळलेल्या स्थिती तशीच राहतात. रासायनिक शेती करताना बेसुमार इंधनाचा वापर केला जातो. युरोपियन लोक 12टन नंतर अमेरिकन लोक 5 टन इंधनाचा वापर करतात. रासायनिक शेतीमध्ये पशु प्राण्यांचा फारसा वापर केला जात नाही . त्यांना एकत्रित डांबून ठेवल्यामुळे विविध रोग होण्याची शक्यता असते. या प्राण्या साठी लागणारे खाद्य रासायनिक शेतीमध्ये तयार होत नाही. प्राण्यांचे खाद्य आयात करावे लागते. त्यामुळे एकूणच रासायनिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांवर आर्थिक भार पडतो. रासायनिक शेती त्या शेतकऱ्याची केवळ जीवनशैली बदलते मात्र त्याचा विकास थंडावतो. या सर्व समस्यांवर उत्तम उपाय म्हणजे सेंद्रिय शेती होय. सेंद्रिय शेतीमध्ये जमिनीची सुपीकता वाढून रासायनिक शेतीपेक्षा जास्त उत्पादन निर्माण करण्याची क्षमता असते. या शेतीमध्ये शेतकरी स्वयंसिद्ध असतो. कारण शेतीसाठी लागणारी सर्व प्रकारची खते कीडनाशके, कीटकनाशके शेतकरी स्वतः तयार करीत असतो. त्यामुळे त्याची आर्थिक बचत होते. सेंद्रिय शेतीमध्ये पिकांना वेगवेगळी मूलद्रव्य संयुगे पुरविण्याची गरज नसते. मातीत उपलब्ध असणाऱ्या जीव आणि सूक्ष्मजीवांमुळे माती दीर्घकाळ सुपीक राहण्यास मदत होते. तसेच अशा जमिनीत उगवणारे पीकही सुपीक असते. सेंद्रिय शेती मध्ये वापरले जाणारे महत्त्वपूर्ण कीटकनाशके वैयक्तिक स्तरावर कशी तयार केली जावीत व त्यांचा वापर कसा करावा, रासायनिक कीटकनाशकांचे दुष्परिणाम याचा चिकित्सक अभ्यास सदर प्रकल्पात करण्यात आला आहे

**Keywords:** रासायनिक कीटकनाशके, नैसर्गिक कीटकनाशके,  मिथॉक्सीक्लोर, सेंद्रिय शेती, शाश्वत विकास, कृषिप्रधान

**प्रस्तावना:**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतीमालाच्या उत्पन्नांची मोजणी करून म्हणजे शेतात किती पीक आले ते मोजून आणि त्याच्या बाजार भावाची चाचपणी करून या उत्पादनांमध्ये लाभांचे गणित अर्थशास्त्रज्ञ मांडत असतात. अनेक शेतकऱ्यांच्या मते शेतीची उत्पादकता आर्थिक उत्पन्नापेक्षा जास्त आहे. शेती समाजाला अन्न आणि इतर उपयुक्त गोष्टींचा पुरवठा करत असते. वाढत्या अन्नाच्या गरजा , अन्नधान्याची किंमत कमी करण्यासाठी आणि अधिकाधिक उत्पन्नासाठी शेतीच्या उत्पादन क्षमतेची शाश्वत वाढ होणे गरजेचे आहे. शेती उद्योगासाठी आवश्यक असलेल्या एखाद्या घटकाचे प्रमाण कमी झाल्यास त्याचा उत्पादन क्षमतेवर परिणाम होतो. रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा अतिरेकी वापरामुळे जमिनीचा पोत, प्रत आणि त्यातील घटकांची रचना बदलते. जमिनीत मिसळले अनेक रसायने मातीतील अनेक जीवाणूंचा नाश  करतात. हे जिवाणू मृत जीवांच्या विघटनातून व इतर अनेक नैसर्गिक प्रक्रिया द्वारा मातीमध्ये पोषक द्रव्ये निर्माण करून वनस्पतींना उपलब्ध करून देत असतात. हे जिवाणू नष्ट झाले तर मातीची उत्पादनक्षमता कमी होते . जमिनीचा

कस कमी झाला की त्याच्या उपलब्ध जमिनीच्या उत्पादकतेवर परिणाम होतो. उदाहरणार्थ ..ऊस लागवडीखाली असलेली हजारो एकर जमीन अविवेकी रासायनिक कीटकनाशकांच्या वापरामुळे क्षारयुक्त झालेली आपणास बघायला मिळते. मागील काही वर्षांची तुलना करता या जमिनीमध्ये सध्या खूपच कमी उत्पादन मिळते. रासायनिक कीटकनाशके यामुळे जमिनीचा दर्जा आणि जनुकीय स्रोतांमध्ये घट झाल्याने उत्पादन कमी होत जाते .याउलट नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर केला असता जमिनीची सुपीकता वाढते. जमिनीचा पोत सुधारतो . क्षारांचे प्रमाण योग्य राखले जाते. याचा एकूण परिणाम म्हणजे वर्षानुवर्षे नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर केल्यास एकूण पिकांचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पादन वाढते.

**उद्दिष्टे:**

एकविसाव्या शतकात वाटचाल करताना या आधुनिकीकरणाच्या आणि यंत्राच्या युगात लोकसंख्या वाढ मर्यादित पणे होत आहे .भारत हा शेतीप्रधान देश असूनही भारतातील मर्यादित शेतजमीन सर्वांना पुरेसे अन्नधान्य निर्माण करू शकत नाही .आणि म्हणूनच मानवाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रासायनिक शेती करण्याचा संकल्प केला. जेणेकरून वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज पूर्ण करता येईल .रासायनिक शेतीमध्ये किडीचा नाश करण्यासाठी रासायनिक कीटकनाशकांचा वापर केला जातो. त्यामुळे एकूण पिकांचे उत्पादन वाढते. परंतु काही कालावधीनंतर सतत रासायनिक कीटकनाशके वापरल्यामुळे शेतजमीन शार युक्त होऊन नापीक होते. त्याचा परिणाम उत्पादन क्षमतेवर होतो रासायनिक कीटकनाशकांचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. शिवाय पिकांची प्रतवारी घटून त्यांचे पोषणमूल्य कमी होते .रासायनिक कीटकनाशकांच्या वापराच्या सर्व समस्या लक्षात घेऊन उपयोजनात्मक सेंद्रिय शेती करणे आवश्यक आहे .यामध्ये नैसर्गिक कीटकनाशकांचा वापर केला जातो. नैसर्गिक कीटकनाशके सहज उपलब्ध होऊ शकतात. त्यांच्या निर्मितीसाठी कमी खर्च येतो. मुबलक प्रमाणात उपलब्ध झाल्याने शेतजमिनीवर एकूणच सकारात्मक परिणाम दिसून येतो. जमिनीचा पोत सुधारतो अशा जमिनीतील अन्नधान्य यामुळे कोणतीही व्याधी होत नाही. मानवी आरोग्य नीरा गमय राहते .जमिनीतील सर्व मूलद्रव्य संयुगे यांचा पुनर्वापर केला जातो. निसर्गाचा समतोल राखला जातो. नैसर्गिक कीटकनाशके अल्पदरात उपलब्ध झाल्याने आर्थिक उत्पादन व उत्पन्नात वाढ होते. हे सर्व सकारात्मक परिणाम दीर्घकाळापर्यंत आढळतात या सर्व बाबींचा विचार करता सदर संशोधनात रासायनिक कीटकनाशके व नैसर्गिक कीटकनाशके यांच्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास करुन नैसर्गिक कीटकनाशकांचे दूरदर्शी सकारात्मक परिणाम पाहण्यात आले. तसेच उपयोजनात्मक विविध नैसर्गिक कीटकनाशकांची निर्मिती स्पष्ट करण्यात आली आहे.

**गृहितके:**

1)रासायनिक कीटकनाशकांचा रोपांच्या वाढीवर परिणाम जाणून घेणे.

2) नैसर्गिक कीटकनाशकांच्या रोपांच्या वाढीवर परिणाम जाणून घेणे.

3) रासायनिक कीटकनाशके व नैसर्गिक कीटकनाशके यांच्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास करणे .

4)नैसर्गिक किटकनाशके निर्माण करण्याच्या विविध पद्धती समजून घेणे .

5)सेंद्रिय शेतीचे दीर्घकालीन परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती व साधने:**

**प्रयोग पद्धती**

समस्या निराकरणासाठी व निरीक्षणासाठी प्रयोग पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रयोग पद्धती सद्यपरिस्थितीत परिस्थितीतील निरीक्षणांचे वर्णन करून सद्यस्थितीतील निष्कर्ष स्पष्ट करते.

**प्रयोग पद्धती**

सदर संशोधनासाठी प्रयोग पद्धती वापरण्यात आली. शेत जमिनीची प्रतवारी व रोपांची प्रतवारी ठरवण्यासाठी रासायनिक कीटकनाशके व नैसर्गिक कीटकनाशके या साधनांचा वापर करण्यात आला. शास्त्रीय दृष्टिकोनातून सर्व निरीक्षणे घेण्यात आली. या सर्व निरीक्षणांचा तुलनात्मक अभ्यास करून त्यातील उत्तम कीटकनाशके कोणती हे ठरविण्यात

आले. त्यासाठी रासायनिक कीटकनाशके म्हणून Methoxychlor वापरण्यात आले तर नैसर्गिक कीटकनाशक म्हणून कोरफड आणि निंबाचा अर्क ही साधने वापरण्यात आली.

**निरीक्षण, निष्कर्ष व संकलन**

रासायनिक कीटकनाशकांचा वापर यामुळे येणाऱ्या रोपांचे प्रमाण मोजणे व नैसर्गिक किटकनाशकांच्या वापरामुळे येणाऱ्या रोपांचे प्रमाण मोजणे. सदर संशोधनामध्ये तुलनात्मक अभ्यासासाठी मेथॉक्सीक्लोर या रासायनिक कीटकनाशकाचा वापर केला आहे . मेथॉक्सीक्लोर या रासायनिक कीटकनाशकांचे अणूवस्तुमान 345. 65 असून हे पाण्यामध्ये अंशतः विरघळते तर अल्कोहोलमध्ये पूर्णतः विरघळते . स्पीरीट दिव्या वर उष्णता दिली असताना मेथॉक्सीवलोर इथेनॉल मध्ये पूर्णपणे विरघळते. नैसर्गिक आणि रासायनिक कीटकनाशकांचा परिणामांचा गणितीय पद्धतीने तुलना केली असता खालील निरीक्षणे आढळले. या संशोधनामध्ये नैसर्गिक कीटकनाशक म्हणून कोरफड आणि लिंबू याचा अर्थ वापरण्यात आला तर रासायनिक कीटकनाशक म्हणून मेथॉक्सीक्लोर हे रसायन वापरण्यात आले.

**नैसर्गिक किटकनाशकांच्या वापरामुळे येणाऱ्या पिकांचे प्रमाण:**

1)नैसर्गिक कीटकनाशक वापरले असता पेरणी नंतर येणाऱ्या पिकांचे प्रमाण जवळजवळ 20 ते 25 टक्के इतकेच होते तर रासायनिक कीटकनाशक वापरले असता पिकाचे प्रमाण जवळजवळ 75 ते 80 टक्के इतके होते 2)दुसऱ्या पेरणी नंतर येणाऱ्या पिकांचे प्रमाण नैसर्गिक कीटकनाशकांच्या वापरावर 45 ते 50 टक्के इतके झाले तर रासायनिक कीटकनाशकांच्या वापराचे प्रमाण 50 ते 55 टक्के इतके झाले 3)तिसऱ्या पेरणी नंतर येणाऱ्या पिकांचे प्रमाण नैसर्गिक कीटकनाशकांच्या वापरावर 75 ते 80 टक्के इतके झाले तर रासायनिक कीटकनाशकांचा वापर यात ते प्रमाण 30 ते 35 टक्के इतके कमी झाले 4)चौथ्या पेरणी नंतर येणाऱ्या पिकांचे प्रमाण नैसर्गिक कीटकनाशकांच्या वापरात 90 ते 95 टक्के झाले तर रासायनिक कीटकनाशकांचा वापर हे प्रमाण 5 ते 10 टक्के इतके कमी झाले

**नैसर्गिक कीटकनाशकांच्या वापराचे उद्दिष्ट व फायदे**

सदर संशोधनामध्ये विविध नैसर्गिक कीटकनाशके शेतकरी स्वतः कशी तयार करू शकतो व त्याचा वापर कोणत्या प्रमाणात करावा हे सांगण्यात आले आहे.

**नैसर्गिक किटकनाशकांच्या वापराचे उद्दिष्टे**

1)जमिनीची सुपिकता वाढवणे जमिनीचा पोत सुधारणे क्षारांचे प्रमाण योग्य राखणे.

2)मातीचा सामू योग्य राखणे आर्थिक उत्पन्न वाढवणे. 3)भाषकांच्या वापराचे फायदे नैसर्गिक कीटकनाशके वनस्पतींना फुलांना नुकसानकारक ठरत नाही. 4)कोणत्याही परिस्थितीमध्ये नैसर्गिक कीटकनाशके कीटकांना वनस्पती पासून दूर करतात . 3)नैसर्गिक कीटकनाशक दीर्घकाळापर्यंत परिणाम साधतात लहान मुले व पाळीव प्राण्यांच्या दृष्टीने सुरक्षित आहे. सदर संशोधनामध्ये विविध नैसर्गिक कीटकनाशके शेतकरी स्वतः तयार करू शकतो हे सांगण्यात आले.

**किटकनाशकांची यादी:**

1) लिंबाच्या पानांची पावडर निंबोण्यांचा अर्क निंबाचे तेल 2)आले-लसूण-मिरचीचे मिश्रण 2)तंबाखू आणि मिरची चा अर्क 3)तंबाखू अर्क व गोमूत्र यांचे मिश्रण 4)कोरफड आणि निंबाचा अर्क 6)खनिज तेलाच्या द्रावणाची फवारणी लिंबाचे 5)तेल आणि मिरीच्या पुडी चे मिश्रण

**संदर्भसूची:**

1. *विज्ञान शिक्षण पूरक साहित्य- शरद नाईक*
2. *शहरी शेती- प्राध्यापक श्री.अ. दाभोळकर*
3. *विज्ञान पत्रिका- मराठी विज्ञान परिषद*
4. *www.Wisegeek.com*
5. *www.insecto.com*
6. *www.botgard.UCLA.edu*
7. *www.hotfrog.in*

# ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणातील समस्यांचा चिकित्सक अभ्यास

***सौ लोंढे शुभांगी राजेंद्र***
*चेंबुर वेल्फेअर मराठी शाळा*

**सारांश:**

जगात थैमान घातलेल्या कोरोना महामारी सर्वच क्षेत्रापुढे काही मूलभूत प्रश्न उभे केले आहेत .त्यास शिक्षण क्षेत्र सुद्धा अपवाद राहिलेले नाही. कोरोना महामारी च्या या काळात परिस्थितीनुसार शैक्षणिक सत्र चालू करण्यासोबतच मुलांनाही सुरक्षित ठेवण्यावर भर दिला जात आहे . या पार्श्वभूमीवर ऑनलाइन शिक्षणाने पारंपारिक शिक्षणाला एक पर्याय म्हणून लक्ष वेधले आहे. ऑनलाइन शिक्षणात दुरस्थ शिक्षण या संकल्पनेचा अंमल करून संमिश्र माध्यमातून शिक्षण देणे ही आज काळाची गरज बनली आहे .अशा प्रकारचे शिक्षणाचे उद्दिष्ट हे टीव्ही ,रेडिओ , लघुसंदेश सेवा या माध्यमातून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण ही अशा परिस्थितीमध्ये पर्याय व्यवस्था म्हणून राबविणे गरजेचे ठरते मात्र ऑनलाईन शिक्षणामध्ये अध्ययन,अध्यापन आणि मूल्यमापन या विविध स्तरावर निर्माण होणाऱ्या विविध समस्यांची जाणीव होणे त्याचा सविस्तर चिकित्सक अभ्यास करणे आणि त्यावर उपाययोजना शोधणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**Keywords -:-** माध्यमिक स्तर, विद्यार्थी, ऑनलाइन शिक्षण, समस्या, चिकित्सक अभ्यास

**प्रस्तावना**:

करोना व्हायरस चा जगातील इतर देशांसह भारतातही वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शैक्षणिक वर्ष 2019 -2 0 मध्ये मार्च 2020 च्या मध्यावर शाळा व महाविद्यालय काही काळापुरती बंद ठेवण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला. 24 मार्च 2020 रोजी केंद्र सरकारने लॉकडाउन घोषित केले. सुरुवातीचे काही दिवस घराबाहेर पडू नका वगैरे सूचनांचे पालन करून झाल्यानंतर covid-19 चा प्रसार आणि परिणाम वेगळा व गंभीर आहे याची सर्वांना जाणीव झाली .या सगळ्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावर न झाला तरच नवल .शिक्षक आणि विद्यार्थी घरात अडकून पडले तरी शिक्षण दिले व घेतले जाऊ शकते आणि ते सुद्धा रोज वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ही कल्पना जोर धरू लागली आणि बघता बघता अगदी प्राथमिक ते पदव्युत्तर स्तरावरील अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन ऑनलाइन पद्धतीने सुरू झाले. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'अद्ययावत व्हा' या सूचनेप्रमाणे स्वतःला अद्ययावत बनवत राहणे आणि गांधीजींच्या 'कर के देखो' या सूचनेप्रमाणे नवनवीन गोष्टींना घाबरून न जाता आणि मुख्य म्हणजे अपयशाला न घाबरता सतत प्रयोग आणि प्रयत्न करत राहणे, ते करता शिकणे व नवनवीन गोष्टींवर प्रभुत्व संपादित करणे हाच बदलाला तोंड देण्याचा योग्य मार्ग आहे

**संशोधन समस्येची गरज:**

ऑनलाइन शिक्षण हे रोजच्या शिक्षणापेक्षा खूप वेगळे आहे. महाराष्ट्रामध्ये जवळजवळ एकवीस हजार शाळा आहेत. याशिवाय केंद्रीय अभ्यास मंडळ तसेच आंतरराष्ट्रीय अभ्यास मंडळाच्या शाळांची संख्या ही उल्लेखनीय आहे. या सर्व शाळांमधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.कोरोना च्या प्रादुर्भावामुळे त्यांच्या भवितव्याचा काय हा शिक्षक व पालकांना पडलेला महत्त्वाचा प्रश्न ऑनलाईन साधनाने तात्पुरता का होईना सोडवला. ऑनलाईन शिक्षणाच्या दिशेने घाईत उचललेले गेलेल्या या नियोजित पावलामुळे डिजिटल उपलब्धता नसलेला एक मोठा वर्ग या आभासी वर्गाबाहेर फेकला गेला. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अध्ययन , अध्यापन आणि मूल्यमापन या प्रक्रियांमध्ये निर्माण झालेल्या समस्यांचा शोध घेऊन त्यांचा चिकित्सक अभ्यास आवश्यक आहे.

**संशोधन समस्येचे महत्व:**

मानवाचा सर्वांगीण विकास हा शिक्षणावरच अवलंबून आहे. शिक्षण हे आपल्यामध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि आपले व्यक्तिमत्त्व घडविण्यास सहाय्यता करते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा पाया हा शाळेतच रचला जातो. माध्यमिक स्तरावर प्राप्त झालेले शिक्षण, संस्कार आणि मुल्यांच्या आधारावरच पुढील

शिक्षणातील यश हे अवलंबून असते. या शिक्षणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असते.सध्याच्या कोविड-19 च्या परिस्थितीनुसार माध्यमिक स्तरावर अध्ययन,अध्यापन आणि मूल्यमापन या तीनही क्रिया ऑनलाइन पद्धतीने चालू आहे .ऑनलाइन शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी, शिक्षक मुख्याध्यापक आणि पालक यांना विविध स्तरावर विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याला कारणीभूत अचानक सुरू झालेले ऑनलाइन शिक्षण. विद्यार्थी आणि शिक्षक यांना अध्ययन-अध्यापन प्रक्रियेसाठी आवश्यक प्रशिक्षण साधन सामग्री उपलब्ध नसल्याने त्यांच्यामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच अतिरिक्त कामाच्या ताणामुळे अध्यापनात अध्यापकांना समाधान जाणवत नाही .तसेच अनेक प्रशिक्षित लोक अध्यापन करताना दिसतात .त्यामुळे अध्यापन वातावरण निर्मिती करू शकत नाही. अभ्यासक्रम ही सर्वसमावेशक अशी योजना आहे .जीवन व शिक्षणाचा संबंध जोडून कृती प्रधान अनुभव देण्याचा प्रयत्न अभ्यासक्रमातून व्हावा यासाठी अभ्यासक्रम रचना केलेली आहे. अभ्यासक्रमातून ज्ञान ,कौशल्य, वृत्ती ,प्रयोग ,व्यवसाय इत्यादींची जोपासना करणारे अनुभव दिले जातात. मात्र सध्याच्या ऑनलाईन शिक्षणात माध्यमिक स्तरावर अध्ययन ,अध्यापन मूल्यमापन ही सर्व उद्दिष्टे खरोखर साध्य होतात का हे जाणून घेणे गरजचे आहे.

**<u>संशोधनाची उद्दिष्टे</u>**:

1) माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन शिक्षणाचा अभ्यास करणे दोन माध्यमिक स्तरावरील ऑनलाइन शिक्षणातील अध्यापन प्रक्रियेतील समस्यांचा अभ्यास करणे

2) माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन शिक्षणातील अध्ययन प्रक्रियेतील समस्यांचा अभ्यास करणे.

3)माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन शिक्षणातील मूल्यमापन प्रक्रियेतील समस्यांचा अभ्यास करणे.

5) माध्यमिक स्तरावरील ऑनलाईन शिक्षणातील येणाऱ्या समस्या याला अनुसरून निष्कर्ष काढणे.

**<u>संशोधनाची साधने:</u>**

संशोधकाने संशोधनासाठी ज्या समस्येची निवड केलेली असते त्या समस्येच्या संदर्भात विविध प्रकारची माहिती गोळा करावी लागते. संशोधन समस्येचे स्वरूप व उद्दिष्ट लक्षात घेऊन योग्य साधनांचा वापर करावा लागतो. कृती संशोधनासाठी वापरली जाणारी साधने पुढील प्रमाणे आहेत.

1) प्रश्नावली, 2) मुलाखती, 3) निरीक्षण सूची

1) प्रश्नावली-

सर्वेक्षण संशोधन पद्धती प्रश्नावली या साधनाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. संशोधनाच्या विविध साधनांमध्ये अत्यंत लोकप्रिय व मोठ्या प्रमाणात वापरले जाणारे हे साधन आहे. प्रश्नावली या साधनाद्वारे प्रतिसाधका कडून माहिती जमा करून त्याचे वर्गीकरण केले जाते. या साधनाद्वारे जमा होणारी माहिती संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही प्रकारचे असते. प्रश्नावली तीन प्रश्नाचे प्रकार- 1) मुक्त प्रश्न 2) बद्ध प्रश्न

प्रश्नावली ची वैशिष्ट्ये-

1)प्रश्नावली ही लहान असावी .प्रश्नांची संख्या मर्यादित असावी.

2) प्रश्नांची रचना व्याकरणदृष्ट्या अचूक असावी.

3) त्याची मांडणी योग्य प्रमाणे असावी.

4) प्रश्नावली तील सूचना स्पष्ट असाव्यात.

5) प्रश्न संशोधनाच्या निश्चित उद्दिष्टांवर आधारित असावे.

2)मुलाखत- प्रश्नावली व निरीक्षण या साधनातून मिळालेली माहिती मुलाखतीतून मिळू शकते. संशोधक पूर्वनियोजित मुद्द्यांवर आधारित प्रश्नोत्तरे रूपाने विश्वसनीय माहिती मिळू शकतो. मुलाखती संशोधक व प्रतिसादक समोरासमोर असतात. प्रतिसादक प्रश्नांची उत्तरे देतो. संभाषणाच्या ओघात एखाद्या प्रश्नाचे उत्तर तसेच अभिप्रेत असलेली कल्पना भूमिका स्पष्ट करण्याची संधी मिळते. मुलाखत हे साधं सरळ सुलभ असल्याने शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व

मूल्यमापनासाठी तसेच त्यांच्या अडचणी व समस्या समजून घेण्यासाठी उपयोग होतो. प्रतिसादात आत्मनिवेदन करण्याची पुरेशी संधी मिळते संशोधक व प्रतिसादक यांचे परस्पर संबंध येत असल्याने गैरसमज दूर होतात.

3) निरीक्षण- संशोधनाच्या संदर्भात सत्य सप्रमाण व विश्वसनीय माहिती उपलब्ध करण्यासाठी या साधनाचा वापर केला जातो. संशोधकाने प्रत्यक्ष पाहुन निरीक्षण करायचे असते. त्यासाठी दुर्बीण, कॅमेरा, टेपरेकॉर्डर इत्यादी साधनांचा वापर करता येतो. निरीक्षण हे सोपे वाटते परंतु सखोलपणे विचार केला तर लक्षात येते की हे तज्ञ व्यक्तीचे काम आहे.

**समस्या:** ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन शिक्षणातील समस्यांचा चिकित्सक अभ्यास

**विश्लेषण:**

करोना संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर देशातील अनेक शाळांनी ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग स्वीकारला आहे. परंतु गरीब विद्यार्थ्यांना मात्र स्मार्टफोनची कमतरता, मोबाईल ला रिचार्ज करण्यासाठी पैशाची चणचण आणि नेटवर्क मध्ये अडथळे अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो .ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रश्न वेगळे तर शहरात झोपडपट्टीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या वेगळया . करोना संसर्गामुळे चालू शैक्षणिक वर्षातील बहुतांश शाळांनी ऑनलाईन अध्यापनाचा पर्याय स्वीकारला आहे. विद्यार्थी व पालकांकडून काही प्रमाणात प्रतिसाद मिळत असला तरी देशभरातील अनेक विद्यार्थी तांत्रिक सुविधांअभावी या शिक्षणापासून वंचित राहत असल्याचेही स्पष्ट झाले आहे. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग( एनसीआरटी) यांच्या सर्वेक्षणानुसार स्मार्टफोन, लॅपटॉप यासारखी साधने नसल्याने किमान 27 टक्के विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणाचा सहभागी होऊ शकत नसल्याचे समोर आले आहे. सर्वेक्षणात 34 हजार जणांचा सहभाग त्यापैकी 28 टक्के विद्यार्थ्यांना अपुऱ्या वीजपुरवठ्याची समस्या टीव्ही रेडिओ या माध्यमांचा नगण्य वापर एनसीआरटी ने केलेल्या या सर्वेक्षणात 34 हजार जण सहभागी झाले होते. यामध्ये विद्यार्थी,पालक, शिक्षक, मुख्याध्यापकांनी अभिप्राय नोंदवले. या सर्वेक्षणात केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय यांच्यासह सीबीएससी शाळांच्या शिक्षक, मुख्याध्यापकांचा ही सहभाग होता. त्यातील 27% सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्याकडे स्मार्टफोनवर लॅपटॉप नसल्याचे सांगितले तर 28 टक्के विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणात अपुऱ्या वीजपुरवठ्याची समस्या जाणवत असल्याचे स्पष्ट झाले. या इलेक्ट्रॉनिक साधनांचा शैक्षणिक उद्देशासाठी प्रभावीपणे वापर करण्याचे ज्ञान असणे तसेच या ऑनलाइन माध्यमांमध्ये शिक्षक पारंगत नसणे या अडचणी येत असल्याचे या सर्वेक्षणात नोंदवण्यात आले. ऑनलाईन शिक्षण ही सध्याची गरज झाली असली तरी 36 टक्के विद्यार्थी हे आजही त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या पाठ्यपुस्तके व अन्य पुस्तकांवर अवलंबून असल्याचे यात दिसून आले .ऑनलाईन शिक्षणामध्ये अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन या तीनही प्रक्रियेमध्ये अनेकविध समस्या निर्माण झाल्या आहेत. ऑनलाइन शिक्षणामध्ये तंत्र शिक्षणावर आधारित साधनांचा प्रत्यक्ष वापर करणे आजही बरेच शिक्षक आणि विद्यार्थी यांना अवगत नाही . आधुनिकीकरणाच्या या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे असली तरीही अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष सहभागी असणारे शिक्षक आणि विद्यार्थी यांना या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर कसा करावा याचे योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने विद्यार्थी , शिक्षक, मुख्याध्यापक या स्तरांसाठी विविधांगी प्रशिक्षणाचे आयोजन करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची:**

1) India Today (2020) Effect of covid-19 on campus: Major steps been taken by colleges to keep education going

2) UNESCO: Education from disruption to recovery.

3)https://maharashtratimes.com Online education

4)http://m.marathi.thewire.in डिजिटल शिक्षण आणि विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य

5)http://www.aksharnama.com - ऑनलाईन शिक्षण अटळ आहे.

# सर्व शिक्षा अभियानाचा चिकित्सक अभ्यास संदर्भ;- तालुका -वसई , जिल्हा :- पालघर

*सौ नलिनी संजय गायकवाड*

पीएच.डी विद्यार्थी , Department of lifelong learning and extension university of Mumbai.

प्रस्तावना:-

सर्व शिक्षा अभियानाची सुरुवात २००२मध्ये स्वर्गीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सुरुवात केली. शिकागो इथे भरलेल्या युनिसेफ कार्यक्रमांमध्ये भारताचाही समावेश होता. २००७ मध्ये सर्व शिक्षा अभियान ही शासकीय पातळीवर ही योजना आणि २००७ ते २०१५ पर्यंत सर्व शिक्षा अभियान ही योजना राबविली गेली २००९मध्ये आर.टी.ई चा कायदा राईट टू एज्युकेशन अंमलात आला . आंतरराष्ट्रीय पातळीवर मोफत आणि सक्तीचे शिक्षण हे या बाल हक्क कायद्यात सांगितले गेले बाल हक्क कायद्याची जोड म्हणूनच वय वर्ष सहा ते चौदा या वयोगटातील बालकांना मुली आणि मुले यांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यात आले २०१५ ते २०१७ मध्ये सर्व शिक्षा अभियानाच्या पातळीवरती प्रगत शैक्षणिक धोरण मंजूर करण्यात आले .व २०१७ मध्ये याच कार्यक्रमाला राष्ट्रीय कार्यक्रम असे नाव देण्यात आले २०१७ ते २०१९ मध्ये राष्ट्रीय कार्यक्रमाचे रूपांतर समग्र शाळा मध्ये करण्यात आले.

**बाल शिक्षण हक्क कायदा :- ठळक वैशिष्ट्ये**

1. बालक:- ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलगा किंवा मुलगी 2. -प्राथमिक शिक्षण:- इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत वर्गापर्यंत चे शिक्षण. 3. -शाळा;- प्राथमिक शिक्षण देणारी मान्यताप्राप्त शाळा. 4. स्थानिक प्राधिकरण ;- जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, कटक मंडळ, ग्रामपंचायत, इत्यादी संस्थांचा समावेश. 5. मोफत शिक्षणाचा कालावधी :-सहा ते चौदा वर्ष वयोगटातील सर्व बालकांना साठी विशेष गरजा असणाऱ्या बालकां करिता १८ वर्षे वयोगटात पर्यंत. 6. मोफत शिक्षण म्हणजे काय :- 7. कोणत्याही प्रकारचे शुल्क नाही. 8. गणवेश, पाठ्यपुस्तके, लेखन साहित्य, मोफत. -सर्व बालकांना इयत्ता आठवी पर्यंतचे शिक्षण घेण्यास कोणताही खर्च नाही. मोफत शिक्षण कोठे मिळेल? 9. -सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मिळेल. 10. -सर्व खाजगी अनुदानित शाळांमध्ये (काहीप्रमाणात ) मिळेल. 11. सक्ती कोणावर ? 12. -शासनावर सक्ती असेल. 13. -स्थानिक प्राधिकरण सक्ती असेल. 14. -शाळांना सक्ती असेल. 15. शिक्षकांना सक्ती असेल.

**संशोधन पद्धती -:**

1.सदर प्रबंध लिहिताना सामाजिक संशोधन पद्धती वापरलेली आहे .2 .सामाजिक संशोधन एक कधीही परिपूर्ण स्वरूपाचे असू शकत नाही .3.हे संशोधन करण्यासाठी संशोधन केंद्र पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील सर्व शिक्षा अभियानासाठी कार्यरत असलेले .4 . प्रत्यक्ष भेटी दिल्या येथे" गट साधन केंद्र चुळणे"गटशिक्षण अधिकारीविस्तार , शाळेतील सर्व शिक्षक वर, प्रमुख शिक्षिका ,सर्व शाळांच्या मुख्याध्यापिका ,गटसमन्वयक ,अधिकारीॱग व विद्यार्थी यांच्या भेटी घेतल्या.

**संशोधन समस्येचे विधान :-**

ही शासकीय योजना विद्यार्थ्यांपर्यंत किती गुणात्मक पद्धतीने पोचली हा परामर्श या प्रबंधातून घेण्यात येत आहे .तसेच सर्व शिक्षा अभियानात प्राथमिक शिक्षण व त्याचबरोबर विविध की विविध उपक्रमांचा विचार केला जाणार आहे.

वसई तालुक्यातील शैक्षणिक स्थिती पाहता पूर्वी व सद्यस्थिती यात काही फरक आहे का याचा आढावा घेतला जाणार आहे.

**सर्व शिक्षा अभियान संशोधन विषयाची गरज:-**

१) समाज आणि शैक्षणिक मार्ग यातील मतभेद दूर करणे . २)विद्यार्थ्यांच्या जीवनातील मूल्य आणि तत्वे समजावणे. ३)जीवनातील सुंदर बालपण वय वर्ष ० ते १४ व आपल्या शैक्षणिक विकास समजवणे ४) ६ ते १४ वयोगटांतील सर्व बालकांना (मुला-मुलींना )शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे ५)डहाणू , पालघर व वसई तालुक्याची सद्यस्थिती अभ्यासणे ६)दारिद्र्यरेषेखालील लोक आणि त्यातून येणारी नवीन पिढी यांना या योजनेचा लाभ करून देणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१)प्राथमिक शिक्षण हा या योजनेचा आत्मा आहे २)ग्रामीण तसेच शहरी भागात सहा ते चौदा वयापर्यंतच्या मुलांना सक्तीचे शिक्षण केलेले आहे . ३) योजनेच्या माध्यमातून दिले जाणारे शिक्षण हा महत्त्वाचा भाग आहे .

४)२००३ पर्यंत ६ ते १४ वयापर्यंत च्या मुलांना शाळेत दाखल करण्यात आले ५)२००७ पर्यंत इयत्ता पाचवी पर्यंतचे दर्जेदार शिक्षण देण्यात आले.

**संशोधनाचा हेतू आणि उद्देश ;-**

१)'सर्व शिक्षा अभियान योजना 'समजून घेणे २)वसई ,पालघर, डहाणू व जव्हार तालुक्यातील सर्व शिक्षा अभियान या योजनेचा आढावा घेणे. ३)या अभियानाचा ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांना झालेला लाभ पाहणे. ४)तेथील शाळांचे गुणात्मक व दर्जात्मक शिक्षणाचे मूल्यमापन करता येईल . ५)६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना उपलब्ध असलेली शैक्षणिक संधी पाहता येईल. ६)शाळा नसलेल्या भागात नवीन शाळा सुरु करणे, शाळा असतील त्या ठिकाणी अतिरीक्त वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल व देखभाल अनुदान प्राप्त करून देणे अशा उपक्रमांचे परीक्षण होईल.

**संशोधन विषयाची व्याप्ती :-**

पालघर जिल्ह्यातील वसई तालुका :-वसई भागात गावात राबविण्यात आलेल्या सर्व शिक्षण अभियान या योजनेची अंमलबजावणी ही संशोधनाची व्याप्ती आहे .वसई गावातील शाळांची निवड करीत असताना गावाचे दोन भाग पडतात .ग्रामीण भाग व शहरी भाग अशा पद्धतीने सर्व शिक्षा अभियानाचा लाभ झालेल्या जिल्हा परिषदेच्या एकंदरीत ९ शाळा आहेत ग्रामीण भागात आकटन ते तरखड येथे एकंदरीत चार जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत तर ,शहरी भागात प्रभाग क्रमांक १ व प्रभाग क्रमांक ८ मध्ये एकंदरीत पाच जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत . संशोधनासाठी वापरलेली सामाजिक संशोधन पद्धतीची साधने :--प्रत्यक्ष निरीक्षण, -मुलाखती आणि चर्चा, -प्रश्नावली, -दस्तऐवज

**संशोधन विषयाच्या मर्यादा :-**

विस्तार अधिकारी, गट समन्वयक अधिकारी, केंद्रप्रमुख निरनिराळया गावाच्या तपासणी भेटीवर असल्याने किंवा त्यांना योजनेसंदर्भात विविध विविध बैठकींना हजर राहावे लागत असल्याने त्यांची भेट होणे कठीण झाले होते. एकंदर कार्यक्रमाचा आवाका वसई तालुक्यातील विखुरलेली गावे काहीवेळा रिक्त असलेली पदे त्यामुळे या कार्यक्रमाच्या अभ्यासाबाबत मर्यादा पडल्या.

**सर्व शिक्षा अभियानाचे व्यवस्थापन :-**

भारतीय राज्य घटनेच्या ८६ व्या तरतुदीनुसार प्राथमिक शिक्षणाच्या या सार्वत्रिक करणाचे ध्येय गाठण्यासाठी केंद्र सरकार सर्व शिक्षा अभियान हा पथदर्शी कार्यक्रम राबवत आहे. मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची गरज भागविण्यासाठी राज्यशासनाच्या भागीदारी सह सर्व शिक्षा अभियान राबविले जात आहे.

**निरीक्षण आणि निष्कर्ष :-**

१) बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे . २)यानुसार मूलभूत सुविधांबाबत याचे निकष ठरविण्याचे बाब शासनाच्या विचाराधीन होती. ३)शाळांमध्ये उपलब्ध करावयाच्या मूलभूत सोयीसुविधांचा संबंध संदर्भात प्रचलित निकष विचारात घेऊन त्याप्रमाणे सुधारणा करण्यात आली . ४)त्याच प्रमाणे काही सुविधांच्या बाबतीत निकष ठरविताना स्थानिक परिस्थिती व साधनांची उपलब्धता विचारात घेणे आवश्यक आहे.

**शिफारशी:-**

१) मध्यान्ह भोजनाबाबत :-शहरी आणि ग्रामीण भागात सर्व शिक्षा अभियानामार्फत मध्यान्ह भोजनात गुणात्मक दर्जा दिसत नाही. मध्यान्ह भोजन शिजविण्यासाठी व्यवस्था योग्य नसल्याकारणाने शिक्षकांना व विद्यार्थ्यांना अध्ययन व अध्यापन पद्धती योग्य रित्या करता येत नाही त्या करता येण्यासाठी शासनाकडून प्रयत्न झाले पाहिजे. २)शैक्षणिक साहित्याबाबत :-शहरी भागात राजकीय स्थान प्राप्त असलेल्या व्यक्तींमार्फत शैक्षणिक साहित्यांचा लाभ मिळत आहे परंतु ग्रामीण भागामध्ये तसा मिळत नाही हा ग्रामीण भागांमध्ये करण्याचा प्रयत्न स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांनी करावा. ३)आरोग्याबाबत :-शहरी भागात वसई विरार महानगरपालिका मार्फत आरोग्य सुविधा वेळोवेळी पुरविल्या जातात परंतु ग्रामीण भागामध्ये तेवढ्या प्रमाणात पुरविल्या जात नाहीत या बाबतीत स्थानिक पातळीवर महानगरपालिका कार्यरत असणे गरजेचे आहे. ४)शिक्षक प्रशिक्षणाबाबत :-सर्व शिक्षा अभियान अंतर्गत असणारे प्रशिक्षण योग्यरीत्या शिक्षकांपर्यंत पुरवले जावे याची दखल शासनाने घ्यावी. ५) विद्यार्थ्यांबाबत :-ही योजना पहिली ते आठवीपर्यंत न राहता पहिली ते दहावीपर्यंत असावी.

**संदर्भ**

**1.**सर्व शिक्षा अभियानाचा चिकित्सक अभ्यास ." संदर्भ;- तालुका -वसई , जिल्हा :- पालघर. **(2016)**, एम फिल डीजरटेशन, विद्यापीठ , मुंबई विद्यापीठ

# जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम

***प्रा. डॉ. राजेंद्र आराम मुंबरकर***

*ग्रामीण विकास विभाग प्रमुख, कणकवली महाविद्यालय, कणकवली जिल्हा सिंधुदुर्ग*

१९९१ साली भारत देशाने जागतिकीकरणाची प्रक्रिया विविध क्षेत्रांतर्गत स्वीकारली आहे. जागतिकीकरणामध्ये शेती हा महत्त्वाचा घटक आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे शेती व्यवसायावर विविध स्वरूपाचे अनुकूल व प्रतिकूल परिणाम दिसू लागले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनावर याचा विपरीत परिणाम झाला असे जाणकारांचे मत आहे. जागतिकीकरणामुळे शेती व्यवसायात अडथळे निर्माण झालेत, परंतु या अडथळ्यांचा सकारात्मक पातळीवर विचार करून भारतीय शेती जागतिकीकरणामध्ये कशी यशस्वी होईल याची मांडणी आणि संशोधन होण्याची गरज आहे. आपण कितीही टीका करण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा उपयोग होणार नाही. जागतिकीकरणाच्या भारतीय शेतीवर झालेल्या योग्य आणि अयोग्य परिणामांची चर्चा या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे.

## गोषवारा (Abstract)

1. भारतात जागतिकीकरणाची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली होती. जावा, सुमात्रा सारख्या देशांना भारतातून मसाल्याचे पदार्थ निर्यात होत असत. ढाक्याची मलमल जगप्रसिद्ध होती.

2. स्वातंत्र्यानंतर १९९१ साली अगदी धाडसाने का होईना तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी भारतात जागतिकीकरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात केली.

3. जागतिकीकरणामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेच्या सर्वच घटकावर सकारात्मक आणि नकारात्मक अशा स्वरूपात परिणाम झाला आहे.

4. विषेशत: शेती व्यवसायावर जागतिकीकरणाचे विविध स्वरूपात परिणाम झाले आहेत.

## परिचय (Introduction)

१) भारतात १९९१ पासून जागतिकीकरणाचा प्रत्यक्ष स्वीकार करण्यात आला. या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप जागतिक झाले आहे.

२) जागतिकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मुक्त झाले. बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेला सुरुवात झाली.

३) जागतिक स्तरावरील बाजारपेठेत भारतीय कृषी अर्थव्यवस्थेने अस्तित्व शोधण्यास आणि सिद्ध करण्यासही सुरुवात केली आहे.

४) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कृषी विकासाची दिशा निश्चित करणे गरजेचे झाले.

## मुख्य उद्दिष्टे (Main Objectives)

१) जागतिकीकरण संकल्पना समजून घेणे.
२) जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवर झालेला परिणाम अभ्यासणे.
३) जागतिकीकरणाचा भारतीय शेतकऱ्यावर झालेला परिणाम अभ्यासणे.
४) जागतिकीकरणाला भारतीय शेती किती सक्षमपणे सामोरे गेली आहे याबाबत माहिती घेणे.
५) जागतिकीकरणामुळे भारतीय शेतीच्या संशोधनाला चालना मिळाली आहे का याची माहिती घेणे.

## गृहितके ( Hypothesis)

१) जागतिकीकरणाच्या स्वीकार्यतेमुळे भारतीय शेती व्यवसायासमोर अस्तित्वाचे आव्हान उभे राहिले आहे.
२) शेतीव्यवसाय जागतिकीकरणाला सामोरे जाण्यासाठी सज्ज झाला आहे.
३) भारतीय शेती व्यवसाय आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आपले अस्तित्व अबाधित ठेवले आहे.
४) जागतिकीकरणामुळे व्यापारी शेतीच्या विकासाला चालना मिळाली आहे.
५) भारतीय शेती व्यवसायाच्या विकासासाठी संशोधनात्मक उपक्रमावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

## अभ्यास पद्धती (Research Methodology)

या शोध निबंधात दुय्यम स्रोतांतर्गत संबंधित विषयाशी संबंधित असणारे संदर्भग्रंथ, इंटरनेट, शासकीय दस्तऐवज, ॲग्रोवन दैनिकातील संदर्भ लेख इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

## विषय विवेचन-

जागतिकीकरणाचे भारतीय शेती व्यवसायावर अनुकूल आणि प्रतिकूल असे दोन्ही स्वरूपाचे परिणाम झालेले आहेत या परिणामांची चर्चा आपण पुढील प्रमाणे करणार आहोत.

अ) अनुकूल परिणाम-

**१) शेतीत नवीन संशोधनाचा आणि तंत्रज्ञानाचा वापर.**

i ) भारतीय शेती व्यवसायात नवीन संशोधनाचा आणि तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. शेतीमध्ये जैवतंत्रज्ञानाच्या ( Biotechnology) वापराच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला लागले आहेत. जैवतंत्रज्ञानाच्या वापरामुळे पिकावर पडणारे किडी आणि रोगांचे नियंत्रण करणे शक्य होऊ लागले आहे. शिवाय अनावश्यक तण सुद्धा या तंत्रज्ञानाच्या साह्याने नष्ट करता येऊ लागले आहेत. अलीकडे नवीन पिकात 'बीटी' जीन चा वापर करण्यात शास्त्रज्ञांना यश आले आहे. या जनुकाच्या मदतीमुळे किडी आणि रोग प्रतिकारक वाण, तणांचा नाश करणारे पिकांचे वाण उपलब्ध होणार आहे. शास्त्रज्ञांनी सोयाबीनचे (Espsgene) वाण तयार केले आहे. त्याला जगामध्ये चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

**ii) दळणवळण वाहतूक मार्गांचा विकास:-**

शेतीस उपयुक्त माहिती आणि दळणवळण तंत्राच्या बळावर जगातील कृषी क्षेत्राचा चेहरामोहरा बदलला आहे. कृषी क्षेत्रातील विपणनाचे बरेचसे कार्य आता संगणकामार्फत होऊ लागले आहे. मालाचा साठा, किंमत, मालाचा दर्जा काय आहे याची माहिती इंटरनेटवरून सहजगत्या मिळायला लागली. माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कृषी विषयक सर्व बाबींची घरबसल्या माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे विविध वस्तूंचे बाजार भाव, लागवडीच्या नवनवीन पद्धती, संभाव्य खरेदीदारांची थेट संपर्क साधणे सहज शक्य झाले आहे. भूमी संगणकीकरण झाल्यामुळे जमिनी विषयी माहिती अद्यावत ठेवता येणे शक्य झाले आहे. कृषी व्यवस्थापन, कृषी विषयक आकडेवारी सहज उपलब्ध करण्याची सोय झाली आहे. खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांचा जगाशी संपर्क साधता येणे शक्य झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा सहकारी साखर कारखाण्याने अशा स्वरूपाचा प्रयोग यशस्वी केला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने गाव पातळीवर कृषी माहिती केंद्राची स्थापना केली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून शेती विषयीची अद्यावत माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जात आहे.

ब) प्रतिकूल परिणाम-

जागतिकीकरणाच्या वरील अनुकूल परिणामा बरोबर प्रतिकूल परिणामांची सुद्धा चर्चा करणे तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिकीकरणामुळे शेती व्यवसायात आमूलाग्र बदल झाले. नवीन तंत्रज्ञान आले. परंतु भारतीय सामाजिक, राजकीय बाजूचा विचार करता यामध्ये बरेच अडथळे आहेत. याची चर्चा पुढील मुद्द्यांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) जागतिक पातळीवर पेटंट कायद्याची अंमलबजावणी-**

जागतिकीकरणाच्या संकल्पनेत शेत मालाच्या उत्पादनाकरिता पेटंट कायदा अधिक सक्रिय करण्यात आला. या पेटंट कायद्यात ज्या वस्तूंच्या उत्पादनाची जबाबदारी आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार ज्या कंपनीला मिळते त्याच कंपनीला त्या वस्तूचे उत्पादन आणि विक्री करता येते. दुसऱ्या कंपनीला त्या विशिष्ट वस्तूचे उत्पादन करता येत नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या जैवतंत्रज्ञानाचा वापर करून नवीन पिकांचे वाण तयार करतात. याना वाणांना रासायनिक द्यावेच लागते. दोन्हीचा परिणाम असा होतो की पिकावर हमखास किडीं रोगांचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे पिकावर वारंवार औषध फवारणीचा खर्च करणे भाग पडते. हे चक्र चालू राहिल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचा फायदा होतो. शिवाय बऱ्याच वेळा मोठी किंमत देऊन शेतकरी बियाणे खरेदी करतो. ही बियाणी पुन्हा रुजतवता येत नाहीत. काही वेळा बियाणी रुजली तरी पिकावर अनेक रोग पडतात. यावेळी कीटकनाशकांचा प्रभावही कमी पडलेला आढळतो.

**२) कंत्राटी शेतीमुळे होणारे परिणाम-**

कंत्राटी शेतीच्या प्रक्रियेत मोठमोठ्या कंपन्या उतरल्या आहेत. शेतीमध्ये जे करार कंपनीकडून केले जातात त्या कराराची माहिती ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकऱ्याला समजेलच असे नाही. त्याने उत्पादीत केलेल्या मालाचा दर्जा करारात नमूद केल्याप्रमाणे असायला हवा. शिवाय उत्पादनाचे सातत्य राखायला हवे. या बाबी ग्रामीण भागातील छोट्या शेतकऱ्यांकडून किती प्रमाणात शक्य होतील हा प्रश्न आहे. भारतातील शेतकऱ्यांचे धारण क्षेत्र लहान असल्यामुळे शेतकरी वरील निकष पूर्ण करण्यामध्ये बरेच अडथळे निर्माण होतील. कंत्राटी शेतीचा करार केलेल्या शेतकऱ्यांना त्याची नुकसानभरपाई देणे अशक्य होईल. सहाजिकच शेतकऱ्यांची पिळवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**३) स्पर्धात्मक वातावरणात भारतीय गरीब शेतकरी टिकून राहण्यात अडचणी व त्यांची मानसिकता-**

जागतिकारणामुळे शेती उद्योगात पूर्ण स्पर्धा आणि स्पर्धात्मक वातावरणाला सामोरे गेल्याशिवाय शेती उद्योग म्हणून विकसित करता येणार नाही. मुळात भारतीय शेतकरी हा पारंपरिक विचारसरणीचा आणि अल्पशिक्षित असलेला असल्यामुळे या स्पर्धात्मक परिस्थितीत कसा सामोरा जाईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतीय शेतकऱ्यांची पारंपरिक माणसिकता बदलण्याचा प्रयत्न केल्यास हे शक्य आहे. स्पर्धात्मक वातावरणाला सामोरे जाण्यासाठी शेतकरी वर्गाचे सातत्याने प्रबोधन होणे गरजेचे आहे. शेतकरी स्पर्धात्मक परिस्थितीत टिकून राहण्यासाठी शासनाची भूमिका सुद्धा महत्त्वाची आहे. शेती विकासाचा लाभ हा श्रीमंत शेतकऱ्यांनाच मिळणार आहे. साहजिकच कमी जमीनधारणा असणारा शेतकरी व्यापारी शेतीकडे वळण्यास मर्यादित जमीन हा अडथळा ठरणार आहे. अल्प जमीन धारकांना व्यापारी शेतीत

उतरने आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे त्यांच्या दृष्टीने कमी जमीन धारणा असलेल्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने जागतिकीकरणातून होणारी शेतीची प्रगती मृगजळच करणार आहे.

**निष्कर्ष-**

१) भारतीय शेती समोर जागतिकीकरणामुळे आव्हाने उभी राहिली आहेत. पण ती आव्हाने पेलायला भारतीय शेती सक्षपणे प्रयत्न करत आहे. कृषी विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी शेती उद्योगात भरीव संशोधन सुरू ठेवले आहे.

२) भारतीय शेती निर्वाहाकडून उद्योगाकडे प्रवास करण्याचा प्रयत्न करत आहे. नवीन तंत्रज्ञानाचा शेती वाढीसाठी उपयोग सुरू झाला आहे. त्याचे सकारात्मक परिणामही दिसायला लागले आहेत.

३) जागतिकीकरणामुळे निर्यातक्षम शेतीला प्रोत्साहन मिळत आहे. शासन आणि शेतकरी दोन्ही स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

४) शेतमाल विक्री व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून येत आहेत. शेतकरी ते ग्राहक अशा स्वरूपाची विक्रीची व्यवस्था नवीन तंत्रज्ञानामुळे विकसित होऊ लागली आहे.

५) शेतीमध्ये कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग ची संकल्पना वाढीस लागत आहे. केंद्र सरकारने शेतीला निर्बंध मुक्त करण्यासाठी तसेच विक्री व्यवस्थेत शेतकऱ्यांना जेथे शेतमालाला जास्त भाव मिळेल तेथे विक्री करण्याची सोय करुन देण्यात साठीचा कायदा केंद्र सरकारने पारित केला आहे.

**संदर्भसूची**

१) दैनिक ॲग्रोवन, सकाळ ग्रुप, दिनांक- १५/१२/२००६

२) माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे शेती, तुषार पांगे, योजना मासिक, ऑगस्ट- २००६, पान नंबर ३०,३१

३) दैनिक ॲग्रोवन, सकाळ ग्रुप, १६/१२/२००६

४ ) शेतीच्या मुळावर उठलेले जागतिकीकरण, लेख- डॉ. गंगाप्रसाद अग्रवाल, साधना साप्ताहिक, पुणे, २३/१०/२००४

५ ) कंत्राटी शेती म्हणजे काय?, नितीन केळकर, योजना मासिक. ऑगस्ट. २००६, पृष्ठ क्रमांक- ४३

६ ) जागतिक व्यापार संघटना आणि कृषी अर्थसहाय्य, प्रा. आर. के. दातार, योजना मासिक, ऑगस्ट, २००६, पृष्ठ क्रमांक- ६०,६१

७ ) स्वातंत्र्योत्तर आर्थिक धोरणाचे परिणाम, गजानन खातू, साधना साप्ताहिक, पुणे, १४/०५/२००५ पान नंबर- ०६

८ ) जागतिकीकरण आणि शेती पेचप्रसंग, माधव दातार, लेख- परिवर्तनाचा वाटसरू मासिक, ईद दीपावली विशेषांक २००६.Rajendra Mumbarkar: जागतिकीकरण आणि भारतीय शेती-

# "महात्मा गांधींच्या विचारातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास"

## संदर्भ- राळेगणसिद्धी, जिल्हा- अहमदनगर

*सहाय्यक प्राध्यापक नितिन वि. खरात*

*प्राचार्य प्रा. डॉ. रविंद्र भा. घागस*

**गोषवारा**

जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपल्या गावातील सुधारणा, पिडीत, शोषित व दारिद्रयात अडकलेल्या लोकांचा विकास घडवण्याचा प्रयत्न केला आहे. तस्रेच श्रमदान, नसबंदी, नशाबंदी, चराईबंदी, व कुऱ्हाडबंदी या पंचसुत्रीचा वापर करून आपल्या गावातील राळेगण शिंदीच राळेगण सिद्धीत रुपांतर करून नंदनवन केले. त्याचबरोबर आरोग्य, शिक्षण, शेती व रोजगार उपलब्ध करून स्थानिकांना सक्षमीकरण व स्वावलंबी केले.

**प्रस्तावना**

महात्मा गांधीजीनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सत्याग्रहाची आंदोलने केली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे एवढच बापूजीचे मर्यादित स्वप्न नव्हत तर मरगळ आलेल्या समाजात चैतन्य निर्माण करणे, पीडित, शोषित, दारिद्रयात पिचलेल्या समाजाचा उद्धार, खेड्यांचा विकास करून देशात सर्वांगीण प्रयत्न केले. बलाढय साम्राजाच्या विरोधात असहकार सत्याग्रह. उपोषण अश्या आयुंधांचा वापर करत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांच्या प्रयत्नातून बापुंजीच्या जीवन पाऊलावर पाऊल टाकत अण्णांनी समाजासाठी आपले मार्गक्रमण केले. अशातच सैन्यातून सुट्टी घेवून घरी येत असताना दिल्लीच्या रेल्वे स्टेशनवरील एका पुस्तकाच्या स्टॉलकडे सहज त्यांची नजर गेली. त्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील स्वामी विवेकानंदाच्या आकर्षक चित्राने अण्णाचे लक्ष वेधून घेतले. ते पुस्तक 'स्वामी विवेकानंदाचे विचार कार्य, मानवी जीवनाचा अर्थ, सर्व जाती धर्मा बद्दलची आस्था, कळकळ, मानवी जीवनाचे तत्वज्ञान प्रत्येक मानवी जीव म्हणजे साक्षात ईश्वराचा अंश त्याची सेवा हीच खरी ईश्वरसेवा अशा स्वरूपाच्या स्वामीच्या विचारांनी अण्णा भारावून गेले. माणसाला आपलं जीवन जगताना व घडवताना कोणाच तरी मागर्दर्शन व प्रेरणास्थान हवे असते. तसे माणसाचे जीवन घडत जात असते. संताची चरित्र व साहित्य महात्मा गांधीजी, स्वामी विवेकानंदाचे तत्वज्ञान ही अण्णांच्या सामाजसेवेच्या कार्याची प्रेरणास्थान सैन्यात असतानाच समाजसेवाचं स्फुलिंग अण्णांच्या मनात निर्माण झाले. एखाद्या बीजाला योग्य ते जमीन, खतपाणी, हवामान मिळालं की ते चांगलंच बाळसे धरते तसेच अण्णांमधील उपजत असलेल्या गुणवंतेला व्यासंगाची जोड मिळाली व ग्रामीण विकासाबरोबर समाजसेवेचा वसा पुढे चालविला होता.

**उद्देश**

1. राळेगणसिद्धीतील पिडीत, शोषित व दारिद्रयात अडकलेल्या लोकांचा विकास घडवून आणणे.
2. वृक्षरोपण, पाणलोटक्षेत्र विकास, व्यसनमुक्ती तसेच सामूहिक शक्तीच्या जोरावर श्रमदान करणे.
3. ग्रामीण महिलांचे सबलीकरणात सहभाग वाढवणे.
4. गावातील आरोग्य, शिक्षण, शेती व रोजगार विषयक मार्गदर्शन करणे.
5. शेतकरी, शेतमजूर, व कारागीर यांना सावकाराच्या विळख्यातून स्वावलंबी बनविणे.

**संशोधन पद्धती –** प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. विविध मासिके, व्हिडिओ, पुस्तक इ. मधून दुय्यम तथ्य सामग्रीचे संकलन करण्यात आले आहे. तसेच काही माहिती इंटरनेटच्या माध्यमातून एकत्रित करण्यात आले आहे.

माहितीचे विश्लेषण

महात्मा गांधीजी व स्वामी विवेकानंद यांच्या विचारातून प्रभावित होऊन अण्णांनी आपल्या त्यांच्या समाजभिमुख तत्वांच्या अंगीकार करत गावातील गावपण हरवलेल्या ओसाड, भक्कास झालेल्या गावाचा, व्यसनांच्या आहारी गेलेल्या माणसाचा संपूर्ण कायापालट करण्याचा निर्धार त्यांनी केला. प्रत्येक माणसाला आपली स्वतःची ओळख व्हावी. मानवी जीवन पुन्हा पुन्हा मिळत नाही. इतर कोणत्याही सजीवाहून मानवी जीवन हे अत्यंत सुंदर आणि श्रेष्ठ आहे. त्या सुंदर जीवनाचा आस्वाद घेण्यासाठी प्रत्येकानं 'माणूस' म्हणून वागायला हवे. पण लोक जशी आपली संस्कारसंस्कृती- विसरले तसेच ते स्वतःचे मरणही विसरले म्हणून जगण विसरले आणि जगण विसरले म्हणून वागण विसरले. जगण्या मरण्याचा विचार करून माणसानं वागायला हवं. चांगल जीवन जगायचं असेल तर वागणूक ही चांगली असायला हवी.

त्यासाठी त्यासाठी अध्यात्माच अधिष्ठान महत्वाचे आहे. हे ओळखून अण्णांनी मोडकळीस असलेल्या लोकांच्या गांधीच्या विचारातून स्वच्छता, आरोग्य, पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम, कुटुंब नियोजन, हुंडा पद्धती, पर्यावरण, अस्पृश्यता निवारण, शिक्षण, महिला सबलीकरण तसेच ग्रामसभेचा अधिकार तसेच माहितीचा अधिकार या विषयी लोकांना मार्गदर्शन केले. १९७५ मध्ये सैन्यातून निवृत्ती घेतल्यानंतर मिळालेल्या भविष्य निर्वाह निधीच्या पैशातून अण्णांनी मंदिराच्या जीर्णोद्धारचे काम हाती घेतले. अनेक तरुण कार्यकर्त्यांच्या सहकार्याने हनुमान मंदिरासह यादव बाबाच्या समाधीचे मंदिर बांधून गावातील लोकांना एकत्रित आणले. त्यामुळे गावातील आणखी लोक जवळ आले. ग्रामस्थांच्या विचारविनिमयातून आणि सहकार्यातून १९७६ साली सभागृह बांधले. याच सभागृहात यादव बाबांच्या कृपाशीर्वादाने ग्रामविकासाच्या विविध कल्पना साकार होत. याच दरम्यान अण्णांनी आपल घरही सोडले. समाजासाठी व कल्याणासाठी कष्ट करून अण्णांनी आपल्या घराचा व भावाबहीणीचा- तसेच आईचा त्याग करून तिच्यापासून दूर राहिले. यादवबाबांच्या समाधीच्या निकट निरंतर सानिध्याने अण्णांच्या विचारांच्या कक्षा रुंदावत गेल्या. अण्णांची नजर आता आता वेशीच्या बाहेर चौभेर राळेगण शिंदीच्या शिवारात दिसू लागल्यानंतर व्यसनाच्या आहारी गेलेले लोक, अत्यल्प पावसाचे प्रमाण, शेतीसाठी पाणी नाही त्यामुळे पिके नाही दहा वीस घर सोडलीतरी घराघरात अठरावीस दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा, अनारोग्य, निरक्षरता या पंचसुत्रीनी व्यसलेले गाव. त्याच बरोबर जोडीला सावकारशाही यामुळे माणसाला माणूस म्हणून जगण अशक्य झाले होते. अशा परिस्थितीत लोकांनी आपलं दुख: दारूच्या ग्लासात बुडवल. नंतर मात्र त्याच दारून माणसांना पुरत जखडून टाकले. हे सर्व पाहून अण्णांचं मन उदास झाले. माणसासारखा माणूस जनावरासारखा वागू लागला. तसेच व्यसनापायी घरदार व पाऊसपाणी- नाही म्हणून पिकं नाहीत. काम नाही म्हणून पैसा नाही. त्यामुळेच दुखाने: होरपळणाया- लोकांनी व्यसनाचा आश्रय घेतला. त्याचं व्यसन तोडायचं असेल तर हाताला काम, पोटाला पोटभर भाकरी मिळाली पाहिजे. याचा विचार करून अण्णांनी प्रथमतः व्यसनमुक्तीच्या दिशेने पाहिलं पाऊल टाकल. ग्रामस्थांच्या सहकार्याने निर्माण केलेल्या सुंदर मंदिर आणि मंदिराच्या सभागृहात अण्णा नी प्रथमत: ग्रामस्थांना चर्चेसाठी बोलावले. तीच राळेगण सिद्धीची पहिली 'ग्रामसभा' ग्रामसभेला होय. गावातील ३८, ४० दारूच्या भट्ट्या, दारू पिणाया-चे वाढते व्यसन, त्यातून होणारे वादविवाद, भांडणतंटे त्यास आळा बसावे म्हणून ग्रामसभेत त्यावर चर्चा होऊन एकमतान दारूबंदी, व्यसनमुक्तीचा बंद केले. एकमतान दारूबंदी, व्यसनमुक्तीचा ठराव मंजूर केला. धंदावाल्यांच्याही पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होऊन पैसा मिळवण्यासाठी त्यांनी दारूभटटया सुरु केल्या नव्हत्या तर दोन वेळेला कुटुंबाला पोटभर अन्न मिळावे. असे प्रश्न कसा सोडवायचं? जगायचं कसं? असे प्रश्न ग्रामसभेत उपस्थित झाले. पोटाला पोटभर भाकरी मिळविण्यासाठी अन्नधान्य पिकविण्यासाठी पाणी हवं होत. पाण्याचा प्रश्न प्रथम सोडवायला हवा. या विचाराने राळेगणसिद्धीच्या भौगोलिक परिस्थीचा लाभ घेवून पडणाया- पावसाच्या थेंब ना थेंब अडविण्यासाठी डोंगरभागाचा 'माथा ते पायथा' हा उपक्रम राबविण्यासाठी सुरुवात केली. श्रमदानाच्या माध्यमातून डोंगरावर सी. सी. टी चे चर खोदण्यात आले. हजारो हात एकजुटीने कामाला लागले. सर्व डोंगरभागावर जलशोषक चर खोदले गेले. राळेगणसिद्धीच्या विकासातल दुसर सूत्र 'श्रमदान' राबवले गेले.

**निष्कर्ष:-** 1.महात्मा गांधीच्या विचारातून राळेगणसिद्धीचा सर्वांगीण विकास दिसून येतो. 2. राळेगणसिद्धी गावातील दारिद्रय, निरक्षरता, अंधश्रद्धा, आरोग्य, शिक्षण, दारूबंदी व व्यसनमुक्तीतून लोकांना मार्गदर्शन व जागृत केले. 3. ग्रामसभेचे व माहितीचा अधिकार तसेच महिलांना अधिकार या विषयी लोकांना जागृत केले. 4. शेती व पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम लोकांना महत्व पटवून दिले.

**संदर्भ**

1. वाघ, बाबासाहेब (२०१६(, ग्रामविकासाची पाऊलवाट ( राळेगणसिद्धी ), प्रकाशक- मिडिया सेंटर, राळेगणसिद्धी.
2. झगडे, रामचंद्र शंकरराव (२०१४(, 'मृदगंध' पाणलोटक्षेत्र विकासातून समृद्धीकडे, प्रकाशक- हिंद स्वराज्य ट्रस्ट , मु. पोस्ट- राळेगणसिद्धी
3. गोडबोले, सुजाता (२०१४(, गांधीजीचे असामान्य नेतृत्व, राजहंस प्रकाशक सदाशिव पेठ, पुणे.
4. भाऊ धर्माधिकारी (१९६४(, आरोग्य विचार, प्रकाशन- म.र . देवगिरी, अध्यक्ष- गांधी वाडमय प्रकाशक सीडी, गांधीभवन पुणे.

# घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*डॉ. विद्या शरद मोदी*

*ग्रंथपाल, कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट*

**प्रास्ताविक :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मूळचे आंबावडे तालुका खेड जिल्हा रत्नागिरी चे असले तरी देखील त्यांचा जन्म मध्यप्रदेश मध्ये महू या गावी 14 एप्रिल 1891 साली झाला. डॉ. आंबेडकर यांच्या जन्मापूर्वी रामजी आणि भिमाबाई यांना 14 अपत्ये झाली होती त्या 14 अपत्यांपैकी गंगा, रमा, मंजुळा या चार मुली आणि बाळाराम, आनंदराव आणि भीमराव ही तीन मुले जिवंत होती. डॉ. आंबेडकरांचे वडील रामजी आंबेडकर यांनी आपल्या गावच्या नावानुसार अंबावडेकर हे आडनाव आपल्या नोकरीच्या ठिकाणी लावलेले होते. डॉ. आंबेडकरांचे वडील हे शिकलेले होते, त्यामुळे ते मिलिटरी मध्ये काम करत असताना मुख्याध्यापक पदापर्यंत पोहोचले होते. त्यामुळे त्यांना आपल्या मुलांनी शिकले पाहिजे असे वाटत असे. सातारा कॅम्प स्कूलमध्ये शिकत असताना आंबेडकर नावाच्या शिक्षकांनी भीमरावांचे अंबावडेकर हे आडनाव बदलून आंबेडकर हे आडनाव लावून प्रचलित केले. डॉ. आंबेडकर शाळेत जाण्यापूर्वी रामजी हे नोकरी मधून निवृत्त झाले होते तर डॉ. आंबेडकरांचे मोठे बंधू बाळाराम ना मिलिटरी मध्ये नोकरी लागली होती. दापोली या गावी आंबेडकरांना योग्य शिक्षण मिळणार नाही तसेच आर्थिक समस्या थोडीफार सोडविण्याकरिता रामजी हे सातारा येथे आले.

डॉ. आंबेडकर पाचवीच्या वर्गात शिकत असताना दापोलीचे भिकू वलंगकर त्यांची मुलगी रामीबाई उर्फ रमाबाई यांच्याशी डॉ. आंबेडकर यांचा विवाह झाला. डॉ.आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई ह्या मूर्तिमंत माणुसकी होत्या. प्रेमळ व कष्टाळू रमाबाई आपुलकीने माणसे जोडण्यात व समाजसेवेला पूर्णपणे वाहून घेतलेल्या पतीच्या पाठीशी मोठ्या विश्वासाने खंबीरपणे उभे राहण्यात पारंगत होत्या. समाजसेवेच्या कार्यामुळे त्यांना घरच्यांसाठी जास्त वेळ देता येत नव्हता, ते घरच्यांसाठी पुरेसा पैसाही देऊ शकत नव्हते. डॉ. आंबेडकर यांना मधुमेहाचा आजार होता आणि सततच्या आजारामुळे, अभ्यासामुळे जागरण आणि जेवणाच्या गैरसोयींमुळे डॉ.आंबेडकर आजारी पडू लागले. त्यामुळे त्यांना रोजच उपचार करून घ्यावे लागत. मुंबईत मुक्कामात ते डॉक्टर मालवणकर यांच्या सल्ल्याने औषधोपचारासाठी जात असत. डॉक्टर मालवणकर यांच्या सल्ल्याने डॉक्टर कुमारी शारदा कबीर या डॉक्टर आंबेडकरांवर औषधोपचार करत असत त्यातूनच त्यांचा परिचय वाढला आणि या दोघांचा विवाह झाला. डॉ.आंबेडकरांचे कार्य हे महान कार्य आहे त्यासाठी त्यांना सांभाळणे आवश्यक असल्याचे मत डॉ. शारदा कबीर यांचे होते. त्यांच्या तब्येतीची काळजी घेणे आवश्यक आहे. या महामानवांच्या कार्यात खारीचा वाटा म्हणून डॉक्टर कबीर त्यांनी आंबेडकरांबरोबर लग्न करण्याचा निर्णय घेतला. डॉक्टर कबीर यांच्या बरोबर लग्न झाल्याने डॉक्टर आंबेडकर 1956 पर्यंत आपले लिखाण करू शकले. 1935 सालीच येवले परिषदेत केलेली "मी हिंदू म्हणून जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही" ही आपली ऐतिहासिक घोषणा आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी प्रत्यक्ष कृतीत आणून दाखविली. त्या दिवशी डॉ. आंबेडकर आणि डॉक्टर सविता आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारला.

**डॉ.आंबेडकरांचे शिक्षण :**

डॉ.आंबेडकरांचा जन्म जरी मध्यप्रदेशात झालेला असला तरी त्यांचे प्राथमिक शिक्षण दापोली कॅम्प मध्ये सुरू झाले. रामजी यांनी आंबेडकरांचे नाव दापोली येथील मिशनरी शाळेमध्ये घातले. मुलांच्या शिक्षणाचा विकास व्हावा याकरिता आणि रोजगार मिळविण्याकरिता रामजी हे सातारा येथे गेले. सातारा येथे डॉक्टर आंबेडकरांचे कॅम्प स्कूलमध्ये शिक्षण सुरू झाले. 1904 मध्ये सुभेदार रामजी सातारा सोडून मुंबईला सहपरिवार आले आणि लोअर परेल येथील "डबक चाळ" या इमारतीमध्ये राहू लागले. मुंबईत आल्यावर रामजींनी आनंदराव आणि भीमराव त्यांची नावे प्रथम मराठा हायस्कूल मध्ये घातली. परंतु त्यांचे समाधान होईना म्हणून रामजी यांनी लगेचच मुलांची नावे मराठा हायस्कूल मधून काढली आणि एलफिस्टन हायस्कूल नावाच्या सरकारी हायस्कूल मध्ये घातली. कुटुंबाचा खर्च आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागविण्याचा आटापिटा करूनही यश येईना म्हणून रामजी यांनी आनंदरावांचे शिक्षण थांबविले आणि भीमरावांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. रामजींना विश्वास होता की भीमराव नक्की शिकून मोठा माणूस होईल. भीमराव बुद्धिमान होते. कोणतेही काम उत्साहाने करणे त्यांना फार आवडत असे. 1908 मध्ये भिमराव मॅट्रिक पास झाले. आपल्या आर्थिक अडचणीमुळे रामजी भीमरावांना कॉलेजचे शिक्षण देऊ शकतील अशी परिस्थिती नव्हती. त्यावेळी केळुसकर यांनी बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याशी भीमरावांची भेट घडविली. भीमरावांची हुशारी पाहून सयाजीराव महाराजांनी कॉलेजला जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी भीमरावांना शिष्यवृत्ती देण्याचे मान्य केले. शिष्यवृत्ती घेऊन शिक्षण घेत असल्याने ते पूर्ण करणे ही आपली जबाबदारी आहे अशी डॉ.आंबेडकरांची भावना होती. याचे फलित म्हणून डॉ. आंबेडकर या परीक्षेत उत्तम रित्या उत्तीर्ण झाले. दलित समाजाला शिक्षण घेण्यास प्रवृत्त करावे असे रामजी यांची इच्छा होती. डॉ. आंबेडकरांनी मुंबईत नोकरी करण्याऐवजी बडोदा येथे सयाजीराव गायकवाड यांच्याकडे काम करणे

पसंत केले. परंतु वडिलांच्या निधनानंतर जाऊ शकले नाहीत. त्यांना पुन्हा एकदा शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला जाण्याची संधी मिळाली होती. भीमरावांवर मन प्रसन्न असलेल्या महाराजांनी भीमरावांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देणे व त्यासाठी भीमरावांना अमेरिकेत पाठविणे पसंत केले. डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणाकरिता राज्यशास्त्र शाखा निवडली डॉ. आंबेडकरांना जुलै 1913 ते 1916 पर्यंत तीन वर्षा साठी प्रवेश मिळाला. आपल्या उच्च शिक्षणासाठी प्रमुख विषय म्हणून अर्थशास्त्र हा विषय निवडला व दुय्यम विषय समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र व तत्वज्ञान हे विषय निवडले. कोलंबिया विद्यापीठात अभ्यास करताना मानववंशशास्त्र या विषयाचा चर्चासत्रात "भारतातील जाती त्यांची रचना उत्पत्ती आणि वृद्धी" या विषयावर शोधनिबंध सादर केलेला होता. हाच लेख कालांतराने पहिले पुस्तक प्रकाशीत करण्यात आले. जून 1916 मध्ये अर्थशास्त्र विषयात एम. एससी. ची उच्च पदवी आणि डी. एससी. ची अति उच्च पदवी मिळविण्यासाठी भीमराव लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स मध्ये दाखल झाले. कोलंबिया विद्यापीठाने 1927 मध्ये भीमरावांना एचडी ही पदवी जाहीर केली. डॉ. आंबेडकरांचा शिक्षण प्रवास 27 वर्षांचा होता.

**डॉ. आंबेडकर आणि समाजकारण -**

शिक्षण घेऊन दलिता करिता काहीतरी काम केले पाहिजे अशी रामजी यांची इच्छा होती. डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यतेची झळ पोहोचली होती. या मरण यातना तून आपल्या बांधवांना बाहेर काढण्याकरिता काहीतरी केले पाहिजे असे नेहमीच त्यांना वाटत होते. दलितांना न्याय इंग्रज सरकार देईल अशी आशा त्यांना होती. तरी देखील दलितांनी आपल्या राहणीमानात बदल करून परंपरेने केली जाणारी कामे बंद करणे आवश्यक आहे. आपल्या आहारात पोशाखात बदल केला पाहिजे. याकरिता शिक्षणाची आवश्यकता आहे हे डॉ. आंबेडकरांनी जाणले होते. दलितांना संघटित करून त्यांना शिक्षणाकरिता प्रवृत्त केले पाहिजे ही आपली जबाबदारी आहे ही जाणीव डॉ. आंबेडकरांनी जोपासली भारतामध्ये सामाजिक क्रांतीची आवश्यकता आहे त्याकरिता दलितांचा उद्धार होण्यात आपल्या राष्ट्राचे हित आहे असे ते मानत होते. डॉ. आंबेडकर यांनी फक्त दलितांचा उद्धार करण्या करता काम केले असे नाही तर त्यांनी पाण्याचा प्रश्न असो, कोकणातील खोती पद्धती असो किंवा दलीता करिता काळाराम मंदिर प्रवेश असो असे अनेक प्रश्न त्यांनी हाताळले. महाडमध्ये पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता चवदार तळ्याचा प्रश्न त्यांनी आंदोलन करून सोडविण्याचा प्रयत्न केला परंतु लढ्याला यश येत नाही असे दिसून आल्यावर त्यानी हा प्रश्न न्यायिक मार्गाने सोडवला. सरकारी मालकीच्या जागा सार्वत्रिक असतात आणि अस्पृश्य लोकांनाही सरकारी मालकीच्या जागांचा वापर करण्याचा कायदेशीर हक्क आहे हे या चवदार तळ्याच्या लढाईने डॉ. आंबेडकरांनी सर्वांसमोर ठेवले. धर्म परंपरा लादणारा मनुस्मृति जाण्याचा कार्यक्रम त्यांनी घडवून आणला. डॉ. आंबेडकर दलितांना आपल्या माणुसकीच्या हक्कांसाठी जागृत करत होते. त्यासाठी त्यांनी सत्याग्रह केले. डॉ. आंबेडकर यांनी नागपूर विभागात त्यांची पहिली राजकीय परिषद 8 व 9 ऑगस्ट 1930 रोजी 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस अधिवेशन' या नावाने पहिली राजकीय परिषद भरवली. डॉ. आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ असल्याने लोकसंख्या नियंत्रणाकरिता संततिनियमन एकच उपाय असल्याचे त्यांनी सांगितले होते. भारतातील लोकसंख्येचा विचार करता त्यानी कुटुंब, कुटुंबातील मुलांचा विकास, स्त्रियांचे आरोग्य अशा विविध दृष्टिकोनातून त्यांनी या प्रश्नाचा विचार केला. अति लोकसंख्या ही भारतामध्ये दारिद्र्याचे कारण आहे. हिंदुस्थानातील लोकसंख्येच्या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचे कामही त्यांनी केले. भारतात दुष्काळ होतात त्यांच्यावर उपाय म्हणून नदीजोड प्रकल्प उभारले पाहिजेत असे विचार त्यांनी मांडले होते. दामोदर नदी प्रकल्प डॉ. आंबेडकरांची भारताला देणगी आहे असेच म्हणावे लागेल. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल यांनी भारताच्या मंत्रिमंडळात आंबेडकरांना स्थान दिले व त्यांच्यावर कायदा खात्याची जबाबदारी सोपविली. शेतीला उद्योगाचा दर्जा द्यायला हवा अशी त्यांची मागणी होती. तसेच शेतकऱ्यांना अनुदान संस्कृतीतून बाहेर काढण्याबाबत ही ते आग्रही होते विद्यार्थीदशेत असताना केळुस्कर, सयाजीराव गायकवाड महाराज कोल्हापूरचे शाहू महाराज, कोलंबिया विद्यापीठात असताना डॉ. आंबेडकरांची लाला लजपतराय यांच्याशी ओळख झाली होती पंडित नेहरू, महात्मा गांधी, जिना इत्यादी नेत्यांशी डॉ. आंबेडकर चर्चा करत असत

**डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना-**

डॉ.आंबेडकर आणि गांधीजी यांचे विचारांमध्ये संघर्ष असल्याचे भासविले जाते. गांधीजींचे काम आणि डॉ.आंबेडकरांचे काम हे वेगवेगळया पातळीवरील होते परंतु त्यांचा अंतिम उद्देश हा समाज परिवर्तनाचा असलेला आपणास पहावयास मिळतो. गांधीजी सवर्ण असून दालितासाठी काम करत होते तर डॉ.आंबेडकर हे दलित असून आपल्या बांधवान करिता काम करत होते. त्यामुळे काम करण्याच्या वेगामध्ये आपल्याला फरक जाणवतो. गांधीजीं प्रमाणे विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलितांच्या उद्धाराकरिता काम केलेले आपणास पहावयास मिळते. गोलमेज परिषद, सायमन कमिशन बाबत काँग्रेस विरोधी भूमिका, पुणे करारामुळे गांधीजींचे उपोषण सोडावे त्याकरिता डॉ. आंबेडकर यांचे वैचारिक मतभेद झाले. त्यामुळे भारताच्या संविधान सभेवर डॉ. आंबेडकर यांना मुंबई मधून निवडणूक लढविता येऊ शकली नाही. तरी

देखील देखील शेकाप च्या सहकार्याने डॉ. आंबेडकर बंगाल मधून निवडून आले. घटना समितीवर निवडून गेल्यानंतर डॉ. आंबेडकर यांना घटना समितीचा मसुदा समितीचे अध्यक्ष केले गेले. घटना समितीचे सभासद झाल्यानंतर आणि स्वतंत्र सार्वभौम भारत राष्ट्राचे पहिले विधी मंत्रीही झाले. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. आंबेडकरांनी इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, जर्मनी, आयर्लंड अशा विविध देशांच्या कायद्यांचा आणि घटनांचा अभ्यास करून सर्वसमावेशक अशी भारताची राज्यघटना लिहिली. स्वतंत्र आणि सार्वभौम व भारत राष्ट्राच्या लिखित स्वरूपातील राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.भीमराव आंबेडकर यांनी आपल्या भाषणामध्ये आपल्या स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्याच्या संरक्षण विषयी लोकशाहीप्रधान राज्यघटनेच्या सुरक्षिततेविषयी आणि राजकीय लोकशाही च्या जोडीला स्वातंत्र्य समता बंधुत्व या जीवन मूल्यावर आधारित सामाजिक लोकशाहीला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्या विषयीचे विचार व्यक्त केले. या भाषणानंतर घटना समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजेंद्र प्रसाद यांनी डॉ. बाबासाहेब यांचा गौरव केला.

**डॉ.आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार –**

डॉ.आंबेडकरांचे वडील शिकलेले होते तसेच त्यांचे आजोबा ही शिकलेले होते. त्यांचा वारसा डॉ. आंबेडकर आणि पुढे चालू ठेवला आणि शिक्षणाचा अत्युच्च पल्ला त्यांनी गाठला. शिक्षणाने माणूस समृद्ध असेल तर तो अन्यायाचा प्रतिकार करू शकतो. परंपरेच्या अन्यायकारक गोष्टी आहेत त्यांना विरोध करण्याची क्षमता त्याच्यामध्ये येते हे डॉ.आंबेडकरांनी पाहिलेले होते आणि अनुभवलेले होते. याकरिता समाजातील सर्व घटकांनी शिकले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. अस्पृश्य वर्गातील सर्वांना शिकता यावे याकरिता डॉ.आंबेडकर यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली.डॉ. आंबेडकर पुढे जाऊन असे म्हणतात की सर्वांना इंग्रजीतून शिकण्याचा अधिकार असला पाहिजे. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ.आंबेडकरांनी शिक्षण ही प्राथमिक गरज आहे हे मांडलेले आपण पाहतोच. शिक्षण धोरण ठरविताना शिक्षणाची धुरा केंद्र सरकारने सांभाळली पाहिजे हे विचार त्यांनी मांडले होते. डॉ. आंबेडकरांचे विचार अमलात आणून जर भारतामध्ये शिक्षणाची जबाबदारी केंद्र सरकारने घेतली असती तर आजची भारतातील शिक्षणाची भरारी वेगाने घेणे शक्य झाले असते.

**डॉ. आंबेडकरांचे महिला विषयक विचार –**

हिंदू **धर्मामध्ये** स्त्रियांना सांगली वागणूक मिळत नाही हे डॉ.आंबेडकर जाणून होते. हिंदू धर्मातील विविध जातींमध्ये कोणता पोशाख करावा किंवा कोणते दागिने घालावेत हे परंपरेने चालत आले होते. त्यात बदल करावेत असे डॉ.आंबेडकरांचे मत होते. चवदार तळे सत्याग्रह मध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त होते. त्यावेळी आंबेडकरांनी सर्वानाच उद्देशून भाषण केले होते डॉ.आंबेडकर म्हणतात 'तुमच्या पोटी जन्म घेणाऱ्या मुलांना चांगली नोकरी कशी मिळेल याची काळजी तुम्ही घेतली पाहिजे. तुमच्या पुरुषांप्रमाणे तुम्ही सुद्धा समाज उन्नतीचा निश्चय करा. तुमच्या वागणुकीच्या जुन्या आणि गलिच्छ चालीरिती बदलल्या पाहिजेत. अस्पृश्य असे ज्यामुळे वाटते त्या सर्व गोष्टी बदलल्या पाहिजेत. तुम्ही लुगडे नेसण्याची पद्धत बदलली पाहिजे. स्पृश्य बायकांप्रमाने लुगडी नेसली पाहिजेत. कोपरभर व गळाभर कथालाचे किवा चांदीचे दागिने घालण्यापेक्षा कमीत कमी सोन्याचे दागिने घातले पाहिजेत. चांगले व स्वच्छ व्यवस्थित कपडे वापरले पाहिजेत. गृहलक्ष्मी म्हणून तुम्ही घरात कोणतेही अमंगल गोष्ट होऊ देऊ नका. आपल्या मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पुरुषांबरोबर तुम्ही सुद्धा ज्ञान विद्या मिळवा. आपली पुढची पिढी सुधारण्यासाठी तुम्ही मुलींना देखील शिक्षण दिले पाहिजे. तुम्ही उद्या सकाळी आपल्या गावी परत जाताना तुमच्या कपडे घालावयाच्या पद्धतीमध्ये चांगला बदल झाल्याचे मला पहावयास मिळाली पाहिजे.' याचा परिणाम झाला आणि दुसऱ्या दिवशी पोषाखा मध्ये बदल झालेला डॉ. आंबेडकरांचा पहावयास मिळाला. प्रसन्न होऊन डॉ.आंबेडकरांनी चोळी बांगड्या प्रत्येकी आठ आठ आणे दिले होते.

लोकसंख्येचा प्रश्नवर सरकारचे लक्ष वेधण ताना त्यांनी स्त्रियांचा जास्त विचार केलेला आहे हे आपणास पाहावयास मिळते. जास्त मुले जन्माला घालाव्या लागणाऱ्या स्त्रियांना या संकटातून मुक्त करून दिलासा देणाऱ्या संततिनियमनाचा पुरस्कार करण्यामध्ये डॉ. आंबेडकरांची स्त्रियांबद्दल एक विशिष्ट दृष्टी दिसून येते. पाठोपाठ मुलांना जन्म द्यावा लागणार या स्त्रियांच्या दुःखाकडे त्यांनी लक्ष वेधले होते. मोठ्या संख्येने मुले होणे, लागोपाठ मुले होणे, अघोरी पद्धतीने गर्भपात, नको असताना मुले होणे यामुळे स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण जास्त होते या अनेक कारणांमुळे मुलांच्या संगोपनाकडे मातांचे दुर्लक्ष होते. ज्यावेळी एखाद्या स्त्रीची मूल होऊ द्यायची इच्छा नसेल त्यावेळी तिला गर्भधारणा टाळता आली पाहिजे. संतती जन्माला घालणं हे सर्वस्वी स्त्रीचा इच्छेवर अवलंबून असले पाहिजे. गरोदरपणाचा बाळंतपणाचा आणि मुलांच्या संगोपनाचा भार स्त्रीलाच होतो. म्हणून मुले केव्हा आणि किती होऊ द्यायची हा निर्णय दिला पाहिजे असे डॉ.आंबेडकरांचे मत होते हिंदू कोड बिलामध्ये आंबेडकरांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्कदार बनविले. हिंदू कोड बिलाचा आहे तसा जरी अवलंब केला गेला नसला तरी देखील हिंदू कोड बिलाचे वेगळे कायदे होऊन स्त्रियांना समान हक्क व स्वातंत्र्य प्राप्त झालेले पहावयास मिळते. डॉ. आंबेडकरांना स्त्री शिक्षण, स्वातंत्र्य व स्त्री मुक्ती यांची सदैव तळमळ होती. डॉ. आंबेडकरांमुळेच महिलांना मतदानाचा अधिकार घटनेच्या माध्यमातून प्राप्त झालेला आहे हे विसरून चालणार नाही.

**डॉ.आंबेडकरांचे विचार आणि आजची स्थिती –**

एकूणच आजच्या स्थितीचा विचार करता डॉ.आंबेडकरांच्या विचारांची तत्कालीन परिस्थितीत अंमलबजावणी झाली असती तर आज भारताला ज्या काही समस्या आहेत त्यांचे निराकरण झाले असते. भारतासमोर लोकसंख्येचा प्रश्न आहे त्यावर उपाय आंबेडकरांनी त्या वेळीच सांगितलेले होते. या उपायांची अंमलबजावणी झाली असती तर आज 'बेटी बचाव' कार्यक्रम घेण्याची गरज भासली नसती. शिक्षणाची दुरावस्था येण्यापूर्वीच शिक्षणाला चांगले दिवस आले असते. जर पाणी आणि वीज केंद्राने आपणा जवळ ठेवली असती तर पाण्याचा प्रश्न जो आज सर्वांसमोर उभा आहे त्यावर योग्य नियोजन आणि उपाययोजना करणे सोपे झाले असते. नदीजोड जोड प्रकल्प ही संकल्पना डॉ. आंबेडकरांची होती. प्रत्यक्ष किती अमलात आणली गेली हा संशोधनाचा विषय आहे. डॉ.आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना अधिकार दिलेले आहेत. त्या सोबतच जबाबदारीही वाटून दिलेली आहे. आजची परिस्थिती पाहता आपण अधिकारासाठी पोटतिडकीने बोलतो त्यापेक्षा खूपच कमी जबाबदारीवर बोलतो. प्रत्यक्ष जबाबदारी पार पाडने बाजूलाच राहते. आपण सुज्ञ वर्ग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार बोलतो पण प्रत्यक्ष त्या विचारांची अंमलबजावणी किती प्रमाणात करतो याचा विचार करण्याची आज खरोखरच गरज निर्माण झाली आहे. सर्व समस्या वर सरकारने उपाययोजना केली पाहिजे असे म्हणणे असेल तर डॉ.बाबासाहेबांचे विचार आपण फक्त वाचत ऐकत बोलतच राहणार आहोत का असा प्रश्न उभा राहतो.

सध्याची भारतातील कोरोना ची परिस्थिती पाहता यावर उपाय देखील आंबेडकरांनी पूर्वीच सुचविले होते परंतु ते अमलात आणले गेले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधीच विधान केले होते की 'मंदिर उभारण्यापेक्षा हॉस्पिटल बांधा.' जर आज हॉस्पिटल उभारलेली अस ती तर कोरो ना वर मात करणे सहज सोपे झाले असते. परंतु डॉ. बाबासाहेबांचे विचार हे फक्त पुस्तकांमधे राहिली त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही ही खरोखरच आजच्या समाजाला खंत आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ -**

१. गायकवाड, जयदेव: संविधान सभेत डॉ. आंबेडकर.

२. गायकवाड, लक्ष्मण: डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य.

३. सुमंत, यशवंत: गांधी आंबेडकर कृतक संघर्ष संपविण्याचा दिशा.

४. साधना १६ एप्रिल २०१६.

५. कीर, धनंजय: डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

# पेशवे घराण्यातील स्त्रियांचे राजकीय योगदान

*प्रा. डॉ. निलीमा राऊत*

*इतिहास विभाग प्रमुख, डॉ. पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य सायन्स महाविद्यालय, कॉटन मार्केट, नागपुर*

भारताचा इतिहास हा तीन कालखंडात विभागलेला आहे. त्या कालखंडापैकी प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड आणि आधुनिक कालखंड या तीन्ही कालखंडात या देशात अनेक उलथापालथी किंवा परिवर्तन झाल्याचे दिसुन येते. या परिवर्तनाचा आढावा घेतला तर त्यासाठी फक्त पुरूषांनीच आपली शक्ती किंवा बौध्दीक परिश्रम घेतले होते असे नसून या परिवर्तनाच्या चळवळीत मोठया प्रमाणावर अनेक कर्तबगार महीलासुध्दा सहभागी झालेल्या होत्या. इ.स. 1707 ते 1818 हा काळ मराठयांच्या इतिहासात हा काळ पेशवाईचा कालखंड म्हणून ओळखला जातो.1 कारण इ. स. 1707 मध्ये मोगलबादशाह औरंगजेबाचे निधन झाले आणि मोगल राजवटीचा -हास होंवून पेशवाईचा उदय झाला. इ.स. 1713 मध्ये पेशवाई अस्तीत्वात आली आणि अनेक कर्तबगार पेशव्यांनी ज्याप्रमाणे आपले नांव इतिहासात अजरामर केले तसेच पेशवे कालीन काही स्त्रीयांनी देखील विविध क्षेत्रात काम करून काही प्रमाणात परीवर्तण घडवुन आनले होते. अशा स्त्रियांच्या कार्याचा आढावा या ठीकानी शोधनिबंधात घेतला आहे. अशा स्त्रियांमध्ये राधाबाई, गोपीकाबाई, आनंदीबाई, सगुणाबाई, गंगाबाई, अनुताई घोरपडे या कर्तबगार स्त्रिया आपल्याला दिसुन येतात. पेशवे हे सतत मोहीमेवर जात असत त्यांच्या गैरहजेरीत गडावरील सर्वकारभार या स्त्रियांच काटेकोरपणे सांभाळीत असत.2

राधाबाई :

पेशवे घराण्याचेंकवा पेशवाईचे संस्थापक म्हणून बाळाजी विष्वनाथ भट यांचे नांव पुढे येते.3 बाळाजी विश्वनाथ हे 1689 मध्ये कोकणातुन घाटावर आले व नंतर 1713 मध्ये त्यांना पेशवाईची वस्त्रे प्राप्त झाली. तेव्हा राधाबाई कोकणातच होत्या परंतू या राधाबाईच्या अंगी पतीचे गुण, पराक्रम, राजकारण कुशलता या गोष्टी रूजलेल्या होत्या. त्या कुशाग्र आणि चौकसबुध्दीच्या होत्या. त्यामुळे पेशवाईतील स्त्रियांपैकी एक कर्तबगार स्त्री म्हणुन राधाबाईचा नावलौकीक होता. छत्रपती शाहु महाराजांच्या कारकिर्दीत राधाबाई हयांना फार मोठा मान होता.4 राधाबाईला वेगवेगळया भाशे चे ज्ञान होते त्यामुळे सातत्याने पत्रव्यवहाराच्या माध्यमातून आपले मत त्या पेशव्यांना कळवत असत. पेशवाईच्या वैभवात आपली तरूण पिढी बिगडू नये, चैनी विलासी होवु नये म्हणुन त्या दक्षता घेत असत, शिवाय त्यांना राजकारणाची सुध्दा जाण होती. बाळाजी विश्वनाथ व बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दीत पुण्यातील बहुतेक विविध व्यवहार राधाबाई पाहात असे. घरघुती बाबतीतही अनेक महत्वाचे निर्णय राधाबाईने स्वतःच्या अधिकारात घेतल्याचे दिसून येते.5 थोरले बाजीराव, चिमाजी आप्पा ही मंडळी काही कारणास्तव पुण्याबाहेर गेली असेल तेव्हा त्या स्वतः कारभार चालवत असत. कठीन प्रसंगात बाजीराव व चिमाजी आप्पा राधाबाईचा सल्ला घेवुन वागत असत. लष्करी मोहीमेवर गेले असता आपल्या लष्करी हालचाली राधाबाईला पत्राने कळवीत असत. राधाबाईने केलेल्या संस्कारामुळे पेशवा पहीला बाजीराव यांचे नांव जगातील अपराजीत सेनापतीमध्ये गणले गेले. आंग्रे, निंबाळकर, जाधव असे मोठमोठे सरदार आणि ब्रम्हेंद्रस्वामी सारखे साधूपुरूषही राधाबाईला फार मानीत असत.

बाजीरावांच्या मृत्युनंतर राधाबाईचे नातू नानासाहेब पेशवे झाले. नानासाहेबांच्या कारकिर्दीमधील राधाबाईनी लिहीलेली बरीच घरघुती आणि काही कारभाराविशयक बाबतीतले पत्रे वाचायला मिळतात. राधाबाईची जी पत्रे पाहायला मिळाली ती 1729 ते 1745 च्या दरम्यानची आहेत.6 या काळात आधी त्यांचा मुलगा बाजीराव व नंतर नातु नानासाहेब पेशवे पदावर होते. कारभार विशयक पत्रांत आणि घरघुती पत्रात राधाबाईने स्वतःच्या अधिकारात काही महत्वाचे निर्णय घेतलेले दिसतात. राधाबाईने घेतलेल्या निर्णयातून त्यांची अधिकार वाणी प्रत्ययाला येतेच पण त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे त्यांनी नाजूक किंवा गुतागुंतीच्या प्रकरणात घेतलेले काही निर्णय हे तत्कालीन सामाजिक रूढीना धक्का देणारे होते तसेच काही सुधारणावादी सुध्दा होते पुण्यातल्या पाण्याच्या व्यवस्थेसंबंधीचे त्यांचे पत्र उपलब्ध आहे. पुणे शहरात पाण्याची टंचाई निर्माण झाली असता राधाबाईने केलेल्या बदलाविरूध्द काही लोकांनी साताÚया च्या नानासाहेबांकडे तक्रार केली. त्याबध्दल राधाबाईला कळल्यावर त्यांनी नानासाहेबांना पत्र लिहीले."बाग वाचवून शहरवासीयांना पाण्या वाचुन हैराण करावे हे आमचे कार्याचे नाही. नदीत पाणी नाही याकरीता आम्ही हा बंदोबस्त केला आहे" जीजामातेने बाळाजी निंबाळकरांना प्रायश्चित देण्यात जसा पुढाकार घेतला होता तसाच पुढाकार राधाबाईने गोविंद हरी पटवर्धनांच्या बाबतीत घेतला होता. पटवर्धनांची एक बहीन महरीण निघाली. ब्राम्हण मंडळीनी पटवर्धनांना वाळीत टाकले. ब्राम्हणमंडळीची प्रखर टिका राधाबाईने सहन करून ब्राम्हणमंडळीचे मन वळवुन पटवर्धनांना प्रायश्चीत

देखविले[7] आणि तेदेखील पेशव्यांच्या पष्चात. राधाबाईचे यावरून नितीधैर्य केवढे प्रबळ होते याची चांगली कल्पना करता येते.

राधाबाई कुशाग्र आणि चौकस बुध्दीच्या होत्या त्यांना जवळपास 75 वर्षेचे आयुष्य लाभले होते. पेशवे नानासाहेबांनी आजी राधाबाईची चांदीतुला केली व तो सर्व पैसा राज्यातील वेगवेगळया देवस्थानाला दिला. त्यामुळे राधाबाई सतत समाधानी होत्या, वयाच्या 75 व्या वर्षी दिनांक 19 एप्रील 1753 रोजी त्यांचे निधन झाले.

अनुबाई (अनुताई घोरपडे )

अनुबाई घोरपडे ही बाळाजी विश्वनाथ पेशव्यांची मुलगी व थोरल्या बाजीराव पेशव्यांची बहीण होती. अनुबाईचा जन्म 1713 च्या सुमारास झाला. अनुबाई हुशार व गुणी असून ती आपला भाऊ बाजीराव सोबत अश्वारोहण कला, लिहीणे, वाचणे सहज शिकली. ऐतिहासीक पत्रात अनुबाईचा पत्रव्यवहार फार मोठा असून त्यात तिचे भाशाप्रभुत्व व व्यक्तीमत्वातील वर्चस्व यांचा प्रत्यय दिसुन येतो.[8]

इ.स. 1719 साली अनुबाईचे लग्न कोल्हापूर गादीचे सचिव नारो महादेव जोशी यांचा मुलगा व्यंकटराव जोशी यांचेशी झाला. इ.स. 1745 मध्ये त्या विधवा झाल्या तेव्हा त्यांचा मुलगा 20-21 वर्षाचा होता.त्यामुळे राज्याचा अंतर्गत कारभार पाहणे व पेशव्यांची पहिल्या दर्जाची सरदारी सांभाळण्याची जबाबदारी त्यांनी त्यांच्या स्वतःहाच्या कर्तुत्वाच्या बळावर पेशव्यांकडून मिळवली. अनुबाई कर्तबगार व हुशार असल्यामुळे त्या दोन्ही कर्तव्य त्या फार उत्तम रित्या पार पाडत होत्या. अनुबाई पेशव्यांसोबत मोहिमेवर जात असत.9 1753 मध्ये नानासाहेब पेशवे कर्नाटकच्या मोहिमेवर गेले असतांना त्या त्यांच्या बरोबर पथकासह हजर होत्या. त्याचप्रमाणे छत्रपती शाहु महाराजांना भेटायलाही जात असत. पेशवे त्यांना छत्रपती शाहु महाराजांकडून काही संरजाम मिळवुन देत असत. छत्रपती शाहु महाराजांनी अनुबाईला आजरे महाल इनाम दिल्याची सनद दिली होती. आजरे महाल ही एकतीस खेडयांची सनद छत्रपती शाहु महाराजांकडून घेतली होती. हयाच भेटीत छत्रपती शाहु महाराजांनी पेशव्यांना भीमगड, पारगड व वल्लभगड हे किल्ले व त्यांच्या घेरातल्या खेडया सुध्दा दिल्या व नानासाहेब पेशव्यांनी हया किल्ल्याची मामलत आपली आत्या अनुबाई यांचेवर सोपविली. तसेच इचलकरंजी या इनाम मिळालेल्या गावाचा कारभार त्या स्वतःच पाहात असे आणि आपल्या हिमतीने व कौशल्याने इचलकरंजी हया लाहानश्या जाहागिरीचे एका पहिल्या दर्जाच्या संस्थानकात रूपांतर करून कोल्हापूर संस्थानकाच्या बरोबरीचा मान इचलकरंजीला प्राप्त करून दिला.10

अनुबाईने आपला मुलगा नारायणराव तात्या याला आर्थिक व्यवहाराबाबत व कौटुंबीक वागणुकीबाबत सल्ला देणारी अनेक पत्रे त्यांनी लिहीलेली आहेत. पुढे ज्यावेळी त्यांचा मुलगा नारायणराव यांच्याशी त्यांचे पटेनासे झाले त्यामुळे त्यांनी सर्व सनदा आपला नातू व्यंकटराव यांचे नावे केल्या व सर्व कारभार मात्र त्या स्वतः पाहात असत. 1784 साली त्यांचा मुत्यृ झाला. आपल्या 70 वर्षेच्या आयुष्यात त्यांनी बाजीराव, नानासाहेब, माधवराव, सवाई माधवराव या महत्वाच्या पेशव्यांची कारकिर्द पाहिली.[11] तसेच पेशवा बाजीरावाच्या काळात काशीबाईने पुणे व साता-या च्या दरबारात पेशव्यांच्या गैरहजेरीत प्रतिनीधीपद सांभाळले तर मस्तानीने बाजीराव सोबत युध्द व राजकारण केले.

गोपिकाबाई :

गोपिकाबाई हया नानासाहेब पेशवे हयांच्या पत्नी, गोपिकाबाईचा जन्म 1725 साली झाला. गोपिकाबाईचे माहेर कोकणातल्या गुहागर भागातले रास्ते घरण्यातले होते.12 इ. स. 1730 मध्ये थोरले बाजीराव पेशवे यांचा मुलगा नानासाहेब पेशवे आणि गोपिकाबाई यांचा विवाह झाला होता. इ.स. 1740 मध्ये पहिले बाजीराव पेशवे हयाचे निधन झाले त्यांच्या मृत्यु नंतर छत्रपती शाहुमहाराजानी पेशवाईची वस्त्रे नानासाहेब पेशव्यांकडे दिली तेव्हापासुन त्या नानासाहेबा सोबत राज्यकारभारात लक्ष घालत असत. नानासाहेबासारख्या चौफेर व्यक्तीमत्वाच्या कर्तबगार पतिला त्यांनी योग्य साथ दिली असे दिसुन येते. गोपिकाबाई यांच्या अंगी बुध्दीमत्ता, महत्वकांक्षा, धैर्य, स्वतःच्या श्रेष्ठतेची जाणिव असे प्रशासनाला लागणारे सर्व गुण होते. गोपिकाबाईचे सतत राजकारणावर नियंत्रण असे. विवाहानंतर इतिहासातील नोंदीच्या आधारे असे म्हटले जाते की, गोपिकाबाई या नानासाहेबाबरोबर मोहीमेवर जात असत.13 गोपिकाबाईना मोहिमेविषयीचे सर्व मार्गदर्शन त्यांच्या आजेसासु राधाबाई कडुन केले जात होते. त्यांचे कडे सर्वगुण असल्यामुळे नानासाहेब त्यांच्याशी राज्यकाभारा विषयक सर्व चर्चा करीत असत. नानासाहेबांच्या गैरहजेरीत त्या पुणे परगण्याचा कारभार पाहात असत. त्यामुळे पेशवे दरबारातील सरदार मंडळीवर त्यांचा मोठा वचक होता.

पाणिपतच्या तिस-या युध्दातील पराभवाच्या धक्कयाने नानासाहेब अतिशय खचले होते भेलसा येथील मुक्कामा पाणिपत वरील मराठयांच्या पराभवाची बातमी समजली. 23 जुन 1761 मध्ये नानासाहेबांनी आपला प्राण सोडला. त्यावेळी माधवराव आणि नारायणराव वयाने फार लहान होते. त्यामुळे गोपिकाबाई सती गेल्या नाहीत. विश्वासराव सारखा हातातोंडाशी आलेला पुत्र पाणिपत युध्दामध्ये मारला गेला व त्यापाठोपाठ नानासाहेब पेशवे मृत्यु पावल्यानंतर गोपिकाबाईने पेशवेपद आपला दिर राघोबादादाला न मिळता आपला मुलगा माधवराव पहिला यास मिळावे यासाठी गोपिकाबाईने बराच दबाव निर्माण केल्याची इतिहासात नोद आहे.14 सारा शोक गिळुन गोपिकाबाई पुत्राला मार्गदर्शन करू लागल्या तसेच राघोबादादांचाही वेळोवेळी सल्ला घेत असत. राघोबादादालाच गोपिकाबाईने माधवरावाची जबाबदारी घेण्यास सुचविले असे दिसते. राघोबादादाला हाताशी धरणे योग्य राहील हे त्या राजकारणी स्त्रीने ओळखले होते. "मुल लहान, त्याला आपण शहाणे करून सोडावे व आपण दौलतीचा सांभाळ करावा असे तिने वेळोवेळी राघोबादादाना सांगितले.15 असे समोपचाराने वागुण त्या त्यांना नेहमीच मोठेपणा देत त्यामुळे राघोबादादाच्या मनातील गोपिकाबाई विशयीचा आदर कधी ढळला नाही व कमी झाला नाही. तसेच राघोबादादा यांना मोठेपणा दिला यावरून त्यांची राजकारणातील धुरंधर वृत्ती दिसुन येते. माधवरावांच्या कार्यक्षमतेचा पाया गोपिकाबाईनेच घातला.

गोपिकाबाई आपल्या गंगापुर इथल्या मुक्कामात रोजकीर्द ठेवीत असत. त्यात कशासाठी काय खर्च झाला, कोणी कसे वर्तण केले, कोणास काय दंड केला वगैरे नोंदी सापडतात.16

मोठया करारीपणाने आपल्या लहानग्या नातवाला पत्राद्वारे 13 कलमी उपदेश लिहुन पाठवला. सवाई माधवरावांचे वय या वेळेस 9 वर्षाचे होते. या 13 कलमामध्ये सकाळी उठल्यापासुन रात्री झोपेपर्यंतची धर्मकृत्ये, अभ्यास, व्यायाम, आहार, विहार कोणत्या वेळेस करणे व किती असावा याचा बारीक सारीक तपशिल गोपिकाबाईने लिहीला आहे.17 या 13 कलमातला मुख्य उपदेश सवाई माधवरांवांनी कोणाशी केव्हा कसे वागावे या संबंधी आहे. हा उपदेश गोपिकाबाईच्या राजकारणी, शिस्तप्रिय व बहुश्रृत मनाची साक्ष देणारा आहे.

गंगापुर येथे 1788 साली गोपीकाबाईचा मृत्यु झाला. त्यावेळेस त्यांचे वय 63 वर्षाच्या होते. गोपीकाबाईच्या अंगी बुध्दीमत्ता महत्वकांक्षा, धैर्य व स्वतःच्या श्रेष्ठतेची जाणीव असे प्रशासनाला लागणारे गुण होते. परंतु राजकारणात प्रयत्न करूनही स्वतःला फारसा शिरकाव करून घेता आला नाही.

आनंदीबाई :

पेशवे घराण्यामध्ये राजकारणामध्ये रस घेणा-या आणि काही राजकीय महत्वकांक्षा बाळगणा-या दोनच स्त्रिया होत्या त्याम्हणजे गोपीकाबाई व आनंदीबाई.18 आनंदीबाईचा जन्म 1747 साली झाला. त्याचे माहेर कोकणातल्या गुहागर गावच्या ओक घराण्यातले होते. 1755 साली रघुनाथरावांशी त्यांचा विवाह झाला.19 पेशवे घराण्यात इतर स्त्रियांप्रमाणे आनंदीबाईलाही लिहीता वाचता येत होते. पती रघुनाथराव सोबत ती मोहीमेवर जात होती. राजकारणातही त्या नेहमीच हस्तक्षेप करीत. पेशवाईच्या राजकारणाच्या पटावर आनंदीबाईचे पाउल पडल्याचा पहीला प्रसंग नारायणरावाच्या वधाशी निगडीत आहे. परंतु नारायणराव पेशव्यांच्या वधात कटकारस्थानात आनंदीबाईच्या सहभागाबद्यल मतभेद दिसुन येतात. बाजीराव दुसरा चे जन्मानंतर तिने मंडलेश्वर येथुन आपल्या मुलाला पेशवेपद मिळावे म्हणुन प्रयत्न केले.20 1775 साली दुस-या बाजीरावचा जन्म झाला. दुस-या बाजीरावच्या जन्मानंतर आनंदीबाईच्या हालचालीची नोंद इतिहासात सापडते. दुस-या बाजीरावच्या जन्माच्या आधी रघुनाथरावाने आपला वारसा म्हणुन अमृतरावाला दत्तक घेतले होते. पण आता पोटचा वारस जन्माला आल्यानंतर आनंदीबाईने पेशव्याविरूध्द बंडाचा झेंडा उभारला होता. त्याभागात तिने फौजा उभारून गडबड सुरू केली.

1777 ते 1779 या दोन वर्शाच्या काळात आनंदीबाई मंडलेश्वर येथे पेशव्यांच्या कैदेत होती. या काळामध्ये रघुनाथराव इंग्रजाची मदत घेवुन पेशव्यांच्या गादीवर येण्याची खटपट करीत होते. या संबंधात आनंदीबाईने स्वतः पुढाकार घेवुन मंडलेश्वरहून नाना फडणीस व सखारामबापू यांना पत्रे लिहीली आहेत. रघुनाथराव घरच्या मंडळीशी लढायला इंग्रजांची मदत घेतो आहे हे आनंदीबाईला योग्य वाटत नव्हते.

रघुनाथरावांच्या कारवाया आत्मघातकी ठरणार आहे. पण रघुनाथरावाच्या कारवायांचा दोष आनंदीबाईने कौशल्याने नाना फडणीस व सखाराम बापू यांचेवर टाकला आहे.21 या पत्रातुन आनंदीबाईच्या स्वभावातला धाडसीपणा, प्रयत्नशिलता, मुत्सदेगिरी हे गुण दिसतात. तिच्या स्वभावातला तिखटपणा आणि खोचकपणाही दिसतो. रघुनाथरावाच्या कारवायांचा राजकीय परीस्थीतीवर होवु शकणारा दुरगामी व गंभीर परिणाम, तिला जाणवत होता. आनंदीबाईची राजकीय दृष्टी प्रगल्भ होती असेही यातून दिसून येते. नाना फडणीसांची आनंदीबाईवर डोळयात तेल घालुन पाळत होती.

आनंदीबाई केव्हाही उठाव करू शकते याची भिती म्हणा किंवा खात्री त्याना होती. आताच वाचलेले आनंदीबाईचे पत्र आणि पुर्वी धारच्या किल्ल्यात तिने केलेला उठाव तिच्या प्रयत्नशिलतेची आणि धाडसाची चुणूक दाखवायला पुरेसे आहेत. आनंदीबाई 1794 साली विफल आणि निराश मनःस्थीतीत मृत्यु पावली.22

रियासतकार सरदेसायांनी आनंदीबाईला बरेच महत्व देवुन तिचा सहानुभुतीने विचार केला आहे. आनंदीबाईची बुध्दीमत्ता, धाडसीपणा, तिचा राजकीय बाबतीमधील जाण आणि परिस्थीतीकडे पाहण्याचा दुरदर्शीपणा हे सारे गुण तिच्या नव-या ची योग्य साथ न मिळाल्यामुळे वाया गेले. तिला तिच्या आयुष्यात त्यांचा उपयोग होवु शकला नाही असे मत त्यांनी नोंदविले आहे. ज्या समाजात स्त्रीच्या जिवनाला फक्त पतीच्या संदर्भातच अर्थ मिळतो त्या समाजात अशा अनेक स्त्रियांचे गुण वाया जात असणार. आनंदीबाई ही अशा स्त्रियांची प्रतिनीधी समजली जावू शकते.

सगुणाबाई :

सगुणाबाई आणि गंगाबाई या पेशवे घराण्यातल्या सुना होत्या. सगुणाबाई ही नानासाहेब पेशव्यांचे अल्पआयुषी बंधु जनार्धनपंत यांची बायको होती तर गंगाबाई ही नारायणराव पेशव्यांची बायको होती.23 सगुणबाईचे माहेरचे आडनाव भिडे हे होते सन 1744 साली त्यांचा विवाह जनार्दनपंताशी झाला. जनार्दनपंत 1749 साली मृत्यु पावले व सगुणबाई वयाच्या दहाव्या वर्षी विधवा झाल्या. आपल्या आयुष्यातील 34 वर्षे त्यांनी वैधव्यदशेत काढली. सगुणबाईनी 1756-57 साली काशीयात्रा केली. यात्रेवरून त्यांनी आपल्या दिरांना आपल्या खुशालीविषयी, उत्तरेच्या परिस्थीती विशयी हालहवाला कळविणारी अनेक पत्रे लिहीली आहेत. सगुणाबाई धार्मीक वृत्तीच्या होत्या व त्यांच्याजवळ स्वतःचा धार्मिक ग्रंथांचा संग्रह होता. सगुणाबाईच्या ग्रंथ समुहाची काही वैशीश्टे होती. ताईतात मावूशकेल इतक्या लहान आकाराची भगवदगीतेची प्रत व तशाच आकाराचे भागवतही होते. या त्यांच्या ग्रंथ संग्रहाची दखल इतिहासकारांनी घेतली आहे.

गंगाबाई :

गंगाबाईचे माहेर पुण्यातच साठयांकडचे होते. त्यांचा विवाह 1763 साली नारायणराव पेशवे यांचे सोबत झाले तेव्हा नारायणराव आठ वर्षाचे होते, त्यानंतर 1773 साली नारायणराव यांचा वध झाला तेव्हा गंगाबाई यांना दिवस गेले होते.24 नारायणरावांचा वध झाल्यानंतर रघुनाथरावांना पेशवाईची वस्त्रे देण्यात आली होती. पण दरबारी मंडळींचा आपल्याला विरोध आहे हे रघुनाथराव ओळखुन होते म्हणुन ते मोहिमेच्या निमीत्ताने पुण्याबाहेर गेले. गंगाबाईना धोका होवू नये म्हणुन घरातल्या वडीलधा-या स्त्रियांच्या संमंतीने व मदतीने त्यांना पुरंदर किल्ल्यावर ठेवण्यात आले. नंतर सवाई माधवरावांचा जन्म होईपर्यंत पुण्याचा कारभार गंगाबाईच्या नावे चालत होता. या संबंधीची नोंद पुरंदरे दप्तरी आहे. म्हणजे सवाई माधवरांव बारा दिवसाचे होईपर्यंत गंगाबाईच्या नावाने पुण्याचा कारभार चालला.25

राज्यकारभाराची गुप्त खलबते चालत तेव्हा गंगाबाई हजर राहत असत आणि प्रत्येक महत्वाच्या कामी कारभारी त्यांची अनुमती घेत असत. गंगाबाई वारल्या तेव्हा त्यांचे वय जेमतेम 19 वर्षाचे होते.26 त्यांच्या मृत्यु समयी त्यांनी सवाई माधवरावांना नाना फडणीस व सखाराम बापु यांचे हवाली केले होते हयात त्यांची राजकीय दुरदृष्टी दिसुन येते.

सारांश :

या सर्व अभ्यासावरून, पेशवे घराण्यातील स्त्रिया या बुध्दीवान, महत्वकांक्षी, डावपेच व प्रशासकीय कसब, राजकारणाची समज असलेल्या दिसुन येतात. जगाच्या इतिहासात राज्य करणाÚया स्त्रिया अगदी अल्प असल्या तरी पत्नी, आई व प्रेयसी या नात्याने राजकारणी पुरूषाला सल्लामसलत करणे आणि त्यांच्याकडून विशीश्ट गोष्टी करवून घेणे अशा अप्रत्यक्ष मार्गानी स्त्रियांनी राजकारणावर आपली छाप पाडलेली आहे. दौलत सांभाळण्या विषयी सावधगिरी, व्यवहारीक, माहितीपुर्ण सल्ला पुरूषांना देत. परंतू क्वचीत प्रसंगी कुटील राजनितीचा अवलंब करण्याचा नुसता सल्ला त्या देत असे नव्हे तर त्याप्रमाणे स्वतः आचरण करीत असत. ज्या राजकारणात त्यांना वगळण्यात आले, त्या राजकारणात जेव्हा जेव्हा संधी सापडली तेव्हा त्या संधीचा त्यांनी कुशलपणे वापर केलेला दिसुन येतो.

आपले छोटेसे संस्थान, आपली जहागीर त्याविषयीची आपली जबाबदारी आणि त्यांच्या संरक्षणासाठी प्रसंगी प्राणपणाने झुंजणे. स्वयंनिर्णय, स्वाभिमान व सत्ता मिळवण्यात स्त्रियाही कमी पडत नव्हत्या. मर्यादीत अधिकरांतही आपल्या तेजाने चकाकणारी काही अभिमान स्थळे इतिहासात आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. अ. रा. कुलकर्णी व ग. ह. खरे, मराठयांचा इतिहास खंड 1,प्रकाशन 1984, पृ. 233
2. डॉ. जयसिंगराव पवार, मराठी सत्तेचा उदय, प्रकाशन 1996, पृ.183,

3. निलीमा भावे, राजसत्तेच्या फटींमधुन पेशवेकालीन स्त्रिया, पॉप्यूलर प्रकाशन मुबंई 1996,पृ. 12,

4. सुरेन्द्रनाथ सेन, मराठयांची प्रशासन व्यवस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रकाशन एप्रील 2003 पृ. 89

5. निलीमा भावे, पृ.64,

6. उपरोक्त पृ. 65

7. वा. कृ. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र,वरदा प्रकाशन पुणे 1988, पृ.304

8. गो. स. सरदेसाई ( संपा. ) पेशवे दप्तर खंड 9, प्रकाशन 1931, पृ 52

9. शारदा देशमुख, शिवकाळातील व पेशवाईतील स्त्री जिवन,प्रकाशन टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, 1903, पृ. 238

10. उपरोक्त पृ. 238

11. निलीमा भावे, पृ. 68

12. वा. कृ. भावे पृ. 334

13. गो. स. सरदेसाई ( संपा.) पेशवे दप्तर खंड 18,प्रकाशन 1931,पृ 104 ते 109

14. उपरोक्त पृ 110

15. द. ब. पारसनिस (संपा.) पेशवे दप्तरातील सनदा पत्रातील माहीती, प्रकाशन 1917, पृ 123

16. पेशवे दप्तर खंड 21, प्रकाशन गर्व्हर्न्मेंट सेन्ट्रल प्रेस, मुंबई 1932,पृ. 174

17. उपरोक्त पृ. 176

18. निलीमा भावे, पृ. 83

19. उपरोक्त पृ. 84

20. पेशवे दप्तरातील सनदा पत्रातील माहीती पृ 125

21. उपरोक्त पृ. 126

22. गो. स. सरदेसाई, मराठी रियासत खंड 3,पॉप्यूलर प्रकाशन मुबंई 1989, पृ 59

23. त्रैमासिका भा,इ,सं.मं. पुणे खंड 61 अंक 1, प्रकाशन 1982 जुलै,पृ 48

24. उपरोक्त

25. गो. स. सरदेसाई, मराठी रियासत खंड 3,प्रकाशन 1989, पृ 79

26. उपरोक्त.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# कोकनातील देवराईमधील वनस्पतीचा अभ्यास

*प्रा.डॉ.पी.डी.गाथाडे*

*लक्ष्मीबाई सीताराम हळबे,कला वाणिज्य विज्ञाण महाविद्यालय दोडामार ,जिल्हा सिंधुदुर्ग*

**प्रस्तावना**

पूर्वीचा मानव आजच्या मानवापेक्षा हुशार आणि पुढचा विचार करणारा दूरदृष्टीचा होता.याचे अनेक पुरावे आपणास पहावयास मिळतात.त्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणजे गावागावात असलेली देवराई .देवराई म्हणजे देवाच्या नावाने गावाच्या किंवा मंदिराच्या आसपास गावकऱ्यांनी जाणीवपूर्वक वाढवलेले जंगल.त्या ठिकाणी लोकांनी जाऊ नये.त्यातील वृक्षवेली तोडू नये.म्हणून देवांची भुताखेतांची भीती घालून ठेवलेली असायची.अशा देवराया भारताबरोबरच जगातील अनेक देशात आहेत. प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतीमध्येही देवरायांचा उल्लेख आढळतो.त्या प्रदेशात ओक वृक्षांच्या देवराईला डोडोना म्हटले जाते.अथेन्स शहराबाहेर ऑलिव्ह वृक्षांच्या देवरायां होत्या. रोममधील रोमन फॉर्म,आणि इटलीतील बास्को,देवराया प्रसिद्ध आहेत.याबरोबरच घाना नायजेरिया,सीरिया,टर्की,चीन व आफ्रिका खंडावरील अनेक देशात देवराया होत्या असे उल्लेख आढळून येतात. वरील देशांप्रमाणेच भारतील हिमालईन विभागात अशा देवराया मोठ्या प्रमाणात होत्या.हिमालयीन प्रदेशाबरोबरच राजस्थान, कर्नाटक,आंध्रप्रदेश,व महाराष्ट्रात अशा देवराया मुबलक प्रमाणात होत्या.या देवरायांना शरणवन,अभयारण्य अभयस्थान,राई, या वेगवेगळया नावाने ओळखले जायांचे.महाराष्ट्रामध्येही या देवराया मुबलक होत्या.त्यांना देवराई देवरहाटी,राय, राई,कर्नाटकमध्ये देवरकडू, नागबन,नागकुडू.राजस्थानमध्ये जोगमाया,शरणवन, अभयस्थान,बिहारमध्ये सरन्य,ओरिसामध्ये जाहेर, तामिळनाडूमध्ये कोविल काडू, केरळमध्ये कान्यू, मध्यप्रदेश छत्तीसगडमध्ये सरणा,उत्तराखंडमध्ये देवबन, अशा नावाने देवरायांना ओळखले जायचे. देवराईत देव आहे,देवांचे वास्तव्य आहे ,भूत आहे.त्यामुळे अशा ठिकाणी गैरवर्तन केले तर देवाचा कोप होतो.अशी भीती घातली जायची.देवराया देवाच्या नावाने राखून ठेवल्याने,त्या वनातील वृक्ष तोडण्याचे धाडस कोणी करीत नसत.देवराईत देव-देवता समूहाने राहतात असा समज होता.त्यांना मातृदेवता पुरुष सहचर,शिरकाई वरदायी,असे म्हणत.काही ठिकाणच्या पुरुष देवताना चेलोबा,म्हसोबा,बाजीबुवा,भैरोबा, वेतोबाची देवराई नागनाथ देवराई ,लिंगाची देवराई, भूतांचे टेंम्ब,वनदेवता किंवा इतर नावाने ओळखले जायचे.काही देवरायात छोटे मंदिर असायचे,किंवा दगडाला सेदूर फासून त्याला देव समजण्याची प्रथा होती.तर काही ठिकाणी अनेक दगड असायचे.त्यांना समूहदेवता म्हटले जायचे.त्यामुळे या अरण्यात देवतांच्या भीतीने कोणी जात नसे.त्यामुळे जंगलाचे रक्षण होत होते.या देवरायांमध्ये प्रचंड मोठे,उंच वृक्ष वाढलेले आढळून यायचे.त्यांची वाढ मुक्तपणे झालेली असायची.काही जंगलात अत्यंत दुर्मिळ वृक्ष आढळत होते.ही जगलं जैवविविधतेने समृद्ध होती.त्यात औषधी वनस्पतीची रेलचेल होती.आजही गावागावात वेगवेगळया आजारावर औषधे देणारे वैद्य आढळून येतात.त्यांच्या मदतीने जर या देवराईचा अभ्यास केला तर, हजारो वर्षांपासून चालत आलेली गावठी औषध देण्याची परंपरा पुढेही चालू राहील.

देवराईचा आकार,जतन, संवर्धन, वनस्पतींची विविधता त्याचे महत्त्व यावरून देवराईचे कार्य लक्षात घेतले जायचे.म्हणून प्रत्येक ठिकाणी देवराईच्या संवर्धनासाठी वेगवेगळे प्रयत्न केले जायांचे.त्यासाठी काही श्रद्धा परंपरा निर्माण करून ठेवलेल्या होत्या.त्यांचे सर्वांनी जतन करावे पालन करावे अशी गावकऱ्यांची अपेक्षा असायची.

**देवराईच्या अभ्यासाचे उद्देश**

1) देवराईचा इतिहास जाणून घेणे .

2) देवराईतील औषधी वनस्पती, पशुपक्षी रानभाज्या, वेली यांचा अभ्यास करणे.

3) देवराईची संख्या कमी होण्याची कारणे शोधणे.

4) देवराईतील नैसर्गिक जलस्त्रोताचा अभ्यास करणे.

5) देवराईच्या समस्या जाणून घेणे आणि संवर्धनासाठी उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती**

या शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती स्त्रोताचा वापर करण्यात आलेला आहे. प्रश्नावली व मुलाखतीद्वारे प्राथमिक माहिती जमा करण्यात आली असून.दुय्यम माहिती उपलब्ध करण्यासाठी वेगवेगळे संदर्भ ग्रंथ, संशोधकाचे शोधनिबंध, जर्नल, पंचायत समिती, तहसील कार्यालय,पर्यटन केंद्,ग्रामपंचायत,कृषी कार्यालय,शिक्षण विभाग,अंगणवाडी सेविका,यांच्याकडून दुय्यम माहिती जमा करण्यात आलेली आहे.

**देवराईचे अभ्यासक**

आपल्या देशात आणि महाराष्ट्रामध्ये देवराईचा अभ्यास करणारे अनेक तज्ञ आहेत.पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयातील प्रा डॉ धर्मानंद कोसंबी ,यांनी देवराईचा पुरातत्वशास्त्र,मानवशास्त्र,भारतविद्याशास्त्र,या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.याबरोबरच डॉक्टर वा.द वर्तक, डॉ माधव गाडगीळ, कैलास मल्होत्रा,मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू संजय देशमुख,डॉ मधुकर बाचुळकर, गोव्यातील प्रसिद्ध पर्यावरण तज्ञ,प्रा राजेंद्र केरकर,सी पी आर चेन्नई,यांनी देवराईचा अतिशय बारकाव्यानिशी अभ्यास केलेला आढळून येतो.त्यांच्यासारखेच असे कितीतरी लोक देवराईचा अभ्यास करत असताना आढळून येतात.

**महाराष्ट्रातील देवराया**

महाराष्ट्रात देवराईला देवरहाटी,राय,राई,या नावाने ओळखतात.अभ्यासकांच्या मतानुसार महाराष्ट्रात तीन हजारपेक्षा अधिक देवराई आहेत.या देवराया साधारणपणे काळुबाई,रांनजाई, भैरोबा,विझाई, म्हसोबा,सोंनजाई, अंबेश्वर,व विविध स्थानिक नावाने ओळखल्या जातात.काही ठिकाणी देवराई परिसरात आदिवासींच्या वस्त्या आहेत.महाराष्ट्रामध्ये पुणे जिल्ह्यातील मावळ,आंबेगाव, मुळशी.नागपूर जिल्ह्यतील रामटेक, कोल्हापूर जिल्ह्यातील माळुंगा,चंदगड, इब्राहिमपूर.सिंधुदुर्ग जिल्ह्यतील हेवाळे, परमे, शिरवल, तेरवनमेढे, मोचेमाड जवळ कडोबा,कोचऱ्याजवळ डोगोबाय.ठाणे जिल्ह्यातील जव्हार,या ठिकाणच्या देवराया प्रसिद्ध आहेत.काही ठिकानच्या देवराया भीतीपोटी राखलेल्या आहेत.या ठिकाणी भूत असते,देव असतो ,वाघ साप घरापर्यंत येतात ही भीती असते.म्हणून या देवराया जगलेल्या आहेत.काही देवरायामध्ये समशानभूमी असल्याने तेथील लाकूड कोणी तोडत नाही.

**कोकणातील देवराई**

देवराईच्या बाबतीत कोकण खूप समृद्ध आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक देवराया कोकणात आढळून येतात.काही तज्ञानी कोकणात किमान 2500 देवराया आहेत असे म्हटले आहे.पण ही संख्या त्यापेक्षाही खूप मोठी असावी.कारण कोकणात प्रत्येक गावात किमान एक तरी देवराई पाहायला मिळते.या परिसरात देवळाच्या सभोवताली देवराया आहेत.कोकणातील रत्नागिरी सिंधुदुर्ग हे जिल्हे देवराईच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध असलेले आढळून येतात.देवराईच्या अभ्यासकांनी केलेल्या नोंदीपैकी 1600 देवराया फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात आढळून येतात.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येक गावात किमान एक दोन देवराया आहेत.तर काही ठिकाणी अनेक देवराया आढळून येतात.या देवराईतील वृक्ष हजरो वर्षापासूनचे असल्याचे जाणवते.दोडामार्ग तालुक्यातील कुडासे येथील वृक्ष इतर राज्यात सर्वाधिक मोठा आणि जुना आहे असे तज्ञ सांगतात.हिवाळे गावात सीतेची देवराई प्रसिद्ध आहे.याबरोबरच परमे, भेडसी,ऊसप,तेरवननेढे,कसई,शिरवल,या गावातील देवराया,पुरातन व समृद्ध आहेत.

**देवराई संदर्भात प्रथा परंपरा**

काही गावातील देवराई संदर्भातील अनेक प्रथा परंपरा आहेत.झाडांचे फूल फळ खाली पडल्याशिवाय त्याला हात लाऊ नये.देवराईतील वृक्ष तोडायला,गुर चरायला पूर्ण बंदी असते.काही देवराई परिसरात तर चप्पल बूट घालून जाण्यास बंदी असते.अनेक ठिकाणी या परंपरा आजही पाळल्या जातात.काही ठिकाणी तर देवराईत गुर चरायला सुद्धा सोडत नाहीत.त्यामुळे देवराईतील विविधता टिकून राहिलेली आढळून येते.यामुळे तेथील मातीची सुपीकता टिकून आहे.भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली आहे.कुंडे, मारलेश्वर, आजगाव,कुळे,मासरंग,विगरवली,काटवली,कुरघुडा,बाशी या ठिकाणच्या देवराईत जुन्या विहिरी व कुंड आहेत.त्यामध्ये उन्हाळयाची भरपूर पाणी असते. अनेक ठिकानच्या देवराईत, प्राणी पक्षी व वनस्पतीची विविधता आढळून येते.उदा गारबीचा वेल, हेदू, काकड, आजण, अंबाडा, ओबळवेल, वाघाटी, कळलावी, कुसुम, सारखी दुर्मिळ वृक्षवेली बरोबरच प्राणी पक्षी मोठ्या संख्येने आढळून येतात.यामध्ये माडगरुड, भेकर, पिसोरी, ससे, कोल्हे, सांबर, भेकर,रानडुक्कर, शेकरू,उदमांजर,सांबर,माकड,या प्राण्यांबरोबरच, इंडियन रोलर पक्षी, सूर्य पक्षी, बुलबुल, कुकू, धनेश, घुबडे, तांबट, कोतवाल, पोपट यासारखे पक्षी, आणि वेगवेगळे साप, सरडे, पाली, सरडे, देवगांडूळ खेकडे, बेडक, सापसूरळया, मुग्या किडे, विविध प्रकारचे क्रमि कीटक अनेक जातीचे फुलपाखरं, माशा आढळून येतात.

**देवराईचे अभ्यासक**

आपल्या देशात आणि महाराष्ट्रामध्ये देवराईचा अभ्यास करणारे अनेक तज्ञ आहेत.पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयातील प्रा डॉ धर्मानंद कोसंबी ,यांनी देवराईचा पुरातत्वशास्त्र,मानवशास्त्र,भारतविद्याशास्त्र,या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.याबरोबरच डॉक्टर वा.द वर्तक, डॉ माधव गाडगीळ, कैलास मल्होत्रा,मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू संजय देशमुख,डॉ मधुकर बाचुळकर, गोव्यातील प्रसिद्ध पर्यावरण तज्ञ,प्रा राजेंद्र केरकर,सी पी आर चेन्नई,यांनी देवराईचा अतिशय बारकाव्यानिशी अभ्यास केलेला आढळून येतो.त्यांच्यासारखेच असे कितीतरी लोक देवराईचा अभ्यास करत असताना आढळून येतात.

**महाराष्ट्रातील देवराया**

महाराष्ट्रात देवराईला देवरहाटी,राय,राई,या नावाने ओळखतात.अभ्यासकांच्या मतानुसार महाराष्ट्रात तीन हजारपेक्षा अधिक देवराई आहेत.या देवराया साधारणपणे काळुबाई,रांनजाई, भैरोबा,विझाई, म्हसोबा,सोंनजाई, अंबेश्वर,व विविध स्थानिक नावाने ओळखल्या जातात.काही ठिकाणी देवराई परिसरात आदिवासींच्या वस्त्या आहेत.महाराष्ट्रामध्ये पुणे जिल्ह्यातील मावळ,आंबेगाव, मुळशी.नागपूर जिल्ह्यतील रामटेक, कोल्हापूर जिल्ह्यातील माळुंगा,चंदगड, इब्राहिमपूर.सिंधुदुर्ग जिल्ह्यतील हेवाळे, परमे, शिरवल, तेरवनमेढे, मोचेमाड जवळ कडोबा,कोचऱ्याजवळ डोगोबाय.ठाणे जिल्ह्यातील जव्हार,या ठिकाणच्या देवराया प्रसिद्ध आहेत.काही ठिकानच्या देवराया भीतीपोटी राखलेल्या आहेत.या ठिकाणी भूत असते,देव असतो ,वाघ साप घरापर्यत येतात ही भीती असते.म्हणून या देवराया जगलेल्या आहेत.काही देवरायामध्ये समशानभूमी असल्याने तेथील लाकूड कोणी तोडत नाही.

**कोकणातील देवराई**

देवराईच्या बाबतीत कोकण खूप समृद्ध आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक देवराया कोकणात आढळून येतात.काही तज्ञानी कोकणात किमान 2500 देवराया आहेत असे म्हटले आहे.पण ही संख्या त्यापेक्षाही खूप मोठी असावी.कारण कोकणात प्रत्येक गावात किमान एक तरी देवराई पाहायला मिळते.या परिसरात देवळाच्या सभोवताली देवराया आहेत.कोकणातील रत्नागिरी सिंधुदुर्ग हे जिल्हे देवराईच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध असलेले आढळून येतात.देवराईच्या अभ्यासकांनी केलेल्या नोंदीपैकी 1600 देवराया फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात आढळून येतात.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रत्येक गावात किमान एक दोन देवराया आहेत.तर काही ठिकाणी अनेक देवराया आढळून येतात.या देवराईतील वृक्ष हजरो वर्षापासूनचे असल्याचे जाणवते.दोडामार्ग तालुक्यातील कुडासे येथील वृक्ष इतर राज्यात सर्वाधिक मोठा आणि जुना आहे असे तज्ञ सांगतात.हिवाळे गावात सीतेची देवराई प्रसिद्ध आहे.याबरोबरच परमे, भेडसी,ऊसप,तेरवननेढे,कसई,शिरवल,या गावातील देवराया,पुरातन व समृद्ध आहेत.

**देवराई संदर्भात प्रथा परंपरा**

काही गावातील देवराई संदर्भातील अनेक प्रथा परंपरा आहेत.झाडांचे फूल फळ खाली पडल्याशिवाय त्याला हात लाऊ नये.देवराईतील वृक्ष तोडायला,गुर चरायला पूर्ण बंदी असते.काही देवराई परिसरात तर चप्पल बूट घालून जाण्यास बंदी असते.अनेक ठिकाणी या परंपरा आजही पाळल्या जातात.काही ठिकाणी तर देवराईत गुर चरायला सुद्धा सोडत नाहीत.त्यामुळे देवराईतील विविधता टिकून राहिलेली आढळून येते.यामुळे तेथील मातीची सुपीकता टिकून आहे.भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली आहे.कुंडे, मारलेश्वर, आजगाव,कुळे,मासरंग,विगरवली,काटवली,कुरघुडा,बाशी या ठिकाणच्या देवराईत जुन्या विहिरी व कुंड आहेत.त्यामध्ये उन्हाळयाची भरपूर पाणी असते. अनेक ठिकानच्या देवराईत, प्राणी पक्षी व वनस्पतीची विविधता आढळून येते.उदा गारबीचा वेल,हेदू,काकड,आजण,अंबाडा,ओबळवेल,वाघाटी,कळलावी,कुसुम,सारखी दुर्मिळ वृक्षवेली बरोबरच प्राणी पक्षी मोठ्या संख्येने आढळून येतात.यामध्ये माडगरुड, भेकर,पिसोरी, ससे,कोल्हे, सांबर, भेकर,रानडुक्कर, शेकरू,उदमांजर,सांबर,माकड,या प्राण्यांबरोबरच, इंडियन रोलर पक्षी,सूर्य पक्षी, बुलबुल, कुकू, धनेश, घुबडे,तांबट, कोतवाल,पोपट यासारखे पक्षी, आणि वेगवेगळे साप, सरडे,पाली, सरडे,देवगांडूळ खेकडे,बेडक,सापसूरळया, मुग्या किडे,विविध प्रकारचे क्रमि कीटक अनेक जातीचे फुलपाखरं,माशा आढळून येतात.

**देवराईचे पर्यावरणीय महत्त्व**

देवराई या देवाच्या नावाने राखून ठेवलेल्या असल्याने अशा ठिकाणी असणारी वृक्ष,त्यांच्या फांद्या कोणी तोडत नाहीत.या ठिकाच्या प्राणी पक्ष्यांची शिकार करीत नाहीत.त्यामुळे या ठिकाणी विविध वृक्ष वेलीच्या जातींची संख्या वाढत असते.हे वृक्ष कित्येक वर्षे जगतात.उंच आणि अवाढव्य वाढतात.अशा ठिकाणी वर्षभर पाणी असते.गावातील गुरांना या ठिकाणी उन्हाळयात ही सावली मिळते.वेगवेगळी फळं,औषध,मध, मेन,डिंक, साल,रानभाज्या याठिकाणी उपलब्ध होतात.मुलांना खेळण्यासाठी,कार्यक्रम करण्यासाठी ही जागा उपलब्ध होते.अनेक ठिकाणच्या देवरायांमध्ये लहान-मोठ्या शालेय,कौटूबीक सहली,व वनभोजनाचे आयोजन केले जाते.वनस्पती शास्त्रज्ञ,व विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे महत्त्वाचे ठिकाण ठरते.अशा विविध पर्यावरणीय महत्त्वामुळे, जगभरातील देवराया टीकाव्यात त्याचे रक्षण व्हावे, म्हणून त्यांचा समावेश जगातील वारसा स्थळात करण्यात येत आहे.भारतातील हिमालयीन प्रदेश व महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगाचा यात समावेश केला आहे.या ठिकाणाला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केल्याने या वनांचे संरक्षण व जतन होन्यास मदत होणार आहे .हे मानवी जीवनासाठी अत्यंत महत्वाचे आहे.

दोडामार्ग तालुक्यातील मायरेस्टीकाची देवराई

दोडामार्ग तालुक्यातील हेवाळे बांबर्डे ही सह्याद्री पर्वताच्या पायथ्याशी कर्नाटक आणि गोव्याच्या सीमेजवळ असलेली,दुर्गम भागातील छोटीशी पण टुमदार गाव.येथे अनेक वेळा जाण्याचा योग आला.गावच्या आसपास असलेले जंगलं, डोंगर, तिलारी धरण, आणि प्रसिद्ध असलेली सीतेची देवराई हे सगळं पाहीलं होतं.तरी माझ्या कॉलेजमधली कु अंकिता ठाकूर ही विद्यार्थिनी सांगायची.सर आमच्या शेतातील जंगल वेगळ आहे.तुम्ही एकदा बघा. तिने एकदा त्या जंगलाचे त्याचे फोटो काढून आणले, ते पाहून मात्र आम्ही जायचे ठरवले. मग काही विध्यार्थीही तयार झाले.पण या परिसरात हत्ती आणि इतर हिंस्र प्राण्यांचा वावर असंल्याने कॉलेजची परवानगी आणि.विध्यार्थ्यांच्या पालकांचे हमीपत्र घेतले.आंकिताचे वडील रमेश ठाकूर,आणि या जंगलाची चांगली जाण असणारे नारायण देसाई यांनाही थांबायला सांगितलं.या बरोबरच मल्हार इंदुलकर या तरुनालाही आमच्या सोबत यायची विनंती केली.हा तरुण चिपळूणचा.पण गेले चार पाच वर्षापासून दोडामार्ग तालुक्यातील पाणमांजर आणि इतर प्राण्यांचा अभ्यास करताना त्यांनी हा परिसर अक्षरशः पिंजून काढला होता.प्राण्याबरोबरच त्यांचा वनस्पतीचाही अभ्यास मोठा असल्याने त्यालाही सोबत घेतलं.आणि मायरिस्टिकाच्या सफरीवर निघालो. तेरवण मेढे परिसरातील जंगल,आणि पाणवठयाची माहिती घेऊन मायरीस्टीकाच्या जंगलाकडे निघालो.पण जायला नीट रस्ता नाही.बाईक घेऊन जायचे झाले तरी जंगलातील पाउलवाटा आणि डोंगराचे चडउतार पार करणे सोपे नव्हते.कसरत करून कसेबसे ठिकाणावर पोचलो.तर रमेश ठाकूर पुढे येऊन,दोनच दिवसांपूर्वी दारापर्यंत आलेल्या हत्तीच्या आठवणी सांगून त्याच्या पायाचे निशाण दाखवू लागले.ते सर्व पाहून अंगावर काटाच उभारला. थोड्या वेळाने जंगलाकडे निघालो तर नारायण देसाई म्हणाले बूट चपला इथेच ठेवा.तिथे चिखल आणि पाणी आहे.त्यांच्या सूचनेनुसार आम्ही चपला काढून ठेवल्या.एकदाचे जंगलात आलो आणि ते पाहून अचंबित झालो.इतके आजब आणि अफलातून वृक्ष कधी पाहिले नव्हते.मग नारायण देसाई आणि मल्हार इंदूरकर जंगलाची माहिती सागू लागले.

पश्चिम घाटाच्या पायथ्याशी तिलारीच्या खोऱ्यातील प्रदेश पूर्वीपासूनच जैवविविधतेने समृद्ध आहे.या ठिकानी वनस्पती प्रमाणेच प्राणी पक्ष्यांची रेलचेल होती.या खोऱ्यात इंग्रजीतल्या उलट्या यू आकाराची मूळी असलेल्या वनस्पती आहेत.तेच या जंगलाचे वैशिष्ट्ये आहे.साधारणपणे दहा ते बार एकर जागेवर ,जायफळाच्या प्रजाती गटात मोडणारी ही वृक्ष वाढली आहेत.याला गोड्या पाण्याची दलदल परिसंस्था म्हणतात.असे जंगल महाराष्ट्रात कुठेच नाही.राज्यतील हे एकमेव जंगल आहे.दोडामार्ग तालुक्यातील बाबर्डेसह गोव्यातील ब्रह्मकरमळी आणि निरंकाराची राई माळावली, बरोबरच केरळ आणि कर्नाटकातील काही ठिकाणी हे जंगल आहे .या वनस्पती भूजल पातळी टिकून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात.हे वृक्ष इतर वृक्षाच्या तुलनेत अधिक प्रमाणात कार्बन ग्रहण करतात.आणि मोठ्या प्रमाणात प्राणवायू उत्सर्जित करतात.ग्रेट हॉर्नबिल सारख्या पक्ष्यांच्या प्रजाती अन्नासाठी अशाच जंगलात वास्तव्य करतात.बिरीष्टिका सफायर आणि मिरीष्टिका बांबूटेल या प्राण्यांच्या प्रजाती याच जंगलातून आढळून येतात.या जंगलाचे वय साधारणपणे 140 दशलक्ष वर्षे असते.म्हणजेच पृथ्वीतलावर आदिमानवाचे आगमन होण्यापूर्वीपासून या जंगलाचे अस्तित्व आहे.या जंगलात सकाळ

संध्याकाळी धनेश पक्षी वास्तव्यास असतो.फक्त पश्चिम घाटातच आसणारी मलबार टीन ही फुलपाखरे या ठिकाणी आढळतात.

या परिसरातील वनस्पती प्राणी पक्षाची माहिती असनारे नारायण देसाई सांगू लागले.आमच्या पूर्वीच्या पिढ्यानि हे जंगल राखून ठेवले.त्यांचे जतन केले.त्यात वाढ केली.तेच काम आम्ही पुढे करतोय.यां वृक्षाच्या बिया एकत्र करून आम्ही आसपासच्या प्रदेशात लागवड करतोय .हुल्लडबाज आणि पार्ट्या करूण जंगल नष्ट करणार्या तथाकथित दिखाऊपणा लोकाना जंगलात प्रवेश देत नाही.आता यापुढे या जंगलात येणाऱ्या व्यक्तीसाठी नियमावली करणार असून,प्रत्येकी शंभर रुपये प्रवेश शुल्क आकारण्याचा विचार आहे.आम्ही गावकरी सुद्धा वर्षातून फक्त होळीच्या सणालाच वृक्ष तोडतो.बाकी वर्षभर कोणीही या वृक्षाला हात लावत नाही.म्हणून हे जंगल शिल्लक आहे या जंगलास आम्ही कातळाची राई म्हणतो.या राईत आमचे देवता असून दर अमावस्या-पौर्णिमेला त्याची पूजा करतो.म्हणून त्यांनी या वृक्षाच्या बिया दाखवल्या आणि पुढे सागू लागले.आम्ही या जंगलाकडे पारंपारिक आणि धार्मिक दृष्टीकोनातून पहात होतो.तिल्लारी खोरे आणि सह्याद्रीच्या डोगर रागांतील जगल नष्ट झाले तरी आम्ही या जंगलास जीवापाड जपले होते.लोकाना हात लाऊ दिला नव्हता. आत मल्हार इंदूरकर गोव्यातील पर्यावरण अभ्यासक राजेंद्र केरकर, वनखाते, सेंचुरी नेचर फाऊंडेशन यांनी या जंगलाचा अभ्यास करून त्याच्या संवर्धनासाठी आम्हा गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.त्याची महती जगभर केली.या जंगला बरोबरच आमचे गाव आणि आम्हीहि जगभरात पोचलो त्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे. हे जंगल अत्यंत दुर्मिळ असून महाराष्ट्रामध्ये कुठेच नाही.म्हणून त्याचे जैविक पर्यावरणीय व ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन स्वता मल्हार इंदूरकर व गायत्री श्रीधरण या अभ्यासकांनी 2018 साली दुर्मिळ वनस्पतिच्या प्रजाती म्हणून जैवविधता कायद्याअंतर्गत याची नोंदनी केली होती.त्याची दखल घेऊन आययुसीएन या आंतरराष्ट्रीय संस्थेने जगातील दुर्मिळ वृक्ष्यांच्या यादीत या वनस्पतींला स्थान दिले असून.त्यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे.तर महाराष्ट्र सरकारनेही लगेचच 28 जानेवारी 2019 रोजी तशी अधिसूचना काढून या जंगलाचे महत्त्व अधोरेखित केले.आणि पर्यावरण अभ्यासकाना खूप मोठा आंनद झाला. खरे तर दोडामार्गला परिसराला तील्लारी धरणामुळे ओळख निर्माण झाली होती.त्यानंतर येथे २००२ सालापासून दांडेलीच्या अभयारण्यातून रानटी हत्तीचे आगमन झाले.याच दरम्यान येथे पटेरी वाघाचा बछडा सापडला.त्यामुळे हा प्रदेश देशाच्या नकाशावर आला होता.आता मायरिस्टीका जंगलामुळे हे ठिकाण जगभरात पोहोचले आहे.त्यामुळे अनेक पर्यावरण प्रेमी,अभ्यासक पत्रकार,याची पावलं आपोआप इकडे वळत आहेत.आज या परिसरात पक्षी,प्राणी,पान माजर,बेडूक,फुलपाखर,माती, पाणी.खडकाचे प्रकार याचा आभ्यास करणारे अनेक अभ्यासक इथे ठाण मांडून आहेत.त्यामुळे इथे कायमच माणसाचा वावर पहायला मिळत आहे.काही ठिकाणी सीसीटीव्ही कैमेरे बसवले असून त्यात अनेक दुर्मिळ व मौलिक प्राणी पक्षाच्या आती आढळून येत आहेत.हे सर्व निसर्ग वैभव जतन करणे अत्यंत गरजेचे आहे

.देवराईच्या र्हासाची कारणे

पूर्वीचे लोक साधे आणि देवभोळे होते.त्यांनी भीतीपोटी का असेना पण जगलाचे जतन-संवर्धन केले होते.आता मानव प्रगत झालाय.तो देवालाच भीती घालू लागलाय. काही ठिकाणी तर देवाच्या मूर्तीची चोरी झाल्याचे आपण पहातो ऐकतो.आता देवाची भीती संपलिय. मानव व्यवहारी झालाय.देवराया तोडून त्या ठिकाणी शेती केली जातेय,घरं बांधली जातात,वस्त्या वसवल्या जातात, रस्ते लोहमार्ग उद्योगधंदे उभारले जातात.विकास प्रकल्पाच्या नावाखाली देवराया नष्ट केल्या जात आहेत.

**देवराईचे जतन व संवर्धन**

देवराया मानवी जीवनासाठी तर महत्त्वाच्या आहेतच.पण प्राणी-पक्षी व वेगवेगळे जीवजंतू आणि पर्यावरण संतुलित ठेवण्यासाठी त्यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष उपयोग होत असतो.देवराया मानवाला शुद्ध हवा देतात. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवतात.गुरांना चारा, मानवाला लाकूड, मध, मेंन, डिंक, औषध, उपलब्ध होते. जमिनीची सुपीकता वाढते.गावाच्या सौंदर्यात भर पडते. म्हणूनच तर देवराया निर्माण करण्यात आल्या होत्या.पण मानव प्रगत झाला,विज्ञान युगात आला.कारखानदारी वाढली.भौतिक विकास झाला आणि देवरायांचे अस्तित्व नष्ट होत आले.पण भावी पिढीच्या उज्वल भवितव्यासाठी देवरायांची अस्तित्व महत्त्वाचे आहे. म्हणूनच गावाने देवरायाचे जतन केले पाहिजे.देवराया जगल्या

पाहिजे,त्यांचे संवर्धन झाले पाहिजे ,त्यांचा सर्वांगीण दृष्टिकोनातून अभ्यास झाला पाहिजे, असे जगभरातील अभ्यासकांना वाटते.

**अभ्यासाचा समाजाला फायदा**

कोकणामध्ये देवराई हा एक महत्त्वाचा आरण्य प्रकार असून,कोकणातील समाजाने पिढ्यानुपिढ्या तो जतन करून ठेवला आहे.या जगला मध्ये भूत पिशाच्च आहे.आशी भीती घालून जंगलाचे रक्षन करण्यात आले आहे .परंतु मागील काही दशकापासून त्यामध्ये घट होताना आढळून येते.यायेथे जगली प्राणी पक्षाची भरमार होती.औशधी वनस्पतीची रेलचेल होती.गावातील गुरासाठीचे हे एक महत्वाचे ठिकाण होते.परतू हे जंगल नष्ट होत असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हे जंगल सुरक्षित रहावे, त्याचे संवर्धन करण्यात यावे ,या उद्देशाने,हा विषय निवडण्यात आलेला आहे.या जंगलाचे रक्षण झाल्यास.गावातीलगुरांना पशुपक्ष्यांना माणसांना आश्रय मिळेल औषधी वनस्पतीचे रक्षण होऊ शकेल.

**भविष्यातील संधी**

या जंगलाचे रक्षण झाल्यानंतर किंवा केल्यानंतर भविष्यातील गावकऱ्यांना त्याचे अनेक लाभ होऊ शकतात .मागील अनेक दशकापासून अशा जंगलांमधून औषधी देण्याची परंपरा प्रथा होती .याचबरोबर या ठिकाणी गुरव प्राणी-पक्षी यांचे आश्रयस्थान होते. याचबरोबर जंगली प्राणी पक्षी यांच्या अधिवास होते.जैवविविधतेने हे भाग समृद्ध होते. परंतु मागील काही दशकापासून हे नष्ट होत असल्याकारणाने याचे संवर्धन जतन होणे गरजेचे आहे. याच्या संवर्धनामुळे गावाला ,गावच्या विकासाला त्याचे निश्चितच लाभ होणार आहेत.

## Reference

1. बाचुळकर मधुकर-औषधी रानभाज्या-निसर्ग मित्र कोल्हापूर-२०१५
2. बंध्योपाध्याय विभूतिभूषण-आरण्यक –साहित्य अकादमी दिल्ली -2018
3. केरकर राजेंद्र- विविधतेने नटलेला गोवा- राजभाषा संचनालय गोवा- २०१६
4. चितमपल्ली मारुती-जंगलाचे देणे-साहित्य प्रसाद केंद्र नागपूर-२०१६
5. चितमपल्ली मारुती-चैत्रपालवी -साहित्य प्रसाद केंद्र नागपूर-२०१६
6. चितमपल्ली मारुती-जंगलाची दुनिया-साहित्य प्रसाद केंद्र नागपूर-२०१२
7. सोवनी रा वी-आपले पर्यावरण-नशनल बुक ट्रस्ट,इंडिया-1999
8. मुलाटे वासुदेव-विष व्रुक्षाच्या मुळया-स्वरूप प्रकाशन औरंगाबाद-2003
9. लट्टू सी एस-वनस्पती जगातून सहल-मनोविकास प्रकाशन-2010
10. Gathade P D (Editor)-Western Ghats -The World Heritage-college of Arts- Commerce and Science Dodamarg- 2015
11. Ingalhalikarshrikant-Flowers of Sahyadri-corolla publications pune-2012
12. Ingalhalikarshrikant-Flowers of Sahyadri- corolla publications pune-2014
13. Butala&parmar-Environmental Studies -Shet publications Mubai-2012

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शोषित वर्गाचे चित्रण

*प्रा. जगदीश पांडुरंग राणे*

*सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट*

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे समाजाचे वास्तव दर्शन करणारे साहित्य आहे. त्यांचे साहित्य हे समाजाचे फक्त वास्तव दर्शनच करत नाही तर त्यांच्या साहित्यात परिवर्तन वाद दिसून येतो. त्यांच्या लेखनाचा एकूण आवाकाच खूप विस्तृत आहे. कथा, कादंबरी, प्रवासवर्णन, नाटक, कविता या सर्व प्रकारच्या साहित्य प्रकारात त्यांचे विपुल आणि व्यापक लेखन आहे. त्यांचे लेखन समाज उपयोगी आहे. त्यांच्या लेखनातून मानव मुक्तीचा संदेश मिळतो. समाजातील दांभिकतेवर त्यांनी आसूड ओढलेले दिसतात आणि त्यामुळेच अण्णाभाऊंचे साहित्य स्वानुभवाच्या रूपात आपल्यासमोर येते.अण्णाभाऊं साहित्याला फक्त मनोरंजन किंवा मौजमजेचे साधन म्हणून पाहत नाहीत किंवा मानत नाहीत तर साहित्य हे समाजाच्या परिवर्तनाचा, प्रबोधनाचा, मानवाच्या उद्धाराचा भाग झाला पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. प्राकृतिक सौंदर्यापेक्षा, वर्णनापेक्षा प्राण्याचे उपाशीपोटीच्या समस्या त्यांच्या साहित्यात सापडतात. त्याच बरोबर त्यांच्या साहित्यात मानवीमूल्य प्रस्थापित करणारे नैतिक व लढाऊ आहेत. प्रत्येक ठिकाणच्या शोषणाच्या विरोधात त्यांचे साहित्य उभे राहते किंवा शोषणाला विरोध करते आणि त्यामुळेच त्यांचे साहित्य वंचित समाज मानवाच्या जीवनाला प्रेरणा देते. साहित्याच्या समीक्षेत अण्णाभाऊंच्या लेखनाच्या गौरवासाठी असं म्हणतात की, 'उत्तर भारतातील समाज कलण्यासाठी गोदान वाचा आणि महाराष्ट्राचा समाज समजण्यासाठी अण्णा भाऊंच्या साहित्यात शिवाय पर्याय नाही' यावरून त्यांच्या साहित्यातील समाज दर्शनाचे वास्तवाची ताकद लक्षात येते.

अण्णाभाऊंच्या साहित्याचा पायाच मुळी वर्ग संघर्श, जाती संघर्ष यांची तत्व अनुसरनारे मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आधारित आहे. मजूर आंदोलन, शाहीर, शाहिरी परिवर्तनात्मक गाणी, साहित्य, कथा, नाटक, तमाशा, लोकनाट्य यांच्या आधाराने महाराष्ट्रात प्रबोधनाचा जागर निर्माण करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आंदोलन लिखाणाच्या आधाराने उभे राहते. विज्ञानाचा आधार नसलेल्या ब्राह्मणी चापलुसी देव, धर्म, धर्मग्रंथ, भूत-पिशाच्च व मानवी रूढी-परंपरा, पाप-पुण्य, मोक्ष, स्वर्ग, नरक या सगळ्याचा विरोध करतात. अण्णाभाऊंचा पोवाडा तर प्रबोधनाचे सहज साधन आहे. अमळनेरचे अमर हुतात्मे या पोवाड्यात अन्याय अत्याचाराच्या विरोधात बंड करणाऱ्या एका क्रांतिकारकाची गोष्ट आहे.

या हुतात्म्यांना स्मरून ।आज आम्ही घेतली आना ।।
अविश्रांत झुंजझुंजून । सर्व शक्ती पणाला लावून ।।
देशात चारी बाजूने । न्यायासाठी पेटवू रान ।।
स्वातंत्र्य युद्ध जिंकून । मग न्याय मिळवून संपूर्ण ।।

अण्णाभाऊंचे लेखन सामाजिक अन्याय अत्याचाराला आव्हान देते. त्यांचे पोवाडे शोषितांच्या संपूर्ण ज्ञानाची भूमिका बजावतात. त्यांचे अनेक पोवाडे जनजागृती आणि समाजपरिवर्तन यांचे उत्तम उदाहरण आहे. उदाहरणार्थ बंगालची हाल, एकजुटीचा नेता, शिवारी चला, माझी मैना गावावर राहिली, जग बदल घालुनी घाव अशी अनेक क्रांतीगीते मानवाला अन्यायाविरुद्ध पेटून उठवण्याचे काम करतात.

बरबाद्या कंजारी या कथासंग्रहात पोटाच्या भुकेचा प्रश्न उपस्थित केला आहे. पोटाचा प्रश्न किती ज्वलंत आहे हे यातून सिद्ध होते. या भूकेसाठी माणूस जीव हातावर घेऊन फिरत असतो. अन्न हे प्राथमिक गरज आहे. ते मिळाले नाही तर तो कसा जगेल? यासाठी जीवनाच्या या जुगारीपणात माणसाला खूप ठसेठोमसे सहन करावे लागतात. तरीही भूक हा माणसाचा सर्वात ज्वलंत प्रश्न उभा राहतोच. या भुकेपोटी स्मशानातील सोने या कथेतील नायक बेबस आहे. प्रेताच्या तोंडातील सोने काढून तो आपले जीवन जगत असतो. दगडाच्या खाणीत काम करून आपली रोजीरोटीचा प्रश्न मिटू शकत नाही. लांडगे प्रेताचे मांस खायला येतात. तेव्हा त्यांच्याबरोबर संघर्ष पण करावा लागतो. अशा लढाईत आपली हाताची बोटंपण त्याला गमवावी लागतात. दुसऱ्या दिवशी त्याला दगडफोडीच्या कामावर जावं लागतं. परंतु डोंगरातले दगड फोडण्यासाठी त्याच्याकडे त्याची बोटं नाहीत. पोटासाठी करावा लागणारा संघर्ष अंगावर शहारे आणणारा आहेत.

अण्णाभाऊंचे साहित्य जुन्या काळातले असले तरी ते आजच्या काळातही जसेच्या तसे लागू पडते. त्यांच्या त्या काळात साहित्यातून उपस्थित केलेले प्रश्न त्याची उत्तरे आजही आपण शोधत आहोत. त्यांची प्रत्येक कलाकृती शोध प्रक्रियेतून जाते. जर आपल्याला कोणी विचारलं की आपण जिवंत का आहोत? हाच प्रश्न त्यांच्या लेखनाला पण लागू पडतो की आपण का लिहिताय? प्रत्येक लेखन एक आव्हान निर्माण करते. वाटेगाव ते मुंबई पर्यंतचा प्रवास हा सुद्धा एक जीवनातील शोषण व्यवस्थेचाच भाग आहे.

त्यांच्या कथा साहित्यात यातनांचा भडीमार आहे.' मी जे जीवन जगतो आहे, पाहतो आहे, अनुभवतो आहे, तेच लिहितो आहे. मला कल्पनेचे पंख लावून विहार करायचा नाय करायचा नाही. याबाबतीत मी स्वतः बेडूक समजतो. आपली माणसं नेहमी आपला कुठे ना कुठे भेटत राहतात. मला त्यांचा जन्म आणि मृत्यू माहित आहे. माझ्या देशातल्या जनतेच्या संघर्ष यावर विश्वास आहे. मी या देशाचे सुख, समृद्ध आणि सभ्यतेचे स्वप्न रोज पाहतो. आणि ते मंगल स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी लिहितो. समता स्वातंत्र्य आणि बंधुता यांच्या आधारावर सर्वांना एकत्र राहण्याच्या लायक अन्याय-अत्याचार मुक्त जग निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न आहे. त्यात कपट आणि छळ कुठेही नसेल. आत्मसन्मान आणि ऊर्जा निर्माण करून दुसऱ्यांना प्रेरणा देणारे साहित्य अण्णाभाऊंच्या कथेची ताकत आहे. आपल्या पूर्ण क्षमतेने सामाजिक जीवनाची बॅटरी चार्ज करून, चारी दिशांना असलेली अराजकता संपवण्याची ते शपथ घेतात. अण्णाभाऊंचे साहित्य माणसाला गुलाम बनवण्याच्या सर्व शक्तीच्या विरोधातले आहे. आपल्याकडे समाजाची मानसिकता समजण्याची मोठी ताकद आहे तीच ताकद समाज परिवर्तन करू शकते. दुष्ट प्रवृत्ती देश आणि समाजासाठी फार हानिकारक आहेत. अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातून पारंपारिक लोकांचे अनुकरण करण्यापेक्षा शोषित माणसांची वेदना जाणून घेऊन ही व्यक्त केली. त्यांच्या रचनेत मानवीमुक्तीची मूल्ये सापडतात. साहित्य आणि समाजावर भांडवलशाहीचा प्रभाव मोठा पडतो आणि त्यामुळेच भांडवलशाहीची मक्तेदारी चालू आहे. निरुपयोगी रूढी-परंपरांना पासून मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ करतात. अण्णाभाऊंचे साहित्य शोषित पीडित समाजाचे वास्तव्य दर्शन करतात . जमीनदार भांडवलशाही आणि सामंतवादाचे बळी आहेत.

कोंबडीचोर या कथेत नायक रामू आपली अवस्था सांगतो आणि त्यातून शोषित पीडित समाजाची दशा यातून अधोरेखित होते. 'माझं कोठे घर नाही जमीन नाही अन्न पुढे आणि मी त्याच्या मागे धावतोय. मी चोरी करू नाहीतर काय करू. आपलं सरकार चोरीच्या गुन्ह्यात चोराला पकडुन तुरुंगात पाठवतात आणि सोडून देतात. पण चोरी करण्यामागच्या कारणाचा विचार करत नाहीत.' यावरून या पिढीत समाजसोईच्या अभावाचे कारण आहे. चोरी सारखा गुन्हा फक्त पोटाची खळगी भरण्यासाठी केली जाते. जिवंत राहण्यासाठी दुसरा कुठला पर्याय नाही म्हणूनच. मराठी साहित्यात समाज उपयोगा पेक्षा भावना भडकवणारी साहित्य अधिक प्रसिद्ध आहे. असले तकलादू साहित्य पीडित समाजाला न्याय देण्यापेक्षा त्यांच्या शोषणाचे समर्थन करणारे दिसते. नक्षलवाद का निर्माण झाला याच्या मुळात अण्णाभाऊ जातात. कल्पनेच्या जगात जगायला अण्णाभाऊंना कधीही आवडत नाही. फ्रेंच आणि रशियाची राज्यक्रांती त्याची छबी भारतीय साम्यवादात दिसते असे अण्णाभाऊ म्हणतात.

अण्णा भाऊंच्या साहित्यातील अधिक तर पात्रे मॅक्झिम गॉर्की च्या आई कादंबरीतील पात्राशी मिळतीजुळती आहेत. गोर्कीची आई कादंबरी भारतीय शोषित समाजाचे प्रतिनिधित्व करते. साधनसामग्री आणि अधिकार यांची विषमता क्रांतीची सुरुवात करतात. मरणापूर्वी देशात साम्यवाद समाज समानता पाहण्याची इच्छा व्यक्त करतात. शोषणाचा अंत दयेवरवर होत नाही, त्याचा संघर्ष हाच एक पर्याय असतो. तोच परिणाम अण्णाभाऊ फकीरा या कादंबरीच्या आधारे स्पष्ट करतात. मृत्यूशी दोन हात करणारा फकिरा दुसऱ्यांना प्रेरणा देतो. या कादंबरीबाबत शरणकुमार निंबाळे म्हणतात, की सर्वसामान्य माणसाला भावणारे त्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात दाखवून देणारे प्रत्ययकारी लेखन अण्णाभाऊंनी केले आहे. सामान्य माणसाच्या जीवनातील उत्तुंग साहस व्यक्त करणे हे अण्णाभाऊंच्या लेखनाचे यश आहे. म्हणूनच अण्णाभाऊ साठे यांची फकीरा ही कादंबरी वाचकांना आवडची ठरली आहे.म्हणून अण्णा भाऊंचे साहित्य हे शोषितांच्या जीवनाचा आरसा आहे.

अण्णाभाऊंच्या साहित्याची विपुलता आणि विविधता आश्चर्यकारक आहे. त्यात ३५ कादंबऱ्या, १४ लोकनाट्य, १२ कथा संग्रह,3 नाटक, १ प्रवास वर्णन, काव्यसंग्रह, लावणी, गण यातून शोषित, पीडित वर्ग बोलतो आहे. त्यांच्या अनेक साहित्यकृतीचे भाषांतर जगातील २७ भाषांमध्ये झाले आहे. रशियन, फ्रेंच, जर्मन भाषेतील अण्णाभाऊंचे साहित्य वाचकांना प्रेरित करते, ७ कादंबऱ्यांवर चित्रपट बनवले आहेत. त्यातील ३ चित्रपटांना पुरस्कार मिळाले.१९६१ सालीचा महाराष्ट्र राज्याचा सर्वोत्कृष्ट कादंबरीचा सन्मान फकीरा कादंबरीला मिळाला. यावरून अण्णाभाऊंचे साहित्य हृदयाला भिडणारे आहे हे स्पष्ट होते.

शोषितांना शोषण मुक्त करण्याचे स्वातंत्र्य, माणूस म्हणून स्वाभिमानाने जगण्याचे आश्वासन देणारे साम्यवादी तत्त्वज्ञान त्यांच्या मनात खोलवर रुजल्यामुळे तो ठसा त्यांच्या साहित्यावर आणि सर्वाधिक स्वरूपात त्यांच्या लोकनाट्य उमटलेला दिसतो. त्यांचे साहित्य आत्मसन्मान आणि साम्यवाद यांचा समन्वय साधते. काल्पनिक नायका पेक्षा जन्मतः शोषित वर्गात उपजलेल्या माणसांना ते नायकत्व देतात. त्यामुळे त्यांचे नायक जनमाणसात रुजतात. शरीयात, रामायण-महाभारत यापेक्षा दास कॅपिटलचा आधार घेऊन साम्यवादी क्रांतीची सुरुवात करतात. समाजाच्या एकता आणि देशाच्या अखंडतेला धोका असणाऱ्या प्रवृत्ती अण्णाभाऊं खुडून टाकतात. अण्णाभाऊ आर्थिक, नैतिक, राजनैतिक, सामाजिक,

सांस्कृतिक न्यायाची मागणी करतात. त्याच्या साहित्य निर्मितीचा उद्देश व्यापारी, पैसे कमावणे हा नव्हता तर व्यवस्थेने लादलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हा आहे.

मुंबई शहराबाबत लिहिताना अण्णाभाऊं म्हणतात की मुंबईत अनेक मुंबई आहेत. एका बाजूला प्रचंड श्रीमंती तर एका बाजूला जीवघेणी गरिबी आहे. मुंबईचे खरे चित्र मुंबईच्या झोपडपट्टीत पाहायला मिळते. 'मुंबईत उंचावरी मलबार हिल, इंद्रपुरी, कुबेराची वस्ती, तिथे सुख भोवती, परलात राहणारे रामदीन रात्रं दिन राबणारे घाम गाळून पोट भरती. एका बाजूला एशो आराम तर दुसऱ्या बाजूला पोट भरण्यासाठी कष्टमय जीवन ही विषमता अण्णाभाऊंना मान्य नाही. मुंबईतील औद्योगिक क्षेत्रातील शोषणपण विचार करायला लावणारे आहे. येथे श्रीमंतांचे बंगले तर गरिबांच्या झोपड्या दिसतात. ते तेथे ना विज, ना पाणी, ना संडासाची सोय, साफसफाईची सोय, खूप सामान्य बकाल जीवन जगणारी माणसं दिसतात. मूठभर लोकांनी ही असमानता लादली आहे. मुलभूत गरजांना पारखी झालेली माणसं इथे दिसतात.

अण्णाभाऊंचे साहित्य हे मानवी मुक्तीचे साहित्य आहे. ऐषआरामी आणि खोटारडेपणाला येथे संस्कृती मानली जाते. जातीव्यवस्था समाजात बळकट झाल्या आहेत. अण्णाभाऊंचे साहित्य समाजाच्या उद्धारासाठी काम करते. त्यांच्या लेखनाचा उद्देश लाखो दलित, पीडित, अवहेलना सोसणारी दलालान पासून मुक्तीचा संकल्प करणारा आहे. मानवाच्या अस्मितेची लढाई ते आयुष्यभर लढले. वर्ण, वर्ग, संप्रदाय यांच्या बेड्या तोडून समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय यांच्या आधारावर समाजाचं नवनिर्माण करू पाहणारे आहे.

**संदर्भ**

१) भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे -बजरंग कोरडे
२) समग्र अण्णाभाऊ साठे -डॉ. अमर कांबळे
३) सर्वव्यापी अण्णा भाऊ - संपादक- डॉ. देविदास हारगीले.
४) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे.
५)अण्णा भाऊ साठे समाज विचार आणि साहित्य विवेचन- बाबुराव गुरव

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# हिंदी उपन्यासों में किन्नर विमर्श का सामाजिक यथार्थ

*डॉ. संतोष रघुनाथराव रायबोले*
*हिंदी विभागाध्यक्ष, कला एवं वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट,जि. सिंधुदुर्ग*

शोध परिचय :-

साहित्य समाज का आइना है। समाज के उपेक्षित वर्ग को साहित्यकार वाणी देना अपना कर्तव्य समझता है। समाज की आवाज ही साहित्य का मूल है। साहित्य जगत से लापता यों कहें कि बहिष्कृत वर्ग समूह अपनी वेदना की दस्तक से रचनाकार को लिखने के लिए बेचैन करता है। साहित्य जगत में स्त्री-विमर्श, दलित विमर्श, अल्पसंख्यक-विमर्श, आदिवासी विमर्श आदि की चर्चाएं जोरों शोरों से चल रही है पर समाज एवं परिवार से बहिष्कृत लिंग निरपेक्ष किन्नर समुदाय को लेकर साहित्य अधिक जागरूक नहीं दिखाई देना। महाभारत महाकाव्य में शिखंडी पात्र के रूप में उभरा है। बृहन्नला किन्नर के रूप में एक साल अज्ञातवास में अर्जुन ने बताया था। खासतौर पर राजा अपने अन्तपुर के नारियों, रक्षिताओ और रानियों की पहरेदारी और हुक्मउदाली की जिम्मेदारी इन्हे सौंपते थे।

हिंदी साहित्य में किन्नर विमर्श का आगाज नीरजा माधव का उपन्यास यमदीप (2002) से माना जा सकता है। साथहिं मनमीत पत्रिकाने 'किन्नर विशेषांक' निकाला जो किन्नरों की यथार्थता बयान करता है। 2000 के बाद किन्नरों की पीड़ा और वेदना कई विधाओं में ऊपरी है। 2010 में प्रकाशित महेंद्र भीष्मा का उपन्यास 'किन्नर कथा' एक सराहनीय प्रयास है। जिसमें उभयलिंगी, तृतीयलींग व्यक्ति की वेदना को बयां किया गया है। संसार स्त्री और पुरुषों दोनों लिंगो को ही मान्यता देता है और उसे ही सृष्टि का जनक बताता है। पर जो न स्त्री है ना पुरुष उसका क्या ? उसका दोष क्या? जैसे कई सवाल उपन्यास उपस्थित करता है। जिसे हिजड़ा, खुसरा, किन्नर, मौसी आदि घृणा युक्त संबोधन से उसके निरंतर अपमानित किया जाता है। लैंगिक विकलांगता अस्तित्व को नकार है। स्त्री और पुरुषों से अलग इनकी भाव-भंगिमा, रहन-सहन, आचार-व्यवहार, चाल-ढाल दिखाई देते है। वर्तमान में नीरजा माधव, महेंद्र भीष्म, प्रदीप सौरभ, चित्रा मुद्गल, अनुसुया त्यागी, निर्मला भुराडिया आदि का साहित्य किन्नरों की वाणी और वेदना, जीवन-शैली समस्या, पीडा, आक्रोश और संघर्ष का बखान करता है। जिसमें किन्नरों के लिए किन्नरों के लिए मानवीय बेहतर जिंदगी, अपने अधिकार, शिक्षा, रोजगार और इन्सानियत आदि चिंताओं पर विचार विमर्श किया गया है।

किसी परिवार में खुशी के अवसर पर बधाईयाँ गाकर अथवा आशीर्वाद देकर कुछ रुपए लेकर भी विदा हो जाते है अपने गुमनाम जगत में। अर्थांभाव में उन्हें भिक्षाटन ही इकलौता आधार है। भारत की सन 2011 की जनगणना के अनुसार पूरे भारत में लगभग 4.9 लक्ष किन्नर है जो मानवीय बिरादरी से बहिष्कृत है। 'यमदीप' उपन्यास में नीरजा माधव हशियकृत किन्नर समुदाय की सामाजिक तिरस्कार और अभिशप्त जीवन के अंतरंग मार्मिक प्रसंग को उठाती है। किन्नरों के उपेक्षित और अनछुए पहलुओं को उपन्यास उजागर करता है। वेश्यागिरी करना या धन कमाने के लिए मर्दों से संपर्क करना आदि। महताब का कहना है कि इस प्रकार के कार्य से यौन रोगों का खतरा अधिक होता है। वे नाजदीबी से कहते हैं "देखो नाज, चोरी-छिपे यहाँ जो धंधा चल रहा है उसका फल तो तुम देख रही हो। जुबैदा चल बसी और अब सोराबती की बारी है- अब चला जाय कि तब इसलिए हम सबको मना करते रहे कि जिस करम को करने के लिए अल्लाह ने हमें नहीं बनाया तो उसके साथ कोई जोर-जबरदस्ती मत करो।"१ उपयुक्त कथन किन्नर गुरु महताब की रोगग्रस्तता की अतियिन्ता का बयान करता है। अप्राकृतिक कर्म और वेश्यावृति की अपेक्षा ताली बजाकर कम आमदनी का समर्थन है।

'यमदिप' उपन्यास में किन्नरों के वात्सल्य और मानवता का चित्रण विशेष बनबैठा है। नाजबीबी किन्नर होते हुए भी सोना नामक अनाथ लडकी का माँ कि तरह लालन पालन करती है और उसका दाखिला भी पाठशाला में कराती है। सोना पाठशाला में जाती है तब नाजबीबी को अपना बाल्यकाल याद आता है। उसके जन्मते ही पिता फुट-फुटकर रोए थे। दादी ने सबका मुँह बन्द किया था और किन्नरो के डर से माँ को ननीहाल रातों-रात भेजा गया था ताकि किन्नर बच्चे के जन्म का पता किसी को न चले। नाजबीबी अपनी आपबीती कहती है "माँ तो फिर भी हिजडा बच्चे से बहुत स्नेह रखती है परंतु पिता का व्यवहार हमेशा उपेक्षा भरा और नकारात्मक रहता है।नाजबीबी अपने माता-पिता के साथ फोन पर सम्पर्क में रहती है। माता-पिता उससे मिलने उसके बस्ती में आते है। जो कि अन्य किसी हिजड़ों के साथ ऐसा नहीं होता। वह हिजड़े नाजबीबी के माता-पिता को देखकर अपने दुर्भाग्य को कोसते है। हिजड़ो के गुरु महताब के समझाने पर नाजबीबी के माता-पिता उससे केवल बातें करते ही जड़ हृदय से वापस लौटते है।२ यहां परिवार का घृणित रवैया स्पष्ट होता है। लोक लाज और बिरादरी में नाक कटने का डर अपनी संतान को अभिभावकों के होते हुए अनाथ और बहिष्कृत बना देता है।

सर्वोच्च न्यायालय के ऐतिहासिक फैसले के कारण सरकारी दस्तावेजों में महिला और पुरुष के साथ एक और कॉलम थर्ड जेंडर का भी शुरू किया गया है। समाज के इस तृतीय नकारे समुदाय को कुछ समाजसेवी संगठनों और समाजसेवकों

की निरंतर पैरवी के चलते शिक्षा और रोजगार में इनकी भागीदारी पर सुप्रीम कोर्ट ने मुहर लगाई, "सुप्रीम कोर्ट ने 15 अप्रैल 2014 को केंद्र और राज्य सरकारों को शिक्षा और नौकरी में किन्नरों अर्थात थर्ड जेंडर को वरीयता देने के निर्देश दिए है।"३ फिर भी किन्नरों की उपेक्षा और जलालत जस की तस बनी हुई है।

'मैं भी औरत हुँँ' उपन्यास की लेखिका डॉ. अनुसया त्यागी स्वयं स्त्रीरोग एवं प्रसूति विशेषज्ञ होने के नाते उसने शरीर विज्ञान और चिकित्सा संबंधी विवरण को प्रस्तुत किया है। उपन्यास दो किन्नर बहनों की कहानी है। जिनके अभिभावकों को लंबे समय तक बेटियों के किन्नर होने की कोई संभावना नहीं थी। पर सच्चाई का पता चलते ही दोनों बहनों का ऑपरेशन कर उन्हें स्त्री रूप दिया जाता है। बड़ी बेटी का ऑपरेशन पूर्ण सफल रहा परिणामत वह नारी भी बनी और माँ भी। छोटी बेटी के भीतर अनुपस्थित होने के कारण व सुखी दांपत्य जीवन तो जी पाई पर वह संतान को जन्म न दे सकी। ऑपरेशन सभी पर लागू नहीं हो सकता चिकित्सा-विज्ञान भी किसी किसी पर अन्याय ही करता है। बड़ी बहन माँ बने और छोटी को संतान नसीब ना हो यह भी विडंबना ही है।

'किन्नर कथा' (2011) महेंद्र भिष्म का उपन्यास झूठी खानदानी शान-मान मर्यादा की चपेट में अपने बच्चों के जल्लाद बने पिता की वहशीयत को बया करता है। राजघराने में जन्मे किन्नर सोना और चंदा के राज को माँ अपनी ममता के कारण काफी दिनों तक दबाए रखती है। पिता को जब पता चलता है कि हमारे घर में किन्नर पैदा हुआ है तो वह उसे मारने का आदेश देते है। पिता जगतराजसिंह के सामने माँ की एक नहीं चलती। संतान के मृत्यु का फरमान माँ की ममता और पीड़ा को उजागर करता है। "संतान कैसी भी हो, उसमें शारीरिक, मानसिक कमी क्यों न हो, माता-पिता को अपनी संतान पर हाल में भली लगती है। प्यारी होती है, फिर भले ही वह संतान हिजडा ही क्यों नही। फिर भी सामाजिक परिस्थितियों, खानदान की इज्जत-मर्यादा, झूठी-शान के सामने अपने हिजड़े बच्चे से उसके जन्मदाता हर हाल में छुटकारा पा लेना चाहते है। यह एक कटु सत्य है।"५ पिता चाहे राजा हो या रंक अथवा किसी भी देश, जाति और वर्ग का हो किन्नर का जन्म उसे असह्य वेदना का भाजक बनाता है। कभी वह उससे सम्बन्ध विच्छेद कर लेता है तो कभी उसकी हत्या करके स्वयं इज्जतदार मर्द बनने का स्वांग करता है।

'जिंदगी 50-50' 2017 भगवंत अनमोल का उपन्यास किन्नर जन्म के कारण परिवार को समाज से क्या-क्या झेलना पड़ता है। इसका यथार्थ अंकन उपन्यास के नायक अनमोल को भाई हर्षा के किन्नर होने का अपराधबोध हर समय झेलना पड़ता है। एक जहरीले दंश के समान। अनमोल को लगता है मैं भी किन्नर का भाई होने का खामियाजा भुगत रहा हूं पर मेरा बेटा सूर्या से दूर रहे। सूर्या को हर्षा से दूर रखने और समाज की फन्तीयों से बचाने का संकल्प अनमोल करता है। उपन्यासकार तंज कसनेवाले समाज को कहना चाहते हैं कि किसी भी इंसान की जिंदगी पूर्ण नहीं होती सभी आधे-अधूरे ही होते है। सबकी जिंदगी 'फिफ्टी-फिफ्टी' होती है। फिर किन्नरों को ही दोष क्यों? उन्हें भी सामान्य मनुष्य की तरह जीवन जीने का अधिकार दे कर तो देखिए समाज की बदलती सोच उन्हें जीवन और जगत का नया दर्शन प्रदान कर सकती है।

'तीसरी ताली' प्रदीप सौरभ का उपन्यास किन्नर व्यथा की यथार्थता है। एक दिन उपन्यास के पात्र मणि के कपड़े कुछ बदमाश किस्म के लड़के पाठशाला में उतारते है। उसके शरीर को देखकर हिजड़ा-हिजड़ा चिल्लाने लगते है। इस अप्रिय घटना के कारण मणि स्कूल छोड़ने का फैसला लेती है। निर्मला भुराडिया का उपन्यास 'गुलाम मंडी'(2014) में भी इसी तरह की घटना को उपन्यास का आधार बनाया गया है। छात्र लड़का है या लड़की इसका पता लगाने हेतु कपड़े उतारे जाते है फिर अगर वह किन्नर निकला तो उसे जूतों से मारकर स्कूल से निष्कासित किया जाता है। शिक्षा में भी इसकी हिस्सेदारी खत्म की जाती है। पढ़-लिखकर क्या करना है। ताली ही तो बनानी है। उसके लिए पुस्तकें पढ़ने और की और पाठशाला में आने की क्या जरूरत है। किन्नर स्कूल में सब के उपेक्षा का नीरीहजीव बनता है। अन्यों का ध्यान इसके कारण कक्षा में नहीं लगता जैसे कई बेबुनियाद तर्क दिए जाते है।

'पोस्ट बॉक्स नं. 203 नालासोपारा' चित्रा मुद्गल (2016) का उपन्यास किन्नर समुदाय के विस्थापन की पीड़ा का दस्तावेज है। मेधावी छात्र विनोद किन्नर होने के कारण उसकी पढ़ाई को रोककर उसे किन्नर चंपाबाई को सौंपा जाता है। विनोद के परिवारवाले उसकी सड़क दुर्घटना में मौत और लाश के लापता होने की खबर फैलाते है। किन्नरों द्वारा विनोद बिन्नी बनाया जाता है। लिंगपूजक समाज में किन्नरों को दुत्कारा जाता है, "आखिर क्यों हमारे इस अहम् हिस्से को अलग-थलग किया जा रहा है। हमारे बच्चों को क्यों हमसे दूर किया जा रहा है। आजादी से लेकर अब तक कई रूढियों टूटी। लेकिन किन्नरों की जिंदगी में कोई बदलाव नहीं आया। क्यों, आखिर उनका दोष क्या है।"७ समाज बहिस्कृती का जहर और किन्नरों द्वारा अपने अनुकूल बनाने की यातनाएँ असह्य है। यहाँ विनोद बनी बिन्नी दुनिया के तमाम किन्नरों का प्रतिनिधित्व है।

बिन्नी बना विनोद किसी भी कीमत पर अपना पुरुष वेश नहीं बदलता अंत तक वह पॅंट और शर्ट पहनता है। संतान के जन्म के लिए अक्षम होते हुए भी ज्योत्सना से विवाह करके बच्चा गोद लेता है। पत्नी का प्रेम और औलाद का सुख वह चाहता है, "सारी प्रताड़ना के बावजूद वह उनकी बात स्वीकार नहीं करता और अंत तक अपनी जीद पर डटा रहता है। उसके लात, घुसे, थप्पड़ और उपन्यास जीवन के अकेलेपन, खालिपन और एकांत की पीडा है। किन्नर का जन्म ही सर्वप्रथम उससे छुटकारा पाने की भावना के साथ होता है। समाज के उपहास से बचने के लिए इन बच्चों को घर में ही छुपाकर रखा जाता है फिर उन्हें किन्नरों को सौंपा जाता है। न कोई उसका मित्र है ना हमदर्द। वह खुद अकेलेपन की त्रासदी को भुगतता है। उपन्यास के पात्र विनीता स्वेच्छा से गृहत्याग करती है। घरवाले उसे ढूंढने तक नहीं वे कहते हैं अच्छा हुआ। इतने बड़े संसार में वह अकेली है। "बेशक वह दूर निकली गई थी और प्रतिशोध में अपने जीवित माता-पिता की तेरहवीं भी कर चुकी थी, मगर सब कुछ के बावजूद वह अकेली थी। वह जिंदगी ऊपर जाती, उतनी अकेली हो जाती।"६ प्रसिद्धी और पैसों के बावजूद परिवार द्वारा खोजे जाने की नफरत उसे प्रतिशोध और प्रेम के द्वन्द में लेती है। परिवार की प्रेम और आसरे के बगैर 'गे वल्ड वल्ड' जैसे पॉप्युलर ब्यूटीसलुन को खोलते एंव पेज श्री की ब्यूटी क्वीन बनने के पश्चात भी अकेलापन उसे सांप की तरह डॅसता है। डरवाना अकेलापन जानलेवा है। बातों में गर्म तेल की टपकती किसी भी संबंध को ना बख्शनेवाली अश्लील गालियों के बावजूद न मै मटक-मटक कर तालीपीटने को राजी हुआ, न सलमे-सितारे वाली साड़ियॉं लपेटकर लिपस्टिक लगा कानों में बूंद लटकाने को।८ हिजडे के पुरुषी शरीर में अक्सर स्त्री की आत्मा होती है यों कहे कि वह अर्धनारीश्वर होता है इस मान्यता का वह विरोध करता है। हिजड़ों की परंपरागत जिंदगी से छुटकारा पाने के लिए वह दिल्ली के सरदार तितलीबाई के डेरे से अलीगढ़ भाग जाता है। उसे फिर से पकड़ा जाता है। और खूब पिटाई होती है। पर उसका विद्रोह हो थमने का नाम ही नहीं लेता।

'मैं पायल' महेंद्र भीष्म का जीवनीपरक उपन्यास है। किन्नर का भोगा हुआ कटु यथार्थ वर्णित है। 2016 का यह उपन्यास किन्नरो के अनछुए पहलुओ की बेबाक प्रस्तुती है। यह उपन्यास गुरु पायलसिंह के जीवन संघर्ष पर आधारित है। उपन्यासकार किन्नरों की वेदना को प्रस्तुत करते है, "मैं पायल----- का आधार किन्नर गुरु पायलसिंह के जीवन संघर्ष की गाथा है, जिसमें प्रत्येक किन्नर के अतीत के संघर्ष की झलक परिलक्षित होती है। विस्थापन का दंश कष्टकारी होता है, फिर वह चाहे परिवार, समाज या अपनी मिट्टी से किया हो।"९ एक कलकिंत जीवन के बसर करते है। साम्प्रदायिकता और धार्मिक उन्माद का नशा इनपर कभी हावी नहीं होता क्यों की वे वह सम्प्रदाय और धर्मनिरपेक्ष त्रासदीपूर्ण जिंदगी और समस्याओं के चपेट में हरदम रहते है।

पायल अपने घर से भाग जाती है तब रेल में एक हमदर्द और प्लेटफार्म पर मुच्छड पुलिसवाला उसके यौन शोषण का प्रयास करता है। पायल को पिता द्वारा ही अपने हिजड़ा होने का गाली-गलौज द्वारा पता चलता है। पिटाई तो लकडी, लात, घुँसों से ऐैसी की जान निकलकर फिर होश आता है। इस बेदर्दी के पश्चात वह अपना जीवन समाप्त करने पर अमादा है। ट्रेन गंगा पुल पर चल रही थी, मन में इच्छा जागृत हुई कि गंगा में कूद जाऊँ और ओ आनेवाले अनिश्चितता भरी यातनाओ से मुक्ति पालू॑॑ पर मैं भयवश या कोई शक्ति जो समानान्तर विचार बन चल रही थी, जो भी कारण हो मैं गंगा की गोद में नहीं समायी और गंगा पुल पार हो गया।"१० परिवार का नजरिया और लोकलाज के कारण जीगर के तुकड़े को मरनासन्न यातनाएं दी जाती है।

**संक्षेप में**

किन्नरों की पीड़ा, दुख दर्द, जीवन जीने की विभिषिका और त्रासद स्थिति उपरोक्त सभी उपन्यासों की पहचान बनी है। किन्नर होने का दर्द, घृणा, अपमान, घुटन, अकेलापन, एकांत, अर्थाभाव पारिवारिक और सामाजिक भत्र्सना के खिलाफ वह भी तुट जाता है तो कभी संघर्ष की मुद्रा अख्तियार करता है। वे परिवारिक सामाजिक और मानवीय प्रेम, दया, सहानुभूति, मान-सम्मान, सामाजिकता के साथ रहना चाहते है। किन्नर संघर्ष और विद्रोह के कारण अपनी इन्सान के रूप में उपस्थिति दर्ज करते है। किन्नरों के तरफ देखने का दृष्टिकोण बदलना चाहिए। मनोरंजन के खिलौनों की अपेक्षा उन्हें इन्सान की हैसियत से देखना चाहिए। असुरक्षा से बाहर निकाल कर उन्हें भी पारिवार की संपत्ति का अधिकार दिलाकर स्वावलंबी बनाया जाए। परिवार से बहिष्कृत इस कलंक को प्रकृति की नाईन्साफी मानकर उनकी घर वापसी का दु:स्साहस समाज के लिए सहज बन जाएगा और मानवीय बिरादरी से बहिष्कृत 4. 9 लाख किन्नरों को न्याय मिलेगा

संदर्भ

1. डॉ विजेंद्र प्रतापसिंह, रविकुमार गोड, भारतीय समाज एवं समाज में तृतीयलिंगी विमर्श, पृ.क्रं 113, अमन प्रकाशन, 2016.

2. माधव नीरजा, यमदीप, सामयिक प्रकाशन, दिल्ली, 2002, पृ.क्रं 57

3. httt://hindi-new 18 com/new/nation/230893-html

4 त्यागी अनुसय, (2005) मै भी औरत हुँ, परमेश्वर प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण

5. भीष्म महेंद्र, किन्नर कथा,(2011), पृ.क्रं.45

6 सौरभ प्रदिप, तीसरी ताली, (2011) वाणी प्रकाशन, दिल्ली, प्रथम संस्करण, पृ.क्रं 117

7 अनमोल भगवंत, जिंदगी 50-50, (2017)

8. डॉ. नियाज शगुफ्ता, थर्ड जेंडर के संघर्ष का यथार्थ, (संपा.) विकास प्रकाशन, कानपुर, 2018, पृ.क्रं 158

9 वही प्रश्न क्रमांक 158

10 भीष्म साहनी, में पायल

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# पेशवे कालीन श्रावणमास दक्षिणा

*प्रा. डॉ. निलीमा राऊत*

*इतिहास विभाग प्रमुख, डॉ.पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य, सायन्स महाविद्यालय, कॉटन मार्केट, नागपुर*

18 व्या शतकातील शतकातील धार्मिक ग्रंथाचा अभ्यास करतांना काही कागदपत्रातून लक्ष वेधून घेणारी घटना म्हणजे श्रावणमास दक्षिणा होय. ब्राम्हणांस श्रावणमासांत दक्षिणा देण्याचा प्रघात श्री शिवछत्रपतीच्या काळापासूनंच होता. प्रतिवर्षी श्रावणमासाच्या निमीत्ताने सरकारातून विद्वान ब्राम्हणांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे दक्षिणा देण्यात येई. ब्राम्हणत्वाबद्यल आदर एवढेच कारण नसून विद्वानांच्या संख्येत वाढ व्हावी हा त्यामागचा मुख्य हेतू होता. संभाजी महाराजांच्या वधानंतर तळेगावचे खंडेराव दाभाडे सेनापती यांनी हे धर्मकृत्य हाती घेतले. श्रावण महिण्यात ब्राम्हणांना दक्षिणा वाटून त्यायोगे प्राचीन विद्येच्या प्रसारास उत्तेजन देण्याचा प्रयत्न सेनापती दाभाडे यांनी सुरू केला होता.1 थोरल्या बाजीराव पेशव्यांनी सेनापती दाभाडयांवरील विजय मिळविल्यानंतर इ. स. 1731 पासून श्रावणमास दक्षिणेची प्रथा पुण्यात सुरू झाली. श्रावण महिण्यात पेशवे ही लक्षवधी रूपयांची दक्षिणा वाटत असत. पावसाळी दिवस असल्याने मराठी फौजा घरीच असत. पेशव्यांचाही मुक्काम बहुधा पावसामुळे राजधानीतच असे, यामुळे श्रावणमास दक्षीणेच्या कार्यक्रमात लोकाचा उत्साह वाढे. या दक्षीणेच्या व पेशव्यांकडून मिळणा-या मानसन्मानाच्या आकर्षणामुळे संपुर्ण भारतातील हजारो विद्वान ब्राम्हण पुण्याकडे आकर्षिले जात. विद्वान ब्राम्हणांच्या या मेळाव्यालाच 'रमणा' असे म्हणत2.

दक्षिणा वाटण्याचे काम कबुतर खाण्यात पुर्वी होत असे परंतु दक्षीणेसाठी जमणा-या ब्राम्हणांचा आकडा हळुहळू वाढु लागला. त्यामुळे हुजूर बागेत दक्षिणा वाटण्याचे काम सुरू झाले. पण सन 1758 मध्ये पर्वतीच्या पायथ्याशी रमण्याकरीता स्वतंत्र आवार बांधून "रमणा" नावाची इमारत बांधण्यात आली. याशिवाय ब्राम्हणांची वाढती संख्या लक्षात घेवुन रमण्याजवळ धर्मशाळाही बांधण्यात आली. पाले, राहुटया, तंबु ठोकून जादा लोकांची तात्पुरती व्यवस्था करण्यात येत असे.3 या रमण्याच्या आवारात एक गणपतीचे देऊळ होते.

त्याच्या सभोंवताली ब्राम्हणांना दक्षिणा देण्यात येई. रमण्याला बाहेर पडण्यास अनेक दरवाजे होते. दक्षिणा मिळवून रमण्यातून बाहेर पडण्यास ब्राम्हणांना दोन दिवस लागत. या दोन दिवसांसाठी ब्राम्हणांना तांदूळ, तुरीची दाळ हा शिधा देवुन प्रत्येकी एक "टंका" देत, त्यामधुन ब्राम्हण तुप, भाजी, लाकुड फाटा विकत घेवुन स्वयंपाक करीत.4

दक्षिणा वाटतांना ज्याला त्याला त्याच्या योग्यतेनुसार दक्षिणा मिळावी अशी व्यवस्था रमण्यातही ठेवण्यात येत होती असे दिसते. दरवर्षी ब्राम्हणांची संख्या वाढू लागली तेव्हा पेशव्यांनी ठरविले की, दक्षीणेसाठी जमणा-या ब्राम्हणांची परीक्षा घेवुन नंतर दक्षिणा द्यावयाची त्याप्रमाणे ही परीक्षा रामशास्त्री रामशास्त्री प्रभुणे, बाळाशास्त्री, अय्याशास्त्री, काशीनाथ शास्त्री वगैरे पेशवे दरबारातील नामवंत शास्त्री घेत असत.5 याशिवाय ब्राम्हणांना दक्षिणा वाटण्यासाठी रमण्यातील दरवाज्यावर विद्वान, प्रतिष्ठीत शास्त्री, सावकार मंडळी, पेशव्यांचे नातेवाईक व स्वतः पेशवे बसत असत. सदाशिव दिक्षीत, कर्वे, अमृतराव, नाना फडणीस, हरीपंत फडके त्यांचे चिरंजीव दाजिबा फडके यांचीही नावे आढळतात.6 त्यानंतर त्यांना या विद्वानांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना दक्षिणा मिळे. सष्ठीस सकाळपासूनदक्षिणा वाटण्यास प्रारंभ होऊन सप्तमी संध्याकाळ पर्यंत रमण्यातील शेवटचा ब्राम्हण बाहेर पडेपर्यंत अखंडपणे हा कार्यक्रम चालत असे. ज्या ब्राम्हणांला दक्षिणा दिली जाई, त्याच्या कपाळावर गंधाचा टिळा लावून त्याला दरवाज्यातून बाहेर सोडले जाई.

श्रावणमास दक्षीणेसंबंधीची माहीती, पत्रे पाहात असतांना एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे ही दक्षिणा केवळ विद्वान जनापुरतीच मर्यादीत ठेवलेली नसून अगदी सामान्य भट, भिक्षुक, दुखणेकरी, यांनाही शिधा व देकार मिळाला आहे.वैदिक ब्राम्हणांना शनिवार वाडयात सरासरी 4 ते 5 रुपये व इतर ब्राम्हणांना दोन ते तीन रुपये दक्षिणा मिळत असे.या ब्राम्हणांबरोबरच रमण्यात अलेल्या स्त्रियांनाही दक्षिणा व शिधा देण्यात येई.7

बाहेरुन येणा-या ब्राम्हणांच्या बरोबरच शनिवारवाडयातील नेहमीच्या ब्राम्हणांनाही ही दक्षिणा देण्यात येत असे. पुण्यातील दुखणेकरी ब्राम्हणांना त्यांच्या घरी जावून दक्षिणा देत असत. तसेच पुण्यातील ओंकारेश्वर गणपती, रामाच्या मंदिरातही श्रावण दक्षिणा ठेवण्यात येई, पुण्यातील या हिन्दू देवस्थांना बरोबरच पुण्यातील पीरालाही दक्षिणा ठेवण्यात आली होती.8 यावरुन असे लक्षात येते की, ब्राम्हण, ब्राम्हणेत्तर विव्दान अविव्दान स्त्रिया व पुरुष या सर्वांचा अंतरात्मा श्रावण मासांत संतुष्ट करणे पेशवे आपले पवित्र कर्तव्य समजत असत.

दक्षिणेकरीता शृंगेरी, कांची, श्रीरंगपट्टण, कुंभमेळा, तंजावर, रामेश्वर, काशी, कनोज, ग्वाल्हेर, मथुरा इत्यादी इष्ट दिशांचे ब्राम्हण पुण्यात येत. त्यात वैदिक, वैयाकरण, ज्योतिषी, कवी, वेदान्ती, नैयायिक भिषक असे सर्व शाखांचे विव्दान असत.9

रमण्यात दक्षिणा श्रावण महिन्याखेरीज पेशव्यांच्या कडील काही महत्वाच्या प्रसंगीही वाटली जाई. इ.स. 1759 मध्ये भाद्रपद महिन्यात अमावस्येला रमण्यात पेशव्यांनी श्राध्द पक्षाची दक्षिणा वाटली. सात आठ हजार ब्राम्हण दक्षिणेसाठी जमले होते. हा कार्यक्रम मध्यरात्रीपर्यंत चालला होता. प्रत्येक ब्राम्हणाला एक एक रुपये दक्षिणा देण्यात आली.10 श्रावणात रमण्यामध्ये अतिशय उत्साहाचे वातावरण असे. तेलाचे दिवे लावून रमण्यात रोषणाई करण्यात येई.11 दक्षिणा संपल्यावर तोफेचे बार होत. ब्राम्हण बाहेर जाण्याच्या वाटेवर "हिलाल" चंद्रज्योती लावण्यात येई.

रमन्यात येण्यासाठी बाहेर गावांहून आलेले ब्राम्हण पुण्यातील त्यांच्या नातेवाईकांच्या घरी उतरत असत. त्यांना रमण्यात किंवा शनिवार वाडयात दक्षिणेसाठी आणण्यास पेशवे 'पालख्या' पाठवत.12 दक्षिणेची रक्कम थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत लहान होती. पण त्यांनंतर पेशवाईची भरभराट जसजशी होत गेली तसतसा दक्षिणेचा आकडाही मोठा झाला. सन 1736 म्हणजे बाजीरावाच्या मरणापूर्वी चार वर्षे अवघे 16354 रुपये दक्षिणा म्हणून वाटण्यात आली. इ.स. 1740 नंतर नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द सुरू झाली. त्याच्या कारकीर्दीत मराठी राज्याची आर्थीक स्थिती सुधारली. श्रावण दक्षिणा नानासाहेबाच्या काळात 30 हजारावरून 16 ते 18 लाखापर्यंत पोहचली.13

राजकीय, आर्थीक परीस्थीतीच्या चढउतारांचा परिणाम होऊन कधी कमी तर कधी जास्त प्रमाणावर श्रावण दक्षिणा वाटली गेली. इ.स. 1761 मध्ये पाणिपतचा भयंकर नरसंहार झाला. सहाजीकच इ.स. 1762 साली श्रावण दक्षीणेचा आकडा पाणिपत संग्रमामुळे खुपच खाली आला होता. त्यावर्षी जनमानसातही उत्साह नव्हता पाणिपतच्या संकटाबरोबरच निजामाने पुणे लुटले. रमणा व तेथे बांधलेल्या धर्मशाळा जाळून टाकल्या गेल्या. इ.स. 1762 मध्ये केवळ 11,893/- रू. श्रावण दक्षिणा वाटली गेली.14

इ.स. 1765 मध्ये माधवरावांनी रमणा पुन्हा बांधला. इ.स. 1776 मध्ये महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थीती असल्याने 5,15,128/- रूपये तर 1780 मध्ये 3,48,485/- रूपये श्रावण दक्षिणा वाटली गेली. इ.स. 1788 मध्ये गोपिकाबाई वारल्यामुळे पेशव्यांना सुतक होते. परीणामी जमलेल्या ब्राम्हणाचे जेवणाचे हाल झाले त्यांना पौर्णिमेनंतर श्रावण दक्षिणा वाटण्यात आली.15

इ.स. 1797 साली दुसÚया बाजीरावांनी स्वहस्ते सर्व ब्राम्हणांना श्रावण दक्षिणा वाटली. बाजीरावांनी दक्षिणा हिरे, मोती, माणिक, पोवळी एकत्र करून ओंजळीने श्रावण दक्षिणा वाटली.16 पुण्यात येणाÚया भिक्षुकांना पेशवे दक्षिणा देतच, पण काशीक्षेत्र हे विद्येचे प्रमुख केंद्र, तेथे देशोदेशीचे विद्वान ब्राम्हण व त्यांनी चालविलेल्या पाठशाळा असत. त्या सर्व ब्राम्हणांना पुण्यासारख्या दुर ठिकाणी येणे अशक्य असल्यामुळे पेशवे पुण्याहून त्याच्याकरीता श्रावण दक्षीणेची रक्कम पाठवून देत. सन 1767 मध्ये माधवराव पेशव्यांने त्याकरीता रू 31500 मंजुर केले होते. माधवरावांची ही वहीवाट नानासाहेब फडणीसांनी पुढेही तशीच चालू ठेवली.17

यावरून असे लक्षात येते की वैयक्तीक पुण्यसंपादन, नावलौकीक मिळवीणे हा एकमेव हेतु श्रावण दक्षीणेमागे असावा. पेशव्यांचे अनुकरण त्यांचे सरदारांनी आणि समाजातील इतर धनिकांनी केल्यामुळे या प्रथेला लोकाश्रय व राजाश्रय मोठया प्रमाणावर मिळाला.

सारांश

पेशव्यांनी वरील प्रकारे श्रावण दक्षिणा वाटण्यास सुरवात केल्याचा फायदा अनेक रूपांनी समाजाला मिळाला. विद्येला उत्तेजन मिळावे यासाठीही पेशव्यांनी दक्षिणेची सुरूवात केली असावी. श्रावण दक्षिणेच्या अशेने तरूण लोक विद्या शिकू लागल्यामुळे जुन्या पाठशाळा भरभराटीस आल्या व नव्या पाठशाला स्थापण्यास विद्वानंाना उत्तेजन मिळाले. विद्येच्या या प्रसारांबरोबर नविन कवी, ग्रंथकार महाराष्ट्रात निर्माण झाले. पेशव्यांचा कित्ता इतर मराठे सरदारांनी उचलला व अशा रितीने मराठी समाजात विद्याभिवृध्दी झालीच पण पेशव्यांच्या श्रावण दक्षिणेची कीर्ती साÚया भारतखंडात पसरून मराठी साम्राज्यात बाहेरचे हजारो भिक्षुक पुण्यास लोटू लागल्यामुळे प्राचीन विद्येच्या वाढत चाललेल्या वृक्षाला सर्वत्र नविन पालवी फुटली. मराठी राज्यापुर्वी सर्वत्र गाजत असलेल्या मुसलमानी अमलाखाली प्राचीन

आर्य विद्येचा बहुतेक लोपच झाल्यासारखा होता. तिचे पुर्नज्जिवन पेशव्यांनी महाराष्ट्रात काय, पण सगळया हिंदुस्तानात दरसाल लाखो रूपये खर्चुन केले हे त्यांचे हिंदुधर्मावर मोठे उपकारच होते.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. वा. कृ. भावे पेशवे कालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन पुणे 1988, पृ. 73
2. उपरोक्त पृ. 73
3. गो. स. सरदेसाई (संपा.) पेशवे दप्तर खंड 22, प्रकाशन 1932, पृ 102
4. गो. स. सरदेसाई (संपा.) पेशवे दप्तर खंड 42, प्रकाशन 1934, पृ 12
5. पेशवे कालीन महाराष्ट्र पृ 73
6. उपरोक्त
7. ना. वि. जोशी, पुणे शहराचे वर्णन, मुंबई 1971 पृ. 89
8. ग. ची. वाड (संपा.), पेशवे रोजनिशी खंड 8, प्रकाशन 1911 पृ 190
9. उपरोक्त पृ 194
10. कृ. वा. पुरंदरे, पुरंदरे दप्तर भाग 3, प्रकाशन पुणे 1934, पृ. 104
11. ग. ची. वाड (संपा.), पेशवे रोजनिशी खंड 8, प्रकाशन 1911 पृ. 186
12. कित्ता पृ. 201
13. गो. स. सरदेसाई (संपा.) पेशवे दप्तर खंड 22, प्रकाशन 1934, पृ 103
14. वा. वा. खरे (संपा.) ऐतिहासीक लेख संग्रह भाग 10, प्रकाशन 1980,पृ 5179
15. कित्ता पृ 5179
16. वा. वा. खरे (संपा.) ऐतिहासीक लेख संग्रह भाग 3, प्रकाशन 1900, पृ 1332
17. पेशवे कालीन महाराष्ट्र पृ.79.

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"*

# चिनी प्रवासी -: प्रवासवर्णन आणि बौद्ध धर्म

***सुनील पंडित वाघमोडे***
*पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर*

प्राचीन काळात भारत हा देश "बौद्धांची भूमी" म्हणून ओळखला जात होता. बौद्ध धर्माचा उगम भारतात झाल्यामुळे बौद्ध धर्म जाणून घेण्यासाठी अनेक परकीय प्रवाशी भारताकडे आकृष्ट झाले. त्या परकीय प्रवाश्या मध्ये चीनी प्रवासी अतंत्य महत्वाचे आहेत. व्यापारी ,प्रवासी यांच्याकडून बौद्ध धम्माची माहिती चीन मध्ये पसरली यामुळे चीन सम्राटापासून सर्वसामान्यापर्यंत बौद्ध धम्म, धर्मग्रंथ ,भगवान गौतम बुद्ध, धम्मातत्व इत्यादी विचारमंथन सुरु झाले होते . त्यामुळे इ.सनाच्या पहिल्या शतकात चीन सम्राट 'मिग' याने कांही प्रतिनिधी भारतात पाठवले होते . त्याने पाठवलेल्या प्रतिनिधी बरोबर काश्यप मातंग आणि धर्मरत्न हे दोन बौद्ध भिक्षू चीन मध्ये आले .त्यांनी आपल्या बरोबर कांही बौद्ध ग्रंथ आणि बुद्धांच्या मूर्ती घेऊन लोयांगला पोहचले .तेथे त्यांनी बौद्ध ग्रंथाचे चीनी भाषेत भाषांतर केले. अशा रीतीने चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रवेश झाला. इ.स पहिल्या ते आठव्या शतकात पर्यंत अनेक चीनी अभ्यासक भारतात आले त्यांच्या प्रवास वर्णनातून भारतातील तत्कालीन सामाजिक,सांस्कृतिक, राजकीय, चालीरीती आणि बौद्ध स्थळांची माहिती मिळते . प्रस्तुत निबंधात सगळया चीन प्रवासी विद्वानाचा उल्लेख करून फाहीयान (इ.स ३९९ ते ४१४ ) ,ह्यूएनत्संग (इ.स ६२९ ते ६४५ ) आणि इत्सिंग ( इ.स ६७१ ते ६९५ ) यांचा भारत भेटीतील बौद्ध धर्म याविषयी चर्चा केली आहे . प्रवास वर्णनाचा विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करून संदर्भग्रंथांचा उल्लेख केला आहे . शेवटी निष्कर्ष नोंदविले आहे.

**पार्श्वभूमी :**

प्राचीन काळापासून बुद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी अनेक बौद्धपंडित भारतात आलेले आढळतात .चीनकडे जाणाऱ्या मार्गावर कशाकर ,बारकंद ,खोतान ,डोकोको कुची या प्रदेशाच्या सीमा अशोक साम्राज्याच्या सीमेशी लागून होती .येतूनच अशोकाने मोठ्या प्रमाणात बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार केल्यामुळे व्यापारी आणि प्रवाश्यांच्या नजरेत येऊन बौद्ध धर्मा बद्दल कुतुहालता निर्माण झाली .खोतान हे बुद्ध धर्माचे सर्वात मोठे केंद्र होते. यामुळे अनेक चीनी प्रवासी , यात्रेकरू तेथे उतरत ,त्याचमुळे सांस्कृतिक – धार्मिक आदान-प्रदान होत असे यातूनच बौद्ध धर्माची माहिती जाणून घेण्याची इच्छा चीनी प्रवाश्या मध्ये निर्माण झाली . यातूनच पुढे अनेक चीनी प्रवासी भारतात आले त्यात इ .स २९० मध्ये चुनासी –दिंग हा प्रवासी खेतान प्रांतातून भारतात आला .पुढे फा-सिं-ग , चि-ऱ्ही आणि हो-युन हे भारतात आले. अलीकडे बुद्धगाय येथे सापडलेल्या चीनी भाषेतील शिलालेखात अनेक चीनी प्रवाश्यांचे नावे कोरलेली आहेत. यावरून कळून येते कि फार वर्षापूर्वी चीनी प्रवासी धम्म ज्ञानासाठी भारतात येत असत .अशाच चीनी प्रवाश्या पैकी फाहीयान(इ.स ३९९) , सुंग युंग (इ.स ५१८ ),ह्यूएनत्संग(इ.स ६२९) आणि इत्सिंग (इ.स ६७३)मध्ये भारतात आले. या तीन बौद्ध भिक्षूचा निबंधात चर्चा केली असून त्यांचे अध्यन, साहित्यलेखन, बौद्ध धर्माविषयी माहितीचे संकलन, संशोधन, वर्णन इत्यदीवर प्रकाश टाकला आहे.

**फा-हीयान-:**

फा-हीयान हा इ.स ३९९ च्या सुमारास भारतात आला होता. त्याचा जन्म इ.स ३७७ मध्ये चीनच्या पिंगयांग प्रदेशातील उचंग येथे झाला. त्याचे पहिले नाव कुंग असे होते. कुंग हा आईवडिलांचे चौथे अपत्य होते. नंतर त्याला फाहीयान या नावाने ओळखले जात.फाहीयान याचा चीनी भाषेतील अर्थ 'धर्माचा विख्यात आचार्य' असा होतो. फाहीयान याला लहानपणीच त्यांच्या वडिलांनी त्यांना भिक्षुसंघाच्या स्वाधीन केले होते. भिक्षु झाल्यावर फा-हीयानने त्रिपिटकाचा अभ्यास सुरु केला. विनायापिटकाचे अध्ययन चालू असताना त्याला चीनी अनुवादात फार त्रुटी दिसून आले.तेंव्हा भारतातून जाऊन विनायापिटकाची मूळ प्रत आणण्याचा फा-हियानाने निर्धार केला.आणि त्यावेळी व्हे-किंग ,ताव-चिंग ,व्हे-चिंग आणि व्हे विई नावाच्या चार भिक्षू सोबत चीनच्या सुप्रसिद्ध चांग-गन या विहारापासून भारताच्या प्रवासास सुरवात केली. फा-हीयान यांचे प्रवास वर्णन 'बौद्ध देशांचे वृतांत' (A Record of the Buddhist Countries) या नावाने प्रसिद्ध आहे. फा-हीयान चांग- गान येथून कोन क्वीची ,चांगाई ,तुनव्हेग येथून कांही बौद्ध यात्रेकरू बरोबर वाळवंटातील प्रवास , डोंगरकडा गोंधळून टाकणाऱ्या वाटा, नद्यांच्य प्रवाह, जंगले, घनदाट झाडी,गर्द अरण्ये तोंड देत पेशावर येथ आला. या प्रवासा दरम्यान अनेक प्रवाश्यांचा मृत्यू झाला .फाहीयान त्यातून वाचला व प्रवास सुरु केला. खोतान येथे १४ मोठे संघाराम अनेक लहान मोठे विहार आहेत. सिंधू नदी पार करून तक्षशीला ,गांधार पासून पुरुष्पूर म्हणजे पेशावर येतील कनिष्क बांधलेला स्तूप आणि भगवान बुद्धाचे पवित्र भिक्षापत्राचे वर्णन केले आहे .

फा-हीयान हा चंद्रगुप्ताच्या द्वीतीय कालखंडात भारतात आला होता .त्याच्या प्रवास वर्णनात मगधाची राजधानी पाटलीपुत्र भेट दिली होती त्यात अशोकाच्या भव्य राजवाड्याचे वर्णन येते. अशोका मुळेच चीनमध्ये बौद्ध धर्म परिचित झाला होता. अशोकाने ८४ हजार स्तूप ,त्या स्तूपाचे वर्णन ,त्यावरील कलाकृती ,नक्षीकाम ,पशुप्रण्याच्या आकृत्या इत्यादी तसेच सांची नालंदा वर्णन आढळते .त्याने आपल्या 'फो-ओकी' या आत्मचरित्रातून गुप्त कालखंडाची माहिती स्पष्ट होते .त्याच्या लेखनात समुद्रगुप्त आणि विक्रमादित्य यांचे सविस्तर वर्णन मिळते .गुप्त काळात विहारांना व भिक्षुंना दान देण्यात

येत असे वर्णन मिळते .त्याचे प्रवास वर्णन चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीवर प्रकाश टाकते . फा-हीयाननच्या काळात बौद्ध धर्माचा प्रभाव कमी होण्यास प्रारंभ झाला. अनेक बौद्ध स्थळे मोडकळीस आली होती. श्रीलंका (सिलोन) मध्ये त्याने अनुराधापूर येथे बुद्धांचा दात पहिला. याचे वर्णन करतो .

फाहीयान भारतातील बौद्धधम्म ,ज्ञानकेंद्र यांना भेटी दिल्या आणि अनेक ग्रंथ चीनला नेले. 'विनम्र सर्वस्तीवाद','परीनिर्वान', 'वैफल्यसुत्रे','महासंधिक' ,'अभिधर्म' इत्यादी ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती चीनला नेल्या.अनेक बौद्ध भिक्षूंची चर्चा बैठक करून मते मतांतरे मांडली.बौद्ध शिक्षण पद्धती अभ्यासली. याच दरम्यान बौद्धसंधासाठी संस्कृत भाषा शिकून विनायापिटकाची संपादन करून हस्तलिखित तयार केली. त्यासाठी ३ वर्ष पाटलीपुत्र येथे वास्तव्य केले. फाहीयान 'सर्वस्तीवादी निकाय', 'सयुंक्त अभिधर्म –हृद्यशास्त्र','परीनिर्वान सूत्राची' आणि 'महासंघिक – अभिधार्माची' चीनी भाषेत अनुवाद केले. भारतात मथुरा, श्रावस्ती,कपिलवस्तू, कुशिनारा, वैशाली,बोधगया अश्या अनेक स्थळांना भेटी देऊन बंगालमधील ताम्रलीप्ती येथे पोहचले. त्यानंतर तेथून श्रीलंकेला गेले. तेथे दोन वर्षे राहिल्यानंतर समुद्र मार्गे चीनला निघाले. या प्रवासात ३० देश्याना भेटी दिल्या .चीनला पोचल्यानंतर नेलेल्या ग्रंथाचे चीनी भाषेत भाषांतर संपादन करण्यात आपले आयुष्य व्यतीत केले. इ.स ४२२ मध्ये वयाच्या ६५ व्या वर्षी मृत्यू झाला .

**ह्यूएनत्संग-:**

"Prince of Pilgrims"या नावाने ओळखले जाणाऱ्या ह्यूएनत्संगचा जन्म इ.स ६०० मध्ये हेनान प्रांतातील चीन-लिऊ येथे झाला.त्याच्या चार भावापैकी हा सर्वात लहान होता दुसऱ्या क्रमांकाच्या भावाने ह्याला लो-यांग ह्या राजधानीत नेले तेथे वयाच्या १३ व्या वर्षी बौद्ध धर्माची दीक्षा दिली. २० व्या वर्षी बौद्ध भिक्षु झाला.आणि त्याला बौद्ध साहित्याची आवड निर्माण झाली.यातूनच भारतात जाण्याची तीव्र ओढ निर्माण झाली. याच काळात चीन मध्ये अस्थिर वातावरण निर्माण झाले होते त्यामुळे त्याच्या जीवाला धोका निर्माण होईल म्हणून चीनी राजाने त्याला बंदी घातली. मात्र तरीही राजा आणि सैनिकापासून बचाव करत इ.स ६२९ सम्राट हर्षवर्धनच्या काळात भारतात आला. भारतात येताना अनेक संकटाना सामोरे जावे लागले. ताश्कंद ,समरकंद बल्ख आणि गांधार मार्गे भारतात पोहचला. ह्यूएनत्संग भारतात १४ वर्ष वास्तव्य केले होते. त्यावेळी हर्षवर्धन राजा राज्य करीत होता. त्याने ह्यूएनत्संगचे स्वागत केले. हर्षवर्धन याने बौद्ध धर्म स्वीकारला होता. कनोज येथील बौद्ध परिषदेचा अध्यक्ष म्हणून नियुक्त केली होती. ह्यू-एन-त्संग याच्या लेखनातून हर्षवर्धन राजवटीबाबत अनेक उल्लेख सापडतात .बौद्ध गये मध्ये बोधिवृक्ष होता आणि शशांक या ब्राम्हण शासकने मुळासकट तो उपटून काढला; जाळला व त्या ठिकाणी शिवाचे मंदिर उभारले तसेच कुशीनगरच्या बौद्ध भिक्षुंना बहिष्कृत करण्याचे आवाहन केले.हर्षवर्धन राजाश्रय असल्यामुळे बौद्ध धर्म कसाबसा टिकून होता.हर्ष राज्याने त्याला आश्रय दिल्यामुळे हर्षाच्या वर्धन घराण्याची माहिती त्याच्या लेखनात आढळते.हर्षवर्धनचा आदर असून सुद्धा समकालीन राजा पुलकेशी दुसरा याचे गौरव केले आहे. पुलकेशी दुसरा यांच्या काळातील अमरावतीच्या स्तूपबद्दल जणून घेतले. त्याने आपल्या प्रवास वर्णनात 'महाराष्ट्र' या नावासाठी मो-हो-ल-च शब्द वापरला आहे यापुलकेशी राजा राज्य करीत असल्याचे सांगितले आहे . महाराष्ट्रा बद्दल विस्तृत विवेचन केले आहे. अजिंठा ,वेरूळ लेणी तसेच नाशिकहून काठेवाड भागाकडे जाऊन स्थळे व बौद्ध धर्मासंबधी विवेचनत्याने अनुभवली.

ह्यू-एन-त्संग भारतामध्ये बौद्ध तीर्थाटने पाहणे हा उद्देश असल्याने त्याने लेण्या,विहार,स्तूप बौद्ध शिक्षण केंद्र यांना भेटी दिल्या. भारतातील अनेक बुद्धस्थळांना, विहार,व स्तूप यांना भेटी दिल्या. सारनाथ येथील धामेख स्तूप व येथील वाज्रासनावर बसलेल्या धम्मचक्रप्रवर्तन मुद्रेतील बुद्धमूर्तीचे सुंदर वर्णन केले आहे तसेच नालंदा बुद्धमंदिरची माहिती मिळते. बामियान ह्या अफगानिस्तानातील ठिकाणी १५० फुट उंचीची उभी बुद्धमूर्ती पहिली तसेच तेथे शेकडो बौद्धविहार शैलगृहे,भितीचीत्रे याचे वर्णन मिळते.म्हणून अफगानिस्तानला बुद्धभूमी म्हणून ओळखले जाई. नालंदा या विद्यापीठात २ वर्ष राहिला आणि तेथे संस्कृत भाषेचे अध्यन केले. पुढे याचा उपयोग बौद्ध साहित्याचे भाषांतर करण्यासाठी केला.तसेच बुद्धाचे १५० अवशेष, सोने,रूपे, चंदनाच्या बुद्धमूर्ती, ६५० हस्तलिखिते, २० घोड्यावरून नेले.चीनला गेल्यावर त्याचे भव्य स्वागत केले. भारतातील अनेक

ह्यू-एन-त्संगच्या प्रवास वर्णानातून भारतीय समाजजीवन , स्त्रियांचे स्थान, केशरचना, वेशभूषा, जातीव्यवस्था, रूढी परंपरा, धर्म ,नागरी अधिकारी ,राजे सरदारांचे जीवन सामान्यलोक यांचे तपशीलवार विवेचन मिळते. यात स्त्रिया शिक्षित आणि सती प्रथा नसल्याचे उल्लेख येतात. पुढे ह्यूएनत्संग हा अलाहाबाद पामीर येथे राहिला .पुढे पंजाब मधून पामीर पार करून सोलन येथे पोहचला. तो चीनच्या परतीच्या प्रवासाला निघाला.प्रवासात प्रचंड त्रास सोसून वादळवाराल्या तोंड देऊन चीनला पोहचला. बुद्धभूमीचे दर्शन घेऊन मायदेशी परतला पुढे इ.स ६४८ त्याने पंधरा ग्रंथाचे भाषंतर केले आणि आपले प्रवासवृत 'सी-यु-कि' लिहून काढले. त्याचा सॅम्युअल बील यांनी "Buddhist Records of The Western World" मध्ये भाषांतर केले .इ.स ६६४ मध्ये परीनिर्वाण झाला.

इत्सिंग (इ.स ६७१ते ६९५)

इत्सिंग हा समुद्रमार्गे भारतात येणार पहिला चिनी बौद्ध यात्री होता. फाहियान व ह्युएनत्संग या प्रवासी प्रमाणेच इत्सिंग देखील बौद्ध धर्माचा अभ्यास व बौद्ध धर्माच्या पवित्र स्थळांचे दर्शन घेण्याच्या हेतूने भारतात आला होता. त्याचा

जन्म बिजिंग जवळील फान -यांग या ठिकाणी झाला त्याने १४ व्या वर्षी बौद्ध धर्माची दिक्षा घेतली . इत्सिंग गांगझू (कॅंटन) बंदरातून व्यापारी जहाजातून सुमात्रा या मार्गे भारताच्या ताम्रलिप्ती येथे आला. ताम्रलिप्तीमधील बौद्ध अभ्यासपद्धतीवर त्याने सविस्तर लिहले आहे. ६ व्या वर्षी मुलगा बौद्ध मठात प्रवेश करतो आणि 'सिद्धीरस्तु' या पुस्तकाचा अभ्यास सुरु होतो. १० व्या वर्षी धातूअवयव ,विभक्तिप्रत्यय धातुसाधित शब्द करावे लागत. १३ व्या वर्षी अभ्यास प्रा होईल .१५ व्या वर्षी १८००० श्लोकाचा वृतीसुत्र हा ग्रंथ पानिनिसुत्रावरील टीकात्मक ग्रंथाच्या अध्ययनाला सुरुवात होते ५ वर्षात विद्यार्थी आत्मसातकरावा लागतो. म्हणजे विद्यार्थ्याचा अभ्यास व्यापक भाग पाहता विद्वान, ज्ञानी, व्यासंगी व्यक्तिमत्वाची घडण शिक्षणपद्धीतीतून कशी आखली जाईल व बौद्ध अभ्यासक्रमाचे स्वरूप किती कठीण होते हे लक्षात येते. इत्सिंग हा बौद्ध शिक्षणाचे माहेरघर समजले जाणारे नालंदा विद्यापीठाता १० वर्ष वास्तव्यास होता. तेथे संस्कृत भाषा शिकली आणि बौद्ध ग्रंथाचे अध्यन केले. त्यात नालंदा विद्यापीठाचे प्रचंड कक्ष, मोठे प्रमाणात विद्यार्थी, आचार्य, निवास,ग्रंथालय व श्रेष्ठ दर्जाचे शीलभद्र कुलपती इत्यादी वर्णन केले आहे. इत्सिंग लेखनात 'बाली' बद्दल लिहिले असून 'बाली' हे बेट बौद्धधर्मीय असून भारतीय संस्कृतीचे मोठे केंद्र होते. त्याच्या प्रवासवर्णनात विक्रमशीला आणि गुजरात राज्याच्या वल्लभी प्राचीन विद्यापीठाचे जे इ.स ७ व्या शतकात स्थापन झाले. त्याचा उल्लेख येतो.त्या विद्यापीठाची स्थापना मैत्रक राजेयांनी केले असून ,विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जात होते असे म्हंटले जाते.जैन आणि बौद्ध धर्माचे त्याने आपला प्रसिद्ध ग्रंथ "भारत आणि मलयद्वीप मध्ये प्रचलित बौद्ध धर्माचे विवरण" हा ग्रंथ लिहिला.यात तात्कालिक बौद्ध धर्म त्याचा चीन व इतर देशात झालेला प्रसार तेथील धर्माचे स्वरूप धर्मातील विविध पंथ व परंपरा यांच्या हे ग्रंथ उपयुक्त आहे . बौद्ध मठातील जीवन भिख्खू व भिख्खुणी यांच्या वस्त्रे, अन्न ,प्रव्रज्याचे नियम गुरुशिष्य संबध रोग व त्यावरचे औषधोपचार इत्यादी विषयी संबधी सविस्तर माहिती देतो.

इत्सिंग इ.स ६७१ ते ६९५ म्हणजे २५ वर्ष परदेशात राहिला . त्याने ३० देशा पेक्षा जास्त देश्यांचा प्रवास केला होता . त्यादरम्यान आपलयाबरोबर ४०० बौद्धग्रंथ नेले होते. त्याने त्याचे इ.स ७०० ते ७१२ पर्यंत इत्सिंग ने २३० खंडात ५६ ग्रंथाचा अनुवाद केला . यामध्ये 'नन –है-चीकुएन नै-फा-चुआन' म्हणजे "दक्षिण मुद्रातील देशातील पाठविलेला आचरणासाबंधीच्या नियमांचा वृतांत" हा ग्रंथ होता. हा ग्रंथ चीनमधील विनायांच्या नियमात घुसलेल्या चुका दुरुस्त करण्याच्या उद्देशाने लिहला होता.यातून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते. तो ताम्रलीप्तीहून समुद्रमार्गे चीनला गेला.तेथे राहून अनेक ग्रंथाचे भाषांतर केले .तत्कालीन राणी वू-त्से –त्वीन हीने त्याला राजाश्रय देऊन ग्रंथनिर्मितीस उत्तेजन दिले. त्याचे इ.स ७१३ मध्ये परिनिर्वाण झाले.

**निष्कर्ष:**

१) भारतातील बौद्ध धर्म, बौद्ध धर्म संस्थापक भगवान गौतम बुद्ध, बौद्ध स्थळे इत्यादीबाबत चीनमध्ये उत्सुकता होती व धर्मग्रंथाचे अध्यन सुरु झाले होते.

२) फाहीयान, ह्यू-एन-त्संग आणि इत्सिंग हे भारतात वेगवेगळया काळात आले,बौद्ध स्थळांना भेटी दिले त्यातून त्याने केलेले निवेदन, लेखन इत्यादीतून बौद्ध धर्माबाबत माहिती उपलब्ध होते.

३) या तिन्ही प्रवाश्यांच्या प्रवासवर्णानातून भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक इतिहासावर महत्वपूर्ण प्रकाश टाकतो .

**संदर्भ:**

१) Samuel Beal, Buddhist Records of The Western World, , Published by Munshiram Manoharlal Publishers ,New Delhi 2004

२) Bapat.P.V ,2500 Years of Buddhism, Ministry of Information and Broadcasting,Government of india ,New Delhi 1956

३) आ.ह. साळुंखे, जिज्ञासापुरुष: ह्यूएन-त्संग, लोकायत प्रकाशन, सातारा

४) मा.शं. मोरे , तीन चीनी प्रवासी, कौशल्य प्रकाशन ,औरंगाबाद.

५) मराठी विश्वकोश खंड- महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मित मंडळ, मुंबई

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021,
Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# सामाजिक वास्तवाचा अविष्कार - युगानुयुगे तूच

*सीमा हडकर*
*कणकवली काँलेज कणकवली*

**प्रास्ताविक -**

१९९० च्या दशकातील अजय कांडर हे एक महत्त्वाचे कवी म्हणून ओळखले जातात.' आवानओल' , ' हत्ती इलो ' (दीर्घकवितासंग्रह ) आणि आता बहुचर्चित असणारा दीर्घकवितासंग्रह म्हणजे ' युगानुयुगे तूच ' हा कविता संग्रह .'युगानुयुगे तूच' या दीर्घकवितासंग्रहातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा व त्यांच्या विचारांचा आढावा घेतलेला आहे.आजच्या वास्तव परिस्थितीचा विचार केला तर संपूर्ण सामाजिक ,राजकीय, सांस्कृतिक विचारांत अराजकता माजली आहे.सामाजिक विघटन तर पराकोटीला पोहचली आहे.अशा परिस्थितीत समाजाला एकसंध राहणे गरजेचे आहे नाही तर समाजाचे विघटन व्हायला वेळ लागणार नाही. समाजातील ही वास्तव परिस्थिती कवी अजय कांडर डोळसपणे पाहतात. तेव्हा त्यांना समाजातील वैचारिक भिन्नता प्रखरपणे जाणवते. अशावेळी समाजातील अनेक थोर नेत्यांनी महात्मा फुले ,शाहू महाराज ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचा विचारांचा समाजाला विसर पडत आहे हे जाणवते.त्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्यातून व विचारांतून समाज क्रांती करून ऐतिहासिक कार्य केले.त्यांच्या विचारांची आज समाजाला खरी गरज आहे. हे कवी अजय कांडरांनी ओळखले व त्यांच्या विचारांशी बांधिलकी असलेला हा कवी बोलू लागतो की ,' युगानुयुगे तूच ' होय.

**उद्दिष्टे -**

१) ' युगानुयुगे तूच ' या दीर्घकवितासंग्रहातील निर्मिती मागील प्रेरणांचा शोध घेणे .

२) ' युगानुयुगे तूच ' या दिर्घकवितासंग्रहातून स्पष्ट होणाऱ्या ऐतिहासिक घटनांचा परामर्श घेणे .

३) ' युगानुयुगे तूच ' या दीर्घकवितासंग्रहातून सामाजिकतेवर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पद्धती-** प्रस्तुत शोधनिबंधात 'युगानुयुगे तूच' या दिर्घकवितासंग्रहाचा विचार केला आहे. तसेच वर्णनात्मक ,विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**विषय विवेचन -**

१९८० च्या दशकात समाजात परिवर्तनाचे वारे वाहू लागले होते. शिक्षणाचा प्रसार ही हळूहळू होत होता. परंतु दलित समाज या सा- यांमध्ये राहून अलिप्त होता.त्यांचा साधा स्पर्श ही विटाळ मानला जात होता.त्यांचे जगणेच या प्रस्थापित समाजाने नाकारले होते.अशा या दलित ,वंचित ,बहुजन समाजात क्रांतीची ज्योत पेटवली ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी. या समाजाला माणूस म्हणून जगण्याचे हक्क बहाल केले. ' शिका ,संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र समाजास दिला." बाबासाहेब जन्माला आले नसते तर...हा अतिशय अंतर्मुख करणारा प्रश्न आहे .कोणत्याही सर्वहारा व सर्व वंचित समाजाला शब्द व भाषा देणारा महापुरुष लाभावा लागतो .त्याशिवाय समाजाची मानसिकता बदलत नाही आणि दिशा ही प्राप्त होत नाही. स्वतः ची स्वतंत्र न नवी मुद्रा देणारा हा महापुरुष काळाला वाकवून नवा इतिहास निर्माण करीत असतो.डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर युगनिर्माणकर्ते ."१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजाबरोबरच स्त्रियांच्या ही उन्नतीसाठी अहोरात्र झटणारे नेते. खरचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाजात जन्माला आलेच नसते तर हा दलित समाज आजही उन्नती साधू शकला नसता .गावकुसाबाहेर फेकल्या गेलेल्या व उच्चभ्रू समाजाने नाकारलेल्या या समाजास नवी दिशा ,जाणीव दिलीच पण त्याबरोबर समग्र मानवजातीच्या कल्याणाचे महान कार्य त्यांनी केले. त्यांच्या या वैचारिक क्रांतीचा जागरच जणू कवी कांडर प्रस्तुत दिर्घकवितासंग्रहातून करतात.

**' युगानुयुगे तूच ' मधील ऐतिहासिक क्रांतीकारक विचार -**

'युगानुयुगे तूच ' या दिर्घकवितासंग्रह लेखनामागे कवी अजय कांडर याची एक दृष्टी आहे ती म्हणजे आंबेडकरी विचारातून निर्माण झालेली परिवर्तनवादी दृष्टी .सम्यक क्रांतीची वैचारिकता व आंबेडकरी प्रबोधनाचा विचार घेऊन त्यांची कविता दिसते.शिक्षण, महाडचा सत्याग्रह ,काळाराम मंदिर प्रवेश ,स्त्रियांच्या उन्नतीसाठी हिंदू कोड बील

,धर्मात्तराची घटना अशा कितीतरी ऐतिहासिक क्रांतीकारक घटनांचे पडसाद जनमानसात उमटले.जणू मुका झालेल्या समाजाला वाचा दिली.. दलित ,शोषितांना ,आत्मसन्मान ,आत्मभान ,आत्मस्वाभिमान जागृत केले.माणसातला माणूस ओळखून त्यांच्यावर प्रेम करायला शिकविले. वंचित बहुजन शोषित समाजाला चिखलातील दलदलीतून बाहेर काढणारे खरेखुरे मुक्तीदाते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

"दलितांच्या मानवी हक्कांसाठी डॉ. बाबासाहेबांनी त्या वेळी महाडचा चवदार तळयाचा लढा व नाशिकच्या काळाराम मंदिराचा सत्याग्रह खूप शर्थीने लढविलेला आणि त्या अभूतपूर्व घटनांनी सा-या दलित समाजात एक प्रकारचे नवचैतन्य संचारले." २कवी म्हणतो की ,तू पाण्यालाच चवदार बनविलेस.आणि जगण्याची अस्मिता दिली.

ज्यांनी दिला पाण्याला आपल्याच वर्णाचा रंग
आणि ज्यांनी पसरवली
पाण्यात विषमतेची विषमल्ली
त्यांच्या विरोधात तू उभा होतास

ही साधी ,सोपी घटना नव्हती .तर जात,धर्म, पंथ यांच्या पलीकडे जाऊन तू माणसाला माणूस म्हणून जगायला शिकविलेस.या समाजात किड्यामुंग्यांना जगण्याचा अधिकार होता .गुरंढोरं यांना पाणी पिण्यास मुभा होती .फक्त बंदी होती ती दलित अस्पृश्य समाजाला.पाण्यासाठी वणवण भटक-या या तहानलेल्या जीवाला तृप्त करण्यासाठी महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह करून असंख्य बहुजन तहानलेल्या समाजास तृप्त केले.पाण्याला ना रंग असतो ,ना गंध असतो .पाणी फक्त पाणी असतं हे प्रथमच समाजास दाखवून दिले. खरं तर हा संघर्ष फक्त पाण्यासाठी नव्हता.तर दलित, वंचित ,बहुजन समाजाच्या जगण्याचा होता.

**'युगानुयुगे तूच 'मधील शैक्षणिक विचार -**

' डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अडाणी ,अज्ञानी जनतेला पहिला कोणता मूलमंत्र दिला असेल तर तो होता शिक्षणाचा ' ३ शिक्षणाने माणूस डोळस होतो त्याचबरोबर त्याला स्वत्वाची जाण व स्वाभिमान ह्या दोघांची ही वाढ होते.आपल्या आचारात --विचारात प्रगल्भता येते .त्यामुळे शिक्षणाशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाही जो आपली उन्नती करू शकेल .आपल्याला अन्यायकारक दास्यातून सहीसलामत बाहेर पडायचे असेल तर शिक्षण घेऊन वैचारिक प्रगती रूंदावली पाहिजे. त्यासाठी 'पुस्तकांसारखा दुसरा मित्र नाही ' तसेच शिक्षण हे वाघासारखे असते.ज्याने ते घेतले तो डरकाळी फोडल्याशिवाय राहणार नाही असे ते तमाम जनतेला आवर्जून सांगतात. ज्ञानाची कवाडे सतत खुली ठेवा. रिकामी डोके सैतानासारखे असते त्याला वेळीच आवर घालण्यासाठी पुस्तकांकडे वळा असा मोलाचा संदेश देतात. आपल्या कृती उक्तीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पटवून देतात. ज्ञानाचे चालते- बोलते भांडार म्हणून आपल्या या महामानवांकडे पाहिले जाते.परंतु आजचा हा समाज ख-या अर्थाने शिकू लागला.शिक्षणाने अर्थाजन करू लागला.स्वतः ची प्रगती साधली .पण ' अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणे ' या म्हणीप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार समजून घेऊन त्याप्रमाणे मार्गक्रमण करणारा मानव कमी होत आहे. चांगल्या - वाईटाचा विचार करणेच त्याने थांबविल्याने तो भ्रमिष्ट होऊन पुन्हा एकदा जुन्याच मार्गावर भ्रमंती करू पाहतो आहे.याची खंत कवीला वाटते.आणि आंबेडकरी विचार नसानसात भिनलेला कवी सांगू लागतो -

पुस्तकांचा लळा लागो
लागो ज्ञानाची आस
असे म्हणत पुस्तकांसाठी भ्रमण होत राहिल
तेव्हाच तर तुझा ग्रंथविचार अंगाअंगात भिनत जाईल

ज्ञानाची आस सम्यक परिवर्तनाकडे घेऊन जाईल .डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथाशी असलेले नाते माहिती नाही असा मानव या भूतलावर सापडणे विरळ.

**'युगानुयुगे तूच ' मधील स्त्रीविषयक विचार -**

दलित शोषित समाजाबरोबरच स्त्रीला ही हीन वागणूक दिली जात होती.'चूल आणि मूल' हेच तिचे विश्व समजून दिला दासी बनवून ती भोगवस्तू म्हणून तिच्याकडे पाहिले जाई.अशा स्त्रीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले .त्याच्यात आत्मविश्वास निर्माण केला.तिचा सन्मान करून जगण्याचा अर्थ दिला.तो हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून " समग्र भारतीय स्त्री बरोबरच दलित स्त्रीलाही कायद्याने अधिकार दिले .हे अधिकार हिंदू धर्मग्रंथांनी हजारो वर्षे नाकारले होते.'हिंदू कोड बिल 'म्हणजे स्त्री मुक्तीचा जाहीरनामाच "-४ असे जे डॉ. छाया निकम म्हणतात ते वस्तुनिष्ठ आहे.जसा काळ बदलला,परिस्थिती बदलली ,स्त्री सुशिक्षित झाली आत्मनिर्भर झाली. तिच आज पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रात आघाडीवर असलेली दिसते.याचे सारे श्रेय आपल्या महान नेत्यांच्या त्यागाचे आहे.त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांची उचित दखल घेतली.

' युगानुयुगे तूच ' या दीर्घकवितासंग्रहात कवीने स्त्रियांची दीर्घ संवेदना मांडली आहे.ही संवेदना 'आजी ' या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून पुढे सरकत सरकत आधुनिक स्त्रीकडे येऊन थांबते.ही स्त्रीची वेदना कवीच्या प्रत्येक शब्दातून गहिरी होते.यातूनच कवीचा स्त्रीकडे पाहण्याचा उदात्त हेतू स्पष्ट होतो.कवी म्हणतो -

आजी म्हणायची
ज्या घरात बाईचा सन्मान राखला जाईल
ते घर आपलं समजावं
आणि
जो महापुरुष बाईला स्वातंत्र्य देण्यासाठी झटेल
तोच समजावा सा-या समाजाचा

' आजी' च्या रूपातून स्त्रीला उमगलेले शहाणपण सांगतो.समग्र स्त्रीला आत्मभान दिले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी .जर घरातील एक स्त्री शिकली तर ती संपूर्ण कुटुंबाला शहाणे करते असे म्हटले जाते .डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिला परिषदेत म्हणाले होते की ,' समाजाची प्रगती तपासायची असेल तर त्या समाजातील स्त्रिया किती शिकलेल्या आहेत यावरून करावी.'५ यातूनच हळूहळू तिला तिच्या हक्काची जाणीव झाली. तिच्या संघर्षाचा लढा सुरू झाला.आणि स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीने आली ही सारी किमया या महामानवांच्या विचारांची होती.आताची स्त्री प्रश्न विचारत नाही तर कसे सोडवावेत याविषयी आपली ठाम मते नोंदविते. कित्येक वर्षे स्त्रीला जे जे हक्क अधिकार नाकारले गेले तेच हक्क ,अधिकार तिला स्वाभिमानाने बहाल झाले. मुलीला समाजात परक्याचे धन मानले जाते अशा मुलीला आज वडिलांच्या संपत्तीत वारसाहक्काने वाटा मिळण्याची तरतुद केली आहे.स्त्रीच्या उन्नतीसाठी अनेक योजना ,कायदेकानून करून जणू तिचा सन्मान केला आहे.परंतु आजही स्त्रीकडे पाहण्याचा समाजा दृष्टिकोन बदलत नाही ही खंत कवीला वाटते.म्हणूनच कवी स्त्रीच्या पूर्वसंचिताची रूपे आठवू पाहतो.

**' युगानुयुगे तूच ' मधील सामाजिक विचार -**

डॉ. बाबासाहेबांन दलित समाजाला शोषणाच्या विळख्यातून बाहेर काढून जगण्याचा नवा आयाम दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित समाजाचे नेते झाले. जणू या समाजाने त्यांना देवत्व बहाल केले.परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दैवत्व नको होते.त्यांना त्यांच्या विचारांची कास धरणारा समाज ,अनुयायी हवा होता.पण आज हा समाज त्यांच्या विचारांच्या दिशेने पाऊल टाकण्याऐवजी तो त्यांच्या प्रतिमेत अडकला जातोय ही खंत कवी अजय कांडर व्यक्त करतात.तर दुसरीकडे असेही म्हणतो की ,

तुझी अपूर्वाई एवढी की
या भूमीवरच्या
प्रत्येकाच्या हातात
दिलास विचारांचा नवा दिवा

डॉ. बाबासाहेबांनी दलित शोषित वंचित समाजाला दिशा दाखवली नाही तर समग्र मानव जातीला नवा विचार दिला.स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ,' गुलामाला गुलामाची जाणीव करून दिली तर तो पेटून उठतो ' ६ याच विचारांनी त्यांनी समाजाला शोषणाची ,अन्यायाची जाणीव करून देऊन सन्मानाने जगण्याचा अधिकार देऊन

माणूसकीची ज्योत मानवात प्रज्वलित केली.स्वातंत्र्य ,समता ,बंधुता याचा स्वीकार करून देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढतालढता माणसांच्या स्वातंत्र्यासाठी लढत राहिलेत.मात्र आज वंचित ,बहुजन समाजातील दु:खांना आपलेसे करून सम्यक मार्ग दाखविणारा पुढारीच नसल्याने समाज एकसंध नाही .

भारत देश स्वतंत्र होऊन कित्येक वर्षे लोटली तरीही मूलभूत गरजांसाठी संघर्ष होताना दिसतो.तर दुसरीकडे 'जात' ही समाजाला लागलेली कीड अधूनमधून डोके वर काढतेच." जाता नाही जात ' ही म्हण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या याच उद्वेगपूर्ण उद्गारातून जन्माला आलेली आहे."७ असे स्पष्ट दिसते .या सामाजिक समस्येचा ही खोलवर जाऊन विचार केला.हिंदू समाज हा जातीच्या विळख्यात अडकलेला असल्याने धर्मांतर केले. या क्रांतीकारक निर्णयाने समग्र मानवजातीला माणसासारखे जगणे बहाल केले.

तू फक्त माणूस वाटलास माणसांसाठी झटणारा
म्हणूनच तू झालास माझ्यासाठी
युगानुयुगांचा नायक !

समस्त मानवजातीचे कल्याण करणारा नेता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कवीच्या मनातील खरे नायक ठरतात.

**समारोप -**

' युगानुयुगे तूच ' या दीर्घकवितासंग्रहातून कवी अजय कांडर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा आढावा घेतला आहे खरा पण एकाच माणसाने आपल्या समाजाबरोबरच इतर समाजाचाही विचार करणारा हा महामानव समाजात आपल्या विचारांनी आजही जिवंत आहेत हेच मांडलेले दिसून येते.आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेल्या कवी आपल्याला प्रत्येक पानावर सापडतो. "जाती ,धर्माच्या नावाने आजवर एवढं बिघडवलं त्या सर्वांना " या अर्पणपत्रिकेतूनचं कवीने वास्तवावर बोट ठेवले आहे.इतकी वर्षे लोटूनही जात ,धर्माच्या पलीकडे जाऊन कोणीही विचार करत नाही. आजही सामाजिक ,सांस्कृतिक ,राजकीय परिस्थिती 'जैसे ते तैसे' आहे.समाजात अनेक सामाजिक प्रश्न फणा वर काढत आहे.समाजातील हे सामाजिक विघटन थांबविण्यासाठी आंबेडकरी विचार हेच अंतिम सत्य आहे.या विचारापर्यंत एकट्याने केलेला प्रवास समष्टीकडे आणून ठेवतो.यातच कवी अजय कांडर यांच्या कवितेचे यश आहे.हे सत्य ओळखूनच कवी म्हणतो ' 'युगानुयुगे तूच '...!

**निष्कर्ष -**

१) कवी अजय कांडर यांच्या 'युगानुयुगे तूच ' या दीर्घकवितासंग्रहात आंबेडकरी विचारांचा प्रभाव असल्याचे स्पष्ट होते.

२) ' युगानुयुगे तूच ' या दीर्घकवितासंग्रहातून कवीने आंबेडकरी विचारांची ज्योत बहुजनांपर्यंत पोहोचवली.

३) आजच्या परिस्थितीत अराजकता थोपविण्यासाठी महामानवांच्या विचारांकडे वळावे लागेल हा मौलिक विचार स्पष्ट होतो.

**संदर्भ पुस्तके -**

१) अजय कांडर ,युगानुयुगे तूच ,लोकवाड्.मय गृह प्रकाशन ,मुंबई ,२०१९

२)डॉ. छाया द.निकम ,दलित स्त्री मुक्ती चळवळ प्रेरणा व स्वरूप , सुविद्या प्रकाशन,पुणे,२०१०

३) प्रा. सिद्धार्थ तांबे , जाता नाही जात ,शब्दालय प्रकाशन ,श्रीरामपूर, २००७

४)संपा.डॉ. गंगाधर पानतावणे ,दलित साहित्य चर्चा आणि चिंतन ,साकेत प्रकाशन,औरंगाबाद ,१९९३

५) प्रा.वामन निंबाळकर ,आंबेडकरी विचारांची दिशा , चंद्रकांत प्रकाशन ,नागपूर ,२००७

# सहकारातून आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास

***सौ. योगिनी जयवंत पाटील***

*सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर, ता. पालघर, जि. पालघर*

सहकाराचे मानवी जीवनातील महत्व अनन्यसाधारण आहे. जो प्रश्न, ज्या समस्या एक व्यक्ती सोडवू शकत नाही तो प्रश्न, त्या समस्या एकमेकांच्या मदतीने सहज सोडवता येतात. या दृष्टीने सहकाराला उजाळा देण्याचा प्रयत्न या शोध निबंधातून केला आहे. भारत हा खेडयांचा देश आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासात ग्रामीण अर्थव्यवस्था ही अत्यंत महत्वाची आहे. भारतात ग्रामीण भागाच्या विकासाचे व शेती विकासाचे साधन म्हणून सहकाराला महत्वाचे स्थान दिले गेले. एकमेकांना सहाय्य करणे, एकत्रित काम करणे, एकत्रित राहणे, एकत्र येऊन समस्या, प्रश्न सोडवणे, एकमेकांच्या विकासासाठी केलेले प्रयत्न, एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी असलेली तळमळ म्हणजेच सहकार असे सहज सोप्या शब्दात सांगता येईल. सध्याचे पतंप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी तर "सबका साथ - सबका विकास - सबका विश्वास'असा नारा देऊन त्यांचा सहकारावर असलेला विश्वास, श्रद्धा जाहीरपणे व्यक्त केला आहे. सहकाराचा उगम एखाद्या देशात, एखाद्या व्यक्तीमुळे झाला असे म्हणणे अवास्तव ठरेल कारण ज्या क्षणी माणूस जन्माला आला त्या क्षणी सहकाराचा उदय झाला. आधुनिक सहकाराचा उगम मात्र 18 व्या शतकात इंगलमध्ये झाला. त्यानंतर संपूर्ण जगभर सहकारातून विकास साधण्यासाठी प्रयत्न सुरू केले. भारतातही बारा पंचवार्षिक योजना व सध्याचा निती आयोग याद्वारे सहकाराला महत्व दिले आणि सहकारातून विकास साधण्याचे अविरत प्रयत्न सुरू झाले. सहकारातून साधला जाणारा विकास हा शाश्वत असतो, चिरस्थायी असतो कारण असा विकास सर्वांच्या प्रयत्नातून, सर्वांच्या मदतीने सर्वांसाठी झालेला असतो. याची जाणीव, याचे महत्व सर्वांना असते म्हणून तो शाश्वत असतो. म्हणूनच गांधीजींनी सहकाराचे तत्व अंगीकारले. याचे परिणाम स्वरूप मिळालेले स्वातंष्य आजही अखंडीत, शाश्वत टिकून आहे. मात्र कालौघात सहकार क्षेत्र मागे पडले. सहकारी संस्थांमधील अकार्यक्षमता, भ्रष्टाचार वाढला आणि सहकाराबाबत लोकांच्या मनात उदासिनताही वाढत गेली. आपण भारतातील आदिवासी समुदायाचा विचार केला तर आजही हा समाज आपल्या अस्तित्वासाठी सातत्याने झूंज देत आहे. आदिवासी लोकांच्याही आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था, मासेमारी संस्था, मीठ उत्पादक संस्था अस्तित्वात आहेत, मात्र त्या कार्यक्षमपणे कार्य करताना दिसत नाहीत. यांची संख्या देखील अगदी कमी आहे. पालघर जिल्हयाचा विचार करता एप्रिल 2018 पर्यंत एकूण 8642 सहकारी संस्थांपैकी केवळ 4 ते 5 टक्के सहकारी संस्था आदिवासी सहकारी संस्था आहेत. संपूर्णपणे आदिवासी जिल्हा म्हणून नावारूपाला आलेल्या जिल्हयात केवळ 4 टक्के ते 5 टक्के आदिवासी सहकारी संस्था असणे यासारखी शोकांतिका नाही. त्यामुळे आदिवासींच्या सहकारी संस्था स्थापन होणे, अस्तित्वात असलेल्यांची कार्यक्षमता वाढवणे व बंद पडलेल्या संस्थांचे पुनरूज्जीवन करणे आवश्यक आहे. आदिवासी बांधवांना त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी गरज होती ती समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकांची, निसर्गातील विविध घटकांची आणि त्याहीपेक्षा जास्त परस्परांवरील विश्वास, परस्पर सहकार्य, समान विचार, समान आकांक्षा यांनी प्रेरित होण्याची म्हणजेच सहकाराची ! सहकारातून नेहमी चांगल्याचीच निर्मिती होत असते. मधमाशांच्या सहकारातन जसे सत्वयुक्त मध, मेण इ. ची निर्मिती होते त्याप्रमाणे आदिवासी बांधवांच्या एकत्रीत प्रयत्नातून, सहकारातून त्यांचे उज्ज्वल भवितव्य उदयास येईल आणि त्यांचे जीवन उजळून निघेल यात शंका नाही.

संशोधनाची उद्दिष्टये :-

1) सहकाराचे आदिवासी विकासातील महत्व अभ्यासणे.2) सहकाराचे आदिवासी जीवनातील सामाजीक व आर्थिकदृष्टया महत्व अभ्यासणे. 3) सहकाराचे आदिवासी महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्व अभ्यासणे. 4) सहकाराच्या माध्यमातून आदिवासींसाठी शाश्वत रोजगार उपलब्ध होतो याची जाणीव करून देणे. 5) सहकाराच्या माध्यमातून आदिवासींना त्यांच्या समस्या सोडवण्यास प्रवृत्त करणे.6) सहकाराच्याद्वारे नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर करून विकास साधता येतो याची जाणीव करून देणे.

संशोधनाची गृहितके :

1. सहकाराच्या माध्यमातून आदिवासींच्या विकासास सहाय्य होते. 2) सहकारामुळे आदिवासींचा सामाजिक व आर्थिक विकास होण्यास मदत होते. 3) सहकाराच्या माध्यमातून आदिवासी महिलांचे सक्षमीकरण होण्यास मदत होते. 4)

सहकारातून आदिवासींसाठी शाश्वत रोजगार उपलब्ध होतो. 5) सहकाराच्या माध्यमातून आदिवासींच्या समस्या सोडवण्यास मदत होते. 6) सहकाराच्या माध्यमातून आदिवासींना विविध सवलती मिळतात. 7) सहकाराबाबत आदिवासींमध्ये उदासिनता जाणवते.

संशोधन पध्दती :- सदर संशोधन करताना संशोधन विषयाशी संबंधित विभागातून प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून माहिती जमा केली.

**महत्व :-**

1) शेती विकास :- सहकारी तत्वावर शेती केल्याने आदिवासी शेतकर्यांचे लहान धारणाक्षेत्राचे प्रश्न सुटतील, मोठया शेतीचे फायदे, कायम स्वरूपी शेती सुधारणा शकय होतील. आदिवासी शेतकी सहकारी संस्थाद्वारेही विविध लाभ मिळतील व शेती विकास होण्यास मदत होईल.

2) जंगलावर आधारित उद्योगांचा विकास :- जंगलावर आधारित लाकूड उद्योग, मध, मेण, लाख गोळा करणे विविध वनोत्पादने गोळा करून त्यावर आधारित उद्योगांचा विकास हा आदिवासींच्या जंगल सहकारी संस्था स्थापून केल्यास भांडवल, श्रम इ. समस्या भेडसावणार नाहीत.

3) महिलांचा विकास :- बचत गट हे सहकाराचे एक रूप आहे. आदिवासी महिलांचे बचत गट स्थापून, आदिवासी महिलांच्या सहकारी संस्था स्थापून त्याद्वारे त्यांना विविध जंगलावर आधारित उद्योजकाता विकास साधणे व आदिवासी महिलांचे सक्षमीकरण साधणे शक्य होईल.

4) युवक व युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराची उपलब्धता :- आजचा आदिवासी युवक हा शिकलेला आहे. काम करण्याची जिद्द त्यांच्यात आहे. सहकाराच्या माध्यमातून त्यांना आवश्यक शिक्षण - प्रशिक्षण, मदत व रोजगाराच्या संधीची उपलब्धता होऊ शकते.

5) सावकाराच्या पाशातून मुक्तता :- सहकारी संस्थांचे विविध लाभ उदा. आर्थिक सवलती, मदत कर्ज इ. यामुळे तसेच सहकारी तत्वावरील उद्योग, शेती यांच्या उभारणीमुळे आदिवासींना रोजगार मिळेल त्यांचे कर्ज विषयक प्रश्न सुटतील व सावकाराच्या पाशातून मुक्तता होईल.

6) राहणीमान व जीवनमान सुधारणा :- सहकारामुळे आदिवासींचे आर्थिक प्रश्न हळूहळू सुटतील. त्यांचे राहणीमान व जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

7) उत्पादनात वाढ :- सहकारी शेती, सहकारी प्रक्रिया उद्योग इ. मुळे जोखीम विभागली जाईल. भांडवल गुतवणूक करणे शक्य होईल व उत्पादनातही वाढ होईल.

8) स्वतंत्र व स्वावलंबी जीवन :- सहकारामुळे हळूहळू आर्थिक दृष्टया आदिवासी लोक स्वयंपूर्ण होऊन ते स्वतंत्र व स्वावलंबी जीवन समर्थपणे जगू शकतील.

9) आदिवासी संस्कृतीचे संवर्धन व जतन :- स्त्रीयांच्या बचत गटाद्वारे, सहकारी संस्थांद्वारे आदिवासी संस्कृतीचे संवर्धन व जतन करणे शक्य होईल.

10) शिक्षण , प्रशिक्षण व कौशल्यात वाढ :- आदिवासींमध्ये जन्मत: असलेली निसर्गाशी समरस होण्याची कला, उपयुक्त असे जंगलातील विविध घटक ओळखणे यावर आधारित उद्योग उभारणीसाठी सहकाराद्वारे शिक्षण प्रशिक्षण व कौशल्यात वाढ घडवून आणता येईल.

अडचणी व मर्यादा :-

1) संस्थेची नोंदणी व कार्यपध्दती किचकट :- सहकारी संस्था व बचत गट स्थापन झाल्यानंतर त्यांची नोंदणी करणे कार्यपध्दती यामध्ये आदिवासी बांधवांना शिक्षण - प्रशिक्षण अभावी अडचणी येऊ शकतात.

2) भांडवल व कर्जपुरवठा अभाव :- सहकारी संस्था स्थापन करून त्याद्वारे शेती किंवा अन्य व्यवसाय सुरू करण्यास आवश्यक भांडवल व कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्यास सहसा बँका तयार नसतात.

3) भाग भांडवल उभारणीचा प्रश्न :- सहकारी संस्था स्थापनेत भाग भांडवल घटक महत्वाचा आहे. मात्र आर्थिक दुर्बलतेमुळे आदिवासींसमोर भाग भांडवलाचा प्रश्न राहू शकतो.

4) अकार्यक्षम व्यवसथापन :- शिक्षण, प्रशिक्षणाचा अभाव, कौशल्याचा अभाव यामुळे सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात अडचणी उद्भवतात.

5) सहकारी अधिकारी व कर्मचार्यांची उदासिनता :- सहकाराशी संबंधीत शासकिय अधिकारी व कर्मचारी यांची उदासिन प्रवृत्ती ही मोठी अडचण यामध्ये ठरू शकते.

6) प्रशिक्षण व मार्गदर्शनाचा अभावा :- सहकारी संस्था बचतगट याची कार्यपध्दती सुरळीत चालू राहण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण व मार्गदर्शन आदिवासींना मिळत नाही.

7) राजकीय हस्तक्षेप व भ्रष्टाचार :- राजकीय हस्तक्षेपामुळे स्वार्थी प्रवृत्ती वाढीव लागते, भ्रष्टाचार वाढतो व मूळ उद्देशापासून संस्था भरकटली जाते.

**निष्कर्ष व शिफारशी :-**

1) सहकारामुळे आदिवासी शेतकर्यांच्या शेती विकासाला मदत होत आहे.

2) सहकारामुळे वनांवर आधारित उद्योगांच्या विकासाला चालना मिळत आहे.

3) सहकारामुळे वेठबिगारी, गुलामगिरी व अल्प मजूरीतून होणारी पिळवणूक यापासून मुक्तता होण्यास मदत मिळते.

4) व्यापारी व दलाल यांच्याकडून होणारी फसवणूक व पिळवणूक थांबवण्यास मदत होत आहे.

5) आदिवासी महिला स्वावलंबी, आत्मनिर्भर बनण्यास मदत होत आहे.

6) आदिवासींचे जीवनमान व राहणीमान यात वाढ व त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास होत आहे.

7) आदिवासी जीवनाला स्थिरता व सातत्य प्राप्त होत आहे.

8) सहकारामुळे आदिवासी लोकांमध्ये रोजगार व स्वयंरोजगारात वाढ होण्यास मदत होत आहे.

9) आदिवासींमध्ये युवक युवतींमध्ये उद्योजकता विकासाला मदत होत आहे.

10) सहकाराबाबत आदिवासींमध्ये जाणीव व जागृती करणे आवश्यक आहे.

11) आदिवासी सहकारी संस्थांमध्ये वाढ व त्यांचा विकास करणे यासाठी शासकिय पातळीवरून प्रयत्न होणे आवश्यक आहे.

12) आदिवासी सहकारी संस्थांना भांडवल व कर्ज पुरवठयात वाढ करण्यासाठी शासकिय मदत आवश्यक आहे.

13) सहकार विषयक शासनाच्या आदिवासी समुदाया बाबतच्या धोरणात आणखी विशेष सवलती देणे आवश्यक आहे.

14) शासकीय स्तरावरून किंवा एन.जी.ओ. मार्फत आदिवासींना सहकाराबाबतचे शिक्षण प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

15) आदिवासी महिलांनी सहकारी चळवळीत जास्तीत जास्त सहभाग घेणे आवश्यक आहे.

16) सहकारी चळवळीत आदिवासी तरूण - तरूणींनी उत्सर्फुतपणे सहभाग घेणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :-**

1) सहकार - बिरादार माधव

2) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था - मंगला जंगले

3) शेतीचे अर्थशास्त्र - गंगाधर कायंदे पाटील

4) सहकार - गंगाधर कायंदे पाटील

5) वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम 2017-18 - महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग.

# शेती व्यवसायात स्त्री शेतकरी संख्येत वाढ करणे ही काळाची गरज

*डॉ. जयवंत काशिनाथ पाटील*

*पी. एल. श्रॉफ कला व वाणिज्य महाविद्यालय, चिंचणी, ता. डहाणू, जि. पालघर*

**प्रस्तावना :**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतातील 70 टक्के लोकसंख्या आजही शेती व्यवसायावर अवलंबून आहे. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटाही महत्वाचा आहे. भारतात प्राचीन काळापासून शेती हा व्यवसाय पारंपारीक पद्धतीने केला जात होता यामध्ये स्त्रियांचा शेतीतील सहभाग महत्वाचा मानला जात होता. स्त्रियाच प्रामुख्याने शेती व्यवसाय सांभाळण्याचे काम करीत होत्या. भारतीय पुरूषप्रधान संस्कृतीमुळे कुटुंबातील कर्त्या पुरूषाला प्राधान्य दिले जात असून स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते त्यामुळे शेतीकरण्याचा वारसा पुरूषाकडे येत असल्यामुळे शेतकरी म्हणवून घेण्याचा मान पुरूषानांच प्राप्त झाला व स्त्रि शेतकरी म्हणून ओळख करून देण्याचा मान आजही स्त्रियांना प्राप्त झालेला नाही कारण स्त्रिया शेतीत मजूर म्हणून काम करतात, त्यांच्या श्रमाची दखल घेतली जात नाही स्त्रिया घरकाम करून उरलेल्या वेळात काम करीत असल्याने त्यांच्या कामाचे स्वरूप हे अर्धवेळ असते. त्यांच्या कामाचा दर्जा कनिष्ठ असतो, त्या पुरूषांसारखी अंगमेहनतीची कामे करू शकत नाही, त्यांची कार्यक्षमता पुरूषांपेक्षा कमी असते, त्यांची निर्णय क्षमता कमी असते. त्या आर्थिकदृष्टया परावलंबी असतात अशा चुकीच्या कल्पना समाजामध्ये रूढ झाल्यामुळे शेतीमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या सर्वाधिक असताना देखील त्यांना कनिष्ठ दर्जा दिला जातो. श्रमबाजारपेठेत त्यांची योग्य दखल घेतली जात नाही म्हणूनच आजच्या आधुनिक काळात शेती व्यवसायात स्त्रि शेतकरी म्हणून त्यांचा सहभाग वाढविणे ही काळाची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) शेती व्यवसायातील स्त्रियांच्या श्रमाचे महत्व अभ्यासणे.

2) 'स्त्रि शेतकरी' म्हणून शेती व्यवासायातील स्त्रियांच्या योगदानाचे महत्त्व अभ्यासणे.

3) शेती व्यवसायातून महिला सक्षिमीकरणाच्या दृष्टीने महत्त्व असभ्यासणे.

4) शेती व्यवसायात महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर उपाय सुचविणे.

**संशोधनाची गृहीतके :**

1) शेती व्यवसायामुळे स्त्रिया आत्मनिर्भर व स्वावलंबी बनतात.

2) शेती व्यवसायामुळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळते.

3) शेती व्यवसायामुळे स्त्रियांचा सामाजिक व आर्थिकदर्जा उंचावण्यास मदत होते.

4) शेती व्यवसायामुळे ग्रामीण विकासाला चालना मिळते.

5) शेती व्यवसायामुळे स्त्री उदयोजकता विकासाला चालना मिळते.

संशोधन पद्धती : सदर संशोधन करताना संशोधन विषयाशी संबंधीत माहिती प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करून प्राप्त केली.

**शेती व्यवसायाच्या विकासातील स्त्रियांचे महत्त्व :**

1) स्त्री शेतकरी संख्येत वाढ - शेती क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढल्याने स्त्री शेतकरी संख्येत वाढ होण्यास मदत होते.

2) शेतमजूर स्त्रियांचे प्रमाण जास्त - शेती व शेतीपूरक विविध व्यवसायातील स्त्रियांचा सहभाग पुरूषांपेक्षा जास्त असल्यामुळे शेतमजूर स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

3) शेती प्रक्रिया उद्योगात सहभाग - शेती व शेतीपूरक व्यवसायातून उत्वारीत होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया विविध उद्योगात स्त्रियांचा सहभाग वाढत असल्यामुळे ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योगाला चालना मिळत आहे.

4) शेतीपूरक व्यवसायात सहभाग - शेतीला पूरक व्यवसाय म्हणून फार पूर्वीपासून शेतकरी दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळया व मेंढयापालन, मधमाशापालन, मासेमारी इत्यादी विविध व्यवसायात महिलांचा सहभाग जास्त असल्यामुळे ग्रामीण भागात शेतीपूरक व्यवसायाच्या विकासाला चालना मिळते.

5) शेतमालाची विक्री -ग्रामीण भागात स्थानिक बाजारपेठेत शेतमालाची विक्री करण्याचे बहुसंख्येने काम स्त्रिया करतात त्यामुळे शेतमाल विक्री व्यवस्थेत स्त्रियांचा सहभाग वाढत आहे.

6) शेती निर्णय प्रक्रियेत सहभाग - आजच्या आधुनिक काळात स्त्रियांची क्रियाशीलता वाढत आहे. त्यांच्यामध्ये संखात्मक व गुणात्मकदृष्टया आवश्यक ती सर्जनशीलता वाढत आहे त्यामुळे सहाजीकच शेती निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढत आहे.

7) कृषी उद्योजकता विकासात वाढ - शेतीचया क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग वाढत असल्यामुळे शेतीउत्पादन, शेतीपूरक व्यवसाय, शेतमाल विक्री, शेतमाल प्रक्रिया, बाजारपेठ, निर्यात विपणन इत्यादी विविध क्षेत्रात स्त्रियांच्या उद्योजकता विकासाला संधी प्राप्त होत आहे.

8) अन्न साठवणूक कौशल्य - स्त्रिया पूर्वीपासून कडधान्य, तृणधान्य यांची साठवणूक करण्यात निपुण असल्यामुळे अन्नधान्याची नासाडी कमी होण्यास मदत होते.

9) अन्नसुरक्षा व परसबाग - ग्रामीण भागात स्वयंपाक करण्याची संपूर्ण जबाबदारी स्त्रियांची असल्यामुळे अन्नधान्याचे संरक्षण करणे व परसबागाचा विकास करण्यात स्त्रीया तरबेज असतात त्यामुळे सत्वयुक्त आहार कुटुंबातील सदस्यांना मिळतो.

10) शाश्वत शेतीचा विकास - स्त्रियांचा सहभाग शेती क्षेत्रात वाढल्यामुळे शाश्वत शेतीच्या विकासाला चालना मिळते.

शेती व्यवसाय विकासातील स्त्रियांच्या समस्या व मर्यादा :

1) स्त्रीयांच्या कामाचे स्वरूप अर्धवेळ असते - स्त्रियांना स्वयंपाक व मुलांचे संगोपन ही कौटुंबीक जबाबदारी जास्त असल्यामुळे उरलेल्या वेळेत शेतीची कामे करावी लागतात.

2) श्रमाचा मोबदला किंवा दखल घेतली जात नाही. - स्त्रिाया पुरूषांच्या बरोबरीने शेतीच्या विविध कामात मदत करीत असल्या तरी तिच्या श्रमाकडे दुर्लक्ष केले जाते तिच्या श्रमाचा मोबदला दिला जात नाही.

3) कामाचा दर्जा कनिष्ठ - स्त्रीया पुरूषांइतकी अंगमेहनतीची कामे करीत नसल्यामुळे त्यांच्या कामाचा दर्जा कनिष्ठ असतो.

4) निर्णयक्षमतेचा अभाव - शेतीतील विविध पिकांच्या उत्पादनाबाबत स्त्रियांचा अनुभव कमी असल्यामुळे त्यांच्यामध्ये शेतीसंदर्भात निर्णय घेण्याची क्षमता कमी असते.

5) आर्थिक परावलंबीत्व - ग्रामीण भागात कुटुंबाची जबाबदारी कर्त्या पुरूषाकडे असते त्यामुळे स्त्रिया आर्थिक घटकांच्या बाबतीत परावलांबी असतात.

6) कुटुंबातील स्थान दुय्यम - ग्रामीण भागात पुरूषप्रधान संस्कृतीचा पगडा जास्त असल्यामुळे चुल व मुल सांभाळण्याची जबाबदारी स्त्रियांकडे येते तसेच कुटुंबातील महत्वाचा निर्णय घेण्यामध्ये स्त्रियांना फारसे विचारात घेतले जात नाही.

7) अज्ञान व अशिक्षीतपणा - ग्रामीण भागातील बहुसंख्य स्त्रिया अज्ञान अशिक्षित असल्यामुळे शेतीमधील नवीन तंत्रज्ञान, नवीन बदल, आधुनिक शेतीचे कौशल्य इत्यादीबाबत क्षमता स्त्रियांमध्ये कमी असतात.

8) शेती उत्पन्नाचे प्रमाण कमी - स्त्रियांच्या उत्पन्नातून मिळालेले शेती उत्पादन कमी असते त्यामुळे पैशाची कमतरता जाणवते व कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागविणे शक्य होत नाही.

**निष्कर्ष व शिफारशी :**

1) ग्रामीण स्त्रियांना आत्मनिर्भर व स्वावलंबी जीवन जगण्यास मदत होत आहे.

2) ग्रामीण स्त्रियांना सामाजिक व आर्थिक विकासास मदत होत आहे.

3) ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन मिळत आहे.

4) ग्रामीण भागातील स्त्री उद्योजकता विकासाला हातभारत लागत आहे.

5) ग्रामीण भागातील कुटुंबाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत आहे.

6) ग्रामीण विकासाच्या कार्याला मदत होत आहे.

7) पुरूष प्रधान संस्कृती स्त्रियांच्या विकासाच्या आड येत आहे.

8) ग्रामीण स्त्रियांमध्ये आर्थिक असमर्थता, भांडवल व साधनसामुग्रीचा अभाव दिसून येतो.

9) ग्रामीण भागात स्त्री शेतकऱ्यांच्या संख्येत वाढ होण्याची गती मंद आहे.

10) कृषी क्षेत्रातील अद्यावत तंत्रज्ञान स्त्रियांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

11) स्त्रियांची कार्यक्षमता व उत्पादकतेत वाढ करणे.

12) प्रादेशिक स्तरावर स्त्रीयांमध्ये कृषी अभ्यासक्रम केंद्रे स्थापन करण्यात यावी.

13) कृषी विद्यापीठांनी शेती व्यावसायिक स्त्रियांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

14) राज्यातील प्रत्येक कृषी विद्यापीठामधून कृषी विज्ञान महाविद्यालय सुरू करण्यात यावे व त्यामध्ये 50 टक्के आरक्षण स्त्रियांसाठी असावे.

15) कृषी शिक्षणात ग्रामीण स्त्रियांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

16) ग्रामीण स्त्रीयांच्या साक्षरतेत वाढ करणे.

17) ग्रामीण भागात कृषी व्यावसायिक तरूणींचा सक्रीय सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

18) स्त्री शेतकऱ्यांबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे.

19) स्त्रिया शेती शिक्षण, शेती संशोधन व शेती विचारात सहभाग वाढविणे.

20) ग्रामीण स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन व स्वातंत्र्य प्राप्त करून देणे.

21) ग्रामीण स्त्रियांना शेती क्षेत्रातील घटकांचे प्रशिक्षण प्राप्त करून देणे.

**संदर्भ सूची :**

*1) योजना मासीक फेब्रुवारी 2000*

*2) ॲग्रोवन वर्तमानपत्र जानेवारी 2005*

*3) शेतकरी मासीक फेब्रुवारी 2007*

# चालुक्यकालीन स्थापत्य कलेचा नांदेड जिल्हातील उत्कृष्ट अविष्कार- होट्टल

***डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे***

*पदवी, पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र यशवंत महाविद्यालय,नांदेड*

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून नांदेड जिल्हयास इतिहास व संस्कृतीचा महान वारसा लाभला आहे. प्राचीन कालखंडा पासून ते निजाम कालखंडा पर्यंत नांदेड परिसरावर अनेक नामांकीत घराण्याची राजसत्ता होती. त्यामध्ये प्रामुख्याने वाकाटक, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, वरंगलचे काकतीय व देवगिरीचे यादव हे घराणे होत. या राजघराण्यांनी आपापल्या कालखंडात नांदेड परिसराचा विकास घडवून आणला. त्यासोबतच त्यांनी या परीसराच्या विकासाबरोबर या परिसरात मंदिर स्थापत्य, मुर्तीस्थापत्य शिल्पस्थापत्य तसेच किल्ले आदींची निर्मिती ही मोठया प्रमाणात केली. त्यांनी बांधलेली मंदिरे हिंदु,बौद्ध आणि जैनधर्मीय होती. या काळात बांधलेली बहुतेक मंदिरे शिवमंदिरे होती. कंधार, होट्टल, करडखेड,सगरोळी, खानापूर, येरगी, अर्धापूर, राहेर व नांदेड परिसरात मोठया प्रमाणात बांधण्यात आलेल्या मंदिरामुळे ही नगरे 'मंदिरांची नगरे' म्हणुन ही प्रसिद्धीस आली होती.[1]

विशेष म्हणजे नांदेड जिल्हातील देगलुर तालुक्यात होट्टल, करडखेड, खानापूर, रामपूर, तडखेल, नरंगल, देगलुर, शेळगांव, येरगी, देवापूर, जुना हवरगा, दावणगिर, खुतमापूर, कोक्कलगांव, कारेगांव, आलुर, बिंमा, वझर, मानुर व सुगाव या एकुण साधारणतः 20 गावात कल्याणीच्या चालुक्य काळातील मंदिराचे अवशेष आढळतात.[2]

कल्याणीच्या चालुक्य कालखंडातील नांदेड जिल्हयातील उत्कृष्ट स्थापत्य कलेचा अविष्कार असलेले होट्टल येथील मंदिरस्थापत्य अतिशय महत्वपूर्ण व वैशिष्टयपूर्ण मानले जाते.

कल्याणीच्या चालुक्य काळातील नांदेड जिल्हयातील होट्टल येथील मंदिरे

चालुक्य वंशातील तैलप याने इ.स.973 मध्ये राष्ट्रकुटांचा पराभव करून मराठवाडयावर कल्याणीच्या चालुक्याची सत्ता स्थापन केली.

कर्नाटकातील बीदर जवळ असलेली 'कल्याणी' ही चालुक्याची राजधानी होती. कल्याणीच्या चालुक्याच्या राज्यात उस्मानाबाद, लातूर व नांदेड जिल्हयाचा प्रदेश समाविष्ठ होता. नांदेड जिल्हयात कल्याणीच्या चालुक्याचे 40 शिलालेख प्राप्त झाले आहेत.[3] या शिलालेखाच्या आधारे कल्याणीच्या चालुक्य कालीन मंदिरांची माहिती उपलब्ध होते.

नांदेड जिल्हातील देगलुर तालुक्यात 'होट्टल' हे गाव देगलुरच्या पश्चिमेस 8 कि.मी अंतरावर आहे. होट्टलचे प्राचीन नाव 'पोट्टल' व ' होट्टलुर' असे होते. 'पोट्टल' म्हणजे डोंगर होय. होट्टल हे डांगर माथ्यावर वसलेले असून त्याच्या भौगोलिक स्थितीवरून या स्थलनामाची उत्पत्ती झाली आहे. होट्टल हे उत्तर कल्याणीच्या चालुक्याच्या उपराजधानीचे ठिकाण होते. होट्टल येथील संस्कृत भाषेतील शिलालेखवरून नांदेड जिल्हातील गोदावरी व मांजरा या दोन नद्यांच्या मध्ये राज्य करणा-या वन्हिकुलाची माहिती मिळते. हे वन्हिकुल कल्याणीच्या चालुक्याचे मांडलिक राजे होते. होट्टल ही या वन्हिकुलाची राजधानी होती. चालुक्य सम्राट जयसिंह यांच्या काळात दुय्यम राजधानी म्हणून 'होट्टलकेरे' या स्थानाचा उल्लेख आढळतो. हे 'होट्टलकेरे' म्हणजेच देगलूर तालुक्यातील 'होट्टल'हे होय.[4]

'होट्टल येथील कल्याणीच्या चालुक्यकाळातील अजरामर कलाकृती म्हणून ओळखल्या जाणा-या केवळ चार मंदिरांचे पुरातत्वीय अवशेष सद्यस्थितीमध्ये आढळतात.

अ) सिध्देश्वर मंदिर:

होट्टल गावाच्या पश्चिमेस सिध्देश्वर मंदिर असुन ते पूर्वाभिमुख आहे. हे मंदिर देगलुर तालुक्यातील सर्वोत्तम शिवमंदिर म्हणुन ओळखले जाते.[5] हे मंदिर एका पीठावर 'जगती' वर उभे आहे. 'जगती' उंच असून, पीठाची रचना मंदिराला साजेशी आहे. हे मंदिर सिध्दुगी याने बांधले होते. सिध्दुगी हा वन्हिकुळातील राजाच्या पदरी होता व ते राजे कल्याणीच्या चालुक्यांचे सामंत होते. अशी माहिती या मंदिराच्या नंदिमंडपावर मिळालेल्या लेखावरून स्पष्ट होते.[6]

या सिध्देश्वर मंदिरास एकच गर्भगृह आहे. तसेच मुखमंडप, मंडप, दोन अर्धमंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशी या मंदिराची रचना आहे. मंदिराची ही वास्तु 72 55 फुट आकाराची आहे. पीठाला पाय-या असून, पाय-याच्या दोन्हीबाजुला देवकोष्ठ आहेत.[7] या मंदिराची बाहयबाजु कोनाकृतीपूर्ण दिसून येते. हा पदविन्यास म्हणजे कल्याणी चालुक्य कलेचा मंदिर रचनेचा उत्कृष्ठ नमुना होय.[8]

ब) रेब्बेश्वर मंदिर:

रेब्बेश्वर मंदिर हे होट्टल येथील दुसरे शिवमंदिर असून हे मंदिर सिध्देश्वर मंदिराच्या दक्षिणेस साधारणपणे शंभर फुट अंतरावर आहे. हे मंदिर आत भग्नावशेषात असून त्याचा बराचसा भाग नष्ट झाला आहे. पुरातत्वीय अवशेषावरून या मंदिराचा पदविन्यास, बांधकाम शैली आणि शिल्पकलेची माहिती होते.

कल्याणीच्या चालुक्यकाळात होट्टल येथील रहिवासी आणि चालुक्याचा अधिकारी 'रेब्बनायक' याने या मंदिराचे बांधकाम केले होते. त्यामुळे त्याच्या नावावरूनच या मंदिरास 'रेब्बेश्वर मंदिर' हे नाव प्राप्त झाले आहे.[9]

सिध्देश्वर मंदिराप्रमाणे हे मंदिर दगडामध्ये बांधलेले आहे. या मंदिराची पूर्व-पश्चिम लंाबी 72 फुट आणि दक्षिण - उत्तर रूंदी 55 फुट आहे. या मंदिराचा पदविन्यास, मुखमंडप, मंडप, दोन अर्ध मंडप, अंतराळ, गर्भगृह व स्तंभ असा आहे. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिराची रचना सिध्देश्वर मंदिराच्या रचने समान आहे.[10]

होट्टल येथील रेब्बेश्वर मंदिराची संगीतशीला हे महत्वपूर्ण वैशिष्टये मानले जाते. या मंदिरातील त्या शिळेवर दगडाने आघात केल्याने संगीतातील सा.रे.ग.म.प.ध.नी हे सातही संगीत स्वर प्रतिध्वनीत होतात.11 रेब्बेश्वर मंदिरातील ही संगीतशीला या मंदिराचे अतिशय महत्वपूर्ण वैशिष्टये मानले जाते.

क)सोमेश्वर मंदिर:

होट्टल येथील सोमेश्वर मंदिर हे तिसरे शिवमंदिर आहे. होट्टल गावाच्या पूर्वेस एका शेतात सोमेश्वर हे त्रिदल पद्धतीचे मंदिर आहे. चालुक्य सम्राट विक्रमादित्य सहावा यांच्या शिलालेखात सोमेश्वर या शिव मंदिराचा उल्लेख 'त्रिपुरूषदेव' मंदिर या नावाने केला आहे. कारण या मंदिरात ब्रम्ह, विष्णु, व महेश या देवतांसाठी स्वतंत्र तीन गर्भगृह आहेत.[12]

या मंदिराची दक्षिण उत्तर लांबी 76 फुट आणि पूर्व-पश्चिम रूंदी 65 फुट इतकी आहे. मुखमंडप, गुढमंडप, व तीन गर्भगृह असा या मंदिराचा पदविन्यास आढळतो. या मंदिराचा पदविन्यास व स्तंभ मार्कंण्डेश्वर मंदिरासारखे आहेत. हे मंदिर पश्चिमाभिमुख असून अर्धमंडप मात्र या मंदिरास नाही. या मंदिराच्या तिन्ही बाजूनी विविध देवतांच्या मुर्त्या कोरविलेल्या आहेत. या मंदिराची निर्मिती होट्टल येथील मंदिराप्रमाणे चौथ-यावर झालेली नाही तर ती सफाटपृष्ट भागावर झालेली दिसून येते.[13]

या मंदिराचा बाहय भाग दगडी चौरस खांबानी बनविला आहे. हे चौरस खांब भिंतीच्या बाहेर आल्यामुळे मंदिराचा बाहय भाग सुंदर बनला आहे. या बाहय भागावर सुरसुंदरी व अप्सरांचे शिल्प कोरलेले आहेत.[14]

ड) परमेश्वर मंदिर:

परमेश्वर मंदिर हे होट्टल येथील चौथे शिवमंदिर आहे. हे मंदिर सिध्देश्वर मंदिराच्या डाव्या बाजुस असुन कल्याणीचा चालुक्य सम्राट सहावा विक्रमादित्य याच्या कारर्किदीत बांधले आहे.[15]

परमेश्वर मंदिर हे सिध्देश्वर व रेब्बेश्वर मंदिराप्रमाणे पूर्वाभिमुख असून या मंदिराची पूर्व-पश्चिम लांबी 54 फुट आणि दक्षिण -उत्तर रूंदी 25.6 फुट आहे. या मंदिरात मंडम, अंतराळ, गर्भगृह, स्तंभ आणि त्यासमोर प्रांगण असा त्यांचा पदविन्यास आहे. या मंदिराची उभारणी 3 फुट उंचीच्या जोत्यावर करण्यात आलेली आहे.[16] अशा प्रकारे स्वतःचे वेगळे वैशिष्टये घेऊन हे परमेश्वर मंदिर अस्तित्वात आले आहे.

निष्कर्ष:

प्राचीन काळापासुन नांदेड जिल्हयास इतिहास व संस्कुतीचा महान वारसा लाभला आहे. प्राचीन कालखंडापासून निजाम कालखंडापर्यत नांदेड परिसरावर अनेक नामंाकित घराण्याची राजसत्ता होती. त्यामध्ये वाकाटक, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, वरंगलचे काकतीय व देवगिरीचे यादव ही राजघराणी होत. यामध्ये कल्याणीचे चालुक्य घराणे महत्वपूर्ण घराणे म्हणून ओळखले जाते. कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील राजे हिंदु धर्माचे असुन त्यानं आपल्या काळात अनेक शिव मंदिरांची निर्मिती केली.

त्यामध्ये नांदेड जिल्हयातील देगलुर तालुक्यात होट्टल येथे उभारलेली मंदिरे अत्यंत महत्वपूर्ण व वैशिष्टयपूर्ण मानली जातात.

होट्टल गावाच्या पश्चिमेस असलेले सिध्देश्वर मंदिर पुर्वाभिमुख असून ते होट्टल येथील सर्वोत्तम शिवमंदिर म्हणुन ओळखले जाते. या मंदिराचा पदविन्यास म्हणजे कल्याणीच्या चालुक्य कलेचा मंदिर रचनेचा उत्कृष्ठ नमुना मानला जातो.

होट्टल येथील रेब्बेश्वर हे दुसरे शिवमंदिर असून होट्टल येथील कल्याणीच्या चालुक्याचा अधिकारी रेब्बनायक याने या मंदिराची निर्मिती केली होती. त्यांच्या नावावरूनच हे मंदिर रेब्बेश्वर मंदिर म्हणुन ओळखले जाते. हे मंदिर पूर्वाभिमुख असून या मंदिराची रचना सिध्देश्वर मंदिराच्या रचनेसारखी आहे. रेब्बेश्वर मंदिरातील संगीत शीला हे या मंदिराचे अगळे वेगळे वैशिष्टये मानले जाते.

होट्टल येथील सोमेश्वर मंदिर हे तिसरे शिवमंदिर असून हे 'त्रिदलपदधतीचे' मंदिर म्हणुन ओळखले जाते. काराण या मंदिरात ब्रम्ह, विष्णु व शिव या देवता आहेत. व या तिन्ही देवतांसाठी स्वतंत्र तीन गर्भगृह आहेत. हे या मंदिराचे वैशिष्टय मानले जाते. पण हे मंदिर सिध्देश्वर मंदिर व रेब्बेश्वर मंदिराप्रमाणे पूर्वाभिमुख नसून ते पश्चिमाभिमुख मंदिर आहे. हे या मंदिराचे वैशिष्टये दिसून येते. तर होट्टल येथील परमेश्वर मंदिर हे चौथे शिवमंदिर असून हे मंदिर सिध्देश्वर व रेब्बेश्वर मंदिराप्रमाणे पूर्वाभिमुख असणारे मंदिर आहे. हे मंदिर सिध्देश्वर, रेब्बेश्वर, सोमेश्वर मंदिराप्रमाणेच होट्टल येथील महत्वाचे मंदिर म्हणून ओळखले जाते. अशा प्रकारे कल्याणीच्या चालुक्य कालीन स्थापत्य कलेचे नांदेड जिल्यातील होट्टल येथील मंदिरे स्थापत्यकलेची अजरामर कलाकृती व स्थापत्यकलेचा उत्कृष्ठ अविष्कार म्हणून ओळखली जातात.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. डॉ. कठारे अनिल, डॉ.साखरे विजया डॉ, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा प्रकाशन, नांदेड, डिसेंबर 2008, पृष्ठ क्र.11

2. डॉ. चव्हाण मारोती, होट्टल एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, आक्टोबर 2016, पृष्ठ क्र.36

3-Riti and shelke G. S., Inscription of Nanded District, Nanded, Y.M.N,1968.P.No.12

4. डॉ. कठारे अनिल, साखरे विजया डॉ, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा प्रकाशन, नांदेड,डिसेंबर, 2008, पृष्ठ क्र.13,14

5. डॉ. चव्हाण मारोती, होट्टल एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, आक्टोबर 2016, पृष्ठ क्र.41

6. डॉ. देव प्रभाकर, (अनुवाद) रायरीकर कल्पना, मराठवाडयातील प्राचीन मंदिर स्थापत्य शिल्पाविष्कार, अपरांत प्रकाशन, पुणे, जानेवारी 2017, पृष्ठ क्र.40

7.कित्ता पृष्ठ क्र.40

8. डॉ. चव्हाण मारोती, होट्टल एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, आक्टोबर 2016,पृष्ठ क्र.42

9. डॉ. कठारे अनिल डॉ, साखरे विजया डॉ, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा प्रकाशन, नांदेड,डिसेंबर 2008, पृष्ठ क्र.18

10. डॉ. चव्हाण मारोती, होट्टल एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, आक्टोबर 2016, पृष्ठ क्र.47

11. डॉ. कठारे अनिल डॉ, साखरे विजया डॉ, मंदिरे आणि मूर्तीशिल्प, अल्फा प्रकाशन, नांदेड, डिसेंबर, 2008, पृष्ठ क्र.19

12.Riti and shelke G. S., Inscription of Nanded District, Nanded, Y.M.N,1968. P.No.12

13. डॉ. चव्हाण मारोती, डॉ, होट्टल एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, आक्टोबर 2016, पृष्ठ क्र.47

14. Riti and shelke G. S., Inscription of Nanded District, Nanded, Y.M.N, 1968. P.No.12

15. डॉ. चव्हाण मारोती, डॉ, होट्टल एक ऐतिहासिक दर्शन, शिल्पा प्रकाशन, उदगीर, आक्टोबर 2016,पृष्ठ क्र.53

16.कित्ता पृष्ठ क्र.53

# मराठवाडा मुक्ती संग्रामातील दलितांचे योगदान

*प्रा. डॉ. ज्ञानोबा कदम[1] प्रा.सत्यवान राणे[2]*

*[1]डी.बी.जे महाविद्यालय चिपळूण*

*[2]कणकवली कॉलेज कणकवली*

**पार्श्वभूमी**

मराठवाडा मुक्तिसंग्रामा मुळे भारताच्या स्वातंत्र्याच्या भौगोलिक सलग तेला परिपूर्णता प्राप्त झाली आहे. भारत जरी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला असला तरी, अनेक लहान मोठ्या संस्थानांचे तुकडे भारतात विलीन व्हायचे होते. या संस्थांनाना स्वतंत्र राहण्याची ही मुभा देण्यात आलेली होती.परंतु भारत सरकारचे केंद्रीय गृहमंत्री मा. सरदार वल्लभाई पटेल यानी स्वतंत्र राहणाऱ्या संस्थानिकांना विरोध दर्शवला त्यांच्या खंबीरपण मुळे भारतातील संस्थानांचे एकीकरण झाले.

स्वातंत्र्या नंतर भारताचे दोन देश होते की ५६२ तुकडे होतील की एकच अखंड भारत राहील अशी निश्चित काहीच सांगता येत नव्हते. भारत सरकारच्या दृष्टीने हैद्राबाद संस्थान म्हणजे अवघड जागचं दुखणं होतं.

भौगोलिक दृष्टीने भारताच्या मध्यभागी असलेले हे संस्थान मात्र सहजासहजी सामील व्हायला तयार नव्हतं.येथील जनतेने या संस्थानाच्या सुलतानशाही वृद्ध दहा वर्षाहून अधिक काळ लढा दिला जनतेच्या याच लढ्याची परिणिती भारत सरकारच्या पोलिसी कारवाई झाली. पोटातील अल्सर प्रमाणे प्राणघातक ठरू शकणारी स्वतंत्र राज्याची स्वप्न पाहणारी निजामी सत्ता जनतेच्या उत्स्फूर्त लढ्यामुळे पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळली.

मराठवाडा मुक्तिलढा हा भारतातील स्वातंत्र्यलढ्याचे एक महत्वपूर्ण रोमांचकारी घटना समजली जाते. या स्वतंत्र निजाम राजवटीतील या हैद्राबाद संस्थानात बेरार, औरंगाबाद ,परभणी, आदिलाबाद नांदेड, बीड ,उस्मानाबाद, बिदर, निजामाबाद ,करिमनगर .गुलबर्गा. नलगोंडा, हैदराबाद या प्रमुख जिल्ह्यांचा समावेश होता.

हैद्राबाद संस्थान दक्षिण हिंदुस्थानातील सर्वात मोठे राज्य गणले जायचे या संस्थानावर असं जाई घराण्याची ९ पिढ्यांपासून सत्ता चालत आलेली होती. मराठी, तेलगू आणि कानडी या तिन्ही भाषा या संस्थानात बोलल्या जात असे, संस्कृती जोपासून जगणाऱ्या भिन्न वर्णीय किंवा भिन्न धर्मीय नागरिकात परस्पर सामंजस्याचा कधी अभावही जाणवला नाही. मुसलमानी राजसत्ता आल्यामुळे मुस्लिमांनी या संस्कृतीचा राडा करणे स्वाभाविक होते या भागात मराठी तेलुगु कानडी आणि उर्दू या प्रमुख भाषा बोलल्या जातात परंतु या संस्थानात उर्दू ही भाषा सक्तीची करण्यात यात आलेली होती. प्राथमिक माध्यमिक आणि उच्चशिक्षण हे गुलबर्गा विद्यापीठातून उर्दू भाषेतून दिले जात. असे या संस्थानांचं वैशिष्ट्य असे आहे की बहुसंख्य समाज हा हिंदूधर्मीय होता आणि आणि अल्पसंख्यांक मुस्लिम होता. तरीही ही या संस्थानावर मुस्लिमांची सत्ता होती हे एक या संस्थानांचे विशेष होते.

मीर उस्मान अली खान हे १९११ ते १९४८ या काळात हैदराबाद संस्थानाचे सातवे निजाम म्हणून सत्तेवर होते या प्रदेशाची शांतता त्यांच्या काळातच हळूहळू ढळू लागली. कारण सर्वच क्षेत्रात मुसलमानांचे प्रभुत्व आणि मुस्लिम धर्मियांचे वर्चस्व निर्माण करण्याचा त्याने सपाटा चालविला. त्यातच काशीम रझवी सारख्या अतिरेकी विकाराने भारावलेल्या मुस्लिम पुढाऱ्याचा उगम झाल्यानंतर इतर धर्मियांची जीवन दोलायमान होऊ लागले भाषण लेखन मुद्रण स्वातंत्र्यावर अघोषित बंदी लादली गेली. इतर धर्मीयांच्या समाज ही तिची संघटना कार्यरत होऊ नये याबद्दल त्याने जातीने लक्ष दिले. हिंदू समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा आटोकाट त्याने प्रयत्न केला. अविवेकी पणा, असहिष्णुता यासारखे अवगुन त्याच्या अंगी मोठ्या प्रमाणात होते. हैद्राबाद संस्थानात मोल प्राप्त होऊ लागले. संपूर्ण हैद्राबाद संस्थानात जुलूम जबरदस्तीचे वातावरण खूप दिवस चालू राहिले यातूनच हैद्राबाद संस्थान विरुद्ध निजामाविरुद्ध एक सर्वंकष लढा दिला. त्या लढ्याचे नाव हैद्राबाद मुक्तिसंग्राम असे आहे.

२) हैद्राबाद मुक्ती संग्रामातील मराठवाड्याचे योगदान

या लढ्यात मराठवाड्यातील अनेक स्वातंत्र्यवीरांनी मोलाचे योगदान दिले.मराठवाड्यातील हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे शिल्पकार स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपले सर्वस्व प्राण अर्पण केले. गुलामगिरीतून आपला देश स्वतंत्र झाला पाहिजे यासाठी त्यांनी संन्यास धारण केले. या स्वातंत्र्यसंग्रामाची सुरुवात करताना स्वामी रामानंद तीर्थ यांनी नव्या

जोमाचे कार्यकर्ते निर्माण केले त्यादृष्टीने मराठवाड्याच्या मातीमध्ये कर्तृत्वाची बिजे रोवली गेली हैद्राबाद मुक्तिसंग्रामात मराठवाड्यातील स्वातंत्र्यवीरांनी आपले बलिदान देते त्यात पहिले बलिदान वेद प्रकाश आर्य या व्यक्तीने दिले.त्यातून सर्व मराठवाड्यातील नेते ते तुटून पडले या हैद्राबाद संग्रामात रजाकार याच्याविरोधात मराठवाडा अर्ध्यापेक्षा जास्त होता. त्यात बहिर्जी शिंदे,श्रीधर नाईक, जनार्धन मामा. बाबूराव बोरगावकर, निलया स्वामी, किसनराव नाथवाटे, श्रीमती गोदावरीबाई टेके, सांबाबाई वीरा धनगर, लक्ष्मण गुरुबसप्पा कलशेट्टी ,शिवलिंग आप्पा, सिद्धाप्पा माशाळकर, शिवरुद्र स्वामी ,बसवलिंग स्वामी, कृष्णा पवार, शंकर चव्हाण, यशवंतराव कुलकर्णी, रेवनसिद्ध स्वामी, श्रीधर विनायकराव वर्तक,गोविंद भाई श्राफ, आणि हैदराबाद संस्थानातील पहिले हुतात्मे वेद प्रकाश आर्य, बाबूराव बोरगावकर, निलया स्वामी, सोयम उल्ला खा, गोविंदराव पानसरे, श्रीधर वर्तक, शंकर जाधव , अनंत वासुदेव साबळे, तुकाराम शहाजी, त्र्यंबक जोशी, देवी चव्हाण , श्रीनिवासन शात्री, विनायक रावजी विद्यालंकार , रामचंद्र दिवाण ,लक्ष्मण गानू गोविंदराव, आनंदा कृष्णा वाघमारे, देशपांडे विश्वनाथ भिसे ,राक्षस भूमकर दत्तात्रेय उत्तरवार, वीरभद्र आर्य , मनोहर पाटील, मारुतराव भोपळे , अशा अनेकांनी तर योगदान दिले. याबरोबरच मराठवाड्यातील दलितांचे योगदान मोठ्या प्रमाणात होते. हे ही आपणास नाकारता येणार नाही.

3)हैदराबाद मुक्तिसंग्रामातील दलितांचे योगदान-

१) हुतात्मा रामा

तावशी तालुका लोहारा पायगा येथे रामा मांग नावाच्या गृहस्थाने आर्य समाजाची दीक्षा घेतली होती. सन १९३२ साली तावशीला हिंदू देवालय पाडून मशीद बांधण्याचा उद्योग सुरू केला. होता तेव्हा पेटलेल्या आर्यसमाज लोकांनी मशिदीचा ओटा काढून टाकला आणि तावशी च्या रज्झाकारणाने या गावी जाऊन दोन ट्रक भरून शस्त्र व पठाण सर्वांना बोलावून आणले .आता आम्हास विरोध करण्याची कोणाची हिंमत आहे.अशा आरोळ्या ठोकीत देवालय पाडण्यात आले. शस्त्र पठान उभे असल्याचे पाहून सर्व हिंदू निमूटपणे उभे राहिले पण तेवढ्यात मी भादर तुमच्याशी मुकाबला द्यायला तयार आहे देवळाच्या दगडाला हात लावाल तर एकाचे मुडदे पाडीन अशी सिंहगर्जना ऐकू आली. आणि तू कोण होता तर तो म्हणजे रामा मांग नावाचा व्यक्ती होता. या एकट्या माणसाने बळकट देहाच्या रामा पुढे येताच दुरून एका पठाणाने त्याच्यावर गोळी झाडली ती त्याच्या मांडीत घुसली तशा अवस्थेत रामा मांग हा पठाण व अरबांच्या घोळक्यात तुटून पडला. पहिल्या झटक्यात आतच त्याने चार पठाण व एका एका पठाणाच्या हातातील बंदूक घेऊन बंधु तिच्यातून बियाणे चार-पाच पठाण व अरबांची टाळकी फोडली. एका पठाणाच्या हातातील बंदूक हिसकावून घेतला रामाचा अवतार बघताच पठाण व अरबांनी पळ काढली. लोकांनी रामा मांगास तुळजापूरच्या दवाखान्यात नेले व तेथून उस्मानाबाद हालवीले कारण गोळी मांडीत घुसल्यामुळे रक्तस्त्राव होऊन तो बेशुद्ध झाला होता. आणि उस्मानाबादच्या दवाखान्यात तो अखेर मरण पावला.

२) हुतात्मा गणपती जळबा जाधव....

उदगीर तालुक्यातील तिरका या गावचा मूळ रहिवासी आहे आप्पाराव पाटलांच्या टोळीतील पांडुरंग नादरगे प्रात; विधीसाठी बाहेर पडले असताना मिलिटरीच्या वेशातील लोक पाहून त्यांनी जोराची आरोळी ठोकली. व गाव जागी केली निजाम सैन्याने पांडुरंग नादरगे यांच्यावर गोळी झाडली तेथेच होता गणपती जळबा जाधव यांनी झाडावरून आरोळी ठोकली रजाकार आले रजाकार आले अशी उरून टोळीला सावध करीत असताना त्यांच्या वरील गोळी झाडली गेली ते झाडावरून कोसळले व त्याचा प्राण गेला.

३) हुतात्मा चंदू नागनाथ जाधव.

उदगीर तालुक्यातील क्रांतीवीर आप्पाराव पाटील यांच्या टोळीत ते बारा क्रांतिकारक होते त्यापैकी एक चंदू नागनाथ जाधव हाही होता घेणार.

४) गोविन्द राम महार

उदगीर तालुक्यातील तिरुका येथील थिल क्रांतिवीर आप्पाराव पाटील यांच्या टोळीतले जे १२क्रांतिकारी सैनिक होते त्यापैकी गोविंदराम महार तिरुक्याचा होता त्याने रजाकार विरुद्ध लढा देण्यासाठी जिवाचा त्याग केला.

त्यामध्ये १२०० हे निजाम लष्कराच्या गोळीबार यामध्ये हुतात्मे झाले त्यापैकी गोविंद महार होते त्याने अन्यायी रजाकराच्या विरोधात लढा दिला.

५) मनोहर धोंडीराम कांबळे---

सण १९२५ ते २६ या दरम्यान उदगीर याठिकाणी आर्य समाजाचे प्रणेते भाई शामलाल जिने आर्य समाजाची स्थापना केली. त्यांच्या कशामुळे आणि नियोजनामुळे भाई बन्सीलाल पंडित कर्मवीरजी, डॉ. दादाराव वैद्य, माधवराव पाटील, गुंजीकर शंकर टोपे, धर्मपाल चौधरी आधी व्यक्तीने आर्य समाजातर्फे अनेक उपक्रम राबवण्याचा संकल्प केला त्यानुसार उदगीर परिसरातील प्रत्येक खेड्यातून आर्य समाजाच्या नेत्यांनी आर्य समाजाचा विचाराचा प्रसार करण्यासाठी आठवड्यातून एक दिवस भेट देण्यास सुरुवात केली त्याचा परिणाम म्हणून या परिसरात आर्य समाजाचे कार्यकर्ते निर्माण झाली. त्यात मनोहर कांबळे संग्राम मिस्त्री, रामचंद्र मिस्त्री, तुळशीराम गावकर, गुरु बसप्पा निलंगे, माणिकराव काळाराम, इत्यादी यावेळी कार्यकर्त्यांनी निजामाच्या विरोधात लढा देण्याचा निश्चय केला.या मनोहर धोंडीराम कांबळे यांनी भूमिगत राहून स्टेट काँग्रेस तर्फे 2 सप्टेंबर १९४७ मध्ये झालेल्या सत्याग्रहात सहभागी झाल्याबद्दल मनोहर कांबळे यांना हैदराबाद व सोलापूर येथे सहा महिन्याची शिक्षा झाली. तरीही मनोहर कांबळे यांनी या निजामाच्या अन्याय अत्याचाराला व दडपणाला कोणत्याही प्रकारचे भीक घातले नाही.अखेर त्याने आपला लढा चालूच ठेवला.

६) तुळशीराम मरेप्पा चांदेगावकर.

उदगीर तालुक्यात चांदेगावचे रहिवासी असलेले तुळशीराम कांबळे उर्फ चांदेगावकर ( मामा ) यांनी बालपणापासूनच भाई शामलाल च्या मार्गदर्शनातून आर्यसमाजी विचारसरणी चा प्रभाव त्याच्यावर पडला. त्यांचा जन्म चांदेगाव याठिकाणी १२ जानेवारी १९२३ रोजी झाला. आप्पारव पाटील व खेडकर यांच्या नेतृत्वाखाली आणि भाई शामलाल जींच्या प्रेरणेने तुळशीरामजी हे भूमिगत कार्यकर्ता म्हणून कार्य केले. त्याने तोंडचीर म्हणजेच रामघाट व देवणी येथील लढाईत सशस्त्र अन्नपुरवठा करण्याचे काम केले. संरक्षण साहित्य पुरवण्याचे कामही त्यांनी केले. १ सप्टेंबर १९४७ मध्ये झालेल्या सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतला. पण त्यांना शिक्षा झाली नाही. तुळशीराम कांबळे म्हणजे चांदेगावकर हे सच्चे प्रामाणिक धाडसी देशप्रेम या गुणांचा सुरेख संगम असलेले एकमेव व्यक्तिमत्व होते. याशिवाय त्यांनी हैदराबाद संस्थानांमध्ये हे दलितांवर होत असलेल्या अन्यायाचा ही प्रतिकार केला. व्यवस्थेने घालून घे दिलेले सूत्र समाजामध्ये होते. आणि ते म्हणजे समाजात शाळा शिकू नये म्हणून हा जो विचार होता त्या विचाराला धक्का देण्याचे काम त्यांनी केले. त्यानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एससी फेडरेशनचे महाराष्ट्र पातळीवरचे नेतृत्व केले. शिवाय रिपब्लिकन पक्षाचे ते सुरुवातीच्या फळीतले कार्यकर्ते होते.संत कबीरदास शिक्षण संस्थेचे संस्थापक सदस्य म्हणून कामगिरी केली.त्यांनी उदगीर येथील आंबेडकर विद्यालयाच्या उभारणीत आपले मोलाचे योगदान दिले एकुरका रोड तालुका उदगीर येथील समर्थ एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सदस्य होते. तुळशिराम कांबळे यांनी आपल्या बांधवावर होत असलेल्या अन्यायाचा कडाडून विरोधक केला. शिक्षणाची संधी मिळवून देण्याची की त्यांनी मोठी कामगिरी केली आज ही दोन्ही शिक्षण संस्था मोठ्या नावारूपाला आलेल्या आहेत.

७) भिमराव जळबा सुर्यवंशी...

उदगीर तालुक्यात नळगीर हे गाव आहे तेथील भीमराव जळवा हे निजामी राजवट यांच्याविरोधात पेटून उठलेले कार्यकर्ते होते. त्यांचा जन्म २ आक्टोंबर १९४१ रोजी झाला. येथील क्रांतीकारी नेते अड.रामचंद्र कापसे यांच्या नेतृत्वाखाली भीमराव जळबा सुर्यवंशी यांनी भूमिगत कार्य केले. यांच्याबरोबर माधवराव कापसे गंगाराम, किशनराव बलांडे, सदाशिव सुळकेकर यांच्या सोबत राहून आर्य समाजसेवी विचारांचाही प्रसार त्यांनी केला. त्यांनी निष्ठेने कार्य केले स्टेट काँग्रेसतर्फे ७ स्प्टेंबार १९४७ रोजी झालेल्या सत्याग्रहात त्यांनी आपला सहभाग घेतला. त्यामुळे त्यांना बिदर गुलबर्गा या ठिकाणी सहा महिन्याची शिक्षा झाली

८) किशन तुकाराम सोनकांबळे...

उदगीर तालुक्यातील हेळंब येथील तुकाराम सोनकांबळे याने निजामाच्या विरोधात दंड थोपटले. त्यांचा जन्म १६ ऑगस्ट १९१८ रोजी झाला ते आर्य समाजाच्या शाखेतून व बौद्धिक कार्यक्रमातून क्रांतिकारी विचाराचे नेते बनले. त्यांना यशवंतराव साळगावकर, माधवराव पाटील,गुंजीकर विर्भद्रा पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचा लाभ तरुण

कार्यकर्ते किशन सोनकांबळे,काशिनाथ बिरादार याना झाला त्यामुळे त्यांच्या मनात स्वातंत्र्य लढ्या विषयी जागृकता निर्माण झाली. सप्टेंबर १९४७ साली स्टेट काँग्रेसने जाहीर केलेल्या सत्याग्रहात किशनराव सोनकांबळे यांनी सहभाग घेतला. त्याबद्दल त्यांना गुलबर्गा या जेलमध्ये सहा महिन्याची शिक्षा झाली तरीही त्यांनी अशा स्वरूपाच्या शिक्षेला कोणत्याही प्रकारची भीक घातली नाही.

९) एकनाथ उर्फ सिताराम मराप्पा भालेराव..

उदगीर तालुक्यातील मलकापूर याठिकाणी गावचे एकनाथ भालेराव यांचा जन्म १९१८ साली झाला व त्यांनी भाई शामलाल यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली आर्यसमाजाच्या विचारसरणीतून संस्कृत झाले. हैद्राबाद मुक्तीलढ्याच्या चळवळीत सक्रियतेने सहभागी झाले. सप्टेंबर १९४७ मध्ये झालेल्या सत्याग्रहात त्यांनी सहभाग घेतल्याबद्दल त्यांना बीदर येथे तीन महिन्याची शिक्षा झाली. एकनाथ भालेराव यांच्या व्यक्तित्वात सच्च्या देशभक्ती असणारा समाजापर्यंत शिक्षणाची आवड इत्यादी गुण होते. त्यांच्या त्यागामुळे निजामाला विशेषत आकाश इंग्रजी तिला मोठा धक्का बसला.

१०) तुळशीराम कांबळे..

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर हैदराबाद राज्यात सर्वत्र शांतता पसरली होती. वेगवेगळया ठिकाणी पुढाऱ्यांची धरपकड होऊ लागली. रजाकार व निजामी पोलिस यांनी संगनमताने हिंदू जनतेची घरी जाणे माणसांची सर्रासपणे कत्तल करणे. असा उपक्रम सुरू केला. निजाम राज्यात अशा रीतीची परिस्थिती पाहून जनता हवालदिल झाली. काही ठिकाणी तरुण आर्यसमाजी कार्यकर्ते मंडळी अत्याचाराचा मुकाबला करीत होते. अशा स्थितीत बिदर जिल्ह्यातील निलंग्याचे शेषरावजी वाघमारे यांच्या सहकाऱ्यासह बिदर, उस्मानाबाद व लातूर भागातून दौरा काढला होता. त्याने गुलबर्गा निलंगा अहमदपूर उदगीर भागातील तरुणांना एकत्र आणून योजनाबद्ध कार्यक्रम आखला. मराठी भाषिक कार्यकर्ते सोलापूर जिल्ह्यातील सरहद्दीवर सरकारी काम करून राहिली. येडशी ते बार्शी या डोंगराळ भागात कार्यकर्त्यांसाठी त्यांची रचनात्मक काम केले. मीटिंग बोलवण्यात आली त्यामध्ये बाबासाहेब परांजपे ,शेषराव वाघमारे, चंद्रशेखर बाजपाई हे सहभागी होते. त्यात तुळशिराम कांबळे व लक्ष्मण पेंटर हे उपस्थित होते ते जानेवारी १९४८ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची एका माथेफिरुनी हत्या केली. जानेवारी ते ऑगस्ट हा काळ अतिशय खडतर स्वरूपाचा गेला १५ आगस्ट१९४८ हा स्वातंत्र्याचा पहिला वर्धापन दिन देशात साजरा होत होता तर हैदराबाद राज्यात जनता शोकाकुल झाली होती. निजाम राज्य स्वतंत्र राहणार भारतात विलीन होणार नाही अशा घोषणा रजाकार करत होते. या काळात १९४७ ते ४८ भारतीय स्वातंत्र्याची महती वर्तमानपत्रातून दर्शविली होती.

गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानिकांना भारतात विलीन होण्यास भाग पाडले. आणि तेरा १९४८ रोजी हैदराबाद निजाम राज्यात राज्याला गळफास लागला भारतीय होता हैदराबाद राज्याच्या चहूबाजूने सरहद्द ओलांडून आत शिरल्या, आपल्याकडील सोलापूर तुळजापूर, उस्मानाबाद, बार्शी ,नळदुर्ग हा परिसर मध्ये भारतीय फौजा आल्याने पाहून रझाकारांनी निजामी पोलीस शहरावर राज्य सरहद्दीवरील हल्ला चढवीला त्यांमधील सत्याग्रहाची स्वयंसेवकांनी योजना रहस्याची माहिती दिली. १७ सपटेंबर १९४८ रोजी हैद्राबाद राज्याच्या चहुबाजूनी भारतीय फौजेने हैद्राबाद शहर गाठले. निजाम शरण आल्याची घोषणा झाली. अर्थात या दिवशी हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम संपला या हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात तुळशीराम कांबळे यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी सरदार वल्लभभाई पाटील यांनी पोलीस ऍक्शन ची सुरू केली होती त्या पोलीस अक्शन मध्ये सुद्धा निजाम त्याविरोधात आवाज उठविला म्हणून ते एक तपस्वी कार्यकर्ते असेच त्यांना म्हणावे लागेल. समारोप आशा प्रकारे हीद्राबाद संस्थान हे भारताच्या इतिहासातील महत्वाचे संस्थान होते केवळ हा लढा केवळ आर्य समाजाचा नवता तर या लढ्यात सर्व समाजाचा वाटा होता यात दलित ही मोठ्या प्रमाणात होते . पण यात इतिहासाने म्हणावी तेवढी दाखल घेतली नाही ,

**संदर्भ सूची**

१) जोशी महादेव शास्त्री संपा भारतीय संस्कृती कोश खंड क्रमांक 1962 पृष्ठ क्रमांक 484.

२) पोतदार वसंत हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम कासार आष्टा समंती मुद्रणालय 166 शुक्रवार पेठ सोलापूर 1984 पृष्ठ क्रमांक 31.

३) पंडित सिंह् नरेन देवजी आरे समाज समाजकारण आणि राजकारण संपा काळे भगवान स्वार्थ पंडित केळकर साकेत प्रकाशन 1986 पृष्ठ क्रमांक 286.

४) दाते सुनील हैदराबाद संस्थानातील राजकीय प्रभाव मराठवाडा सुवर्णमहोत्सवी विशेषांक हैदराबाद पृष्ठ क्रमांक 112

५) कापसे लक्ष्मणराव हैदराबाद निजाम राज्य मुक्तिसंग्रामातील चित्तथरारक आठवणी जोली अपसेट 14 वडाळा इंडस्ट्रियल इस्टेट नायगाव क्रॉस रोड मुंबई 2009

६)पाटील संजय हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि आर्य समाज मुक्तरंग प्रकाशन लातूर प्रकाशन पृष्ठ क्रमांक 335

७)कुलकर्णी खंडेराव हैदराबाद मुक्तिसंग्राम एक क्रांतीपर्व स्वातंत्र्यसैनिक समिती गुडसूर

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"*

# महिला सक्षमीकरण

***सौ. सुचिता रमेश म्हात्रे***
*डिपार्टमेंट ऑफ लाईफ लॉंग लर्निंग एक्सटेन्शन*

**प्रस्तावना:**

विकसनशील देशाचा विकास आणि महिलांचा विकास यांचा अत्यंत जवळचा व प्रत्यक्ष संबंध आहे. असे म्हणतात की, महिलांच्या आर्थिक,सामाजिक परिस्थितीकडे बघितले असता तुम्हाला त्या देशाची संस्कृती समजू शकते. महिला आज विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे कार्य करताना दिसत आहे. निसर्गाने बुद्धी, कौशल्य सर्वांना समान दिलेले असले तरी इतिहास काळापासून तर आज पर्यंत महिलांना प्रत्येक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले गेले. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, महादेव गोविंद रानडे, अण्णासाहेब कर्वे या सर्वांनी महिलांना सक्षम बनवण्यासाठी व महिलांच्या शिक्षणासाठी आपले सर्व आयुष्य खर्ची घातले. राजा राम मोहन रॉय यांनी सतीची चाल बंद केली व स्त्री मुक्ती आंदोलनाला चालना दिली. महिलांचा कुटुंबातील दर्जा समाजातील स्थान व त्यांच्या सर्व क्षेत्रातील भूमिका पार पाडत असताना त्यांना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक याला विरोध करून महिलांना कुटुंबात, समाजात व इतर सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने समान स्थान मिळवण्यासाठी महिलांचे सामाजिक, मानसिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच राजकीय सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. भारतामध्ये ग्रामीण भागात महिलांची सद्यस्थिती लक्षात घेता असे दिसून येते की, महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण, आजार, कौटुंबिक, हिंसा, आत्महत्या इत्यादी अनेक समस्यांमुळे महिलांचा विकास होऊ शकत नाही. त्यामध्ये अडथळे निर्माण होतात व हे अडथळे दूर करण्यासाठी महिलांची सामाजिक व आर्थिक, शैक्षणिक तसेच राजकीय स्थितीमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहेत आणि त्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला आहे. दुय्यम पद्धतीचा भाग म्हणून विविध ग्रंथ, मासिके, विषया संबंधित शोध निबंध, साहित्य, शासकिय अहवाल ,इंटरनेट याद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे.

**उद्दिष्टे :** 1. महिला सक्षमीकरणाची संकल्पना अभ्यासणे.

2. महिला सक्षमीकरणाची आवश्यकता अभ्यासणे .

**महिला सक्षमीकरणाची संकल्पना व व्याख्या :**

सक्षमीकरण हा शब्द हल्ली इतक्या वेळा वापरला जात आहे की, त्या शब्दाला निश्चित असा अर्थ राहिला नाही. सक्षमीकरण ही भिन्नभिन्न संदर्भात असलेली संकल्पना आहे. उदाहरणार्थ ती कधी क्षमतावृद्धी, कधी कल्याण, कधी समानता, कधी समबल संतुलित करणे तर कधी दारिद्र्य निर्मूलन या अर्थाने वापरली जाते. सक्षमीकरण म्हणजे अंगभूत गुणांचा विकास होय. महिला सक्षमीकरणाचा अर्थ "महिलांना आर्थिक बाबतीत स्वावलंबी आत्मविश्वासाचा प्रति अस्मिता अवघड व वाईट परिस्थितीशी सकारात्मक विचार करून तिला तोंड देण्यास सक्षम बनवणे आणि कार्यात त्यांचा सहभाग निर्माण करून निर्णय घेण्यासाठी एका परिपक्व सशक्त महिलेची निर्मिती करणे असा करता येईल." अर्थात "महिलांच्या मनात आत्मविश्वास, आपल्या अधिकाराच्या प्रति जागृती तसेच अन्यायाशी लढण्याची नैतिक ताकद व क्षमता प्राप्त होणे जेणेकरून आपल्यावर होणा-ऱ्या आर्थिक,सामाजिक तसेच पारंपारिक भावना ओळखून त्यांच्या प्रतिकार करेल अशी महिला तयार करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. "

महिलांना कर्तव्या बरोबर काही अधिकार दिले पाहिजेत जेणे करून ती घरा बरोबरच बाहेरही सृजनशीलतेने कार्य करू शकेल. असे अधिकार आणि स्वातंत्र्य दिलेली महिला सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक तसेच मानसिक विकासाला सण समजावून घेऊन, आपल्या क्षमता ओळखून स्वतःच्या तर्कबुद्धीने समाजाशी सुसंवाद साधून आपले अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करेल यासह प्रत्येक महिलेने स्वतःसाठी केलेले सक्षमीकरण असे म्हणता येईल. महिला सक्षमीकरणाची आवश्यकता पुरुष प्रधान समाज व्यवस्थेमुळे भारतात महिलांना पूर्वीपासूनच दुय्यम स्थान देण्यात आले आहे. अगदी वैदिक काळातही काही अपवाद वगळता महिलांची परवड झाल्याचे दिसते. मध्य युगीन कालखंड महिला वर्गाच्या दृष्टीने अत्यंत भयंकर समजला जातो. आधुनिक काळातही पुरुषी वर्चस्वाची मानसिकता पूर्णता संपलेली नाही.

महिला सक्षमीकरणाचे आवश्यकता पुढील घटकाद्वारे स्पष्ट करण्यात येत आहे.

**शिक्षण :**

1901 ते 2011 च्या जनगणनेनुसार स्त्री-पुरुष शिक्षणाचे प्रमाण व फरक खालील तक्त्यानुसार सांख्यिकीय माहिती आधारे जाणून घेता येईल. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र शासनाने महिलांच्या शिक्षणासाठी वेळोवेळी केलेल्या प्रयत्नामुळे 1951 ते 2011 या कालखंडात महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण तुलनात्मक वाढल्याचे दिसून येते.

**महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण 1901 ते 2011 :** तक्ता क्रमांक 1.1

| अ.क्र. | जनगणना | एकूण साक्षरता | पुरुष साक्षरता | महिला साक्षरता | साक्षरतेचे अंतर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1901 | 5.35 | 9.83 | 0.6 | 9.23 |
| 2 | 1911 | 5.92 | 10.56 | 1.05 | 9.51 |
| 3 | 1921 | 7.16 | 12.21 | 1.81 | 10.4 |
| 4 | 1932 | 9.5 | 15.59 | 2.93 | 12.66 |
| 5 | 1941 | 16.1 | 24.9 | 7.3 | 17.6 |
| 6 | 1951 | 18.33 | 27.16 | 8.86 | 18.3 |
| 7 | 1961 | 28.3 | 40.39 | 15.33 | 25.06 |
| 8 | 1971 | 34.95 | 45.95 | 21.67 | 24.28 |
| 9 | 1981 | 43.67 | 56.9 | 29.85 | 26.65 |
| 10 | 1991 | 52.51 | 64.13 | 39.29 | 24.84 |
| 11 | 2001 | 64.83 | 75.26 | 53.67 | 21.59 |
| 12 | 2011 | 74.09 | 82.14 | 65.46 | 16.68 |

निरक्षरतेचे प्रमाण कमी करण्यासाठी शैक्षणिक सक्षमीकरण केवळ उपयुक्त नाही तर अत्यावश्यक आहे सक्षमीकरण झाल्याने महिलांचे निरक्षरतेचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

**आरोग्य :**

भारतात एकूण लोकसंख्येच्या 50 टक्के स्त्रिया आहेत. भारतीय अनुसंधान परिषदेच्या अहवालाप्रमाणे सध्या 48 टक्के महिला कुपोषित आहेत. तर दुसऱ्या एका अहवालाप्रमाणे जवळपास 89% गर्भवती महिला मासिक पाळी समस्यांनी त्रस्त आहेत. महिला स्वतःच्या आरोग्याची पूर्णपणे हेळसांड करते. त्याचाच परिणाम म्हणून भविष्यात त्यांना विविध व्याधींना सामोरे जावे लागते. त्यांचे आयुष्यमान घटते. 15 ते 29 वयोगटातील स्त्रियांमध्ये गरोदरपणातील मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. भारतातील ग्रामीण भागातील माता मृत्यू दर हा जगात सर्वात जास्त आहे. म्हणूनच महिलांना आरोग्याच्या बाबतीत सक्षम बनवले तर ती जास्तीत जास्त कार्यक्षम व कुशलतेने आपली कौटुंबिक जबाबदारी व्यवस्थितरीत्या पार पाडू शकेल. या सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.

**समानता :**

समानता म्हणजे महिलांना प्रत्येक बाबतीत समानतेने वागवणे . शिक्षण, आरोग्य,तिच्या आवडी निवडी, नोकरी अशा अनेक क्षेत्रात महिलांना समानतेची वागणूक देण्याची आवश्यकता आहे. ही विषमता नष्ट करण्यासाठी, तिचा सामाजिक दर्जा वाढवण्यासाठी महिलांच्या सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.

**महिलांवरील अत्याचार :**

महिलांवरील अत्याचाराचा विचार केला तर ग्रामीण व शहरी अर्थार्जन करणाऱ्या नोकरी-व्यवसाय घरकाम करणाऱ्या अशा सर्व स्तरांमधील महिलांना शारीरिक व मानसिक अत्याचारांना तोंड द्यावे लागते. हुंडाबळी लैंगिक अत्याचार बलात्कार स्त्री भ्रूण हत्या समान वेतन अशा अत्याचार राशी सामना भारतातील अनेक महिलांना सतत करावा लागतो. महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. मुली व स्त्रियांच्या लैंगिक छळाच्या बातम्या आपल्या कानावर वरचेवर येत असतात. परंतु त्यातील गुन्हेगारी शोधणे अवघड जाते. मुली किंवा स्त्रिया स्वतःहून अशा तक्रारी घेऊन पुढे येत नाही अशा तऱ्हेच्या छळ हा नागपूरः मनोरुग्णालय निरनिराळी कार्यालय येथे होत असतो असे नाही तर घरातील पुरुष

नातेवाईक सुद्धा असा त्रास देत असतात. स्त्रियांकडे अजूनही एक गोड वस्तू म्हणून पाहिले जाते. महिलांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष शारीरिक किंवा मानसिक रित्या केला जाणाऱ्या क्रूर कृत्यांना महिलांवरील अत्याचार असे संबोधले जाते.

**महिलांवरील अत्याचाराचे नोंदवलेले गुन्हे :**

| अत्याचाराचा प्रकार | 2014 | 2015 | 2016 |
|---|---|---|---|
| बलात्कार | 3438 | 4144 | 4209 |
| अपहरण आणि पळवून नेणे | 2457 | 5096 | 4776 |
| हुंडाबळी | 279 | 268 | 227 |
| पती व पत्नीच्या नातेवाईकांकडून झालेले अत्याचार | 7696 | 7640 | 6203 |
| विनयभंग | 10001 | 11713 | 11388 |
| लैंगिक अत्याचार | 1575 | 1119 | 793 |
| अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा | 202 | 381 | 317 |
| इतर | 1045 | 765 | 4635 |
| **एकूण** | **26693** | **31126** | **32548** |

तक्ता क्रमांक 1. 2 : महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल 2016 2017

केंद्र सरकार द्वारा 27 जानेवारी 1993 रोजी महिलांच्या विरुद्ध हिंसा या विषयावर एक अहवाल प्रकाशित करण्यात आला त्यानुसार भारतात 54 मिनिटात एका महिलेवर बलात्कार होतो याचा अर्थ असा की एका महिन्यात आठशे वर्षभरात 9600 महिलांना बलात्कार सारख्या लैंगिक अमानवीय अत्याचारांना बळी पडावे लागते. या सर्व प्रकारच्या समस्या कमी होण्यासाठी महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.

**महिलांचा राजकारणातील सहभाग :**

राजकीय निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढवणे याकडे महिला सक्षमीकरणाचे एक साधन म्हणून ओळखले जाते. त्यासाठी महिलांना राजकीय अधिकाराचा वापर करून राजकीय सत्ता प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे .राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय होऊ शकतात. महिलांच्या विकासासाठी संरक्षणासाठी कायदे केले जावेत म्हणून सरकारवर दबाव आणता येतात .महिलांवर होणारे अन्याय अत्याचार सरकारपुढे मांडून त्याचे निराकरण करण्यासाठी त्वरित प्रयत्न करता येतात. तसेच राजकीय घटकांमुळे सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असलेली क्षमता जसे संघटन व एकत्रीकरण महिलांमध्ये निर्माण होते आणि नेतृत्व गुणांचा विकास होतो. राजकारणात महिलांचा अत्यंत अत्यल्प सहभाग असल्यामुळे त्यांना प्रेरित करण्यासाठी 1993 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रथमच महिलांना ते 30 टक्के राखीव जागा मिळाल्या. 2009 मध्ये 50 टक्के राखीव जागा मिळाल्या .त्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढण्यास मदत झाली हे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

**राज्यातील स्थानिक संस्थांमधील महिलांच्या राखीव जागा 31 डिसेंबर 2016**

| स्थानिक संस्था | संख्या | एकूण जागा | महिलांसाठी राखीव जागा |
|---|---|---|---|
| महानगरपालिका | 27 | 2730 | 1371 |
| नगरपरिषद | 234 | 5290 | 2721 |
| नगरपंचायत | 124 | 2108 | 1116 |
| जिल्हा परिषद | 34 | 2006 | 1013 |
| पंचायत समिती | 351 | 4012 | 2006 |
| ग्रामपंचायत | 28332 | 227241 | 113621 |
| **एकूण** | **29102** | **243387** | **121848** |

तक्ता क्रमांक 1.3 संदर्भ महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल 2016 2017

परिषदेतील महिलांची संख्या तीन ते चार पेक्षा पुढे गेले नाहीत. कॅबिनेट दर्जाचा मंत्री तर फक्त एकच असताना दिसत जोपर्यंत संसदेमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व त्यांच्या लोकसंख्येनुसार होणार नाही तोपर्यंत महिलांचा निर्णय प्रक्रियेत अभावच असेल. त्यामुळे राजकीय क्षेत्रात महिलांची संख्या वाढणे गरजेचे आहे. त्यासाठी महिला सक्षमीकरणाची आवश्यकता आहे

**आर्थिक स्वावलंबन :** आज प्रत्येक महिलेला आर्थिक स्वावलंबनाची आवश्यकता आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या ती स्वतःच्या आरोग्याची तसेच आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची व्यवस्थित काळजी घेऊ शकेल. त्यामुळे महिलांच्या शारीरिक मानसिक व आर्थिक सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.

**आर्थिक विकासात महत्त्वाचा घटक :** आर्थिक विकासात उत्पादनाच्या प्रमुख चार घटकांपैकी श्रम हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. श्रम या घटकात महिला व पुरुष याचा विचार प्रामुख्याने येतो. पुरुषांप्रमाणे महिलासुद्धा प्रत्येक क्षेत्रात तितकेच महत्त्वाचे कार्य करतात. त्यामुळे तिच्या पर्यायाने सामाजिक व राष्ट्राच्या आर्थिक विकासात वाढ होण्यासाठी महिला सक्षमीकरण होणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय उत्पन्न :** राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणायची असेल तर महिलांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणे गरजेचे आहे. आज महिलांना ही आंतरराष्ट्रीय पातळीवर पोचून विविध क्षेत्रांत आपली कार्यकुशलता कर्तबगारी व कर्तृत्व सिद्ध करताना दिसतात. तसेच परकीय गंगाजळीत भर टाकण्यात अहि त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पन्न व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील विकास, राष्ट्रीय उत्पन्नात देखील वाढ होताना दिसते. महिला सक्षमीकरण यामुळे हे सहज शक्य आहे.

वरील सर्व घटकांचा विचार करता आपल्याला असे दिसून येते की समाजात महिला सक्षमीकरण केवळ महत्त्वाचे नसून अपरिहार्य सुद्धा आहे.

**संदर्भसूची :**

1 . डॉ एस पी गायकवाड महिला नेतृत्व सबळीकरण व परिवर्तन एक समाजशास्त्रीय अभ्यास विषय संदर्भ लातूर जिल्हा शोधप्रबंध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद 2000

2. डॉ राहुल भगत शोधनिबंध महाराष्ट्राचा राजकीय सहभाग आणि महिला सशक्तीकरण डिसेंबर 2014

3. श्री वीरेंद्र मुरलीधर घरडे सुरेंद्र अमर मोरे महिलांचा राजकीय सहभाग व सबलीकरणाची वास्तविकता विषय संदर्भ धुळे जिल्हा शोधनिबंध जानेवारी 2015

4. कार्की डीएस व शर्मा नीता बोरा रिसर्च लिंक ऑगस्ट 2007 पृष्ठ क्रमांक थर्टी

5. डॉ चौधरी कृष्णचंद्र स्त्री सक्षमीकरण चुनोती व संभावना ए समाज कल्याण 2005 पृष्ठ क्रमांक 9

6. गुप्ता कमलेश कुमार महिला स-शक्तिकरण बुक एन क्लेव जयपुर 2005 पृष्ठ एक 16 गुप्ता

7. कमलेशकुमार कुमार, भारतीय महिलाए, पूर्वोक्त,पृष्ठ 307

8. हिंगोले रेखा, स्त्री सक्षमीकरण आणि स्वयंसेवी संघटना, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पीएचडीचा अप्रकाशित शोधप्रबंध, 2002, पृष्ठ 115

9. तरुण भारत, नागपूर, निवडणुका मतदान आणि महिला,5/5/2019

10. लोकसत्ता, लेख

11. कबीर ,उषा लक्ष्मण बोबडे, लेख राजकारण आणि स्त्रिया, 31 मार्च 2019

12. महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल 2016 -2017

# समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*डॉ. भागवत सुभाष गजधाने*

*सहाय्यक प्राध्यापक, छ. शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस्, अॅन्ड कॉमर्स, सोलापूर*

**प्रस्तावना :**

एक समाजशास्त्रज्ञाच्या रूपामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणतीही शैक्षणिक पदवी प्राप्त केली नाही तरीही त्यांचे समाज विषयक मौलिक चिंतन, लेख संशोधनात्मक प्रबंधाच्या माध्यमातून वेळोवेळी त्याचे प्रकटीकरण झाले आहे. त्यामुळे त्यंना एक समाजशास्त्रज्ञाच्या रूपामध्ये प्रतिष्ठित करता येते. भारतीय समाजाची समजशास्त्रीय विवेचनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्याच्या आंदोलनातील सर्व विभुतियामध्ये अग्रगणी ठरतात. त्यांचे लेखन हे अग्रगणी समाजाची समाजशास्त्रीय दृष्टी केवळ भारताच्या वर्तमान समाजाचे चित्रण दाखवत नाही तर प्राचीन काळातील जाती व वर्णाची उत्त्पतीपासुन ते जातिविरहीत समाज निर्माण करिता भविष्यासाठी ठोस उपायापर्यंत पोहचते. त्याचबरोबर भारतीय समाजामधील वर्तमानकालीन स्त्रीयांच्या स्थितीबाबत समानतेच्या बाबतीत चिंतित आणि गंभीर दिसतात आणि त्यांची समाजशास्त्रीय विवेचना भारताच्या धर्माची विशिष्टतांनासुद्धा उजागर करते. त्यांचे धर्म, जाति व वर्ण विषयक चिंतनाचे अध्ययन आपण वेगळया पद्धतीने करू शकतो. इथे मात्र हे सांगु इच्छितो की, त्यांचे सामाजिक विचार त्यांच्या सामाजिक आंदोलनाच्या भागिदारीतून निर्माण झाले आहेत. हे त्यांच्या विद्वत्तापुर्ण समाजशास्त्रीय स्वरूपाचे ठोस परिचायक आहे.

**समाजशास्त्रज्ञ म्हणुन परिचय :**

डॉ. ए.ए. गोल्डन वाईजनच्या परिषदेमध्ये 9 मे, 1916 या दिवशी "भारतात जातिप्रथा, संरचना, उत्त्पत्ती आणि विभास" या नावाचा संशोधनपर लेख कोलंबिया युनिव्हर्सिटी, न्युयॉर्क (अमेरिका) मध्ये वाचला होता. कदाचित त्यांची समाजशास्त्रज्ञ म्हणुन तो पहिला परिचयपत्र होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जातिभेदाचे उन्मुलन' नावाचे शोधपुर्ण भाषणामध्ये भारतीय समाज-व्यवस्थेचे जे संशोधनपुर्ण समाजशास्त्रीय म्हणुन आलोचना केली आहे. ते संपुर्ण भाषण त्यांना प्रबुद्ध समाजशास्त्रज्ञ म्हणुन प्रमाणित करण्यासाठी पुरेसे आहे. लाहोरच्या "जात-पात तोडक मंडळ" (1936) च्या वार्षिक संमेलनाकरिता तयार केलेल्या भाषणाच्या बाबतीत डॉ. वसंत मुन यांचे असे म्हणणे आहे की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे भाषण अप्रतिम वक्तृत्वाचा, अद्वितीय युक्तीवादाचा, निरागस टीकेचा, विशुद्ध बुद्धिनिष्ठ तर्कवादाचा, चिकित्सक संशोधनाचा आणि बेजोड बुद्धीमत्तेचा भारतीय साहित्यातील व समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा एक अनुपम असा अविष्कार आहे. हे भाषण कितीही वाचा याची गोडी कमी होत नाही. क्रांतीची मशाल पेटवणारे शब्द शोधायचे असतील तर ते यात सापडतील. मात्र मशाल पेलणारे बाहुदेखील तेवढेच समर्थ हवेत.1"

**समाजशास्त्रज्ञ म्हणुन योगदान :**

व्यक्ति हा समाजाचा भाग आहे याच्या आधारे समुचित विकासाच्या मार्गामध्ये, जातिभेद, अस्पृश्यता, जातिव्यवस्था इ. बंधनांना ते सगळयात अगोदर त्यांना हटविले पाहिजे असे त्यांना वाटत. ते एक समाजशास्त्रज्ञाच्या दृष्टीकोनातून पाहतांना सर्वांना 'स्वतंत्रता, समता, बंधुता या मानवीय सामाजिक मुल्यांच्याबरोबर शोधत असतात.' 'रोटीबंदी' च्या समाप्तीनंतर 'बेटीबंदी' पण बंद करणे, आंतरधर्मिय, आंतरजातीय विवाह करणे याबाबत त्यांचे पक्के मत झाले होते. विधवा-विवाह करावे. चातुवर्ण्याच्या चौकटीतुन बाहेर पडावे. असे आवाहन करतांना अनेक शतकापासुन देशास गुलामीत ठेवण्याच्या कारणांमध्ये याच समाजिक दुर्बलता, अनिष्ट परंपरामध्ये पाहतात. केवळ एक वर्ण विशेषत: क्षत्रियांना देशाची रक्षा करण्याची जबाबदारी देणे हा संकुचित विचार आहे. उलट अपवाद सोडुन प्रत्येक नागरिकांमध्ये देश संरक्षणाची उत्कट भावना असते. सामाजिक क्षेत्रामध्ये संत, महंताच्या हस्तक्षेपामुळे व त्यांनी पाखंडीपणाने भरलेल्या साधुवादास वंदनीय न मानता त्यांच्यावर आरोप लावले की संत लोक मानवाच्या समानतेची गोष्ट करीत नाहीत. परंतु इश्वराच्या दृष्टीने सर्व मानव समान आहेत. कोणत्याही साधु-संताने जातिभेदाविरूद्ध मोहिम उघडली नाही. त्यांच्यापासुन जातिभेदरूपी विशाल वृक्षाचे एक पानही हलवु शकले नाहीत.2 बहिष्कृत भारतामध्ये संपादकीय लेखनातुन डॉ. बाबासाहेबांनी पेशवेकालीन समाज-व्यवस्थेचे यथार्थ चित्रण केले ज्यामध्ये सांगितले की कशापद्धतीने अस्पृश्यांच्या गळयात मडके बांधले जाई कारण ते थुंकले तर त्यामध्येच थुकावे. त्यांच्या कमरेला झाडु बांधले जात असत कारण स्पृश्य लोकांना रस्ता साफ व्हावा. या अमानवीय आणि असंवेदनशील व्यवहाराचे भयंकर परिणामांना समोर ठेवुन डॉ. बाबासाहेबांनी उदार मानवीय पक्षाचे पोषण केले.

मुकनायकाच्या सुरूवातीच्या अंकात त्यांनी हिंदु धर्म ग्रंथावर टीका केली. सामाजिक अनिष्ट चालीरीती याच ग्रंथाद्वारे दिलेल्या व्यवस्थेवर आधारित अस्पृश्यांवर लादल्या गेल्या आहेत. हेच कारण होते की स्पृश्य आणि अस्पृश्यांमध्ये भेदभाव

निर्माण झाला आणि असे सांगितले की, आम्ही संस्कृतीने एक आहोत आणि जातीतुन अनेक व वेग-वेगळे आहोत. 'हिंदु समाज व्यवस्था' नावाच्या निबंधामध्ये बाबासाहेबांनी 'कालीकत' प्रांताच्या नायर जातितील स्त्रीयांच्या स्थितीबाबत' विस्ताराने लिहुन सामाजिक चेतनाचा परिचय दिला. येथे बाबासाहेब नायरपेक्षाही हीन अशा 18 जातीतील क्रमानुसार सामाजिक परिस्थितीचे विवेचन केले आहे. जसे 'मैनाती क्लेटी' आणि यापेक्षासुद्धा खालची जात आहे. 'तुझ्या' (शुद्र) यापेक्षाही खालची जाती आहेत. यामध्ये 'मेमन', 'कनकू', 'अंगेर', 'मंगोर' या सर्व नायर जातीपेक्षा खालच्या व गुलाम जाती आहेत. 'मोलक' (मल्हा) 'वेतून' हिंदुंची याच क्रमाने खालची जाती आहेत. 'रोबली' चे लोकसुद्धा नायरांचे गुलाम आहेत. हे लोक आपले गुप्तांग घाण अस्वच्छ अशा कापडापासुन झाकत असत. 'पोला' नावाची जात यापेक्षाही खालची असते, त्यांना बहिष्कृत ठेवले जाते. पाश्चात्य समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजव्यवस्थेबाबत मोठ्या प्रमाणात लिखाण केले परंतु ते पेक्षक होते. त्यांचा भारतीय समाजव्यवस्थेशी आत्मीय संबंध नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनुसार परकिय लोकांनी भारतीय जाती-व्यवस्थे विषयी संपुर्ण माहिती देऊ शकले नाहीत. ही गोष्ट समजु शकतो कारण प्रत्येक परकियांसाठी हिंदुंचे वैयक्तिक जीवन हे रहस्यमय आहे. जर जाती-व्यवस्था त्यांना भारतीय समाजाची विलक्षणता वाटली नसती तर याबाबतीत त्यांनी लिखाण केले नसते.3

वर्ण व्यवस्थेचे विभाजन चार भागामध्ये केले गेले परंतु हे विभाजन चार हजार जातीमध्ये विस्तृत करून समाजशास्त्रज्ञांनी समाजाच्या एकतेला गंभीर जखम पोहचवली. भारतीय धर्म पंडितांनी जातीचे बहिष्कार, स्तरीकरणाला न्यायसंगत म्हटले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानुसार "श्री भट्टाचार्यांनी जाति पासुन बहिष्कृत करण्याची अनेक कारणे सांगितली आहे. यामध्ये विधवाविवाह परदेशागमन, आंतरजातीय विवाह, आंतरजातीय सहभोजन मुख्य आहे.4 ही प्रतिबंधे प्राचीन आहेत आता परदेशागमन, विधवा विवाह, आंतरजातीय विवाह इ. होतात. याबाबत आता कोणालाही आपत्ती नाही परंतु जाती आणखीनच मजबुत होत आहेत. भारतीय समाजशास्त्रज्ञ टी.एन. मदानच्या शब्दात साठ च्या दशकात आम्हाला शिकविले की जात-पंचायत भारतीय राजनीतीचे मुख्य कारकांपैकी एक आहे.5"

**समारोप :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या क्षेत्रामध्ये औपचारिक उच्चकोटीची शिक्षा घेतली. त्याचे मुख्य शिक्षण एम.ए. पी.एच.डी. (कोलंबिया), डी.एस.सी. (लंडन), एल.एल.डी. (कोलंबिया), डी.लिट. (उस्मानिया), बार ॲट लॉ (लंडन) इ. यामध्ये कायद्यासंबंधी पदवी अत्यंत महत्त्वपुर्ण होत्या. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातुन त्यांची प्रत्येक घटनेकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा योग्य न्यायिक मतांचा होता. सर्व मिळुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्वावरती शोधक दृष्टीकोनातुन पाहिले असता आम्हाला असे आढळते की एका सर्वसाधारण घर आणि अस्पृश्य जातीचा व्यक्तिसुद्धा उद्देश,सातत्त्य,कठोर परिश्रम आणि अभ्यासाच्या जोरावर स्वत:मध्ये राष्ट्रोपयोगी योग्यता उत्पन्न करू शकतो आणि समाजासाठी एक अनुकरणीय उदाहरण बनु शकतो. त्याचबरोबर एकाचवेळी अनेक मोर्चांवर आपल्या सेवा देऊ शकतो. राहीली गोष्ट यश-अपयशाची की जे समाज-परिवर्तनाचे कार्य अविरत चालु राहते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जे राहिलेले कार्य आहे ते त्यांच्या वैचारिक वारसांना करावे लागेल.

**तळटिपा :**

1. पवार दया आणि इतर (संपादित) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ जातिनिर्मुलन पुस्तक : एक चिकित्सा. लेखक : वसंत मुन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पुणे 1993, पृ.क्र. 86.

2. डॉ. आंबेडकर बाबासाहेब यांचे लेखन आणि भाषणे खंड-18 भाग-1 1920 ते 1936 डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन 2016, पृ.क्र. 528.

3. कित्ता, पृ.क्र. 504.

4. डॉ. आंबेडकर बाबासाहेब - हिंदुंची समाजव्यवस्था, खंड-5 प्रकरण-16, अनुवाद डी.के. खापर्डे - बहुजन संघर्ष, 1 सप्टेंबर 1991, पृ.क्र. 262.

5. कित्ता, पृ.क्र. 263.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

*डॉ.देविदास हारगिले*
*स.का.पाटील महाविद्यालय मालवण*

कोणत्याही राष्ट्राचे संविधान हे त्या राष्ट्राचा पवित्र कायदा असतो नागरिकांच्या सामाजिक ,आर्थिक ,राजकी जीवनाच्या सुरक्षिततेची हमी संविधानाने दिलेली आहे. भारतीय संविधान 26 जानेवारी 1950 रोजी स्वीकृत करण्यात आले या भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा विस्ताराने विचार करण्यात आला आहे तसेच भारतीय लोकांना हक्कासंदर्भात हमी देणारा राज्यघटना हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर असून जगातील सर्वात मोठे संविधान म्हणून भारतीय संविधानाचा उल्लेख केला जातो 2 वर्ष 11 महिने 18 दिवस भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीचे कार्य चालले. राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी 29 ऑगस्ट 1947 रोजी घटना समितीने मसुदा समितीची निवड केली या मसुदा समितीत एकूण सदस्य होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष होते इतर सर्व सदस्यांना काही या ना त्या कारणाने कार्यात सहभाग घेता आला नाही म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी एकट्यानेच सर्व जबाबदारी पूर्ण केले. उच्चशिक्षित आणि प्रखर राष्ट्रप्रेमी आणि महान देशभक्त असल्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची मसूदा समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती मसुदा समितीचे कार्य फार प्रभावीपणे झाले. आंबेडकर आंबेडक यांचे हे योगदान कार्यनिष्ठेचे द्योतक ठरले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करत असताना सातत्याने आजारी पडत होते, त्यांना मधुमेहाचा आजार व त्रास सुरू झाला होता परंतु आजाराची फारशी तमा न बाळगता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना निर्मितीचे कार्य अखंडपणे केले. कृष्णमाचारी म्हणतात, अनेकदा संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये बाबासाहेब व त्यांच्या टायपिस्ट दोघेच रात्रंदिवस काम करीत असत अविश्रांतपणे भारतीय राज्यघटनेच्या मसुदा निर्मितीचे कार्य पूर्ण करण्याचा अट्टाहास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घेतला होता म्हणून तर वेळेत निर्मिती होऊ शकली म्हणून आजारपणामध्ये सुद्धा स्वतःचा विचार न करता राष्ट्राचा विचार करणार्या बाबासाहेबांना राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते.

*निर्णायक मसुद्याची क्लिष्ट प्रक्रिया व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका*

भारतीय संविधान निर्मितीच्या शेवटच्या दिवशी केलेल्या भाषणात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या निर्णायक मसुद्याची क्लिष्ट प्रक्रिया व राज्यघटना निर्मितीच्या कालावधीवर प्रकाश टाकला होता भारताची राज्यघटना तयार करण्यास दोन वर्ष 2 वर्ष 11 महिने लागले त्याच बरोबर उदाहरण देत असताना त्यांनी सांगितले की ऑस्ट्रेलियाच्या राज्यघटना निर्मिती साठी तब्बल नऊ वर्षांचा कालावधी लागला तर दक्षिण आफ्रिकेच्या राज्यघटने निर्मितीसाठी एक वर्षांची कालावधी लागला या सर्वांचघ तुलना केल्यास 395 कलम असलेली राज्यघटना तयार करण्यासाठी विलंब झाल्याचा आरोप मला सर्वस्वी अनाठायी वाटतो. यावरून भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीच्या कालखंड हा जास्त नसून जगातील सर्वात मोठी राज्यघटना अशा प्रक्रियेतून त्यामानाने फार लवकर तयार झाली यामध्ये घटनासमितीचे योगदान आहे त्यापेक्षा अधिक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विशेष योगदान होते कारण या प्रक्रियेतून सर्वमान्य अशा घटनेचा मसुदा तयार करण्यात त्यांचा वाटा महत्त्वाचा होता. *घटनासमितीचे सर्वाधिक जबाबदारी*

बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र व सार्वभौम राज्यघटनेचे शिल्पकार होते हे टीटी कृष्णमचारी यांच्या मतावरून स्पष्ट होते ते म्हणतात ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहकार्य पैकी एकाने राजीनामा दिला आणि त्याची जागा दुसऱ्या ची नियुक्ती करण्यात आली नाही त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांची संख्या सहा राहिली पण त्या सहकाऱ्या पैकी एकाचा मृत्यू झाला त्यांची जागा रिकामी राहिली. पाच सहकारी सभासद राहिले त्या पाच सहकारी सभासदांपैकी एक जण अमेरिकेत राहू लागला त्याची जागा रिकामीच राहिली शिल्लक राहिलेल्या चारपैकी एक राज्याच्या कारभारात गुंतून राहिले ती जागा रिकामीच राहिली उरलेल्या तीन सहकारी सभासदांपैकी दोन सभासद दिल्लीपासून दूर होते आणि ते आजारपणामुळे मसुदा समितीच्या कामकाजात भाग घेऊ शकत नव्हते शेवटी मसुदासमितीचे घटना तयार करण्याची जबाबदारी अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना सांभाळावे लागली आंबेडकर यांनी त्यांचे कर्तव्य आणि निष्ठेने हे कार्य केले त्यांचे आभार मानलेपाहिजेत अशा प्रकारची प्रतिक्रिया यावेळी संमितीच्या अनेक सभासदांनी व्यक्त केली होती.

*विविध विचारप्रवाहांना न्याय*

विविध विचारप्रवाह यांना न्याय आंबेडकरांनी दिला. राज्यघटनेचे निर्माण कसे करावे,भारतीय राज्यघटना कशी असावी याबाबत विविध मतप्रवाह त्या काळात होते नेहरू रिपोर्ट त्यासाठीच मांडण्यात आला होता त्याशिवाय मानवेंद्रनाथ रॉय यांनीही राज्य घटनेचा कच्चा आराखडा घोषित केला होता याशिवाय गांधीवादी महात्मा गांधीजींच्या विचारांवर आधारित राज्यघटना मागत होते हिंदू महासभा हिंदुत्वाचा आग्रह धरत होती पंडित जवाहरलाल नेहरू समाजवादी विचारांच्या बाजूने होते तर घटना समितीवर काँग्रेसचे वर्चस्व होते या सर्व पार्श्वभूमीवर कोणाच्याही दबावाला बळी न पडता सर्व

विचार प्रवाहातील उद्दात मुल्य स्वीकारत भारतीय राजकीय सामाजिक व्यवस्थेचा सांगाडा मसुद्याच्या रूपाने तयार करण्यात बाबासाहेब आंबेडकर यशस्वी झाले आंबेडकरांनी अप्रतिम आणि प्रचंड कार्य केलं. कुणालाही न जुमानणारे दडपणाला बळी न पडणारी अजिंक्य आशी बुद्धिमत्ता पामवृक्षाप्रमाणे त्या सर्वांचे दमन करीत त्यांना जे योग्य वाटेल त्याकरता परिणामाची पर्वा न करता बाबासाहेब आंबेडकर कार्य करीत असत.

*आंबेडकरांना राज्यघटनेचे शिल्पकार ठरवणारी मते* आंबेडकरांच्या घटनात्मक कार्याविषयी विदमते संस्थेच्या भाषणात व्यक्त करण्यात आले होते असे म्हणतात जगातील कुठल्याही राष्ट्रातील कोणत्याही घटनापंडित यांच्या तोडीचे डॉक्टर आंबेडकरांचे कार्य आहे अल्लादी कृष्णस्वामी अय्यर म्हणतात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले कौशल्य व बुद्धिमत्ता यांचा उपयोग करून तसेच अविश्रांत खपून घटना तयार केली त्याबद्दल धन्यवादास पात्र आहेत.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मसूदा समितीच्या वतीने घटना तयार करून त्या देशाची फार मोठी सेवा केली आहे.

*गोषवारा*

भारतीय संविधान जगातील सर्वोत्कृष्ट संविधान पैकी एक आहे इतर राष्ट्रांच्या संविधानाचा अभ्यास करून भारतीय परंपरा व संस्कृतीला पूरक अशा स्वरूपात त्यांचे रूपांतर करून भारतीय संविधान तयार करण्यात आले आहे कोणत्याही राष्ट्राचे संविधान हे त्या राष्ट्राचा पवित्र कायदा असतो नागरिकांच्या सामाजिक आर्थिक राजकीय जीवनाच्या सुरक्षिततेची हमी संविधानाने दिलेले असते राज्याची शासन व्यवस्था नियंत्रित होते त्या नियमांच्या संचालन संविधानाचे म्हणतात 26 जानेवारी 1950 ला भारतीय संविधान म्हणजे राज्यघटना अस्तित्वात आली राज्यघटनेच्या मसुदा तयार करण्यासाठी 29 ऑगस्ट 1947 रोजी घटना समितीने मसुदा समितीची निवड केली या मसुदा समितीत एकूण सात सदस्य होते भीमराव रामजी आंबेडकर डॉक्टर

घटना समितीचे अध्यक्ष डॉक्टर राजेंद्र प्रसाद म्हणतात की स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी अध्यक्ष म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्याचा घटना समितीचा निर्णय अगदी अचुक होता आपल्या ढासळणाऱ्या प्रकृतीची तमा न करता त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले आंबेडकर यांनी उत्कृष्ट राज्यघटनेची निर्मिती करून तो निर्णय सार्थक सिद्ध केला आहे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आंबेडकर हेच आहेत जगातील सर्वात मोठे समाधान त्यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीचे कार्य केले तयार केलेल्या घटनेबद्दल 25 नोव्हेंबर 1949 रोजी ते आपल्या भाषणात म्हणतात की, ही राज्यघटना चांगली असो की वाईट असो तीचे यशापयश हे ती राबवणाऱ्या वर अवलंबून असते .स्वातंत्र्य व लोकशाही अबाधित राखण्याकरिता शेवट पर्यंत प्रत्येकाने झटले पाहिजे .

**संदर्भसूची**

१)पाटील सुरेश- मानवी हक्क, के'सागर पब्लिकेशन पुणे 2009

२)देवेंद्र इंगळे- लोकशाही म्हणजे काय?विदयाभारती प्रकाशन लातूर 2010

३) भारतीय संविधान,नॅशनल बुक ट्रस्ट नवी दिल्ली 2009

४) डॉ.ज्ञानराज गायकवाड-महामानव डॉ.भीमराव रामजी आंबेडकर,अजब प्रकाशन, कोल्हापूर,२००६

५)चांगदेव खैरमोडे- डॉ.भीमराव रामजी आंबेडकर,खंड ९, सुगावा प्रकाशन पुणे २०१४

*'Journal of Research & Development'*
*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"*

# पंचवार्षिक योजनांमधील बदलते कृषी धोरण

***सचिन आर. दर्पे***
*कणकवली कॉलेज, कणकवली, जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र*

**सारांश -**

भारतात स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनांना सुरूवात केली आणि खऱ्या अर्थाने देशाच्या सर्वांगीन विकासावर भर देण्यात आला. भारतात नियोजनाच्या दृष्टीने 5 वर्षासाठी आराखडा तयार करण्यात येतो. पहिल्या पंचवार्षिक यांजनेत अन्नधान्याचा पुरवठा वाढविण्यासाठी कृषी क्षेत्राला महत्त्व देण्यात आले. नवीन आर्थिक धोरणानंतर कृषी विकासाला गती मिळेल असे वाटत होते, परंतु कृषी क्षेत्रातील उत्पादन तंत्राच्या वापरामुळे शेतीची उत्पादकता व आधुनिक आदानांचा वापर यातील संबंध उघड झाला. त्यामुळे सरकारच्या बदलत्या भूमिकेचा आणि पंचवार्षिक योजनांनमधील कृषी क्षेत्रातील बदलत्या भूमिकेचा आढावा घेणे महत्त्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्था कृषी प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. आजही देशातील तीन तृतीयांश लोकसंख्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्रातूनच उदर्निर्वाह करते, त्यामुळे नियोजन काळात कृषी क्षेत्रावर केलेला खर्च आणि ठरवलेली उद्दिष्ट्ये यांचा ताळमेळ घालणे आवश्यक वाटते. अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करून अन्नाधान्याच्या बाबतीत देशाला स्वयंपूर्ण करणे, वाजवी किमतीत अन्नधान्याचा उपभोक्त्यांना पुरवठा करणे, रोजगार वृद्धी आणि देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे अशी या पंचावार्षिक योजनांची उद्दिष्ट्ये होती. त्यानुसार देशात अंमलबजावणी झालेल्या सर्व योजनांचा कृषी क्षेत्राच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी संशोधन पद्धतीमधील दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. साधनसामग्रीच्या वापरानंतर, अभ्यासानंतर असे लक्षात येते की पंचावार्षिक योजनांमधून झालेला खर्च हा सतत घसरत असलेला दिसून येतो. योजनांची योग्य अंमलबजावणी न झाल्याने आजही कृषी क्षेत्र पुढारलेलं दिसून येत नाही.

**प्रस्तावना -**

भारतात नियोजनाच्या दृष्टीने 5 वर्षासाठी समग्र आराखडा तयार केला जातो. पं. नेहरूंनी पहिली पंचवार्षिक योजना 8 डिसेंबर 1950 ला संसदेत मांडली आणि देशाच्या नियोजित विकासाला सुरूवात झाली. नियोजनात सर्वच क्षेत्रावर विशेष भर देण्यात आला, त्यात शेती क्षेत्राला आजपर्यंत झालेल्या सर्वच योजनेत प्राधान्य दिले आहे. त्याचाच आढावा यामध्ये घेण्यात आला आहे

**संबंधित साहित्याचा आढावा -**

**साठिया सुथंथिरवीरे -**

'भारतातील पंचवार्षिक योजना : सार्वजनिक आरोग्य धोरणांचा आढावा' या विषयावरील संशोधनात पंचवार्षिक योजनांच्या आढाव्यावरून असे लक्षात आले की सर्व योजनांमध्ये आरोग्य क्षेत्राकडे केलेली गुंतवणूक ही एकूण बजेटच्या 3.28% येवढी होती. या गुंवणूकीत सर्वाधिक प्रमाण चौथ्या योजनेत 9.9% तर सर्वातकमी प्रमाण दहाव्या योजनेत 2.4% येवढे होते.

**प्रमिता गुरुंग (2017) -**

'संघटीत क्षेत्रातील श्रमिकांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने पंचावार्षिक योजनांचा अभ्यास' केला. त्यात असे दिसून आले की स्वातंत्र्यानंतर दोन ते तीन दशकापर्यंत म्हणजेच नवव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत श्रमिकांच्या सामाजिक सुरक्षा योजनांनकडे लक्ष दिले नव्हते. अलिकडील काळात विविध योजनांनमधून या प्रवृत्तीत बदल होत आहे.

बबिता जैस्वाल, चित्रा शर्मा (2015) -

'पंचवार्षिक योजनांनमधील कृषी व रस्ते विकास' यामध्ये सरकारने शेती क्षेत्राच्या विकासासाठी, लक्षीत वृद्धीसाठी लहान-लहान टप्पे गाठण्याची गर आहे असे मत प्रतिपादित केले.

प्रभा, ब्रिजेश कुमार, एस्. के. गोयल (2015) -

'पंचवार्षिक योजनांमधील कृषी आणि ग्रामीण विकास' यामध्ये नियोजनामध्ये शेतीच्या विकासासाठी विज्ञान तंत्रज्ञान संशोधन यासारख्या कार्यक्रमांवर भर द्यावा. कृषी व ग्रामीण विकास ही एकमेकांवर आधारीत प्रक्रिया आहे, त्यायोगे आखलेल्या योजनांची योग्य अंमलबजावणी आणि देखरेख करणे आवश्यक आहे.

**संशोधन पद्धती -**

या संशोधनासाठी दुय्यम संशोधन साहित्याचा वापर करण्यात आला आहे. पुस्तके, मासिके, नियतकालीके, एम्. *फिल., पीएच्. डी. संशोधने, सरकारी प्रकाशने, विविध पंचवार्षिक योजनांची प्रसिद्ध अहवाल इत्यादी.*

**कृषी संदर्भात वेगवेगळ्या योजनांचा आढावा -**

**पहिली पंचवार्षिक योजना (1951 ते 1956) -**

भारत हा कृषी प्रधान देश आहे. हे जाणून पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. या योजनाकाळात दामोदर खोरे विकास प्रकल्प, भागनागल धरण, सिंद्री खत कारखाना अशा शेती विकास योजनांवर खर्च करण्यात आला. त्यातूनच पहिल्या पंचवार्षिक योजना काळात शेती क्षेत्राने लक्षणीय प्रगती केली. 1950-51 मध्ये अन्न धान्याचे उत्पादन 50 दशलक्ष टन होते. या योजनेत अन्नधान्य उत्पादनाचे लक्ष 61.6 दशलक्ष ठरविण्यात आले होते. परंतु उत्पादन यापेक्षा जास्त म्हणजे 65.38 दशलक्ष टन इतके झाले. अन्नधान्याची किंमती झाल्या. आयात कमी झाली आणि निर्यात वाढू लागली.

**द्वितीय पंचवार्षिक योजना (1956 - 1961) -**

पहिल्या योजनेत कृषी क्षेत्राची भरभराट झाली होती. शेती उत्पादनात वाढ झाली. शेती उत्पादनात 18% नी वाढ झाली. दुसर्या योजनेत नांगल खत कारखाना सुरू केला. या प्रकल्पांना महत्त्व देण्यात आले. या योजनेत उद्योग क्षेत्रावर भर दिला. अवजड व भांडवली उद्योगांच्या विकासाला आग्रक्रम देण्यात आले. त्यामुळे शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष करण्यात आले. शेती उत्पादनांच्या किंमतीमध्ये वाढ झाली. परिणामी अन्नधान्याची आयात करावी लागली. 1956-57 मध्ये W.P.I.105.1 होता तो 1960-61 मध्ये 12.5 झाला.

**तृतीय पंचवार्षिक योजना (1961 - 1966) -**

दुसऱ्या योजनेअखेरीस अन्नधान्य उत्पादनाबाबत अपेक्षीत यश मिळाले नाही. तिसर्या पंचावार्षिक योजनेत असे नमूद करण्यात आले की देशाच्या आर्थिक विकासासाठी शेती क्षेत्राला महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. यासाठी जानेवारी 1965 मध्ये कृषी किंमती आयोग स्थापन केला गेला तसेच 1964 मध्ये अन्न महामंडळ कायदा संमत करण्यात आला आणि 1962 मध्ये भारतीय अन्न महामंडळ (FCI) ची स्थापना करण्यात आली. शेतीच्या विकासावरच आर्थिक विकासाचा वेग अवलंबून राहणार आहे. त्यासाठी शेतीच्या उत्पादनात वाढ घडवून आणने आवश्यक आहे. त्यासाठी या योजनेत आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून दिली गेली.

**चौथी पंचावार्षिक योजना -**

चौथ्या पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्राच्या दृष्टीने प्रकर्षित शेतकी डावपेचाचा अवलंब करण्यात आला. दुष्काळ आणि अन्नधान्याच्या तुठवड्यावर पर्याय म्हणून FCI ची स्थापना झाली होती. उच्च प्रतिच्या बी-बियानांचा वापर करून शेतीत एका ऐवजी अनेक पिके घ्यावयाची असे ठरविण्यात आले. पुढील 10 वर्षात म्हणजे 1979 पर्यंत शेतीच्या उत्पादनात दरवर्षी 4 टक्के दराने वाढ करणे, देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करणे, छोटे व सिंमात शेतकर्यांच्या शेतीच्या विकास कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे असे असले तरी या योजनेत ठरविण्यात आलेली उद्दिष्टे साध्य होवू शकली नाहीत.

**पाचवी पंचवार्षिक योजना -**

पाचव्या योजनेत कृषी क्षेत्रावर 22% खर्च करण्यात आला. तसेच शेतीक्षेत्राने 4.2 टक्के वृद्धीदर गाठावा असे ठरविण्यात आले. शेतीमध्ये स्वर्यपूर्णता मिळावी म्हणून शेती क्षेत्राचा वृद्धीदर 4.2 % ठेवण्यात आला. या काळात शेतीक्षेत्रातील नव्या डावपेचांचा अवलंब करण्याचे ठरविण्यात आले. या काळात कोरडवाहू शेतीच्या तंत्रावर लक्ष केंद्रीत करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे शेती आदानाच्या वापरात वाढ झाली. रासायनिक खतांच्या वापरात वाढ झाली. सिंचनक्षमतेत वाढ झाली. जलसिंचन प्रकल्पामुळे 11.2 दशलक्ष हेक्टर जमिनीस सिंचनसोयी उपलब्ध करून देण्याचे ठरविण्यात आले होते. योजना अखेरीस 125 दशलक्ष टन अन्नधान्य उत्पादनाचे लक्ष ठरविण्यात आले. प्रत्यक्षात 126 दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन झाले.

**सहावी पंचवार्षिक योजना (1980 - 1985)**

या योजना काळात ग्रामी विकासावर भर देण्यात आला. त्यासाठी IRDP, NREP, RLEGP या सारख्या योजना सुरू करण्यात आल्या. यातून सिमांत अल्प, शेतमजूर यांना रोजगार उपलब्ध करून दिला गेला. कृषी सेवांच्या पुरवठ्यासाठी कृषी सेवा केंद्र स्थापन करणे, शेतीला प्रगत तंत्रज्ञान पुरवणे, शेतमाल विपणनात सुधारणा घडवणे. ग्रामीण

रोजगार निर्मिती शेती विषयात सुधारणांची कार्यवाही करणे, पायाभूत सेवांची जलद निर्मिती करणे इ. उद्दिष्टे आखण्यात आली. योजनेच्या सुरूवातीला अन्नधान्य उत्पादन 109 दशलक्ष टन इतके होते. ते 1984-85 मध्ये ते 145.5 दशलक्ष टन इतके झाले.

**सातवी पंचवार्षिक योजना (1985 - 1990) -**

सातव्या योजनेत आदेशात्मक नियोजन वापरण्यात आले. पाणी पुरवठ्यासाठी दशलक्ष विहिरी योजना (mws) सुरू करण्यात आली. शेती विकासासाठी सिंचन व्यवस्था करणे, कृषी विपणनात सुधारणा, नवीन शेती तंत्राचा अधिक प्रसार, ग्रामीण रस्ते, पतपुरवठा करणार्या संस्थांचा विकास, योग्य शेतकी धोरण यास प्राधान्य देण्यात आले. सातव्या योजनेत शेतीच्या विकासासाठी पुढील कार्यक्रम निश्चित करण्यात आला. भारताच्या पूर्व विभागात भाताच्या उत्पादनासाठी विशेष स्वरूपाचा कार्यक्रम तेलबियांच्या विकासासाठी राष्ट्रीय प्रकल्प सिमांत व लहान शेतकर्यांसाठी विकास योजना इत्यादी यामुळेच सातव्या पंचवार्षिक योजनेत देश अन्न धान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. कृषी उत्पादन 145.5 दशलक्ष टनावरून 1989-90 मध्ये 170.6 दशलक्ष टन इतके झाले.

**आठवी पंचवार्षिक योजना (1992 - 1997) -**

हा परिवर्तनाचा कालखंड म्हणावा लागेल. याच कालखंडात नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केल्याने जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या संकल्पना सर्वच क्षेत्रात स्विकारले गेले. परकीय चलनाची समस्या निर्माण झाली होती. विदेशी कर्जाचा बोजा वाढला होता. तरी देखील शेतमजूर, लहान शेतकरी, ग्रामीण गारागीर यांना सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीने आर्थिक मदत केली. हरीत क्रांतीचे लाभ ज्या विभागांना मिळाले नाहीत त्यांना ते मिळवून देण्याचे निश्चित केले गेले. अन्नधान्य उत्पादन-आठव्या योजनेअखेर 201 दशलक्ष टन उत्पादनाचे लक्ष ठेवण्यात आले. प्रत्यक्षात 199 दशलक्ष टन इतकेच उत्पादन झाले.

**नववी पंचवार्षिक योजना (1997 - 2002) -**

स्वातंत्र्याच्या 50 व्या वर्षी 9 वीं पंचवार्षिक योजना सुरू झाली. सामाजिक न्याय व समानतेसह आर्थिक वाढ या योजनेचे प्रमुख लक्ष होते. शेती विकासाच्या दृष्टीने कृषी विकासदर 4.5 टक्के निश्चित करण्यात आला. सर्वांना पुरेसे व पौष्टीक अन्नधान्य उपलब्ध करू देणे, किंमत पातळी स्थिर ठेवणे, शेती क्षेत्रात विविधता आणने, नव्या सिंचन सुविधांमध्ये वाढ करणे, लागवडी खालील क्षेत्रात वाढ घडवून आणणे अशी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती. त्या बरोबरच 1999 मध्ये ज्या निराधार वृद्धांना कोणतीही पेन्शन मिळत नाही त्यांना या योजनेअंतर्गत दरमहा 10 किलो धान्य देणारी अन्नपूर्णा योजना सुरू करण्यात आली. या योजनेत अन्नधान्य उत्पादन 202.9 % इतके झाले.

**दहावी पंचवार्षिक योजना (2002 - 2007) -**

दहाव्या योजनेत एकूणच विकेंद्रिकरणावर भर देण्यात आला. या योजनेत प्रथमच केंद्र आणि राज्यांचे विकासाचे लक्ष निर्धारीत करण्यात आले. शेतकर्यासाठी विमा योजना सुरू करण्यात आली. पिकांचे संरक्षण करण्यासाठी कार्यक्रम हाती घेण्यात आला. ओलिताखालील शेत जमिनीचे क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यात आला. जीवनावश्यक वस्तु उत्पादनावर विशेष लक्ष दिले. त्यामुळे या योजनेस कृषी विकास अर्थव्यवस्थेचे मुळ प्रेरक बळ म्हणून जाहिर करण्यात आले. कामाच्या मोबदल्यात अन्न योजना (NFFWP) सुरू करण्यात आली. अन्नधान्य उत्पादनात जास्त वाढ नोंदवली गेली नाही. कृषी क्षेत्रात 2.1 % इतकाच वृद्धीदर गाठता आला. शहरी विकासासाठी पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला.

**अकरावी पंचवार्षिक योजना (2007 - 2012) -**

या योजनेत कृषी विकास दर 4% एवढा निर्धारित करण्यात आला. दहाव्या योजनेत कृषी विकासदर अल्प राहिला होता. शेतकर्यांच्या आत्महत्तेचे प्रमाण वाढले. शेतकर्यांना पिक विविधीकरणावर भर देण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले. शेतमाल किंमती स्थिर ठेवणे, मोफत वीज धोरणाचे परीक्षण, रासायनिक खतांवरील अनुदानावरील परीक्षण, सहकारी कृषी वित्तपुरवठ्याला उत्तेजन आणि कृषी संशोधन यावर भर देण्यात आला. जलद कृषी विकास साध्य करण्यासाठी दूसरी हरीत क्रांती घडवून आणने आवश्यक आहे. यासाठी कृषी विद्यापीठे निर्माण केली. कृषी विषयक राष्ट्रीय आयोगाने कृषी क्षेत्राची घसरण थांबविण्यासाठी आपला अहवाल सादर केला. त्यात मागील काही वर्षात कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष झाले असल्याचे निदर्शनास आणून दिले.

**बारावी पंचवार्षिक योजना (2012 - 2017) -**

अकराव्या योजनेत कृषी विकास दर 3.3 % राहिला होता, तो बाराव्या योजनेत 4% गाठण्यावर भर देण्यात आला. सर्वसमावेशन, दारीद्रय निर्मूलन, रोजगारावर भर अशी उद्दिष्टे ठेवण्यात आली. कृषी विकासास प्राधान्यासाठी अनुदान, वित्तपुरवठा, नवनवीन तंत्रतानांची अंमलबाजवणी यावर भर देण्यात आला आहे. शेती बरोबरच निरंतर विकासासाठी वने आणि जंगले यांना महत्त्व देण्यात आले. 'अन्न सुरक्षा धोरण' प्रभावीपणे राबविले जात आहे. तांदुळ, गहू, डाळी, तीळ, ऊस उत्पादनात क्रांती होत आहे.

**योजना निहाय शेतीव्ययाचे प्रमाण**

(आकडे कोटीमध्ये)

| योजना | कालखंड | एकूण खर्च | शेती खर्चाचे प्रमाण |
|---|---|---|---|
| पहिली पंचवार्षिक योजना | 1951-1956 | 1,960 | 31% |
| दुसरी पंचवार्षिक योजना | 1956-1961 | 4,600 | 20 % |
| तीसरी पंचवार्षिक योजना | 1961-1966 | 8,577 | 21 % |
| चौथी पंचवार्षिक योजना | 1969-1974 | 15,799 | 24 % |
| पाचवी पंचवार्षिक योजना | 1974-1978 | 39,426 | 22 % |
| सहावी पंचवार्षिक योजना | 1980-1985 | 1,09,292 | 24 % |
| सातवी पंचवार्षिक योजना | 1985-1990 | 2,18,729 | 2.2 % |
| आठवी पंचवार्षिक योजना | 1992-1997 | 4,74,121 | 2.1 % |
| नववी पंचवार्षिक योजना | 1997-2002 | 9,41,040 | 12.8 % |
| दहावी पंचवार्षिक योजना | 2002-2007 | 16,18,460 | 20.2 % |
| अकरावी पंचवार्षिक योजना | 2007-2012 | 36,44,718 | 18.8 % |
| बारावी पंचवार्षिक योजना | 2012-2017 | 43,33,739 | % 17.25 |

वरील तकत्यावरून असे दिसून येते की पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राला महत्त्व देवून 31% खर्च करण्यात आला. त्यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत हा खर्च 20% तर अकराव्या योजनेत हा खर्च 18.8% आणि बाराव्या पंचवार्षिक योजनेत 17.25% येवढा केला असल्याचे दिसते. नवनवीन विकास ध्येयांमुळे हे प्रमाण कमी झाल्याचे दिसते.

शिफारशी / निष्कर्ष -

भारत देशात कृषी हा अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक आहे. ग्रामीण जनता पूर्णत: शेतीवरच अवलंबून आहे. त्यासाठी स्वातंत्र्यानंतर नियोजनाचा स्विकार केला गेला. विविध योजनेतून जरी शेतीसंबंधी क्षेत्रावर करण्यात आलेल्या खर्चात वाढ झाली तरी एकूण खर्चातील शेती व संबंधित असणार्या खर्चात घट होत आहे. शेती उत्पादनात वाढ घडवून देशाला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान शेतकर्यांच्या जवळ आणने आज आवश्यक आहे. सिंचन सुविधा, पीक पद्धती, शेती मशागत, आधुनिक यंत्राचा वापर, शेती प्रक्रिया, कृषी विपणन साठवणूक शेतकर्यांची स्वच्छता, अन्न सुरक्षा धोरण प्रभावीपणे राबविणे, त्यासाठी ग्रामीण भागाचा विकास लक्षात ठेवून योजना राबविणे, पिक विमा, शतकर्यांसाठी पेन्शन योजना, अनुदान या सारख्या सातत्यपूर्ण गुंतवणूकीची शेती क्षेत्राला आवश्यकता आहे. मोठ्या उत्पादकांनी, सिमांत शेतकरी व छोटे शेतकरी यांचा विचार करून निर्णय घेण्याची आज गरज आहे. तरच भारतीय अर्थव्यवस्था कृषी अर्थव्यवस्था म्हणून जगात नावारूपाला येईल आणि कृषी स्वयंपूर्ण देश म्हणून भारताची गणना होईल.

**संदर्भ सूची -**

1. निता वाणी - कृषी अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2012.
2. किरण जी. देसले - स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र - 1, दिपस्तंभ प्रकाशन, जळगाव, पाचवी आवृत्ती, जुलै, 2015.
3. Babita Jaiswal – Agriculture : Under the Five Year plans and Road Ahead, 2015
4. Indian Agriculture under five year plans, preservearticles.com.
5. Planning Commission Report – Government of India, 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11 and 12

# सरोगेसी मदर- एक परामर्श

*Prof.Tendolkar Dipa dattaram.*
*Department of Hindi, Kankavli College Kankavli*

**प्रस्तावना :-**

"आकाश भी झुककर स्त्री को पायल पहना जाता है,
जब वह स्त्री , माँ का पद प्राप्त कर लेती है |
देती है वह जनम एक सन्तान को,
सारा विश्व मुग्ध रह जाता है |"

माता-पिता भगवान का रुप माना जाता है, क्योकि उन्होंने आपको नयी जिंदगी दी हैं | किसी को जीवन देने कि परिकल्पना केवल भगवान के साथ की जाती है | अत: माता पिता की तुलना हमेशा भगवान से की जाती है | परंतु आज विज्ञान ने इतनी तरक्की कर ली है कि इस परिकल्पना पर दुबारा सोचने की जरुरत पडने लगी है | माँ को हमेशा सर्वाधिक महत्त्व दिया गया है क्योंकि माँ ही त्याग की मुर्ति है | जो अपनी जान पर खेलकर अपने भीतर आपकी सांसो की संरचना को पूरा होने तक पालती है | अगर उस त्याग की मुर्ति ने ऐसा नही किया तो किसी भी नए जीवन की कल्पना संभव नही परंतु बात हो रही है विज्ञान की , विज्ञान जिसके लिए अब लगभग हर चीज संभव है |अब वह सृष्टि के रचयिता भगवान की खोज मे जूटा है ,उसके लिए भगवान भी एक प्रकार उच्च् कोटी का वैज्ञानिक है | यहाँ तक कि उन्होंने धरती के भगवान माँ – बाप का स्वरुप भी बदल दिया है |

विज्ञान् व्दारा भगवान बनने की चाह का ही यह नतीजा है | आज का सरोगेट मदर की संकल्पना सरोगेसी यानी "वास्तविक माँ कि जगह दूसरी महिला बच्चे को जनम देने के लिए अपनी कोख का इस्तेमाल करें | सरोगेसी को वह महिलाएँ अपनाती है, जो बच्चे को जनम देने मे असमर्थ होती है | अर्थात जो दंपत्ति संतान के सुख के विहीन थे उनके लिए सरोगेसी मदर की यह संकल्पना जीन के साथ उन्हे बच्चा दिला सकते है |

**2 ब} सरोगेसी माता**

**सरोगेसी की सेकल्पना :-**

सरोगेसी का शाब्दिक अर्थ है किसी और को अपने काम के लिए नियुक्त करना | इस प्रक्रिया में "वास्त्विक माँ कि जगह एक दुसरी महीला बच्चे को जन्म् देने के लिए अपनी कोख देती है | इस प्रक्रिया में शुक्राणू और अंडाणू को निषेचित करा कर भ्रुण को उस महिला के कोख में डाल दिया जाता है | इसमे एक प्रतिशत अंश भी सरोगेट मदर का नही होता | इस प्रक्रिया से बच्चों के साथ उनका जेनेटिक संबंध बरकरार होता है | जिंसमें जन्में बच्चे का रंग, लंबाई ,बालो का रंग, और प्रकृती,आनुवंशिक गुण आदि सभी जेनोटिक माँ–बाप के होते हैं |

सरोगेसी के प्रकार :-

**1 ) ट्रेडिशनल सरोगेसी:-[a]**

इस प्रक्रिया में दंपत्ति में से पिता के शुक्राणुओ को एक स्वस्थ महिला अंडाणू के साथ प्राकृतिक रुप से निषेचित किया जाता हैं | शुक्राणुओ को सरोगेट मदर के नेचुरल ओब्युलेशन के समय डाला जाता है | इसमें जेनेटिक संबंध सिर्फ पिता से होता है|

**2 ) गेस्टेशनल सरोगेसी :-**

इस पदधती में माता-पिता के अंडाणू व शुक्राणू का मेल परख नली विधी से करवा कर भ्रूण को सरोगेट मदर की बच्चेदानी में प्रत्यारोपित कर दिया जाता है| इस पदधती में सरोगेट मदर को ओरल पिल्स खिलाकर अंडाणू विहीन चक्र में रखना पडता है | जिससे बच्चा होने तक उसके अपने अंडाणू न बन सके| सरोगेसी मदर की संकल्पना हालांकि विज्ञान ने की है , वस्तुत: इसे आधार हमने दिया है | इसका कोई एक कारण नही है, हाँ अपनी हर जरुरत को किसी भी किमत पर पाने की हमारी चाहत इसके पीछे का सबसे बडा कारण हो सकता है | इसके साथ इसकी दो वजह है|

**बांझपन:-**

भारतीय समाज में औरत को माँ बनने ही पूरा बनकर की संकल्पना प्रचलित है| माँ का मतलब सिर्फ ममता नही होती, बल्कि कोख में कम से कम एक बच्चे को पालना भी होता है | परंतु जो महिलाएँ शारीरिक कमियों से माँ बनने अक्षम होती है, उन्हें हमारा समाज "बांझ" कहकर उलाहना देता है | बांझपन का यह उलाहना कोई औरत सहना नही चाहती | हालांकी एक शादी-शुदा जोडे का माता –पिता बनने का सपना किसी अनाथ बच्चे को गोद लेकर ही पूरा होता है | किंतु हमारे देश में खून का रिश्ता सबसे बडा रिश्ता माना जाता है | अत: पारंपारिक ढाचे में गोद लेकर माँ -बाप बनना नही फिर नही बैठ पाता | वस्तुत: यही वजह होती कि जेनेटिक विशेषताओ के साथ माँ -बाप बनने का विकल्प दिलाया है | तो ऐसे दंप्पृति अपने लिए ज्यादा मुफीद समजते है | विश्व की तो बात ही नही सिर्फ भारत में ही हर वर्ष जितनी शादीयाँ होती है, उसमें से 10 % महिलाएँ बांझपन से ग्रस्त होती है|

**हायटेक बच्चो की चाहत:-**

विदेशी में हालंकी बांझपन की यह संकल्पना (concept) किसी भी हद तक लागू नही होती | उनके लिए यह एक अति आकर्षण का कारण है | अपनी चाहत के अनुकूल अपने बच्चे को बनाना आम बच्चे ( यहाँ इसके प्राकृतिक बच्चे उपयोग करना बहुत सही होगा) जहाँ भगवान की देन मानी जाती है वह अपाहिज है, दिमाग से कमजोर है या काला है,नाटा है या लंबा है | यह सब भगवान की देन मानी जाती है इस पर वैज्ञानिक विधी से माता-पिता बनने में ये सारी चीजें वे अपनी चाहत अनुकुल निर्धारित कर सकते है | आज के हाईटेक और आधुनिक युग मे लोक बच्चे भी हायटेक ही ढुंढते है | अत: विदेशी मे सरोगेसी का चलन बढ रहा है |

**3] संशोधन का हेतू:-**

जो महिला बच्चे को किसी कारण वश जनम नही दे सकती इस गंभीर समस्या से निजात के लिए पूरी दूनिया के वैज्ञानिको ने इसे चुनौती के रुप मे स्वीकार किया और इन्फर्टिलिटी की बिमारी को दूर करने के लिए इसका ट्रिटमेंट खोजने का अथक प्रयास करते रहे | कालांतर में वैज्ञानिको ने सहायक प्रजनन तकनीक (Assisted Reproductiotive technique) इस तकनीक में एग्स और भ्रूण दोनो को हैंडल किया जाता है | सामान्य तौर पर ART Process में एक महिला के अंडाशय से अंडो को निकालना उन्हें लेबोरेटरी में शुंक्राणू के साथ संयोजित करना और .उन्हें महिला के शरीर में वापस करना आवश्यकता होता है| इसमे मुख्य रुप से इन विट्रो को फर्टीलाइझेश्यन (IVF),(ICSI),गैमेटस या भ्रूणका क्रोप्रेजवेशन (अंडे या शुक्राणू) , PGT (प्रीझम प्लाटेशन जैनेटिक टेस्टींग) शामिल होता है | इस प्रक्रियों के माध्याम से कई नि:संतान दम्प्तियों को लाभ भी मिलने लगा | परंतू ART के इजाद के बावजूद भी कुछ महिलाओं को गर्भधारण में समस्या बनी रही | सहायक प्रजनन तकनीकी के बावजूद कुछ महिलाओ व्दारा गर्भाधान ना होने और बार- बार गर्भपात हो जाने की स्थिती मे चिकित्स को ने एक विकल्प् के रुप मे सरोगेसी की खोंज की |

"सरोगेसी का आशय है "किराए की कोख'' – अर्थात किसी अन्य् के मातृत्व् सूख के लिए शिशु के जनम हेतु अपनी कोख को (सशुल्क /नि:शुल्क् ) किराए प्रदान करना |

सरोगेसी मदर कि संकल्पना मुझे लगता है (संदर्भ महाभारत पुस्तक से लिया) आज की नही है | इसके लिए मै आपको पौराणिक कथा का संदर्भ देती हूँ| आप सभी को ज्ञात कि श्रीकृष्ण् का जनम होते ही उसको राजा नंद के पास सौप दिया | इसका अर्थ यह होता है कि माता देवकी ने अपने कोख में श्रीकृष्ण को बढाया और नंद दंपत्ति को दे दिया | देने का कारण कोई भी हो परंतु एक कोख मे पला और पालन – पोषण दुसरे के पास हो गया | श्रीकृष्ण् को देने में ममता का संरक्षण करना ही होता है | आज अगर हम विज्ञान की बात करें तो वैज्ञानिक तकनीक बढ गई है| मुझे लगता है देवकी के मानवतावादी दृष्टीकोन को विज्ञान ने बढावा दिया और सरोगेसी मदर का सृजन हुआ |

1] हम देखते है की पुरी दुनिया इस विज्ञान के चमत्कार को अपना रही है और अपने जीवन में बच्चे के कमी को उजागर कर रहे है | 2] आज युरोपीय लोग, भारतीय लोग, भारत में महाराष्ट्र जैसे प्रांत इस बात को अपना रहे है| मेरा ध्यान महाराष्ट्र में स्थित सिंधुदूर्ग जिले पर गया और मन में एक विचार आ गया कि इस सूविधा का सिंधुदूर्ग वासी कितना लाभ उठा रहे है ? या इस सुविधा के बारे में सिंधुदूर्ग वासी कितने जागृत है | 3] आज विश्व के साथ सभी लोक "सरोगेसी मदर'' अपना रहे है | इस वरदान के कारण अनेक माताओं की गोद भर गई है | अनेक घरो में बच्चों कि

किलकारिया सूनाई देती है | अपने संन्तानो के साथ माता –पिता खुशी मना रहे है | परंतु सिंधुदूर्ग जिला इन सुविधा से पिछे पड गया है ? यह सारी बाते शोध के माध्यम से देखनी थी | इस लिए इसके बारे में अभ्यास करना मुझे महत्व् पूर्ण लगा |

**उद्देश्य् :**

1] सरागेसी प्रक्रिया के बारे मे सामाजिक दृष्टीकोन सकारात्मक करना |

2] सरोगेसी माताओं के मानसिक तथा स्वास्थ् के बारे में जाच करना |

3] सिंधुदूर्ग जिले के अंतर्गत और भी केंद्र कि स्थापना करने में सहायत्ता करना |

4] सिंधुदूर्ग जैसे ग्रामिण भागों में शिक्षण का प्रसार करना |

5] अनेक आरोग्य विषयक सुविधाओं के बारे में जन जागृती करना |

**समस्याए:**1] सिंधुदूर्ग जैसे अति ग्रामीण भागों में बहुत सारी समस्याएँ दिखाई देती है 2] सिंधुदूर्ग जिला एक ऐसा जिला है जहाँ अभाव ग्रस्त जीवन है और ऐसे इलाके में इस प्रकार की खोज करना बहुत कठीण हो जाता है| 3] अगर दुनिया का विचार करे तो सरोगेसी मदर उनके लिए आम बात बन गयी है | 4] परंतु भारत की बात करे तो कई महिलाएँ अपनी आर्थिक परिस्थिती दुर करने के लिए "सरोगेसी मदर" अपनाती है| 5] कई बार शोषण का मामला भी सामने आ चुका है | 6] बढती सरोगेसी की संख्या देखकर नए कानुनों की जरुरत पडने लगी है | 7] कभी –कभी अगर बच्चो में व्यंगत्व आ जाता है तो ऐसी स्थिती में उनके माता- पिता उन्हे अपनाते नही | 8] सरोगेसी मदर के बारे में यह भी समस्या सामने आ गई है की स्त्री भ्रुण है तो उनके माता-पिता उसे अपनाते नही | ऐसी स्थिती में भारत सरकार ने अनेक कानून बनाएँ है | जिसके माध्यम से सरोगेसी मदर को राहत मिल सकती है |

## RESEARCH METHODOLOGY संशोधन पदधती

इस संशोधन पेपर में मैंने संशोधन कि दुसरी पदधती अपनाने कि कोशिश कि है | इस संशोधन पेपर के विषय के कारण डॉक्टरों को प्रत्यक्ष मिलने की आवश्यकता थी | इसलिए मैंने ग्रामिण भागों में जो डॉक्टर अपनी सेवा देते है तथा शहरी भागो में जो डाँक्टर सेवा देते है उनसे जाकर मिली | सर्वेक्षण कि अगर बात करे तो कणकवली शहर में स्थित नागवेकर अस्पताल के प्रमुख डॉ . मान. मीनल म. नागवेकरजी की साक्षात्कार से संबंधित जानकारी का उपयोग किया गया है | उनके साथ- साथ सर्वेक्षण और संदर्भ ग्रंथ का भी उपयोग किया गया अन्य पाँच डाँक्टर के अनुमोदन से इस शोध – लेख को प्रस्तुत किया गया है

## DATA ANALYSIS –विवेचन / स्पष्टीकरण

भारतीय समाज में खास तौर पर महिलाओ को अनेक समस्याओ से जुझना पडता है | अनेक समस्या मे एक ऐसी समस्या है जो उन्हे जीवन भर सताती रहती है | वह है आर्थिक समस्या | आर्थिक समस्या को दूर करने के लिए अथवा अपने परिवार का पालन पोषण हेतु अनेक बातो का उन्हे स्विकार करना पडता है | उसमें कभी मजुरी , वेश्याव्यवसाय तो कभी सरोगेसी मदर का अवलंब करते है | विदेशी में आर्थिक समस्या ना के बराबर रहती है |अपने मातृत्व पीडा को बचाना, हायटेक बच्चे ऐसी बाते विदेशी अपनाने की कोशिश करते है परंतु मेरा ध्यान विदेशी लोगो पर न होकर मेरा जिला सिंधुदूर्ग पर आकर्षित हुआ है| सिंधुदूर्ग जिले की बातकरे तो सन 2011के अनुसार 849651 इतनी जनसंख्या है | जो बाकी के जिले से बहुत कम मानी जाती है | इसलिए ही सिंधुदूर्ग जैसे जहाँ किसी भी प्रकार का विकास आज तक नही हुआ है चाहे शैक्षणिक हो या औद्योगिक | मैं जानना चाहती थी कि इस विषय में हमारे यहाँ के लोगो कि मानसिकता क्या रही होगी | इस जिज्ञासा ने मुझे इस शोध लेख का सुजन करने के लिए प्रोत्साहीत कर दिया |

**कणकवली, "डाँ नागवेकर हॉस्पिटल ॲण्ड नर्सिंग होम"**

विज्ञान के खोज ने पुरी तरह से विश्व को बदल दिया है |अनेक माताओं को अपनी सन्तान दी है | घर –घर में बच्चों कि किलकारी यों से घर भर गए है | और इसका श्रेय विज्ञान के साथ – साथ डाँक्टर को भी जाता है |

मैं इस बात पर ध्यान केंद्रीत करना चाहती हु कि “कणकवली तहसिल एक ऐसा तहसिल है जहाँ सरोगेसी मदर के संदर्भ में प्रकिया (process) कि जाती है | सरोगेसी मदर के बारे में जानने के लिए मैं डाँ . मीनल नागवेकरजी से मिली उन्हींके साक्षात्कार के माध्यम से मुझे यह ज्ञात हुआ कि अस्पताल में पुणे , मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद,चैनई ऐसी मेट्रोसिटी में जो सेवाए दि जाती है उसी सभी प्रकार कि सेवाए डॉ. नागवेकर हॉस्पिटल ॲण्ड नर्सिंग होम ” मे दी जाती है| डॉ. मीनलजी ने इस बात की जानकारी देते हुए कहाँ कि यहा मानवतावादी दृष्टिकोन से देखा जा सकता है| यह महत्त्वपूर्ण बात है कि सरोगेसी कि संख्या कम है लेकिन इन जिले में जो जनजागृती हो रही है वह बहुत ही सुखकारक है |बहुत बडी बात है |देहातो में मानसिकता बदलना आज की आवश्यकता है | यहाँ महिलाओ अनुमति से इस प्राक्रिया को पुरा की जाता है | सिंधुदूर्ग जैसे छोटे ग्रामीण भागो में हायटेक की बात नही होती | यहाँ जो सेवा दि जाती है वह केवल आवश्यकता को ध्यान में रखकर ही जाती है| इस अस्पताल में अनुभव शाली स्टाफ अपनी सेवाएँ दे रहा है | मान. डॉ. अनंत व डाँ. किर्ती नागवेकर , इनके साथ– साथ् डाँ. मयुर नागवेकर (MS. DNB ,GL-Surgry) मा. डॉ .मिनल नागवेकर (एन डी.डी .एन बी. स्त्रीरोगतज्ञ ) व डाँ रघुनाथ् उर्फ अमोल नागवेकर (DMRD, DNB) ये सभी अपने कर्तव्य में सदा दक्ष है| सन 2014 में रत्नागिरी सिंधुदूर्ग का ,पहला “टेस्ट टयूब बेबी सेंटर ” स्थापन किया गया | मान.डाँ मिनल नागवेकर स्त्रीरोगतज्ञ है तथा वह आधुनिक तकनीकी के माध्यम से अपनी सेवा दे रही है| उन्होंने युरोप फ्रान्स, जैसे विदेशो मे जाकर अपना शिक्षण पूरा किया है| मुझे इस बात की खुशी है कि सिंधुदूर्ग एक ऐसा इलाका है जहाँ लोगो को लगता है कि किसी भी प्रकार की सुविधाए नही है | परंतु वास्तव में खोज करने के बाद यह समज मे आ गया कि हमारे यहा ऐसे सितारे है जो आसमान में नही जमीन पर चमकते है | और वह सितारे है डॉ . नागवेकर परिवार | जो तिसरी पिढी है | मेरे संशोधन पेपर का यह एक हिस्सा भी है कि अपने सिंधुदूर्ग के अस्मिता को बरकरार रखना | जहाँ हापूस आम कि मिठास है वहाँ विज्ञान कि देन भी | जहाँ भोले –भाले लोग है वहाँ प्रगति का स्त्रोत भी है | जो अनेक मार्ग से अपनी सेवा लोगो को दे रहे है |

**सारांश :-**

प्रस्तुत शोध–लेख के माध्यम से स्थानिक लोगो में सरोगेसी मदर के बारे में जागृती निर्माण होगी | बांझपन के कारण जो महिलाए पीडीत है,उनको जीवन मे एक नई आशा मिलेगी | सामाजिक और धार्मिक दृष्टीकोन में बदलाव आ जाएगा | सरोगेसी माता हेतु स्थानिक स्तर पर विचारों का आदान – प्रदान हो जाएगा | एक कम जनसंख्या वाले इलाके /प्रांत मे भी इस प्रकार के सुविधा के कारण सिंधुदूर्ग कि ओर देखने का दृष्टीकोन बदल जाएगा |

**सल्ला :-**

आज ऐसे लेखक कि आवश्यकता है जिसके से समाज माध्यम से समाज मे स्थित रुढी परंपरा नष्ट हो सके | ऐसे साहित्य् सृजन की आवश्यकता है जहाँ समाज के हर समस्या पर गौर हो सके|

**संदर्भ ग्रथ**

1. ब्रिटन ने सरोगेट माताओ के साक्षात्कार जे | रेप्रोड| शिशु साइकोल, 12,189-198|
2. ब्रिटीश मेडीकल असोशिएशन 1996
3. जनसंख्या और जनगनना सांख्यिकी (ओ पी सी एस)
4. भगवत गीता
5. महाभारत (काव्य् )
6. चाणाक्य् मंडळ मासिक 2004
7. चाणाक्य् मंडळ मासिक 2008
8. चाणाक्य् मंडळ मासिक 2011
9. लोकसत्ता ,समाचारपत्र-लेख
10. प्रसवोत्त्र अवधी के बाहर माता पिता समुह के साथ एडिनबर्ग पोस्ट नेटल डिप्रेशन स्केल के उपयोग का ऐ अध्ययन जे रिप्रोड | शिशु साइकोल |11,119-125|

# उमाजी नाईक यांच्या जीवनातील उपेक्षित पैलू

***प्रा. सुमन केंद्रे***
*कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर*

**उमाजी नाईकांचे पूर्वचरित्र ..**

क्रांतिकारक उमाजी नाईक याचा जन्म हिंदू धर्मातील रामोशी या जातीत इ.न. १७९१ साली पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात भिवडी या गावी दादाजी व लक्ष्मीबाई खोमणे यांच्या पोटी झाला.असं सांगितलं जातं की कोणताही माणूस ज्या वातावरणात वावरतो व लहानाचा मोठा होतो, त्या वातावरणाचा तेथील परिस्थितीचा संस्कृतीचा आणि विचाराचा त्याच्यावर कळत नकळत परिणाम पडत असतो. उमाजी नाईकांच्या बाबतीतही असेच घडले ज्या जातीचा उल्लेख बंडखोर क्रांतिकारक म्हणून केला जातो त्या जातीत जातीतील रूढी परंपरा, चाली, रितीरिवाज, व्यवसाय, उद्योग या सर्वच गोष्टीचा प्रभाव पडणे सहाजिकच आहे. जाती बंधनाच्या आणि जाते प्राप्त जीवन पद्धतीच्या चक्रातून बाहेर पडणे अशक्य आहे. त्याने आपल्या जातीवर होत असलेल्या अन्यायाची जाणीव स्वतःला करून घेतली आणि त्याविरुद्ध रान उठवण्याची ची तयारी दाखवून पूर्णपणे तो क्रांतिकारी विचारांचा बनला. मरावे परी कीर्तिरूपे उरावे या व्यक्तीनुसार उमाजी नाईक यांच्या संदर्भात ते तंतोतंत जुळते ते स्वतःच्या नावे एक दीपस्तंभ ठरला. त्या कार्याची व क्रांति संदर्भातील दखल भारतीयांनी घेतली नाही पण इंग्रजांनी मात्र अतिशय तटस्थपणे घेतली.

उमाजी बद्दल इंग्रज अधिकारी रॉबर्ट टोश याने १८२० साली ईस्ट इंडिया कंपनीला लिहिताना म्हटले आहे. ' **उमाजी चा रामोशी समाज इंग्रजांविरुद्ध तिरस्काराने पेटून उठला आहे.' व पुढे म्हणतो** तो **"कोणत्यातरी राजकीय परिवर्तनाची वाट पाहतात प्रजा त्याला मदत करत असून हा उमाजी राजा होऊन छत्रपती शिवाजी महाराजांसारखे राज्य तर स्थापन करणार नाही ना तर इंग्रज अधिकारी तोस म्हणतो की, उमाजी पुढे छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श होता शिवाजी महाराजांच्या सैन्यात मोठ्या प्रमाणात रामोशी जातीचा भरणा होता. उमाजीच्या समोरही शिवाजी महाराजांचा आदर्श होता त्याला फाशी दिली नसती तर तो कदाचित प्रतिशिवाजी बनला असता "**

वरील दोघांच्या मता वरून असा निष्कर्ष काढता येतो की, तो जगला असता तर तर लवकरच भारताला स्वातंत्र्य मिळाले असते.

गौरउदगार नसून हे सत्य आहे. जर इंग्रजांनी फोडा आणि झोडा या नीतीचा अवलंब नसता केला तर कदाचित तेव्हाच भारताला स्वातंत्र्य मिळाले असते.

**इंग्रज रामोशी संघर्ष.**

इंग्रजांचा रामोशी जनतेवर दिवसेंदिवस दबाव वाढत होता त्यामुळे रामोशी लोकांच्या मनात इंग्रजांविषयी द्वेषाची भावना निर्माण झाली. त्या भावनेतून इंग्रज-रामोशी संघर्ष चालू झाला. या संघर्षातूनच उमाजीने ब्रिटिशांची हकालपट्टी केल्याशिवाय आमचा प्रश्न सुटणार नाही. म्हणून उमजीने इंग्रजांसी संघर्ष केला.

ज्या दिवशी संघर्ष करण्यासाठी उतरला त्या दिवसापासून कधीच ब्रिटिशांना तो शरण गेला नाही. ब्रिटिशांना सडेतोड प्रश्न विचारून न्याय मागण्याचा प्रयत्न केला. आणि न्याय मिळत नसेल तर क्रांती करण्याचा निर्णय घेतला. संस्थानिकांनी ब्रिटिशांच्या समोर नमते घेतले पण उमाजीने मात्र कोणत्याही प्रकारची तडजोड न करता ब्रिटिशांच्या विरोधात दंड थोपटून संघर्ष केला .

**उमाजी मराठा संबंध**

उमाजीचे वडील दादाजी खोमणे यानी मराठेशाहीत किल्ल्यांच्या रक्षणाची जबाबदारी स्वता;च्या अंगावर घेतली होती. तर पुरंदरच्या बंदोबस्तासाठी रामोशी लोकांवर सोपवली होती.व उमाजीचे कुटुंबही ही त्याच कामात सहभागी होते. म्हणजेच त्यावेळी पुरंदरचा गड सांभाळून आवश्यक तेव्हा पेशव्याला योगी सेवा देणे हा सुद्धा त्याचा एक कर्तव्याचा भाग होता. असेच ते समजत असत पुरंदर रामोशी गडकर यांना गडांच्या नोकरीशिवाय रखवालदार म्हणून ही नेमले होते. त्यात त्यांना असामान्य मिळाल्या अलीकडील भागात रामोशी रखवालदार असून त्यातील बहुतेक पुरंदर गावकऱ्यामध्ये दिसतात. बहामनी राज्य मूळ गडांची वसाहत बिदरचे चंद्रकांत देशपांडे यांनी बादशाही हुकुमाने चोरा चिलटांच्या उपद्रवामुळे मूर्खाचा व्यत्यय येऊ लागला म्हणून स्वरक्षनाची व्यवस्था केली होती. तेव्हा गडांच्या व्यवस्थे साठी त्यांनी आपल्या बरोबर जे नाईक आणले तेच पुढे वंशपरंपरेने नाईक या नाईकांना कोळी, बेड,रामोशी व महार यांच्याही नाईक या स्थापन झालेल्या हे कोळी रामोशी महार गडांच्या अधिकाऱ्यात उलथापालथ झाली तरी ते कायम राहिले होते.

उमाजीचे कुटुंब हे पुरंदर जवळचे रहिवासी असून त्याचे सर्वच कुटुंब पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी इमानदारीने सांभाळत होते. त्यामुळे त्यांना गडनायक किंवा नायक ही पदवी मिळाली. उमाजीचे पूर्वीचे खोमणे आडनाव होते ते आडनाव बदलून नाईक असे झाले . शिव काळामध्ये किल्ल्याचे रक्षण करण्याची जबाबदारी रामोशी लोकाकडेच होती. जवळ जवळ १४ किल्ल्यावर रामोशी समाजातील लोक किल्लेदार म्हणून काम करत होते. त्याच्या मोबदल्यात त्यांना त्याकाळी काही जमिनी इनाम म्हणून देण्यात आल्या होत्या, कोल्हापूर, पुरंदर, सोलापूर या भागात अशा प्रकारच्या

इनामी जमिनी आजही त्या समाजाकडे आहेत. याच काळात त्यांना नाहीत ही पदवी देण्यात आली त्यामुळे रामोशी हे नाईक या नावाने ओळखले जाऊ लागले.

पुरंदर किल्ल्याच्या परिसरातील रामोशी कोळी व महार यांना किल्ल्यांच्या संरक्षणाचे व पहारेकऱ्याची काम वंशपरंपरेने शिवछत्रपतींनी दिले होते. त्या मोबदल्यात त्यांना त्यांच्या परिसरात शेती करून उदनिर्वाह भागवण्याचा हक्क शिवाजी महाराजांच्या काळापासून होता. म्हणजेच साधारणपणे १६७१ पासून हा हक्क त्यांना मिळालेला होता म्हणून त्यांना सनदी गडकरी असेही म्हणतात. यावरून असे लक्षात येते की शिवाजी महाराजांच्या काळापासून उमाजी उमाजी च्या कुटुंबाचा संबंध अस्तित्वात होता.

**उमाजी पेशवे संबध**

दुसऱ्या बाजीरावाच्या असे निदर्शनास आले की पुरंदर किल्ल्याची राखण रामोशी लोक करत आहेत. तसेच ब्रिटिश सरकारचे हुकूम रामोशी मानत नव्हते. पुरंदरच्या भागात रामोशी लोक पुष्कळ राहत होते व त्यांचे चांगले बस्तान बसले होते. उमाजी नाईकाने दोस्त मंडळी जमा करून एक छोटेसे संस्थान निर्माण केले. नेमकी हीच गोष्ट बाजीरावास खटकली. कोणत्याच मराठी सरदारांना आवडली नाही. सरदार विठोजी व यशवंतराव होळकर या बंधूनी अमृतरावाला पेशवा मानून त्याच्या नावाने राज्यकारभार सुरू केले. परंतु उघडपणे ते शेवटपर्यंत बाजीराव इंग्रजांच्या विरोधात उभा राहिला नाही याच काळात साधारणता १८०३ च्या मे महिन्यात लौर्ड वेलस्ली ने पुण्यात बाजीरावास पेशवेपदी विराजमान केले, व पुण्याच्या आसपास चे सर्व गडकोट घेण्याचे हुकूम दिले. त्यापैकी पुरंदर किल्ला ही एक मोठी मोत्याची जागा होती आणि पुरंदर वरची व्यवस्था अगदी शिवाजी महाराजांच्या काळापासून काही विशिष्ट पद्धतीने लावलेली होती. म्हणजे रामोशी व कोळी हेही किल्ल्याच्या घेण्याचे आणि किल्ल्याचे रखवालदार म्हणून लहान-मोठी कामे करत होते. पुरंदरच्या रामोशांचा ठाव ठिकाणा याविषयीचा प्रश्न निर्माण झाला. त्यातच अमृतराव रामोशांचा थोडाफार विश्वास होता, पण पुढे तो इंग्रजांची आणि बाजीरावाची नेहमी बोलणे करून टाकला आसपासचे महत्त्वाचे किल्ले घेण्यास माणसे पाठवली पुरंदर ही पेशव्यांची माणसे चाल करून येत होते. यात महत्वाचे म्हणजे अमृतराव बाजीरावाशी वाटाघाटी करत आहेत. हे लक्षातआले तेव्हा आपला निभाव लागणार नाही असे त्यांना स्पष्ट कळाले.

रामोशी लोकांनी पेशव्यांच्या सेवेत राहणे पसंत केले आणि ते पेशव्यास शरण गेले पुरंदर किल्ला हीच रामोशी लोकांची खरी मिळकत होती. किल्ल्याची कमाई हेच आयुष्यभराचे पोट भरायचे साधन होते. म्हणून रामोशी लोकांनी बाजीरावास पुरंदर किल्ल्यावरील हक्क सोडण्यास नाकारले, त्यामुळेच दुसऱ्या बाजीरावाने चिडून जाऊन रागाच्या भरात रामोशी लोकांच्या सनदा इनामे हक्क वतन नेमणुका जमिनी या सर्वच्या सर्व जप्त करून टाकले त्यातच उमाजीचे वडील दादोजी खोमणे यांचीही जमीन जप्त केले त्यामुळेच रामोशी आणि पेशवे यांच्या संघर्षाला सुरुवात.

रामोशांची पुरंदरमधील जमिनी वगैरे सर्व जप्त करून टाकल्यावर उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने रामोशी लोक बेचैन झाले. पेशवे सरकारच्या अमदारा पासून पुन्हा त्रास पोहोचू नये म्हणून दुसरीकडे कुठेतरी जाणे त्यांना क्रमप्राप्त झाले म्हणून त्यांनी पूर्वेकडील निजामशाहीच्या प्रदेशात जावून परंड्या जवळ तळ ठोकला त्यामुळे पेशवे हादरून गेले पेशव्यांचेही लहान-मोठे जहागीरदार होते. त्यांच्याच आश्रयाखाली हे रामोशी जाऊन राहिले. यापैकी बऱ्याच रामोशी निरनिराळया वेळी निरनिराळया त्यात सामील होऊन पेशव्यांच्या प्रांततात धुमाकूळ घातला होता.आणि त्यामुळे त्यांच्या पाठीमागे सरकारी फौजा लागल्या शेवटी आपल्या मागचा हा हल्ला चुकवण्यासाठी स्थलांतर करण्याचा निरणे घेतला.

**सुभेदार व उमाजी संघर्ष.**

औरंगाबादच्या सुभेदार आणि रामोशी यांच्या संघर्षशाला सुरुवात झाली. या संघर्षात फक्त नोकरीवर गदा आला नाही तर जगण्याचा प्रश्न निर्माण झाला. थोरल्या इनामदार बाईने सावतीचा मार्गातील काढला. या कामाबद्दल त्यांना ठरलेली रक्कम मिळाली पण त्या रामोशाचे आपापसात भांडणे सुरू झाली सर्व अघोरी कृत्य शेवटी उजेडात आले. यामध्ये मोठी दंगल माजण्याची चिन्हे दिसू लागली तेव्हा औरंगाबादच्या सुभेदाराने सर्वांना पकडण्याचे फर्मान काढले. ही बातमी कळताच त्यांच्या धावपळी सुरू झाल्या आता मागे फिरून पुरंदर कडे जाण्याशिवाय त्याच्यासमोर पर्याय नव्हता.म्हणून सर्वजन परत फिरले तेव्हा फौजेच्या तुकडीशी आणि रामोशी लोकांचा संघर्ष चालू झाला तेव्हा त्यांनी त्यांच्या बायकांना,मेंढ्या,गुरे जंगलात जाण्यास सांगितले. आणि त्या फौजेचा तुकडीवर एकदम गोळीबार सुरु केला.

निजामशाही फौजीच्या तुकडीत सुमारे शंभर लोक होते. त्यांचा सामना करणारे लोक रामोशी होते. त्यांच्यापैकी काहीजण जवळ बंदुका छोट्या होत्या काही जणांकडे तलवारी होत्या म्हणजे संख्येने ते घोडेस्वार त्यापेक्षा जरी पाचपटीने जास्त होते. तरी त्यांची त्या त्यांच्या लहानशा टेकडीवर एकदम हल्ला करण्याची हिम्मत झाली नाही.या संघर्षात सूभेदारला मोठी किमत मोजावी लागली.या संघर्षात उमाजीने यातून मोठा धडा घेतला.

अशाप्रकारे शिवाजी महाराजांच्या काळानंतर पेशवेकाळात मात्र रामोशी समाजाची मोठ्या प्रमाणात वाताहात झालेली दिसते. कारण रामोशी समाजाला पुणे परिसर मराठवाडा परिसरात सतत भटकंती करावी लागली. आणि येणाऱ्या हल्ल्यांना सामोरे जावे लागले आणि तिथूनच खऱ्या अर्थाने उमाजी नाईक हा बंडखोर बनला आणि अध्य क्रांतिकारक म्हणून नावारूपाला आला.पुरंदरला येऊन उमाजी नाईकाचे पूर्णपणे जीवन बदलून गेले. आणि सतत छत्रपती

शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यावेळच्या परिस्थितीचा सामना करण्याचा निर्णय घेतला आणि परिस्थिती हीच त्याला बंडखोर ठरवली त्या बंडखोर आतून असतो यशस्वी क्रांतिकारक म्हणून उदयास आला असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ**

१) भागवत अ.ना.उमाजी नाईक चरित्र ऐतिहासिक पुस्तकमाला न.२३ भारत भूषण,सदाशिव पेठ ,पुणे,पृ.१४४

२) मांडे प्रमोद मारुती,स्वातंत्र्य संग्रामातील समिधा,वडवानल प्रतिस्ठान,पुणे १९९९ पृ.१९

३) पोतदार माधव महाराष्ट्रातील लढे आणि लढवय्ये अनुबंध प्रकाशन धंनकवडी,पुणे पृ.२९

४) राऊत गणेश महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन पुणे २००७ पृ.३५

५) सरदेसाई गो.स.मराठी रियसता पापूलर प्रकाशन मुंबई २०१२ पृ. २०८

६) पाटोळे शिवाजी माझे स्वप्ना साकार झाले ,माय बोली प्रकाशन मुंबई २०१२ पृ. १४४

७) मराठी दफ्तर-रुमाल न.४७ पत्र क्रं.६३ सन १८३१

८) मराठी दफ्तर-रुमाल न.४७ पत्र क्रं.६३ सन १८३०

## Significance of Sindhudurg Fort Through The Perception of Malvan Tourism

*Jyoti Buwa*

*Assistant Teacher, A.S. D. Topiwala Highschool, Malvan, Dist.Sindhudurg, Maharashtra, India.*

**गोषवारा :-**

छत्रपती शिवाजी महाराजांनी १६६४-१६६७ या सालात मालवण येथील कुरटे बेटावर स्वराज्याची जल राजधानी, किल्ले सिंधुदुर्गचे बांधकाम पूर्णत्वास नेले त्यामुळे जंजीऱ्याचे सिद्धी, गोव्याचे पोर्तुगीज, वेंगुर्ल्याचे डच आणि टोपीकर इंग्रज यांना शह देण्यास मराठी स्वराज्य प्रबल सामर्थ्यवान बनले. सिंधुदुर्ग किल्ल्यामुळे पश्चिम सागरात व्यापार आणि अर्थव्यवस्थेवर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. पुढील काळात करवीर, आंग्रे, पेशवे व इंग्रजांच्या काळातही या किल्ल्याचे राजकीय व आर्थिक महत्व अबाधित राहिले. आज या किल्ल्याला पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व प्राप्त झाले असून शासन, पुरातत्व विभाग, स्थानिक लोक, इतिहास अभ्यासक यांनी एकत्रित प्रयत्न करुन या ऐतिहासिक वास्तूचे जतन आणि संवर्धन केल्यास मालवणचे पर्यटन व अर्थव्यवस्था अधिक विकसित होऊ शकते.

**प्रस्तावना :-**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बंदरातून चालणाऱ्या व्यापारामुळे प्राचीन काळापासून या जिल्ह्याला आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले होते. इसवी सन 610 मध्ये सत्याश्रय पुलकेशी यांनी आपला थोरला मुलगा चंद्रदित्य याला कुडाळ प्रांतावर राज्य करण्यास पाठवले. त्याची पत्नी विजया भट्टारिका हिने दान दिलेल्या ताम्रपट तसा उल्लेख सापडतो. पुढे या प्रांतावर चालुक्यांची सत्ता आली तर इसवी सन 753 मध्ये राष्ट्रकुट राजा दंतिदुर्ग याने हा भाग जिंकून घेतला. चालुक्य आणि राष्ट्रकूट यांचे मांडलिक असणाऱ्या शिलाहार घराणे पुढे या प्रांतावर स्वामित्व प्रस्थापित केले. शिलाहारांचा पराभव राष्ट्रकूट राजा जयसिंहाने केला व पुढे 1209 मध्ये देवगिरीचा यादव राजा सिंघनदेव याने सिंधुदुर्गवर यादवांची सत्ता प्रस्थापित केली. 12 व्या शतकात दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दिन खिलजी याचे मांडलिकत्व देवगिरीच्या यादवांनी स्विकारले व सिंधुदुर्गवर सुलतानाची सत्ता प्रस्थापित झाली. परंतु ती नाममात्र होती. कारण येथील स्थानिक देसाई, सरदारच येथील कारभार बघत होते. महंमद तुघलकाच्या काळात तेराव्या शतकात हंपी येथे विजयनगर साम्राज्य प्रस्थापित झाले व या साम्राज्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बराच भाग जिंकून घेतला. इसवी सन 1469-70 मध्ये बहामनीचा वजीर मोहम्मद गवाण याने सिंधुदुर्ग जिल्ह्याचा बहुतांश प्रदेश गोव्याच्या बहामनी राज्यात जोडला. परंतु कृष्णदेवराय यांच्या कारकिर्दीत पुन्हा प्रदेश विजयनगर साम्राज्य समाविष्ट झाला. तालिकोट लढाईनंतर मात्र जवळपास संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा विजापूरच्या आदिलशहाच्या अंमलाखाली गेला. पुढे सोळाव्या शतकात पोर्तुगीज व्हाईसरॉय अल्बुकर्क त्याने बांदयावर स्वारी केली. या प्रांतासाठी पोर्तुगीज व आदिलशहा यांच्यामध्ये अनेक लढाया झाल्या आणि त्यामध्येच आदिलशहाचे मांडलिक असणाऱ्या सावंतवाडीच्या सावंत-भोसले घराण्याचा उदय झाला. छत्रपती शिवरायांनी स्वराज्य निर्मिती प्रारंभ केला त्यावेळी संपूर्ण सिंधुदुर्गावर अदिलशहाचा अंमल होता. पुढे दक्षिण कोकणात मराठे उतरले. परंतु महाराज सिद्दीच्या वेढ्यात अडकले व शाहिस्तेखानाचा तळ पुण्यात असल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात पोहोचण्याआधीच मराठी माघारी फिरले. पुढे शाहिस्तेखानाचा बंदोबस केल्यानंतर पुन्हा एकदा छत्रपती महाराजांनी आपली नजर कोकण प्रांती वळवली व कुडाळ चा ताबा घेतला. मार्गशीष बहुल द्वितीया शके पंधराशी शहाऐंशी म्हणजेच 25 नोव्हेंबर 1664 रोजी मालवण प्रांती स्वराज्याची जल राजधानी किल्ले सिंधुदुर्ग कुरटे बेटावर वसवण्याचा संकल्प महाराजांनी सोडला व पुढील काळात या किल्ल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याचे व मालवण शहराचे राजकीय आणि आर्थिक महत्त्व दुणावत गेले. शिवछत्रपतीनंतर संभाजी राजे, राजाराम महाराज व पुढील राजकीय कलहात हा किल्ला करविर संस्थांनकडे राहिला. 8 नोव्हेंबर 1763 रोजी पोर्तुगीजांनी आपल्या भव्य आरमारासह सिंधुदुर्गावर स्वारी केली. जवळजवळ एक आठवडा हे युद्ध चालले. करवीर छत्रपती संभाजीराजे दुसरे यांच्या पत्नी जिजाबाई यांनी केलेल्या तहामुळे पोर्तुगीजांचे आरमार माघारी फिरले. पोर्तुगीजांच्या स्वारीनंतर दोनच वर्षात इंग्रजांनी सिंधुदुर्गवर आक्रमण केले. किल्ला काबीज करून किल्ल्याचे नाव "फोर्ट ऑगस्टस्" असे ठेवले. सिंधुदुर्ग किल्ला टिकवण्यासाठी जिजाबाईंनी नमते घेऊन सतराशे 76 ला पुन्हा इंग्रजांशी तह केला व किल्ल्यावर करवीरांचे वर्चस्व राहिले तरी ते नाममात्रच होते. 1792 ला पुन्हा इंग्रजांनी सिंधुदुर्ग किल्ल्यावर हल्ला चढवला यावेळी झालेल्या तहामध्ये इंग्रजांचे निशाण किल्ल्यावर फडकवण्याचे करवीर छत्रपती शिवाजीराजांनी मान्य केले. 18 शतकात मात्र करवीर संस्थांचे संपूर्ण वर्चस्व संपुष्टात आले व किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सिंधुदुर्ग जिल्हा रत्नागिरी जिल्ह्याच्या एक भाग होता. 1 मे 1981 रोजी रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन करून रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे निर्माण करण्यात आले. 5219 चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असणारा व 121 किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभलेला नवीन सिंधुदुर्ग जिल्हा अस्तित्वात आला 1994 मध्ये सिंधुदुर्गनगरी ओरस सिंधुदुर्ग

जिल्ह्याचे मुख्यालय बनले. सन 1997 रोजी हा जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. पर्यटन जिल्हा म्हणून घोषित होणारा हा देशातील पहिला जिल्हा होय.

**उददेश :-**

1) सिंधुदुर्ग या सागरी किल्ल्याचा ऐतिहासिक अभ्यास.
2) सिंधुदुर्ग किल्ल्याचे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व तपासणे.

**गृहीतक :-**

सिंधुदुर्ग किल्ल्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

**2. संदर्भ साहित्याचा आढावा :-**

1) Dr. S. P. Shinde did his Ph. D. from Shivaji vidyapith Kolhapur on the subject "The History of The Princely State of Sawantwadi From 1812 to 1988" In this Thesis he made a deep study on the political condition, administration arrangement, trade, industry and educational and social conditions during the period 1812 to 1988 in the princely state of the Sawantwadi
2) Dr. Shivaji D. Jadhav did his Ph.D. from Shivaji Vidyapith Kolhapur on the subject "Tourism in Kolhapur District – an Historical study" In thesis he studied Tourists Places in Kolhapur District and studied on various schemes carried out by Governments from the tourism point of view.
3) Dr. Suresh Shikhare was conferred on Ph. D. by Shivaji Vidyapith from " *Marathynche Aarmar Itihas*". In this historical topic he dealt with the period from *Shivkal* to *Peshve* regarding Maratha fleet.
4) Dr. Sarang, Ankush T. did his Ph. D. from Shivaji Vidyapith Kolhapur on the subject "External relation of Sawantwadi state. In this thesis he made a deep study from the period of Lakham Sawant –I to Durgabai up to era (1809-1819).

**संशोधन पध्दती :-**

सदर अभ्यास करताना ऐतिहासिक संशोधन पध्दतीने प्रस्तुत विषय मांडला आहे. उपलब्ध माहिती अंतर्गत व बहिर्गत परिक्षणाद्वारे त्याची सत्यता तपासून मगच वस्तूनिष्ठपणे त्याचा वापर केला आहे. समस्या विषयाचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला. संदर्भ साधनांमध्ये मालवण नगरपालिका कार्यालयीन कागदपत्रे, वायरी ग्रामपंचायत कार्यालयीन कागदपत्रे, महाराष्ट्र पर्यटन विकास कार्यालयातील कागदपत्रे, मालवण बंदर जेटटी विभाग कागदपत्रे, रत्नागिरी-सिंधुदुर्ग गॅझेटीअर तसेच प्रत्यक्ष मुलाखती यांचा संशोधनासाठी वापर केला.

**सविस्तर आढावा :-**

**1** सिंधुदुर्ग किल्ला - "जसे ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी तदवत ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र" हे शिवरायांचे धोरण होते. हबसण्यातून आलेल्या सिद्दीचे आरमार प्रबळ होते. सिद्धीने कोकणवासीयांचा छळ चालवला होता. महाराजांनी सिद्धि विरुद्ध अनेक मोहिमा काढल्या. परंतु त्याच्या आरमारासमोर महाराजांच्या छोट्या आरमाराचा टिकाव लागला नाही. तेव्हापासून शिवाजी महाराजांचा पश्चिम किनाऱ्यावर जलदुर्ग उभारण्याचा मानस होता. तसेच इंग्रज पोर्तुगीज यांचे समुद्रावर वर्चस्व होते. त्यांना शह देण्यासाठी पश्चिम किनाऱ्यावर दुर्घट असा आरमारी किल्ला बांधण्यासाठी सुरक्षित जागा महाराज शोधत होते. पश्चिम किनारा म्हणजे स्वराज्याचा किनारा असावा आणि आपल्या ताब्यात राहावा. या किनाऱ्यावर मराठ्यांची सत्ता हवी यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी कारवार ते मुंबई पासूनची 11 ठाणी मराठी स्वराज्यात दाखल करायचे ठरवले व कोकणात ससैन्य मोहीम काढली. ते मालवणला पोचले यावेळी त्यांना किनाऱ्यालगत ऐन समुद्रात कुरटे बेट दिसले. या बेटा संबंधीची सर्व माहिती कुडाळचा जोगण प्रभू त्याचा मुलगा कृष्ण प्रभू यांनी महाराजांना दिली होती, असा उल्लेख कागदपत्रात आढळतो. सोळाव्या शतकात व्यापाराचा आणि मालवाहतुकीचे मूळ ठिकाण हे मालवण होतं. घाट माथ्यावरील प्रदेश आणि कर्नाटक यांचा परदेशी माल चढवण्याचा मुख्य मार्ग मालवण प्रांतातून जात होता. त्यामुळे शिवरायांना सर्वतोपरी विविध उद्देश हेतूने हा किनारा अत्यंत महत्त्वाचा वाटला. "चौऱ्याऐंशी बंदरी ऐसा जागा नाही, इये बदली नूतन जंजिरा बसवावा!" असा आदेश महाराजांनी दिला. किल्ल्याच्या जवळच असणारा मोरयाचा धोंडा या ठिकाणी 25 नोव्हेंबर 1664 रोजी पायाभरणीचा संकल्प महाराजांनी सोडला व मुहूर्ताचा चिरा स्वत: बसवला. सिंधुदुर्गच्या बांधकामासाठी राज्यांनी पाथरवट, चुना मिळणाऱ्या कामासाठी व बाजे लोक मिळवून तीन हजार

लोक कामासाठी लावले. पाच हजार मावळे लोकांची चौकी नेमिली फिरंग्यांनी अडथळा आणू नये, म्हणून त्यांना महाराजांनी पत्र पाठवले. किल्ला बांधकामात दगड कुरटे बेटावर वापरला. पाण्याच्या माऱ्याने किल्ल्याचा तट दुभंगू नये, म्हणून बांधकामात शिसे घालण्यात आले. या संपूर्ण कारभारावर कामावर देखरेख ठेवण्याचे काम गोविंद विश्वनाथ प्रभू सुभेदार कुंभारजुवे तसेच हिरोजी इंदूलकर यांची नेमणूक केली. 500 पाथरवट असामी 200 लोहार त्याचप्रमाणे शंभर गोवेकर पोर्तुगीज आणि तीन हजार मजूर सतत सिंधुदुर्गाच्या बांधकामासाठी खपत होते. अदमासे एक कोटीहून सिंधुदुर्गासाठी खर्च आला. सिंधुदुर्गाच्या संरक्षणासाठी महाराजांनी सिंधुदुर्ग जवळ जमिनीच्या बाजूस पद्मगड बांधता आणि दक्षिणेस राजकोट बांधण्यात आला.

**2 भौगोलिक स्थान व महत्त्व व बांधकाम :-**

48 एकर क्षेत्रावर हा किल्ला वसलेला आहे. 29 ते 30 फूट उंच, 12 फूट रुंद अशी किल्ल्याची तटबंदी असून ही तटबंदी जवळ जवळ दोन मैल पसरलेली आहे. किल्ल्याच्या संरक्षणासाठी 52 टेहळणी बुरुज असून या प्रत्येक बुरुजावर तोफा डागणेची सोय केली आहे. उत्तर व पूर्वेला किल्ल्याचा मुख्य दरवाजा आहे, त्याला दिल्ली दरवाजा असेही म्हणतात. किल्ल्यात साखरबाव, दहिबाव, दुधबाव अश्या तीन विहिरी गोड्या पाण्याच्या आहेत. त्या आजही अस्तित्वात आहेत. 4 किलोमीटर घेराच्या तटबंदीत वीस हेक्टर क्षेत्रफळ सामावले आहे. तटबंदीत वरखाली जाण्यास 45 जिने आहेत. पाहरेकऱ्यांसाठी 40 शौचालय बांधले आहेत. तटावर साधारण अर्ध्या मैलाच्या अंतरावर चार चौक्या 3 मीटर चौरस मापाच्या आहेत. आत खटावाची खोली आहे. मालवण शहराच्या दिशेने प्रमुखद्वार असले तरी शहरातून, किनाऱ्यावरून त्याचा थांपत्ता लागत नाही. घेराचा तट दोन्ही अंगाने आत वळून जाऊन चिंचोली खिंड तयार झाली आहे. टोकाशी गोमुखी बांधणीचे दुर्गद्वार आहे. पश्चिमेकडील तटावर साडे नऊ मीटर लांबी रुंदीची चौरस अंधार कोठडी कैद्यांना ठेवण्यासाठी बांधली आहे. उत्तरेकडील बुरुजावर दोन घुमट्या असून एका देवळीत श्री शिवाजी महाराजांच्या हातचा व दुसरीत पायाचा असे चुन्यात उमटवलेले ठसे आजही चांगल्या स्थितीत दिसतात. दक्षिणेकडील तटबंदी मधून एक बोगदेवजा वाट किल्ल्याबाहेर गेली असून तेथे लहानशी वेळ आहे. करवीर राज्याच्या संस्थापिका ताराबाई येऊन राहिल्या होत्या त्यावेळी समुद्रस्नानासाठी जात असल्याने त्या वेळेस 'राणीची वेळ' म्हणतात.

**3 किल्ल्यातील वास्तुशिल्पे :-**

किल्ल्यातील प्रवेशद्वारातच मारुतीचे मंदिर आहे. त्याचप्रमाणे भवानीदेवी, महादेव, जरीमरी आणि महापुरुष यांची स्वतंत्र मंदिरे आहेत. भारतातील एकमेव असे शिवछत्रपती महाराजांचे मंदिर किल्ल्यावर मध्यवर्ती ठिकाणी आहे. पंधरा मीटर लांबी साडे सात मीटर रुंदीचे हे मंदिर राजाराम महाराजांच्या काळात बांधण्यात आले. महाराजांची मूर्ती काळया पाषणाची वीरासन घातलेली, दाढी नसलेली, पायात तोडे व तुमान, कमरेस कमरपटटा, कर्णभूषण व नावाड्याच्या टोपीसारखे शिरोभूषण, छातीवार यज्ञोपवित कोरले आहे. मूर्तीच्या मागील प्रभावळीत उजवीकडे सूर्य, डावीकडे चंद्रकोर कोरलेली आहे, अशी आगळीवेगळी प्रतिमा असलेले हे एकमेव मंदिर आहे.

**5. पर्यटन :-**

प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. पर्यटन हा मानवाचा निरनिराळया ठिकाणी होणारा हेतू पूर्वक प्रवास व वास्तव्यामुळे झालेली वैशिष्टयपूर्ण बाब आहे. आधुनिक काळात महत्त्व प्राप्त झाले आहे.

'पर्यटन' (Tourism) ही संज्ञा 'प्रवास' (Tour) या शब्दाशी संबंधित आहे आणि प्रवास हा शब्द लॅटिन भाषेतील Tornos या शब्दापासून आला आहे, याचा अर्थ वर्तुळ असा आहे. यापासून पुढे वर्तुळाकार प्रवास किंवा पॅकेज टूर्स हा शब्द रुढ झाला. 'Tours' या शब्दाची आणखी एक उत्पत्ती असून हा शब्द हिब्रू भाषेतील 'Torah' या शब्दापासून आला आहे आणि त्याचा अर्थ शिकणे शोध घेणे असा होतो.

**1 पर्यटनातील सिंधुदुर्ग किल्ल्याचे महत्त्व :-**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन हा मानवाचा एक महत्वपूर्ण आर्थिक व्यवसाय बनला आहे. पर्यटनाचे वैशिष्ट्य म्हणजे जगातील विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांमध्ये त्याचा विकास होत आहे. भारतामध्ये पूर्वंपार धार्मिक पर्यटन अस्तित्वात होते. ब्रिटीश काळापासून भारतीय पर्यटनाला संयोजित रूप प्राप्त झाले. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने पर्यटन व्यवसायाला प्राधान्य व चालना दिली. धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, कृषी, नैसर्गिक असे पर्यटनाचे विविध प्रकार पडतात. हे प्रकार सिंधुदुर्ग पर्यटनात सुद्धा आढळतात.

**2 ऐतिहासिक पर्यटन व महत्त्व :-**

पर्यटनाचा आत्मा म्हणून ऐतिहासिक स्थळांचा उल्लेख केला जातो. ऐतिहासिक घटना, घटनास्थळे याबददल लोकांना कुतूहल, आस्था असते. म्हणूनच अशा स्थळांना भेटी देऊन तेथील इतिहास जाणून घेण्याची इच्छा पर्यटकांना असल्याने, अशा स्थळांना पर्यटक भेट देतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची जलराजधानी म्हणून सिंधुदुर्गचे बांधकाम केले. पद्मदुर्ग, राजकोट, सर्जेकोट, किल्ले निवती यांचे बांधकाम केल्यामुळे मालवण व आसपासच्या परिसराला व्यापारिक आर्थिक तसेच राजकीयदृष्ट्या महत्व प्राप्त झाले. काळाच्या ओघात किल्ल्यांचे राजकीय महत्व कमी झाले असले तरी पर्यटनाच्या दृष्टीने त्यांचे महत्व विकसित होत गेले. मराठी साम्राज्यात राजकीय केंद्रबिंदू असलेला सिंधुदुर्ग स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पर्यटनाचा आर्थिक केंद्रबिंदू बनला. पर्यटकांमुळे मालवण शहराच्या अर्थकारण व उद्योगाला चालना मिळाली आहे.

| सन | पर्यटक |
|---|---|
| 2005-06 | 73,787 |
| 2006-07 | 1,18,039 |
| 2007-08 | 1,17,268 |
| 2008-09 | 2,12,403 |
| 2009-10 | 2,34,219 |
| 2010-11 | 2,51,842 |
| 2011-12 | 2,67,199 |
| 2012-13 | 2,69,631 |
| 2013-14 | 2,49,622 |
| 2014-15 | 3,58,984 |

सौजन्य बंदर विभाग मालवण (आकडेवारी)

वरील आकडेवारीचा गोषवारा पाहता, सिंधुदुर्ग किल्ल्याला भेट देणाऱ्यांची संख्या वाढत गेली आहे. परंतु मालवणात येणाऱ्या एकूण पर्यटकांच्या संख्येचे तुलनात्मक विश्लेषण करताना,

| सन | पर्यटक |
|---|---|
| 2012-13 | 3,50,567 |
| 2013-14 | 4,45,267 |
| 2014-15 | 6,01,586 |

सौजन्य पर्यटन व्यावसायिक मंडळ (आकडेवारी)

शहराला भेट देणाऱ्या लोकांची संख्या २०१४-१५ मध्ये ५ ते ६ लाख होती. परंतु त्यातील ३,५८,९८४ लोकांनीच किल्ल्याला भेट दिली.

**मर्यादा :-**

हे संशोधन मालवण शहरापुरती मर्यादित असून 2012 ते 2015 या कालावधीचा विचार करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :-**

सिंधुदुर्ग किल्ल्यात प्रवेश करण्याचा सागरी मार्ग मालवण नगरपालिकेच्या सर हद्दीत येत असून किल्ल्यावर जाण्यासाठी नगरपालिका पूर्वी ७० रुपये व आता ९० रुपये मूल्य आकारते. आतील सिंधुदुर्ग किल्ला वायरी ग्रामपंचायतीच्या पुरातत्त्व विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत येत असून ते पाच रुपये प्रवेश मुल्य आकारतात. किल्ल्यामध्ये स्थानिक लोकांची वस्ती आहे. नगरपालिका वायरी ग्रामपंचायत स्थानिक लोक यांनी मिळून स्वच्छता, मुलभूत सोयीसुविधा व आधुनिक पर्यटनाची मूल्य अनुसरली तर मालवण शहरात येणारा प्रत्येक पर्यटक किल्ल्यात पुन्हा पुन्हा भेट देईल.

**पर्यटक वाढण्यासाठी केलेल्या उपाययोजना :-**

i) किल्ल्यावर जाण्यासाठी प्रवासाची व्यवस्था.

ii) किल्ल्यातंर्गत निवासाची व्यवस्था.

iii) प्रसाधनगृहांची उपलब्धता.

iv) किल्ल्यातंर्गत फिरण्याची सोय.

v) तटावर वाढलेली झाडेझुडपे काढून तट फिरण्याजोगा करणे.

vi) प्रशिक्षित गाईड.

vii) नाम फलक / माहिती फलक.

viii) शासन मान्यताप्राप्त उपहारगृह.

ix) सिंधुदुर्ग किल्ल्याचा इतिहास सांगणारे माहितीपट, लेझर शो.

x) किल्ल्याशी संबंधित ऐतिहासिक वास्तूंचे सफरी आयोजित करणे.

**समारोप :-**

साडेतीनशे वर्षाचा ऐतिहासिक वारसा लाभलेली वास्तू, किल्ले सिंधुदुर्ग हा मालवणचा ऐतिहासिक वारसा आहे. प्राचीन काळात सिंधुदुर्ग किल्ला हा स्वराज्याची आर्थिक व राजकिय राजधानी होता. आजही पर्यटनाच्या माध्यमातून हा किल्ला आर्थिक केंद्रबिंदू बनताह या ऐतिहासिक ठेव्याचे जतन आणि संवर्धन व नवीन सुधारणा करण्यासाठी शासकीय पातळीवरून पुरातत्व विभाग मालवण नगरपालिका, वायरी ग्रामपंचायत, इतिहास संशोधक, प्रेमी यांनी एकत्रित येऊन सकारात्मक प्रयत्न कल्यास या किल्ल्यास पूर्वीचे वैभव प्राप्त होईल.

**REFERENCES :**

1. Gazetteer of the Bombay Presidency. Vol. x- Ratnagiri and Savantwadi. Government of central press, Bombay. 1880.
2. Ratnagiri District Gazetteer. Executive Editor-P. SetuMadhavaRao. Directorate of Government Printing, Stationery and Publications, Maharashtra State, Bombay. Second Edition, 1962.
3. Shivkalin letters, extracts, collection, volume1, volumen2, shrishivcharitra karyalaya, Pune, 1930.
4. Shivkalin letters, extracts, collection, volume 3. Editor – Sha. Na. Joshi, Bharat Itihas sawnsodhak Mandal Pune, 1937.
5. Marathacha Itihasachi Sadhane, Poruguese Daptar, Khand 2 Pramukh Sampadak – Pandurang S. Pisulekar. Sampadak Anuwadak - Sa. Sha. Desai Maharashtra Rajya Sahitya – Sanskruti Mandal, Mumbai, 1974.
6. Correspondence available to the princely state of sawantwadi.
7. Correspondence with Tarabai, Bawada Daptar.
8. Unpublished Documents at Bharat Itihas Sausodhan, Mandal Pune.
9. Sindhudurg Zilla Abhilekhagar, Oras.
10. Shivshahi Portuguese documents, Translator and editor – S. S. Desai, Shivaji Unversity, Kolhapur, 1977.
11. Apte B. K., History of the Maratha Navy and Merchant Ships, Bombay, 1973.
12. Buwa G. A., Sawantwadi Sansthan – Sai-publications, Banda.
13. Kamat A. P., Ghanekar P. K., Kokanacha Manbindu, Sindhudurg, Archeology and Museum Department Govt. of Maharashtra, Mumbai, 1985 .
14. Ajgaonkar R.Wa, Sindhudurg Darshan, ed. P. R. Ajgaonkar, Malvan, 1979.
15. Balkrishna, Shivaji the Great, (Vols.) D. B. Taraporwala Sons and Co. Bombay, 1938.
16. Deshpande, C. D., Western India, A Regional Geography, Dharwar, 1948.

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021,
Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# महाराष्ट्र राज्यातील महिला स्वयंसहायता बचत गट व महिलांचा विकास

**सौ.विनया विक्रांत रासम**

***सहा.प्राध्यापक (ग्रामीण विकास), कणकवली कॉलेज, कणकवली, जि.सिंधुदुर्ग***

समाजातील महिलांना मानाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी भारत सरकारने आणि बांगलादेश सारख्या देशांनी स्वयंसहायता समूह गट चळवळीच्या माध्यमातून अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. इतर समाजातील स्त्रियांप्रमाणेच ग्रामीण भागातील स्त्रिया व त्याचबरोबर दुर्गम व मागास भागातील व कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन मानाने समाजामध्ये राहण्याची महत्त्वपूर्ण संधी प्राप्त झालेली दिसून येते. सध्याचे चित्र पाहता महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात स्वयंसहायता समूह गटाच्या माध्यमातून गरीब मागास होतकरू व गरजू महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमटविण्याची संधी प्राप्त झाली आहे. या संकल्पनेचे प्रणेते नोबल पारितोषिक विजेते डॉ. मोहम्मद युनुस यांनी बांगलादेशातील जोबरा या गावात स्वयंसहायता समूह गट बचत गटाची सुरुवात केल्याचे दिसते.

## गोषवारा (Abstract)

१. स्वयंसहायता समूह निर्मितीमुळे महिला वर्गामध्ये वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक परिवर्तनाला चालना मिळत आहे.

२. महाराष्ट्रात इलाबेन भट यांनी मांडलेला महिला व सूक्ष्म वित्तपुरवठा हा विषय व डॉ. मोहम्मद युनुस यांनी प्रत्यक्षात केलेले महिला बचत गटाचे प्रयोग यामुळे महिलांच्या आर्थिक परिवर्तनाला दिशा प्राप्त झाली.

३. महाराष्ट्रात स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या अंमलबजावणीनंतर स्वयंसहाय्यता समूह गट बांधणीची चळवळ अधिक रूढ झाली.

४. स्वयंसहाय्यता समुह गटांमुळे स्त्रियांना आपलंही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे व समाजात ते महत्त्वाचे आहे याची जाणीव अधिक प्रबळ होऊ लागली.

## परिचय (Introduction)

१. महाराष्ट्रात सन १९९९ सालापासून स्वयंसहायता समूह गट चळवळ सुरू झाली आणि तिथूनच महिलांना आपला सर्वांगीण विकास करून घेण्याची प्रेरणा मिळाली.

२. आपल्या वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासासाठी गटाचा आधार घेऊनच पुढे गेले पाहिजे अशा स्वरूपाची जाणीव महिलांमध्ये निर्माण झाली.

३. महाराष्ट्राच्या महिला वर्गाच्या आर्थिक परिवर्तनात महिलांचा सहभाग आहे व याला ऐतिहासिक आधार आहे. त्यात स्वयंसहाय्यता गटाचाही वाटा आहे.

४. महाराष्ट्रातल्या महिला वर्गाने विविध आघाड्यांवर परिवर्तन चळवळी उभ्या केल्या त्यात स्वयंसहायता समूह गट एक वैशिष्ट्यपूर्ण चळवळ आहे.

## मुख्य उद्दिष्टे

१. स्वयंसहायता समूह गट या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. स्वयंसहायता समूह गटाचा महिलांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनावर झालेला परिणाम अभ्यासणे.

३. स्वयंसहायता समूह गटामार्फत महिलांचा उद्योजकता विकास कितपत झाला याचा शोध घेणे.

४. स्वयंसहायता समूह गट व सामाजिक परिवर्तन यांचा परस्पर संबंध अभ्यासणे.

५. महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.

## गृहितके

१. स्वयंसहायता समुहामुळे महिलांची कौटुंबिक, आर्थिक स्थिती बळकट झाली आहे.

२. स्वयंसहायता समूह गटात राबविल्या जाणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेतल्यामुळे महिलांची वैयक्तिक दर्जाची पातळी उंचावलेली आहे.

३. स्वयंसहायता समूह गटामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढला असून राजकीय विकास झालेला आहे.

४. स्वयंसहायता समूह गटात काम करणाऱ्या महिलांचा वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास झालेला आहे.

५. महिलांच्या नेतृत्वगुणांचा विकास झालेला आहे.

## अभ्यास पद्धती (संशोधन पद्धती)

### दुय्यम स्त्रोत

प्रस्तुत संशोधनात दुय्यम स्त्रोताअंतर्गत विषयाशी संबंधित असणारे संदर्भग्रंथ, इंटरनेट, शोधनिबंध, शासकीय योजना पत्रके, वर्तमानपत्रे, महिला सबलीकरण योजनांशी संबंधित पत्रिका इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

### विषय विवेचन (Analysis & Data Analysis)

स्वयंसहायता समूह गट संकल्पना

स्वयंसहायता समूह गट हे ग्रामीण बचत गट, सेल्फ हेल्प डेव्हलपमेंट ग्रुप (SHG) या नावाने ओळखले जातात.

### व्याख्या (Definition)

एकाच वाडी वस्तीतील, एकाच सामाजिक व आर्थिक स्तरावरील, समविचार, समान गरजा असणाऱ्या दहा ते वीस महिलांच्या संघटनास 'स्वयंसहायता समूह गट बचत गट' असे म्हणतात.

बचत गट हा एक सामाजिक आर्थिक उपक्रम आहे की, ज्या उपक्रमांमध्ये सदस्यांनी संघटितपणे एकमेकांना समजून घेऊनच सर्व प्रक्रिया केल्या जात असल्याने या रचनेला 'स्वयंसहायता समूह गट' असे संबोधले जाते.

जगाच्या दृष्टीने मागास राष्ट्र म्हणून गणल्या गेलेल्या बांगलादेशात स्वयंसहायता गटाची मुहूर्तमेढ रोवली गेली. नोबेल पारितोषिक विजेते डॉ. मोहम्मद युनुस हे या संकल्पनेचे प्रणेते होत. १९७४ साली पडलेल्या दुष्काळामुळे चितगाव विद्यापीठाच्या परिसरात असलेल्या जोबरा गावातील महिला या दुष्काळाच्या कालावधीत किमान एक वेळच्या उदरनिर्वाहासाठी धडपडत होत्या. तेव्हा सावकारी कर्जाशिवाय या महिलांकडे गरजा निवारण्याचे दुसरे साधन नव्हते. अशा वेळेस डॉ. मोहम्मद युनुसनी काही गरजवंत लोकांना स्वतःच्या खिशातील पैसे विनातारण कर्ज स्वरूपात दिले. त्या वेळेस त्या गरजवंत लोकांनी आपली गरज पूर्ण झाल्यानंतर त्यांचे पैसे वेळेत परत केले. यावरून डॉ. युनूस यांच्या एक गोष्ट लक्षात आली की, गरजवंत लोक आपली गरज पूर्ण होताच विनातारण घेतलेले कर्जही अगदी प्रामाणिकपणे परतफेड करतात आणि हीच गोष्ट मनावर घेऊन त्यांनी जोबरा गावात स्वयंसहाय्यता गटाची योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली की, ज्यामध्ये काही सारख्या गरजा असणारे लोक समान बचत करतील व त्यांचे पैसे देताना गरजेनुरूप वापरता येतील व यालाच बचत गट म्हणजेच स्वयंसहायता समूह गट म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यानंतर सन १९८३ मध्ये त्यांनी जोबरा येथे ग्रामीण बँकेची स्थापना करून या माध्यमातून गरीब व्यक्तीही खरंच कर्ज परतफेड करतात हे प्रयोगाने सिद्ध केले.

देशात तसे पाहता १९५१ पासून दारिद्र्य निर्मुलनाचे अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. पण म्हणावे तितके यश या कार्यक्रमांना मिळाले नाही. महाराष्ट्र राज्य व स्वयंसहायता गट यांच्या परस्पर संबंधांचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते की, महाराष्ट्रातही स्वयंसहायता गटाची पार्श्वभूमी अगदी १९७० च्या दशकापासून ची आहे. कारण इलाबेन भट यांनी १९७७ मध्ये राज्यात महिला व सूक्ष्म वित्त पुरवठा या विषयाची मांडणी केली होती व १९८५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील 'वडसा' तालुक्यात गट स्थापन केला गेला. त्यानंतर डॉ. मोहम्मद युनुस यांची बचत गटाची संकल्पना महाराष्ट्रातही पसरू लागली. त्याचबरोबर सन १९९२ मध्ये राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ने पुढाकार घेऊन सुरू केलेला स्वयंसहायता समूह गट-बँक संलग्न कार्यक्रमाने ही राज्यात चांगली प्रगती केली. पण मूल्यमापनात एक गोष्ट लक्षात आली की, म्हणावे तितके यश या योजनांना आले नाही आणि म्हणूनच या सर्व योजनांचे एकत्रीकरण करून एक एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SJGSY) सुरू करण्यात आली व त्या अंतर्गत सातव्या योजनेच्या कालावधीत स्वयंसहाय्यता गट स्थापनेवर भर देण्यात आला. हेच बचत गट बचतीचे तसेच गरजवंत सदस्यांना गरजेनुरूप कर्ज पुरवठा करणारे प्रभावी साधन मानले जाऊ लागले. यानंतर महाराष्ट्रात अनुदान तत्त्वावर स्वयंसहायता गटाची चळवळ जोरदार सुरू झाली. स्वयंसहायता समूह गटांना अनुदान देण्यासाठी आज महाराष्ट्रात जवळपास ४३०० बँक शाखा कार्य करीत आहे. त्यांच्याबरोबर एनजीओ आणि विविध शासकीय योजनाही राबविल्या जात आहे. आजच्या वर्तमान परिस्थितीत स्वयंसहायता गटाची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्रात पसरलेली दिसून येत आहे आणि या माध्यमातूनच महिलांचा केवळ आर्थिक नव्हे तर कौटुंबिक, सामाजिक, राजकीय व व्यक्तिमत्त्वांचाही विकास झालेला दिसून येत आहे

**महाराष्ट्र राज्यातील महिला बचत गटांची सद्यस्थिती**

| अ.क्र. | जिल्याचे नाव | एकुण तालुके | एकूण तालुक्यापैकी बचत गट स्थापन झालेले तालुके | एकूण बचत गट |
|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | 14 | 14 | 13,018 |
| २. | अकोला | 7 | 7 | 11,705 |
| ३. | अमरावती | 14 | 14 | 19,764 |
| ४. | औरंगाबाद | 9 | 9 | 11,052 |
| ५. | बीड | 11 | 11 | 19,572 |
| ६. | भंडारा | 7 | 7 | 13,033 |
| ७. | बुलढाणा | 13 | 13 | 19,785 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | चंद्रपूर | 15 | 15 | 18,177 |
| ९. | धुळे | 4 | 4 | 9,795 |
| १०. | गडचिरोली | 12 | 12 | 15,061 |
| ११. | गोंदिया | 8 | 8 | 16410 |
| १२. | हिंगोली | 5 | 5 | 7450 |
| १३. | जळगाव | 15 | 15 | 20367 |
| १४. | जालना | 8 | 8 | 17731 |
| १५. | कोल्हापूर | 12 | 12 | 14922 |
| १६. | लातूर | 10 | 10 | 16190 |
| १७. | नागपूर | 13 | 13 | 13683 |
| १८. | नांदेड | 16 | 16 | 14142 |
| १९. | नंदुरबार | 6 | 6 | 16174 |
| २०. | नाशिक | 15 | 15 | 20503 |
| २१. | उस्मानाबाद | 8 | 8 | 14465 |
| २२. | पालघर | 8 | 8 | 19344 |
| २३. | परभणी | 9 | 9 | 11086 |
| २४. | पुणे | 13 | 13 | 15769 |
| २५. | रायगड | 15 | 15 | 12961 |
| २६. | रत्नागिरी | 9 | 9 | 16329 |
| २७. | सांगली | 10 | 10 | 9892 |
| २८. | सातारा | 11 | 11 | 12342 |
| २९. | सिंधुदुर्ग | 8 | 8 | 10365 |
| ३०. | सोलापूर | 11 | 11 | 21178 |
| ३१. | ठाणे | 5 | 5 | 10524 |
| ३२. | वर्धा | 8 | 8 | 14169 |
| ३३. | वाशीम | 6 | 6 | 9639 |
| ३४. | यवतमाळ | 16 | 16 | 24635 |
| | | **351** | **351** | **5,11,232** |

(स्रोत: www.nrlm.gov.in)

**१. महिला स्वयंसहायता समूह गटातून महिलांचा वैयक्तिक व कौटुंबिक विकास**

'स्वतःच्या समस्या स्वतःच्याच पद्धतीने सोडविता येण्याची क्षमता स्त्रियांना लाभलीच पाहिजे आणि त्यांच्यात क्षमता निर्माण करण्याचे कार्य दुसरे कोणी नाही तर त्यांनी स्वतः केले पाहिजे. इतर कोणत्याही देशातील स्त्रिया आणि स्त्रियांइतक्याच योग्यतेने भारतीय स्त्रियाही कार्य करू शकतात.' असे उद्गार भारतीय स्त्रियांसाठी स्वामी विवेकानंद यांनी काढले होते आणि वर्तमान परिस्थिती पाहता स्वयंसहायता समूहाच्या माध्यमातून स्त्रियांनी हे सत्यातही उतरवून दाखवले आहे. महिला स्वयंसहाय्यता गट आज लाखोंच्या घरात आहेत व महिलांनी या गटांच्या माध्यमातून स्वतःच्या विकासासाठी परस्पर समन्वयातून स्वावलंबन, समान बचत व समूह शक्ती या त्रिसूत्रीचा वापर करून स्वतःचा विकास साधला आहे. रोजंदारीवर काम करून स्वतःच्या कुटुंबाचा चरितार्थ चालवणाऱ्या महिला आज प्रत्येक महिन्यात काही रुपयांची बचत करू लागल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून महिला वैयक्तिक पातळीवर व्यवसाय करू लागल्या आहेत. जसे की शिवणकाम, खाद्यपदार्थ बनवून विक्री करणे, पशु पक्षी पालन, गारमेंट्स चालविणे, ब्युटी पार्लर, कॅटरिंग चालविणे इ. स्वयंसहायता समूह गट हे त्यांच्यातील कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ ठरले आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून नोकरी न करताही कौटुंबिक कामे व जबाबदाऱ्या पार पाडत, कुटुंबाला आर्थिक स्थैर्य देण्याचा बचत गटातील

महिलांचा आज महत्त्वाचा वाटा आहे असे दिसून येते. तसेच महिलांचा आत्मविश्वास वाढीस लागला आहे. आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या नेतृत्व गुणाचाही विकास झालेला आहे. एकूण काय तर महिलांच्या वैयक्तिक विकासाबरोबर कौटुंबिक विकासही होताना दिसत आहे.

**२. महिला स्वयंसहायता समूह गटातून महिलांचा आर्थिक विकास**

देशाला स्वातंत्र्य मिळाले अगदी तेव्हापासून महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना अंमलात आणल्या गेल्या. यामध्ये महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अनेक योजना समोर आल्या. पण हवे तसे यश त्या योजनांना मिळाले नाही. पण महिला स्वयंसहाय्यता गटांमुळे मात्र ६०% का होईना हे चित्र पालटलेले दिसते. गटातून होणाऱ्या आर्थिक सहाय्यातून महिला आज सक्षम होताना दिसत आहेत. त्यांच्यातील नेतृत्वगुण विकसित होताना दिसत आहे. आज गटातील महिला सामूहिक किंवा वैयक्तिक पातळीवर शेतीबरोबर लघुउद्योग करताना दिसत आहे. त्यामुळे महिलांच्या व्यवहार ज्ञानात भर पडल्याचे दिसून येत आहे. बँकेचे व्यवहार, पोस्टाचे व्यवहार त्यांना माहीत झाले आहेत. बँकेतर्फे महिला विकासाकरिता असलेल्या विविध योजना त्यांना माहीत झाल्या आहेत. त्याचबरोबर बँकेत पैसे जमा करणे, कर्जावरील अनुदानाची माहिती त्यांना होत आहे. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक स्वयंसहाय्यता गट आज महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) नियंत्रणाखाली काम करीत आहेत. गटाच्या महिला सदस्य आज बँक, पंचायत समितीमध्ये जाऊन स्वतःची कामे स्वतः करताना दिसताहेत. गटातील निरक्षर महिलाही ही कामे सवयीने करू लागले आहे. गटांच्या माध्यमातून महिलांनी बँका व स्वर्णजयंती योजनेतून विविध स्वरूपाची कर्ज घेऊन आज लघुउद्योग ते राज्य पातळीवर दखल घेतली अशा स्वरूपाच्या उद्योगधंद्यांत पर्यंत मजल मारली आहे असे दिसून येते. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीवर आर्थिक सहाय्याकरिता अवलंबून न राहता पुरुष प्रधान संस्कृतीत अडकलेल्या महिला आज स्वावलंबी झाल्या दिसून येत आहेत. एकूण स्वयंसहाय्यता गटांमुळे आज महिलांचे आर्थिक सक्षमीकरण झालेले दिसून येते.

**३. महिला स्वयंसहायता गटातून महिलांचा सामाजिक विकास**

स्वयंसहाय्यता बचत गट आणि ग्रामीण भागाचा विकास करण्यात व ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी केलेली आतापर्यंतची कामगिरी खरोखरच उत्साहवर्धक व वाखाणण्याजोगी आहे. आज या गटांमध्ये सहभागी असणाऱ्या महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन नेतृत्वगुणांचा विकास झालेले चित्र समाजात दिसून येते. आत्मविश्वासामुळे महिला केवळ आर्थिक विकासाची नव्हे तर स्वव्यक्तिमत्त्व विकासाची कास धरून चालल्या आहेत. अन्यायाविरुद्ध लढताना दिसत आहेत. समाजातील वाईट चालीरिती व परंपरा मोडून काढण्यातही गटाच्या महिला सदस्या अग्रेसर आहेत. उदा. दारूबंदी. स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी अगदी बचत गटात नाव नोंदवूण्यापासून बँकांचे अनुदान मिळवून विकास करीत आहेत. बऱ्याच ग्रामीण भागात असे चित्र दिसून येते की, स्वतःच्या गावचा विकास करण्यासाठी श्रमदानाने रस्ते बांधणी करीत आहेत. स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करीत आहेत. काही दुर्गम भागात एस.टी. बसेस सुरू करण्यासाठी आंदोलन करून एस.टी. सेवा सुरु करण्यापर्यंत गटातील महिलांनी मजल मारली आहे. त्याचप्रमाणे गावातील ग्रामपंचायत प्रजासत्ताक व स्वातंत्र्यदिनी उपस्थित राहणे, गावातील लोकांसाठी आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिराचे आयोजन करणे, वृक्षलागवड करणे इ. कामात बचत गटातील महिलांचा सक्रिय सहभाग दिसून येत आहे. समाजासाठी काही करण्याची संधी महिलांना मिळालेली आहे. आत्मविश्वास व आत्मबळामुळे समाजात अस्तित्वात असणाऱ्या अनेक प्रश्नांची जाणीव त्यांना झाल्यामुळे उपाययोजनेसाठी विचार प्रणालीने आकार घेतला आहे. सामाजिक विषयांवर आवाज उठविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण झालेले दिसते. एकूण त्यांच्यात हे परिवर्तन घडून येण्यासाठी स्वयंसहायता गटाचा हातभार एवढा मोठा आहे की, स्त्रियांची स्वयंविकासाकडून सामाजिक विकासाकडे वाटचाल होऊ लागली आहे असे चित्र समाजात दिसून येते.

**४. महिला स्वयंसहायता गटातून महिलांचा राजकीय विकास**

१९५७ साली पंचायत राज्याकरिता नेमलेल्या बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार १ मे १९६५ रोजी महाराष्ट्रात त्रिस्तरीय योजना -जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निर्माण करण्यात आली व १९९०-९४ मध्ये ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करून महिलांना ३३% जागांवर आरक्षण देण्याचे विधेयक तयार करण्यात आले. या आरक्षणामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे. सध्या महाराष्ट्रात महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सरपंच, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, महापौर इ. पदांसाठी ५० टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे व ही पदे अगदी प्रभावीपणे राबविताना महिला वर्ग दिसून येत आहे. याला काही प्रमाणात का असेना स्वयंसहाय्यता गटाचा आधार आहे. कारण असे की ग्रामीण भागातील महिला चूल व मूल मध्ये गुरफटलेल्या असताना स्वयंसहाय्यता गटांमुळे त्यांच्यात आत्मविश्वास व नेतृत्वाचा विकास होत आहे व याच आत्मविश्वासाच्या जोरावर महिला राजकारणात सक्रिय होताना दिसत आहेत. यातून स्त्रियांच्या विकासाच्या संधीला महत्त्वाकांक्षेचे पंख फुटलेले दिसतात.

राजकारणात जाऊन स्त्रिया केवळ पदं भूषवीत नाहीत तर स्थानिक आरोग्याच्या समस्या, पायाभूत सुविधा, महिला सुरक्षितता, स्त्री-भ्रूणहत्या, दारूबंदी, बचत गटांच्या विकासासाठी योजना, महिला अत्याचाराविरोधात निर्भया मोहीम अशा अनेक समस्यांवर आवाज उठवून न्याय मिळेपर्यंत लढताना दिसत आहेत. एकूणच स्त्रियांचा राजकारणातील सहभाग याविषयीच्या विरोधाला स्त्रियांनी एक शक्ती बनवण्यात यश मिळवले आहे. सध्याच्या वर्तमान परिस्थितीत वरिष्ठ स्तरावर पक्षात स्त्रियांच्या बुद्धी, परिश्रम, वेळेचा सदुपयोग करून घेतला तर असे वाटते की त्याचा देशाच्या विकासास नक्कीच हातभार लागेल.

**निष्कर्ष**

1. स्वयंसहायता समूह गटातील महिला सदर सदस्य वैयक्तिकरीत्या तथा सामूहिकरीत्या परिश्रमपूर्वक कार्यरत असल्यामुळे त्यांना व्यवसायात नफा अधिक झाल्याचे दिसते.
2. महिला सदस्यांना गटातील सामूहिक व्यवसायामुळे कौटुंबिक अडचणींवर मात करता आली आहे व कौटुंबिक स्वास्थ्य टिकवता आले आहे.
3. महिला सदस्यांची सामाजिक प्रतिष्ठा उंचावण्यासाठी स्वयंसहाय्यता गटातील सहभाग कारणीभूत ठरलेला आहे असे दिसते.
4. महिला स्वयंसहायता समूह गट स्थापन करण्यात शासन, स्वयंसेवी संस्था, नाबार्ड इत्यादींचा सहभाग असल्याने महिला सदस्यांना मिळणाऱ्या प्रशिक्षणातून उद्योग, व्यवसाय यशस्वीपणे चालविताना दिसतात.
5. स्वयंसहाय्यता गटातील कार्याबरोबरच इतर सामाजिक कार्यातही महिला सदस्यांचे महत्त्वाचे योगदान असल्याचे दिसून येते. त्यामुळे महिलांचा सामाजिक विकास झाला आहे.
6. महिला स्वयंसहायता समूह गटातील महिलांची संख्या वाढत असून महिला आत्मनिर्भर बनलेल्या आहेत
7. महिला सदस्या आर्थिक व्यवस्थापन उत्कृष्टपणे करू शकतात.
8. महिला स्वयंसहाय्यता गटातील महिलांचा व्यसनमुक्ती, आरोग्याबाबत जागरूकता, ग्रामसभेमध्ये सहभाग, पोषण आहार, वैयक्तिक व परिसर स्वच्छता, इ. सामाजिक कार्यात सहभाग दिसून येतो.
9. महिलांच्या नेतृत्वगुणांचा विकास झाल्यामुळे त्याचा पंचायत राजमध्ये सहभाग वाढत आहे.
10. महिलांचा स्वयंसहाय्यता समुह गटातील सहभागामुळे वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय एकूणच सर्वांगीण विकास झालेला दिसून येतो.

**समारोप**

स्वयंसहायता समूह गट हे महिलांसाठी एक वरदान ठरलेले आहे. या गटामुळे महिलांचा केवळ आर्थिक विकास झालेला नाही तर त्यांच्यात संघटन, आत्मविश्वास, अनुभवाची निर्मिती झाली आहे. एवढेच नव्हे तर हे गट स्त्रियांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय उन्नतीचे एक उत्तम माध्यम आहे. गटांमुळे महिलांचे संभाषण कौशल्य, नेतृत्वगुण, आत्मसन्मान वाढीस लागून शासकीय यंत्रणेमधीलही दुरावा कमी झाला आहे. त्यांच्यातील गतिशीलता वाढीस लागली आहे. एकूणच पाहता या उपक्रमातून कुटुंब, समाज व राष्ट्राच्या प्रगतीस हातभार लागला आहे.

संदर्भ सूची

1. प्रा.एम.यु.मुल्लाणी, अल्पबचत नियोजन
2. काटोले रविंद्र, महिला बचत गट मार्गदर्शिका
3. दैनिक लोकसत्ता, चतुरंग वर्धापन विशेष
4. Micro Finance World, Jan - Mar 2010, The Indian Express Limited, Mumbai.
5. Hand Book on SHG, NRLM, Govt. of India
6. http://www.maharashtra.gov.in.
7. www.nrlm.gov.in
8. https://mr.vikaspedia.in/social-welfare
9. https://www.nabard.org/content1.aspx?id=518&catid=8&mid=489
10. https://www.lokmat.com/kolhapur/movement-womens-savings-groups/

# महिला ग्रा.प. लोकप्रतिनिधीच्या विकासात मागासक्षेत्र अनुदान निधीची भूमिका

*प्रा. सोनवणे एस.एम.*[1] *डॉ. कालिदास भांगे*[2]

[1]*संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ] औरंगाबाद*

[2]*मार्गदर्शक, समाजशास्त्र विभाग श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय] देवगाव रंगारी] औरंगाबाद*

**प्रस्तावना**

भारतातच नव्हेतर जगभरात सर्वत्र कमी अधिक प्रमाणात महिलांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते- तेव्हा महिलांना समान संधी देवून सामाजिक] आर्थिक] राजकीय आणि सार्वजनिक जीवनात समता प्रदान करणे आवश्यक आहे- महिला सबलिकरणाच्या प्रक्रियेत ज्या विविध बाबी महत्त्वपूर्ण आहेत त्यातील सर्वाधिक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे महिलांचा राजकीय सत्ता आणि निर्णय प्रक्रियेतील एकसमान सहभाग आणि त्यासाठी स्त्रियांना विशेष संधी देण्याची आवश्यकता आहे- अशी विशेषसंधी राजकीय आरक्षणाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न भारतात ७३ व्या घटना दुरुस्तीने झालेला दिसतो- त्यामूळे राजकीय क्षेत्रातील महिलांच्या सहभागामध्ये संख्यात्मक वाढ झाली परंतु प्रत्यक्षात निर्णय प्रक्रियेत त्याचा सहभाग वाढला आहे का \ हा प्रश्न महत्त्वाचा आहे-

भारतीय समाज जीवनातील पारंपरिक श्रम विभाजनाच्या तत्वाचा विचार करता असे आठवते की] ^चुल व मुल* हे स्त्रीचे कार्यक्षेत्र व घराबाहेरील कामे पुरुषांकडे हे श्रम विभाजनाचे सुत्र होते- एका अर्थाने हे एक प्रकारचे लिंगाधिष्ठित सु{e स्तरीकरण होते जे जाती सदृश्य आढळते- लिंगाच्या आधारे स्त्रीला अर्पित कनिष्ठ दर्जा देऊन वर्षानुवर्षे गतीमत्व नाकारल्या गेल्याचे चित्र दिसते- भारताच्या संविधानाने सर्व व्यक्तींना समानता बहाल केली घटनेच्या १५ व्या कालमानुसार स्त्री पुरुषभेद घटनात्मकरित्या नष्ट करुन स्त्रीच्या उद्धाराला चालना दिली गेली- पुढे वेगवेगळया तरतुदी आणि विधेयकाद्वारे समाजाच्या विविध क्षेत्रातील लिंगाधिष्ठित विषमता नष्ट केली यास ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीकडे स्थानिक स्वराज्य संस्थात महिलासाठी ३३ टक्के आरक्षण आले आणि मोठ्या प्रमाणात स्त्रीयांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग वाढण्यास चालना मिळाली-

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याने स्थानिक स्वराज्ये संस्थामध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण ठेवून खऱ्या अर्थाने राजकीय क्षेत्रातील उपेक्षितांचे जीवन जगणाऱ्या लोकसंख्येतील जवळपास अर्ध्या घटकांला राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेऊन सत्तेत प्रत्यक्ष हक्काचा वाटा दिला यामूळे केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक क्षेत्रातही बदल होत आहेत- तेव्हा सत्ता] अधिकार यांचा वापर महिला योग्य पद्धतीने करतात का यासाठी ग्रा- प- महिला लोकप्रतिनीधी यांच्या विकासातील मागासक्षेत्र अनुदान निधी या योजनेचा अभ्यास करण्या आला-

मागासक्षेत्र अनुदान निधी (B-R-G-F) Backward Regions grant Fund Program कार्यक्रम पंचायतराज मंत्रालयाने २००६&०७ या वर्षापासून केला होता भारतातील जिल्हा मानव विकास निर्देशांकाच्या साह्याने भारतातील २५० जिल्ह्याना पंचायतराज मंत्रालयाने मागास क्षेत्र म्हणून घोषीत केले- यामध्ये महाराष्ट्रातील बार जिल्हयात हा कार्यक्रम घोषीत केले- यामध्ये महाराष्ट्रातील बार जिल्हयातील हा कार्यक्रम राबविण्यात आला- ७३ आणि ७४ व्या घटना दुरुस्तीला अपेक्षित असणारे स्थानिक पातळीवरील नियोजन ग्रामीण भागातील पंचायतराज सदस्याच्या सक्रिय सहयाच्या अभावाने अनेक प्रकारच्या ग्रामीण विकासाच्या योजनाना हवा जसा विकास साधता आला नाही- ग्रामीण भागातील समाज व्यवस्था] निरीक्षरता इ- बाबी त्याला कारणीभूत ठरवतांना दिसतात- पंचायतराज सदस्याचे सक्षमिकरण त्यांच्यात ज्ञान] कौशल्य आणि क्षमता वृद्धी झाल्याशिवाय ग्रामीण नियोजनाला फारसा अर्थ राहात नाही हीच बाब विचारात घेवून B-R-G-F या योजनेच्या माध्यमातून ग्रा- प- लोकप्रतिनिधीना प्रशिक्षण देण्यात आले त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिला लोकप्रतीनिधीच्या भूमिकेत काय बदल झाला हे पाहाणे आवश्यक आहे-

**संशोधन पद्धती**

ग्रामपंचायत महिला लोकप्रतिनिधीच्या विकासात मागासक्षेत्र अनुदान निधीची (B-R-G-F) ची भूमिका* हा शोध निबंध लिहण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला-

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे- प्राथमिक साधनामध्ये मुलाखत अनुसुची] निरिक्षणाचा अवलंब करण्यात आला आहे- तर दुय्यम साधन सामग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ] मासिक] वृत्तपत्र व इंटरनेटचा आधार घेण्यात आला आहे-

**नमुना निवड**

प्रस्तुत शोध निबंधासाठी औरंगाबाद तालुक्यातील आठ (08) ग्रामपंचायतधील ३० ग्रामपंचायत महिला सदस्याची गैरसंभाव्यता नमूना निवड आर्तगन सहेतूक नमूना निवड पद्धतीने नमुना म्हणून निवड करण्यात आली-

**१- संशोधनाची उदीष्ट्ये**

१-महिला लोकप्रतिनिधीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे-

२-ग्रामपंचायत निर्णय प्रक्रियेतील महिला लोकप्रतिनिधीच्या सहभागाचा अभ्यास करणे-

३-मागासक्षेत्र अनुदाननिधी (B-R-G-F) अंर्तगत दिलेल्या प्रशिक्षणातून महिला लोक&प्रतिनिधीतील समतावृद्धी वाढीचा अभ्यास करणे-

**गृहितके**

१-मागासक्षेत्र अनुदाननिधी प्रशिक्षणातून महिला लोकप्रतिनिधीच्या ज्ञान] कौशल्य आणि क्षमताचा विकास झाला आहे-

२-ग्रामपंचायत निर्णय प्रक्रियेत महिला सदस्याचा सहभाग वाढला आहे-

३-ग्रामपंचायत लोकप्रतिनिधीना आपल्या अधिकाराची जाणीव झाली आहे-

राजकारण हे मुलत% पुरुषाचे कार्यक्षेत्रा आहे अशी धारणा असणाऱ्या समाजामध्ये राजकारणात स्त्री व पुरुष त्यांना बरोबरीचा सहभाग असावा ही बाब आता सर्वसामान्य होत आहे- नव्हे पंचायतराज व्यवस्थेमधील महिलासाठीच्या आरक्षणामुळे या बाबींवर कायदेशीर मान्यता प्राप्त होऊन महिला आरक्षण धोरणाचा परिणाम म्हणून सद्यस्थितीत पंचायतराज व्यवस्थेत किमान ५० टक्के महिला लोकप्रतिनिधी निवडून आलेल्या आहेत असे असले तरी अप्रत्यक्षरीत्या आपले वर्चस्व कायम राहावे या करिता पुरुष राजकारण्यानी आपल्या कुटुंबातील महिलांना संधी दिली आहे- असे असले तरी प्रत्यक्ष सत्तेत सहभागी झाल्यानंतर त्यांचा अनुभव काय त्यांना पडणारे प्रश्न हे शोधण्याचा प्रयत्न या शोध निबंधात घेण्यात आला-

मागासक्षेत्र अनुदान निधी (B-R-G-F) या योजनेच्या माध्यमातून केद्रशासनाच्या पंचायतराज मंत्रालयाच्या व राज्यशासनाच्या ग्रामविकास विभागाच्या सक्रीय पाठिब्यातून ग्रामपंचायत लोकप्रतिनिधीना पायाभरणी प्रशिक्षणात देण्यात आले- यातून क्षमतावृद्धी करुन त्यांना त्यांच्या अधिकाराची व कर्तव्ये याची माहिती करुन देण्यात आली- लोकसहभागी ग्रामविकास आराखडा व त्याला अनुसरुन इतर साधनाची माहिती व्हावी हा हेतू या प्रशिक्षणाचा होता- या अनुषंगाने महिला लोकप्रतीनिधीना प्रश्न विचारण्यात आला-

आपण घेतलेल्या प्रशिक्षणातून आपणाला आपल्या अधिकाराची ओळख झाली का

| होय | उत्तरदाते २३ | टक्के ७६-५ |
|---|---|---|
| नाही | ०२ | ६-५ |
| काही प्रमाणात | ०५ | १६-६६ |
| एकूण | ३० | १०० |

महिला उत्तरदात्यांना जेव्हा हा प्रश्न विचारला तेव्हा ७६-५ टक्के उत्तरदात्यांनी आम्हाला आमच्या अधिकाराची ओळख झाली असे सागितले उत्तरदाते हे प्रशिक्षण घेतलेलेच निवडले होते- परंतु त्यातील ६-५ टक्के उत्तरदात्यांनी नाही हे उत्तर दिले काही प्रमाणात ओळख झाली १६-६६ टक्के लोकप्रतिनिधीवर सांगितले-

प्रशिक्षणाच्या माध्यमातून ग्रामपंचायत काय आहे- यांची ओळखात्यांना प्रशिक्षणातून झाली आपल्या पदाला किती महत्व आहे- हे त्यांना समजले-

२- प्रशिक्षणाचा आपणाला काय फायदा झाला-

| | | |
|---|---|---|
| अधिकार समजले | १२ | ४० |
| ग्रा.प. कामकाजाची माहिती मिळाली | 07 | 23-5 |
| योजनांची माहिती मिळाली | 11 | 36-5 |
| एकूण | 40 | 100 |

प्रशिक्षणाचा आपणाला काय फायदा झाला हा प्रश्न जेव्हा विचारण्यात आला तेव्हा ४० टक्के उत्तरदात्यांनी आम्हाला आमचे अधिकार समजले असे सागितले २३-५ उत्तर दात्यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजाची माहिती मिळाली असे सांगितले ३६- ५ उत्तरदात्यांनी योजनाची माहिती मिळाली असे सांगितले आजही ग्रामीण भागात शासनाच्या योजनाची पुरेपूर माहित नागरीकापर्यंत पोहचत नाही ग्रामपंचायती मार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनाची माहिती लोकप्रतिनिधीना समजली तेव्हाच तो आपल्या वाडीतील लाभार्थ्यांपर्यंत योजना घेवून जावू शकतो-

३- आपण मासिक सभांना हजर राहता काय\

ग्रामपंचायतमध्ये मासिक सभाना महिला लोकप्रतीनिधीची उपस्थिती असते का\ हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे- त्या अनुषंगाने कामकाजातील उपस्थिती जाणून घेण्याच्या उद्देशाने आपण मासिक सभाना हजर राहता काय हा प्रश्न विचारण्यात आला

| | | |
|---|---|---|
| होय | २४ | ८० |
| नाही | ०६ | २० |
| एकूण | ३० | १०० |

महिला लोकप्रतिनिधींना हा प्रश्न विचारल्यानंतर ८० टक्के महीला सदृश्य म्हणाल्या प्रशिक्षणानंतर आम्ही मासिक सभांना हजर राहतो परंतू 20 टक्के महिला सदस्य अद्यापही मासिक सथांना हजर राहात नाही कारण त्यांना सभेची नोटीस किंवा माहिती त्यांच्यापर्यंत पोहचत नाही सहा मासिक सभांना गैरहजर राहिल्यास सदस्यत्व रद्द होते हेही त्यांना माहित नाही-

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 7 नुसार ग्रामसभेचे आयोजन करावे लागते वर्षातून किमान सह (06) ग्रामसभा होणे बंधनकारक आहे- ग्रामसभेच्या एक दिवस अगोदर गावात महिलांची महिला ग्रामसभा घेणे आवश्यक आहे या सभेत महिलांच्या प्रश्नावर चर्चा होते- तेव्हा उत्तरदात्यांना हा प्रश्न विचारण्यात आला-

4-ग्रामसभेच्या एक दिवस अगोदर महिला ग्रामसभा होते का\

| | | |
|---|---|---|
| होय | 27 | 90 |
| नाही | 03 | 10 |
| एकूण | 30 | 100 |

जेव्हा हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा 90 टक्के लोकप्रतिनिधी गावातील ग्रामसभेच्या अगोदर गावात महिला ग्रामसभा होते असे सागितले परतूं 10 टक्के सदस्यांनी सांगितले गावात ग्रामसभा होत नाही ग्रामसभेत गावातील महिलांची उपस्थिती पाहिजे त्या प्रमाणात राहात नाही म्हणून फक्त सहयाच घेतल्या जातात असे सांगितले-

**5**-सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असतांना महिलांना विविध प्रकारचे बरेवाईट अनुभव येत असतात- महिलांना दुय्यम स्वरुपाची वागणूक दिली जाते असे चित्र सर्वत्र कमी अधिक फरकाने दिसते तेव्हा याबाबत महिला लोकप्रतिनिधीचे मत काय हे जाणून घेण्यासाठी आपणाला पुरुष सदस्याकडून सन्मानपूर्वक वागणूक मिळते का\ हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा

| | | |
|---|---|---|
| होय | 22 | 73-5 |
| नाही | 2 | 6-5 |
| काही izek.kkr | 6 | 20 |
| एकूण | 30 | 100 |

जेव्हा हा प्रश्न विचारण्यात आला तेव्हा 73-5 टक्के लोकप्रतिनिधी सागितले सन्मानपूर्वक वागणूक मिळते- परंतू आजही 6-5 सदस्यांनी सांगितले सन्मानपूर्वक वागणूक मिळत नाही 20 टक्के महिला लोकप्रतीनिधीनी सांगितले काही प्रमाणात

सन्मानपूर्वक वागणूक मिळते महिलांना हक्काबरोबर त्याचा आत्मसन्मान राखला पाहिजे- समाजांचा जोपर्यंत स्त्रीयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणार नाही तोपर्यंत त्यांना आत्मसन्मानाने जगता येणार नाही-

6-कोणत्याही क्षेत्रात काम करीत असतांना प्रत्येक व्यक्तीला बरेवाईट अनुभव येत असताना त्याला राजकीय क्षेत्र अपवाद असल्याचे कारण नाही- ग्रामपंचायतमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून काम करी असतांना त्याच्या अनुभवातून राजकारणाबद्दल त्याची काही मते बनतात- स्वत%च्या मताप्रमाणे काम करता आले नाही किंवा सन्मानपूर्वक वागणूक मिळाली नाही- तेव्हा हे जाणून घेण्यासाठी पुन्हा निवडणूकीला उभे राहण्याची इच्छा आहे का \ प्रश्न विचारण्यात आला-

| | | |
|---|---|---|
| होय | 13 | 43-5 |
| नाही | 7 | 23-5 |
| सांगता येत नाही | 10 | 24 |
| एकूण | 30 | 100 |

महिला लोकप्रतीनिधीनी या प्रश्नांचे उत्तर देतांना 43-5 उत्तरदात्यांनी सांगितले होय 23-5 नाही- 33 टक्के उत्तरदात्यांना सागता नाही आले- की परत निवडणूकीला उभे राहण्याची इच्छा आहे कींवा नाही त्यावरुन हे लक्षात येते त्याच्या निर्णय त्याच्या घरातील पुरुषावर अवलंबून आहे-

**निष्कर्ष**

महाराष्ट्रात पंचायतराज मध्ये महिलांच्या सहभागाला खऱ्या अर्थाने चालuk मिळाली 73 व्या संविधान दुरुस्तीमूळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत अमुलाग्र बदल होऊन पंचायतीराजला सवैधानिक दर्जा प्राप्त झाला- सविधानामध्ये 11 वे परिशिष्ट जोडून 29 विषयाची सूची जोडण्यात आली- त्यानूसार भारतभर पंचायतराज व्यवस्थेत महिलांसाठी 33 टक्के आरक्षण होऊन त्यास घटनात्मक दर्जा प्राप्त झाला महाराष्ट्रात 1992 पासून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या नियमित निवडणूका वित्त आयोग यामूळे पंचायतराज व्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली- 09 मार्च 2011 रोजी महिलांना पंचायतराज व्यवस्थेत 50 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या राज्य मंत्रीमंडळाने घेतला राज्य विधीमंडळाने 14 एप्रिल 2011 रोजी हे विधेयक संमत केले आणि 2012 मध्ये पंचायतराज सार्वत्रिक निवडणूका झाल्या आणि पंचायतराज व्यवस्थेमधील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी म्हणून महिलांचा सहभाग 50 टक्क्याहून अधिक वाढला त्यामूळे एका नवीन परिवर्तनाला सुरुवात होऊन स्थानिक पातळीवरील महिलाच्या राजकीय सहभागामूळे भारतीय लोकशाही अधिक मजबूत आणि व्यापक होण्यास मदत झाली प्रत्यक्ष महिला लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असतांना कोणते अनुभव आले- याचा शोध या शोध निबंधात घेण्यात आला-

**1-** प्रशिक्षणातून आपणाला आपल्या अधिकाराची ओळख झाली का तेव्हा 76-5 महिला सदस्यांनी ओळख झाली असे सांगितले त्याचबरोबर 6-5 नाही असे सांगितले काही प्रमाणात ओळख झाली असे 16-6 उत्तरदात्यांनी सांगितले- या नवीन बदलाच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आपल्या अधिकाराची ओळख होणे गरजेचे आहे- तेव्हा प्रशिक्षणाच्या माध्यमातून घटनात्मक अधिकाराची ओळख त्यांना झाली-

2- प्रशिक्षणातून महिला लोकप्रतिनिधीना 40 टक्के अधिकार समजले असे सागितले त्याच बरोबर 23-5 कामकाजाची पद्धत समजली असे सांगितले 36-5 योजनाची माहीती मिळाली असे सांगितले सत्तेपासून आजपर्यंत स्त्रीया हया वंचित होत्या तेव्हा अधिकार कामकाजाची पद्धत योजनाची माहिती या सर्व घटकांचा परिचय त्यांना प्रशिक्षणातून झाला ग्रामपंचायमध्ये कामकरतांना प्रशिक्षणाच खर त्यांना गरज आहे- राजकीय सामाजिकरणाची प्रक्रि;k गतीमान होणे आवश्यक आहे-

3- ग्रामपंचायतीच्या सर्व जमा खर्चास मासिक सभेत मान्यता देण्यात येते- मासिक सभेना महिला लोकप्रतीनिधी हजर राहात नाही-असे सांगितले जाते- प्रशिक्षणात जेव्हा त्यांना विचारण्यात आले- तेव्हा 80 टक्के महिला लोकप्रतिनीधी मासिक सभेना हजर असता 20 टक्के हजर राहात नाही- कारण त्याच्यापर्यंत मासिक सभेची नोटीस किंवा पती हजर असतात असे निरीक्षणातून आढळून आले- महिलांचा राजकीय सहभागाबरोबर निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढत आहे-

4- ग्रामपंचायत मध्ये काम करीत असतांना बरे वाईट अनुभव किंवा राजकारण आपले क्षेत्र नाही असे बऱ्याच महिला सदस्याबाबत वाटते पून्हा निवडणूकीला उभे राहण्याची इच्छा आहे का हे जेव्हा विचारण्यात आले तेव्हा 43-5 महीलांनी होकार दिला तर 23-5 नाही म्हणाल्या 24 टक्के सदस्ये सागता येत नाही असे सांगितले-

प्रस्तुत शोध निबंधाच्या तथ्याच्या आधारे हे स्पष्ट होते की] स्त्रीयांना कोणत्याही क्षेत्रात संधी देवून सन्मापूर्वक काम करु दिले त्यांना त्याचे अविकार वापरु दिले तरच खऱ्या अर्थाने लोकशाहीची संकल्पना बळकट होण्यास मदत होईल प्रशिक्षणातून त्याना घटनेने अधिकार दिलेले आहे त्यांच्या पदाचे अधिकार आणि कर्तव्ये याची ओळख ग्रामपंचायतीच्या कामकाजात सहभागाची संख्या अधिकार वापरण्यास सुरुवात झाली B-R-G-F- प्रशिक्षणातून महिला सक्षमिकरणाला गती प्राप्त झाली असेच म्हणावे लागेल-

**संदर्भ ग्रंथ**

१ . पंचायतराज समतावद्धी- श्रृखंला नवनिर्माण प्रकाशन खोकडपूरा औरंगाबाद

२ . मागासक्षेत्र अनुदाननिधी कार्यक्रम मार्गदर्शिका] पंचायतराज मंत्रालय भारत सरकार

३ . मागासक्षेत्र अनुदान निधी वाचनसाहित्य] यशदा पुणे] राजभवन आवार] बाणेर रस्ता पूणे

४ . मुलभूत कार्यात्मक प्रशिक्षण वाचनसाहित्य जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय-

# ग्रामीणांचे जमीन हक्क व भूसंपादन कायदा: स्थिती व वास्तव

*श्री. अनंत कदम[1] डॉ. सुभाष सावंत[2] प्रा. चंद्रप्रभा निकम[3]*

*[1]रिसर्च स्कॉलर, डी,एल, एल ई. मुंबई विद्यापीठ*

*[2]लो.गो.मुंडे महाविद्यालय, मंडणगड*

*[3]कॉलेज ऑफ सोशल वर्क, नाशिक*

संक्षिप्त :

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ आणि ३१ मध्ये संसाधंनांवरचा (जमिनी सहित) अधिकार देण्यात आला आहे. ३१व्या कलमामध्ये कोणालाही त्याच्या मूळ संसाधंनांवरून वंचित केले जावू नये असे म्हटले आहे. जमीन हा उपजीवेकेच्या साधंनामध्ये मूलभूत घटक आहे आणि तो घटक आपल्या हातून जावू नये अशी प्रत्येकाची इच्छा असते. गेल्या २० वर्षात सरकारी व खाजगी उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन झाले व सुमारे ५० दशलक्ष लोक बाधित झाले. महाराष्ट्राचा विचार केल्यास गेल्या १५ वर्षात १.९२ लाख हेक्टर जमीन संपादित केली गेली त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाद विवाद निर्माण झाले. काही अंमलणाजवणी मधील त्रुटी पुढे आल्या. निर्माण झालेले वाद स्थानिक, राज्य व सर्वोच्च न्यायालयात गेले व ते अनेक वर्षे निर्णायक पातळीवर पोहोचले नाहीत. या सर्व मुद्द्यांची मीमांसा करण्यासाठी हा संशोधन प्रयत्न आहे.

कळीचे शब्द :

भूसंपादन, वाद, विवाद, न्यायालये, सामाजिक, आर्थिक, विकास, सरकार, बाधित, भूमिहीन, भूधारक, धोरणे

उद्देश:

१. भुसंपादन प्रक्रिया व कायदे यांचा आढावा घेणे.
२. भूसंपादन व संबंधीत वाद विवादाचा परामर्श घेणे.
३. भूसंपादनामुळे झालेल्या परिणामांचा आढावा व ग्रामीण विकासातील त्याचे महत्व तपासणे.

प्रास्ताविक:

भारत देशाचा विचार करता गेल्या काही दशकात विकास प्रक्रिया राबवण्यासाठी राजकीय, आर्थिक व सामाजिक आव्हाने दिसतात. विकास प्रक्रिया जी आर्थिक विकास साधेलच परंतु ती सामाजिकदृष्ट्या सर्वसमावेशक, पर्यावरणीयदृष्ट्या निरंतर, राजकीय दृष्ट्या समर्पक आणि विशेष म्हणजे कायद्याच्या कसोटीवर कोणतीही तडजोड असणार नाही यावर आधारित असावी. सर्वसमावेशक विकासाचा विचार करताना हे मुद्दे निश्चितच महत्त्वाचे आहेत. विशेषत: विकासाच्या कार्यक्रमांचा –उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जमीन हा महत्त्वाचा घटक आहे. जमीन क्षेत्र वाढवता किंवा तयार करता येत नसल्याने तिच्या वापरासंबंधी खूप संवेदनशील व वास्तववादी दृष्टीने पाहायला हवे. सरकारे ही लोकांनी निवडून किंवा नियुक्त केलेली असतात व आपल्यावतीने त्यांनी विकासाची कामे करावीत व त्यासाठी लागणारे कठोर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य सरकारला असते. विकास प्रक्रिया व विकास करताना आवश्यक ते निर्णय हे कायद्याच्या कसोटीवर घेतले जावेत व आवश्यक ते कायदे करणे किंवा कायद्यात बदल करणे हे अधिकार देखील लोकप्रतिनिधी व सरकारला असतात. जमिनीच्या संदर्भात विचार करायचं झाल्यास भूसंपादन प्रक्रिया ही ज्यांची जमीन घेतली जाणार आहे व ज्या लोकहिताच्या किंवा वापराच्या उद्दिष्टांसाठी न्याय्य असावी व ते पहाणे सरकारची जबाबदारी आहे. गेल्या काही दशकांचा विचार करता भूसंपादन प्रक्रिया या नेहमी वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. या भूसंपादन प्रक्रियांमध्ये लोकहिताच्या किंवा सार्वजनिक हिताच्या सरकारच्या दृष्टीकोनावरच लोक. लोकसंघटना व चळवळी प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहेत.

जमीन संपादन आणि वाद विवाद

विकास प्रकल्पांसाठी सरकारकडून होणारे भूसंपादन हे बहुतांशवेळा वादाचेच राहिले आहे. जमीन हे साधन फक्त आर्थिक विकास व उपजीविकेच्या गरजा भागवण्याचे साधन नसून तो समाज घटकांची ओळख, इतिहास व संस्कृतीशी जोडलेला घटक आहे. गतकाळात विशेष म्हणजे भूसंपादन व संबंधित प्रक्रियांसंदर्भात विरोध व संघर्ष पुढे आला आहे. जी विरोधाची भूमिका समोर आली त्यामध्ये विशेषकरून धरणांसाठी भूसंपादन, विशेष आर्थिक क्षेत्र, गृहनिर्माण संकुले, औद्योगिक प्रकल्प आणि खनिज उत्खनन या संदर्भातील भूसंपादन या विरोधात असणारे संघर्ष हे अतिशय तीव्र स्वरूपाचे आहेत. स्वातंत्र्यपूर्व व त्यानंतरच्या काळातील सरकारांनी भूसंपादनासाठी विविध कायदे आणले. ब्रिटिश कालखंडात त्याची सुरुवात सन. १८२४ च्या 'बंगाल नियमन' या कायद्याने झाला. त्यानंतर १८९४ चा भूमी अधिनियम या कायद्याद्वारे ब्रिटीशांनी भूसंपादनासाठी विविष सरकारी प्रक्रियांचा अवलंब व प्रात्यक्षिके सुरू केली. हा कायदा विशेष करून ब्रिटिशांची सत्ता असलेल्या विभागांसाठी होता परंतु स्वातंत्र्यानंतर जम्मू कश्मीर या राज्याच्या स्वत:चा भूसंपादन कायदा असल्याने जम्मू काश्मिरला या कायद्याच्या कक्षेतून वगळले होते.

सन १९५०मध्ये भारत हे प्रजासत्ताक राज्य म्हणून घोषित झाले व जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना स्वीकारली गेली. या राज्यघटनेतील अनुच्छेद १३ (२) मध्ये ब्रिटिशकालीन विविध कायदे स्वीकारले गेले त्यामध्ये भूसंपादन कायदाही घेतला गेला. हे कायदे लोकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे नसल्याने विशेषत: भूसंपादन सारखा कायदा वेळोवेळी सुधारणाकरून लागू करण्यात आले जे गेल्या सुमारे १२० वर्षापासून अंमलबजावणीत आहेत.

भारतीय राज्यघटनेत मालमत्ता व संपत्ती बाळगणे, शाबूत ठेवण्याचा मूलभूत अधिकार अनुच्छेद ३१ मध्ये देण्यात आला होता व कलम ३२ व ३५ नुसार आपला मूलभूत अधिकार डावलला गेला असे वाटल्यास त्या व्यक्तिला न्यायालयात दाद मागण्याचा/ तक्रार करण्याचा घटनात्मक अधिकार होता. परंतु लोकोपयोगी कामांसाठी वा प्रकल्पांसाठी भूमी अधिग्रहण कायद्याला कलम ३१ हे सरकारे व राजकीय आस्थापणांसाठी अडचणीचे होते. या तरतुदींमुळे जमीन भूसंपादन बाधित लोकांना अशातऱ्हेच्या भूसंपादनाला विरोध करण्याचा घटनात्मक अधिकार होता त्यामुळे १९७८ मध्ये हे कलम ४४ व्या घटना दुरुस्तीद्वारे वगळण्यात आले. परंतु त्याचा समतोल राखण्यासाठी घटनेच्या कलम ३०० अ मध्ये कोणत्याही व्यक्तिला त्याच्या मालमत्ता व संसाधंनांपासून वंचित केले जाणार नाही असे नमूद करून एखादी मालमत्ता संपादनाची गरज असल्यास योग्य भरपाई देण्याची व्यवस्था केली गेली. कलम ३१ वगळण्याची कृती वादग्रस्त ठरली होती परंतु सर्वोच्च न्यायालयाने त्याचा योग्य अर्थ लावून व हस्तक्षेप करून भरपाईची व्यवस्था निश्चित केली. अर्थात या भरपाईचे निकष व उद्देश यावर अजूनही विचार मंथन होण्याची गरज आहे.

<u>जमीन हा विषय कोणाचे अधिकार क्षेत्र</u>

भारतीय राज्य घटनेच्या सातव्या अनुच्छेदात केंद्र व राज्य सरकारचे कायदेशीर अधिकार विभागून देण्यात आलेले आहेत. भारताच्या संघराज्यीय रचनेत जमीन हा विषय राज्याच्या कार्यकक्षेत येतो त्यामुळे विविध राज्यातील जमीन व भूसंपादन नियम व प्रक्रिया विभिन्न स्वरुपाच्या आहेत.

<u>विकास धोरणे व जमीन हक्क कायदे</u>

गेल्या सत्तर वर्षाच्या कालखंडात केंद्र व राज्य सरकारांनी आर्थिक विकास साधण्यासाठी विविध डावपेच आखले व विकासाचा मूळ श्रोत जमीन हा असल्याने तिच्या संपादनासाठी विविध प्रकारचे भूसंपादन कायदे विविध राज्यांमध्ये व केंद्रशासित प्रदेशात लागू करण्यात आले. जमीन हक्क शाबूत रहावेत म्हणून विविध जमीन सुधारणा कायदे कायदे करण्यात आले यामध्ये जमीनदारी निर्मूलन, कृषिसुधारणा, शहर नियोजन, झोपडपट्टी मान्यता व विकास, निर्वासितांचे पुनर्वसन इ. कायद्यांच्या माध्यमातून प्रयत्न झाले. त्यातील काही कायदे आजही लागू आहेत त्यामध्ये भूसंपादन कायद्याचा उल्लेखही करता येईल. भूसंपादन कायद्यात १९८४ मध्ये विशेष सुधारणा करण्यात आल्या.

सन १९९१ मध्ये भारत सरकारने आर्थिक सुधारणा धोरण स्वीकारले व उदारीकरणाची प्रक्रिया व्यापक केली. परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सरकारने विविध उद्योगातील व क्षेत्रातील स्वत: ची निर्गुंतवणूक करायला सुरुवात केली. १९९९ मध्ये स्वतंत्र निर्गुंतवणूक मंत्रालय सुरू करण्यात आले व सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील आपली गुंतवणूक काढून घेवून सरकारी उद्योगात खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यात आली. उदारीकरणाच्या रेट्यात खाजगी गुंतवणुकीला अडसर ठरतील असे नियम, तरतुदी व कायदे शिथिल करण्यात आल्या. भूसंपादन कायदयामध्येही २००७ मध्ये काही तरतुदी गाळण्यात आल्या. या दरम्याने विविध चळवळी व आंदोलनांच्या माध्यमातून जमीन तंटे व वाद समोर येवू लागले व त्याचे कारण होते विशेष आर्थिक क्षेत्र कायदा २००५ यातील जमीन संपादन तरतुदी व खाजगी उद्योगांना भूसंपादनासाठी दिलेले अधिकार. जमीन अधिकारासंबंधी व कायद्याच्या विरोधात वाढणारा दबाव यामुळे सन. २००७ साली भूसंपादन कायद्यात सुधारणा करण्यात आल्या व पुढे त्याचे रूपांतर 'उचित नुकसान भरपाईचा हाक आणि भूसंपादन, पुनर्वसन व पारदर्शकता कायदा २०१३ (Right to Fair Compensation and Transparency in Land acquisition, Rehabilitation and Resettlement Act 2013) मध्ये लागू करण्यात आला.

<u>भूसंपादन व संघर्ष</u>


भूसंपादन आणि वाद हे काही भारतीय परीक्षेपात नवखे विषय नाहीत. अशा वडांवर 'हक्क आणि संसाधन संस्था' (Rights and Resource Institute) या आंतरराष्ट्रीय संस्थेने २०१३ व २००१४ दरम्याने प्रथम संशोधन करून भारतातील १/३ क्षेत्रात जमिनीचे राजकीय व कायदेशीर स्तरावर वाद वाढत असल्याचे नमूद केले आहे. सुमारे १६३ प्रकारचे वाद हे जमीन संपादना संदर्भातील शासना सोबत आहेत असे अहवाल सांगतो.

<u>भारतातील भूसंपादन आणि न्यायलयीन विवाद</u>


भूसंपादन आणि त्या संदर्भातले विवाद हे विरोध व न्यायलयीन माध्यमातून लढले जातात. आजही बरेचसे वाद अनेक वर्षे न्यायालयात प्रलंबित आहेत. काही भूसंपादन बाधित लोक वर्षानुवर्षे न्यायालयांचे उंबरे झिजवत आहेत. न्यायालयीन प्रक्रियेतील विलंबामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होतेच परंतु मानसिक त्रास देखील सहन करावा लागतो. कायदे व ते तंतोतंत पाळण्याची भूमिका अंमलबाजवणी यंत्रणेकडून यायला हवी तरच त्यांचा अर्थ आहे. हक्क आणि संसाधन संस्थेने अभ्यास केलेल्या केंद्रशासीत प्रदेशातील १५ व राज्यांच्या पातळीवरील भूमी संपादन व्यवहारावरील अभ्यासात (एकूण

वाद १२६९ केसेस) ८७% विवाद हे भूसंपादनाशी निगडीत आहेत. ज्या निवड्यांची न्यायालयात सुनावणी झाली त्या निवाड्यांचे किश्लेषण पुढील प्रमाणे:

केंद्र व राज्यस्तरावरील कायदेशीर निवाड्यांची संख्या:





एकूण सर्वोच्च न्यायालयातील कायदेविषयक याचिकांची संख्या





<u>इतर विवाद व जमीनीसंदर्भातील  निकाल यांचे विश्लेषण</u>

न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारींचा निवाडा लवकर लागत नाही हा सर्वसामान्य अनुभव आहे. गेल्या ७ दशकांचा विचार केल्यास जमिनीसंदर्भात न्यायालयीन तक्रारींची व निवड्यांची स्थिती पुढील प्रमाणे:




न्यायालयाचे निकाल व त्यांची संख्या ही प्रत्यक्ष पुरावेव सादरीकरण यावर अवलंबून असतात. १९९०ते ९९ या दशकात निवाड्यांची संख्या साधारणपणे जास्त दिसते. इथे एक नमूद करावेसे वाटते ते म्हणजे याच दशकात भारताने खुले आर्थिक धोरण व जगतिकीकरणाचा स्वीकार केला होता. बऱ्याच कलावधीत विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पांसाठी भूसंपादन जोर धरत होते व जमीन विषयक तंटे वाढत होते.

जमीन भूसंपादनाच्या प्रक्रियेत संदर्भात झालेल्या विविध अभ्यासांमध्ये भूसंपादन प्रक्रिया १९७० ते १८० या दशकात मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे:




गेल्या सात दशकांमध्ये वरील भूमिसंपादनाच्या प्रक्रियेत तयार झालेल्या वादांचे व न्यायालयीन निवाड्यामध्ये जी अनियमितता किंवा दोष आढळले त्याची वर्गवारी व टक्केवारी पुढीलप्रमाणे.




**नवीन भूसंपादन कायदा २०१३**

भारत सरकारने २०१३ मध्ये जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत कायदा २०१३ लागू केला व या कायद्याने ब्रिटिश कालीन भूसंपादन कायदा १८९४ चा कायदा आपोआपच रदबदलात आला. या कायद्याद्वारे भूसंपादनातील पारदर्शकता, पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रक्रिया चोख होईल अशी सरकारची अपेक्षा आहे. या कायद्यात ज्या तरतुदी / बाबी आहेत त्यातील काही ठळक बाबी खालील प्रमाणे:

- या कायद्याद्वारे सार्वजनिक व खाजगी भागीदारी प्रकल्पासाठी भूसंपादनासाठी ७०% जमीनदारांची सहमती व खाजगी संस्थांच्या प्रकल्पांसाठी ८०% जमीनदारांची ना हरकत असावी लागते. परंतु ही अधिसूचना लोकसभेत मंजूर करताना संरक्षण, ग्रामीण संरचना, परवडणारी घरे, उद्योग कोरिडोर, सार्वजनिक व खाजगी भागीदारीतील सोईसुविधा प्रकल्पांसाठी ही तरतूद लागू नाही.
- बाजार भावाच्या चार पट नुकसान भरपाई.
- बाधित कुटुंबातील एका व्यक्तिला नोकरी नोकरीची सक्ती
- सामाजिक परिणाम मूल्यांकन करावे हा मुद्दा वगळला गेला.

- शेतकऱ्यांना जमीन संपादना विरोधात तक्रारी किंवा शंका असल्यास जिल्हास्तरावरील तक्रार निवारण कक्षाकडे दाद मागता येणार.
- आदिवासींची जमीन संपादित करण्यासाठी ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र लागू शकेल.
- 'खाजगी संस्था' या ऐवजी 'खाजगी उद्योग' ही परिभाषा
- उद्योग कोरिडोर जमीन संपादनासाठी हमरस्ता व रेल्वे यासाठी दोन्ही बाजूंनी एक किलोमीटर इतके मर्यादित केले.


**१९९४ व २०१३ च्या कायद्यात असणारे मूलभूत फरक**

| मुद्दा | १८९४ चा कायदा | २०१३ चा कायदा | २१४ चा अध्यादेश |
|---|---|---|---|
| बाधित लोकांची सहमती | तरतूद नाही | जमीन धारकांची सहमती गरजेची | संरक्षण, सुरक्षा तसेच ग्रामीण व शहरी सुविधांसाठी सहमती गरजेची नाही |
| सामाजिक परिणामांची तपासणी | तरतूद नाही | या कायद्याने अशी तपासणी अनिवार्य | संरक्षण, सुरक्षा तसेच ग्रामीण व शहरी सुविधांसाठी सहमती गरजेची नाही |
| ५ वर्षापर्यंत सबब कारणासाठी वापर झाला नाही तर ती जमीन परत करणे | तरतूद नाही | अपरिहार्य स्थितीत जिल्ह्यातील जास्तीत जास्त ५% संपादना एवढी जमीन ती ही दुबार पिक असेल अशी जमीन | संरक्षण, सुरक्षा तसेच ग्रामीण व शहरी सुविधांसाठी सहमती गरजेची नाही |
| अन्नसुरक्षेचा विचार | तरतूद नाही | हा निकष आहे | तरतूद नाही |
| स्थानिक स्वराज्य संस्थेची भूमिका | तरतूद नाही | जनसुनावणी व ग्राम सभेची मान्यता | तरतूद नाही |
| कोण भूसंपादन करू शकेल | तरतूद नाही | सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी कंपनी | सार्वजनिक क्षेत्रे, खाजगी कंपन्या आणि खाजगी संस्था |

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात म्हणजेच १९४७ पासून सुमारे ५० दशलक्षं एकर जमीन (भारताच्या एकूण जमीन क्षेत्राच्या ६% एवढे) संपादित किंवा परावर्तीत केली आहे. त्यामुळे सुममरे ५० दशलक्ष च्या वर लोक बाधित झाले आहेत.

<u>गेल्या दोन दशकातील महाराष्ट्रात झालेले भूसंपादन</u>.

गेल्या १५ वर्षातील आकडे पाहील्यास महाराष्ट्रातील सरकारांनी सुमारे १.९२ लाख हेक्टर जमिनीचे संपादन केले आहे. या भूसंपादनात लागवडीखाली, पडीक व राखीव जमिनीचा समावेश आहे. संपादित जमीन ज्या कारणांसाठी घेतली आहे त्याची वर्गवारी पुढील प्रमाणे:




<u>निष्कर्ष:</u>

- जमीन हे ग्रामिणांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन आहे व ते संपादित किंवा हिरावले गेल्याने ज्यांची जमीन गेली आहे त्यांचे निरंतर उदरनिर्वाहाचे मार्ग धोक्यात आले आहेत. मिळालेला पैशाचा मोबदला अल्प असून तो निरंतर संसाधनाचे साधन नाही त्यामुळे जमिनीच्या बदल्यात जमीन मोबदला हा दृष्टीकोन सरकारने घ्यायला हवा.
- ग्रामीण महिलांचे कौशल्य हे जमीन या संसाधंनासाठी पूरक आहे. उदा. भाजीपाला उत्पादन, बी-बियाणे संवर्धन इ. यातून त्या आपल्या रोजगार व साधन निर्मिती करत असतात. हातातील जमीन गेल्यामुळे आत्मसात केलेली कौशल्ये इतर ठिकाणी वापरू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या रोजगार व आत्मसन्मानाचे प्रश्न उभे राहिले आहेत.

- भूसंपादन झालेल्या जमीन क्षेत्रावर मजुरीसाठी अवलंबून शेतमाजुरांचा रोजगार धोक्यात आला आहे. त्यांना दूरवर रोजगारासाठी जावे लागते त्यामुळे त्यांचा प्रवास व कामाच्या तासांवर परिणाम झाला आहे.
- भूसंपादन प्रक्रियेमुळे सरकार व स्थानिक जमिनधारक यांच्यात मोबदला, पुनर्वसन, पर्यावरणीय मुद्दे, भूसंपादनात नियमबाह्य कृती यावरून निविध संघर्ष उभे राहिले आहेत. उदा. नर्मदा भूसंपादन, इंदिरा सागर प्रकल्प.
- भूसंपादन झालेल्या क्षेत्रात कमी जमिनीवर मोठ्या कुटुंबांचा निर्वाह अवलंबून असल्यामुळे जमीनीसाठी कुटुंबांमध्ये संघर्ष व कलह निर्माण झाले आहेत.

- वाढत्या लोकसंख्येस आवश्यक असणाऱ्या अन्नधान्याची पूर्तता ही उत्पादक जमिनीपासून होते. परंतु मोठ्या प्रमाणात जमिनीचे उत्पादक कारणाशिवाय इतर कारणांसाठी परावर्तन झाल्याने स्थानिक पातळीवर अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

संदर्भ:

१. MRD. (2011, July). *The Draft Land Acquisition and Rehabilitation and Resettlement Bill 2011.* New Delhi: Government of India. http://alexis.org.in/land-acquisition-act-a-critical-analysis/
२. https://www.teriin.org/article/right-livelihood-and-social-impact-assessment-land-acquisition
३. https://www.sciencedirect.com/science/article/abs/pii/0197397595000348?via%3Dihub
४. http://planningcommission.nic.in/reports/articles/venka/index.php?repts=m-land.htm
५. https://journals.sagepub.com/doi/full/10.1177/0019556117689851
६. http://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/43097/8/08_chapter%202.pdf
७. http://www.advancedjournal.com/download/200/1-12-24-563.pdf
८. https://www.tandfonline.com/doi/full/10.1080/14615517.2015.1096037
९. https://icrier.org/pdf/Working_Paper_361.pdf
१०. https://pdfs.semanticscholar.org/3b2f/981833790ecc40667bf23b4063c0311606f2.pdf

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021,
Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# दलित कथेचे शिल्पकारः बाबुराव बागूल

**प्रा. डॉ. सोनवले राजकुमार रंगनाथ,**
*देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.*

**प्रस्तावना :-**

*१९६५-१९७० पासून दलित कथा जसजशी क्रांतीदर्शी बनत होती, तसतशी ती कलात्मक दृष्टयाही नेटकी व वेधक होऊ लागली आहे असे दिसते. बागूलांच मूळ पिंडच कवीचा. पण त्यांच्या दोन कथासंग्रहाने मराठी साहित्य विश्वात वेगळाच ठसा उमटविला अन कवी बागूल प्रसिध्द दलित कथाकार म्हणून जगासमोर उभे ठाकले. दोन कथासंग्रह खळबळजनक. पहिला 'जेव्हा मी जात चोरी होती' (१९६३), दुसरा 'मरण स्वस्त होत आहे' (१९६९) हे संग्रह म्हणजे एका आगळया विदारक अनुभवसृष्टीचे मराठी साहित्य प्रांगणातील नवे टवटवीत दालनच. बागूलांच्या कथाविश्वाचे स्वरूप पाहिले तर दलित वेदनांचे, दुःखाचे वाढत पाझर, मूलभूत विद्रोहाचा धगधगता अंगार. समता-न्यायासाठी, मानवतेसाठी टाहो फोडणारी, सृजनशील प्रवृत्तीची सामर्थ्यसंपन्न कथा त्यांच्या कथालेखनामागच्या प्रेरणा निराळया आहेत. ती माणुसकीच्या तत्वज्ञानाशी प्रतिबध्द आहे. भारतीय क्रांतीचा खराखुरा लढा अस्पृश्यता निवारणाच्या लढयातूनच विकसित होणार आहे. म्हणून 'शूद्र, अतिशूद्र, अत्यंज समाज, हाच केंद्र केला पाहिजे. त्यालाच नेता मानला पाहिजे'. अशी विचारधारा त्यांच्या कथालेखनामागे आहे. अन त्यांचे कथेने मराठी साहित्य विश्वात दलित कथेचे दालन अधिक समृध्द केले, त्यास नवे आत्मभान दिले, म्हणूनच बाबुराव बागूल दलित कथेचे शिल्पकार होत.*

बागूलांच्या कथेत विलक्षण सामर्थ्य आहे, त्यांच्या कथेतील जग हे मराठी लेखक, वाचकांना अपरिचित असे आहे. हजारो वर्षे अंधाराच्या खायेत खितपत पडलेला असा दलित समाज व जातीयतेमुळे त्यांना अनंत जीवघेणे हाल, अपेष्टा भोगाव्या लागल्या आहेत. तोच अनुभव बागूलांनी घेतला आहे. त्यामुळे अन्यायाची चीड, विद्रोह यांची साठवण आपल्या हृदयाच्या कप्प्यात करून ठेवली आहे. यामुळेच त्यांची कथा रौद्र, भीषण वाटतात. त्यांचा नायक हा विद्रोही, बंड करणारा, अन्याय, अत्याचाराविरूध्द लढण्यासाठी सतत पुढे असणारा योध्दा वाटतो. येथील रूढी, परंपरा, धर्म व देवाने ज्यांच्या जीवनाचे तुरूंग केलेत ते तुरूंग फोडून, पुढील विजयासाठी सुरूंग पेरीत हा नायक क्रांतीची मशाल घेवून निघालेला आहे. त्यांचा गायकांना ताठ मानेने जगण्यासाठी उभे करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या कर्तृत्वाचा / कार्याचा मोठा प्रताप आहे. त्यांचे सर्व कथानायक तळागाळातील समाजाचे नायक आहेत. त्यांच्या कथेतील पात्रे भन्नाट आहेत. ही झपाटलेली माणसे, त्यांची वस्ती, तेथील झोपडया, झोपडयातून डोकावणारे दारिद्य, तेथील उंदीर, पाली, घुशी, मुंग्या, साप, सरडे यांचे उद्वेग, चीड, घृणा आणणारे चित्रण त्यांच्या कथेतून झाले आहे. बंड, विद्रोह, नकार यांना पेलणारी व बळ देणारी भाषा बागूल आपल्या कथांतून सहज वापरतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुध्द यांचे तत्वज्ञानच जगाला पुढे नेऊ शकते, यावर बागूलांचा ठाम विश्वास आहे. 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथेच्या आरंभीच ते लिहितात की, 'या दुर्दैवी देशात माणसाने दलित जातीत जन्म घेऊ नये. घेतल्यास असे दुःख, असा अपमान सहन करावा लागतो की, त्यातून मरण बरे वाटते, विष प्यारे होते, अंतःकरणातील अमृत सडून जाते अन उरते फक्त तरवारीपेक्षा ही क्रूर, कठोर चीड' नोकरीसाठी जात चोरून ठेवणाऱ्या 'मी' ला जातिभेदाच्या रानटी रूढीने रक्तबंबाळ, उध्दवस्त झालेला काशिनाथ दिसतो. 'कामगार म्हणून मरणार नाही' या काशिनाथाच्या एकाच उद्गाराने 'मी' चे हृदय भरून येते. या कथेत 'मी' चे मास्तरचे जे अखेरचे उद्गार आहेत ते ऐकले की, अंतःकरणात विद्रोहाचे डोंब उसळतात. मास्तर म्हणतात

'त्यांचा मार मी कुठे खाल्ला ! मनूनेच मला मारले ? सामाजिक विषमतेचे विष पेरणारा मनूच !' बागूलांच्या कथेत नायक आढळतो. तो अस्मिता, जागा झालेला बंडखोर नायक आहे.

'विद्रोह' कथेतील नायक हा भंग्याचा मुलगा आहे. त्याचे मन सतत आक्रोशात आहे की हे घाण काम मी का म्हणून करावे ? तो आपल्या बापाला विचारतो की, 'पिताजी, शाळेत ही मला विद्यार्थी न मानता भंगी म्हणतात सारेच. असा पावलोपावली छळ करून जगविणारा देश दुनियेत कुठेच नाही. सहज तरी करू किती ? गिळू तरी किती ? हा आहे देश की बंदिषाला ? केंदखाना . ......' भंग्याची नोकरी मिळविण्यासाठी साहेबाला लाच द्यावी लागते हे तर विशेष आश्चर्य !

'आई' या कथेतील पांडूचा पोरकेपणा हा अस्वस्थ करून टाकणारा, मराठी साहित्यातील चोकारीच्या बाहेरील असा आहे. पांडूच्या आईचे मन म्हणजे भीषण जीवननाटयच. लेकरासाठी देहविक्रय करणारी पण पोटच्या पोरांन 'शिंदळ' ठरवू नये म्हणून जिवाचा आटापीटा करणारी ही दलित आई मराठी कथासृष्टीत दुर्मिळच म्हणावी लागेल. विधवा आईने ठेवलेल्या दादल्याला पाहून पांडूच्या मनाची तगमग होते. त्याबद्दल त्याला घृणा वाटते. तिच्यापासून मनाने, देहाने दूर झालेला पांडू आपणासमोर सतत उभा राहतो. पांडूवर होणाऱ्या आघाताचे वर्णन बागूल किती प्रभावीपणे करतात ते पाहण्यासारखे आहे. पांडूच्या आईच्या मनातही आगडोंब उसळतो आहे ती पांडूला म्हणते की 'बघ लेकरा, तू मला शिंदळे ठरवून गेलास, तुझ्या बापापेक्षा अधिक दुःख देऊन गेलास, दुःखासाठी मला देवान धाडल आहे काय ? तू, तुझ्या बापानं आणि वस्तीवस्तीतील बायकापुरूषांनी मला छळल ...... तू मला आई मानतोस तर मी हा घरोबा केला नसता, तुझा आधार मला होता'. कथेच्या अखेरीस घरी परत आलेल्या पांडूला आपली आई मुकादमाच्या मिठीत असलेली पाहून त्याचे मन फाटून जाते. असे वास्तव, जिवघेणा अनुभव मराठी साहित्यात क्वचितच पहावयास मिळतो.

'मरण स्वस्त होत आहे' या कथेतील चित्रण ही अंगावर शहारे आणणारे आहे. यातील प्रत्येक दृश्य स्वतंत्र आहे. त्या सर्व दृश्यांचा परिणाम 'या मुंबईत' माणसाला माणूस खातो अन येथे मरण स्वस्त आहे, या जाणिवेत होतो. या दृश्यांत जी माणसे आहेत ती समाजाने फेकून दिलेली माणसे आहेत. कुठेही कसेबसे जगायचे एवढेच त्यांच्या नशिबी !. या माणसात चार मुले, बायका असलेला क्षयी राणू नागवेकर आहे. एक दिवस आखाडयाला न जाता घरात घुसलेल्या आपल्या शत्रूला व स्वतःच्या बायकोला नागवी एकत्र झोपलेले असताना कुऱ्हाडीने खांडोळी करून मारणारा अन स्वतः पोलीस ठाण्यात जाऊन खूनाची कबुली जबाब देणारा पहिलवान आहे. ही सर्व माणसे असे भयानक, भयाण जीवन का जगतात ? त्यांना तसे जीवन का जगावे लागत आहे ? इत्यादी प्रश्नांचा विचार कोणीच कसा करीत नाही याचे दुःख बागूलांना आहे.

'भांडवल' या कथेतील बाप आपल्या मुलीला स्पष्टपणे सांगतो की 'पोरी, नवऱ्याला जगवायला चोरी, सिंदळकी केली असतीस तर मी खाली मान घातली नसती !' परंतु या कथेतील नटाबाईची जगण्यासाठी होणारी धडपड पाहिली की आपल्या अंगावर शहारे उठतात. भूक माणसाला पशूपातळीवर घेवून जाते पण त्याला तसे जायचे नसते त्याच्या वाटयाला येतात फक्त जीवघेण्या, मरणप्राय यातनाच याचे दर्शन बागूलांच्या कथा समर्थपणे देतात. 'वानर, अराजक, लूटालूट, विद्रोह, मैदानातील माणसे' इत्यादी कथा अशाच आहेत. तर 'सूर्यचे सांगाती' मध्ये दलित साहित्यातील संपूर्ण नकार, विद्रोह जळजळीत होऊन अवतरला आहे, तो सार्थ वाटतो. तर 'कवितेचा जन्म' ही कथा म्हणजे दलित जीवनाचे अंतःदर्शन होय. घरातील दुःख, दैन्य, दारिद्रयातून उद्भवलेल्या प्रचंड प्रक्षोभ लोळ पाहून उद्वेगलेला त्यातील नायक शेवटी मरणालाच आवाहन करीत असताना तोंडून कविताच बाहेर पडते. 'मरणा तू येणार आहेस ना तर लवकर ये ! बुजतील वळ युगायुगाचे हे मरणा मरणा'. या जीवनातून कविता जन्म घेते. 'दलित जीवन हेच एक महान काव्य व भीषण नाटच आहे ?' असे सुचविणारी ही कथा अत्यंत प्रभावी, दीर्घकाळ स्मरणात राहणारी ज्वलंत प्रत्ययकारी आहे. अशाच भूक, सक्तमजुरी, शिक्षण, तहान इत्यादी कथा विलक्षण आहेत. बागूलांच्या कथेतून साकार होणारे जग पांढरपेशा वाचकांना

वेगळे, भयभीत अन विचार करण्यास भाग पाडणारे असे आहे. म्हणून तर डॉ. भालचंद्र फडके लिहितात 'दलित कथेची जडणघडण होत असता तिला मानाचे स्थान मिळवून देणारे दलित कथेचे शिल्पकार म्हणजे श्री बागूल होत' हे मला योग्य वाटते. तर गंगाधर पानतावणे म्हणतात 'उपेक्षित जीवनाचा समर्थ भाष्यकार ठरणाऱ्या बागूलाचा 'मरण स्वस्त होत आहे' हा कथासंग्रह मराठी कथेची कोंडी फोडणारा ठरेल' त्यांच्या कथा म्हणजे आजच्या विद्रोही दलित कथेची अभूतपूर्व उदय होय. म्हणून बागूल हे दुसऱ्या पर्वातील विद्रोही दलित कथेचे शिल्पकार ठरतात.

**<u>संदर्भ ग्रंथ सुची</u>**

१ *डॉ. भालचंद्र फडके - दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७७.*
२ *डॉ. योगेंद्र मेश्राम (संपा.) - दलित साहित्य उद्गम आणि विकास, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८.*

# भारतीय लोकतंत्र के समक्ष चुनौतियॉं (एक विवेचनात्मक दृष्टिकोण )

*आशा नागर*
*सहायक आचार्य -राजनीति विज्ञान राजकीय महाविद्यालय,देवली (टोंक-राज०)*

**शोध सारांष -**

प्रस्तुत आलेख में भारतीय लोकतंत्र के समक्ष चुनौतियों को संक्षेप में बताया है । इस आलेख में जातिवाद, भाषावाद, साम्प्रदायिकता, क्षेत्रीयतावाद, आतंकवाद, प्रॉक्सीषासन, राजनीतिक अस्थिरता अथवा गठबंधन की राजनीति तथा नक्सलवाद को बताते हुए इन चुनौतियों से किस प्रकार राहत पा सकते है, उनके समाधान के लिए कुछ सुझाव व विचारों का समावेष भी इस आलोच्य आलेख में किया गया है। वर्तमान भारतीय लोकतांत्रिक व्यवस्था में अनेक विकृतियों की भरमार हो रही है फलतः भारतीय लोकतंत्र जैसी मजबूत संस्था धीरे-धीरे कमजोर व आन्तरिक रूप से खोखली होती जा रही है । अत : समय रहते हुए इन चुनौतियों के बढ़ते प्रभाव पर अकुंष लगानें तथा सुधारात्मक उपाय लागू करने जैसे बिन्दुओं पर भी प्रकाष डाला गया है। अत : लोकतंत्र जैसी व्यवस्था को पुख्ता आधार प्रदान करने के लिए उन उभरती चुनौतियों के सम्बन्ध में चिंतन करतें हुए इन्हें समयानुसार ही नियंत्रित करना अत्यावष्यक है ।

**परिचय -**

भारत विष्व का सबसे बड़ा लोकतांत्रिक राष्ट्र है। यह लोकतांत्रिक राष्ट्र के साथ ही विविधताओं में एकता वाला भी अनूठा देष है । यद्यपि जितना बड़ा कोई देष होगा उसमें समस्याएँ, बाधाएँ व चुनौतियों की भी भरमार होती है । आजादी से लेकर वर्तमान समय तक देखा जाए तो एक अच्छी व सुखद बात यह है कि भारत ने कई क्षेत्रों जैसे वैज्ञानिक, आर्थिक, राजनीतिक व सांस्कृतिक क्षेत्रों आदि में नये-नये कीर्तिमान बनाए हैं । फलतः विगत कुछ वर्षों से भारत विष्व में एक शक्तिषाली राष्ट्र की छवि के रूप में उभर कर देष-दुनिया के सामने आया है।

हमारे संविधान निर्माताओं ने एक आदर्ष संसदीय लोकतंत्र की परिकल्पना की थी । हमने लोकतंत्र की मूल विचारधारा को स्वीकार करके समाजवाद, राष्ट्रीय एकता, अखंडता, धर्मनिरपेक्षता, सामाजिक समता, समरसता, एकात्मकता और साम्प्रदायिक सद्भाव जैसे आदर्ष लक्ष्यों की प्राप्ति के लिए कदम बढ़ाया था । ये सिद्धान्त हमारे प्राण वायु रहे हैं । हमने इनकी अभिव्यक्ति एवं सहज क्रियान्विति के लिए एक उत्तम राजनीतिक संरचना के निर्माण का संकल्प लिया था । भारतीय संसद इसकी साक्षी है ।

लोकतंत्र शासन और प्रषासन की खुली पुस्तक है किन्तु राजनेताओं के आपसी स्वार्थों के संघर्ष में इसका प्रत्येक पृष्ठ दिनोंदिन मैला होता जा रहा है । यद्यपि भारतीय लोकतंत्र विष्व का सबसे बड़ा लोकतांत्रिक राष्ट्र है, लेकिन विगत कुछ वर्षों से इस लोकतंत्र को अनेक चुनौतियों का सामना करना पड़ रहा है। चुनौतियों में जातिवाद, साम्प्रदायिकता, क्षेत्रीयतावाद, भाषावाद, आतंकवाद, प्रॉक्सी शासन, राजनीतिक अस्थिरता अथवा गठबधंन की राजनीति, नक्सलवाद आदि को शामिल किया जा सकता हैं । ये चुनौतियॉं न केवल जन-जीवन को अस्त-व्यस्त बनाती है अपितु लोकतंत्र को भी अन्दर ही अन्दर से खोखला बनाती रहती है, जो भारत के लोकतंत्र के लिय ही नही अपितु विष्व के किसी भी राष्ट्र के लोकतंत्र के लिए भयंकर घातक सिद्ध हो रही हैं । इनके कारण लोकतंत्र की सफल क्रियान्विति में बाधा या रूकावट उत्पन्न होती है। वर्तमान भारतीय लोकतंत्र के समक्ष जो चुनौतियॉं हैं, उन्हें विस्तारपूर्वक इस प्रकार समझ सकते हैं -

- **जातिवाद :-**

जाति एक सामाजिक सरंचना है जो प्राचीन काल से ही भारत में विद्यमान था । प्रारम्भ में इस सामाजिक व्यवस्था का रूप इतना विकराल व विकृत नहीं था जितना वर्तमान समय में देखने को मिलता है । इस सम्बन्ध में **के.एन.मेनन**. ने कहा है कि -''स्वतंत्रता के बाद भारत के राजनीतिक क्षेत्र में जाति का प्रभाव पहले की अपेक्षा बढ़ा है ।'' वर्तमान समय में जातिवाद का दायरा और अधिक विस्तृत होता जा रहा है क्योंकि भारत में जाति का राजनीतिकरण हो गया है जिसके परिणामस्वरूप न केवल जातिवाद का प्रभाव राजनीति में ही सिर चढ़कर बोल रहा है अपितु वह मनुष्य जीवन के अन्य क्षेत्रों जैसे- सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रों में दस्तक देकर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूप से अपनी उपस्थिति दर्ज करा रहा है । जातिवाद ने धीरे-धीरे भारतीय लोकतंत्र में इतनी शहरी पैठ बना ली है कि उसकी जड़े भारतीय समाज में गहराई तक फैल गई है। कई विद्वान जैसे डी.आर.गाडगिल का मानना है कि जाति का प्रभाव प्रजातंत्र के विकास में सहायक नहीं हैं । इतना ही नहीं डॉ. आषीर्वादम ने तो यहॉं तक कह दिया है कि ''भूतकाल में जाति के चाहे जो भी लाभ हो, आज यह प्रगति में बाधक हैं ।'' इस तरह प्रारम्भिक दौर में जातिगत व्यवस्था के कुछ सकारात्मक पहलू भी थे लेकिन धीरे-धीरे जातिगत भेदभाव केंसर एवं एड्स जैसे भयंकर रोगों की तरह सर्वत्र फैल गया है जिसका निदान असम्भव है । आज राष्ट्रीय हितों की अपेक्षा जातिगत हितों को विषेष महत्व दिया जा रहा है, जिसके कारण हमारी लोकतांत्रिक व्यवस्था कमजोर हो रही है । अतः जातिवाद देष, समाज और राजनीति के लिए बाधक है। जो लोकतंत्र जैसी संस्था के लिए चुनौती के रूप में मुंह खोले खड़ी है ।

- **साम्प्रदायिकता -**

साम्प्रदायिकता भारतीय लोकतंत्र के लिए जातिवाद से बढ़कर भयंकर चुनौती है। यह न केवल लोकतंत्र जैसी व्यवस्था के लिए बड़ी चुनौती है अपितु सम्पूर्ण मानवता के लिए एक गंभीर अभिषाप हैं। इसके बुरे परिणाम मानवता व देष की एकता तथा अखण्डता

के लिए खतरा बनकर सामने आते हैं जिसका दंष मानव समाज से सदियों तक मिटाए नहीं मिटता है तथा भुलाए नहीं भूला जाता है । भारत में साम्प्रदायिकता जैसी समस्या ब्रिटिष शासन की देन है। ब्रिटिष सरकार ने फूट डालों-राज करों की नीति का बीजारोपण करके विभिन्न धर्मों व जातियों के मध्य वैमनस्यता की अग्नि सुलगा दी जिसका विकराल रूप धीरे-धीरे साम्प्रदायिकता जैसी विकराल चुनौती के रूप में सामने आयी । इस समस्या के कारण आपसी द्वेषता की खाई बढ़ती जाती है, आर्थिक हानि भी होती है इतना ही नहीं प्राण हानि के साथ-साथ राजनीतिक अस्थिरता की स्थिति भी बन जाती है जिससे न केवल राष्ट्रीय एकता बाधित होती है अपितु राष्ट्रीय सुरक्षा को भी खतरा उत्पन्न हो जाता है । अतः साम्प्रदायिकता जैसी भयंकर चुनौती लोकतंत्र जैसी व्यवस्था के लिए अनुपयोगी व प्रगति में बाधक ही सिद्ध होती है । अत : इस समस्या के समाधान के लिए तुष्टिकरण की नीति का परित्याग करना चाहिए, साथ ही चुनाव जीतने हेतु सम्प्रदाय का सहारा लेने वालों पर कठोर कार्यवाही करनी चाहिए, धर्म के आधार पर किसी प्रकार का भेदभाव नहीं होना चाहिए तथा षिक्षा का प्रचार-प्रसार करते हुए षिक्षा के माध्यम से शाष्वत नैतिक मूल्यों को पढ़ाया जाना चाहिए ।

- **क्षेत्रवाद - क्षेत्रीय असंतुलन**

क्षेत्रवाद भी जातिवाद व साम्प्रदायिकता की तरह ही लोकतंत्र के समक्ष महत्वपूर्ण चुनौती के रूप में है । राष्ट्रीय स्तर पर विषमताओं के कारण क्षेत्रीय भावना का विकास ही क्षेत्रवाद है । भारत एक विषाल राष्ट्र है, जिसमें अनेक जातियों के लोग निवास करते हैं इनमें से कुछ धार्मिक और भाषायी समूह कतिपय क्षेत्र विषेष में संकेन्द्रित हैं, ये अपने क्षेत्र को ही सर्वाधिक प्राथमिकता देते हैं तथा अपनी सांस्कृतिक पहचान बनाए रखते हैं । इसी मानसिकता के चलते भारत में क्षेत्रवाद की प्रवृति का आविर्भाव हुआ । यद्यपि स्वतंत्रता आन्दोलन के दौरान एकमात्र लक्ष्य आजादी प्राप्त करना था । उस दौर में ये आकांक्षाऍं गौंण रही । परन्तु आजादी के पष्चात् ये पुनः प्रधान हो गई। स्वतंत्रता प्राप्ति के बाद विभिन्न प्रांतों की इन मांगों ने क्षेत्रवाद की भावनाओं को बलवती किया - १. राज्यों के पुनर्गठन की मॉंग २. नवीन राज्य निर्माण की मॉंग ३. भारत संघ में ही अधिक स्वायत्तता की आकांक्षा ४. प्राकृतिक संसाधनों के वितरण सम्बन्धी विवाद ५. केन्द्र से अधिकाधिक आर्थिक सहायता प्राप्त करना । ६. अधिकाधिक राजनीतिक सहभागिता का दावा ।

इस प्रकार क्षेत्रीयतावाद भारत की लोकतांत्रिक व्यवस्था के लिए एक चुनौती के रूप में उभर रहा है । समय रहते हुए इस पर नियंत्रण नहीं पाया गया तो लोकतंत्र की जड़ों को ये खोखला बना सकती हैं। क्षेत्रवाद की तरह ही एक प्रमुख चुनौती क्षेत्रीय असंतुलन भी है। भारत में कुछ प्रदेष क्षेत्रीय असंतुलन के ज्वलन्त उदाहरण हैं जैसे - उत्तरी-पूर्वी क्षेत्र, ग्रामीण क्षेत्र, आदिवासी और पहाड़ी क्षेत्र आदि हैं । क्षेत्रवाद के कारण राष्ट्रीय एकता को करारा झटका लगता है, लोकतंत्र की भी जड़ें हिल जाती है, कई तरह के अलगाव उत्पन्न हो जाते हैं तथा यह हमारी अन्तर्राष्ट्रीय छवि को खराब करता है । अतः किसी भी लोकतांत्रिक राष्ट्र के लिए क्षेत्रवाद की प्रवृत्ति एक चिंताजनक विषय है ।

- **भाषावाद -**

क्षेत्रवाद की भांति भाषावाद भी भारत जैसी लोकतांत्रिक व्यवस्था के लिए महत्वपूर्ण चुनौती के रूप में मानी जाती है। अपनी भाषा के प्रति लगाव भाषावाद नहीं हैं परन्तु जब किसी भाषा से जुड़े लोग भाषा के आधार पर अपने सामाजिक-आर्थिक हितों को अन्य भाषा-भाषियों से पृथक मानने लगते हैं तो यह भाषावाद कहलाता है । भाषावाद के कारण देष में कई तरह के आन्दोलन भी हुए हैं। भाषा के आधार पर राज्यों का पुनर्गठन एवं दक्षिण के कुछ राज्यों में हिन्दी विरोधी आन्दोलन विचारणीय मुद्दे रहे हैं । समय-समय पर भाषा को लेकर देष में कई आन्दोलन होते रहते हैं जिसके कारण राष्ट्रीय एकता को न केवल क्षति पहुँचती हैं अपितु लोकतंत्र भी कमजोर पड़ता है । यद्यपि देखा जाए तो भाषावाद की समस्या वस्तुतः निहित राजनीतिक स्वार्थों से प्रेरित समस्या अधिक रही है। बढ़ते राजनीतिकरण के कारण स्वार्थ की अंधी दौड़ में विभिन्न भाषा-भाषी राज्यों के बीच भाषा को लेकर टकराहट होती रहती है । जो भारतीय लोकतांत्रिक व्यवस्था के लिए एक भंयकर चुनौती के रूप में सामने आ रही है । भाषावाद की चुनौती पर काबू पाना अति आवष्यक है तथा हिन्दी को सम्पूर्ण देष की भाषा के रूप में स्वीकार करना होगा वरना सच्चाई यह है कि भारतीय परिवेष में अगर हिन्दी की चाल को सुदृढ़ करना है तो भू-मण्डलीकरण ही नहीं, वसुधैव कुटम्बकम् ज्यादा हितकारी है । अतः भाषावाद को समाप्त कर 'एक राष्ट्र, एक भाषा' के सिद्धांत को स्थापित करना होगा जो न केवल राष्ट्रीय एकता में ही सहायक होगा अपितु लोकतंत्र को भी मजबूत आधार प्रदान करने में अपनी महत्वपूर्ण भूमिका का भी निर्वहन हो सकेगा ।

- **आंतकवाद -**

आतंकवाद मूलतः एक विखण्डनकारी प्रवृति है जिसका अन्य विखण्डनकारी प्रवृतियों के साथ गहरा सम्बन्ध है । वास्तव में आतंकवाद केवल हिंसा की तकनीक नहीं है, यह सिर्फ जान से मार देने की या आतंकित कर देने की कला नहीं है, अपितु विचारधारा है। यह विषम परिस्थिति न केवल वैष्विक लोकतंत्र व सम्पूर्ण मानवता के लिए खतरे की घण्टी है, बल्कि विकसित एवं भारत जैसे विकासषील देषों की लोकतांत्रिक व्यवस्था के लिए भी बड़े अवरोधक व चुनौतिपूर्ण कार्य है ।

भारत में आंतकवाद की समस्या धीरे-धीरे काफी पैर पसार चुकी है । जैसे भारतीय संसद पर फिदायीन आतंकवादियों का हमला, गॉधीनगर के अक्षरधाम मन्दिर में ३४ श्रद्धालुओं की हत्या, जम्मू के रघुनाथ एवं षिव मन्दिर में हथगोलों से हमला, मुंबई की लोकल ट्रेनों एवं गेटवे ऑफ इण्डिया में बम विस्फोट, बनारस में श्रृंखलाबद्ध बम विस्फोट, हैदराबाद की जामा मस्जिद में बम विस्फोट, अजमेर में दरगाह के सामने हुआ विस्फोट, अमरनाथ यात्रा में श्रद्धालुओं की हत्या तथा हाल ही में १४ फरवरी २०१९ की पुलवामा की घटना । इस तरह भारत में हुए कई आतंकवादी हमलों के कारण देष में न केवल जान-माल की हानि होती है अपितु स्वस्थ लोकतंत्र में भी बाधा उत्पन्न होती है। इस प्रकार आज भी आतंकवाद विष्व शांति और सुरक्षा के लिए सबसे गंभीर चुनौति बनी हुई है । विष्व के समस्त देष जब तक एकजुट होकर इस आतंकवाद रूपी दैत्य का मुकाबला नही करते तब तक यह समस्या समाप्त नहीं होगी । भारत में भी शासन व प्रषासन को आने वाले समय में आतंकवाद से निपटने के लिए कड़े कदम उठाने होंगे तभी लोकतंत्र को मजबूत आधार प्रदान हो सकता है ।

➢ **प्रॉक्सी शासन का प्रादुर्भाव -**

लोकतंत्र के सामने यह एक प्रमुख चुनौती के रूप में उभर रही यह एक नई बाधा है । आज देष में लोकतंत्र के नाम पर 'गठबन्धन शासन', सुविधावादी 'रूल' जंगलराज, वषंवादी राजतंत्र, और प्रॉक्सी रूल, खुले आम चल रहा है । देष में शासन की वास्तविक बागड़ोर बड़े पूॅंजीपतियों, उद्योगपतियों, माफिया समूहों, आपराधिक तत्वों के हाथ में जा रही है । अब लोकतंत्र की वास्तविक राजा आम जनता नही है । सामान्य इच्छा का अब कोई मूल्य नहीं बचा। प्रॉक्सी शासन का सबसे अच्छा उदाहरण १६ मई २००० को राबड़ी देवी की सरकार का कहा जा सकता है । इसी तरह महाराष्ट्र में 'प्रॉक्सी शासन' की यही शैली बाल ठाकरे ने भी अपना रखी है । वे कहते है कि उनकी पार्टी के शासन के दौरान मुख्यमंत्री कोई भी हो 'रिमोट कन्ट्रोल' तो उनके हाथ में ही रहता है ।

इस प्रकार वर्तमान लोकतंत्र के समक्ष 'प्रॉक्सी शासन' एक प्रमुख चुनौती के रूप में उभर रही है। यदि समय रहते हुए इस चुनौती का हल या तोड़ नहीं निकलता है तो लोकतंत्र की परिभाषा "जनता का, जनता के लिए, जनता द्वारा" किया गया शासन लोकतंत्र कहलाता है, का प्रभाव किताबों के कुछ पन्नों तक सिमटकर रह जाएगा । क्योंकि जनता के शासन में कुछ वर्चस्वषाली व प्रभावषाली लोगों के हस्तक्षेप के कारण लोकतंत्र उन जैसे लोगों के हाथों की कठपुतली बनकर रह जाएगा ।

➢ **राजनीतिक अस्थिरता अथवा गठबंधन की राजनीति -**

भारतीय राजनीति में राजनीतिक अस्थिरता या गठबंधन की राजनीति, एक नयी चुनौती के रूप में आकार ले रही है । भारतीय राजनीति के इतिहास पर दृष्टिपात करें तो सर्वप्रथम सन् १९७७ में इसका रूप देखने को मिला जब पॉच दलों के गठबन्धन से मोरारजी देसाई के नेतृत्त्व में सरकार बनी । लेकिन अल्पकाल में ही जनता पार्टी दोहरी सदस्यता के मुद्दे पर वापस बिखर गई । तत्पष्चात् ११ वीं से लेकर १५ वीं लोकसभा तक फिर भारत में किसी एक दल को लोकसभा में बहुमत नहीं मिला । कोई भी एक दल सरकार बनाने की स्थिति में नहीं रहा । अस्थायी सरकारों का दौर शुरू हुआ और गठबन्धन की राजनीति की शुरूआत हुई । आज से कुछ समय के राजनीतिक घटनाक्रम पर दृष्टि डालें तो साफ दिखाई देता है कि राजनीति सिर्फ जोड़-तोड़ की कला बनकर रह गई है । वर्तमान समय में न तो कोई पार्टी बहुमत हासिल करने की स्थिति में है और न कोई ऐसा व्यक्तित्व है जो दो-तीन मजबूत दलों को जोड़कर एक साझा मंच दे सके । इस तरह से रोज पार्टियां बदलती है तो फिर सरकारें भी परिवर्तित होगी। भारत जैसे देष के लिए इस तरह सरकार का बदलना बहुत महंगा व नुकसानदायक है । इस प्रकार भारत में राजनीतिक गठबन्धन के चलते किसी स्थायी सरकार की संभावना नहीं है । भारत एक दौराहे पर पहुॅंच गया है । भारत में कोई अल्पमत वाली या साझा सरकार नहीं चल सकती । क्योंकि इन दोनों ही परिस्थितियों में वास्तविक बागड़ोर किसी के भी हाथ में नहीं होगी । फलतः राजनीतिक अस्थिरता को बढ़ावा मिलेगा जो लोकतंत्र के लिए बहुत बड़ा खतरा उत्पन्न करने में अहम् हिस्सा रखता है । अतः लोकतंत्र की सफलता के लिए सषक्त सत्ता दल तथा मजबूत विपक्ष होना अत्यावष्यक है ।

➢ **नक्सलवाद -**

नक्सलवाद एक ऐसे क्रांतिकारी आन्दोलन का नाम है जिसका यह मानना है कि साधनहीनों की स्थिति में परिवर्तन केवल 'सषक्त क्रांति' के द्वारा ही लाया जा सकता है । वर्तमान समय में नक्सलवाद का स्वरूप अपने विकराल रूप में देष-दुनिया के सामने आ रहा है । भारत में नक्सलवाद का खतरा आंतकवाद के खतरे से भी बड़ा होता जा रहा है। विडम्बना इस बात की है कि जिन कारणों से देष में नक्सलवाद को बढ़ावा मिला दुर्भाग्यवष वे आज तक मौजूद हैं । देष में गरीबी बनी हुई है, भूमि सुधारों पर ध्यान नहीं दिया जा रहा, बेरोजगारी बढ़ती जा रही है, आदिवासियों के साथ अच्छा व्यवहार देखने को नहीं मिल रहा । दूर-दराज तक सुषासन नाम मात्र का ही है। अतः इस चुनौती से शीघ्रताषीघ्र निपटने के लिए कारगर कदम उठाना बहुत जरूरी है । यथा सभी राज्य सरकारें भूमि सुधार कानूनों में तेजी लाए तथा बुनियादी या मूलभूत सुविधाओं का विकास किया जाए तथा पिछड़े एवं दूर-दराज के इलाकों में युवा वर्ग को रोजगारों की योजना बनाई जाए और वे समस्त कारण समाप्त करने चाहिए जो एक निर्दोष नागरिक को नक्सली बनाते हैं ।

➢ **राजनीति में बढ़ता अपराध व भ्रष्टाचार -**

आज अपराधियों, राजनीतिज्ञों और विषिष्ट व्यक्तियों के बीच अपवित्र गठबन्धन बढ़ता जा रहा हैं। अपराधियों ने पूरे राजनीतिक तंत्र को अपने षिकंजे में कस रखा है। इसी कारण राजनीतिक दलों में एक नूतन प्रवृत्ति के रूप में राजनीति का अपराधिकरण देखने को मिल रहा है। विकास में असमानता, बढ़ते चुनावी खर्चे, आरक्षण की राजनीति आदि ने राजनीति में हिंसात्मक आधारों को जन्म दिया हैं। इस बढ़ते अपराध के कारण येन-केन प्रकारण अपराधी लोग सांठ-गांठ करके सत्ता के गलियारें तक पहुँच जाता है । एक उदाहरण के द्वारा इस तथ्य को पुष्ट किया जा सकता है कि १६ वीं लोकसभा के ३४ प्रतिषत सदस्य आपराधिक पृष्ठभूमि वाले है । जिनके विरूद्ध आपराधिक मामले विचाराधीन हैं । सभी दल ईमानदार छवि वाले लोगों की तुलना में धन-बल और बाहुबल वाले जिताऊ उम्मीदवारों को ही टिकट देते हैं । फलतः ये उम्मीदवार धन व बाहुबल से किसी राजनीतिक दल की मदद करते है, असामाजिक तत्वों के माध्यम से बूथ-केप्चरिंग व चुनाव में फर्जी मतदान करते हैं।

वर्तमान में अपराध नये-नये रूपों में भारतीय राजनीति में घुसपैठ कर रहा है । कभी विधायकों, सांसदों की खरीद-फरोख्त के रूप में, कभी सरकार को अल्पमत में लाने के रूप में तो कभी बाड़ाबंदी के रूप में सामने आ रहा है । इतना ही नहीं आज भारतीय राजनीति अपने बढ़ते अपराधों, गिरते नैतिक स्तर तथा बढ़ते भ्रष्टाचार के कारण राजनीति विकृतियों व बुराइयों का अखाड़ा बन चुकी है । राजनीतिक अपराधों की छाया में भ्रष्टाचार भी बढ़ रहा है। किसी भी देष की अर्थव्यवस्था में भ्रष्टाचार दीमक की तरह होता है जो उसे खोखला कर देता है । भ्रष्टाचार के अधिकांष मामले खरीद, अनुदान, निर्माण, लाईसेंस, परमिट आंवटन, ऋण, नियुक्ति, स्थानान्तरण आदि क्षेत्रों से सम्बन्धित होते है। इस प्रकार विगत कुछ दषकों से भारतीय राजनीति में ये दो समस्या बढ़ता अपराध व भ्रष्टाचार तीव्र गति से बढ़ रहे हैं जिसको उचित रूप से नियंत्रित नहीं किया गया तो भारतीय लोकतंत्र के लिए ये नासूर के रूप में खतरनाक हो सकते हैं । अतः अपराध व भ्रष्टाचार की रोकथाम के सम्बन्ध में पुनः मंथन करने की आवष्यकता हैं तथा चुनाव आयोग के लिए बनाये गये नियमों की भी पुनर्समीक्षा कर उसमें देषहित को ध्यान में रखते हुए संसोधन करने की आवष्यकता है । तभी जाकर हम लोकतंत्र के समक्ष बढ़ रही चुनौतियों का सख्ती से सामना कर सकते है।

- **चुनाव व्यवस्था -**

चुनाव व्यवस्था लोकतांत्रिक व्यवस्था का प्राण है। निर्वाचन प्रक्रिया तथा उस प्रक्रिया का संचालन करने वाली मषीनरी लोकतांत्रिक व्यवस्था का बुनियादी आधार है । भारत के सन्दर्भ में चुनाव की विधिवत शुरूआत १९५२ में देखतें हैं । सन् १९६७ तक हमारी चुनावी व्यवस्था मौटे तौर पर दोषरहित थी । पर उसके बाद इसके स्तर पर गिरावट आनी शुरू हुई एवं तभी से चुनाव सुधार एक गंभीर चुनौती के रूप में भारतीय लोकतंत्र के सामने आया । वर्तमान में समय के साथ-साथ चुनाव के दौरान हिंसा, राजनीतिक अपराधीकरण, मतदान केन्द्र की लूट, प्रषासन का गलत इस्तेमाल, सरकारी धन का दुरूपयोग आदि ने चुनाव के सफल संचालन पर प्रष्न चिन्ह लगा दिया । आज ससंद में वोट के बदले नोट की राजनीति, दल बदल की समस्या, अपराधियों का बड़े पैमाने पर चुनकर व्यवस्थापिका तक पहुँचना आदि समस्या का मूल कारण एक सषक्त एवं प्रभावी चुनाव व्यवस्था की कमी को दर्षाता है । आज कई छोटे-छोटे दल उभर आए हैं । इन दलों में कई तो सिर्फ पंजीकृत हैं और चुनाव में प्रत्यक्ष रूप से सक्रिय तो नहीं होते पर परोक्ष रूप से गलत माध्यमों का प्रयोग कर राजनीतिक वातावरण को दूषित करते हैं। इस प्रकार देखा जाए तो भारतीय लोकतंत्र में जो चुनौतियां उभर रही हैं उन सबके पीछे लोकतंत्र के लिए होने वाली चुनाव प्रक्रिया हैं । ।अगर चुनाव निष्पक्ष व पारदर्षी होते हैं तो ये चुनौतियां स्वतः ही निष्क्रिय हो जाएगी । क्योंकि सिर्फ समस्या को बड़ा बताने भर से समस्या का हल नहीं निकलेगा । उस समस्या को कम या समाप्त करने हेतु लगातार प्रयास करने होंगे । अतः भारतीय चुनावी प्रणाली पर विषेष सुधार की महत्ती आवष्यकता है क्योंकि यह लोकतंत्र का मूल केन्द्र बिन्दु है, जिसके कारण यहीं से कई चुनौतियां करवट लेती दिखाई देती है ।

**निष्कर्ष -**

भारतीय लोकतंत्र शासन की सबसे प्रमुख व्यवस्थाओं में से एक है । यहाँ लोकतंत्र का स्वरूप बहुत ही आदर्ष व प्रगतिषील है। इसी कारण से इसे दुनिया का सबसे बड़ा लोकतंत्र माना जाता हैं । भारतीय लोकतंत्रीय व्यवस्था पर दृष्टिपात करें तो हम पाते हैं कि भारतीय लोकतंत्र काफी विकसित व स्वस्थ था । लोकतंत्र में आम लोगों की घनिष्ठ आस्था व श्रद्धा थी । इसलिए लोकतंत्र के चुनाव चाहे वह लोकसभा के हो या राज्यों की विधानसभाओं के उनमें आम लोगों में त्यौहारों की तरह उत्साह रहा करता था, ऐसा नहीं है कि आज वह उत्साह समाप्त हो गया हो लेकिन उसमें गिरावट अवष्य आयी है । विगत कुछ वर्षो से भारतीय लोकतंत्र में अनेक विकृतियां उत्पन्न होती जा रही हैं जिसके कारण भारतीय लोकतंत्र की छवि कुछ धूमिल होती नजर आ रही है । यद्यपि कुछ वर्षो से भारतीय लोकतंत्र में कई चुनौतियां इसके स्वरूप को विकृत बना रही हैं लेकिन समय रहते हुए इन पर नियंत्रण करके इन्हें दूर किया जा सकता हैं । क्योंकि इतिहास गवाह है कि जिन मनुष्यों में आषा और उम्मीद होती है वें बड़ी से बड़ी चुनौतियों का सामना आसानी से कर सकते हैं । इस सम्बन्ध में **इमर्सन** नामक विद्वान ने भी कहा है "जिसके पास आषा होती है उसके पास सब कुछ होता है।" अतः आषा और उम्मीदों के

सहारे चलते-चलते इन चुनौतियों का सामना किया जा सकता है । अतः भारत जैसे राष्ट्र में लोकतंत्र चिंता का नही चिंतन का विषय हैं तथा भारत में लोकतंत्र का भविष्य सुरक्षित है ।

**सन्दर्भ ग्रन्थ सूची -**


- जीवन, अग्रवाल, भारतीय लोकतंत्र और राजनीतिक विचारधारा (२०१५)गौरव बुक सेन्टर, प्रा०लि०, नई दिल्ली ।
- सुधा, विपस्सना, भारतीय राजनीति में नैतिक संकट (२००२), राज पब्लिषिंग हाउस, जयपुर ।
- खण्डेला, मानचन्द, भारतीय राजनीति का भविष्य (२००८) अरिहंत पब्लिषिंग हाउस, जयपुर ।
- गोस्वामी,आचार्य बालचन्द 'प्रखर', संसदीय लोकतंत्र -सफलता-असफलता (२००७) राज पब्लिषिंग हाउस, जयपुर ।
- अग्रवाल, बिहारी प्रसाद, भारतीय राजनीति में भ्रष्टाचार (२००५) राधा पब्लिकेषन्स, नई दिल्ली ।
- मिश्रा, डॉ. महेन्द्र कुमार, भारतीय राजनीति : समस्याएं और समाधान (२००८) आर०बी०एस०ए० पब्लिषर्स, चौड़ा रास्ता, जयपुर ।
- चतुर्वेदी, डॉ. ईनाक्षी, राजनीति विज्ञान की प्रमुख अवधारणाएं एवं विचारधाराएं (२०१९) माध्यमिक षिक्षा बोर्ड, अजमेर ।
- खण्डेला, मानचन्द, भारतीय राजनीति का बदलता परिदृष्य (२००८) अरिहंत पब्लिषिंग हाउस, जयपुर ।
- राय, हिमांषु व एम०पी०सिंह, भारतीय राजनीतिक व्यवस्था (२०१८) पियर्सन एजुकेषन इण्डिया, दिल्ली ।
- प्रतियोगिता दर्पण, राजनीति विज्ञान अतिरिक्तांक (२००६) उपकार प्रकाषन, आगरा ।
- प्रतियोगिता दर्पण (जनवरी २०१४/मार्च २०१८/जून २०१८) उपकार प्रकाषन, आगरा ।
- समसामयिक पत्र-पत्रिकाएं ।
- गूगल ब्राउजर ।

# सांगली जिल्ह्यातील महिला शेतमजूरांच्या समस्या

***राणी महादेव कांबळे***
*संशोधक विद्यार्थीनीए अर्थशास्त्र अधिविभागए शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

**प्रस्तावना :-**

सांगली जिल्हा हा महाराष्ट्राच्या पश्चिम मध्यवर्ती क्षेत्रावर वसलेला असून जिल्ह्याने स्वतःची सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात स्वतंत्र अशी एक ओळख निर्माण केली आहे. जिल्ह्याचा मुख्य व्यवसाय कृषी असून ७० टक्के लोक कृषी व्यवसायात गुंतलेले आहेत. जिल्ह्याला वारणा आणि कृष्णा नदीचे सुपीक खोरे लाभलेले असून कृषी व्यवसायासाठी अतिशय योग्य असे वातावरण लाभले आहे. कृषी व्यवसायासाठी मजूर हा घटक अतिशय महत्तवपूर्ण असून त्यामध्ये महिला कृषी कामगारांचे योगदान अतिशय मोलाचे आहे.

- **उद्दिदष्ट्ये :-**

१. महिला कृषी कामगार होण्याची कारणे समजून घेणे.
२. महिला कृषी कामगारांच्या समस्या जाणून घेणे

- **संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधन लेख दुयुयम साधनसामग्रीवर आधारित आहे. यासाठी मासिके, अहवाल, वृत्तपत्रे, संशोधन लेख, संगणक इ. संदर्भ साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

- **सांगली जिल्ह्याची भौगौलिक परिस्थिती :-**

महाराष्ट्राच्या दक्षिण व अग्नेय दिशेला आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे ८,५७२ चौ.किमी असुन जिल्ह्याच्या उत्तरेला व वायव्येला सातारा उत्तर व ईशान्येला सोलापूर, पूर्वेला विजापूर (कर्नाटक), दक्षिणेला बेळगांव (कर्नाटक), नैऋत्येला कोल्हापूर व पश्चिमोल रत्नागिरी हे जिल्हे आहेत. पश्चिमेकडील शिराळा तालुका सह्याद्रीच्या मुख्यरांगेत येतो. जिल्ह्याचा पश्चिम भाग डोंगराळ आहे. कृष्णा खोऱ्याचा परिसर सपाट मैदानी स्वरुपाचा आहे. सांगली जिल्ह्यात शिराळा, वाळवा, तासगांव, खानापूर, विटा, आटपाडी, कवठेमहांकाळ, मिरज, पलूस, जत व कडेगांव इ. तालुके आहेत. जिल्ह्यात प्रत्येक ठिकाणी भिन्नभिन्न भौगोलिक आर्थिक व सामाजिक स्थिती आहे. जत, आटपाडी, कवठेमहांकाळ हे कायम दुष्काळी तालुके आहेत. पलूस मिरज, वाळवा या तालुक्यातील गावांना कायम पुराचा धोका असतो. तसेच एका टोकाच्या शिराळा तालुक्यात जंगल आहे. तर दुसरीकडे जत तालुक्यात ओसाड जमिन आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर असलेल्या सांगलीचा निम्मा लोकव्यवहार हा कानडी भाषेत चालतो. जिल्ह्याची पूर्व-पश्चिम लांबी २०५ किमी व उत्तर-दक्षिण लांबी ६६ किमी आहे.

सांगली जिल्हा कृष्णा वारणा नदी व उत्तरेस महादेवाच्या डोंगराखालील पठार व माणगंगा नदीच्या पात्रात वसला आहे. कृष्णा नदीची जिल्ह्यातील लांबी १०५ किमी आहे. जिल्ह्याचे तापमान किमान १४ अंश सेंटिग्रेड व कमाल ४२ अंश सेंटिग्रेड या दरम्यान आहे.

जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ४००-४५० मिली लीटर आहे. जिल्ह्याची २००१ सालची लोकसंख्या २८, २०, ५७५ इतकी आहे.

कृष्णाकाठची अतिशय सुपीक जमिन सांगलीला लाभलेली आहे. त्यामुळे येथे भाजीपाला, ऊस, द्राक्षे, ज्वारी, बाजरी, भात (तांदूळ), गहू, मका, भुईमुग, हळद, सोयबीन, डाळिंब व कापूस इ. प्रमुख पिके घेतली जातात.

- **शेतमजूर म्हणजे काय?**

जे व्यक्ती दुसऱ्याच्या शेतावर रोजंदारीच्या अपेक्षेने काम करते, तिला शेतमजूर म्हणतात.

- **महिला शेतमजूर होण्याची कारणे :-**

महिला मोठ्या संख्येने कृषी कामगार होतात त्यास पुढील कारणे जबाबदार आहेत.

**१. पतीचे व्यसन :-**

अनेक महिला कृषी कामगारांचे पति व्यसनी असतात. त्यांचे घरात लक्ष नसते. अशावेळेस त्या महिलेला घरखर्च चालविण्यसाठी, कुटुंबाच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी शेतात कामाला जावे लागते.

**२. सहजासहजी मिळणारा रोजगार :-**

शेती क्षेत्रात काम करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, अर्ज किंवा कोणाची शिफारस लागत नाही. तोंडी कोणीतरी सांगते आणि कामावर हजर व्हायचे, अशा रितीने सहजासहजी रोजगार मिळत असल्यामुळे महिला शेतमजूर होतात.

**३. कुटुंबाला हातभार :-**

आजच्या महागाईच्या काळात कौटुंबिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे स्त्रियांना असे वाटते की आपणही घरी बसण्यापेक्षा शेतात कामाला जाऊन पैसे मिळविले तर तेवढाच कुटुंबाला हातभार लागेल.

**४. घटस्फोटित किंवा विधवा स्त्री :-**

घटस्फोट झालेल्या किंवा विधवा स्त्रिला आपला व आपल्या मुलाबाळांचा खर्च भागविण्यासाठी, संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी पार पाडण्यासाठी तिला शेतात कामाला जावे लागते.

**५. एकत्र कुटुंब :-**

स्त्रियांना घराबाहेर पडताना महत्त्वाचा प्रश्न मुलांचा सांभाळ कसा होईल, हा असतो. एकत्र कुटुंबात ती राहत असेल तर मुलांचा सांभाळ घरातील इतर सदस्य करु शकतात आणि ती शेतात कामाला जाऊन कुटुंबाला हातभार लावू शकते.

- **महिला शेतमजूरांच्या समस्या**

महिला कृषी शेतमजूरांना पुढील समस्यांना सामोरे जावे लागते.

**१. कौटुंबिक आर्थिक परिस्थिती :-**

कौटुंबिक आर्थिक परिस्थिती हालाखीच्या असलेल्या अनेक महिला पतीच्या व्यसनामुळे शेतात कामाला जात असतात. दिवसभर शेतातली कष्टाची कामे करुन त्या घरी येतात आणि पती दारुसाठी तिला मारझोड करुन तिच्या मिळालेल्या कमाईतील हिस्सा ते हिसकावून घेतात. अशारीतीने दिवसभर कष्ट करुनही तिला घरी स्वास्थ, विश्रांती मिळत नाही आणि तिची आर्थिक परिस्थिती सुध्दा सुधारत नाही.

**२. हीन दर्जा :-**

शेतमजूर महिलेला समाजात हीन दर्जा मिळतो. आर्थिक दर्जावर सामाजिक दर्जा अवलंबून असतो. तिला मिळणारे वेतन कमी असल्यामुळे तिची दारिद्र्यातून सुटका नसते. ज्या शेमजूर महिलेच्या कष्टावर सर्व जग जीवन जगत असते. सर्वांना अन्नधान्य मिळत असते. त्या स्त्रीची समाजाकडून उपेक्षा केली जाते.

**३. अज्ञान व असंघटितपणा :-**

घटनेच्या बळावर श्रमिक वर्ग आपल्या मागण्या मान्य घेतात. पण स्त्री शेतमजूर या विखुरलेल्या असतात. त्यांच्या संघटना नसल्यामुळे त्यांना पुरेसे वेतन मिळावे म्हणून त्या चळवळी करीत नाहीत. त्यांची सौदाशक्ती कमी असल्यामुळे त्यांना वेतन कमी मिळते. तसेच त्यांच्या अशिक्षितपणामुळे, अज्ञानामुळे त्यांना कायद्यांबाबत आणि त्यांच्या अधिकारांबाबत जाण नसते.

**४. बालसंगोपनाच्या समस्या :-**

शेतमजूर महिलेला घरापासून बरेच लांबवर शेतात कामाला जावे लागते. मुलांचा सांभाळ करायला कुणी नाही पण दारिद्र्यामुळे कामाला जावे लागते. मुले दिवसभर कुठेतरी फिरत असतात आणि त्यातून काही कारणास्तव मुले दगावण्याची किंवा त्यांच्यावर योग्य संस्कार न होण्याची शक्यता असते.

**५. कष्टप्रद काम :-**

शेतातील काम कष्टाचे असते. प्रचंड उन्हात आणि पावसात तासनूतास थांबून काम करावे लागते. दारिद्र्यामुळे शेतमजूर महिला अनेकवेळा आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष करुन काम करीत असते. रोजची कमाई जाईल. म्हणून मी मासिक धर्मात, दिवस असताना किंवा बाळंतीण झाल्यावरही लगेच हे कष्टाचे काम करते. पण याचा तिच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो, अनेक आजारांना ती लवकर बळी पडते.

- **निष्कर्ष :-**

१. कुटुंबाचा आर्थिक दर्जा कमकुवत असल्यामुळे स्त्रीला शेतमजूर म्हणून काम करावे लागल्याचे दिसते.
२. स्त्रीयांची शैक्षणिक पात्रता कमी असल्यामुळे बौध्दिक कामाऐवजी त्यांना शेतमजूर म्हणून काम करावे लागल्याचे आढळते.
३. कष्टाचे काम असून देखील पुरुषांपेक्षा स्त्रीला कमी वेतन मिळते यावरुन तिची हीन दर्जेची पातळी समजते.
४. अशिक्षितपणामुळे आणि आर्थिक कमकुवतपणामुळे तिचे बालसंगोपनाकडे आणि स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.

- **सूचना :-**

१. शेतमजूर स्त्रीयांचा शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे.
२. स्त्री-पुरुष समानता असूनदेखील तिला बरोबरीने वेतन मिळत नाही ते मिळाले पाहिजे.
३. शासनाने शेतमजूर स्त्रीयांच्या आरोग्यासाठी खास सोई-सुविधा उपलब्ध केल्या पाहिजेत.

- **संदर्भ सूची :-**

१. पवार शरद-दुसरी हरित क्रांती - अमेय प्रकाषन- पृष्ठ क्र. २८
२. ॅपापचमकपंण्पदझंहतपबनसजनतम
३. वाणी निता सुधाकर - ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजूरांचे योगदान व त्यांच्या समस्या - अर्थसंवाद - २०१६ - त्रैमासिक - खंड-४२-अंक-४-पृ.क्र.-३८२
४. वाणी निता सुधाकर-ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजूरांचे योगदान व त्यांच्या समस्या - अर्थसंवाद - २०१६ - त्रैमासिक - खंड - ४२ - अंक - ४ - पृष्ठ क्र. - ३८३ व ३८४

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# महिला सक्षमीकरणात स्वयंसेवी संस्थेची भूमिका''संदर्भः युसूफ मेहेरअली सेंटर तारा, पनवेल, रायगड.

**डॉ. रमेश प. म्हात्रे**
*महात्मा फुले महाविद्यालय पनवेल, रायगड.*

**प्रस्तावना**

महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, महादेव गोविंद रानडे, अण्णासाहेब कर्वे या सर्वांनी घरचा प्रखर विरोध पत्करून, प्रसंगी शेणा-दगडाचा मारा सोसून, समाजातल्या कर्मठ व प्रतिष्ठित म्हणवणा-यांच्या कुचेष्टा सहन करुन स्त्रीला सक्षम बनवण्याचा चंगच बांधला. त्यासाठी महिलांना शिक्षण देण्याची गरज होती. त्यांना स्वावलंबी करण्याची गरज होती. निराधार स्त्रियांना, ज्यांना समाज आपल्या मध्ये मिसळू देत नव्हता त्यांना आधार देण्याची गरज होती. जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री–शिक्षणाची सुरुवात केली. निराधार आणि विधवा महिलांना आधार दिला. स्वत:च्या घरात त्यांना आश्रय देउन सुरक्षित केले.

आज जी सक्षम महिला दिसत आहे ती या सगळयांनी केलेल्या अथक परिश्रमाचा परिपाक आहे. आजची स्त्री सक्षम आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून वावरते आहे. पण या सक्षमीकरणाचा अर्थ असा नाही की तिने पुरुषांवर कुरघोडी करावी, त्यांना कमी लेखावे. त्यांच्या विरोधात जावे कारण पुरुष आणि स्त्री एकाच रथाची दोन चाके आहेत आणि ती दोन्ही सारखीच सक्षम असायला हवीत तरच संसाराचा आणि पर्यायाने समाजाचा रथ व्यवस्थित चालू शकेल. स्त्रीचं जर सक्षमीकरण करायचे असेल तर प्रथम स्त्रीमधील निद्रिस्त असलेल्या आत्मविश्वासाला जागं करण्याची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

संशोधन कार्यात संशोधनकर्ता कशाचा अभ्यास करणार आहे. तो अचूक व नेमका कसा असणार आहे. त्यामुळे काय साध्य होणार आहे या प्रश्नांची उत्तरे म्हणजे संशोधन कार्याची उद्दिष्टे होय. ही उद्दिष्टे संशोधन कार्यातील समस्येचे उत्तर शोधण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांना किंवा संशोधन पध्दतीला दिशा देण्याचे काम करतात. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१. महिला सक्षमीकरणाची संकल्पना अभ्यासणे.
२. युसूफ मेहेरअली सेंटरच्या विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.
३. महिला सक्षमीकरणाची संकल्पना अभ्यासणे.
४. महिला सक्षमीकरणामध्ये युसूफ मेहेरअली सेंटर तारा या स्वयंसेवी संस्थेचे योगदान अभ्यासणे

**संशोधनाची गृहीतके**

गृहीतकृत्य संशोधकांना संशोधन कार्यात मार्गदर्शक ठरतात व दीपस्तंभाप्रमाणे दिशा दाखवतात. म्हणजे संशोधकाला त्यांच्या ध्येयपूर्तीपर्यंत पोहचण्यास मदत करतात. सर्वसामान्यपणे गृहीतकृत्य आपल्या संशोधनाच्या विषयाशी मिळते-जुळते असावे लागतात. परिणामी संशोधन कार्यातील अडथळे आपोआप दूर होतात. मी एक संशोधिक या नात्याने अभ्यास विषयाशी सुसंगत असे गृहितकृत्ये निर्माण करून त्यानुसार संशोधनाचा प्रवास केला आहे.

१. युसूफ मेहरअली सेंटर या स्वयंसेवी संस्थेमुळे महिला सक्षमीकरणाला चालना मिळाली आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्राथमिक तथ्ये संकलन करण्यासाठी खालीलप्रमाणे स्त्रोताचा अवलंब केला आहे. मुलाखत अनुसूची तयार करताना अतिशय काळजी घेतली असून यामध्ये बहुतांश प्रश्न हे होय, नाही अशा उत्तराच्या स्वरूपाचे आहेत. अशा प्रश्नांमुळे उत्तरदात्यांचा कमीत कमी वेळ खर्च होईल, याचबरोबरच काही विशिष्ट प्रश्न बहुउपयोगी स्वरूपाचीदेखील देण्यात आलेली आहेत. जेणेकरून प्राप्त होणारी माहिती ही अधिक सयुक्तिक व आवश्यक स्वरूपातील मिळण्यास मदत होईल. प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचा आधार घेतला आहे. महिलाविषयक लघुशोध निबंध, संशोधन पत्रिका या सर्वांच्या आधारे दुय्यम माहिती मिळविली आहे. याबरोबरच विविध संस्थांची प्रकाशने, विविध ग्रंथ, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिक, साप्तहिके, अहवाल यांची दुय्यम माहिती संकलन करण्यासाठी प्रामुख्याने उपयोग झाला.

**महिला सक्षमीकरणाची संकल्पना**

महिलांच्या संदर्भात 'सक्षमीकरण' हा शब्द मागील दशकापासून वापरला जातो. परंतु त्याला ख-या अर्थाने सन १९६५ पासून महिला मुक्तीच्या चळवळीमुळे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर चर्चीले जात आहे. त्यामुळेच सन १९८५ मध्ये नैरोबी येथे भरलेल्या 'आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत', ''महिलांना पुरुषांबरोबर कायदेशीर, राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात तसेच शाररिक, मानसिक व त्यांच्या कुटुंबात अथवा समुदायात आणि राष्ट्राच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीमध्ये निर्णय घेण्याचे स्वातंत्र व स्वायत्तता दिली जावी'' अशी घोषण करण्यात आली.

**स्वयंसेवी संस्थेची संकल्पना**

प्रख्यात मराठी विचारवंत **प्रा. स. ह. देशपांडे** यांनी स्वयंसेवी संस्थांच्या संकल्पनेबद्दलचा आपला विचार मांडताना असे म्हटले आहे की, ''सर्वसामान्य जनतेचे, विशेषत: अतीव गरीब, गरजू आणि मागासलेल्या वर्गाचे निकडीचे प्रश्न हातात घेऊन ते सोडविण्याचा प्रयत्न करणा-या शासकीय किंवा निमशासकीय क्षेत्राबाहेरच्या नफा हेतू नसलेल्या म्हणजेच समाजसेवा हा प्रधान हेतू असलेल्या आणि बाहय नियमावलीच्या फारशा अधीन नसलेल्या संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होय.

**युसूफ मेहेरअली सेंटर, तारा**

युसूफ मेहेरअली सेंटर, तारा ही संस्था एक स्वयंसेवी संघटना आहे. नि:स्वार्थी वृत्तीने आणि कोणताही नफा प्राप्त करण्याचे उद्दिष्टे नसलेली संस्था आहे. समाजोपयोगी सेवा उपलब्ध करून देणारी यंत्रणा म्हणून कार्य करते. युसूफ मेहेरअली सेंटर या संस्थेची स्थापना सन १९६६ मध्ये डॉ. झाकीर हुसेन यांच्या हस्ते झाली आहे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार स्थापन झाले असून संस्थेचा रजिस्टर नं. बी.पी.टी. ॲक्ट – १९५० एफ १९७२ बॉम्बे हा आहे.

**संस्थेचे विविध उपक्रम**

**१. मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य पुरवठा**

आदिवासीना कोणत्याही प्रकारचे उपचार करायचे असल्यास त्यांना ते मोफत केले जातात. तसेच काही व्यक्तींचे उत्पन्न जर ५० हजारपेक्षा कमी असेल अशा व्यक्तींकडून त्यांच्यावर आकारला जाणारा कर हा कमी असतो.

**२. होतकरु तरुणांसाठी मोफत प्रशिक्षण**

युसूफ मेहेरअली सेंटर, तारा या संस्थेच्या परिसरातील गावे व आदिवासी वाडयांमधील तरुणांसाठी या संस्थेमध्ये काही उपक्रम राबवले आहेत. त्यामध्ये हाउस वायरिंग हा कोर्स शिकविला जातो. विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची व जेवणाची सोय केली जाते.

**३. महिलांसाठी शिवणकाम प्रशिक्षण**

शिर्की, आपटा, तारा इत्यादी तसेच इतर आसपासच्या खेडेगावांमधील स्त्रियांसाठी शिवणकाम प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी शिलाईयंत्र विकत घेण्यासाठी संस्था अनुदान पुरविते.

**४. महिला संघटन आणि सक्षमीकरण**

युसुफ मेहेरअली सेंटर, तारा या संस्थेने स्त्रियांच्या मध्ये जागृती आणण्यासाठी महिला बचत गट तयार केले. महिला बचत गट तयार करून दिल्यानंतर महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिलांना एकत्रित येवून स्वत:चा विकास घडऊन आणण्यासाठी संस्था अनुदान पुरविते.

**५. आदिवासी मुलींसाठी मोफत शिक्षण**

युसूफ मेहेरअली सेंटर याने सुरु केलेल्या शैक्षणिक संकुलात आदिवासी मुलींना मोफत शिक्षण दिले जात आहे. या संस्थेने भानुबेन प्रवीण शहा महाविद्यालय १९९० साली स्थापन केले आहे. त्याचप्रमाणे त्या मुलींना राहण्यासाठी वसतिगृह स्थापन करण्यात आले आहे. तसेच त्यांना लागणारे साहित्य, वहया, पुस्तके, गणवेश, चहा, नाश्ता यांची मोफत सोय केलेली आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारे उपक्रम**

सामाजिक बांधिलकी असणा-या अनेक प्रकारच्या समूहांपैकी स्वयंसेवी संस्थांचे समाज विकासातील कार्य हे दखलपात्र स्वरूपाचे आहे. या स्वयंसेवी संस्था समाज विकासातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबवितात त्याचप्रमाणे पनवेल तालुक्यातील युसूफ मेहरअली सेंटर या स्वयंसेवी संस्थादेखील महिला सक्षमीकरणासाठी वेगवेगळया स्वरूपाचे उपक्रम राबवतात. युसूफ मेहरअली सेंटर या स्वयंसेवी संस्थेमार्फत महिला सक्षमीकरणासाठी आरोग्याविषयी जनजागृती, स्वयंरोजगार विषयक प्रशिक्षण तसेच शैक्षणिक जनजागृती तसेच राजकीय जनजागृतीसाठीचे उपक्रम राबविले जातात.

प्रत्यक्ष सर्वेक्षणावरून ४० टक्के महिलांचे वार्षिक उत्पन्न ५००००/- ते १०००००/- असल्याचे आढळून आले. २० टक्के महिलांचे वार्षिक उत्पन्न १०००००/- ते १५००००/- तर ३० टक्के महिलांचे वार्षिक उत्पन्न १५००००/- ते २०००००/- तसेच १० टक्के महिलांचे वार्षिक उत्पन्न २०००००/- ते पुढे असल्याचे दिसून आले. परंतु कमी उत्पन्न असलेल्या महिलांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येत आहे.

**महिलांना झालेले शैक्षणिक फायदे**

युसूफ मेहेरअली सेंटर ही स्वयंसेवी संस्था महिलांच्या सक्षमीकरणासाठी काम करत असताना शैक्षणिक क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी संस्थेचे किती योगदान आहे. युसूफ मेहेरअली सेंटरमध्ये सहभागी झाल्यानंतर ९२ टक्के महिलांच्या मते युसूफ मेहेरअली सेंटर या स्वयंसेवी संस्थेमुळे मुलांच्या शिक्षणांची सोय झाली ८८ टक्के महिलांच्या मते गावामधील साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. २० टक्के महिलांच्या मते सर्व लोकांना तसेच मुलांना शिक्षणाचे महत्त्व समजले आहे. ९६ टक्के महिलांच्या म्हणण्यानुसार आदिवासी मुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. ३६ टक्के महिलांच्या मते शिक्षणामुळे अंधश्रध्दा कमी झाली आहे. लोक जादुटोणा, भगत यांच्याकडे जाण्याऐवजी आजारी पडल्यावर हॉस्पीटलमध्ये जाऊन उपचार घेतात. १२ टक्के महिलांच्या मते शिक्षणाची सोय झाल्यामुळे लोकांना तसेच महिलांनादेखील आर्थिक व्यवहार समजू लागले आहेत.

**महिलांना झालेले कौटुंबिक फायदे**

महिलांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा करताना त्याची सुरुवात कुटुंबापासून करावी लागणार आहे. त्यामुळे ज्या वेगवेगळया घटकांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया चालू आहे. त्यापैकी युसूफ मेहेरअली सेंटर या स्वयंसेवी संस्थेने महिलांचा कौटुंबिक दर्जा उंचावण्यासाठी किंवा महिलांना कुटुंबात मान-सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. हे पाहात असताना ८८ टक्के महिलांचा कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला तसेच ८८ टक्के महिलांच्या घरात त्यांना रोजगार उपलब्ध झाल्यामुळे महिलांच्या उत्पन्नात वाढ झाली व त्यामुळे त्यांच्या घरात गरजेच्या वस्तू आल्या आहेत. महिलांच्या हातात पैसा आल्यामुळे २८ टक्के महिलांच्या मुलांचे आरोग्य व शिक्षण याचा दर्जा सुधारला आहे. तसेच रोजगार उपलब्ध झाल्यानंतर व उत्पन्नात वाढ झाल्यानंतर २८ टक्के महिलांना त्यांच्या कुटुंबात मान मिळाला त्या मानानी जगू लागल्या.

**महिलांना झालेले सामाजिक फायदे**

युसूफ मेहेरअली सेंटरमध्ये सहभागी झालेल्या महिलांपैकी काही लाभार्थी महिलांची मुलाखत घेतली असता असे निदर्शनास आले की युसूफ मेहेरअली सेंटरमध्ये सहभागी झाल्यानंतर ७२ टक्के महिलांना समाजात मान मिळाला. तर ३२ टक्के महिलांमध्ये नेतृत्व कौशल्य निर्माण झाले. ३६ टक्के महिलांना आपल्या समस्यांची जाणीव झाली तर ५८ टक्के महिलांना समस्या सोडवण्याचे मार्ग समजले. २४ टक्के महिलांना संघटनेचे महत्त्व समजले. ४८ टक्के महिलांना आरोग्याच्या समस्या आणि महत्त्व समजले. २८ टक्के महिलांचा समाजातील दर्जा उंचावला. ३२ टक्के महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळाली. १२ टक्के कौशल्य महिलांचे संवाद कौशल्य विकसित झाले. अतिशय महत्त्वाचे म्हणजे १०० टक्के महिलांचा कुटुंबातील निर्णयांमध्ये सहभाग वाढला त्याचप्रमाणे १०० टक्के महिलांच्या आत्मविश्वासात वाढ झाली.

**निष्कर्ष**

१. ग्रामीण विकासासाठी व महिलांसाठी युसूफ मेहेरअली सेंटर ही स्वयंसेवी संस्था कार्य करते. त्यामुळे महिला आर्थिकदृष्टया सक्षम झाल्या आहेत.

२. बचत गटात सहभागी झाल्यानंतर त्या महिलांना रोजगार उपलब्ध झाला व त्याच्या उत्पन्नात वाढ झाली.

३. युसूफ मेहेरअली सेंटरच्या योगदानामुळे महिलांचे वेगवेगळया क्षेत्रांत पदार्पण व सुधारणा झालेली आहे.

४. महिलांना सामाजिकदृष्टया सक्षम बनविण्याचे कार्य युसूफ मेहेरअली सेंटर या स्वयंसेवी संस्थेने केले आहे.

५. युसूफ मेहेरअली सेंटर या संस्थेच्या मार्गदर्शनामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे

**संदर्भ सूची**

१. हिंगोले रेखा, स्त्री सक्षमीकरण आणि स्वयंसेवी संघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठातील पीएच.डी. चा अप्रकाशित शोध प्रबंध, २००२,पृ.०३.

२. Joroland : Empowering woman for Development study material,Tata Reserach Institute of woman studies, Tuljapur, P.59.

३. गुप्ता कमलेश कुमार, महिला सशक्तीकरण, बुक एनक्लेव,जयपूर २००५,पृ.०१.

४. हिंगोले रेखा, स्त्री सक्षमीकरण आणि स्वयंसेवी संघटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठातील पीएच.डी. चा अप्रकाशित शोध प्रबंध, २००२,पृ.०३.

५. Batliwala Shrilata : Empowerment of woman in south Asia, (FFHCFAO) study material Tata Research Institute of woman studies, Tuljapur, 1993,P.08.

६. द्विवेदी राकेश : महिला सशक्तिकरण, चुनौतियॉ एवं रणनितियॉ, पूर्वोक्त
पृ,१७३–१७६.

७. सिंह मिनाक्षी निशांत : महिला सशक्तीकरण का सच, आमेया पब्लीकेशन, दरियागंज,
नई दिल्ली, २००५, पृ.१५४

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor 7.265, ISSN: 2230-9578, April-2021, Volume-11, Issue-10 "Recent Trends in Social Sciences"

# ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च, तंत्र व कौशल्य शिक्षण/प्रशिक्षणाच्या असूविधा आणि गळतीची कारणे

***श्री. संतोष नारायण निकम***

*संशोधक अभ्यासक, ग्रामीण विकास, मुंबई विद्यापीठ*

**प्रस्ताविक:—**

मानवामध्ये जन्मजात सुप्तरूपात असलेले गुण, कौशल्य व्यक्त करण्याची क्षमता विकसित करणे हे शिक्षणाचे आद्य कर्तव्य मानले आहे. तसेच मानवाच्या चारित्र्याचा विकास करण्याचे उदिष्ट शिक्षणाने सिध्द होते. कर्तव्य आणि उदिष्ट यांचा विचार करता भारतीय शिक्षण व्यवस्था आणि भारतामध्ये पूर्वापार चालत आलेल्या तद्वतच समकालिन प्रचलित शैक्षणिक पध्दतींमध्ये या दोन्ही गोष्टींचे भरीव कार्य दिसून येत नाही. आज २१व्या शतकात तरी ग्रामीण भागात उच्च, तंत्र व कौशल्य शिक्षणात गळतीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असल्याचे जाणवते. त्यामुळे भविष्यात उच्च शिक्षणाबाबत शासनाच्या धेय्य धोरणांनुसार घेत असलेल्या घातक निर्णयांमुळे मोठे परिणाम दिसून येतील. शिक्षणाच्या होणारे खाजगीकरणामुळे स्वायत्त महाविद्यालये/संस्था आणि शासनाच्या यंत्रणेतील विद्यापीठे बिनकामी होण्याची भिती निर्माण झालेली आहे. ग्रामीण विकासाचा अभ्यास करताना पारंपारिक शिक्षणाचा अभाव सर्वच स्तरांवर जाणवतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या जीवनातील हा महत्वाचा आणि निर्णायक काळ असतो. या काळात ते ख—या अर्थाने मानसिक, शारिरिक व बौध्दीक व इतर व्यवहारिक बाजूने विकसित होत असतात. परंतु त्याकाळात त्यांच्यावर संस्कार झाले नाहीत, त्यांच्या क्षमतांचा ज्ञान झाल नाही किंवा त्यांच्या आर्तगुणांना उत्तेजीत केले नाही तर जीवनातील येणा—या संकटांना तोंड देवून स्वत:ला सिध्द करू शकत नाही. त्याचे शिक्षण हा फक्त अभ्याक्रम म्हणून राहिल्यास सामाजिक, मानसिक उर्जा निर्माण करून नवीन पिढी घडविता येणार नाही. भविष्यात अडचणींना सामोरे जाताना शिक्षण आणि शिक्षकांचे मार्गदर्शन न झाल्यास हा विद्यार्थी सजीवतेकडून निर्जिवतेकडे संकूचित वृत्तीने प्रवास करतो हे निश्चित आहे. आज ग्रामीण भागात उच्च व कौशल्य शिक्षणात ही समस्या मोठया प्रमाणात असताना संशोधक शिक्षणतज्ञ आणि अभ्यासकांनी पुरेसे लक्ष दिलेले दिसत नाही. त्यामुळे या संशोधनाच्या विषयात अभ्यास करणे आवश्यक आहे.

**शिक्षणाची संकल्पना आणि अर्थ :—**

शिक्षण म्हणजे व्यक्त रूप देणे किंवा अंतर्गुण बाहेर काढणे असा होतो. म्हणजेच व्यक्तीमध्ये जे जे सुप्तरूपात आहे, त्याला व्यक्त स्वरूप सजविणे म्हणजे शिक्षण होय. शिक्षण प्रदान करणे म्हणजे शारिरिक आणि आत्मशक्तीस जितकी क्षमता असेत तितके पूर्णत्व आणि सौदर्य प्राप्त करून देणे होय. 'शिक्षण देणे म्हणजे ज्यात पूर्ण सूख समाविष्ट आहे. अश 'सत्यम, शिवम, सुंदरम्' गोष्टीच्या चिंतनाचा आस्वाद घेणे होय. अशा रितीने व्यक्तीच्या सुप्त शक्तीचा प्रामुख्याने मानसिक शक्तीचा विकास साधणे होय. शिक्षणाचा अर्थ या मुद्यांच्या आधार स्पष्ट होतो:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण प्रक्रिया स्वरूप असते. | ४ | शिक्षणामूळे व्यक्तीच्या सुप्त शक्तीचा विकास होतो. |
| २ | शिक्षणातून व्यक्तीचा शारिरिक व मानसिक विकास साध्य होतो. | ५ | शिक्षण समाजधारणेस पोषक असते. |
| ३ | शिक्षणातून सत्य, शिव आणि सुंदरत्वाचा समावेश होतो. | ६ | शिक्षणातून कोणत्याही परिस्थितीशी तडजोड करण्याची क्षमता प्राप्त होते. |

प्राचीनकाळी गुरूकुलामधून शिक्षण देण्यात येते असे. त्याकाळी शिक्षणाचे निर्धारण वर्णव्यवस्थेत होत असे. या शिक्षणात भाषा, व्याकरण, शास्त्र, आयुर्वेद, राजनीती, धनुर्विद्या इ. विषयाचे शिक्षण दिले जाई. तर बौध्द कालखंडात शिक्षणाचा मोठया प्रमाणात प्रसार होवून नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशा प्रसिध्द विद्यापीठातून अनेक विषयांसोबत धार्मिक शिक्षण देण्यात येई. तसेच १२व्या शतकापर्यंत ही व्यवस्था होती. पुढे मोगल अमदानीत मदरशामधून औपचारिक शिक्षण देण्यात येत असे.

इ.स. ११व्या ते १८व्या शतकापर्यंत मदरशांतून धार्मिक शिक्षण देण्यात येत होते. अकबराच्या राजवटीत त्यांनी शिक्षणात अनेक सुधारणा केल्या मात्र संस्कृतची जागा पर्शियन भाषेने घेतली. १७व्या शतकात ईस्ट इंडिया कंपनीने भारतात प्रवेश केल्यावर इंग्रजी धर्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यामूळे शाळा, महाविद्यालये औपचारिक शिक्षण देवून अभ्यासक्रमाची आखणी सहेतूक करण्यात आलेली होती. सन १९३० ते १९५० या कालखंडात भारतीयांच्या साक्षरतेत भर पडली. स्वातंत्र्योत्तर भारतीय संविधान मान्य पावले. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, समान न्याय ही मुल्ये आदर्श मानण्यात आली. शिक्षण आयोगाची

स्थापना सन १९८६ झाली आणि भारतीय राज्य घटनेत शिक्षणविषयक धोरणांच्या केलेल्या तरतूदींमूळे शिक्षणाचा प्रसार झाला.

**शिक्षणः— महती, कार्ये व उदिष्टये :—**

मानव जातीच्या उत्पत्तीपासून वेगवेगळया पध्दतीने शिक्षण घेऊ लागला होता. त्यामध्ये तो घरामध्येच आपल्या माता—पित्यांकडून वंश—परंपरागत शिकविले जाणारे शिक्षण घेत होता. तद्वतच वेद काळापासून ऋषी मूनींच्या सानिध्यात राहून मानव आपली शिक्षण विद्या पुर्ण करीत होता. फार वर्षापुर्वी शिक्षणाची गुरूकुल पध्दत मानली जात होती. त्यानंतर समाज रचना झाल्यावर समाजामध्ये बालकांना प्रथम समाजिक, व्यवहारिक, प्रापंचिक, सांस्कृतिक शिक्षण शिकविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

प्राचिन काळी मोठ—मोठे विव्दान हे संस्कृत मधून शिक्षण घेत होते. त्यामूळे बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित राहिलेला दिसतो. समाजात शिक्षण नसल्याने मोठी हानी होत असल्याचे लक्षात आल्यावर प्रथम महात्मा जोतीबा फुले शिक्षणासाठी मोठे कार्य केले आहे. तव्दतच शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराजांनी सर्वागिण शिक्षणासाठी प्रयत्न केले आहेत तर बहुजनांच्या शिक्षणासाठी क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुलेंच्या विचाराचा वसा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठे कार्य केले आहे. २१व्या शतकातही शिक्षण शास्त्रातील पारंगत तज्ञांनी शिक्षणाबाबतची प्रगत विचारांची मांडणी केलेली असल्यामूळे शिक्षणशास्त्र मोठया प्रमाणात विकसित झाले आहे. थोडक्यात एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे व एकस समूह समुदायातून दुस—या—समुदायाकडे ज्ञान मिळते. व्यक्तीचा सर्वागिण विकास करणारी, व्यक्तीच्या सुप्त गुण आणि शिस्त विकसित करणारी प्रक्रिया म्हणजेच शिक्षण होय.

**१.४ शिक्षणाची कार्येः—**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन्मजात शक्तीचा विकास | ८ | वृद्धापकाळाची तयारी |
| २ | मूलभूत प्रवृत्तींचे नियंत्रण | ९ | सामाजिक नियंत्रण |
| ३ | व्यक्तिमत्वाचा विकास | १० | सामाजिक परिवर्तन |
| ४ | सामाजिक गूणांचा विकास | ११ | नविन सामाजिक पद्धतीचा विकास |
| ५ | संस्कृती संपादन, संरक्षण, वृद्धी व संक्रमण | १२ | राष्ट्रीय विकास |
| ६ | चारित्र निर्मिती | १३ | भावनिक ऐक्य निर्माण करणे |
| ७ | सुयोग्य नागरिकांची निर्मिती | १४ | फुरसतीच्या वेळेचा सदूपयोग |

**१.५ राष्ट्रीय जीवनातील शिक्षणाची कार्येः—**

एकाच भौगोलिक प्रदेशात वास्तव्य करणारा, समान वंश असलेल्या लोकांचा समूह म्हणजे राष्ट्र होय. समान संस्कृती, समान भूप्रदेश असल्यामूळे प्रबळ ऐक्य असलेल्या मानवी समूहास राष्ट्र म्हणतात.

| | | |
|---|---|---|
| भाविक ऐक्य निर्माण करणे | कूशल कार्यकर्त्यांची निर्मिती | समर्थ नेतृत्वाची निर्मिती करणे |
| सहिष्णूता निर्माण करणे | कर्तव्याची जाणीव निर्माण करणे | राष्ट्रीय भावनेचा विकास करणे |
| राष्ट्र भाषेतून शिक्षण देणे | | |

**शिक्षणाची सर्वसामान्य उदिद्ष्टयेः—**

शिक्षणाची उदिद्ष्टये ही स्थळानुसार, काळानुसार व तत्वज्ञानानुसार बदललेली दिसून येतात.

१. **ज्ञानात्मक उदिद्ष्टयेः—**१) ज्ञानप्राप्ती २) मासिक शक्तीचा विकास ३) साक्षरता ४) उपयोजन कौशल्य ५) व्यावसायिक शिक्षण

२. **चारित्र्य निर्मितीचे उदिद्ष्टेः—**१) शारिरिक विकास २) नैतिक आध्यात्मिक विकास ३) चारित्र्य निर्मितीचा विकास ४) व्यक्तिगत पात्रतेचा विकास ५) सामाजिक जबाबदारीची व राष्ट्रीयत्वाची जाणीव

३. **सांस्कृतिक उदिद्ष्टयेः—**१) संस्कृती संक्रमण व संस्कृती संवर्धन २) सौंदर्याभिरूची व रसिकतेचा विकास ३) फुरसदीचा सदुपयोग

**शिक्षण प्रसारामुळे राष्ट्रीय प्रगतीः—**१) शिक्षणाची क्षमता २) आंतरक्रिया ३) स्विकारशीलता ४) भाषाक्षमता ५) निश्चित अनुक्रम ६) शिस्त ७) आकांशा रूजविणे ८) शिक्षणाच्या भूमिका ९) सामाजिक मूल्ये आणि प्रमाणके.

**शिक्षणाचे प्रकारः—**

**१. अनौपचारिक (Informal Education)**

जे शिक्षण कोणत्याही प्रकारच्या औपचारिकतेशिवाय दिले जाते, त्याला अनौपचारिक शिक्षण म्हणतात. मागच्या पिढीने अनुभवातून प्राप्त केलेल्या ज्ञानाचा वारसा तिला लाभलेला असतो. अर्थातः— अनौपचारिक शिक्षण पूर्वनियोजित नसते २. त्याचा आधार अनुभव असतो. ३. ते लिखित स्वरूपात दिलेले नसते ४. त्यात स्वाभाविकता असते ५. हे शिक्षण प्रामुख्याने कुटुंबातून दिले जाते ६.याचे कोणतेही वेळापत्रक व अभ्यासक्रम नसतो ७. बालकास कुटुंबातून मिळणारे शिक्षण अनौपचारिक असते.

**२. शिक्षणः—** (Formal Education)

औपचारिक शिक्षण सुस्थापित पध्दतीव्दारा दिले जाते. या शिक्षणाचे संस्थिकरण झालेले असते. औपचारिक शिक्षण शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्थांचे माध्यमातून देण्यात येते. औपचारिक शिक्षणात १) संस्था २) शिक्षक ३) विद्यार्थी हे घटक महत्वाचे असतात. भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात औपचारिक शिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे. या शिक्षणामूळे जाती व व्यवसायाचे साहचर्य नष्ट करण्यासाठी औपचारिक शिक्षणाचे योगदान महत्वाचे ठरले आहे.

**उच्च, तंत्रव कौशल्य शिक्षणातील गळतीचे स्वरूपः—**

उच्च, तंत्रव कौशल्य शिक्षणातील विद्यार्थी गळतीचे स्वरूप हे अनेक स्तरीय दिसून येते. तर मानसिकतेमुळे परीक्षेत अनुतिर्ण होणे हे महत्वाचे स्वरूप आहे. तसेच या विद्यार्थ्यांच्या उच्च व कौशल्य शिक्षणात अडथळा येणा—या अनेक गोष्टींकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्यामुळे उच्च, तंत्रव कौशल्य शिक्षणात गळती होत असल्याचे जाणवतेः—

१. शिक्षणाची सुविधा नजिकच्या अंतरावर नसते.
२. महाविद्यालयात वसतीगृह सुविधा व पूरक व्यवस्थापन नसणे
३. उच्च, तंत्र व कौशल्य शिक्षणाचा वापर दैनंदिन जिवनात न होणे व त्यामुळे येणारे अपयश
४. शिक्षणाबाबत कौटुंबिक मानसिकता, पाठबळ आणि सकारात्मक विचारांची कमतरता
५. शिक्षणाची शुल्क आवाक्याबाहेर असते
६. रोजगारांसाठी स्थलांतर
७. शिक्षणातील परीक्षा पध्दतींचे स्वरूप व निरर्थक, निरूपयोगी अभ्यासक्रम
९. शिक्षणाच्या अभ्यासक्रमानुसार काम नसणे
१०. सभोवतालची परिस्थिती पुरक अभ्यासक्रम नसल्याने शिक्षणाला दुय्यम स्थान देणे व पुढे दुर्लक्ष करणे
१३ प्रापंचिक व्यवहारात गुंतणे व शिक्षण काळात विवाह तर काम करून शिक्षण घेण्याची मनोवृत्ती व गरज
१४. आर्थिक आवक, शेती व्यवसाय डबघाईला जाणे
१५. शेती जमीन, जमीन प्रश्न मार्गी न लागल्याने मानसिक तणाव
१६. शहरी भागातील विद्यार्थी यांची बरोबरी करात येत नाही
१७. ग्रामीण भागातील शिक्षणाचे भाषाज्ञान आणि उच्च, तंत्रव कौशल्य शिक्षणाच्या भाषा ज्ञानामध्ये फरक असल्याने मातृभाषेतील विद्यार्थी यांना स्वतःला सिध्द करता येत नाही.

**ग्रामीण भागातून उच्च, तंत्रव कौशल्य शिक्षणातील गळतीची कारणेः—**

**१. शेती जमीन प्रश्न निकाली न लागणेः—**

ग्रामीण भागातील जमीन मालकी प्रश्न निकाली न काढल्याने शेती जमीनींचे मोठया प्रमाणात वाद निर्माण झाले आहेत. त्यामुळे १०० वर्षापासून कसवटीखाली असलेली जमीन जमीनदारांनी काढून घेतली. जमीन प्रवेश नसल्याने ग्रामीण समाजचा शेती व्यवसाय डबघाईला आला. त्यामुळे मुख्य व्यवसाय बंद झाल्याने जीवनमान पध्दतीत बदल झाला आणि शिक्षणला दुय्यम निर्माण झाले आहे. त्यामुळे शिक्षणातील मोठी गळती सुरू झाली आहे.

**२. स्थलांतरः—**

ग्रामीण भागातील जमीनी जमीनदारांनी काढून घेतल्यामुळे शेती व्यवसाय डबघाईला आला. पर्यायाने कुटुंब जगविण्याच्या उददेशाने रोजगार, धंद्याच्या शोधात शिक्षणाला दुय्यम स्थान मानून तरूण शहराकडे वळला. त्यामुळे शेती जमीन नसणे हेच शिक्षणातील गळतीचे प्रमुख कारण आहे. ग्रामीण भागात रोजगार नसल्याने शहरांकडे अनेक प्रकारच्या रोजगारांकरिता शहराकडे वळला आहे. पुर्वी संयुक्त कुटुंब पध्दतीत कुटुंब प्रमुख अर्थाजनासाठी स्थलांतरीत झाला तरी शेतीची जोड घेवून गावगाडा हाकत होता. पण विभक्त कुटुंब पध्दतीत कुटुंबे स्थलांतर झाली. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने उच्च शिक्षण न घेता पैशासाठी रोजगाराचा विचार करू लागला. शिक्षणाच्या चाललेल्या खाजगीकरणामुळे

शिक्षणाची शुल्क भरमसाठ वाढली असल्याने काम करून शिक्षण घेणे जिकरीचे झाल्याने गळतीचे प्रमाण वाढले आहे.

**३. अभ्यासक्रम स्वरूप:—**

पुर्वीची गुरूकुल आणि इतर शिक्षण पध्दती होत्या. पुढे ब्रिटिशांनी नव्याने शिक्षण पध्दतीचा अवलंब केला. या शिक्षण पध्दतीला छत्रपती शाहू महाराज यांनी स्विकार करून शिक्षणाचा प्रसार केला. सन १९९१ नंतर जेव्हा जागतीकीकरण व खाजगीकरण तत्वाचा स्विकार केला गेला. तेव्हा नवनवीन प्रयोग करून शिक्षण व्यवस्थेत संभ्रमीत परिस्थिती निर्माण झाली. परीक्षा पध्दती वेगवेगळया राबविण्यात येवून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाचे गुणांकन प्रमाण मानून प्राधान्य देण्यात आले. मातृभाषेतून आलेला विद्यार्थी त्यांचे पुस्तकी भाषिक ज्ञान, गुण वैशिष्टये, चातूर्य, चिकाटी, कष्टाळुपणा यांचा विचार न केल्यामुळे ग्रामीण विद्यार्थी प्रक्रियेतून बाहेर फेकला गेला आणि उच्च शिक्षणात मोठया प्रमाणात गळती निर्माण झाली.

**४. दैनंदिन जिवनात आवश्यक शिक्षणाचा अभाव:—**

भारत हा एकमेव देश असा आहे की, भौगोलिक परिस्थिती, संस्कृती व भाषा यामध्ये विविधता आहे. अशावेळी अभ्यासक्रम ठरविताना तो एक साचा पध्दतीने ठरविणे संयुक्तीक होणार नाही. त्या—त्या भागांसाठी अनुरूप कौशल्य विकसित करणारा अभ्यासक्रम असावा. देश विकासाच्या दृष्टीने फलदायक, संरक्षक आणि विज्ञानाची कास धरणारा अभ्यासक्रम असावा. ग्रामीण विकास हा देशाच्या विकासाचा पाया आहे. परंतु ग्रामीण विकास या विषयाकडे शिक्षणतज्ञ व धोरणकर्त्यांनी अक्षम्य दूर्लक्ष केले असल्याचे जाणवते.

**५.जागतीकीकरण आणि खाजगीकरणामुळे शिक्षण व्यवस्थेत शर्यत:—**

जागतीकीकरण आणि खाजगीकरणामुळे टक्केवारीची शर्यत बघायला मिळते. शिक्षण प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप आणि पैसाच्या जोरावर शिक्षणाचा बटयाबोळ झाला आहे. जे पात्र आहेत त्यांना प्राधान्य न देता फक्त इंग्रजी बोलता येते या भावनेतून आणि पुस्तकी ज्ञानाच्या गुणांने शिक्षण तोलणे योग्य होणार नाही. फक्त पदवी मिळावी आणि उच्च पदावर राहून मोठा पगार घ्यावा या हेतूने शिक्षण घेत असल्याने शिक्षणाची नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे ज्याच्याकडे खरोखरचे कौशल्य आहे, त्याला उच्च शिक्षणात ओढ लागत नाही. म्हणून उच्च शिक्षणात गळती निर्माण झाली आहे.

**६. उच्च, तंत्र व कौशल्य शिक्षणाच्या उपयोगाची हमी:—**

आज उच्च, तंत्र व कौशल्य शिक्षणातून किमान नोकरी, व्यवसाय किंवा अधिकतचे आर्थिक लाभ मिळण्याची हमी असायला हवी, अशी अपेक्षा असते. मात्र या शिक्षण व्यवस्थेतून विद्यार्थामध्ये कौशल्य विकास होत नाही. तसेच मोठया प्रमाणात परीक्षांमध्ये उच्चश्रेणी उत्तीर्ण असून देखील व्यवहारिक पातळीवर सर्वच स्तरांवर अपयशी ठरताना दिसतात. उच्च, तंत्रव कौशल्य शिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याने गळतीचे प्रमाण मोठया प्रमाण होत आहे.

**उपाय योजनांच्या शिफारशी:—**

१. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करण्याकरिता पूरक उद्योगांना प्रोत्साहन व अनुदान देणे.
२. परिस्थिती पुरक उच्च, तंत्र व कौशल्य विकसित अभ्यासक्रम निर्माण करणे.
३. शेती व तेथिल होणा—या फलोत्पानावर प्रक्रिया करण्यासाठी व निर्मितीसाठी कारखाने निर्माण करणे
४. बाजारात आवश्यक गरज विचारात घेवून सातत्याने नाविन्यपूर्ण कौशल्य अभ्यासक्रम तयार करणे.
५. उच्च, तंत्र व कौशल्य शिक्षणात अभ्यासक्रमांचे प्राथमिक ज्ञान असलेल्या मुलांना समाविष्ठ करणे.
६. मुलींकरीता आवश्यक संधी सहज उपलब्ध करणे व प्रोत्सहान भत्ता किंवा इतर मदत देणे
७. दुरस्थ शिक्षण प्रणालीला प्रात्यक्षित परीक्षा व कार्यशाळा घेणे आवश्यक आहे.
८. ग्रामीण मुलांना शिक्षण इंग्रजीतून घेण्यासाठी अभ्यासक्रमात विशेष वर्ग सुरू करावे.
९. परीक्षा पध्दती मातृभाषेतून असावी. तसेच कार्यपध्दती मिश्र भाषेत असावी.
१०.ग्रामीण भागात उच्च, तांत्रिक, कौशल्य शिक्षणासाठी तालुका—तालुका पातळीवर वस्तीगृहासह महाविद्यालये उभारणे आवश्यक आहे.
११.प्रत्येक जिल्हयातील तरूणांना त्या—त्या जिल्हयात होणा—या सर्व प्रत्येक खारखाना, उद्योग, शासकिय, निमशासकिय, माथाडी कामे, सर्व शासकिय बांधकामांसाठी स्थानिक रोजगारांना प्राधान्य देण्यात यावे.

**निष्कर्ष:—**

सारांश, शिक्षण हे स्वत:, कुटुंब, गाव, समाज, राज्य व राष्ट्राच्या उन्नीसाठी महत्वाचा भाग आहे. शिक्षण हि युवा पिढीची गुंतवणूक असून शिक्षण हेच त्याचे योग्य मार्गक्रमण आणि येणा—या संकटावर मात करण्यासाठी ताकद देणारे प्रोटीन आहे. आत्मनिर्भर भारताची घोषणा करणे म्हणेजे सर्वकाही असे

नाही. आत्मनिर्भर भारताचे धेय्य गाठण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला उच्च, तंत्रव कौशल्य शिक्षणासाठी प्रोत्सहान देणे आजची गरज आहे. आपला देश सूजलाम सुफलाम करण्यासाठी चीन, भूतान, रशिया, जर्मनी या देशांसारख्या देशांचा आदर्श डोळयांसमोर ठेवणे गरजेचे आहे. तर चिनसारख्या देशाने जगातील सर्वात मोठी शक्ती अशी ओळख निर्माण केली आहे. उच्च शिक्षणातील गुंतवणुकीतून व परिस्थिती पूरक शैक्षणिक उपक्रमातून भारत ही या दिशेने मार्गक्रमण करून मार्गदर्शन ठरावा ही अपेक्षा आहे. केद्र व राज्य शासनाने आर्थिक अंदाजपत्रकात दरवर्षी शिक्षणासाठी आजपेक्षा जास्त प्रमाणात तरतूद करून ती अंमलात आणली पाहिजे. यासाठी शासनाने ग्रामपंचायत ते केंद्रशासन असा उपक्रम राबवून समाजातील सर्व घकांनी आपली भूमिका समजून घेवून सहकार्य करणे आहे. यामध्ये समाजसेवी/सेवाभावी संस्थाना मोफत सहकार्य करण्यासाठी सोबत घेवून काम करणे आवश्यक आहे. तसे घडले नाही तर भारताचे युवा समाज भारताचे भवितव्य घडविणे शक्य नाही, त्यांचे जिवन गुलामी करणे एवढेच राहील, असा निष्कर्षात आपण येतो.

## Reference


1. **https://mr.vikaspedia.in/**
2. **https://mr.wikipedia.org/wiki**
3. **https://htedu.maharashtra.gov.in/**

# सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासात कोकण रेल्वेची भूमिका

*विश्वास मुळीक*
*आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, विद्यापीठ विद्यार्थी भवन, 'बी' रोड, चर्चगेट, मुंबई*

**घोषवारा :**
कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा तेथील वाहतूक व दळणवळण व्यवस्थेवर अवलंबून असतो ग्रामीण विकासात याचे महत्व अधिक असते. हि व्यवस्था प्रभावी नसेल तर त्या भागाचा आर्थिक विकास खुंटला जातो. कार्यक्षम वाहतूक व दळणवळण व्यवस्था म्हणजे आधुनिक व विकसित अर्थव्यवस्थेचा पायाच असतो. या वाहतूक व्यवस्था प्रणालीत रेल्वेचा प्रथम क्रमांक लागतो. ज्या देशात रेल्वेचे जाळे अधिक विणले जाते त्या देशाची आर्थिक स्थिती मजबूत असते. कारण रेल्वेच्या रूळातून विकासाचा मार्ग जात असतो. मग तो शेती क्षेत्राचा असो औद्योगिक क्षेत्राचा असो किंवा ग्रामीण विकासाचा असो. रेल्वे आणि भौतिक प्रगती या गोष्टी हातात हात घालूनच चालतात. रेल्वेच्या प्रगतीमुळ केवळ आर्थिक व्यवस्था मजबूत होत नाही तर मानवाच्या सर्वांगीण विकासालाही फार मोठा हातभार लागतो.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याच्या पालघर जिल्ह्यातील डहाणू पासून केरळ राज्याच्या कन्याकुमारी पर्यंत कोकण प्रदेश आहे. परंतु महाराष्ट्र राज्यात डहाणू पासून दोडामार्ग तालुक्यापर्यंत कोकण प्रदेश ओळखला जातो. महाराष्ट्राच्या इतर भागापेक्षा कोकण प्रदेश हा तसा दुर्लक्षित राहिला. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नव्याने निर्माण झालेला पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग अशा सात जिल्ह्याचा कोकण प्रदेश असला तरी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्याचा कोकण प्रदेश हा अविकसित राहिला. हे तीन जिल्हे अविकसित राहण्याचे मुख्य कारण म्हणजे या जिल्ह्यात रेल्वेचा मार्गाच नव्हता. विकसित होत असलेल्या मुंबई-ठाणे जिल्ह्यापासून हे जिल्हे तुटले गेले. पूर्वापार पासून मानवी वस्ती उभी राहिली ती नदी किंवा समुद्रकाठ धरूनच आणि रेल्वेरुळाचा मार्गही टाकला तो नदी समुद्रकाठ धरूनच. परिणामी रेल्वेरुळाच्या बरोबरीने मानवाची प्रगती होत गेली.

डहाणू ते वेंगुर्ला हा ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा म्हणजेच महाराष्ट्रातील कोकण प्रदेश आहे. याच समुद्रकाठावरील भूप्रदेशावर मानवी वस्ती वसली. स्वातंत्र्यपूर्व काळापासून मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात टाकण्यात आलेल्या रेल्वे मार्गामुळे या दोन जिल्ह्याचा विकास होत गेला. स्वातंत्र्यानंतर २५ वर्षानंतर रायगड जिल्ह्यात रेल्वे मार्ग टाकण्यास सुरुवात झाली आणि रेल्वेच्या रूळाबरोबर रायगड जिल्ह्याची प्रगती होत गेली. मात्र रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे प्रगतीपासून दूरच राहीले.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हा निसर्गाने सर्वांगसुंदर असूनही या जिल्ह्याची आणि येथील मानवाची प्रगती झालीच नाही. १९८५ पासूनच सिंधुदुर्ग जिल्ह्यात विकासाचे वारे वाहत होते पण पायाभूत सुविधांमध्ये किंवा ग्रामीण विकासामध्ये सर्वात महत्वाचा घटक समजला जाणारा रेल्वेचा मार्गाच नसल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासाचा मार्गाच खुंटला गेला. ठाणे हा जिल्हा अतिशय सुलभ पद्धतीने मुंबई सारख्या जागतिक स्तरावरील शहराला केवळ रेल्वेमार्गानेच नव्हे तर उपनगरीय रेल्वेने जोडला आहे. त्या पाठोपाठ रायगडही जिल्हा रेल्वे आणि उपनगरीय रेल्वेने जोडला गेला. त्यामुळे मुंबई शहरातील सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रतिबिंब तत्काळ ठाणे, नव्याने निर्माण झालेले पालघर आणि रायगड या जिल्ह्यावर दिसून येते. यामुळे दोन्ही जिल्ह्याच्या औद्योगिक क्षेत्रात, पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाली, रोजगार उपलब्ध झाला.

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच चाकरमान्याच्या मनिऑर्डेरवरच सिंधुदुर्ग जिल्ह्याचे अर्थकारण अवलंबून होते. चाकरमान्यांची मनिऑर्डेर आली तरच त्या घरात महिन्याची चूल पेटत होती. या परिस्थितीमुळेच 'एसटी बस' आणि 'साकव' यापलीकडे कोकणी माणसाने कोणतीच मागणी केली नाही. कोकणचा विकास व्हावा असे कोकणी माणसाला फार पूर्वीपासून वाटत होते आणि यासाठीच तो बर्याचवेळा रेल्वेची मागणी करीत होता. पण डोंगरांच्या रंगांकडे सरकार बोट दाखवीत असे आणि या डोंगरामुळे रेल्वे येणे शक्य नाही असेही त्यांना वाटत होते. पण अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे २० व्या शतकाच्या अखेरीस कोकणात रेल्वे आली आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळाली. ज्याने फक्त साकवाची अपेक्षा केली त्याला रेल्वे आणि त्यामुळे होणारा औद्योगिक विकास मिळाला. कोकण रेल्वेच्या यशाची हि पहिली पावती आहे.

**रेल्वेचा इतिहास :**

जेम्स वॅटने उकळत ठेवलेल्या चहाच्या किटलीचे झाकण वाफेमुळे उडाले आणि जेम्स वॅटला वाफेच्या ताकदीची कल्पना आली त्या कल्पनेतूनच रेल्वेचे एवढे मोठे विश्व निर्माण झाले. जेम्स वॅटच नाव रेल्वेशी जोडलं गेल असल तरी फिल वाफेच इंजिन तयार केल ते ब्रिटनच्या ट्रेवीथीकन १८०४ साली. वेल्स प्रांतातील पेनिडारेन ते ग्लामोर्गन या मार्गावर हे इंजिन धावले. मात्र त्याच वजन खूपच असल्याने ते उपयोगात आणले गेले नाही. त्यानंतर जॉर्ज स्टिव्हेन्सन यांनी रेल्वेची बांधणी केली. आजच्या आधुनिक रेल्वेचे हे पहिले रूप. स्टॉकटन ते डालिर्गटन या ४३ कि.मी. च्या मार्गावर १८२१ साली हि रेल्वे धावली. या रेल्वेतून प्रवासी व मालवाहतूक करण्यासाठी ब्रिटीश संसदेने विशेष परवानगी दिली. स्टिव्हेन्सन लोकोमोशन नावाचे इंजिन ३१ डब्ब्याच्या गाडीला घेऊन पहिल्यांदा धावले. या पहिल्या धावेने रेल्वेचे युग सुरु झाले.

**भारतीय रेल्वे :**

१८४० सालापासून भारतातही रेल्वे मार्ग असावा असे वारे वाहू लागले. ठाणे आणि कल्याणशी मुंबई जोडावी अशी कल्पना १८४३ साली मुंबईचे मुख्य अभियंते जॉर्ज क्लार्क यांनी मांडली. त्यानंतर क्लार्क यांनी कुर्ला ते ठाणे असा प्रस्ताव तयार केला. अनेक प्रयत्नानंतर १ ऑगस्ट १८४५ रोजी ब्रिटीश संसदेने भारतीय रेल्वेला मंजुरी दिली. १४ नोव्हेंबर १८४९ रोजी जे.जे. बर्कल यांची निवासी अभियंते म्हणून नेमणूक झाली. ३१ ऑक्टोबर १८५० ला सायन जवळ रेल्वे मार्गाचा मुहूर्त झाला आणि १६ एप्रिल १८५३ या दिवशी भारतातील मुंबई ते ठाणे हि पहिली रेल्वे धावली. १४ डब्बे असणारी हि गाडी तीन इंजिनांनी ओढली. "सिंध, सुलतान आणि साहिल" अशी या तीन इंजिनाची नावे होती. दुपारी ३:३० वाजता हजारो लोकांच्या उपस्थितीत आणि २१ तोफांच्या सलामीने या रेल्वे प्रवासाला सुरुवात केली. गाडीत ४०० प्रवासी होते. ४:४५ वाजता हि गाडी ठाण्यात पोहोचली.

**स्वप्न सत्यात उतरले :**

२६ जानेवारी १९९७ साली सिंधुदुर्ग जिल्ह्याचा अखेरच्या 'सावंतवाडी' स्थानकापर्यंत कोकण रेल्वेची सेवा सुरु झाली. 'कोकण रेल्वे एक स्वप्न' असे म्हणणाऱ्या कोकणवासीयांना सुखद धक्का बसला. कारण कोकण रेल्वे होण्यासाठी १८६६ पासून सातत्याने सर्व्हे सुरु होता. १९६६ साली दिवा-पनवेल या २६ कि.मी. च्या मार्गाचे उद्घाटन झाले. त्यानंतर पनवेल ते आपटा आणि आपटा ते रोह या केवळ ८० कि.मी. मार्गासाठी तब्बल २० वर्षे लागली. १९८६ साली रोहापर्यंतचा मार्ग वाहतुकीसाठी खुला झाला. त्यानंतर १९८९ साली या मार्गाला पुन्हा चालना मिळाली. या मार्गाचे काम वेगाने व्हावे व निधी अभावी थांबू नये यासाठी केंद्र सरकारने **'Konkan Railway Corporation Ltd'** या कंपनीची स्थापना केली आणि **BOT (Build Operate and Transfer)** या तत्वावर या कंपनीकडे कोकण रेल्वेच्या मार्गाची जबाबदारी दिली. भारतीय रेल्वेच्या इतिहासात हे प्रथमच घडले होते. १५ सप्टेंबर १९९० साली रोह ते मंगलोर या ७६० कि.मी. मार्गाच्या कामाला सुरुवात झाली. या मार्गाच्या उभारणीसाठी महाराष्ट्र (२२ टक्के), गोवा (६ टक्के), कर्नाटक ( १५ टक्के) आणि केरळ (६ टक्के) अशा चार राज्यांचा आर्थिक सहभाग होता आणि उर्वरित (५१ टक्के) भारतीय रेल्वेने जबाबदारी स्वीकारली म्हणूनच खडतर असा मार्ग वेळेत पूर्ण झाला.

**फायदे तोटे :**

कोणत्याही प्रकल्पाचे जसे फायदे असतात तसे तोटेही असतात. कोकण रेल्वेही याबाबत अपवाद नाही. कोकण रेल्वेचा रोहा ते मंगलोर हा ७६० कि.मी. लांबीचा मार्ग पूर्ण करण्यासाठी निसर्गाची प्रचंड हानी झाली. किंबहुना निसर्ग चिरडून हि कोकण रेल्वे धावली असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. या मार्गासाठी एकूण ९२ ठिकाणी डोंगरांना भुयार पाडण्यात आले ज्यांची लांबी ८३ कि.मी. आहे. यातील सर्वात मोठा ६.५ कि.मी. लांबीचा भुयार हा महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील करबुडे या गावात आहे. नदी आणि नाल्यावर एकूण १ हजार ८१९ असे लहान मोठे पूल उभारण्यात आले. तर रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा येऊ नये यासाठी २४७ ठिकाणी रस्त्यावर पूल बांधण्यात आले. सर्वात लांब २०६५ मीटर लांबीचा पूल कर्नाटक जिल्ह्यातील होनावर येथील 'शरावती' नदीवर बांधण्यात आला. तर ६४ मीटर उंचीचा सर्वात उंच पूल रत्नागिरी जिल्ह्यातील पानवाळ नदीवर उभारण्यात आला. या मार्गासाठी येणाऱ्या डोंगरांचे अडथळे दूर करण्यासाठी ८८.७७ मिलियन क्युबिक मीटर खोदकाम करण्यात आले. मार्ग टाकण्यासाठी १ लाख टन रेल्वेरूळ टाकण्यात आले. तर १२ लाख ८७ हजार सिमेंट काँक्रीटचे स्लीपर्स बसविण्यात आले. या मार्गासाठी १० हजार २५ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली. तब्बल ६ हजार ३७५ पक्की घरे ९ हजार ४८१ सर्वसाधारण घरे जमीन दोस्त केली. १२४ विहिरी बुजविण्यात आल्या आणि सर्वात महत्वाचे म्हणजे २ लाख १ हजार २६० झाडे तोडण्यात आली त्यानंतरच कुठे कोंकण रेल्वे धावू शकली.

गेली २० वर्षे या मार्गावरून दर दिवशी ७८ प्रवासी गाड्या आणि ४ मालवाहतूक गाड्या मोठमोठ्याने शिट्या वाजवीत रूळांचा आवाज करीत धावत आहेत. त्यामुळे या मार्गाच्या आसपासच्या परिसरातील वन्य प्राणी व पक्षांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. मोजमाप करू शकणार नाही इतक्या मोठ्या संख्येने या मार्गावर वन्य जीवांचा मृत्यू झाला. अनेक वन्य प्राण्यांनी आवाजाच्या प्रदूषणामुळे स्थलांतर केले. सद्यस्थितीत कोकण रेल्वेच्या मार्गाच्या विद्युत्तीकरणाचे काम जरी सुरु असले तरी मागील २० वर्षात दर दिवशी धावणाऱ्या ७८ गाड्यांना वापरल्या जाणार्या डीझेल इंजीनांतून निघणार्या धुराचा येथील नैसार्गिक संपत्तीवर मोठा परिणाम झाला आहे. रेल्वे मार्गाच्या दुतर्फा ५-७ किलोमीटरच्या परीसारातील आंबा, काजू, जांभळे, करवंदे, केळी या सारख्या फळांच्या उत्पादनावर परिणाम झालेला आहे. दरदिवशी सरासरी ६० हजाराहून अधिक प्रवास करणाऱ्या प्रवासाचे मलमूत्र मार्गात पडल्याने संपूर्ण मार्गात दुर्गंधी निर्माण झाली आहे. नव्याने बसविण्यात आलेल्या 'बायो टॉयलेटमुळे' हि दुर्गंधी कमी होण्यास आता कुठे सुरुवात झाली आहे. त्याशिवाय खाण्यासाठी वापरलेल्या प्लॅस्टिक पिशव्या, फॉईल पाऊच, चहाच्या थर्मोकोलचे कप प्रवासी रेल्वे मार्गातच फेकत असल्याने हा कचरा पावसाळयात शेतकर्याच्या शेतात येतो आणि शेतातील निसर्गाचा समतोल ढासळतो.

**संशोधनाचा उद्देश :**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील 'इन्सुली' हे संशोधकाचे मूळ गाव आहे. संशोधकाच्या पाच पिढया याच गावातील असून ते शेतकरी कुटुंबातील आहेत. ग्रामीण विकास विषयातून एम.फिल. चा अभ्यास क्स्रताना संशोधकाने सावंतवाडी तालुक्यातील 'एकात्मिक बालविकास सेवा योजना' (I.C.D.S.) या विषयावर संशोधन केलेले आहे. 'सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासात कोकण रेल्वेची भूमिका' या विषयावर यापूर्वी कोणीही संशोधन केले नसल्याने या विषयावर संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**या शोध प्रबंधाचा प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे :**

१) कोकण रेल्वेच्या मार्गामुळे औद्योगिक व्यवसायात झालेल्या वाढीचा आढावा घेणे.

२) कोकण रेल्वेने येणाऱ्या प्रवाश्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधा आणि अडचणीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके :**

१) कोकण रेल्वेमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

२) कोकण रेल्वेमुळे जमिनीला चांगले भाव आले, पण कुटुंब व्यवस्था कमकुवत झाली.

३) कोकण रेल्वेमुळे रस्ते व इतर दळणवळणाच्या सोयीत वाढ झाली

४) कोकण रेल्वेमुळे वाहतुकीच्या वेळेत बचत झाली.

**संशोधन पद्धती :**

**सदर शोध प्रबंधासाठी खालील संशोधन पद्धतीचा वापर केला :**

**अ) प्राथमिक स्रोत :**

१) निरीक्षण पद्धत

२) नमुना निवड पद्धत

३) मुलाखत व चर्चा पद्धत

४) प्रश्नावली

**ब) द्वितीय स्रोत :**

१) दस्तऐवज

२) छायाचित्रे

**निष्कर्ष :**

**वरील संशोधन पद्धती वापरून मिळालेल्या माहितीचे परीक्षण करून खालील निष्कर्ष मांडले आहेत :**

**१) कोकण रेल्वेचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उद्योग समूहावर झालेला परिणाम :**

कोकण रेल्वेमुळे व्यावसायिकांना मुंबईतून सिंधुदुर्ग जिल्ह्यात सहजरीत्या येणे शक्य झाले आहे. तसेच कोकण रेल्वेने सुरु केलेली रो.रो. सेवा, मालवाहतूक सेवा याचा लाभ जिल्ह्यातील अनेक उद्योगांना झालेला आहे. यामुळे जिल्ह्यात अनेक लघु उद्योग नव्याने निर्माण होत असून तरुणांना जिल्ह्यातच रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

**२) कोकण रेल्वेचा जमिनीवरील किमतीवर परिणाम :**

कोकण रेल्वेचा मार्ग सुरु झाल्याने जिल्यातील उद्योग व्यवसायाला चालना मिळाली. यामुळे विविध व्यवसाय सुरु करण्यासाठी जिल्ह्यातील, जिल्ह्याबाहेरील आणि राज्याबाहेरील अनेक उद्योजकांनी स्थानिकांच्या जमिनी घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला स्थानिकांनी जमीन देण्यास नकार दिला परंतु उद्योजकांनी चढ्या भावात जीमिनी घायला सुरुवात केली. यामुळे आपसूकच जमिनीची किंमत वाढली. यामुळे पूर्वी जमीन विकताना एकराची किंमत सांगणारी स्थानिक जनता आज गुंठ्याची किंमत सांगू लागली व लवकरच जमिनीची किंमत चौ. फुटात सांगितली जाणार. या जमिनीच्या वाढत्या किमतींमुळे जमिनी विकताना वर्षानुवर्षे एकत्रित असलेली कुटुंब व्यवस्था दुभंगली गेली. कुटुंबातील एकाला जमीन विकणे गरजेचे वाटत होते तर दुसर्याला त्याची गरज नव्हती. यामुळे जमिनीची विभागणी झाली आणि ज्यांनी जमीन विकली ती कुटुंबे गावातील शहरात वास्तव्यास गेली.

**३) कोकण रेल्वेमुळे दळणवळणाच्या सोयीत वाढ झाली :**

कोकण रेल्व्च्या आगमनामुळे जिल्ह्यात पर्यटन, लघु उद्योग, घरबांधणी व्यवसाय तेजीत आले. यामुळे दळणवळणाच्या सोयीत वाढ करावी लागली. कोकण रेल्वेमुळे जिल्ह्यात येणाऱ्या लोकसंख्येत वाढ झाली. यामुळे एकेरी असलेला मुंबई गोवा हा राष्ट्रीय महामार्गहीचौपदरी करण्यास सुरुवात केली. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले-चिपी येथे विमानतळ

उभारून आंतराष्ट्रीय धावपट्टीही निर्माण करण्यात आली आहे.

**४) कोकण रेल्वेमुळे वेळेत झालेली बचत :**

| **मार्ग** | **मार्ग पूर्ण होण्यापूर्वी** | **मार्ग पूर्ण झाल्यावर** | **बचत** |
|---|---|---|---|
| मुंबई-मंगलोर | ४१ तास | १५ तास | २६ तास |
| मुंबई-कोचीन | ३६ तास | २४ तास | १२ तास |
| मुंबई-गोवा | २० तास | १० तास | १० तास |

**संदर्भ सूची :**

1. Indian's Railway Man – A Biography Of E. Sreedharan Rupa Publication India Pvt. Ltd. New Delhi 2017, Rajendra B. Aklekar

2. A Short History Of Indian Railways Rupa Publication India Pvt. Ltd. New Delhi 2019 Rajendra B. Aklekar

3. Halt Station India – The Dramatic Tale Of The Nation's First Rail Lines Rupa Publication India Pvt. Ltd. New Delhi 2014, Rajendra B. Aklekar

4. The Great Indian Railways – A Cultural Biography Bloomsbury Publishing India Pvt. Ltd. New Delhi 2018 Arup K Chatterjee

5. Around India In 80 Trains Roli Books Pvt. Ltd. New Delhi 2012 Monisha Rajesh

6. Around The World In 80 Trains Bloomsbury Publishing London 2019, Monisha Rajesh

7. A Dream Coming True,Konkan Railway Corporation Ltd. 1992

8. A Dream Came True, Konkan Railway Corporation Ltd. 1998, Menka Shivdasani, Raju Kane

9. A Treatise On Konkan Railway, Konkan Railway Corporation Ltd. 2002

10. Project Profile And Status Konkan Railway Corporation Ltd. 1998

11. भारतीय रेल्वे 'द टर्न अराउंड स्टोरी', अमेय प्रकाशन पुणे २००८ विवेक खरे

12. मेट्रोमॅन श्रीधरन रोहन प्रकाशन पुणे २०१६ एम. एस. अशोकने, अनुवाद अवधूत डोंगरे

13. रेलचक्र मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस ठाणे २०१२ व्यंकटेश बोर्गीकर

14. ट्रेन टू पाकिस्तान, चिनार पब्लिशर्स पुणे २००३ खुशवंतसिंग, अनुवाद अनिल किणीकर

# डॉ. पंजाबराव देशमुखांनी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी केलेले कार्य

***पंकज चंद्रशेखर जयस्वाल***
*संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

ब्रिटिशांची सत्ता भारतामध्ये स्थापन झाल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत फार मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे ब्रिटिशांनी सर्वप्रथम येथील कृषी क्षेत्राकडे आपले लक्ष केंद्रित केले. कृषी क्षेत्रातून जास्तीत जास्त महसूल गोळा करण्यासाठी त्यांनी जमीनदारी, स्त्री महालवाडी व रयतवाडी यासारख्या शोषणकारी पद्धती लागू करून शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण केले. तसेच इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्याने कारख्यान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाची पुर्तता करण्यासाठी पारंपरिक शेतीचे रुपांतर वाणिज्यिक शेतीमध्ये के◌ेले. शेतीतील कच्चा माल स्वस्त दराने विकत घेऊन इंग्लंडला पाठवत व इंग्लंडच्या कारखान्यातील पक्का माल भारतीय बाजापेठेत मोठ्या दराने विक्री करत असे. अशा असंतुलित व्यापाराने भारतीय शेतकरी दारिद्रय बनत गेला. त्यामुळे ब्रिटिश काळातच सर्वात जास्त आर्थिक शोषण भारतीय शेतकऱ्यांचे झाले. इंग्राजांबरोबर भारतातील सावकार, व्यापारी, अडते-दलाल इत्यादींनी सुद्धा शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण केले. यातूनच भारतामध्ये स्वदेशीची चळवळ उभी राहिली.

संपूर्ण भारतामध्ये शेतकऱ्यांची जी दयनिय अवस्था होती तीच अवस्था वऱ्हाडातील शेतकऱ्यांची होती. अवर्षण, दुष्काळ, आर्थिक मंदि, इंग्रज व सावकारांची हडपशाही इ. मुळे येथील शेतकरी होरपळून निघाला. अशा अत्यंत दयनिय अवस्थेतुन शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुखांनी पुढाकार घेतला. भाऊसाहेब देशमुख हे वऱ्हाडातील एक महान समाजसुधारक व पुरोगामी विचारवंत होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांची आर्थिक प्रगती साधण्यासाठी निरंतर कार्य केले. शेतकऱ्यांच्या आर्थिक क्रांतीतूनच भारतातील सामाजिक, राजकीय आणि वैचारिक क्रांती घडून येईल असे भाऊसाहेबांचे ठाम मत होते. त्यासाठी त्यांनी भारतीय शेतकऱ्यांना एकत्र केले आणि आर्थिकहिताच्या दृष्टिने त्यांच्या संरक्षणासाठी विविध कायदे करून भारतीय शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविले. प्रस्तुत शोधनिबंधात डॉ. पंजाबराव देशमुखांनी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी केलेले कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

### 1. शेतकरी संघ - (1927)

तत्कालीन वऱ्हाडमध्ये राष्ट्रीय पक्ष व ब्राम्हणेत्तर पक्ष हे दोन प्रमुख पक्ष होते पण दोन्हीही पक्ष परस्परविरोधी विचारसरणीमध्ये गुंतलेले असल्याने देशाचे आधारस्तंभ असलेली शेती आणि शेतकरी यांच्या समस्येकडे लक्ष्य देत नव्हती त्यामुळे येथील शेतकऱ्यांची अवस्था ही बीन मायेबापाच्या लेकरासारखी म्हणजेच अनाथासारखी झाली होती. त्यांच्यात कमालीचे दारिद्र्य, अज्ञान, भेदाभेद, बेकारी, अस्पृश्यता, व्यसने, रुढी-परंपरा, रोगराई, शोषण इत्यादी गोष्टी मोठ्या प्रमाणात होते. त्यांच्या या दयनिय अवस्थेचे कारण म्हणजे त्यांचा असंगठितपणा असल्याचे भाऊसाहेबांच्या लक्षात आले. तेव्हा डॉ. पंजाबराव देशमुखांनी भारतीय शेतकऱ्यांना एकत्रित व संगठित होऊन आपले न्याय व हक्क मिळविण्याकरिता, इ. स. 1927 मध्ये शेतकरी संघाची स्थापन केली. शेतकरी संघामध्ये सर्व जाती व धर्माचे लोक एकत्रित आले व अल्पावधितच या पक्षाने वऱ्हाड प्रांतात सत्ता स्थापित करून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने कार्य करण्यात सुरुवात केली व त्यांच्या हिताचे कायदे ही केले.

### सहकारी सोसायटी दुरुस्ती विधेयक - (1931)

सहकारी संघटना ही समान गरज असलेल्या व एकत्रितरित्या त्या गरजांची पूर्ती करू इच्छिणाऱ्या समविचारी व्यक्तिंनी ऐच्छिकरित्या संगठित होऊन स्थापन केलेली संस्था होय. भारतामध्ये ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची कर्जातुन सुटका होण्यासाठी श्री. फ्रेडरिक निकलसन याने इ.स. 1895 मध्ये शासनाला सहकारी सोसायटी संदर्भात एक निवेदन दिले ज्यानुसार 13 नोव्हेंबर 1904 रोजी अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ या ठिकाणी सहकारी संस्था स्थापन करण्यात आली.

सहकारी संस्था स्थापण्यामागचा उद्देश सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी आणि उत्पादन व

उत्पादन सामग्री विकत घेण्यासाठी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेकडून सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देणे हा होता. खेड्यातील बहुसंख्य शेतकरी सावकाराच्या भीतीने सहकारी बँकेकडेच धाव घेत. या कर्जाच्या मोबदल्यात त्याला आपली जमीन बँकेत गहाण ठेवावी लागे. पण दुर्दैवाने पहिल्या महायुद्धानंतर संपूर्ण जगात आर्थिक महामंदिची लाट पसरल्याने शेतकरी कर्ज फेडण्यास असमर्थ ठरले. मात्र बँकानी कर्जाची रक्कम जबरीने वसुलण्याचे धोरण अवलंबिले होते.

सहकारी बँकानी शेतकऱ्याकडील कर्जवसुलीसाठी चालविलेल्या मालमत्ता जप्तीच्या धोरणापासून शेतकऱ्याला संरक्षण देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुखांनी मध्यप्रांत वऱ्हाडचे मंत्री या नात्याने 1912 च्या कायद्यात संशोधन केले. संशोधनानुसार

1. या कायद्याला सहकारी सोसायटी दुरुस्ती विधेयक 1931 असे संबोधण्यात येईल.
2. शासनाचा जमीन महसुल वसुल करणे किंवा सहकारी सोसायटीकडून सदस्याने घेतलेले कर्ज वसुल करण्यासाठी जप्तीची कारवाई करावी लागल्यास ऋणकोला पुर्वसुचना देणे आवश्यक करण्यात आले.
3. कर्जदार मयत झाल्यास त्याचेकडील थकित कर्जवसुली वारसदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय वारसदाराकडून कर्जवसुली करता येणार नाही.

वरील तरतुदींमुळे सोसायटीला कर्जवसुलीसाठी निश्चित नियमांचा आधार मिळाला पण त्याचबरोबर कर्जदार शेतकरी याला कर्जफेडीची जप्तीपूर्वी सुचना मिळत असल्यामुळे त्याला कर्जफेडीची तरतुद करणे सोयीचे झाले व अचानक जप्तीचे संकट टळले.

**मध्यप्रांत कॉटन मार्केट विधेयक - (1932)**

वऱ्हाड प्रांत हा कापसाच्या उत्पादनासाठी अत्यंत प्रसिद्ध प्रांत होता. कापसाच्या बाबतीत या प्रांतात 'वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड' म्हणून संबोधित असत. वऱ्हाडातील अमरावतीची कापसाची बाजारपेठ त्या काळात आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ होती. महाराष्ट्र राज्याच्या सुमारे 66% कापासाचे उत्पादन आजही विदर्भात होते. कापूसच विदर्भाचे ऐश्वर्य आहे. परंतु 20 व्या शतकाच्या प्रारंभापासून कापसाच्या व्यवहाराची सुत्रे वऱ्हाडात गणेशदास राठी यांच्या हातात होती. अडते, दलाल आणि व्यापारी गणेशदास राठीच्या मर्जीतीलच असत. संपूर्ण आर्थिक सत्ता त्यांच्या आतात असल्याने निरक्षर शेतकऱ्यांची लुबाडणुक करून त्यांचा कापूस कवडीमोल किंमतीने विकत घेत असत. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती ही अत्यंत दयनिय झाली होती. मात्र 1930 साली भाऊसाहेब देशमुख वऱ्हाड प्रांताचे मंत्री झाल्यानंतर कापूस बाजारात काहिसा फरक पडायला सुरुवात झाली होती. शेतकऱ्यांच्या कापसाला व त्यांच्या श्रमाला योग्य भाव मिळावा व शेतकऱ्यांचे दारिद्र्य दुर व्हावे यासाठी भाऊसाहेबांनी 30 जानेवारी 1932 रोजी कॉटन मार्केट विधेयक मंत्रिमंडळामध्ये पारित करून घेतले. या विधेयकाचा मुख्य उद्देश 'धर्मदायाच्या व गोरक्षणाच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून बेकायदेशीपणे पैसा गोळा करणे. बंद व्हावे, वजन-मापे अगदी चोख असावी, शेतकऱ्यांना बाजार समितीत योग्य प्रतिनिधित्व असावे इत्यादी सर्व गोष्टी कायद्याने चालावे हा होता.' या कायद्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाला पायबंद घातला व कॉटन मार्केटच्या व्यवहारात पारदर्शता आल्याचे दिसून येते.

**कर्जलवाद बील आणि देवस्थान संपत्ती बील - (1932-33)**

डॉ. पंजाबराव देशमुखांनी 'कर्जलवाद बील' आणि 'देवस्थान संपत्ती बील' 1930-33 या काळात भारत ब्रिटिश साम्राज्याचा गुलाम असतानाच मांडलीत. या दोन बीलांनी भारतातील नेतृत्वाला भारताच्या स्वातंत्र्याची दिशा आणि स्वातंत्र्याचा कार्यक्रम दर्शविला होता. भारताचा शंभर वर्षाचा विचार करून त्यांनी ही दोन बीले मांडलीत. संपूर्ण भारतातून ही बिले मांडणारे भारतात एकटे डॉ. पंजाबराव देशमुखच होते. कर्जलवाद बील म्हणजे केवळ कृषकांच्या ऋणमुक्तीचा कायदा नव्हता तर ते डॉ. पंजाबराव देशमुखांनी रचलेली भारतातील कृषक-क्रांतीची पहिली वीट होती. कृषक ऋणमुक्त होणे याचाच अर्थ कृषकांचे अर्थबल, बुद्धिबल आणि संघटन बल वाढणे हा होता. आजही कृषकांना सतत कर्जबाजारी आणि दरिद्र ठेवण्याची जी वृत्ती आढळते तिचे मूळ कृषकांना सतत गुलाम ठेवण्याच्या वृत्तीत आढळते. परकीय गुलामगिरी एवढीच किंबहुना

त्यापेक्षाही भारतातील एतदेशियांची गुलामगिरी जास्त क्रुर व पाशवी असते. यामुळेच महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, बाबासाहेब आंबेडकर व डॉ. पंजाबराव देखमुख यांनी सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला. भारतीय कृषकांना बलवान करणे म्हणजे आधी त्यांना ऋणमुक्त करणे, नंतर त्यांना शिकविणे आणि पुढे त्यांना संघटीत करणे हे असे भाऊसाहेबांच्या कृषक क्रांतीचे सूत्र होते. डॉ. पंजाबराव देशमुखांनी भारतीय शेतकऱ्यांची सावकार, मध्यस्थ, दलाल, भांडवलदार, व्यापारी इत्यादी विरुद्ध कायदेशीर लढाई कर्जलवाद बिलाद्वारे केली. हे बील मंत्रिमंडळात पारित झाले व ते संपूर्ण भारतात पसरले. या विधेयकामुळे शेतकऱ्यांची 90% जमीन वाचली. डॉ. पंजाबराव देशमुखांनी हे बील जर पारित करून घेतले नसते तर वऱ्हाडात शेतकरी वर्गाचा विलय होऊन 80% मजूरांचा वर्ग दिसला असता.

भारतात ब्रिटिशशाही, भांडवलशाही व सावकारशाही याविरुद्धच्या लढ्यापेक्षा भटशाहीविरुद्धचा लढा अधिक कठीण आहे हे डॉ. पंजाबराव देशमुखांनी ओळखले होते. वऱ्हाड प्रांताचे मंत्री असताना डॉ. पंजाबराव देशमुखांनी जनकल्याणार्थ देवस्थान संपत्ती बील मंत्रिमंडळात मांडले परंतु हे बील पारित न होता फेटाळल्या गेले. देवधर्माच्या आडोशाने बसलेल्या शोषकांचा विजय झाला. हा सनातण्यांचा विजय होता आणि भारतीय कृषकवर्गाचा पराभव होता. साध्याभोळया भारतीय शेतकरी वर्गाला हे कळले नाही पण भाऊसाहेबांना त्वरित कळून चुकले. हा डॉ. पंजाबरावांचा पराभव नव्हता तर भारतीय जनतेचा पराभव होता.

डॉ. पंजाबराव देशमुखांनी देवस्थान संपत्ती बील तेव्हा आणले तेव्हा भारतीयांना शिक्षणासाठी आणि आरोग्यसंवर्धनासाठी धनाची गरज होती त्या काळात भारतातील सारी धनसंपदा देवस्थानात एकत्रित होत होती आणि सनातनी धर्मवेड, जातीवेड, पंथवेड निर्माण करून भारतीयांना आपापसात लढवित होते. त्यांना निरक्षरतेत व दारिद्र्यात जखडून टाकीत होते. डॉ. पंजाबराव देशमुखांनी या देवधर्मनिर्मित शोषणनीतीला आव्हान दिले आणि देवस्थान संपत्ती बील कायदेमंडळात मांडले. भारतातील व विदर्भातील देवस्थानांच्या संपत्तीला शिक्षणासाठी आणि आरोग्यासाठी वापरण्यात यावे याची कायदेशीर मागणी म्हणजे देवस्थान सपंत्ती बील होते. कायद्याने माणसाचे माणसाकडून होणारे शोषण बंद व्हावे ही कायदेशीर मागणी होती. भारतातील सावकारशाही व मध्यस्थाविरुद्ध जसे कर्जलवाद बील होते तसेच देवधर्मातील मध्यस्थाविरुद्ध देवस्थान संपत्ती बील होते. पण हे बील फेटाळले गेले. आम्हाला देवधर्माच्या नावावर संपूर्ण समाजाचे शोषण करण्याचा अधिकार आहे ही सनातनी नीती यशस्वी झाली. देवस्थान संपत्ती बील फेटाळल्याचे परिणाम आजही स्वतंत्र भारताला भोगावे लागत आहेत.

देवस्थान संपत्ती बील 1932 साली जर पारित झाले असते तर भारतीय समाजनीतीला एक निरोगी दिशा मिळाली असती. भारतातील जातीवेड, धर्मवेड, प्रदेशवेड, अस्पृश्याता यांना पायबदं बसला असता, त्यामुळे भारताची फाळणीच झाली नसती. फाळणीची बीजेच या बीलामुळे नष्ट झाली असती. भारतात धार्मिक, जातीय व सामाजिक सलोखा निर्माण होऊन शास्त्रीय राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली असती. स्त्री शिक्षणाचा प्रसार होऊन जुनाट रुढी, परंपरा, बुवाबाजी यातुन त्यांना पर्यायाने भारताच्या बालपिढीला मुक्त करता आले असते. परंतु दुर्दैवाने हे बील पास होऊ शकले नाही. आज स्वतंत्र भारत अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्य, भेदभाव, भ्रष्टाचार, दासवृत्ती, परावलंबन, शोषण, विषमता, लोकसंख्येची बिकट समस्या, बेकारी, बुवाबाजी इत्यादी समस्यात अडकून पडला. असह्य अज्ञान व असह्य दारिद्र्य समाजावर लादले गेले. देवस्थान संपत्ती बील यशस्वी होणे म्हणजे कृषक क्रांतीचे तत्वज्ञान यशस्वी होणे होते परंतु होऊ शकले नाही.

अशाप्रकारे डॉ. पंजाबराव देशमुख भारतीय शेतकऱ्यांचा आर्थिक व सर्वांगीण विकास करण्यासाठी अहोरात्र झटत होते. भाऊसाहेब शेतकऱ्यांचा विकास म्हणजेच देशाचा विकास मानत होते. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या प्रत्येक समस्या सोडविण्यासाठी पंजाबराव हजर असत. भाऊसाहेबांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याबद्दल राष्ट्रपिता महात्मा गांधी पंजाबराव देखमुखाबद्दल गौरवोद्गार काढताना म्हणतात. "शेतकऱ्यांची सेवा करणे सोपे आहे. त्यासाठी सोपे कायदे, साधे शिष्टाचार व

सरळ माणसे हवी आहेत. हे तीनही गुण अंगीकारलेला डॉ. पंजाबराव देखमुख हा कदाचित भारतात या युगातला एकमेव असावा, ज्याने पद, प्रतिष्ठा व पैसा यांना तुच्छ लेखून आपला जीवनयज्ञ चेतवला."

**संदर्भसूची**

1. अंधारे रमेश (संपा.), *मुद्रा महाराष्ट्राची*, मुद्रक इंडिया प्रिंटीग वर्क्स, मुंबई, पहिली आवृत्ती, 07 जानेवारी 2010.
2. कडवे रघुनाथ, *भारत कृषक भूषण : भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख*, संस्कार प्रकाशन, नागपुर, प्रथमावृत्ती, 1986.
3. कारंजकर भि. दे., *नवशे वर्षाचा अमरावती शहराचा इतिहास*, भाग पहिला व दुसरा सचित्र, सुदिप प्रिंटर्स, अमरावती, प्रथमावृत्ती, 1978.
4. मोहिते उत्तमराव, *जागतिक कृषकक्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख*, भाग्यरेखा देशमुख, अमरावती, प्रथमावृत्ती, 1983.
5. सावरकर सुदाम, सूर्यकर रा. ब., *भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देखमुख जीवन व कार्य*, खंड 1 व 2, शं. रा. लोंढे, अमरावती, प्रथमावृत्ती, 1964.

# साहित्य आणि चळवळी

*प्रा.रामचंद्र गायकवाड*
*पानसरे महाविद्यालय, अर्जापूर, ता. बिलोली*

साहित्य समाज प्रबोधनाच्या दृष्टीने समाजाची मशागत करीत असते. म्हणून ज्या काळात सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी झालेल्या असतील त्याची निसंकोचपणे व निपक्षपातीपणे नोंद घेतली गेली असेल तर ती एका दृष्टीने भविष्यकालीन एकसंघ एकजिव समाजाची बांधणी व राष्ट्रब्बोधणीच्या उपयोगी पडत असते, आणि जर ती नोंद योग्यवेळी घेतली गेली नसेल तर समाज एका चांगल्या विचाराबरोबरच कलाकृतीला पण मुकत असतो. इतिहासाच्या प्रत्येक वळणावर घडून गेलेल्या घटनापासून समाज जर अनभिज्ञ राहिला तर समाजात काही विघटनकारी अपप्रवृती बळावत ल जातात. परिणामी वर्तमानस्थितीत इतिहासाचे विकृतीकरण घडून आणून समाजाला आपापसात दुभागले जाते. ही कधीही भरून न येणारी समाजाची हानि होत असते. म्हणून इतिहासाच्या प्रत्येक टप्यावर न दुर्लिक्षिता ज्या समाजहितैशी चळवळी होत असतात त्याची नोंद घेतली तर समाजिक चळवळीसाठी सकस साहित्याची निर्मिती होत असते.

1919 ते 1956 या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा एक झंजावस भारतात ज समाजबदलाच्या संदर्भात चालु होता. तो झंजावत ‘दलित मुक्तीची चळवळ होती. हा झंजावत फक्त साहित्याच्या स्वरूपात नव्हता तर प्रत्यक्ष कृती कार्यक्रमही होता, त्यांनी आपल्या कार्याचा आरंभ 'बिहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून केला होता. त्यांच्या कार्याचे स्वरूप आंदोलनाची गरज म्हणून साधन स्वरूपात संघटना व नियतकालिक असे होते. या पाश्वभूमीवर ‘महाडचा सत्याग्रह' ते धर्मांतराची चढवळ-धम्मचक्र प्रवर्तन हा चळवळीचा एक मोठा पल्ला आहे. हिंदू समाज व्यवस्थेच्या विरुध्द चालविलेला ‘दलितांचा मुम्ती लढा' हा खऱ्या अर्थाने मानवमुक्तीचा लढा होता. 19 व्या शतकात भारतात घडून आलेल्या राजकीय व सामाजिक चळवळीत दलितांच्या प्रश्नांची दखल कोणी अवर्जून घेनली नव्हती. त्यामुळे दलित मुक्ती लढ्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत

योगदान दिलेल्या दलितेत्तरांच्या सहभागाची दखल आजवर स्वतंत्रपणे या चळवळीच्या व इनर अभ्यासकांनी ही घेतलेली आढळत नाही. विजय सुरवाडे लिखित (संपा) समकालीन सहळाऱ्यांच्या आठवणीतील डॉ. की बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथात दलित्तेतरांचा तळटीपाच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला. तर कवी योगीराज वाघमारे यांचा एक ग्रंथ दलित चळवळीतील दलितेत्तरांचे योदान' नुकताच प्रकाशित झाला. परंतु स्वतंत्रपणे चरित्राच्या स्वरुपात लिखान झाले नाही. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला पुरक साहित्य उपलब्ध झाले नाही. ही एक मोठी फार मोठी शोकांतिका आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरां शुद्रातिशुद्राच्या मुक्तीचे कार्य करीत असताना विविध पातळ्यांवर अविरत प्रयत्न करावे लागले. यासाठी त्यांनी ‘बहिष्कृत हितकारिणी सभा', 'मुकनायक', 'बहिष्कृत भारत’, ‘महाडचा सत्याग्रह', 'काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन', 'पुणे करार', 'जनता', 'स्वतंत्र मजूर पक्ष', 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन', 'संविधान सभेतील कार्य' आणि धर्मांतर अशा विविध पातळ्यावर/आघाड्यावर कार्य करावे लागले आहे. हेच खऱ्या अर्थाने अस्पृश्यांच्या

मुक्तीसंग्रामाचे मुलस्त्रोत आहेत. वरील सर्व आघाड्यावर शुद्रातिशुद्र अस्पृश्याच्या मुक्ती लढ्यात डॉ.बाबासाहेब

आंबेडकर एकटे नाहीत ज्यांच्यासाठी हा लढा संपूर्ण देशभर चालवला गेला तो समाज शतकानुशतके अन्याय अत्याचार सहन करीत सामाजिक बंधनात जखडून आज्ञानात खितपत पडला होता. त्यामूळे या समाजातून सहकार्य मदत म्हणजे दगडावर डोक आपटून रक्त बंबाळ होण्याचाच प्रकार होता. म्हणून त्यांनी चालवलेल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थे विरुध्दच्या शुद्रातिशुद्र-अस्पृश्यांच्या मुक्ती लढ्यात काही दलितेत्तर सहभागी झाले होते. जे जन्माने उच्चकुळीत आहेत. ज्यात प्रामुख्याने रावसाहेब बोले, आचार्य दोंदे, भाई अनंत, विनायक अत्रे, भाई सुरबा टिपणीस, ग.नि. उर्फ बापुसाहेब सहस्त्रबुध्दे, डी.व्ही. प्रधान, भास्कर कद्रेकर, देवराव नाईक, मडके बूवा, हिंदू धर्माभिमानी श्रीधरपंत टिळक, प्रबोधनकार ठाकरे, भाईसेठ वडके, प्राचार्य म.भि. चिटणीस, नवल एम.भतेना, कमलाकांत चित्रे, आदीचा समावेश होता. तत्कालीन परिस्थित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत राहून शुद्रातिशुद्राच्या चातुर्वर्ण्यव्यस्थेतून मुक्त करण्यासाठी कार्य करणे सोपे व सहज नव्हते. तत्कालीन समाज हे कदापीही सहन करणारा नव्हता. असे असतानाही त्यांनी या लढ्यात स्वत:ला झोकून दिले होते. त्यांना उच्चवर्णीय समाजाच्या रोषाला किती प्रमाणात सामोरे जावे लागले असेल याची कल्पनाही करु शकत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या शुद्रातिशुद्राच्या दलित मुक्ती लढ्यात दलितेत्तरांनी जी कामगिरी केली ती आजवर फक्त दलित चळवळ म्हणूनच प्रसिध्द आहे. या दलित चळवळीच्या संदर्भाने जे लेखन झाले त्यात यांच्या कार्याच्या संदर्भाने चरित्रात्मक स्वरुपात स्वतंत्रपणे कोणीच दखल घेतलेली नाही. चांगदेव खैरमोडे लिखित 'डॉ.भिमराव रामजी आंबेडकर, चरित्र, खंड 1 ते 12, सुरवाडे विजय संपादित 'पत्रव्यवहारातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर, खंड 1, 2 व समकालीन अत्यंत त्रोटक स्वरुपात उल्लेख करण्यात आला आहे. त्यांच्या कार्याची व त्यांनी घडवून आणलेल्या परिवर्तनाची दखल आजपर्यंत कोणत्याच लेखकांनी व संशोधकांनी व्यापक स्वरुपात घेतलेली नाही.

या पार्श्वभूमीवर अनंत विनायक चित्रे यांच्यावर यांच्याच मुलाकडून त्यांच्या मृत्यूनंतर 6 लिहिलेले 'वेगळ्या वाटेचा प्रवासी-(अनंत विनायक उर्फ भाई चित्रे) हे अक्षर प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केलेले चरित्र सामाजिक चळवळीच्या अभ्यासक व कार्यकर्ते यांच्यासाठी एक मैलाचे दगड ठरले तर ते नवलच ठरावे असे आहे.

अनंत विनायक चित्रे यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या शुद्रातिशुद्राच्या दलित मुक्ती लढ्यातील महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात 'भाई अनंत चित्रे आघाडीचे वीर' होते. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना व या पक्षाला अस्पृश्य समाजापूरते मर्यादित न ठेवता अस्पृश्येत्तर श्रमजीवी वर्गाचही प्रतिनिधीत्व करावे यासाठी व्यापक स्वरुप प्राप्त करुन देण्यात चित्रे भाईचे मोलाचे योगदान राहिले आहे. म्हणून त्यांनी 1937 ची मुंबई प्रांतिक विधीमंडळाची निवडणूक रत्नागिरी जिल्हा उत्तर विभागातून लढविली होती. जनता पत्राचे संपादक भास्कर कद्रेकर असले तरी एकूण 23 अग्रलेख चित्रे यांनी लिहिलेले होते. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चालविलेल्या 'खोती' विरुध्दच्या चळवळीत भाई चित्रे यांनीही हिरारीने भाग घेतलेला होता. म्हणून वेगळ्या

वाटेचा प्रवासी' हे चरित्र पुन्हा एकदा 'जात्यांच धर्माभिमानी झालेल्या लोकासाठी एक प्रेरणा देणारे आहे.

श.अ. चित्रो लिखित 'वेगळ्या वाटेचा प्रवासी' हे चरित्र एकूण 213 पेजेसचे आहे. याची सुरुवात कविवर्य 'बी' यांच्या 'फुलांची ओंजळ' या कवीता संग्रहातील तीव्र जाणीव' या कवीतेच्या ओळीने केलेली आहे. या ओळी आजच्या संदर्भात फार सुचक आहेत. त्या ओळी अशा आहेत.

का ब्राह्मणवाद नित्य आमुच्या मार्गी पडे आडवा
याचा सारविचारबोध अझुनी आम्हा नको का हवा ?
नान धर्मविमोह निर्मूति जनां केले निसर्गच्युत,
ती कालोपहाता समाजघटना कामा न ये सांप्रत!

श.अ. चित्रे यांनी आपल्या वडिलांविषयीचे त्यांच्या मृत्यूनंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे एकनिष्ठ सहकारी मुंबईचे माजी महापौर डॉ.पी.टी.बोराळे यांच्या आग्रहावरुन लिहिले आहे. असे त्यांनी या चरित्रात उल्लेख केलेला आहे.

भाई चित्रे यांचा जन्म त्यांच्या आजोळी 1 मे 1984 रोजी दापोली येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण पोलादपूर, दोपाली, महाड येथे झाले तर महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात 'फर्ग्युसन कॉलेज' व मुंबईतील विल्सन कॉलेज मध्ये झाले आहे. श.अ.चित्रे या चरित्रात लिहितात की, बाबांचा, मुंबईतील वास्तव्यात अनेक चांगल्या व्यक्तींशी आणि पुरोगामी विचारांच्या सामाजिक सुधारकांशी संबंध आला. त्यावेळी मुंबईतील तरुण होलिकोत्सव साजरा करीत. परंतु या उत्सवाला आलेले बीमत्स स्वरुप न पहावल्याने त्या तरुणांना संघटीत करुन 11 मार्च 1991 मध्ये एक संमेलन भरविले. याचे अध्यक्ष न्या.नारायणराव चंदावरकर होते. याच संमेलनात 'सोशल सर्व्हिसलीगची स्थापना करण्यात आली. या संदर्भात शरद चित्रे असे म्हणतात की, 'बाबांनी आपल्या पुढच्या आयुष्यात अस्पृश्यांना सामाजिक समतेच्या लढ्यासाठी उद्यूक्त करण्याची महत्वाची कामगिरी केली.

वेगळ्या वाटेचा प्रवासी या चरित्र ग्रंथात एकूण 19 प्रकरणे असले तरी अभ्यासाच्या सोईसाठी व महत्वाचे म्हणून या चरित्र ग्रंथाची या ठिकाणी महाडचे चवदार तळे सत्याग्रह, शेतकरी व कामगार चळवळ आणि इतर सामाजिक घडामोडी यात भाई चित्रे यांचा सहभाग काय राहिला आहे या दृष्टीने अभ्यास करण्यात आला आहे. वर्तमान व भविष्यकालीन सामाजिक परिवर्तनाचे कार्य करण्यासाठी हे पुस्तक अभ्यासकांना व कार्यकत्यांना एक प्रेरणा देणारे आहे.

संदर्भ:

1. वेगळ्या वाट वेगळ्या वाटेचा प्रवासी अ. वि. चित्रे, लेखक शरद चित्रे

# आधुनिक महिलांचा आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याविषयीचा अभ्यास

**डॉ. सौ. हेमलता आनंद सावंत**

सहाय्यक प्राध्यापिका, भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण -रायगड

**सारांश –**

आधुनिक काळातील महिलांचा झालेला विकास पाहता त्या आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या निर्णयक्षम असाव्यात असे दिसते. महिला मोठ्या प्रमाणात स्वतंत्र झालेल्या दिसतात. नोकरी आणि व्यवसाय करणाऱ्या महिलांचा अभ्यास मुख्यतः असे स्पष्ट करतो कि स्त्रिया आर्थिक दृष्ट्या आणि राजकीय दृष्ट्या स्वतंत्र निर्णय घेऊ लागल्या आहेत.

**विषयाची ओळख-**

आधुनिक काळातील महिलांचे आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य यामध्ये काळाबरोबर बदल झालेला दिसतो याविषयी या लेखात अभ्यास करण्यात आला आहे

**महत्व आणि उद्दिष्ट-**

महिला सबलीकरणामध्ये महिलांना आर्थिक व राजकीय दृष्टीने स्वावलंबी बनवण्याचे धोरण आखण्यात आले आहे प्रत्यक्षात हे धोरण यशस्वी झाले आहे का अभ्यासणे हेच या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे

**अभ्युपगम-**

आधुनिक काळातील महिला आर्थिक व राजकीय स्वातंत्र्या विषयी जागरूक बनल्या आहेत.

शहरी आणि सुशिक्षित महिलांना आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झालेले दिसते.

**संशोधन पद्धती-**

या अभ्यासासाठी सर्वेक्षणाची पद्धती वापरण्यात आली आहे. हे सर्वेक्षण google formच्या साहाय्याने केलेले आहे. त्यामुळे शहरी आणि सुशिक्षित स्त्रियां पुरतेच हे सीमित झाले आहे.

**माहितीचे विवेचन-**

आधुनिक काळात स्त्रीपुरुष समानतेबद्दल सर्वत्र जागृती निर्माण झालेली दिसते जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील स्त्रीचे दुय्यमत्व संपुष्टात आणून स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करण्याचा आज अनेकविध दृष्टीने प्रयत्न केला जातो. स्त्रियांचा विकास आणि कल्याण यादृष्टीने अनेक स्वरूपाचे प्रयत्न केले जातात. स्त्रीला स्वावलंबी बनवण्यासाठी शिक्षण आणि नोकरी किंवा व्यवसाय यांची सांगड घालून व्यक्तिमत्व विकासाबरोबरच स्त्रियांना स्व प्रतिष्ठा प्राप्त करणे याला आज महत्त्व प्राप्त झाले आहे. आर्थिक स्वावलंबनातून इतर सर्व स्वावलंबनाचे मार्ग मोकळे होतात याची जाणीव झाल्यामुळेच स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या सहा-सात दशकांत स्त्रियांच्या शिक्षणाचे आणि अर्थार्जनाचे मार्ग मोकळे झालेले दिसतात.

महिलांना आर्थिक व राजकीय दृष्टिकोनातून निर्णय क्षमता प्राप्त होते का हे तपासून पाहण्यासाठी उत्पन्नाचे नियोजन, आर्थिक व्यवहार, आयकर नियोजन, मतदानाचा हक्क, राजकीय पक्षांविषयीची माहिती व योग्यायोग्यता. राजकारणातील सहभाग याविषयी सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणात नोकरी व व्यवसाय करणाऱ्या ६९.०३%तर ३०.९७% गृहिणींचा समावेश आहे. यातील प्रश्नानुसार माहीतीचे वर्गीकरण तक्त्यात केले आहे

**आर्थिक स्वातंत्र्य**

| | उत्पन्नाचे नियोजन | बँकेतील आर्थिक व्यवहार | | स्थावर मालमत्ता | वेतन खर्चाचे स्वातंत्र्य |
|---|---|---|---|---|---|
| स्वतः | २३.०१% | ७१.०४% | होय | ५७.०१% | ९२.०३% |
| पती | २३.०१% | २८.०६% | नाही | ४२.०९% | ७.०७% |
| दोघेजण | ५३.०८% | | | | |

**राजकीय स्वातंत्र्य**

| | मतदानाचा हक्क | राजकीय पक्षांविषयी जागृती | स्वतंत्रपणे मतदान | राजकारणात प्रवेश |
|---|---|---|---|---|
| होय | १००% | ९२.०९% | १००% | १३.०३% |
| नाही | | | | ८६.०७% |

**निष्कर्ष-**

आधुनिक काळात स्त्रिया आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात स्वतंत्र  व स्वयंपूर्ण झालेल्या आहेत असे या अभ्यासातून स्पष्ट होते.

**संदर्भ:-**

1. *https://maharashtratimes.com/business/business-news/financial-independence-of-women/articleshow/74515488.cms*
2. *https://www.loksatta.com/chaturang-news/nagpur-bhagini-mandal-founder-anusuya-272037/*

**Chief Editor**

Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**Guest Editor**

Dr. R. B. Chougule
I/C Principal,
Kankavli College, Kankavli, (Maharashtra)

**Executive Editors**

*Dr. S. N. Patil*
*Dr. R. A. Mumbarkar*
*Mr. Y. V. Mahalinge*

**Co- Editors**

*Dr. S. D. Kadam*
*Lt. (Dr.) B. L. Rathod*
*Mr.T.N.Jaykar*

**Editorial Board**

| | | |
|---|---|---|
| *Dr. A. K. Farakate* | *Dr.B.G.Gawade* | *Dr. S. T. Disale* |
| *Mr. S. B. Patil* | *Mr. S. S. Rane* | *Dr. M. P. Chavan* |
| *Mr. G. A. Tekale* | *Mr. S. M. Sonawane* | *Mrs. V. V. Rasam* |



**Address**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102